# १

# भारतीय ग्रामीण समाज
# स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**पाठाची रूपरेषा**

१.० पाठाचे उद्देश

१.१ प्रास्ताविक

१.२ ग्रामीण समाजाचा अभ्यास

१.३ ग्रामीण समाजाचे स्वरूप

१.४ ग्रामीण समाजाच्या व्याख्या

१.५ भारतीय ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये

१.६ स्वाध्याय

## १.० पाठाचे उद्देश

- भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास करणे.
- ग्रामीण समाजाचे स्वरूप समजावून घेणे, घटक समजावून घेणे.
- ग्रामीण समाजाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
- ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

## १.१ प्रास्ताविक

ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास भारताच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा ठरतो. कारण खऱ्या अर्थाने भारत हा ग्रामवासीयांचाच देश समजला जातो. शेती हाच येथील प्रमुख व्यवसाय आहे. २००१ च्या शिरगणतीनुसार भारतात ७८ टक्के लोक ग्रामीण क्षेत्रात राहत असून त्यापैकी ७४ टक्के लोक शेतीवर उपजीविका करताना दिसतात. भारतात ६ लाख ५ हजार खेडी आहेत. भारताचा अतिप्राचीन इतिहास क्लिष्ट अशी समाजरचना, भारतीय धार्मिक जीवन व संस्कृती याचे आकलन होण्याकरिता या समाजातील ग्रामीण क्षेत्रास आधार मानून त्याचे सखोल अध्ययन करणे आवश्यक आहे.

औद्योगिकीकरण, नागरीकरण, पाश्चिमात्य विचारसरणी यामुळे स्वतंत्र व स्वयंपूर्ण असलेल्या भारतीय ग्रामीण, आर्थिक व सामाजिक जीवनात आज जलदगतीने परिवर्तन होत आहेत. तसेच विचारप्रणाली, राहणी, वेशभूषा, रीतिरिवाज व संस्कारात बदल होत असल्यानेही या क्षेत्राच्या शास्त्रीय अभ्यासाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय समाजाची महत्त्वाची तीन वैशिष्ट्ये - ग्रामीण समाज, जातीव्यवस्था, कुटुंबसंस्था, शंभर कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या आपल्या देशामध्ये ही वैशिष्ट्ये सार्वत्रिक आढळतात. आपल्या देशातील असा एकही प्रदेश नाही, की ज्या ठिकाणी ही वैशिष्ट्ये आढळत नाहीत. म्हणून त्यांना खास वैशिष्ट्ये संबोधण्यात आलेले आहे.

यापैकी ग्रामीण समाजाचा आपणाला अभ्यास करावयाचा असून या समाजाचा अर्थ आणि भारतीय ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये या गोष्टींवर विशेष भर देण्यात आलेला आहे.

## १.२ ग्रामीण समाजाचा अभ्यास

सर्वसाधारणपणे ग्रामीण समूहाचे स्पष्टीकरण नागरी समूहाच्या संदर्भात केले जाते. जे नागरी नाही ते ग्रामीण असे म्हणता येईल. राष्ट्रीय जनगणनेत ग्रामीण व नागरी समूहात जनसंख्येच्या आधारावर भेद केला जातो. अमेरिकेत ज्या समूहास २५०० पेक्षा कमी लोकसंख्या आहे त्या समूहास ग्रामीण समुदाय मानतात, तर भारतात ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेले क्षेत्र ग्रामीण ठरते. अथांग अशा खेडुतांच्या लोकसंख्येने वसलेल्या भारतीय ग्रामीण समाजाला आज अनेक प्रश्नांनी ग्रासलेले असून या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या कामी शासन सर्वतोपरी कटिबद्ध आहे. निरक्षरता, अंधश्रद्धा, दारिद्र्य, वाढती लोकसंख्या, अनारोग्य, वेठबिगारी या समस्या ग्रामीण समाजाच्या प्रमुख समस्या आहेत. ग्रामीण समाजशास्त्र ही एक समाजशास्त्राची शाखा असून समाजाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास १९१६ पासून करण्यात येऊ लागला. याच कालखंडात ग्रामीण समाजजीवनावर विचारवंतांनी विपुल लेखन केले आणि या विषयात मोलाची भर घातली. सोरोकिन, झिम्मरमन, गॅल्विन, टेलर इत्यादी अमेरिकन विचारवंतांच्या बौद्धिक प्रयत्नामुळे ग्रामीण समाजाच्या अभ्यासाला चालना मिळाली. आज आपण ज्या ग्रामीण समाजामध्ये वास्तव्य करतो त्या ग्रामीण समाजाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. मानवी जन्मापासून इ. पूर्व ५००० पर्यंत इतिहास काळ संबोधला जातो. सुरूवातीला मानव जन्माला आला त्यावेळी तो रानटी अवस्थेत होता. तो कच्चे अन्न खात होता. वल्कले नेसत होता. नव्या अश्मयुगामध्ये इ. सन पूर्व १५०० मध्ये धान्य पेरल्यानंतर उगवते आणि धान्य येते. या गोष्टीचा मनुष्याला शोध लागला. दरम्यानच्या काळात त्याला अग्नीचा शोध लागला. त्यामुळे मानवाची भ्रमंतीची अवस्था संपली त्याला स्थैर्यत्व प्राप्त झाले. कृषी व्यवसाय ग्रामीण समाजाचा प्रमुख पाया ठरला. खेड्याच्या निर्मितीच्या दृष्टीने ही घटना जबाबदार ठरली. तो समाजव्यवस्था निर्माण करून वास्तव्य करू लागला. संसारासाठी आवश्यक गोष्टींची तो जमवाजमव करू लागला. कला, तत्त्वज्ञान या गोष्टींना त्याने जन्म दिला. वैवाहिक नाते संबंध निर्माण करू लागला आणि शेती व्यवसायातून खेड्याचे जीवन सुरू झाले शेती व्यवसायातून संस्कृती निर्माण झाली.

जगातील संस्कृतीची निर्मिती ही नदीकाठी झालेली आढळते. परंतु सर्वच खेडी काही नदीकाठी नाहीत. काही खेडी घनदाट जंगलाच्या परिसरात, तसेच डोंगर पायथ्याजवळ वसलेली आढळतात. या संदर्भात प्राचीन धर्मग्रंथामध्ये उदाहरणार्थ - ऋग्वेद, महाभारत, मनुस्मृती, कौटिल्याच्या अर्थशास्त्रात, ग्रामीण समाजशास्त्राचे अतिशय सुरेख वर्णन केलेले आढळते.

## १.३ ग्रामीण समाजाचे स्वरूप

ग्रामीण समाजाच्या ज्या ठळक बाबींचा ग्रामीण समाजशास्त्राने स्वतंत्रपणे अभ्यास केलेला आहे. त्यालाच ग्रामीण समाजाचे स्वरूप असे म्हटले आहे.

जगातील बहुतांश लोक ग्रामीण समुदायात वास्तव्य करतात. त्यांचे जीवन शहरी समुदायातील लोकांच्या तुलनेने मागासलेले आढळते. कित्येक ग्रामवासियांच्या पुढे आज अनेक प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय समस्या उभ्या आहेत. अशा परिस्थितीत ग्रामीण जनतेच्या समस्या समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणे निकडीचे ठरले आहे. त्याकरिता ग्रामीण समाजाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करून, त्याद्वारे ग्रामीण जीवनातील विविध घटना व प्रक्रिया यांचे सखोल अध्ययन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

ग्रामीण समाजामध्ये आढळणाऱ्या ठळक बाबींचा अभ्यास करणे म्हणजेच ग्रामीण समाजाचे स्वरूप समजावून घेणे होय. ग्रामीण व नागरी समाजातील भेद, पारंपरिक ग्रामीण समाज खेड्यातील कुटुंबसंस्था, जातीव्यवस्था, बलुतेदारीपद्धती, ग्रामीण आर्थिक जीवन, ग्रामीण मनोरंजन, ग्रामीण धर्म, ग्रामीण वर्गरचना, ग्रामीण पुनर्रचना व जमीन सुधारणा, भूदान चळवळ, ग्रामीण शिक्षण, पंचायत राज इ. ठळक बाबींचा सखोल अभ्यास करणे अनिवार्य ठरते. या करिता एका विशिष्ट शास्त्राचा जन्म झाला असून त्याला ग्रामीण समाजशास्त्र असे म्हटले आहे.

ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना या शाखाने पुढील गोष्टींवर विशेष लक्ष वेधले आहे.

**ग्रामीण समुदायाचा अभ्यास :**

ग्रामीण समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौतिक, अभौतिक जीवनाचा, ग्रामीण समाजाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात केलेला आढळतो.

**ग्रामीण समाजरचना :**

ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास करताना भौतिक रचनेनुसार खेड्याचे जे वेगळे प्रकार पडतात त्यांचाही विचार ग्रामीण समाजशास्त्रात केला जातो.

**ग्रामीण सामाजिक संघटना :**

ग्रामीण सामाजिक संघटना म्हटले की, त्यांच्यामध्ये कुटुंब, विवाह, जाती, वर्ग, इ. चा समावेश आढळतो. त्यांची वैशिष्ट्ये, कार्ये, त्यांचे बदलते स्वरूप या सर्वांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्र करते.

**ग्रामीण आर्थिक संघटना :**

कृषिप्रधान अर्थव्यवस्थेचा फार मोठा प्रभाव ग्रामीण समाजावर पडलेला आढळतो. या अर्थव्यवस्थेचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्र करते.

**ग्रामीण राजकीय संघटना :**

ग्रामीण समाजातील राजकीय संस्था, त्यातील नेतृत्व, समाज जीवनावर त्याचा पडलेला प्रभाव या सर्वांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात केला जातो.

**ग्रामीण धर्म :**

अज्ञान व निरक्षरता यामुळे ग्रामीण मनुष्य दैववाद व धर्मभोळेपणा यांच्या आहारी गेला आहे. ग्रामीण जीवनाच्या प्रत्येक भागावर धार्मिक कल्पनांचा प्रभाव पडलेला आढळतो. या शिवाय ग्रामीण समाजशास्त्र ग्रामीण धर्माचाही अभ्यास करते.

**सामाजिक प्रक्रिया :**

ग्रामीण समाजशास्त्र सहकार, स्पर्धा, संघर्ष, समायोजन आणि समावेशन यासारख्या प्रक्रियांचा देखील अभ्यास करते.

**ग्रामीण परिवर्तन :**

ग्रामीण समाजाच्या कोणकोणत्या क्षेत्रात कोणते परिवर्तन झाले आहे ? परिवर्तन होण्यासाठी कोणकोणते घटक जबाबदार आहेत ? या गोष्टींचा अभ्यासदेखील या शास्त्रातून केला जातो.

**ग्रामीण पुनर्रचना :**

ग्रामीण समाजाला सतत भेडसावणाऱ्या समस्या कोणत्या आहेत ? त्या सोडविण्यासाठी कोणकोणते उपाय योजायला हवेत ? या सर्वांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्र करते.

आतापर्यंतच्या विवेचनावरून ग्रामीण समाजाचे स्वरूप विस्तृत असून त्यामध्ये अनेक बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

## १.४ ग्रामीण समाजाच्या व्याख्या

ग्रामीण समाज म्हणजे काय ? हे पाहण्यासाठी खेड्यांच्या विविध व्याख्यांचा अभ्यास करणे जरूरीचे आहे.

पुराणात गावांची किंवा ग्रामीण समुदायाची कल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेली आढळते.

१) ''जिच्या भोवती कीर्दसाद - वाहितीला योग्य - जमीन आहे आणि जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व अनेक मजूर आहेत, अशा वस्तीला गाव म्हणतात.''

याच आधारावर त्रि.ना. अत्रे यांनी ग्रामीण समूहाची कल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. ते म्हणतात,

२) खेडणे म्हणजे जमीन कसणे आणि खेडूत म्हणजे जमीन कसणारा तेव्हा खेडुताची जी वस्ती ते खेडे, ज्यामध्ये प्रधान धंदा शेती व ज्यामध्ये भरण्याची वस्ती शेतकऱ्याची असते त्या गावाला लोक खेडे किंवा गावठे म्हणतात.

३) भिन्नता दाखविणाऱ्या विशिष्ट नावामुळे सुस्पष्ट ओळखला जाणारा भिन्न सामाजिक घटक म्हणून दुसरे लोक आणि स्वत : ज्या समाजातील रहिवासी मानतात असा घरांचा समूह म्हणजे खेडे होय.

४) काही वेळा सामुदायिक अशा लागवडयोग्य जमीन समावेशक असलेल्या निश्चित भूप्रदेशात कायमचे वास्तव्य करणाऱ्या अनेक कुटुंबाचा समुच्चय म्हणजे ग्रामीण समाज होय. प्रामुख्याने शेती व्यवस्था, नैसर्गिक पर्यावरणाशी घनिष्ठ संबंध, अंर्तगत श्रेणी रचना, सामाजिक गतिशीलतेचा अभाव इत्यादी वैशिष्ट्ये ग्रामीण समाजाच्या संदर्भात आढळतात.

५) Dictionary of Social Science मध्ये ग्रामीण समूहास काही वैशिष्ट्याच्या आधारावर परिभाषित केले आहे. ते म्हणतात, कोणत्याही समूदायास नागरी समुहाच्या तुलनेत ग्रामीण समुदायात पुढील वैशिष्ट्यांचा आधारावर ठेवता येईल. लोकसंख्येचे कमी घनत्व, सामाजिक विभेदनाचा अभाव, सामाजिक व स्थानिक गतिशीलतेचा अभाव, सामाजिक परिवर्तनाची मंदगती, कृषी व्यवसायाचे प्राधान्य व जमिनीवरील अधिकारानुसार राजनैतिक व आर्थिक व्यवस्था.

६) Encyclopaedia of social Sciences मधील Village Community या लेखात Prak यांनी ग्रामीण समुदायाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

ग्रामीण समुदाय परस्परसंबंधित अथवा असंबंधित अशा व्यक्तीचा समूह आहे. जो एक कुटुंबापेक्षा मोठ्या कुटुंबात जवळजवळ किंवा एकाच गल्लीत राहतो. सामान्यत : कृषी योग्य जमिनीवर शेती करतो. पडित जमिनीवर गुरे चारतो व एका निश्चित सीमेपर्यंत हे गाव व ही जमीन आमची आहे अशी अधिकाराची भावना त्याला असते.

७) सिम्स यांनी ग्रामीण समुदायाचा उल्लेख प्रामुख्याने शेतकऱ्यांची वस्ती असाच केला आहे तर श्री. मुकर्जी ग्रामीण समुदायाची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात.

८) ग्राम हा असा समुदाय आहे ज्यात तुलनात्मकदृष्ट्या सामाजिक व सांस्कृतिक समानता, औपचारिकता, प्राथमिक समूहाचे प्राधान्य व जनसंख्येची कमी घनत्व ही वैशिष्ट्ये आढळतात. शेती हा प्रमुख व्यवसाय असतो.

ग्रामीण क्षेत्राच्या वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की कुटुंबाचा प्रकार सामाजिक संबंध विशिष्ट स्वरूप व व्यवसायाबाबात हा समुदाय स्वतःचे एक स्वतंत्र अस्तित्व स्पष्ट करतो. प्रत्येक देशाच्या सांस्कृतिक प्रतिमानाचे एक वेगळे वैशिष्ट्य असून त्यांचे प्रतिबिंब त्या त्या देशाच्या समुदायात पडलेले दिसते. म्हणूनच इतर देशातील ग्रामीण समूहात आढळून येणाऱ्या सर्वसाधारण वैशिष्ट्यांव्यतिरिक्त भारतीय ग्रामीण समुदायाचीही काही स्वतंत्र वैशिष्ट्ये आढळून येतात. या वैशिष्ट्यांचा थोडक्यात उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

## १.५ भारतीय ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये

### १) कुटुंबावर आधारित समाजजीवन व संयुक्त कुटुंबपद्धती :

ग्रामीण समाजरचनेत कुटुंब हे केंद्रस्थानी असून समाजजीवनात त्यास अत्याधिक महत्त्व

आहे. भारतीय ग्रामीण समाजात व्यक्तीला प्राधान्य नसून त्याची सामाजिक प्रतिष्ठा बऱ्याच प्रमाणात त्यांच्या कुटुंबावर अवलंबून असते. व्यक्ती अमुक एका कुटुंबाची सभासद म्हणून ओळखली जाते. सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीनेदेखील कुटुंबच महत्त्वाचे ठरते. व्यक्तीपेक्षा कुटुंबावरच अधिक सामाजिक जबाबदारी असते. धार्मिक, सामाजिक व राजनैतिक क्षेत्रांतदेखील कुटुंबाच्या सर्व सभासदात एकी व समानता आढळते. ग्रामीण क्षेत्रात कुटुंबाचे सर्व सभासाद अधिक प्रमाणात कुटुंबावर अवलंबून असतात. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजांची पूर्ती करण्याचे कार्य कुटुंबच करीत असल्याने व्यक्तीवर कुटुंबाचा सर्वात अधिक प्रभाव असलेला दिसतो.

भारतीय ग्रामीण समुदायात संयुक्त कुटुंबपद्धती प्रामुख्याने आढळते. माता, पिता त्यांची मुले व अनेक पिढ्यांपर्यंतचे सदस्य एकाच घरात, एकाच सामाजिक मालमत्तेवर आपली उपजीविकात्मक करताना दिसतात. भारतातील संयुक्त कुटुंबपद्धती पितृसत्तात्मक आहे. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती कुटुंबाचा कर्ता म्हणून ओळखली जाते. शेती हा प्रधान व्यवसाय असलेल्या जीवनास पोषक अशीच ही कुटुंबपद्धती असल्यामुळे अगदी सुरूवातीपासून भारतीय ग्रामीण समुदायात ती आढळून येते.

अग्रगण्य समाजशास्त्रज्ञ सरोकिन व जिमरमेन यांनी सांगितलेले ग्रामीण समुदाय पुरेपूर लागू पडते. 'कुटुंबवादाची' कल्पना स्पष्ट करताना सरोकिन व गाल्पीत म्हणतात, ''कुटुंब ग्रामीण समाज जीवनाची एक मूलभूत सामाजिक संस्था असल्यामुळे ग्रामीण कुटुंबातील वैशिष्ट्यांची छाप या कृषिसमूहाच्या सर्व सामाजिक संघटनावर पडल्यास नवल नाही. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, इतर सर्व सामाजिक संस्था व मूलभूत सामाजिक संबंध ग्रामीण कौटुंबिक संबंधाद्वारे निश्चित व निर्धारित झालेले दिसतात. अशा प्रकारच्या सामाजिक संघटनेस संबोधिक करण्याकरिता 'कुटुंबवाद' (Familism) या शब्दाचा वापर केला जातो. सर्व प्रकारच्या सामाजिक संस्था व सामाजिक संबंधियावर कौटुंबिक संबंधाची छाप पडलेली असून राजनैतिक क्षेत्रातदेखील राजा व प्रजेचा संबंध  पिता-पुत्राच्या संबंधासारखा असावा, ज्यात शासक प्रजेकरिता पित्याची भूमिका वठवीत असतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, भारतीय ग्रामीण व्यक्तीच्या जीवनातील सर्व अंगावर कुटुंबाचा पूर्ण प्रभाव असलेला दिसतो.''

**२. जातिप्रथेवर आधारित समाजरचना :**

भारतीय ग्रामीण समुदायात संयुक्त कुटुंबास जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व जातिप्रथेला देखील आहे. आजदेखील ग्रामीण समुदायात पद, दर्जा व सामाजिक संबंधाचे स्वरूप जातीनुसारच निश्चित झालेले दिसते. संपूर्ण समुदाय जातीच्या आधारावरच अनेक खंडांत विभाजित झालेला दिसतो. कुटुंबाच्या नियमाइतकेच जातिनियमाचे वर्चस्व ग्रामीण लोकांवर आहे.

व्यवसायाचे रहस्य आपल्याच जातीत राहावे या उद्देशाने प्रत्येक जातीचे सदस्य स्वत :चा एक स्वतंत्र व्यवसाय करीत असून ग्रामीण आर्थिक जीवनात या सर्व जाती परस्परांवर अवलंबून असल्या तरी प्रत्येक जातीचा त्यांच्या परंपरागत व्यवसायावर एकाधिकार असलेला दिसतो. शेतीचा व्यवसाय मात्र याला अपवाद आहे.

खेड्यातील क्षेत्रीय विभागणीदेखील जातीच्या आधारावरच झालेली असते. डॉ. इरावतीबाई कर्वे यांनी केलेल्या ग्रामीण क्षेत्राच्या अध्ययनात त्या म्हणतात एखाद्या ग्रामीण विभागाचा नकाशा पाहिल्यास असे दिसून येते की, प्रत्येक जातीचे वास्तव्य खेड्याच्या एका विशिष्ट भागात दिसते.

काही निवडक जातीच्या लोकांची घरे गावात एकमेकांच्या जवळ असतील. परंतु अस्पृश्य जाती मात्र गावापासून थोडे दूर, वेगळे वास्तव्य करतात. ब्राह्मणआळी, सोनारआळी, कुंभारवाडा ही नावे याचीच द्योतक आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यात महारवाडा आढळून येतो व तेथेच महारजातीच्या लोकांची वस्ती असते, असे आढळून येते. गावात प्रत्येक जातीचे वेगळे निवासस्थान असण्याच्या या प्रवृत्तीचे स्पष्टीकरण जातीची श्रेष्ठ, कनिष्ठता, शुद्ध - अशुद्धतेची भावना किंवा प्रत्येक व्यवसायाकरिता आवश्यक असणारी जागा यांच्या आधारावर करता येईल. डॉ. इरावतीबाई कर्वेच्या मते, भारतीय संस्कृतीत स्वत :चा एक स्वतंत्र गट करून वेगळे राहण्याची प्रवृत्ती मुळातच आहे.

ग्रामीण नेतृत्वाचे स्वरूपदेखील बऱ्याच प्रमाणात जातीच्या आधारावरच निश्चित होते. ग्रामीण क्षेत्रात आजदेखील परंपरागत नेतृत्वास विशेष स्थान आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत उच्चजातीकडून हे नेतृत्व दुसऱ्या जातीकडे जात आहे, पण नवीन नेतृत्व ज्या जातीतून विकसित होत आहे त्या जातीसंख्येच्या दृष्टीने प्रबळ अशाच आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, दर्जा, पद, सामाजिक संबंध, व्यवसाय,निवासस्थान, ग्रामीण नेतृत्व या सर्व बाबतीत आजही भारतीय ग्रामीण जीवनात जातींना विशेष स्थान आहे.

### ३) ग्रामीण समुदायाचे एकाकी स्वरूप :

भारतीय ग्रामीण समुदायाचा बाह्य जगाशी फारच थोडा संबंध होता. पृथक स्वयंपूर्ण व एकाकी असे समाजजीवन हे भारतीय ग्रामीण समुदायाचे आगळे विशिष्ट्य आहे. Charles Metcalf म्हणतात, ग्रामीण समुदाय लहानशा संघराज्याच्या स्वरूपात आहेत. त्यांच्याजवळ त्यांच्या गरजांच्या पूर्तीची साधने पूर्ण असून बाह्य संबंधापासून ते पूर्णत : स्वतंत्र आहेत.

ग्रामीण समुदायात हा वेगळेपणा निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या क्षेत्रातील अर्थव्यवस्था आहे. जीवनास आवश्यक असणाऱ्या निरनिराळ्या वस्तूचे उत्पादन ग्रामीण क्षेत्रात निरनिराळ्या जातींकडून होत असते. आर्थिकदृष्ट्या ग्रामीण क्षेत्रात निरनिराळ्या जातींकडून होत असे. आर्थिकदृष्ट्या ग्रामीण समुदाय हा स्वयंपूर्ण गट होता. आपल्या सर्वसाधारण गरजांच्या पूर्तीकरिता या समुदायास दुसऱ्या समुदायावर अवलंबून राहावे लागत नव्हते. धान्य, कापड व घरे बांधण्याकरिता लागणारे सामान त्या त्या समुदायातच उपलब्ध होत असे. त्याच्या गरजादेखील त्या काळात मर्यादितच होत्या.

मनोरंजन, शिक्षण व सामाजिक सुरक्षेचे कार्य कुटुंबसंस्था करीत होती. त्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत नव्हते. राजकीय क्षेत्रातदेखील जातीपंचायतींना व ग्रामपंचायतींना त्या विशिष्ट ग्रामीण क्षेत्राबाबत पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. राजा ग्रामीण क्षेत्राच्या कोणत्याच व्यवहारात ढवळाढवळ करीत नव्हता. घरे सडका, बाजार, स्मशानभूमी, देवळे, विहिरी, तलाव, कुरणे इत्यादी सर्व बाबींवर ग्रामप्रमुखाचे नियंत्रण असे. ग्रामपंचायती, ग्रामसंरक्षणाचे, न्यायदानाचे कार्य करीत. कर वसूल करून सरकारी खजिन्यात भरण्याचे कार्यदेखील त्याचेच होते. ग्रामपंचायती इतक्या शक्ती शाली होत्या की, राजाने कितीही कर बसविले तर त्यापैकी कोणते जनतेवर लागू करावेत. या बाबतचे अधिकार त्यांचे होते. अशा तऱ्हेने राजकीय क्षेत्रात एका स्वयंपूर्ण संस्थेच्या स्वरूपात ग्रामपंचायत व जातिपंचायत कार्य करीत असल्यामुळे या दृष्टीनेदेखील एका ग्रामीण समुदायाचा इतर क्षेत्रांशी फारच कमी संबंध येत होता.

ग्रामीण समुदायाच्या एकाकी स्वरूपाचे तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे वाहतूक संचारसाधनांचा अभाव हे आहे. आजच्या घटकेलादेखील भारतातील बरीचशी ग्रामीण क्षेत्रे वाहतूक साधनांनी परस्परांशी जोडलेले नाहीत. उपलब्ध असलेल्या बैलगाडीत या वाहतूक साधनाच्या साह्याने एका मर्यादित क्षेत्रात येणे-जाणे होत आहे. साधनांच्या अभावामुळे देखील ग्रामीण समुदाय इतर समुदायापासून वेगळे पडलेले दिसतात. तसेच शिक्षणाच्या अभावामुळे वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ या संदेशवाहक साधनांचादेखील विशेष प्रसार ग्रामीण क्षेत्रात झालेला नव्हता. त्यामुळे केंद्रात कोणाचे सरकार आहे. कोणत्या राज्यात कोण मुख्यमंत्री आहे. या प्रश्नात ग्रामीण क्षेत्रातील लोकांना विशेष रस नाही. त्यांचे गाव हेच त्यांचे विश्व होते. परंतु दिवसेंदिवस ही परिस्थिती बदलत आहे. समुदायात परिवर्तन होत आहे असे दिसते.

**४. कुटुंब अर्थव्यवस्था :**

भारतीय ग्रामीण क्षेत्रात कृषी हाच प्रमुख व्यवसाय आहे. एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के लोक प्रत्यक्षात शेतीवर अवलंबून आहेत व ५ टक्के लोक शेतीशी संबंधित असणाऱ्या इतर व्यवसायावर आपली उपजीविका करतात. महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या विकसित प्रांतातदेखील ६४ टक्के लोक शेती करतात. या व्यवसायाचे सर्वात महत्त्वाचे  वैशिष्ट्य म्हणजे या व्यवसायातील मनुष्याचा संबंध जीवित व विकसित वस्तूंशी म्हणजे प्रत्यक्ष निसर्गाशी असतो.

ग्रामीण क्षेत्रातील बहुतेक सर्व लोक व्यवसायाने शेतकरी असले तरी आर्थिक दर्जा, त्यांच्या कामाचे स्वरूप, राहणी याबाबत भिन्नता असते. काही लोकांजवळ अधिक शेती असते, तर काहींजवळ कमी. काही लोकतर शेतमजुरी करूनच आपली उपजीविका करतात. तसेच ग्रामीण क्षेत्रात असेही काही लोक असतात की जे प्रत्यक्ष शेती करीत नाहीत. परंतु त्यांचा व्यवसाय शेतीशी संबंधित असतो. उदा. लोहार, सुतार, चांभार.

ग्रामीण क्षेत्रातील अर्थव्यवस्थेचा निर्वाही अर्थव्यवस्था (Substance Economy) म्हणून उल्लेख करता येईल. जीवनातील कमीतकमी व अनिवार्य गरजांची पूर्ती ही व्यवस्था करते. व्यवस्थेत सरळ सोप्या साधनांचा वापर केला जातो. या अर्थव्यवस्थेत समुदाय स्वयंपूर्ण असतो. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत ही सर्व वैशिष्ट्ये आढळतात. उपभोगाकरिता उत्पादन हे तत्त्व निर्वाही अर्थव्यवस्थेत असते. परंतु बदलत्या परिस्थितीत ही वैशिष्ट्ये हळूहळू कमी होत आहेत. आज शेतकरी व्यापारी दृष्टी कोनातून शेती करताना दिसतो. ग्रामीण क्षेत्रात झालेला हा एक चांगला बदल म्हणावा लागेल.

**५. विशेषीकरणाचा अभाव :**

व्यवसाय विशेषीकरणाच्या कल्पनेस औद्योगिक प्रगती व नागरिक या पासूनच खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. नागरी क्षेत्रात एकाच व्यवसायाच्या अनेक भागात विशिष्ट लोकच कार्य करतात व त्याच क्षेत्रात ते प्रावीण्य मिळवितात. उदा. कापड तयार करणारे व मशीन दुरूस्त करणारे वगळे असे विशेषीकरण दिसते. परंतु ग्रामीण क्षेत्रात मात्र शेती हा एकच व्यवसाय असून या व्यवसायातील नांगरणे, पेरणे, मळणे  या सर्व क्रिया एकच व्यक्ती करू शकते. प्रसंगी आपल्या अवजारांची दुरूस्तीदेखील तो स्वतःच करून घेईल. भारतीय ग्रामीण समुदायात अजून म्हणावा तितका यंत्रानी प्रवेश केलेला नाही. यामुळे परंपरागत पद्धतीच्या शेतातील सर्व क्रियांची माहिती एकाच व्यक्तीला असलेली दिसते. पण ज्यावेळी ट्रॅक्टर, मोटर पंप, मळणीची यंत्रिक साधने येतील त्यावेळी कदाचित विशेषीकरणाचा प्रसार याही क्षेत्रात होईल.

**६. सामाजिक एकरूपता :**

सामाजिक स्वरूपाच्या दृष्टीने ग्रामीण समुदायाची अवस्था आदिवासी जमाती व नागरीसमुदाय यांच्यामधील आहे. यात दोहोंचीही काही लक्षणे आढळतात. आदिवासी जमातीत आढळून येणारे सामाजिक एकरूपतेचे तत्त्व यात अधिक प्रमाणात व नागरी समुदायात आढळणारे सामाजिक विषमतेचे तत्त्व कमी प्रमाणात आढळते.

ग्रामीण समाज हा शेतकऱ्यांचा समाज असल्याने सर्व लोक एकाच व्यवसायात असतात. एकाच ठिकाणी बराच काळ वास्तव्य व इतर संस्कृतीचा कमी संबंध यामुळे सांस्कृतिक परंपरा रतिरिवाज, धार्मिक विश्वास, नीती-अनीतीच्या कल्पना, भाषा, सण या सर्व बाबतीत त्यांच्यात एकरूपता निर्माण झालेली दिसते. व्यवसाय समान असल्यामुळे व्यवसायातील सुख-दुःखे देखील समान असतात. नगराप्रमाणे भिन्न ठिकाणचे, भिन्न जातीचे व धर्माचे लोक येथे येऊन स्थायिक होत नाहीत. त्यामुळे ग्रामीण समाजजीवनात एकरूपता दिसते.

**७. सामाजिक गतिशीलतेचा अभाव :**

समाजशास्त्रात गतिशीलता म्हणजे स्तरीकरणाच्या व्यवस्थेत गती किंवा स्थितीमध्ये परिवर्तन. जर या गती किंवा स्थितीमधील या परिवर्तनाचे दर्जा व भूमिकेत बदल होत असेल, पण सामाजिक वर्गाच्या दर्जाच्या स्थितीत परिवर्तन होत नसेल तर त्यास समस्तरीय Horizontal परिवर्तनशीलता असे म्हणतात. जर या पद व भूमिकेतील परिवर्तनाने सामाजिक वर्गाच्या स्थितीत परिवर्तन होत असेल, तर या परिवर्तनशीलतेस किंवा गतिशीलतेस (vertical) विषमस्तरीय गतिशीलता असे म्हणतात.

गतिशीलतेच्या वरील व्याख्येवरून असे दिसते की, परिवर्तनाच्या बाबतीत ग्रामीण व नागरी क्षेत्रात फार मोठे अंतर आहे. ग्रामीण क्षेत्रात ही गतिशीलता अतिशय कमी आहे. कुटुंबाचा जो व्यवसाय असेल तोच पिढ्यान्पिढ्या सुरू असतो व त्या व्यवसायानुसार मिळणारा दर्जादेखील तसाच कायम असतो. जातीनुसार किंवा जन्मानुसार  व्यवसाय व सामाजिक दर्जा हा आधार असल्याने गतिशीलता कमी दिसते. या उलट नागरी क्षेत्रात मात्र संपत्ती, कौशल्य, बुद्धी यांच्या आधारावर सामाजिक दर्जा मिळत असल्याने पद किंवा दर्जा बदलविणे सोपे असते. तसेच सामाजिक प्रक्रियेचा हा नियम आहे की, सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात जेव्हा परिवर्तन होतात तेव्हा ऊर्ध्वमुखी Vertical गतिशीलतेचे अनेक मार्ग मोकळे होतात. नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण क्षेत्रात सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन अतिशय  मंद आहे. त्यामुळे गतिशीलतेला विशेष संधी नाही.

क्षेत्रीय परिवर्तनाची गतीदेखील ग्रामीण क्षेत्रात कमीच आहे. ग्रामीण समुदाय बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण असल्याने व परंपरागत शेती हा व्यवसाय असल्यामुळे व्यवसायाच्या निमित्ताने किंवा व्यवसाय शोधण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची प्रवृत्ती ग्रामीण क्षेत्रात कमीच दिसते. तसेच कुटुंबाच्या बंधनात व्यक्ती इतकी बांधली गेली असते की आपले कुटुंब सोडून दूर जाण्याची कल्पना तिला सहनदेखील होत नाही. या उलट नागरी क्षेत्रात व्यवसाय व व्यापारानिमित्त व्यक्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास सहज तयार होते.

**८. बलुतेदारीची व्यवस्था :**

भारतीय समाजजीवनात जातिव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे जातिव्यवस्थेवर

आधारित बलुतेदारी व्यवस्थादेखील भारतीय ग्रामीण समुदायात महत्त्वाची मानली जाई. इतकेच नव्हे तर भारतीय ग्रामीण समुदायाचे हे आगळेच वैशिष्ट्य आहे. या व्यवस्थेचे स्पष्टीकरण करताना ऑक्सर लेबिस म्हणतात, ''या व्यवस्थेमध्ये गावातील प्रत्येक जातिसमूहाकडून अशी अपेक्षा केली जाते की, ते दुसऱ्या जातिकुटुंबाची नियोजित सेवा करतील''. या प्रथेनुसार एका विशिष्ट समुदायात राहणाऱ्या विभिन्न जातींच्या लोकांनी इतर जातींची काही प्रमाणिक सेवा करावी व या सेवेच्या मोबदल्यात इतर जातींनी त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करावी. उदा. सोनार दागिने तयार करीत, लोहार शेतीसाठी लोखंडी अवजारे, सुतार लाकडी अवजारे तयार करीत व त्यांच्या मोबदल्यात यजमानाकडून वर्षातून एकदा किंवा दोनदा धान्याच्या स्वरूपात नियोजित मोबदला घेत असत. सेवा करणाऱ्यांना बलूतेदार असे म्हणत. जातीतील प्रत्येक कुटुंबास काही घरे वाटून दिलेली असत व पिढ्यान्‌पिढ्या ते त्यांची सेवा करीत असत. सेवा करण्याचा हा अधिकार मालमत्तेसारखा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीस मिळत असे. पित्यांच्या मृत्यूनंतर सेवेचे अधिकार मुलांना मिळत. हिस्से वाटणीच्या वेळी यजमान कुटुंबाचीदेखील वाटणी होई. एखाद्या कुटुंबास एकच मुलगी असल्यास ते अधिकार मुलीच्या पतीस मिळत. आपले बलुतेदारीचे अधिकार बलुतेदार विकूदेखील शकत होता. अशा रीतीने सेवा करणे व सेवा घेणे हा अधिकार मानला जाई. स्वत :च्या इच्छेनुसार बलुतेदार एखाद्या कुटुंबाची सेवा नाकारू शकत नव्हता किंवा बलुतेदारास काढू शकत नव्हता त्यावर जातीपंचायतीचे नियंत्रण होते. अशा रीतीने या प्रथेने ग्रामीण क्षेत्रातील सहजाती परस्पर अधिकार कर्तव्याच्या (Mutual obligation) जाणिवेने एकमेकांशी बांधल्या होत्या.

सामाजिक सुरक्षा उत्तरदायित्वपूर्ण सामाजिक बंधन, कमीतकमी व्यावसायिक स्पर्धा, सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन हे या प्रथेचे काही गुण सांगता येतील. परंतु परिवर्तनाच्या ओघात जेव्हा उच्चजातींना या प्रथेच्या नावाखाली कनिष्ठ जातींची पिळवणूक सुरू केली तेव्हा परस्पर सहकार्याच्या उद्देशाने सुरू झालेली ही प्रथा समाजात जाचक ठरली. बदललेल्या सामाजिक परिस्थितीत तिचे प्रयोजनदेखील उरले नाही. त्यामुळे आज ही प्रथा जवळजवळ नष्ट पावल्यासारखीच आहे.

**९) जनमताचे अधिक महत्त्व :**

ग्रामीण समुदाय आकाराने लहान असतो. त्यातील सदस्यांची संख्या मर्यादित असते व सर्व सदस्य एकमेकांना प्रत्यक्ष ओळखणारे असतात. थोडक्यात म्हणजे हा समुदाय प्राथमिक समूहाच्या स्वरूपात आपले जीवन व्यतीत करतो. व्यक्तिजीवनाच्या प्रत्येक अंगाशी समूहाचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे ग्रामीण समुदाय जनमताचा विशेष आदर केला जातो. गावातील वृद्धांच्या व सर्वसाधारण जनतेच्या मताच्या विरूद्ध जाऊन कोणतेही कार्य करण्यास व्यक्ती धजत नाही. प्राथमिक स्वरूपाची नियंत्रणशक्ती ग्रामीण समुदायात आढळून येते. जातिपंचायतीच्या किंवा ग्रामपंचायतीच्या शिक्षेची, शेजाऱ्यांच्या निंदेची सर्वांना भीती वाटत असते, कारण राज्याच्या न्यायालयात झालेल्या शिक्षेपेक्षा ही शिक्षा जीवघेणी वाटते.

**१०) धर्म, रूढी व परंपरांचा अधिक प्रभाव**

नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण समाजावर धर्म, रूढी व परंपरांचा अधिक पगडा असलेला दिसतो. ग्रामीण समाजात धर्माच्या बाबतीत तर्कापेक्षा श्रद्धेलाच अधिक महत्त्व आहे. धर्माचे स्वरूप परंपरेने व संस्कृतीचा वारसा म्हणून त्यांच्याकडे जसे चालत आले तसेच ते दिसते. सत्य-असत्य किंवा योग्य अयोग्यतेची शहानिशा करण्याची त्यांना गरज वाटत नाही. देवदेवतांबाबतच्या त्यांच्या कल्पना मानवीकृत Anthropomorphic आहेत. आदिवासी समाजात आढळून येणारी आत्मवादाची

जादुटोण्याची कल्पना भारतीय ग्रामीण नैसर्गिक आपत्तीच्या क्षेत्रात आजही धर्माचे एक अंग ठरले आहे. आजच्या विशाल युगातदेखील नैसर्गिक आपत्तीच्या वेळी ईश्वराकडे धाव घेण्याची, पूजाअर्चा, धार्मिक अनुष्ठाने करण्याची प्रवृत्ती ग्रामीण क्षेत्रात दिसते.

भारतातील ग्रामीण क्षेत्रात प्रामुख्याने हिंदू, मुसलमान व बौद्ध धर्माचे लोक राहतात. परंतु धार्मिक उत्सवांच्या वेळी हे सर्व लोक एकसाथ भाग घेताना दिसतात. धर्माने हिंदू असून मुसलमान पीर, दर्गा यांच्यापुढे नवस करणाऱ्यांची संख्या आजही कमी नाही किंवा हिंदुदेवतांच्या पालखीकरिता दरवर्षी काही करून देणारे मुसलमान पुजारीदेखील कमी नाहीत. भारतीय ग्रामीण समुदायावर धर्मांचा एवढा प्रभाव असण्याचे मुख्य कारण म्हणजे पूर्णत : निसर्गावर अवलंबून असणारा त्यांचा शेतीचा व्यवसाय, ऊन, पाऊस, वादळ या निसर्गाच्या खेळाबरोबर त्यास प्रत्यक्ष सामना करावा लागतो. ग्रामीण व्यक्तीच्या धार्मिक प्रवृत्तीचे स्पष्टीकरण मॅक आयव्हर (Mac iver) यांनी मोठ्या मार्मिक रीतीने केले आहे. शेतकरी निसर्गाकडे कलाकाराच्या सौंदर्यात्मक दृष्टिकोनातून पाहत नाही किंवा वैज्ञानिकाच्या चिकित्सक दृष्टिकोनातून त्यामागील रहस्याचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करीत नाही, तर निसर्गाकडे तो मित्र किंवा शत्रू, धान्य पिकविणारा, पाऊस पाडणारा किंवा वादळ, पूर आणणारा या दृष्टिकोनातून पाहतो. मॅक्स स्पृलरच्या मते भारतात इंद्र, वरूण सूर्य, चंद्र इत्यादींना देवता मानून त्यांची पूजा करण्याचे कारणदेखील हेच आहे.

**११. ग्रामीण कला :**

भारतीय ग्रामीण कलेवरदेखील धर्म, निसर्ग व कुटुंबांचा बराच प्रभाव असलेला दिसून येतो. ग्रामीण समुदायात त्यांची चित्रकला, मूर्तिकला, लोकगाथा, नृत्य, नाटक आदी सर्वच त्यांच्या धार्मिक विश्वासास अनुकूल असेच असतात. कलेच्या क्षेत्रात नागरी क्षेत्राप्रमाणे एखादी व्यक्तीच नव्हे तर सर्व कुटुंबच्या कुटुंबच प्रसिद्ध असते. ग्रामीण कला त्यांच्या साध्या व सरळ जीवनाचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करते. उदा. संगीताच्या क्षेत्रात वापरली जाणारी उपकरणे अगदी साधी व गावातल्या कारागिरांनी बनविलेली असतात. नाटके उघड्या मैदानात होतात व जागादेखील फुले, पाने, पिसे या नैसर्गिक साधनांनीच शृंगारलेली असते. निरनिराळी लोकगीते किंवा नृत्यगीतेदेखील लावणी, कापणी, मळणीच्या वेळची किंवा ऋतूंशी संबंधित अशीच असतात. त्यात नागरी कवीचे शब्दांचे अवडंबर नाही तर साधी भाषा, सरळ व सोपे भाव त्यात दिसतात. उपमा आदी अलंकार असले तरी तेदेखील पाने, फुले, फळ, नदी, ओढा या नैसर्गिक बाबींशी संबंधित असेच असतात.

**१२.स्त्रियांचा निम्न सामाजिक दर्जा :**

पूर्वीच्या काळी भारतीय ग्रामीण समाज स्त्रीचा दर्जा पुरूषांच्या तुलनेत निम्न प्रतीचाच होता. पित्रृसत्तात्मक कुटुंबव्यवस्था असल्याने सर्व अधिकार पुरूषांच्या हातीच केंद्रित झाले होते. कोणत्याही व्यवहारात स्त्रीचे मत घेतले जात नसे. तिच्या मताला किंमतदेखील नव्हती. तिचे क्षेत्र मुलांचे पालनपोषण व घरगुती कामापुरतेच मर्यादित होते. बालविवाहाची प्रथा रूढ होती. समज येण्याअगोदरच तिचा विवाह होत असे. जोडीदाराच्या निवडीबाबतदेखील तिचे मत घेतले जात नसे. स्त्रियांना शिक्षण नसे. ती पूर्ण अंशाने पुरूषावर अवलंबून होती. आज त्यात बरेच बदल होत आहेत.

**१३. निम्न शैक्षणिक व आर्थिक दर्जा :**

भारतीय ग्रामीण समुदायात शिक्षणाचा अभावच आहे. भारतीय शालेय शिक्षणाचा प्रसार इंग्रजी आमदानीतच झाला व तोदेखील नागरी क्षेत्रातच. ग्रामीण क्षेत्राची शैक्षणिक प्रगती करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात होत आहेत, परंतु त्यास म्हणावे तितके यश लाभले नाही.

भारतीय ग्रामीण जनतेचा आर्थिक दर्जादेखील निकृष्ट आहे. तिरांसाठी धान्य पिकवणारा शेतकरी स्वतः अर्धपोटी राहतो. ग्रामीण क्षेत्रातील या निर्धनतेचे प्रमुख कारण म्हणजे शेतीचे मागसलेले तंत्र आहे. इतर देशाबरोबर भारतीय ग्रामीण समाजाच्या दरडोई वार्षिक उत्पन्नाचा अभ्यास केला असता हे उत्पन्न अतिशय मर्यादित असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यात कोकण किनारपट्टीतील जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न तर फारच अल्प असल्याचे दिसून येते. त्याचे कारण भारतातील बहुसंख्य ग्रामीण भागातील शेतकऱ्याना नवीन तंत्रांचे ज्ञान नाही. शेतीत लावायला भांडवल नाही. ओलिताची सोय नाही व त्यामुळे शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. जमीनदार, सावकारशाही ह्यासारख्या प्रथांमुळे देखील भारतीय शेतकरी अधिक निर्धन व कर्जबाजारी झालेले आहे.

**१४. साधे व प्रामाणिक जीवन :**

ग्रामीण समाजामध्ये अजूनही बहुसंख्य ठिकाणी पारंपरिक शेती तंत्राचाच वापर केला जातो. तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात नाही. त्यामुळे शेती व्यवसायातून जेमतेम उत्पन्न मिळते. अंधश्रद्धा, निरक्षरता, वेठबिगारी, देवभोळेपणा इ. कारणांमुळे या समाजाच्या प्रगतीमध्ये मोठे अडसर निर्माण झाले आहेत. अतिशय मर्यादित उत्पन्नामध्ये लोकांना जीवन जगावे लागत आहे. प्राथमिक संबंधांची तीव्रता अधिक असल्याने आपला समाज व आपले कुटुंब यांच्याशी प्रामाणिक राहण्याची शिकवण त्यांना प्रथमपासून दिली जाते.

**१५.नैसर्गिक वातावरणाचा प्रभाव :**

शेती प्रधानतेमुळे ग्रामीण लोकांचा निसर्गशक्तीशी जवळचा संबंध येतो. ग्रामवासीयांच्या दैनंदिन जीवनावर नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव असलेला दिसून येतो. हे लोक निसर्गशक्तीशी सामना करत असलेले आढळतात. या संघर्षात त्यांना कित्येकदा हारही पत्करावी लागते. त्यामुळे त्यांच्या मनात दैवीशक्तीचे श्रेष्ठत्व निर्माण झालेले दिसून येते. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी नेहमीच मुकाबला करण्याचा प्रसंग त्यांच्यावर येत असल्याने निसर्गशक्तीशी संघर्ष करण्याऐवजी त्या शक्तीला शरण जाणे ते अधिक पसंत करतात. निसर्गतः निर्माण झालेल्या वनस्पतीची फळे चाखणे, कंदमुळे संकलित करणे, औषधी वनस्पतीपासून विविध प्रकारची औषधे बनविणे हे लोक पसंत करतात. काही वृक्षांना देव मानणे, त्यांची भक्तिभावे पूजा करणे याही गोष्टींना प्राधान्य देण्यात आलेले दिसून येते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, भारतीय ग्रामीण जीवनाची स्वत :ची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. जी इतर देशांत आढळत नाहीत. निम्न शैक्षणिक व आर्थिक दर्जा, तसेच स्त्रियांची निकृष्ट अवस्था असली तरी ग्रामीण कौटुंबिक जीवन मात्र अधिक स्थिर व समाधानी आहे.

## १.६ स्वाध्याय

१. भारतीय ग्रामीण समाजाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीस जबाबदार असणाऱ्या घटकांची सविस्तर चर्चा करा.

३. ग्रामीण समाजाची व्याख्या सांगून भारतीय ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये सांगा.

♦ ♦ ♦

# २

# भारतीय ग्रामीण समाजाचे घटक
# (आदिवासी - ग्रामीण - शहरी)

**पाठाची रूपरेषा**

२.० पाठाचे उद्देश

२.१ प्रास्ताविक

२.२ आदिवासी समुदाय

२.३ भारतातील आदिवासी आणि त्याची वसतिस्थाने

२.४ आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये

२.५ ग्रामीण समुदाय

२.६ ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीस जबाबदार घटक

२.७ शहरी समुदायाची वैशिष्ट्ये

२.८ स्वाध्याय

## २.० पाठाचे उद्देश

- भारतीय ग्रामीण समाजाचे घटक अभ्यासणे.
- आदिवासी समुदाय आणि आदिवासी समुदायाची वसतिस्थाने अभ्यासणे.
- आदिवासी समुदायाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
- ग्रामीण समुदायाचा अभ्यास करणे.
- ग्रामीण समाजाच्या उत्पन्नास जबाबदार असणारे घटक अभ्यासणे. शहरी समुदाय आणि शहरवाढीचे घटक अभ्यासणे.
- शहरी समुदायाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

## २.१ प्रास्ताविक

भारत हा खंडप्राय देश आहे. अनेक जाती - धर्मांचे, पंथाचे लोक आपल्या देशामध्ये ठिकठिकाणी वास्तव्य करतात. विविध भाषा बोलणारे भिन्न संस्कृतीचे लोक आपल्या देशामध्ये सर्वत्र आढळतात. भारतीय समाजाचा अभ्यास करताना अनेकविध संस्कृतीचे व सामाजिक व्यवहारांचे सुंदर चित्र आपणाला पाहावयास मिळते. आपल्या देशाची जागतिक पातळीवर इतर देशांबरोबर तुलना करताना

लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये आपला देश दोन नंबरचा देश म्हणून ओळखला जातो. २००१ च्या आकडेवारीनुसार जगाच्या लोकसंख्येच्या १६.२ टक्के इतकी लोकसंख्या आपल्या भारत देशाची आहे. दिवसेंदिवस या लोकसंख्येमध्ये वाढ होत चालली आहे. एकूण भूक्षेत्रफळाचा विचार करता हे क्षेत्रफळ जगाच्या क्षेत्रफळाच्या २.४ टक्के इतके आहे. आपला भारतीय समाज हा समृद्धतेने आणि विविधतेने नटलेला असून वेगवेगळ्या रूढीपरंपरांचा प्रभाव भारतीय, समाजावर पडलेला दिसून येतो. अशा या विविधतेने नटलेल्या भारतीय समाजाचा अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञांनी अभ्यास विषयाच्या सोयीसाठी एकूण भारतीय समाजाचे आदिवासी, ग्रामीण आणि नागरी समाज असे तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण केलेले आहे. यापैकी ग्रामीण समाज हा सर्वत्र आढळतो. आदिवासी समाज मात्र उत्तर, दक्षिण भागात आढळतो, तर नागरी समाजदेखील ठिकठिकाणी आढळतो.

संख्याबळाचा अभ्यास केल्यानंतर ग्रामीण समाजामध्ये ७० टक्क्यांच्या जवळपास भारतीय जनता वास्तव्य करते. नागरी समाजामध्ये २५.७१ टक्के वास्तव्य करते. बाकीची लोकसंख्या आदिवासी समाजामध्ये वास्तव्य करते. दिवसेंदिवस नागरी समाजामध्ये वास्तव्य करणारी जनता वाढू लागली आहे. आदिवासी समाजातील बहुसंख्य जनता ग्रामीण तसेच शहरी समाजामध्ये वास्तव्यास येऊ लागली आहे. या तिन्ही समाजाचे चित्र अधिकाधिक स्पष्ट व्हावे. पर्यायाने भारतीय समाजाची रचना ध्यानात यावी या दृष्टीने आदिवासी ग्रामीण आणि नागरी समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये या गोष्टींवर देणे अत्यावश्यक आहे.

## २.२ आदिवासी समुदाय

भारतासारख्या खंडप्राय देशाच्या समाजजीवनाचा अभ्यास केल्यानंतर भौगोलिक विविधतेमुळे व भिन्न भौगोलिक पर्यावरणामुळे विविध प्रकारचे समूह जीवन अस्तित्वात आल्याचे दिसून येते अनेक छोट्या छोट्या टोळ्यांचे वसती स्थान पर्वताच्या पायथ्याशी अतिदूर जंगलात जिथे सुधारणेचे वारे अजूनही जाऊन पोहोचलेले नाही. अशा ठिकाणी असल्याचे आढळते. आदिम किंवा रानटी समाजाचे लोक म्हणून यांचा उल्लेख केला जातो. १९९१ च्या शिरगणतीनुसार आपल्या देशामध्ये आदिवासींची लोकसंख्या कोटी लक्ष इतकी होती. इंग्रजीमध्ये Tribal म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो. त्यांना आदिम, टोळीवाले इ. नावांनी ओळखले जाते. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ धुर्ये यांनी त्यांना मागासलेले हिंदू असे म्हटले आहे.

आदिवासी म्हणजे रानटी, नरमांस भक्षक, सतत झगडे करणारा, अत्यंत मागास असे पशुवत जीवन जगणारा, अर्धनग्न राहणारा, कोणतेही विधिनिषेध न बाळगता खावे-प्यावे-भोगावे अशा वृत्तीचा अशी विविध एकांगी चुकीची मते अगदी शिकलेली माणसेदेखील व्यक्त करतात. पण सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी आदिवासीच्या वस्तुनिष्ठ व शास्त्रीय अभ्यासावर भर दिला आहे. भारताच्या उत्तर, मध्य आणि दक्षिण विभागात खालील टोळ्या आढळतात.

उत्तर विभाग - गद्दी, गुजर, लेपचा, अल्का, डेफला, गारो, खासी, कुकी, नागा.

मध्य विभाग - मुंडा हो गोंडा बेगा भुयिया, भिलु, कोळी.

दक्षिण विभाग - कानार, तेरूवा, कदार, कोटा, मालवदन चेंचू, उराली इ. जमाती वेगवेगळ्या विभागांत आढळतात.

काहींना आदिवासींची भीती वाटते, काहींना त्यांची किळस वाटते, तर काहींना त्यांच्या बद्दल अत्यंत सहानुभूती वाटते. आदिवासी समाजाचा अभ्यास करणाऱ्या विविध मानसशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाच्या शास्त्रीय व्याख्या दिलेल्या आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) डॉ. डी.एम. मुजुमदार यांच्या मते, 'आदिवासी म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या एका विशिष्ट भूप्रदेशावर निवास करणाऱ्या एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह, व्यवसाय या बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणाऱ्या व निश्चित अशा मूल्यांच्या विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय.'

२) डॉ. रिव्हर्स यांच्या मते, 'आदिवासी समूह हा साधा सरळ सामाजिक समूह असून त्यातील सदस्य हे एकाच समान बोली भाषेचा वापर करतात आणि युद्ध वगैरे समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एकत्र येऊन कार्य करतात.'

३) गिलीन आणि गिलीन यांच्या मते, 'एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा. परंतु अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.'

४) ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांनी प्रसिद्ध केलेल्या इंपिरिअल गॅझेटियर ऑफ इंडिया या ग्रंथानुसार, 'समान नाव धारण करणारा, समान बोलीभाषा बोलणारा, एकाच भूभागावर राहणारा आणि पूर्वी जरी आंतरविवाह असण्याची शक्यता असली तरी आता आंतरविवाह नसलेल्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय.'

## २.३ भारतातील आदिवासी व त्यांची वसतिस्थाने

भारतात आदिवासींची संख्या फारच कमी असली तरी ते सर्व भारतभर आढळतात. ते दूर डोंगराळ भागातून, दऱ्याखोऱ्यातून, रानावनांतून राहतात. म्हणूनच त्यांना वन्य जाती - जनजाती, वनवासी, गिरिजन असे म्हटले जाते. रिसले, एल्विन, ग्रियसन, ठक्कर बाप्पा, मार्टिन इत्यादींना भारतातील आदिवासी हे भारतातील मूळचे निवासी आहेत, असे मानले आहे. वास्तव त्यांना ते 'अगदी मूळचे रहिवाशी' अगर 'अतिप्राचिन (Aburiginal) असे म्हणतात (Aborigines) हटनने त्यांना 'आदिम' अगर 'आदिवासी' (Primitive Tribes) असे म्हटले आहे.

एकूण भारतीय लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासीचे प्रमाण ८.०८ इतके आहे. नागालँड, मेघालय, मिझोराम, अरूणाचल प्रदेश या राज्यांतील बहुसंख्य लोक आदिवासी आहेत. ओरिसा, मध्य प्रदेश, बिहार, आसाम, उत्तर प्रदेश येथे आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मध्य प्रदेशात सर्वात जास्त आदिवासी राहतात.

## २.४ आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये

### १) विशिष्ट भूप्रदेश :

सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रदेश घनदाट जंगल वा पाण्याने वेढलेले बेट अशासारख्या विशिष्ट भू-प्रदेशावर त्यांचे कायम निवासस्थान असते. जरी काही आदिवासी जमाती भटक्या असल्या

तरीही त्यांचे भटक्याचे क्षेत्र विशिष्ट भू- प्रदेशच असतो.

उदा. कुकी, खासी, नागा वैगैरे.

**२) प्रमाण लघुता :**

सर्वसाधारणपणे आदिवासींची लोकसंख्या फारच मर्यादित असते. काही आदिवासींची संख्या तर शंभरच्या आत-बाहेर आढळते. परिणामी, त्यांच्यातील सामाजिक संपर्काचे प्रमाणदेखील मर्यादित राहते.

**३) समान नाव व एकच रक्तसंबंधीपणाची श्रद्धा :**

आदिवासी जमातीला तिचे स्वतंत्र असे नाव असते. इतर जमातीपासून आपले वेगळेपण व स्वातंत्र्य त्यामुळे सूचित होते. त्याचप्रमाणे आपली निर्मिती ही एकाच पूर्वजापासून झाली. अशा विश्वासामुळे ते परस्परांना रक्तसंबधी मानतात. त्यामुळे परस्परांत आत्मीयता, आपुलकी व प्रेमाचे बंध निर्माण झालेले असतात.

**४) साधी अर्थव्यवस्था :**

इन्हान्स प्रिचर्डने साधी अर्थव्यवस्था हे आदिवासींचे एक प्रभेदक लक्षण मानले आहे. पोटापुरते अर्थोत्पादन हे त्यांच्या आर्थिक जीवनाचे वैशिष्ट्य आहे. वस्तू विनिमयाच्या साहाय्याने ते परस्परांच्या आर्थिक गरजांचे निराकरण करतात. त्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात कमालाची सामाजिक समता आढळते. त्यांची अर्थव्यवस्था निसर्ग नियंत्रित अशी आहे. श्रमविभाजन लिंगभेदावर आधारलेले आहे. सर्वसाधारणपणे काही कामे स्त्रियांची व काही पुरूषांची असे ठरून गेलेले असते. त्यामुळे व्यावसायिक विशेषीकरणाचा अभाव आढळतो.

**५) मर्यादित तंत्रविद्या :**

वर्षानुवर्षे अत्यंत पुरातन पद्धतीचीच तंत्रविद्या त्यांना अवगत आहे. मासेमारी, शिकार, पशुपालन अगर क्वचित शेती यासाठी तो  जी हत्यारे, आयुधे अवजारे वापरतो ती अत्यंत मागासलेली व ओबडधोबड आहेत.

**६) समान बोलीभाषेचा वापर; लेखनकलेचा अभाव :**

प्रत्येक आदिवासी जमिनीत समान बोलीभाषा असते. त्यांच्यातील समूह भावना दृढ करण्यात व त्याचे समान सांस्कृतिक अस्तित्व इतर जमातीपासून वेगळे राखण्यात ही समान बोलीभाषा प्रभावी कारण ठरली आहे. मात्र त्यांच्यात लेखनकलेचा अभाव आहे. साहजिकच त्यांच्या ज्ञान, कला, धर्म, साहित्य इत्यादी बाबींवर आणि त्यांच्या प्रगतीवर खूपच मर्यादा पडतात. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीचे हस्तांतर करण्याची कामगिरी त्यांची लोकगीते, लोककथा, लोकनृत्य, कोडी, म्हणी, उखाणे, याद्वारे पार पाडली जातात.

**७) समान धर्म व जादूटोण्याचा प्रभाव:**

आदिवासींना निसर्गातील घडामोडीतील कारण - कार्यसंबंध कळत नसल्याने ते निसर्गाची

त्याचबरोबर पूर्वजांची, भूताखेतांची पूजा करतात. अनाकलनीय घडामोडींवर आपले प्रभावी नियंत्रण राहावे व आपल्या कार्यात यश यावे म्हणून ते जादूटोणा व मंत्रतंत्र यांचा श्रद्धापूर्वक वापर करतात.

**८) समान व इतरांकडून वेगळी जीवनपद्धती :**

आदिवासीतील सामाजिक संबंध औपचारिक व करारात्मक नसतात. रक्तसबंध व सामाजिक दर्जा यावर ते आधारलेले असतात. त्यामुळे त्यांच्या जीवनात कुटुंब व आप्तसंबंधांना महत्त्वाचे स्थान असते. व्यक्तीचा दर्जादेखील कुटुंब व आप्तसंबंधीतांचा दर्जा यावरून ठरत असतो. एकीकडे त्यांना खूप स्वातंत्र्य असूनदेखील त्याचे जीवन सामूहिक स्वरूपाचे असते. समाजातील विविध संस्था, नियमन व्यवस्था, रीतिरिवाज यांच्याकडून त्याचे जीवन नियंत्रित झालेले असते. श्रर्मश्रद्धा, जादूटोणा, दैनंदिन आचार-विचार, खाणे-पिणे, केशवेषभूषा यात कमालीची साम्यता आढळते. एवढेच नव्हे तर त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोनदेखील समान बनलेला असतो. समाजाने घालून दिलेले कायदेकानू व निषेध नियमन यांच्यामुळे त्यांच्या व्यर्वक्तिमत्त्वाची जडणघडणदेखील तशी बनलेली असते, की समाजमान्य जीवनपद्धतीपेक्षा वेगळी जीवनपद्धती जगण्याचा विचार त्यांच्या कृतीत उतरणे केवळ अशक्यप्राय असते. एखाद्याने जरी त्याचे उल्लंघन केले तरी समाजाच्या तीव्र शिक्षेला त्याला सामोरे जावे लागते. त्यामुळे इतर कोणत्याही समाजात न आढळणाऱ्या सामाजिक ऐक्यभावाचा आविष्कार आदिवासी समाजात दिसून येतो.

**९) जमातकेंद्रीय आत्मीयता :**

आदिवासींच्यात एक विलक्षण अशी जमात केंद्रीय आत्मीयता निर्माण झालेली असते. त्यांच्या आचार-विचारात, जीवनविषयक दृष्टिकोनात कमालीची एकवाक्यता दिसून येते. परिणामी, त्यांच्यात निर्माण झालेला सामाजिक एकजिनसीपणा हा इतर समाजात आढळत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत घडणाऱ्या कोणत्याही घटनेविषयी त्यांची प्रतिक्रिया सारखीच असते. त्यात मतभेद आढळत नाहीत.

**१०) जमातप्रमुख :**

प्रत्येक आदिवासी जमातीत जमातप्रमुख असतो. तो त्या जमातीचा नायक, नेता मानला जातो. त्याचा शब्द हा त्या आदिवासींसाठी अखेरचा शब्द असतो. त्याचे सर्वजण पालन करतात. तो प्रामुख्याने राजकीय स्वरूपाची कार्ये पार पाडत असतो. उदा : युद्ध, संरक्षण, अंतर्गत व्यवस्था प्रथागत कायद्याचे जमातीकडून पालन, न्यायनिवाडा इ.

इव्हान्स प्रिचर्ड म्हणतात त्याप्रमाणे आदिवासींच्या वैशिष्ट्यांमुळे त्यांना एक विशिष्ट असे आंतरिक मूल्य (Intrinsic Value) लाभले आहे. त्यांच्या जीवनात वेगळी अर्थपूर्णता आली आहे. एक अनोखा समतोल साधला आहे. या धरतीच्या लेकरांना, या जंगलाच्या राजांना भले लिहिता वाचता येत नसेल, प्रतिकूल परिस्थितीत कष्टकरून देखील अर्धपोटी, अर्धनग्न राहावे लागत असे, परंतु काही बाबतीत मात्र प्रगत समजल्या जाणाऱ्या समाजापेक्षा ते अत्यंत आनंदी व विलक्षण समाधानी आहेत.

**११) राजकीय संघटन :**

आदिवासींमध्ये पंचायत प्रणाली सर्वत्र आढळते. पंचायतीत वृद्ध व अनुभवी व्यक्तींचा समावेश होतो. पंचायत जमाती अंतर्गत शांतता, सुव्यवस्था, न्यायदान, भांडणतंटे सोडविणे, दंड करणे,

अशी कामे पार पाडते. काही जमातीत राजेशाही पद्धती होती. उदा. गोंड, महादेव, कोळी, नागा वगैरे जमातीशी असलेल्या संबंधाचे निर्धारण पंचायतीमार्फत होत होते.

**१२) शैक्षणिक मागासलेपणा :**

आदिवासी समुदायात कुटुंब, सवंगडी तसेच शयनागारातून अनौपचारिक जीवन शिक्षण देण्यात येते. या शिक्षणात मौखिक पद्धतीवर भर असतो. फळे मुळे गोळा करणे, मासेमारी, पशुपक्षी पकडणे, शिकार करणे, नृत्य, वाद्ये तयार करणे, वाजविणे इत्यादी या शिक्षणासमवेत औपचारिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झाल्या आहेत. जमातीत औपचारिक शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. दुर्गम प्रदेश, शिक्षणाच्या महत्त्वाच्या जाणिवेचा अभाव, गळतीचे प्रमाण जास्त वगैरे प्रमुख कारणे आहेत. (अपवाद नागालँड)

**१३) लिखित साहित्याचा अभाव :**

आदिवासी समुदायाच्या भाषांना लिपी नव्हती. त्यामुळे लोककथा, गाणी, अनुभव लिपीबद्ध करण्यात आलेले नव्हते. ऐकणे आठवणीत ठेवणे आणि इतरांना कथन करणे (श्रुती-स्मृतीउक्ती) या पद्धतीने अनुभव ज्ञानाचे संक्रमण चाललेले होते.

इल्विनसारख्या संशोधकाने जमातीतील गाणी रोमनलिपीत संकलित केली आहेत. वरील वैशिष्ट्याप्रमाणे जमातीत शोधाची मंदगती आढळते. मर्यादित गरजा भागविण्यासाठी परंपरागत साधने तंत्राचा उपयोग करण्यात येतो. वर दिलेल्या सामान्य वैशिष्ट्यात आधुनिक काळात बदल होत आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

## २.५ ग्रामीण समुदाय

आज आपण ज्या ग्रामीण समाजामध्ये वास्तव्य करतो त्या ग्रामीण समाजाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. खेड्यांच्या इतिहासाचा दोन बाजूंनी विचार केलेला आढळतो. मानवी जन्मापासून इ. पूर्व ५००० पर्यंत इतिहासपूर्व काळ संबोधला जातो. इ. सन पूर्व ५००० नंतरच्या काळात इतिहास काळ म्हणून संबोधले जाते. सुरुवातीला ज्यावेळी मानव जन्माला आला त्यावेळी तो रानटी अवस्थेत होता. तो कच्चे अन्न खात होता. वल्कले नेसत होता. नव्या अश्मयुगामध्ये इ.सन पूर्व १५०० मध्ये धान्य पेरल्यानंतर ते उगवते आणि धान्य येते या गोष्टींचा मनुष्याला शोध लागला. दरम्यानच्या कालावधीत त्याला अग्नीचा शोध लागला. त्यामुळे मानवाची भ्रमंतीची अवस्था संपली. त्याला स्थैर्यत्व प्राप्त झाले. कृषी व्यवसायात ग्रामीण समाजाचा प्रमुख पाया ठरला. खेड्यांच्या निर्मितीच्या दृष्टीने ही घटना जबाबदार ठरली होती. समाजव्यवस्था निर्माण करून वास्तव्य करू लागला. संसारासाठी तो भांडीकुंडी जमवू लागला. कला, तत्त्वज्ञान या गोष्टींना त्याने जन्म दिला. तो वैवाहिक नातेसंबंध निर्माण करू लागला. शेती व्यवसायातून खेड्याचे जीवन सुरू झाले. शेती व्यवसायातून संस्कृती निर्माण झाली.

जगातील संस्कृतीची निर्मिती ही नदीकाठी झालेली आढळते. परंतु सर्वच खेडी काही नदीकाठी नाहीत. काही खेडी घनदाट जंगलाच्या परिसरात तसेच डोंगरपायथ्याजवळ वसलेली आढळतात. या संदर्भात प्राचीन धर्मग्रंथांमध्ये आजच्या खेड्याच्या उत्पत्तीसंबंधी विशेष नोंदी आढळतात.

ऋग्वेद, महाभारत, मनुस्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र या सर्वांमध्ये अतिशय सुरेख वर्णन केलेले आढळते. ते पुढीलप्रमाणे.

**ऋग्वेद :**

या ग्रंथामध्ये तत्कालीनसंबंधी किंवा खेडे कसे असावे, या संबंधी माहिती दिलेली आढळते. संस्कृतमध्ये खेड्याला ग्राम म्हणतात. ग्राम म्हणजे काय ? याचा अर्थ ऋग्वेदामध्ये सांगितला आहे.

एकाच भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या अनेक कुटुंबांच्या समुच्चयास ग्राम खेडेगाव म्हणतात. ग्रामातील प्रमुखास ग्रामीण असे म्हणतात. त्यांची निवड ग्रामातील लोकांकडून केली जात असे. प्रत्येक गावाचे स्वरूप हे लोकशाही प्रधान असे.

**महाभारत :**

इ.स. पूर्व २००० हा महाभारत कालखंड महाभारतामध्ये सुद्धा तत्कालीन ग्रामाचा विचार केलेला दिसून येतो. प्रत्येक ग्राम शासनाचा मूलभूत घटक असे. त्याच्या प्रमुख नेत्याला ग्रामिणी म्हटले जात असे. १० गावांचा एक समूह असे आणि त्याच्यावरच एक प्रमुख असे त्याला दशग्रामीण म्हणत. २० गावांचा एक समूह असे त्यावरील प्रमुखाला विषतीप म्हणत. १०० गावांचा समूह त्याच्या प्रमुखाला गतग्रामिणी म्हणत. १००० गावांचा समूह त्याला अधिपती म्हणत.

**मनस्मृती :**

मनुस्मृतीमध्ये देखील खेड्यांचा उल्लेख आढळतो. खेड्यांची विभागणी तीन प्रकारांत झालेली आढळते. मनुस्मृतीमध्ये कोणत्याही प्रदेशाचे तीन विभाग मानले आहेत. (अ) ग्राम (ब) पूर (क) नगर यापैकी ज्यांची लोकसंख्या सर्वात कमी आहे. त्याला ग्राम म्हणतात. ग्रामापेक्षा ज्यांची लोकसंख्या अधिक आहे त्याला पूर म्हणतात. पूरपेक्षा ज्याची लोकसंख्या जास्त आहे. ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरतो. त्याला नगर असे म्हटले आहे. अनेक कुटुंबाचे मिळून ग्राम तयार होते, असाही उल्लेख आढळतो.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये ग्रामीण समाजशास्त्राचे अतिशय सुरेख वर्णन केलेले आढळते. कौटिल्य अर्थशास्त्र जगमान्य मानले जाते. यामध्ये प्रत्येक क्षेत्राची माहिती दिलेली आढळते. खऱ्या अर्थाने ग्राम विषयाची कल्पना कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये मांडलेली आढळते.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये ग्रामीण समाजशास्त्राचे अतिशय सुरेख वर्णन केलेले आढळते. कौटिल्य अर्थशास्त्र जगमान्य मानले जाते. यामध्ये प्रत्येक क्षेत्राची माहिती दिलेली आढळते. खऱ्या अर्थाने ग्रामाविषयाची कल्पना कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये मांडलेली आढळते. ग्रामाचा अर्थ अधिकाधिक स्पष्ट करण्याचे कार्य कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये केलेले आढळते. नदी, डोंगर, जंगलांचा अभ्यास या शास्त्रामध्ये केलेला दिसून येतो.

## २.६ ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीस जबाबदार घटक

ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीस वेगवेगळे घटक जबाबदार असून ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीच्या दृष्टीने या घटकांचा प्रामुख्याने विचार करणे अत्यावश्यक आहे. या घटकांचा थोडक्यात परिचय करून घेणे गरजेचे आहे.

**भौगोलिक घटक :**

भौगोलिक घटकामध्ये जमीन, हवा आणि पाणी यांचा समावेश होता. या गोष्टी जिथे अनुकूल आहेत तिथेच खेड्याची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. या गोष्टी जिथे प्रतिकूल आहेत तिथे विरळ स्वरूपाची खेडी आढळतात.

**जमीन :**

वाळवंट भूभागामध्ये, दऱ्याखोऱ्यामध्ये डोंगराळ भागात फारच तुरळक स्वरूपाची खेडी आढळतात. कारण लागवडयोग्य जमीन कमी असल्याने शेती उत्पादनाचा प्रश्न नेहमीच भेडसावत राहतो. याउलट जिथे लागवड योग्य जमीन अधिक आढळते. तिथे मात्र खेड्यांची निर्मिती झपाट्याने झालेली आढळते. उदा. गंगा-यमुनांचे खोरे, या परिसरातील जमीन सुपीक असल्याने शेती उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेतले जाते. याचाच अर्थ असा की, खेड्याच्या निर्मितीमध्ये जमीन हा घटक अधिक महत्त्वाचा आहे.

**हवामान :**

ज्या भूप्रदेशातील हवामान समशितोष्ण आहे तिथे लोकवस्ती दाट(घन) आढळते. नवीन नवीन खेड्याची निर्मिती झालेली दिसून येते. उलट जिथे अत्यंत थंड वा उष्ण हवामान असते. तिथे मात्र तुरळक स्वरूपाची खेडी आढळतात.

**पाणी :**

मानवी प्राण्याच्या दृष्टीने तसेच शेती व्यवसायाच्या दृष्टीने पाणी ही मूलभूत गरज असून जिथे भरपूर पाणी आहे अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात खेडी अस्तित्वात आलेली पाहायला मिळतात. मात्र पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या प्रदेशात खेड्यांची संख्या कमी आढळते.

**आर्थिक घटक :**

आर्थिक घटक सबल बनविण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी जमीन सुपीक आहे. बागायती पिके घेतली जातात अशा ठिकाणचा शेतकरी वर्ग आर्थिकदृष्ट्या सबल आढळतो. सर्वजण अशा ठिकाणी वास्तव्य करणे अधिक पसंत करतात. स्थानिक साधनसामुग्रीचा वापर करून जिथे उद्योगव्यवसायांची निर्मिती केली जाते तिथेदेखील खेड्याचे प्रमाण अधिक आढळते.

**सामाजिक घटक :**

सामाजिक स्वास्थ्य ज्या भागातील लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळते. अशा ठिकाणी खेड्याची निर्मिती झपाट्याने झालेली दिसून येते. आपापसात हेवेदावे नसणे हे एक सामाजिक स्वास्थ्याचे लक्षण आहे. सामाजिक प्रश्न आपापसात सोडविण्याची ज्या खेड्यातील लोकांमध्ये अधिक कुवत आढळते. त्या खेड्यांची झपाट्याने प्रगती झालेली दिसून येते.

**सहकार :**

एकमेकांना सहकार करण्याची वृत्ती ज्या खेड्यात लोकांमध्ये अधिक आढळते अशा भूप्रदेशातील खेडी अत्यावधीत नावारूपाला आलेली आढळतात. मात्र सहकाराची वृत्ती नसणाऱ्या भूप्रदेशातील

खेड्याची अधोगती झालेली दिसून येते. कित्येक वेळा हे लोक एकमेकांच्या विकासाआड येत असल्याने सामाजिक शांततासुद्धा नाहीशी होण्याची शक्यता असते.

**बुद्धिमत्ता व श्रम :**

बुद्धिमत्तेच्या जोरावर काही भूप्रदेशातील लोकांनी अल्पावधीत आपली प्रगती करून घेतलेली दिसून येते. अर्थात बुद्धीबरोबर श्रमही करण्याची तयारी या लोकांची असते. काही प्रदेशामध्ये बुद्धिजीवी वर्ग फारच कमी प्रमाणात आढळतो. रूढीपरंपरांचा पगडा या लोकांमध्ये अधिक आढळतो. तिथे विरळ स्वरूपाची खेडी आढळतात. म्हणून बुद्धी आणि श्रम या दोन गोष्टींची जोड ज्या प्रदेशातील मंडळींना लाभलेली आहे त्या परिसरातील खेडी प्रगतीच्या मार्गावर असलेली दिसून येतात.

**नागरी (शहरी) समुदाय :**

**आदिवासी :**

ग्रामीण यानंतर समुदाय विकासातील अत्यंत गुंतागुंतीचा विकसित टप्पा म्हणजे शहरी किंवा नागरी समुदाय होय.

मानवी जीवनाच्या प्रगत अवस्थेचे ज्वलंत उदाहरण म्हणून नागरी समुदायाला ओळखले जाते. मानवी संस्कृतीच्या विकासातील नागरी समाजाचा व नागरी संस्कृतीचा प्रारंभ खऱ्या अर्थाने ग्रामीण समाजापासूनच झाल्याचे दिसून येते. शेती प्रधान व्यवसायावर पूर्णपणे अवलंबुन न राहता जेव्हा इतर व्यवसायांचा आर्थिक स्थैर्यासाठी स्वीकार करण्यात येऊ लागला तेव्हा नागरी समाजाचा प्रारंभ झाला. भारतामध्ये २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १०२.५२ कोटी होती. या पैकी नागरी लोकसंख्या २८.४९ कोटी होती. यात पुरूषांची संख्या १४.९९ कोटी, तर स्त्रियांची १३.५० कोटी होती. १० लाखापेक्षा अधिक असलेल्या शहरांची संख्या २७ झाली आहे.

**शहरवाढीचे घटक :** शहरवाढी मुख्यत्वे करून खालील घटकांचा समावेश आढळतो.

**१) औद्योगिक विकास :**

औद्योगिक विकास झाल्यामुळे ग्रामीण विभागातून शहरामध्ये जास्तीत जास्त लोकसंख्या एकत्र वास्तव्यास आली त्यामुळे शहरांची वाढ झाली.

**२) व्यापारी क्रांती :**

व्यापाराचे प्रमुख ठिकाण म्हणून शहराकडे पाहिले जाऊ लागले. विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर शहरी समाजामध्ये होऊ लागली. आर्थिक उलाढालीसाठी लोक एकत्र वास्तव्यास येऊ लागले.

**३) कृषिव्यवसायातील क्रांती :**

कृषिव्यवसायामध्ये क्रांती घडून आल्यामुळे शेतीतील मालाची खरेदी-विक्री शहरी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात होऊ लागली. शेतमालावर प्रक्रिया घडविणाऱ्या संस्थांची / उद्योगक्षेत्रांची निर्मिती शहरी समाजामध्ये केली जाऊ लागली. परिणामी शहरांची संख्या वाढली.

**४) उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती :**

पुस्तकी शिक्षणाबरोबर धंदेविषयक शिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती शहरी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात झाली. पदवी, पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या संस्थांची दिवसेंदिवस शहरी समाजामध्ये भरभराट झाल्याने उच्चशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मंडळींनी शहरामध्ये वास्तव्य करण्यास सुरूवात केली. पर्यायाने शहरांची मोठ्या प्रमाणात वाढ करण्यास सुरूवात केली. पर्यायाने शहरांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

**५) मनोरंजनाच्या सोयीमध्ये वाढ :**

धंदेकरमणुकीची विविध केंद्र शहरी समाजामध्ये सर्वत्र आढळतात. धंदेकरमणुकीचा आस्वाद घेणाऱ्या मंडळींची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. शहरी समाजामध्ये वास्तव्य करणाऱ्या मंडळींची संख्या वाढू लागली आहे. या शिवाय शहरवाढीच्या बाबतीत संदेशवहनाच्या साधनातील विकास, राजकीय घटक हे घटकदेखील जबाबदार आहेत.

शहराच्या उत्पत्तीच्या संदर्भात विविध सिद्धांत मांडले आहेत. ई बर्जेसचा विभागीय (झोन) सिद्धांत, होम हॉयट्स थेअरी या सिद्धांतातून शहरांच्या रचने विषयी सविस्तर माहिती दिल्याचे दिसून येते.

भारतातील नागरी समुदायाच्या बाबतीत खालील व्याख्या केलेल्या दिसून येतात.

१) ज्या समाजामध्ये सामाजिक विविधता, सामाजिक गतिशीलता आणि विशेषीकरण मोठ्या प्रमाणात आढळते त्या समाजाला नागरी समुदाय असे म्हटले आहे.

२) ज्या समाजाची संख्याा ५००० पेक्षा अधिक आहे. जिथे सामाजिक गतिशीलता, विशेषीकरण मोठ्या प्रमाणात आढळते. त्या समाजाला नागरी समुदाय असे म्हटले आहे.

३) सामाजिक विजातीयता असलेल्या व्यक्तीचा तुलनात्मकदृष्ट्या मोठा दाट स्थायी स्वरूपाचा समुदाय म्हणजे शहर किंवा नगर होय.

## २.७ शहरी समुदायाची वैशिष्ट्ये

शहरांची संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी नागरी समुदायाची पुढील सामाजिक वैशिष्ट्ये लक्षात घेणे अधिक आवश्यक आहे.

**१) मानवनिर्मित कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव :**

शहरी समुदायाचा निसर्गाशी प्रत्यक्ष असा संबंध येत नाही. त्याने प्रगत तंत्रविज्ञान, उपकरणांच्या साहाय्याने दुय्यम असे कृत्रिम पर्यावरण तयार केलेले असते. तो आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मानवनिर्मिती उपकरणे व प्रगत तंत्रविद्या यांचा वापर करतो. शहरी समुदाय हे प्रामुख्याने बिगरशेती व्यवसायी असतात. निसर्गातील घडामोडींचा उदा. अवर्षण अगर ओला दुष्काळ वगैरेंचा तत्कालीन व प्रत्यक्ष असा अभाव त्याच्या जीवनावर दिसून येत नाही. याचा त्यांच्या मनोवृत्तीवर फार मोठा परिणाम दिसून येतो. त्यांच्यात चिकित्सक वृत्तीचा परिपोष आढळून येतो. प्रारब्ध वादीपेक्षा तो

अधिकतर प्रयत्नवादी दिसून येतो. नगरातील व्यक्तीच्या आवडीनिवडी, त्याचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे कुटुंब, त्याचे सामाजिक संबंध, धर्मविषयक श्रद्धा, विवाहविषयक दृष्टिकोन, त्यांचे आरोग्य इत्यादी विविध बाबींवर नगरातील मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभावी परिणाम होत असतो.

**२. शेतीव्यतिरिक्त विविध व्यवसाय :**

शेतीव्यतिरिक्त म्हणजे बिगरशेती व्यवसायात शहरी लोक गुंतलेले असतात. टाचणी ते ट्रॅक्टर, बालवाडी ते विद्यापीठ, सफाई कामगार ते प्रशासक, सहकारी सोसायट्या ते राष्ट्रीयीकृत बँका, उत्पादक ते विक्रेता, वृत्तपत्रांचे संपादक ते वृत्तपत्राची रद्दी, चित्रपटगृहाचा द्वारपाल ते चित्रपटांची निर्मिती अशा हजारो व्यवसायात मग ते शासकीय-अशासकीय, व्यापारी-शैक्षणिक, धार्मिक करमणूक वगैरेंचे असो त्यात शहरी नागरिक चरितार्थ चालवीत असतात. अशा व्यवसायांना बिगर प्राथमिक व्यवसाय असेही म्हटले जाते.

**३. मोठा आकार व दाट वस्ती :**

शहरी समुदायाचा आकार तुलनात्मकदृष्ट्या मोठा असतो. विविध व्यवसायांना शहरी समुदायात वाव असल्याने थोड्या जागेत दाट लोकवस्ती दिसून येते. कारण शहरी व्यवसायांना शेतीपेक्षा फार कमी जागा पुरेशी होते. शहरातून पोटापाण्याचा, शिक्षणाचा प्रश्न सुटेल या कारणास्तव शेजारच्या ग्रामीण समुदायातून, तसेच देशाच्या इतर भागांतून लोकांचा सततचा ओघ उंच उंच इमारती बांधल्या जातात. अशा झोपडपट्ट्यादेखील निर्माण होतात. दळणवळणाच्या वाढत्या सोयीने शहरे विस्तारली जातात.

**४.सामाजिक विजातीयता :**

शहरातील लोकसंख्या एकीकडे दाट असते, तर दुसरीकडे त्यात विजातीयता दिसून येते. वेगवेगळ्या जाती धर्माचे, पंथाचे, भाषा-बोलीचे, आचार-विचाराचे, आवडी निवडीचे, परंपरेचे, विविध व्यवसायाचे, भिन्न - दर्जाचे, जीवनविषयक भिन्न-भिन्न दृष्टिकोन असलेले लोक शहरी समुदायात मर्यादित जागेत एकवटलेले असतात. आपण एखाद्या कारखान्याचे वा कार्यालयाचे जरी सहज अवलोकन केले तर ही विजातीयता तात्काळ दिसून येते. त्यामुळे सजातीय ग्रामीण समुदायापेक्षा त्याला विजातीय स्वरूप लाभलेले असते. त्यामुळे सामाजिक विजातीयता म्हणजे सामाजिक बहुजिनसीपणा शहरी समुदायाचे प्रभेदक लक्षण बनले आहे.

**५) दुय्यम संबंधाचे प्राबल्य :**

शहरी समुदायायातील लोकसंख्या दाट व विस्तृत असल्याने शहराचा आकार मोठा असतो. त्यामुळे हा दुय्यम समूह बनतो. अत्यंत विजातीय स्वरूप लाभलेल्या या समूहातील व्यक्ती एकमेकाला नावाने फारशा परिचित नसतात. या समुदायात प्रत्यक्ष समोरासमोरचे संबंध फारसे येत नाहीत. व्यक्तिनिरपेक्ष संबंध असल्याने फोन, वृत्तपत्र, रेडिओ, टी.व्ही इत्यादी संपर्क साधनांचा वापर केला जातो. इथले संबंध हे कारणमात्र किंवा साधनमात्र असतात. एखादी व्यक्ती किती उपयुक्त आहे यावरून या संबंधाची तीव्रता अवलंबून असते. वर्षानुवर्षे एकाच फ्लॅटमध्ये राहणारी माणसे एकमेकाला खऱ्या अर्थाने परिचित नसतात. त्यांच्यात प्राथमिक संबंध निर्माण झालेले नसतात.

**६) व्यक्ती प्रधानतेस वाव :**

शहरी समुदायातील लाखो लोक असले तरी मानसिक व सामाजिक एकात्मता कमी झालेली असते. शिवाय व्यक्तीचे शहरातील स्थान हे ती इतरांना किती उपयुक्त ठरते यावरून ठरत असते. तिचे कूळ, कुटुंब किंवा जात याचा विचार केला जात नाही. विविध व्यवसायांतून व्यक्तीला आपल्या अंगच्या गुणांवरून दर्जा प्राप्त होत असल्याने शहरी समुदायात व्यक्ती प्रधानतेस वाव मिळतो. याचा दूरगामी परिणाम व्यक्तीच्या मनोरचनेवर होतो. तो आपल्या आवडीनिवडी जोपासतो. इच्छेनुसार, लहरीनुसार, पात्रतेनुसार बऱ्याच बाबतीत निर्णय घेऊ शकतो. ही बाब त्याच्या व्यक्तिविकासाला अत्यंत पोषक ठरते. एकप्रकारचे स्वतंत्र असे जीवन तो जगत असतो. त्यात तो स्वतःच केंद्र असतो ज्याला आपण Career Minded म्हणतो. तो वेगळ्या अर्थाने स्वतःचे स्वार्थ, हितसंबंध जोपासत असतो. थोडक्यात शहरी समुदायातील व्यक्तीची अधिकतर बांधीलकी स्वतःशी असते. समुदायाशी नव्हे.

**७) ऐच्छिक मंडळांची मोठी संख्या :**

मोठ्या व दाट लोकवस्तीच्या शहरातील मोठ्या प्रमाणातील विजातीयता ऐच्छिक मंडळांना पोषकच ठरते. भिन्न भिन्न भाषा, आवडी-निवडी, जातीधर्म, व्यापारव्यवसाय इत्यादी बाबतीत एकीकडे भिन्नता वाढत असतानाच दुसरीकडे समान आवडी-निवडी, सवयी, छंद हितसंबंध जोपासण्याच्या दृष्टीने एकत्र येण्याची प्रक्रियादेखील मोठ्याने घडून येत असते. शहरी समुदायातील व्यक्ती आपले विशिष्ट हितसंबंध जोपासण्यासाठी अनेक प्रकारच्या ऐच्छिक मंडळांची सदस्य असते. शारीरिक स्वास्थ्य मिळविण्यासाठी ती योगासनाच्या वर्गाची सदस्य असेल, तर करमणुकीसाठी एखाद्या कॅरम क्लबची सदस्य असेल. याचप्रमाणे शहरात रोटरी क्लब, लायन्स क्लब, महिला मंडळे, नाटक मंडळी, साहित्य सभा, विविध कला मंडळे, पर्यावरण बचाव मंडळे वगैरेही एक आवश्यक बाब बनली आहे.

**८) सामाजिक सहिष्णुता :**

के डेव्हिसच्या मते सामाजिक सहिष्णुता नागरी समुदायात प्राधान्याने आढळते. या समुदायाचे सदस्य स्वार्थाच्या पूर्तीसाठी इच्छा नसूनही सहिष्णुतापूर्वक व्यवहार करतात. वास्तविक पाहता त्यांचे स्वार्थ परस्पर भिन्न असतात. मात्र गरजापूर्तीसाठी एका दुसऱ्याच्या मदतीची गरज असते. अशा परिस्थितीत उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी ते सहनशीलता दर्शवितात.

**९) सामाजिक गतिशीलता:**

नागरी समुदायात खुलेपणा असतो. परंपरागत तटबंद्या नसतात आणि जातीचा प्रभाव नसतो. कुणीही व्यक्ती शिक्षण घेऊ शकते. कोणताही व्यवसाय करू शकते. स्पर्धेत सहभागी होऊ शकते. त्यामुळे व्यक्तिविकास करता येतो. या समुदायात जन्म, वय, लिंग, जातीपेक्षा कर्तृत्व, शिक्षण, नैपुण्य, बुद्धिमत्ता, निर्णयक्षमता महत्त्वाची असते. व्यक्ती गुणवत्तेच्या आधारे वरचे पद मिळवू शकते. या समुदायात व्यावसायिक, स्थानिक आणि सामाजिक गतिशीलता प्रत्ययास येते.

**१०) श्रमविभाजन व विशेषीकरणाला महत्त्व :**

शहरी समुदायात श्रमविभाजन व विशेषीकरणाला मोठा वाव मिळतो. तांत्रिक, औद्योगिक, व्यापारी, शैक्षणिक, राजकीय, साहित्यिक, कला, करमणूक इत्यादी जीवनाच्या विविध दालनांत

विविध व्यक्ती विशिष्ट अशी कार्ये करताना दिसून येतात. आवडी-निवडी, पात्रता, बुद्धिमत्ता, शारीरिक क्षमता, शैक्षणिक क्षमता, वंश, लिंग वगैरेनुसार हे श्रमविभाजन व विशेषीकरण घडून आलेले असते. अकुशल, अर्धकुशल, कुशल, विशेषज्ञ असे अनेक लोक एकाच कारखान्यात दिसून येतात. शहरात डॉक्टर म्हटला तरी तो दातांचा, हाडांचा, हृदयाचा, डोळे, नाक, कान, घशाचा वगैरेंतील तज्ज्ञ असतो. महापालिकेचा कारभार आयुक्तापासून ते स्वच्छता कामगारांपर्यंत हजारो वेगवेगळे काम करणाऱ्या चालवीत असतात.

### ११) सामाजिक स्तरिकरणात वर्गव्यवस्थेचा प्रभाव :

शहरात जे सामाजिक स्तरीकरण आढळते त्यात धर्म, पंथ, जात यांचा जरी विचार होत असला तरी आर्थिक स्थितीवरून गरीब, मध्यस्थ, श्रीमंत अशी जी वर्गव्यवस्था आकारास आलेली आहे तिचा फार मोठा प्रभाव आढळतो. आर्थिक स्थितीवरून व्यक्तीचा दर्जा ठरतो व त्याच्या कुटुंबालाही तो प्रभावित करतो. शिकण्याची, व्यवसाय करण्याची, कलाक्षेत्रात चमकण्याची, राजकीय क्षेत्रात पुढे येण्याची संधी व्यक्तीला उपलब्ध होते. त्यात जातीचा अडसर येत नाही. परिणामी शहरी जीवनात, सामाजिक स्तरीकरणात वर्गव्यवस्था, व्यवसाय, आवडी-निवडी, सामाजिक स्थान यामुळे प्रभावित होते. श्रीमंत शहराच्या चांगल्या ठिकाणी ते राहतात. लोकलने प्रवास करतानादेखील ते पहिल्या दर्जाच्या डब्यातून प्रवास करतात. मध्यमवर्गीय चाळीत वा उपनगरात कर्ज काढून फ्लॅटमध्ये राहतील तर गरीब चाळीतील खोली वा झोपडपट्टीत कसेबसे जगत राहतील.

### १२) दुय्यम समूहाकडून सामाजिक नियंत्रण :

शहरातील लोकसंख्या विशाल, दाट व विजातीय असल्यामुळे व्यक्ती अधिक स्वतंत्र व मुक्तपणे वागू शकते. तशातच विभक्त कुटुंबपद्धतीचे वाढते प्रमाण, नोकरी-व्यवसाय, प्रापंचिक जबाबदाऱ्यांचा केवळ पती-पत्नीवर पडणारा ताण यामुळे मुलांवर हवे तितके लक्ष देता येत नाही. प्रथा, परंपरा, कुटुंब, शाळा, शेजारी वगैरेंकडून शहरात व्यक्तीच्या वर्तनाचे फारसे प्रभावी नियंत्रण होऊ शकत नाही. त्यामुळे शहरात सामाजिक नियंत्रणासाठी दुय्यम समूहाचा वापर केला जातो. कायदा, पोलीस, न्यायखाते यांसारख्या औपचारिक मार्गाचा वापर शहरात अधिक आवश्यक ठरतो.

## २.८ स्वाध्याय

१. आदिवासी समुदाय, ग्रामीण समुदाय व शहरी समुदाय यांतील भेद स्पष्ट करा.

२. आदिवासी समुदाय, ग्रामीण समुदाय आणि शहरी समुदाय हे एकमेकांवर कोणकोणत्या बाबतीत अवलंबून आहेत ते सांगा.

३. आदिवासी समुदायाची संकल्पना स्पष्ट करून आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये सांगा.

४. ग्रामीण समुदायाची व्याख्या सांगून ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीस जबाबदार असलेल्या घटकांची चर्चा करा.

५. शहरी समुदायाची व्याख्या सांगून शहरी समुदायाची वैशिष्ट्ये सांगा.

♦ ♦ ♦

# ३

# ग्रामीण नागरी सातत्य

**पाठाची रूपरेषा**

३.० पाठाचे उद्देश

३.१ प्रास्ताविक

३.२ ग्रामीण नगरीय सातत्याचा अर्थ.

३.३ ग्रामीण नगरीय सातत्याच्या ठळक बाबी.

३.४ भारतातील ग्रामीण नगरीय सातत्य.

३.५ नगरीय ग्रामीण आंतरक्रिया

३.६ ग्रामीण क्षेत्रातील सामाजिक आंतरक्रिया.

३.७ ग्रामीण नगरीय सातत्याचे दृश्य परिणाम.

३.८ ग्रामीण जीवनावर नगरीय जीवनाचा प्रभाव.

३.९ ग्रामीण नगरीय सातत्यामुळे निर्माण झालेल्या समस्या

३.१० स्वाध्याय

## ३.० पाठाचे उद्देश

- ग्रामीण नगरीय सातत्याचा अर्थ समजावून घेणे.
- ग्रामीण नगरीय सातत्याची ठळक उदाहरणे समजून घेणे.
- नगरीय ग्रामीण आंतरक्रिया समजावून घेणे.
- ग्रामीण क्षेत्रातील सामाजिक आंतरक्रिया अभ्यासणे.
- ग्रामीण नागरी सातत्याचे दृश्य परिणाम अभ्यासणे.
- ग्रामीण जीवनावर नागरी जीवनाचा झालेला प्रभाव समजावून घेणे.
- ग्रामीण नगरीय सातत्यामुळे निर्माण झालेल्या समस्या अभ्यासणे.

## ३.१ प्रास्ताविक

भारतीय समाजामध्ये ग्रामीण आणि शहरी असे दोन प्रमुख समाज आहेत. ते परस्परावलंबी आहेत. नगर आणि ग्राम यांचा संबंध दिवसेंदिवस घनिष्ठ होत चालला आहे. नगराची सुरूवात आणि त्याचा शेवट सांगणे कठीण. या दोन्ही समाजामध्ये ग्रामीण समाजातून नगराकडे स्थलांतरित होणाऱ्या मंडळीचे प्रमाण सर्वात अधिक आहे. ग्रामीण समाजावर व ग्रामीण समाजाचा नागरी समाजावर प्रभाव पडत असल्याने ग्रामीण व नागरी समाजात सातत्य निर्माण झालेले दिसून येते. ग्राम्य नागरीकरण आणि ग्राम्य समाप्तीकरण या प्रक्रिया फार जलद प्रमाणात घडून येऊ लागल्या आहेत. शहरी संस्कृतीचा ग्रामीण समाजावर व ग्रामीण संस्कृतीचा शहरी समाजावर दूरगामी परिणाम झालेला दिसून येतो. ग्रामीण नगरीत सातत्याच्या दृष्टीने अन्नधान्य, दूधदुभते व भाजीपाला, फळफळावळ, कच्चामाल, ग्राहक वर्गाची उपलब्धता या बाबतीत शहरी समाज ग्रामीण समाजावर अवलंबून आहे. तर धंदे करमणूक, उच्चशिक्षण सेवाभावी संस्था, पूरक व्यवसाय, समाजकारण, राजकारण यासंदर्भात ग्रामीण समाज शहरी समाजावर अवलंबून आहे. ग्रामीण नगरीय सातत्याच्या दृष्टीने ग्रामीण शहरी आंतरक्रिया नागरी समाजाच्या ग्रामीण समाजावरील प्रभाव या घटनादेखील कारणीभूत आहेत. दोन्ही समाजातील सातत्यामुळे एकमेकांमध्ये जवळीकता निर्माण झाली असली तरी काही समस्या निर्माण झाल्या आहेत. सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये तरी याहीपेक्षा जलदगतीने शहरे व ग्रामीण समाज एकत्र येऊ लागले आहेत. शहरी-ग्रामीण सातत्य दोन्ही समाजामध्ये परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरले आहे.

## ३.२ ग्रामीण नगरीय सातत्याचा अर्थ

रॉबर्ट रेड फिल्ड या शास्त्रज्ञापासून अनेक शास्त्रज्ञांनी ग्रामीण नगरीय सातत्याविषयी आपले विचार मांडले असले तरी ग्रामीण, नगरीय सातत्य या बाबत निश्चित अशा व्याख्या कोणीही केलेल्या नाहीत. एवढे मात्र निश्चित की हे दोन्ही समाज एकमेकांमध्ये विलीन झाले आहेत. एकमेकांची गुणवैशिष्ट्ये आपापसात आत्मसात केलेली आहेत. नागरी समाजाच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजामध्ये परिवर्तन घडून आलेले आहे. ग्रामीण समाजाच्या संस्कृतीचा त्याचबरोबर इतर विविध अंगाचा स्वीकार शहरी समाजातील मंडळींनी केलेला आहे. ढोबळमानाने ग्रामीण, नगरीय सातत्याचा अर्थ खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) शहरी आणि ग्रामीण संस्कृती यांची आपापसामध्ये देवाणघेवाण होणे, शहरी संस्कृतीच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजामध्ये एक प्रकारचे परिवर्तन घडून येणे म्हणजे ग्रामीण, नगरीय सातत्य होय.

२) शहरांचा प्रभाव ग्रामीण समाजावर पडणे, नगरीय जीवनाच्या प्रभावामुळे ग्रामीण लोकांच्या जीवनात सतत परिवर्तन होत जाणे म्हणजे ग्रामीण नगरीय सातत्य होय.

३) ग्रामीण समाजावर देखील बऱ्याच वेळेला शहरी समाज अवलंबून असतो. उदा. भाजीपाला, दूधदुभते, फळे, कच्चामाल, इत्यादी हेच ग्रामीण नगरीय सातत्य होय.

४) ग्रामीण क्षेत्र व नगरीय क्षेत्र ही दोन्ही क्षेत्रे परस्परावलंबी व परस्पराश्रेयी आहेत. या दोहोंत मिळतेजुळते किंवा परस्पर सापेक्ष संबंध आहेत. या संबंधांनाच ग्रामीण नगरीय सातत्य असे म्हटले आहे.

५) ग्रामीण, नागरीय या दोन समाजांचा परस्पर निकटचा संबंध निर्माण होणे, ते समाज परस्परान्वयी व परस्परावलंबी बनणे म्हणजे ग्रामीण नगरीय सातत्य होय.

६) ग्रामीण, नगरीय समाजांची मूलतः कोणत्याही प्रकारे फारकत करता न येणे, त्यांच्यामध्ये वेगवेगळ्या दृष्टीने आंतरिक संबंध दृढ बनविणे, एकमेकांच्या सहकार्याची एकमेकांना जाणीव निर्माण करून देणे म्हणजे ग्रामीण नगरीय सातत्य होय.

**ग्रामीण, नगरीय सातत्याची ठळक उदाहरणे-**

ग्रामीण समाजातूनच शहरी समाजाचा जन्म झालेला आहे. ग्रामीण आणि शहरी समाज हे पस्परस्परावलंबी आहेत. केवळ नागरीय समाजाचा ग्रामीण समाजावर परिणाम होतो असे नाही तर ग्रामीण समाजाचा देखील नगरीय समाजावर परिणाम होतो. जसा ग्रामीण समाज शहरी समाजावर अवलंबून आहे, तसाच शहरी समाजदेखील ग्रामीण समाजावर अवलंबून आहे. त्यामुळे तर या दोहोंतील सातत्य टिकून आहे. या संदर्भात खालील उदाहरणे देता येतील.

**१) अन्नधान्याची उपलब्धता :**

औद्योगिकदृष्ट्या शहरी समाज कितीही प्रगत बनला असला तरी अन्नधान्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत तो मागासलेला राहिला आहे. या समाजामध्ये शेती व्यवसायाला फारशे प्राधान्य दिले जात नाही. उत्तम प्रतिचे अन्नधान्य उपलब्ध करण्यासाठी नगरीय समाजाला ग्रामीण समाजावर अवलंबून राहावे लागते.

**२) दूधदुभते व भाजीपाला :**

दूधदुभते, भाजीपाला, फळफळावळ याबाबतीत शहरी समाजाला ग्रामीण समाजावर अवलंबून राहावे लागते. शहरामध्ये अलीकडे गोपालन, म्हैशींचे पालन केले जात असले तरी त्यांच्यापासून मिळणारे दूध शहरवासीयांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. आजूबाजूच्या खेड्यातून संबंधित शहरांना दूधपुरवठा केला जातो. हीचगोष्ट भाजीपाल्याच्या बाबतीत दिसून येते. शहरामध्ये भाजीपाल्यांचे उत्पन्न काढले जात नाही. शहरवासीयांना लागणारा भाजीपाला खेड्यापाड्यातूनच पुरविला जातो.

**३) फळांचे उत्पादन :**

फळांचे उत्पादन ग्रामीण विभागातच मोठ्या प्रमाणात केले जाते. शहरवासीयांच्या मागणीनुसार फळांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन ग्रामीण समाजामध्ये घेतले जाते. उदा. कलिंगड, डाळिंब, चिकू , अननस, आंबे, पपई, केळी यासारख्या फळांचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे शहरवासीयांना फळांच्या उत्पादनाबाबत खेड्यावर अवलंबून राहावे लागते.

**४) कच्च्या मालाचा पुरवठा :**

शहरी समाजामध्ये वेगवेगळ्या कारखान्यामध्ये लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा ग्रामीण समाजातून केला जातो. उदा. साखर कारखान्यासाठी लागणारा ऊस, कापडी बनविण्यासाठी लागणारा कापूस, फळप्रक्रिया उद्योगासाठी लागणारी वेगवेगळ्या प्रकारची फळे इत्यादी पुरवठा ग्रामीण समाजाकडून शहरी समाजाला केला जातो.

**५) ग्राहक वर्गाची उपलब्धता :**

शहरामध्ये तयार होणाऱ्या सर्वच मालाची उचल ही शहरी समाजातील लोकांकडून होऊ शकत नाही. शहरामध्ये तयार होणाऱ्या बऱ्याच मालाची उचल ही ग्रामीण भागातील ग्राहकांकडून केली जाते. दैनंदिन वापराच्या वस्तू, शोभेच्या वस्तू, यंत्रसामुग्री इत्यादीची उपलब्धता ग्रामीण ग्राहकांना शहरी समाजाकडून केली जाते.

**६) धंदे करमणुकीचा आस्वाद :**

ग्रामीण समाजामध्ये पारंपारिक करमणूक मोठ्या प्रमाणात आढळते. धंदेकरमणूक उदा. नाटक, सिनेमा, विविध प्रकारचे नाच या गोष्टींचा आस्वाद घेण्यासाठी ग्रामवासीयांना शहरावर अवलंबून राहावे लागते.

**७) उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था :**

उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था, धंदेशिक्षण देणाऱ्या संस्था आज शहरी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहेत. ग्रामीण भागातून शहरी भागात खास करून उच्चशिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या मंडळींचे प्रमाण अधिक आहे. यापैकी काही लोक धंदेशिक्षण पूर्ण केल्यानंतर शहरामध्ये स्थायिक झालेले आढळतात. तर काही लोक परत ग्रामीण समाजामध्ये येऊन स्थायिक झालेले दिसून येतात.

**८) सेवाभावी संस्था :**

शहरी समाजामध्ये अनेक प्रकारच्या सेवाभावी संस्था आढळतात. यामध्ये अनाथालये, अनाथ महिलाश्रम, बालकाश्रम, प्रमाणित शाळा, वृद्धाश्रम, भिक्षागृह, स्वीकारगृह, लायन्स क्लब, रोटरी क्लब इत्यादी या सेवाभावी संस्थाचा लाभ शहरवासीयांबरोबर ग्रामीण समाजातील मंडळीदेखील मोठ्या प्रमाणात घेतात. आपापल्या अडीअडचणी आपापल्या पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न करतात.

**९) पूरक व्यवसायांची निर्मिती :**

ग्रामीण समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे पूरक व्यवसाय आढळतात. उदा. वराहपालन, मधमादिका पालन, रेशीम उद्योग, काजू प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय इत्यादी या व्यवसायांचा लाभ ग्रामीण समाजातील लोकांना तर होतोच शिवाय शहरी समाजातील लोकांना सुद्धा या व्यवसायांचा लाभ होतो. शहरातील रेडिमेड कपड्यांची दुकाने, चायनिज मेड वस्तू, चायनिज जेवण, गृहोपयोगी वस्तू या सर्वांचा लाभ ग्रामीण समाजातील लोक घेऊ लागले आहेत.

**१०) विविध मंडळांचे कार्यक्रम :**

ग्रामीण विभागातील काही मंडळांची कार्यालये शहरी समाजामध्ये कार्य करीत असलेली दिसून येतात. गावातील मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम शहरामध्ये त्या गावाचे अस्तित्वात असलेले मंडळ पाहते. गावाच्या विकासासाठी ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यासाठी लागणारे पुरेसे आर्थिक बळ उपलब्ध करण्यासाठी शहरी समाजामध्ये वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात.

**११) राजकारण :**

शहरी समाजामध्ये अस्तित्वात असणारे नव्याने जन्माला येणारे विविध राजकीय पक्ष. त्यांचा परिणामदेखील ग्रामीण समाजावर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पार्टी इत्यादी पक्षांचे राजकारण ग्रामीण समाजापर्यंत येऊन पोहोचले आहे. ग्रामीण समाजातील लोकांचे नियोजन आज शहरवासीयांना करावे लागत आहे.

**१२) घरगुती वापराच्या वस्तू :**

स्वयंपाकासाठी लागणारी शेगडी गॅस, कुकर, वेगवेगळी उपकरणे यांची निर्मिती शहरी समाजात मोठ्या प्रमाणात केली जाते. ह्याशिवाय वॉशिंग, टेपरेकॉर्डर, रेडिओ इत्यादींची निर्मिती पण शहरी समाजातच केली जाते. या साधनाचा पुरेपूर वापर ग्रामीण समाजातील जनता करते. ग्रामीण समाजामध्ये तयार करण्यात आलेल्या काही वस्तूंचा उपभोग शहरी समाजातील जनता घेते. उदा. नारळाच्या पानापासून तयार केलेली वाडवण, घरगुती वापरातील बांबूपासून तयार करण्यात आलेले सूप, मातीचा माठ (गेळा) इत्यादी.

**१३) घरबांधणीसाठी लागणारे साहित्य :**

घरबांधणीसाठी लागणाऱ्या साहित्यामध्ये काही साहित्याच्या बाबतीत खेड्यांना शहरावर अवलंबून राहावे लागते, तर काही साहित्याच्या बाबतीत शहरांना खेड्यावर अवलंबून राहावे लागते. सिमेंटचे पत्र, कड्याकुलुपे किंवा गऱ्या, सिमेंटच्या विटा, घरगुती शोभेच्या वस्तू, इत्यादी बाबतीत मात्र खेडुतांना शहरांवर अवलंबून राहावे लागते. मातीच्या विटा, भाजलेल्या विटा, लाकूडकाम या बाबतीत मात्र शहरवासीयांना खेडुतांवर अवलंबून राहावे लागते.

आतापर्यंतच्या विवेवचनावरून ग्रामीण व नगरीय सातत्य या संदर्भात विविध गोष्टींचा खुलासा करण्यात आला. खरोखरीच वरील गोष्टीमुळे आजदेखील ग्रामीण नगरीय सातत्य टिकून आहे. खऱ्या अर्थाने हे दोन्ही समाज एकरूप होण्यासाठी ग्रामीण - नगरीय सातत्याची कल्पना जबाबदारी ठरलेली आहे.

## ३.४ भारतातील ग्रामीण नगरीय सातत्य

आजच्या परिस्थितीत भारताचा विचार केला असता ही ग्रामीण नगरीय सातत्याची संकल्पना भारतात स्पष्टपणे दिसून येते.

आज भारतात विविध प्रकारच्या विकासयोजना सुरू आहेत. त्यामुळे ग्रामीण क्षेत्राचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होत आहे. ग्रामीण क्षेत्रासाठी राबविल्या जाणाऱ्या या योजना नगरीय अधिकारीवर्गच कार्यान्वित करीत आहे. उदा. ग्रामीण पातळीवर राबविल्या जाणाऱ्या रस्त्यांच्या योजना, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा इत्यादी. याचाच अर्थ ग्राम वगर यात सत्य आहेच. विकास योजनांच्या कार्यवाहीमुळे गावांचा एकंदर चेहरामोहरा बदलून गेला आहे. लहान-लहान गावेसुद्धा छोट्या छोट्या नगरांचे रूप धारण करू लागली आहेत. गावातून नगरी जीवनाची लक्षणे दिसून येत आहेत. कृषी सुधारणा म्हणजेही गावांचे आधुनिकीकरण आहे. अर्थात हे आधुनिकीकरण शहराच्याच वळणावर होणारे आहेत. या विकास योजनेत संचारसाधने, स्वास्थ्य, सफाई, निवास, शिक्षण, रोजगारी, महिला कल्याण, बालकल्याण, कुटिरोद्योगांचा समावेश आहे. या सर्व गोष्टींमुळे आजची

भारतीय गावे पूर्वीप्रमाणे स्वयंपूर्ण स्वावलंबी व स्वतंत्र राहिली नाहीत तर ती आपल्या विकासासाठी नगरावर अवलंबून आहेत. नगरे आपल्या पोषणासाठी गावावर अवलंबून आहेत.

विज्ञान आणि तंत्र यामुळे निर्माण झालेल्या आधुनिक सभ्यतेमुळे नगरे व ग्राम परस्परावलंबी व अन्योन्याश्रयी बनत आहेत. परस्परांशी संलग्न आहे. आता हे दोन समाज घटक (ग्राम व नगर) परस्परापासून वेगळे व स्वतंत्र राहणे अशक्य आहे. पूर्ण या दोहोंत जे होते ते बरेच कमी झाले आहे. आणखीही कमी होणार आहे. परस्परांचे विशेष परस्परांना प्रभावित करत आहे. सरोकीनच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे शहर आणि गाव हे दोन्ही घटक एकरूप होण्याची जी प्रवृत्ती आहे. त्यामुळे विशिष्ट ग्रामीण व नगरीय लक्षणे एकमेकांत मिसळत आहेत. परंतु दोहोंचेही विशेष नष्ट न होता सुरक्षित राहतात. दोघांच्याही ठिकाणी असणारा अभाव कमी होतो.

आज भारतातील ग्रामीण समाज संरचनेत फार वेगाने परिवर्तन होत आहे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेला गावाचे नागरीकरण होण्याची प्रक्रिया म्हणतात. मोठ्या नगरात लहान उपनगरे निर्माण होण्याची प्रक्रिया म्हणजेही गावांचे नागरीकरण होण्याचीच प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे ग्राम व नगर यांचे सुखद सम्मीलन होत आहे. ही प्रक्रिया ग्रामीण - नगरीय सातत्याच्या रूपाने विकसित होईल.

जी खेडी शहराशी रस्त्याने जोडलेली आहेत. अशा खेड्यांचे परिवर्तन फारच झपाट्याने झालेले दिसून येत आहे. अशा शहरातील कारखानदारी, फॅशन, शैक्षणिक संस्था , संस्था संघटना यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडू लागला आहे. खेडी आणि शहरे यांच्यामध्ये सातत्य निर्माण होण्यास मदत झालेली आहे.

## ३.५ नगरीय ग्रामीण अंतरक्रिया

दिवसेंदिवस नगरीय ग्रामीण आंतरक्रिया वाढू लागल्याने या दोन्ही समाजांचे सातत्य अधिकाधिक दृढ होऊ लागले आहे. या ठिकाणी नगरीय ग्रामीण आंतरक्रियेचा विचार करण्यापूर्वी आंतरक्रिया म्हणजे काय हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दोन किंवा दोहोंपेक्षा अधिक व्यक्तींच्यामध्ये होणारी वैचारिक देवाणघेवाण म्हणजे सामाजिक आंतरक्रिया होय. ही आंतरक्रिया व्यक्तींमध्ये, गटांमध्ये अथवा समुदायामध्ये होऊ शकते.

जेव्हा दोन विभिन्न सामाजिक समूह परस्परांच्या संपर्कात येतात व त्यांच्या परस्परांवर सामाजिक क्रिया घडून येतात त्यांचा परिणाम म्हणून परस्परांनी परस्परांना प्रभावित करण्याच्या प्रवृत्तीला सामाजिक आंतरक्रिया म्हणतात.

संबंधाचे स्वरूप, त्यांची घनिष्ठता, प्राथमिकता किंवा तटस्थता, दिखाऊपणा, औपचारिकता या सर्वांचा समावेश सामाजिक आंतरक्रियेमध्ये होतो. एवढे मात्र निश्चित ग्रामीण आणि नगरीय समाजामध्ये जेवढी आंतरक्रिया अधिक तितके सातत्य अधिक. सामाजिक आंतरक्रियेवरच दोन्ही समाजातील सातत्य टिकून आहे.

नगर आणि ग्राम यांचा संपर्क आला की, या दोन्ही घटकांचा परस्परांवर प्रभाव पडतो. दोन्ही बाजूने क्रिया प्रक्रिया सुरू होतात. उदा. : नगरांच्या प्रभावामुळे ग्रामांचे नागरीकरण होऊ लागते, तर नगरातही ग्रामीणीकरणाची प्रवृत्ती निर्माण होते. दोन समसमान संस्कृतीचा प्रभाव असणारी नगरे आपल्या पाहण्यात येऊ लागतात.

## ३.६ ग्रामीण क्षेत्रातील सामाजिक आंतरक्रिया

### १) सामाजिक संपर्क :

ग्रामीण पक्ष : ग्रामीण क्षेत्र लहान असते. मर्यादित असते.

**संघर्षाची भावना :**

**ग्रामीण पक्ष :**

संघर्ष म्हणजे आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याचे अहित करण्याची, त्याला त्रास देण्याची, प्रसंगी हिंसक कार्य करण्याची तयारी होय. ग्रामीण समुदायात अनेक परंपरागत संघर्ष सुरू असतात. या संघर्षाचा परिणाम अनेकदा गंभीर अपराध, मारामारी किंवा खुनाखुनी हयात होती. ग्रामीण लोक अधिक भावनाप्रधान असल्यामुळे ते कोणत्याही कारणासाठी हिंसक संघर्ष करतात. अशा वेळी ते आपल्या प्राणांची पर्वा करीत नाहीत. हे संघर्ष शेतीवरून हिस्से वाटणीवरून किंवा धार्मिक कारणावरून होतात. असे संघर्ष कुटुंबातून व जातीतून पसरतात.

**नागरीय पक्ष :**

नगरात ग्रामीण लोकांप्रमाणे हिंसक संघर्षाचे प्रमाण कमी असते. नगरीय संघर्ष हे अप्रत्यक्ष स्वरूपाचे असतात. नगरीय लोकांची वृत्ती सहनशील व संयमी असल्यामुळे, तसेच त्यांच्या ठिकाणी व्यवहार चातुर्य असल्यामुळे प्रत्यक्ष व हिंसक संघर्ष सहसा होत नाही. शहरात हरताळ, टाळेबंदी, मारामाऱ्या, सांप्रदायिक झगडे, जातीय दंगली जास्त असतात.

## ३.७ ग्रामीण नगरीय सातत्याचे दृश्य परिणाम

ग्रामीण नगरीय सातत्य, त्यांच्यामध्ये परस्पर होणाऱ्या आंतरक्रिया यातून तीन प्रक्रिया निर्माण होतात.

### १) ग्राम्य नागरीकरण :

नगर आणि गाव यातील वाढत्या संपर्कामुळे नागरीकरणाची प्रक्रिया हळूहळू वाढत जाते. नगरीय संस्कृतीची छाप ग्रामीण भागावर उमटू लागते. नगरातील श्रीमंत लोक नगरातील यांत्रिक जीवनाला कंटाळतात. त्यांना बदल हवा असतो. शांती हवी असते. म्हणून ते नगराजवळ असलेल्या गावांत स्थानांतरण करतात किंवा नगरातच राहून ग्रामीण वैशिष्ट्ये विकसित करण्याचा प्रयत्न करतात. अशा रीतीने ग्राम्य नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते. ही प्रक्रिया म्हणजे ग्रामीण व नगरीय संस्कृतीचे मिश्रण होय. ग्रामीण आणि शहरी संस्कृतीचा समसमान प्रभाव एखाद्या खेड्यावर पडणे असेदेखील या प्रक्रियेला म्हटले आहे.

### २) उपनगरीयकरण :

मोठ्यामोठ्या शहरांना लागून किंवा शहराच्या निकट असलेल्या ग्रामीण भागांत नगराची वैशिष्ट्ये असलेली छोटी नगरे उत्पन्न होतात. या प्रक्रियेला उपनगरीयकरण म्हणतात. अशा उपनगरात काही ग्रामीण लक्षणे आढळतात. तर काही नगरीय लक्षणे आढळतात. मात्र नगरीय विशेषांना प्राधान्य

दिले जाते. उदाहरणार्थ, म्हणून सामाजिक संपर्काचे प्रमाण कमी असते. या संपर्कात विविधता नसते. जे संबंध असतात ते मात्र घनिष्ठ व प्राथमिक स्वरूपाचे असतात. मर्यादित क्षेत्रामुळे सामाजिक संबंधाचा विकास होत नाही. म्हणून त्यांचा दृष्टिकोन संकुचित असतो.

**नगरीय पक्ष :** सामाजिक संबंधात विविधता असते. वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांशी संबंध येतो. समिती व संस्थांशी संबंध येतो. त्यामुळे दृष्टिकोन उदार व विशाल बनतो. नगरीय संस्कृतीत गतिशीलता असते. प्रगती लवकर होते. मात्र नगरातील सामाजिक संबंध हे अप्रत्यक्ष, अवैयक्तिक व दुय्यम असतात.

**संयोगाची प्रक्रिया :** सहयोग (सहकार) करणे ही मानवी प्रवृत्ती आहे. सहयोगाशिवाय कोणतेही लहान-मोठे कार्य पार पडू शकत नाही. मनुष्याच्या अनेक गरजांसाठी सहयोगाची आवश्यकता असते.

ग्रामीण लोकांत सहयोगाची भावना अधिक प्रबल असते. हा सहयोग स्नेहसंबंधावर आधारित असतो. खेड्यात विविध प्रकारच्या संघटना नसतात. म्हणून ग्रामीण लोकांची सहयोगाची भावना कुटुंब किंवा जाती एवढ्या पुरती मर्यादित असते.

**नगरीय पक्ष :** नगरीय जनतेमध्ये व्यक्तिवाढ अधिक असतो. प्रत्येकजण स्वतंत्रपणे कार्य करतो. त्यांच्या ठिकाणी सहयोगाची प्रवृत्ती असते. पण ती सुप्त असते. प्रत्येकाच्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे स्वार्थ असतात. भिन्नभिन्न हितसंबंध असतात. आपला स्वार्थ किंवा हित साधण्यासाठी सहयोगाची प्रक्रिया आवश्यक असतेच.

**स्पर्धेची प्रक्रिया :**

**ग्रामीण पक्ष–** एकमेकांशी स्पर्धा करणे ही माणसाची स्वाभाविक वृत्ती आहे. ही वृत्ती मनुष्याच्या स्वभावातील असमानतेवर आधारलेली आहे. ग्रामीण समाजात स्वार्थ मर्यादित असतात. शिवाय स्वार्थाच्या बाबतीत विविधताही कमी असते. त्यांच्या ठिकाणी सामुदायिक भावना असते. सांस्कृतिक मूल्यावर निष्ठाही ठेवतात. प्रत्येकाचे कार्यही वेगळे असते. दुसऱ्याचे अहित करावे अशी भावना कमी प्रमाणात असते. म्हणून ग्रामीण समाजात स्पर्धेची प्रक्रिया कमी असते. ग्रामीण लोकांत व्यक्तिपेक्षा कुटुंबाला अधिक महत्त्व असते.

**नगरीय पक्ष :** याच्या उलट नगरीय लोकांत स्पर्धेत क्षेत्र व्यापक असते. एकमेकांचे हितसंबंध एकमेकांच्या विरोधी असतात. प्रत्येकजण समोर जाण्याचा व आपले हित साधण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी इतरांना मागे टाकण्याच्या प्रयत्नात असतो. व्यक्तीची स्थिती किंवा दर्जा त्याला स्वतः प्राप्त करून घ्यावा लागतो. मुंबईजवळील अनेक उपनगरे ही नगराप्रमाणे विशाल नसतात. नगराची लक्षणे असूनही त्यांना नगर म्हणता येत नाही. अशा उपनगरात विभिन्न प्रकारची धंद्याची, आकांक्षांची माणसे असतात. पण ही विभिन्नता असूनही त्यांच्या ठिकाणी एकाच उपनगरात राहत असल्यामुळे सामूहिकता असते.

**३) ग्राम्य समाप्तीकरण :**

एखाद्या ग्रामीण समाजावर जेव्हा पूर्णतः शहरी संस्कृतीचा प्रभाव दिसून येऊ लागतो. तेव्हा त्याला ग्राम्य समाप्तीकरण असे म्हटले जाते. शहरी संस्कृतीचा पूर्णतः प्रभाव पडला तरी तिथे

वास्तव्य करणाऱ्या मंडळींना ग्रामीण संस्कृतीचा विसर पडत नाही. कित्येक ग्रामीण लक्षणे उदा. सणवार, धार्मिक विधी इत्यादी गोष्टी नागरी समाजामध्ये वास्तव्य करून सुद्धा राजरोसपणे चालू असतात.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, ग्रामीण नगरीय संबंध किती तात्पुरते वा घनिष्ठ आले तरी प्रत्येक समाजातील मूळ विशेषांना लोक विसरू शकत नाहीत.

## ३.८ ग्रामीण जीवनावर नगरीय जीवनाचा प्रभाव

भारतातील बहुतेक नगराच्या सभोवताली शेकडो किंवा हजारो लहान-मोठी गावे आहेत. नगर आणि ग्राम यांच्या वाढत्या संपर्कामुळे नगराचा प्रभाव ग्रामीण जीवनावर पडतो. तशीच ग्रामीण जीवनाची थोडी बहुत छाया नगरीय संस्कृतीवर पडते. गावावरील नगराचा प्रभाव हा फार मोठा सर्वस्पर्शी आणि बऱ्याच प्रमाणात भयकारक आहे. शहरात शिक्षण संस्था असतात. न्यायालये असतात. शासकीय कार्यालये असतात. या सर्वांची गरज ग्रामवासीयांना असतेच. त्यामुळे त्यांना शहरात यावेच लागते. वाहतूक व संचार साधनाच्या वाढीमुळे शहरात वारंवार येणे हेही सुलभ झाले आहे. शिवाय शहराचा झगमगाट, भपका, मनोरंजनाची विविध साधने याचेही ग्रामीण लोकांना आकर्षण असते. शहरातील वर्तमानपत्रे, मासिकेही गावात जाऊन पोहोचतात त्याचाही परिणाम ग्रामीण लोकांवर होतोच.

**१) जीवनपद्धती किंवा राहणीमान बदलले :**

जीवन पद्धतीच्या बदलाचा अभ्यास करता त्याचे पुन्हा वर्गीकरण करावे लागेल.

**अ) खानपानविषयक सवयी :**

नगरांचा प्रभाव पडल्यामुळे ग्रामीण लोकांच्या सवयी बदलल्या. भोजनाचा साधेपणा गेला. मसाल्याच्या पदार्थाचा वापर वाढला. धातूंची भांडी गेली. त्याऐवजी स्टेनलेस आणि चिनी मातीची भांडी आली. काही ठिकाणी भोजनासाठी टेबलाचा उपयोग होऊ लागला. सकाळ-संध्याकाळ चहा घेणे हा प्रकार सुरू झाला. भोजनाच्या प्रकारातही सुधारणा झाली.

**ब) गृहरचना :**

पूर्वी खेड्यात मातीची व वेळूची घरे होती. फक्त श्रीमंत लोकांची घरे अनेक मजली व विटा कौलांची असत. आता कौलारू घरांची संख्या वाढली. गृहरचनेची पद्धत बदलली. सिमेंटचा वापर सुरू झाला. घरांच्या खिडक्या दारांची संख्या वाढली. दोन मजली, तीन मजली घरे होऊ लागली.

**क) वेशभूषा :**

तरूण पिढीतून शर्ट, धोतर बेपत्ता होऊन त्यांची जागा फुलपँट, बुशशर्ट व मॅनलानी घेतली. पादत्राणातही बदल झाला आहे. घड्याळांचा सुकाळ झाला आहे. स्त्रियांच्या वेशात फरक पडला आहे. पातळे गेली, गोलसाड्या आल्या, साजशृंगार वाढला, पावडर, क्रीम, सुगंधी तेल इत्यादीचा वापर होऊ लागला.

**ड) मनोरंजनाचे क्षेत्र :**

ग्रामीण भागात पूर्वी मनोरंजनाची पारंपरिक साधने उपलब्ध होती. शाहीर गाणी, भारूडे, तमाशा यांना प्राधान्य दिले जात होते. आता ही साधने कमी कमी होत आहेत. त्यांची जागा चित्रपट व नाटके यांनी घेतली. रेडिओ व ट्रान्झिस्टर घरोघरी दिसू लागले आहेत. हल्ली सरकारच्या कृपेने टेलिव्हिजन व व्हिडीओ यांचेही आगमन खेड्यामध्ये झालेले आहे.

**२) धार्मिक क्षेत्रावरील प्रभाव :**

ग्रामीण लोकांचा धर्मावर अतूट विश्वास होता. आता तसे राहिलेले नाही. खेड्यातूनही धार्मिक श्रद्धेचे उच्चाटन होऊ लागले आहे. पूर्वी खेड्यात कथा, कीर्तने, भजने वगैरे होत असत. आता या गोष्टी फारच क्वचित होतात. धर्मश्रद्धा नसल्यामुळे ब्राह्मणांचे, पुराणिकांचे महत्त्व कमी झाले. अजूनही ग्रामीण व्यक्तीच्या मनातील धर्मश्रद्धा पूर्णपणे नष्ट झालेली नाही.

**३) व्यापारी क्षेत्र :**

व्यापारी क्षेत्रातही नगरांचा प्रभाव आहेच. पूर्वी गावात फक्त अन्नधान्याची, किराण्यांची दुकाने असतात. आता खेड्यातही शहरातील तऱ्हेतऱ्हेच्या फॅशनेबल वस्तूंची संख्या वाढत आहे. हिशेब वगैरे ठेवण्याचे नवे प्रकार वाढले आहेत. पूर्वी व्यापारी आणि ग्राहक यांचे संबंध अनौपचारिक व घनिष्ठ होते. आता ते नगरातील संबंधाप्रमाणे औपचारिक बनले आहेत. विविध प्रकारच्या चैनीच्या वस्तू, स्टेशनरी, कापड, शेतीची उपकरणे, खते, कीटकनाशके इत्यादी वस्तूंची दुकाने सतत वाढू लागली आहेत.

**४) औद्योगिक क्षेत्र :**

खेड्यामध्ये कुटिरोद्योगांची संख्या वाढू लागली आहे. त्यामुळे अनेक परिवर्तन घडून येत आहेत. आजचा शेतकरी विविध प्रकारची सुधारलेली यांत्रिक उपकरणे वापरू लागला आहे. शेतीच्या कामात आधुनिक तंत्राचा वापर करू लागला आहे. मोटर सायकल खेड्यामध्ये आल्या आहेत. त्यामुळे त्यांची दुरूस्ती केंद्रे निघू लागली आहेत. खेड्यामध्ये भात, तेल, पोहे यांच्या गिरण्या निघत आहेत. या सर्व गोष्टींमुळे औद्योगिक क्षेत्रांचा विकास होऊन खेड्यांचे नवे रूप निर्माण होत आहे.

**५) आरोग्य क्षेत्र :**

पूर्वीइतका वैद्यांवर ग्रामीण समाजामध्ये विश्वास राहिलेला नाही. इंग्रजी औषधांचा प्रचंड प्रमाणावर वापर होत आहे. डॉक्टर मंडळींची संख्यादेखील वाढू लागली आहे. कोणताही रोग म्हणजे देवदेवतांचा कोप हा प्रकार राहिलेला नाही. आरोग्य क्षेत्रावर नगरांचा पुरेसा प्रभाव पडला आहे.

**६) शिक्षण क्षेत्रातील प्रभाव :**

खेड्यातील शिक्षणाचा प्रसार वाढला आहे. तरूण सुशिक्षित होत आहेत. अनेक खेड्यात माध्यमिक शाळा आहेत. कित्येक ठिकाणी महाविद्यालयेदेखील सुरू करण्यात आलेली आहेत. श्रीमंत शेतकऱ्यांची मुले, मुली शहरात जाऊन कृषी विद्यक, स्थापत्य, तंत्रविज्ञान इत्यादी विषयांत शिक्षण घेत आहेत.

**वाहतूक व संचार साधने :**

शासनाने खेड्यातही वाहतुकीच्या साधनांची सोय केलेली आहे. बहुतेक गावे रस्त्यांनी शहरांशी जोडली गेली आहेत. मोटारींची संख्या वाढली त्यामुळे शहराशी संपर्क वाढला. कोकण रेल्वेसारखे रेल्वेमार्ग ग्रामीण भागातून गेले. खेड्यातील बैलगाडी, घोडागाडीसारख्या साधनांचे उच्चाटन झाले.

वरील बदलामुळे ग्राम आणि नगर यांच्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात सातत्य निर्माण झालेले दिसून येत आहे. नवीन विचार, नव्या दिशा या दृष्टीने प्रत्येकजण प्रयत्न करू लागला आहे.

**मूल्यव्यवस्थेवरील प्रभाव :**

पूर्वी ग्रामीण समाजातील सर्व व्यवहार हे त्या समाजात असणाऱ्या मूल्यावर आधारित होते. ग्रामीण जीवनातील व्यवहार, आचार, आदर्श ठरलेले होते. परंतु नगरीय संपर्कामुळे ग्रामीण समाजातील मूल्यव्यवस्थाही प्रभावित झालेली आहे. मूल्यव्यवस्थेत देखील एकसारखे बदल होऊ लागले आहेत.

**१) कुटुंबविषयक मूल्ये :**

कुटुंबातील कर्त्याव्यक्तीला महत्त्वाचे स्थान दिले जात असे. कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्परांविषयी प्रेम असे. सर्वजण मिळून एकोप्याने आपले कर्तव्य पूर्ण करीत असत.

आज हा दृष्टिकोन राहिलेला नाही. प्रत्येक व्यक्ती स्वार्थी व स्वयंकेंद्री बनलेली आढळते. संयुक्त कुटुंब हे व्यक्तीच्या हिताला व प्रगतीला बाधक आहे. ही भावना निर्माण झालेली आहे. शहराप्रमाणेच ग्रामीण समाजामध्ये विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात येऊ लागल्या आहेत.

**२) विवाहविषयक मूल्य :**

ग्रामीण लोक विवाहाला एक पवित्र व धार्मिक संस्कार समजत असत. सजातीय विवाह, वयस्क विवाह, विधवा पुनर्विवाह होऊ लागले आहेत. हल्ली वराला आपल्या निवडीप्रमाणे वधू निवडता येते. वधूसुद्धा आपल्या इच्छेप्रमाणे वर निवडतात. अशा रीतीने विवाहविषयक मूल्यातही शिथिलता आली आहे.

**३) स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

नागरी स्त्रियांप्रमाणे आज ग्रामीण समाजातील स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या आहेत. ग्रामीण स्त्री ही दासी नसून खऱ्या अर्थाने सहचर बनलेली आहे. तिला पूर्वी मिळणारी कनिष्ठ दर्जाची वागणूक आज मिळत नाही.

**४) जातीविषयक मूल्य :**

पूर्वीची जातीविषयक बंधने आज राहीलेली नाहीत. पूर्वीचे जातीचे पारंपरिक व्यवसाय इतर जाती बांधव करू लागले आहेत. शासनाने जातींना दिलेल्या सवलतीचा लाभ कनिष्ठ जाती बांधवांनी घेतलेला आहे. अस्पृश्य जातींचा देखील सामाजिक दर्जा सुधारला आहे.

**५) पंच व्यवस्थाविषयक मूल्य :**

पूर्वीची परंपरागत पद्धत म्हणजे गावातील वृद्ध मंडळी पंच म्हणून निवडले जात. त्यांचा निर्णय अंतिम मानला जाई. आज ग्रामवासीयांना पूर्वीइतका पंचाविषयी आदर राहिलेला नाही. प्रसंग आल्यास ग्रामीण लोक पंचाच्या विरोधात झगडतात. न्यायालयात जातात, अर्थात आजचे पंचदेखील पूर्वीइतके निःपक्ष राहिलेले नाहीत.

नगरांच्या संपर्कामुळे खेड्यातील जुनी मूल्य नष्ट होत आहेत. त्या ऐवढी नगरीय मूल्य प्रस्थापित होत आहेत. ग्रामीण लोकांची जीवन पद्धती, व्यवहार व वैचारिक दृष्टिकोन यात फार मोठे परिवर्तन होत आहे. हा सर्व परिणाम ग्रामीण नगरीय सातत्याचा आहे.

## ३.९ ग्रामीण नगरीय सातत्यामुळे निर्माण झालेल्या समस्या

ग्रामीण जीवनावर नगरीय जीवनाचा झालेला प्रभाव, मूल्यव्यवस्थेवरील प्रभाव यामुळे एकूण ग्रामीण जीवनात घडून आलेले अनेक बदल या विषयी आपण आतापर्यंत अभ्यास केलेला आहे. धर्म औद्योगिक क्षेत्रे, आरोग्य, वाहतूक, कुटुंबविषयक मूल्ये, विवाहविषयक मूल्ये इत्यादी मध्ये अनेक प्रकारचे बदल घडून आलेले आहेत. यातून काही बदल निश्चितच उपयुक्त कसे आहेत तर काही विघातक स्वरूपाचे आहेत. नागरी आणि ग्रामीण सातत्यामुळे काही ठळक समस्या निश्चितच निर्माण झाल्या आहेत.

**१) प्रदूषणाचा प्रश्न :**

नगर आणि ग्राम यांचे संबंध आज इतके घनिष्ठ झाले आहे की त्यामुळे हवेचे, पाण्याचे, ध्वनीचे प्रदूषण फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. आज ग्रामीण समाजामध्ये सुद्धा शुद्ध आणि स्वच्छ हवा मिळत नाही.

**२) फसवणुकीच्या प्रकारांमध्ये वाढ :**

नागरी समाजामध्ये ज्या प्रकारे फसवणुकीचे प्रकार घडविले जातात. तसेच प्रकार ग्रामीण समाजामध्ये घडविले जाऊ लागले आहेत. दिवसा दरोड्यांचे प्रमाण ग्रामीण भागात वाढले आहे. चोऱ्यामाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.

**३) नैतिक मूल्यांची घसरण :**

अश्लील चित्रपटे, वरिष्ठांचे कुटुंबातील दिवसेंदिवस कमी होणारे वर्चस्व यामुळे नागरी समाजाप्रमाणे ग्रामीण समाजामध्ये नैतिक मूल्यांची घसरण होऊ लागली आहे. शहरांप्रमाणेच अनौरस संतती, कुमारीमातांचा प्रश्न असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

**४) वृद्धमंडळींचा प्रश्न :**

नागरी समाजाप्रमाणे ग्रामीण समाजात वृद्धमंडळींच्या संगोपनाचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. ग्रामीण समाजातील कित्येक वृद्धांची वृद्धाश्रमामध्ये नोंदणी केली जाऊ लागली आहे. ग्रामीण पातळीवर वृद्धाश्रम, दीन केंद्रे यांसारख्या संस्थांची निर्मिती करण्यावर भर दिला जाऊ लागला आहे. वृद्धांबरोबर कुटुंबातील शारीरिक, मानसिकदृष्ट्या विकृतांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावू लागला आहे.

**५) बेरोजगारीचा प्रश्न :**

शहराच्या पातळीवर आवश्यक असणारे उद्योगधंदे पुरेसे नाहीत. शिवाय खेड्याच्या पातळीवर देखील पुरेसे उद्योगधंदे नाहीत. त्यामुळे सर्वत्रच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावू लागला आहे.

**६) झोपडपट्ट्यांचा प्रश्न :**

शहरी समाजाप्रमाणे ग्रामीण समाजामध्ये देखील झोपडपट्ट्यांचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात भेडसावू लागला आहे. नीच प्रतिचे राहणीमान, निकृष्ट प्रतिचा आहार यामुळे ग्रामीण जनतेमध्ये आरोग्याचे अनेक प्रश्न भेडसावू लागले आहेत.

वरील प्रकारच्या इतर अनेक समस्या ग्रामीण-नागरी सातत्यामुळे निर्माण झालेल्या दिसून येतात. असे असले तरी एवढे मात्र निश्चित ग्रामीण-शहरी सातत्य अटळ आहे. कित्येक बाबतीत ते आवश्यक आहे.

## ३.१० स्वाध्याय

१. ग्रामीण नगरीय सातत्याचा अर्थ सांगून ग्रामीण नगरीय सातत्याची ठळक उदाहरणे द्या.

२. भारतातील ग्रामीण नगरीय सातत्याची सविस्तर चर्चा करा.

३. ग्रामीण नागरी सातत्याचे दृश्य परिणामाची चर्चा करा.

४. ग्रामीण जीवनावर नगरीय जीवनाचा झालेला प्रभाव स्पष्ट करा.

५. ग्रामीण नगरीय सातत्यामुळे निर्माण झालेल्या समस्या स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# ४

# दुर्बल घटकांच्या समस्या (अनुसूचित जाती आणि जमाती)

**पाठाची रूपरेषा**

४.० पाठाचे उद्देश

४.१ प्रास्ताविक

४.२ अनुसूचित जाती

४.३ अनुसूचित जातीचा अर्थ

४.४ अनुसूचित जातीच्या प्रमुख समस्या.

४.५ अनुसूचित जातीच्या समस्यांचे निराकरणासाठीचे शासकीय उपाय.

४.६ अनुसूचित जमातीचा अर्थ

४.७ अनुसूचित जमातीच्या प्रमुख समस्या

४.८ अनुसूचित जमातीच्या संरक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदी

४.९ अनुसूचित जमातीच्या समस्या सोडविण्यासाठी शासकीय उपाय

४.१० स्वाध्याय

## ४.० पाठाचे उद्देश

- अनुसूचित जाती म्हणजे काय ? ते समजावून घेणे.
- अनुसूचित जातीच्या समस्यांचा अभ्यास करणे.
- अनुसूचित जातीच्या समस्या सोडविण्यासाठी करण्यात येणाऱ्या शासकीय उपाययोजनांचा अभ्यास करणे.
- अनुसूचित जमातीचा अर्थ समजावून घेणे.
- अनुसूचित जमातीच्या प्रमुख समस्यांचा अभ्यास करणे.
- अनुसूचित जमातीच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदीचा अभ्यास करणे.
- अनुसूचित जमातीच्या समस्या सोडविण्यासाठी शासकीय उपाययोजनाची माहिती घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

भारतीय समाजातील दुर्बल घटक व त्यांच्या समस्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आहेत. भारतीय समाजातील दुर्बलांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे या समस्येचे स्वरूप भयानक आहे.

दुर्बल घटक या संकल्पनेत अनेक प्रकारच्या दुर्बलांचा समावेश आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रांशी संबंधित असलेल्या दुर्बलांचा त्यामध्ये समावेश आहे.

दुर्बल घटक म्हणजे ज्यांना स्वतःच्या आवश्यक दैनंदिन गरजा भागविता येत नाहीत. पैशाच्या अभावामुळे शारीरिक गरजाही पूर्ण करता येत नाहीत. दारिद्र्यरेषेखाली असलेल्या समाजातील लोकांना दुर्बल घटक असे म्हटले आहे.

समाजातील ज्या लोकांना आवश्यक, प्राथमिक गरजा भागविता येत नाहीत. स्वतःचे जीवन स्थिर व सुरक्षित ठेवता येत नाही त्यांना दुर्बल घटक असे म्हणतात.

समाजातील दुर्बल घटकांकडे पैसा नसतो. आत्यंतिक दारिद्र्य असते. त्यामुळे त्यांना राहण्यासाठी घर नसते.  असले तरी अपुरे व अयोग्य असते. ते बकाल वस्तीत राहतात. दारिद्र्यात पडून असतात. अत्यंत दरिद्री जीवन जगतात. खाण्यासाठी पुरेसे अन्न नसते. त्यामुळे त्यांची शारीरिक क्षमता कमी असते. ते अशक्त असल्यामुळे कष्टाची कामे करू शकत नाहीत. सर्व समाजघटकांची जीवनस्थिती समान नसते. वय व लिंगभेद या जैविक घटकांमुळे त्यांच्या जीवनस्थितीत फरक पडतो. तसेच रीतिरिवाज, प्रथा, परंपरा, वंश, जात यासारख्या सामाजिक घटकांमुळे त्यांच्या जीवनस्थितीत फरक पडतो. उदा. स्त्रिया पुरूषांपेक्षा निसर्गतःच दुर्बल आहेत. अशी लोकांची धारणा आहे. अनेक भारतीय कुटुंबात पुरूषांना स्त्रियांपेक्षा अधिक कष्टाची (शारीरिक व बौद्धिक) कामे करावी लागतात. असे मानले जाते यासाठी त्यांना सकस ताज्या अन्नाची आवश्यकता असते. असे समजून शिळेअन्न स्त्रियांनीच खावे हा रीतिरिवाज पाळला जातो. थोडक्यात सर्वच पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये कमी-अधिक प्रमाणात स्त्रियांचे स्थान पुरूषांपेक्षा गौण आहे असे मानले जाते. यामुळे पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना अधिकारहिततेच्या स्थितीत जीवन जगावे लागते. अशा प्रकारे समाजघटकांच्या जीवनस्थितीमध्ये असणारी विषमता सार्वत्रिक आहे. म्हणून प्रत्येक समाजात काही समाजघटक सबल, तर काही दुर्बल आहेत, असे मानले जाते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून सर्वच समाजामध्ये दुर्बल घटक आहेत.

भारतीय समाजात जातिसंस्थेच्या संरचनेतून अधिकारहीनतेची स्थिती असणारे जातीसमूह होते व आजतागायत आहेत. तसेच प्रादेशिक व सांस्कृतिक पातळीवरील संपर्काच्या अभावातून किंवा संपर्काच्या प्रभावामुळे विविध समस्यांना तोंड देणारे अनेक आदिवासी समूह आहेत. त्याचा देखील दुर्बल घटकांमध्येच समावेश होतो.

## ४.२ अनुसूचित जाती

भारतीय समाज बहुतत्त्वीन असून त्यात अनेक जाती, धर्म, भाषा व इतर गटांचा समावेश होतो. यातील जातीची संख्या तर ३००० पेक्षा जास्त आहे. जातीपैकी काही जाती पुढारलेल्या आहेत, तर बऱ्याच जाती मागासवर्गात मोडतात. ज्या जातींना विकासाची संधी नव्हती, समाजातील

खालच्या स्तरांत ज्यांचा समावेश करण्यात येत होता. अशा उपेक्षित जातीकडे विशेष लक्ष देता यावे. या दृष्टीने त्यांचा समावेश घटनेतील अनुसूचित जातीमध्ये करण्यात आलेला आहे. अनुसूचित जातींना 'दलितवर्ग' Depressed classes किंवा बहिर्जाती Exterior Castes म्हणून संबोधिले गेले आहे. महात्मा गांधींनी त्यांचा उल्लेख 'हरिजन' असा केला आहे. परंतु पुढे १९३५ साली प्रस्तुत जातीची एक सूची करण्यात आली. तेव्हापासून 'अनुसूचित जाती ' Scheduled cast) असा शब्द प्रयोग रूढ झाला आहे. आता घटनेत अनुच्छेद ३४१ (१,२) प्रमाणे स्वतंत्ररीत्या अशी सूची समाविष्ट केलेली आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जातींचे प्रमाण १६.७३ टक्के आहे. अनुसूचित जातीची सर्वात जास्त संख्या उत्तर प्रदेशात आहे.

पश्चिम बंगाल, बिहार, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, पंजाब व महाराष्ट्र असा क्रम अनुसूचित जातींचा संख्यात्मक आकार या दृष्टीने निश्चित होतो. भारताच्या सर्व घटक राज्यामध्ये अनुसूचित जाती आहेत. अनुसूचित जातींचे सुमारे ८४ टक्के लोक ग्रामीण क्षेत्रात राहतात. ते शेतमजूर अल्पभूधारक बढाईदार म्हणून ग्रामीण क्षेत्रात कार्ये करतात. साफ-सफाईचे काम आणि चमडा उद्योगात काम करणारे जवळपास सर्वच लोक अनुसूचित जातीचे आहेत. अनुसूचित जातींमध्ये साक्षरतेचे प्रमाण बरेच कमी आहे. अनुसूचित जातींमधील बहुसंख्य लोकांचे दारिद्र्यरेषेखालील लोकांमध्ये समावेश होतो.

## ४.३ अनुसूचित जातीचा अर्थ

अनुसूचित जातीच्या समस्यांच्या अभ्यासाचा प्रारंभ अनुसूचित जाती असे कोणत्या जातींना संबोधले जाते ? या प्रश्नाची चर्चा करण्यापासून केला पाहिजे. अन्य देशात न आढळणारी 'अस्पृश्यता' हिंदू समाजात कशी आली. या बाबत विभिन्न मते व सिद्धांत मांडले जातात. जातीच्या उदयासंबंधीच्या सर्व सिद्धांतामधील कारणमीमांसा वेगवेगळी आहे. अस्पृश्यता निर्माण होण्यास अनेक घटक जबाबदार आहेत.

भारतात शूद्र, अस्पृश्य, अवर्ण, हरिजन, दलित इत्यादी विविध नावांनी अस्पृश्य यांना संबोधिले जात होते. मागासलेल्या जाती, मागासवर्गीय जाती असे संबोधण्याचा देखील प्रघात आहे. इ.स. १९३५ मध्ये ब्रिटिश शासनाने मागासलेल्या जातींना विशेष सवलती देण्यासाठी जो कायदा मंजूर केला त्या कायद्यात 'अनुसूचित जाती' हा शब्दप्रयोग प्रथम वापरण्यात आला. हा कायदा होण्यापूर्वी या जातीगटांना 'मागासवर्गीय' पददलित वर्ग' असेच संबोधिले जात असे. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत 'अनुसूचित जाती' याच शब्दप्रयोगाचा स्वीकार केला आहे.

'अनुसूचित जाती' असे कोणत्या जातींना संबोधावे या संबंधी राज्यघटनेच्या ३६६ व्या कलमात पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. ''ज्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा जातींचे उपभाग याचा भारतीय शासन संस्थेने अनुसूचित जाती म्हणून उल्लेख केला असेल त्याच सामाजिक गटांना 'अनुसूचित जाती' असे मानले जाईल.

थोडक्यात आज त्या जातिसमूहांचा समावेश शासनाने जाहीर केलेल्या 'अनुसूचित जाती' मध्ये झालेला नाही. ते सर्व जाती समूह सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेले आहेत, असे आपणास म्हणता येईल.

## ४.४ अनुसूचित जातींच्या प्रमुख समस्या

वर उल्लेखलेल्या अनुसूचित जातीच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सामाजिक समस्या :**

अनुसूचित जातिसमूहाच्या सामाजिक समस्या त्यांच्यावरील पारंपरिक निर्बंधातून निर्माण झाल्या आहेत. सोप्या शब्दात, सामाजिक रचनेत अन्य समाज घटकांनी लादलेली बंधने हे त्यांच्या सामाजिक समस्याचे मूळ कारण आहे, महार, मांग, चांभार, खाटिक, भंगी या सर्व अनुसूचित जातींमध्येही श्रेष्ठता व कनिष्ठता यांना मान्यता देण्याच्या समाजवृत्तीतून या जातीसमूहांमध्ये सामाजिक गतिशीलतेचा अभाव निर्माण झाला आहे. अंधश्रद्धा आणि प्रथा या परंपरा यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती यामुळे या जातिसमूहाला अनेक सामाजिक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. गरिबी, कर्जबाजारीपणा, सामाजिक अन्याय, सामाजिक शोषण, उपेक्षा आदींमुळे या जातीसमूहामधील लोकांचे सामाजिक जीवन अतिशय दयनीय झाले आहे.

**२) आर्थिक समस्या :**

अनुसूचित जातिसमूहातील काही जातींना परंपरेनुसार निश्चित झालेला व्यवसाय करावा लागत असे, परंतु काही जातींना परंपरागत स्वरूपाचा विशिष्ट व्यवसाय नव्हता हे बलुतेदारीच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. परिणामी परंपरेनुसार कोणताच निश्चित व्यवसाय नसणाऱ्या जातींमधील लोकांना केवळ मजुरी व भिक्षेवर स्वतःचा चरितार्थ चालवावा लागत असे. मांग, चांभार, खाटिक यांसारख्या काही जातींना परंपरागत स्वरूपाचा विशिष्ट व्यवसाय होता. परंतु त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप आर्थिक दृष्टीने नफा न देणारे होते. उदा. मेलेली जनावरी उचलणे, त्यांचे चामडे काढून विकणे या व्यवसायामध्ये आर्थिक प्राप्तीचे प्रमाण फारच कमी होते. नवीन व्यवसाय करणाऱ्यांवर बंदी होती. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या त्याची पीछेहाट होत होती. खेड्यांमध्ये परंपरेने ठरलेला कोणताही व्यवसाय नाही. तसेच शेतमजूर म्हणून काम करू देण्यास उच्च जातीचे लोक तयार नाहीत. त्यामुळे या जातिसमूहातील लोकांना खेड्यामधून शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करावे लागते. महाराष्ट्रात प्रामुख्याने विदर्भात, ग्रामीण लोकसंख्येपेक्षा शहरी लोकसंख्येत, अनुसूचित जातीचे तुलनात्मक प्रमाण अधिक असण्याचे हे एक महत्त्वपूर्ण कारण आहे. अशा प्रकारे व्यवसायाची निवड करण्याचा अभाव, परंपरेने प्राप्त झालेले घृणित व्यवसाय, वेठबिगारी व कर्जबाजारीपणा यामुळे या जातिसमूहाचे आर्थिक जीवन कमालीचे खालावते.

**३) धार्मिक समस्या :**

या जातीसमूहांवर मंदिरात प्रवेश करण्यावर बंदी होती. कर्म पुनर्जन्म, पाप, पुण्य, भाग्य यासारख्या धार्मिक तत्त्वांचा त्याच्यावर बराच पगडा होता. धर्माच्या नावावर या जातिसमूहाचे शोषण होत होते. अशा प्रकारे धार्मिक अधिकार नसल्यामुळे या जातिसमूहांच्या जीवनात स्थितिशीलता निर्माण झाली.

**४) शैक्षणिक समस्या :**

अनुसूचित जातींमध्येही शिक्षणाचे प्रमाण जवळजवळ नव्हतेच. कारण सामाजिक संकेतानुसार यांना शिक्षण घेण्याचा अधिकारच नाकारण्यात आला होता. शिक्षण नसल्यामुळे ह्या जातीतील

लोकांना शासकीय नोकऱ्या योग्य व्यवसाय व उच्च जीवन जगण्याची संधीच प्राप्त होत नव्हती. शेतमजूर, हमाल, बांधकामावरील मजूर यासारखी शारीरिक कष्टाची कामे करून त्यांना आपले पोट भरावे लागत होते. शिक्षणाच्या अभावामुळे या जातीसमूहाचे जीवन मागासलेले होते.

**५) राजकीय समस्या :**

स्वातंत्र्यपूर्वकाळात अनुसूचित जातीमधील लोकांना कोणतेच राजकीय अधिकार नव्हते. जमीनदारी पद्धती आणि संस्थानिकांचे प्रस्थ असणाऱ्या भारतीय समाजात या जातीसमूहांना राजकीय अधिकार प्राप्त होणे शक्यच नव्हते. स्वातंत्र्योत्तर कालात प्रौढमताधिकाराच्या तत्त्वाचा स्वीकार केल्यामुळे अनुसूचित जातींच्या राजकीय स्थितीमध्ये कमालीचे परिवर्तन झाले आहे. याचा अर्थ आज या जातिसमूहांशी निगडित कोणत्याच राजकीय समस्या नाहीत, असा होत नाही. काही खेड्यांमध्ये अनुसूचित जातीच्या सदस्यांनी मतदान करण्याचा अधिकार वापरू नये. यासाठी त्यांचेवर दबाव आणला जातो. मतदानाच्या दिवशी गुंडागर्दी केली जाते. मतपेट्या पळवून नेल्या जातात. निवडणूक निकालानंतर विरोधी मतदान केले जाते, असे आढळून आले तर त्यांच्या घरांना आग लावली जाते. या सर्व घटना अनुसूचित जाती सदस्यांच्या राजकीय समस्यांशी संबंधित आहेत. अनुसूचित जातीमधील जे जातिसमूह राजकीयदृष्ट्या संघटित आहेत. त्याच जातिसमूहांना विविध प्रकारचे शासकीय लाभ प्राप्त होत आहेत. अनुसूचित जाती समूहातील अनेक जातिसमूहांपर्यंत त्यांच्या कल्याण कार्यक्रमाचे फायदे पोहोचलेच नाहीत. याचे प्रमुख कारण या जातिसमूहांमध्ये (उदा. मांग, चांभार, भंगी, खाटीक इत्यादी जातीचे समूह) राजकीय नेतृत्वाचा विकास झाला नाही, असा निष्कर्ष काही अभ्यासकांनी त्यांच्या संशोधन अध्ययनाच्या आधारे काढला आहे.

## ४.५ अनुसूचित जातींच्या समस्यांच्या निराकरणासाठीचे शासकीय उपाय

भारतीय समाजरचनेचा आधार असणारी जातिसंस्था प्राचीन आहे. जातिव्यवस्थेच्या संरचनेतून निर्माण झालेली अस्पृश्यतेची प्रवाही शेकडो वर्षापासून आहे. अस्पृश्यतेच्या प्रथेमुळेच सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांत अनुसूचित जाती समूहाच्या वाढ्यास अधिकारहीनतेची स्थिती झाली व समाजाचा दुर्बल घटक म्हणून जीवन जगणे त्यांना भाग पडले. जाणीवपूर्वक व योजनापूर्वक प्रयत्न केल्याशिवाय त्यांच्या विभिन्न समस्यांचे निराकरण होणे शक्य नाही.

अनुसूचित जातींच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यापक स्वरूपातील शासकीय उपाययोजनेचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) वैधानिक वा कायदेशीर उपाययोजना :**

आधुनिक समाजात अधिकार वा हक्क मिळवून देणाऱ्या महत्त्वपूर्ण आधार कायदा आहे असे मानले जाते. अनुसूचित जातींच्या सामाजिक समस्यांचे मूळ कारण अस्पृश्यतेची प्रथा आहे. समाजहिताच्या विरोधी असणाऱ्या प्रथा व परंपरांना पायबंद घालण्यासाठी कायदा हे उत्तम साधन असल्याचे ब्रिटिश शासनकाळात अनुभवास आले. अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा होय, असे १९५५मधील कायद्यानुसार निश्चित झाले. तरीही आपल्या देशाच्या विविध भागांत अनुसूचित जाती समूहांवर होणाऱ्या हल्ल्यांचे प्रमाण कमी झाले नाही. म्हणून या जाती समूहांसंबधीच्या तक्रारीची दखल त्वरित घेण्यात यावी. पोलीस चौकीत तक्रार दाखल होताच वेगाने चौकशी करून आरोपीला ताब्यात घ्यावे. तसेच आरोपींना जमानतीवर सोडू नये. अशा प्रकारची तरतूद असणारा कायदा

शासनाने केला आहे. केवळ कायदे करून कोणत्याही समस्या सुटत नसतात. त्या कायद्याची प्रामाणिक, कठोरपणे अंमलबजावणी  होणे आवश्यक असते. हे बिहारमधील दलितांवर झालेल्या हल्ल्यावरून स्पष्ट झाले आहे. संघटित व जागृत लोकमत हेच कोणत्याही पक्षाच्या शासनाला (राज्यकर्त्यांना) कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यास भाग पाडू शकते. अनुसूचित जाती समूहांचे वाढत्या प्रमाणावरील संघटन, तसेच अधिकारांसंबंधीची जाणीव जागृती हे जागृत लोकमत निर्माण होत असल्याचे एक सुचिन्ह होय असे म्हणता येईल.

**२) राजकीय उपाययोजना व मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व :**

लोकशाही शासनपद्धतीत शासनाच्या सत्तेत विभिन्न समूहांना सहभाग मिळणे आवश्यक असल्याचे मानले जाते. कारण शासनाच्या निर्णयप्रक्रियेत व धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत सहभाग प्राप्त झाला की त्या समूहांच्या अनेक समस्यांचे निराकरण करणे शक्य होते. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र, तसेच घटक राज्य पातळीवरील मंत्रिमंडळात अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व देण्याचा संकेत निर्माण झाला आहे. सर्वच राजकीय पक्ष या राजकीय संकेताचे पालन करतात. ग्रामपंचायत जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका या स्थानिक पातळीवरील शासनाच्या सत्तेतदेखील अनुसूचित जातींना सहभागी करून घेतले जाते. शासनाने नियुक्त केलेल्या विविध समित्यांमध्येही अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व  दिले जाते. तसेच सहकार क्षेत्रातील सत्तेत सर्वच राजकीय पक्षांच्या संघटनेत अनुसूचित जाती समूहांना प्रतिनिधित्व  देण्याचा संकेत स्वातंत्र्योत्तर काळात प्रस्थापित झाला आहे. सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळाली की कोणत्याही समूहाच्या समस्यांचे निराकरण होण्यासाठी वैयक्तिक स्वार्थाऐवजी संपूर्ण समूहाच्या हितसंबधाचे रक्षण करण्याची भूमिका असणारे राजकीय नेतृत्व विकसित होणेदेखील आवश्यक असते असे म्हणता येईल.

**३) आरक्षणाचे धोरण :**

भारताच्या संविधानातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारी वा सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये, तसेच शिक्षणसंस्थांमधील प्रवेशामध्ये अनुसूचित जातीसाठी जागा आरक्षित ठेवण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आहे. अनुसूचित जातीमधील उमेदवारांसाठी गुणवत्ता, वयोमर्यादा यासारख्या पात्रताविषयक अटी काही प्रमाणात शिथिल केल्या जातात. या जातीसमूहातील अधिकाधिक तरूणांना नोकरीमध्ये प्रवेश मिळावा हा पात्रताविषयक अटी शिथिल करण्याचा प्रमुख उद्देश आहे. नोकऱ्यांमधील प्रवेशासोबत बढती (प्रमोशन) देतानाही या जाती समूहासाठी आरक्षित जागा ठेवण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. अनुसूचित जाती समूहातील उमेदवारांना नोकरीच्या मुलाखती व लेखी स्पर्धात्मक परीक्षांसाठी दूर अंतर असणाऱ्या गावांमध्ये जाणे शक्य व्हावे या हेतूने रेल्वे प्रवास भाड्यात सवलत देण्याचे धोरणही शासनाने मान्य केले आहे.

**४) शैक्षणिक विकासाच्या उपाययोजना :**

अनुसूचित जाती समूहांचा शैक्षणिक विकास घडून यावा या उद्देशाने केंद्र सरकारने आर्थिक साहाय्य (वा अनुदान) असणाऱ्या अनेक योजना शासनाद्वारे राबविल्या जातात. यातील प्रमुख योजना पुढीलप्रमाणे.

i) IAS, IPS या सारख्या लोकसेवा आयोगाद्वारे घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी या जातीसमूहातील विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याच्या उद्देशाने कोचिंग सेंटर चालवणे.

ii) पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देणे.

iii) अनुसूचित जातीच्या समस्यांचे संशोधनात्मक अध्ययन करण्यासाठी नामवंत शैक्षणिक संस्थांना आर्थिक साहाय्य देणे.

iv) अनुसूचित जाती समूहातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविणे.

v) वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील अनुसूचित जाती समूहाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ग्रंथ व पुस्तके विकत घेण्यात आर्थिक मदत देणे.

vi) विदेशांमध्ये उच्चशिक्षण घेण्यासाठी आर्थिक साहाय्य देणे.

**५) आर्थिक विकासाच्या उपाययोजना :**

अनुसूचित जाती समूहातील सदस्यांचा आर्थिक विकास झाल्याशिवाय त्यांच्या विभिन्न समस्यांचे निराकरण होणे शक्य नाही. हे लक्षात घेऊन त्यांच्यासाठी अनेक कल्याण कार्यक्रम शासनाद्वारे राबविले जातात. उदा. अनुसूचित जातीमधील भूमिहीन शेतमजुरांना सीलिंगच्या कायद्यामुळे उपलब्ध झालेली शेतजमीन देणे, दोरवळणे, चटया करणे, पादत्राणे तयार करणे या सारख्या गृहोद्योगांसाठी कमी व्याजदराने भांडवल पुरवठा, तसेच या व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे, सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्री संस्था सुरू करणे. माफक किंमत असणारी किंवा व्यापार करण्यासाठी अनुसूचित जाती समूहातील युवकांना बँकांद्वारे कर्ज देताना अग्रक्रम दिला जावा, असे आदर्शदेखील शासनाने दिले आहेत.

**६) महात्मा फुले विकास महामंडळ :**

अनुसूचित जातीच्या विकासासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. महाराष्ट्रातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासनाने १० जुलै १९७८ रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. दुर्बल पद दलित व मागासवर्गातील लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक उन्नतीचा प्रयत्न करणे हे या मंडळाचे कार्य आहे. या महामंडळाचे अधिकृत भांडवल अडीच कोटी रूपये असून त्यात भारत सरकारने ४९ टक्के आणि महाराष्ट्र शासनाचे ७१ टक्के भांडवल आहे. मंडळाकडून गरजू व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी कर्ज व अनुदान देण्यात येते. अर्जदार वर्गीकृत जाती, नवबौद्ध जातीतीलच असावा. मंडळाद्वारा दुग्ध विकास पशुसंवर्धन, शेती कामे, ग्रामोद्योग वगैरे क्षेत्रांत व्यवसाय सुरू करण्यात कर्ज देण्यात येते.

**७) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ :**

अनुसूचित जातीच्या प्रगतीसाठी मुंबई येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. मागासवर्गात मोडणाऱ्या दुर्बल मातंग समाजातील व्यक्तींना विकासाची संधी देण्याच्या दृष्टीने या महामंडळाची निर्मिती करण्यात आली. प्रस्तुत मंडळाकडून मांग जातीच्या व्यक्तीस काही अटीची पूर्ती करून कर्ज मिळविता येते. मंडळाकडून व्यवसाय प्रशिक्षणास मदत, नवीन व्यवसाय आरंभ करण्यासंबंधी मार्गदर्शन देण्यात येते. तसेच गायी, म्हशी, बकऱ्या, विटानिर्मिती, झाडू तयार करणे, दुकानलावण व इतर अन्य लघु व्यवसायांसाठी मदत देण्यात येते.

थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू झालेल्या या सुधार प्रयत्नांना महात्मा गांधी, डॉ.

आंबेडकर यांच्या नेतृत्वाने गती दिली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शासनाने लोकसमूह विकास योजना समाजकल्याण विभागाअंतर्गत अनेक योजना कार्यान्वित करून आणि वेळोवेळी कायदे करून व आयोग नेमून अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी सर्वांगीण प्रयत्न केलेले आढळतात. तरी परंतु अद्यापी अनुसूचित जातीच्या समस्यांचे निराकरण पूर्णतः झालेले नाही. हे मात्र निश्चितपणे सांगता येते.

## ४.६ अनुसूचित जमातीचा अर्थ

अनुसूचित जमातींमध्ये कोणत्या समूहाचा अथवा जनजाती समूहाचा समावेश होतो ? या प्रश्नाच्या चर्चेनेच त्यांच्या समस्यांच्या अध्ययनाचा आरंभ करणे योग्य ठरते. सर्वसामान्यपणे 'आदिवासी' अथवा जंगलात राहणारा 'वन्यजनांचा समूह' म्हणजे अनुसूचित जमाती असे समीकरण भारतीयांच्या मनात रूढ झाले आहे. हे समीकरण चूक आहे, असे म्हणता येणार नाही, कारण भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ (१) अनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना 'अनुसूचित जमाती' असे संबोधिले जाते. यात सर्वसाधारणपणे एकाकी, डोंगरावर, जंगलात राहणारे आणि ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवनपद्धतीचा परिचय होऊ शकला नाही, अशांचा समावेश होतो. म्हणूनच गिरिजन, आदिवासी, वनवासी अशा विविध नावांनी या जमातींना संबोधिले जाते. भारतातील विविध अनुसूचित जमाती एकाच पातळीवर किंवा समान स्थितीत नाहीत. विभिन्न घटक राज्यांत त्यांची नावेदेखील भिन्न आहेत. उदा. महाराष्ट्रातील कोरकू, वारली, गोंड, गुजरातमधील धोबिया, भिल्ल तामीळनाडूमधील कोंडा, कपूर, मल्याळी, इस्लर, उत्तर ईशान्य भारतातील अंगामी, मिझो, कोम, नागा, खासी अशा नावांनी संबोधिल्या जाणाऱ्या विविध जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये होतो. भारतात जवळजवळ २५० प्रकारच्या अनुसूचित जमाती आहेत. विविध प्रकारच्या ११६ भाषा या जमातींमध्ये बोलल्या जातात. अशा प्रकारे भाषास वंश, संस्कृती, आर्थिक स्थिती इत्यादीबाबत विभिन्न अनुसूचित जमातींची स्थिती समान नाही. एखादा समूह हा अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट होतो की नाही ? याचा निर्णय करण्यासाठी अभ्यासकाला शासनाने प्रसिद्ध केलेल्या या जमातींच्या यादीचा आधार घ्यावा लागतो. भौगोलिक स्थान, भाषा, वंश, आर्थिक स्थिती, सामाजिक व सांस्कृतिक स्थिती, या आधारावर भारतातील अनुसूचित जमातींचे प्रकारही पाडले जातात.

भारतातील अनुसूचित जमातीबाबत असणारी विविधता लक्षात घेतली, तर त्याची निश्चित अशी व्याख्या करणे अवघड आहे. म्हणून समाजशास्त्राचे अभ्यासक अनुसूचित जमातींचे अध्ययन करण्यासाठी या जमातीच्या लक्षणावर भर देतात. त्यांच्या जमातींच्या समूहाची प्रमुख लक्षणे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) जमात हा एक निश्चित भूप्रदेशात राहणारा समूह असतो.

२) प्रत्येक जमातीला एक विशिष्ट नाव परंपरेनुसार प्राप्त झालेले असते.

३) प्रत्येक जमातीची भाषा सामान्यपणे वेगळी असते. ती भाषा बोलीभाषा असू शकते किंवा लिपी असणारी देखील असू शकते.

४) जमात हा एकाच रक्ताच्या आणि विवाहाच्या नात्यावर आधारलेला समूह आहे.

५) या समूहात धर्म व त्याचे आचरण यांना खूप महत्त्व दिले जाते. त्यांच्या मनात निसर्गाविषयी खूप आदर, तसेच निसर्गाबद्दल विलक्षण भीती आहे.

६) यंत्रामुळे आधुनिक मानवाच्या जीवनात जे दूरगामी परिणाम होतात. त्यांचा पूर्ण अभाव या समूहात दिसून येतो.

७) या समूहातील लोक आपल्या उपजीविकेसाठी सभोवतालच्या नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून असतात. साधी अर्थव्यवस्था असणारे समूह हे या समूहाचे एक वैशिष्ट्य आहे.

८) विवाहपद्धती, कुटुंबपद्धती, वेशभूषा, प्रथा इत्यादीबाबत एका जमातीचा समूह दुसऱ्या जमातीच्या समूहापेक्षा भिन्न असतो.

## ४.७ अनुसूचित जमातींच्या प्रमुख समस्या

अनुसूचित जमातींच्या समस्या अनेकविध असून त्यांची कारणेही विविध आहेत. उदा. पर्वतीय प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींचा शहरी व ग्रामीण समाजाशी संपर्क नसल्यामुळे त्यांच्या काही समस्या निर्माण झाल्या आहेत. या उलट या समाजाशी संपर्क आल्यामुळेही त्यांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. आदिवासींच्या समस्या निर्माण होण्याची ही सर्व कारणे विचारात घेऊन त्यांच्या ठळक समस्यांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**आर्थिक समस्या :**

भारताच्या विविध प्रदेशामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या उपजीविकेचे साधन एकच असणे शक्य नाही. शेती करणे, शिकार करणे, जंगली पदार्थ गोळा करणे, खाणीच्या उद्योगामध्ये काम करणे यासारखी त्यांच्या उपजीविकेची विविध साधने आहेत.

आदिवासींमध्ये उपजीवीकेच्या साधनांबाबत असलेली ही विविधता लक्षात घेऊनच त्यांच्या आर्थिक समस्यांचा विचार करणे आवश्यक ठरते. जंगल उत्पादन व जंगली जनावरांची शिकार यावर चरितार्थ चालविणाऱ्या काही आदिवासी जमाती आजही आहेत, परंतु त्यांची संख्या अतिशय कमी असून दिवसेंदिवस ती कमी होत आहे. या आदिवासी जमातींना जिवंत राहण्यासाठी सतत आर्थिक तणावांना तोंड द्यावे लागते. जंगलावर सरकारचे स्वामित्व प्रस्थापित झाले असल्यामुळे शिकार करणे हे कायदेशीररित्या गुन्ह्यांचे कृत्य ठरते. वनखात्याच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांची ससेहोलपट सुरू असते. फिरती रोजी हेच काही आदिवासी जमातीच्या उपजीविकेचे साधन आहे. शेतजमीन न नांगरल्यामुळे फिरती शेती करणाऱ्याला उत्पन्न फारच कमी मिळते.

जंगल काम करून स्थिरशेती करणारा आदिवासींचा गट सर्वात मोठा आहे. जमीनदार, लहान व्यापारी, जंगलाचे ठेकेदार, सरकारी अधिकारी, वगैरेंकडून आदिवासीची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे असे या गटास वाटते. या गटातील आदिवासींच्या जमिनीचे क्षेत्र अत्यंत लहान आहे. चांगला पाऊस झाला तरीही शेतीतून मिळणारे उत्पन्न २ ते ३ महिनेच पुरते. पावसाळ्यातील निदान २-३ महिने कंदफळांवर निर्वाह करून त्यांना राहावे लागते. या काळातील उपासमार आणि इतर काळातील अर्धउपासमार आदिवासींना अतिशय त्रस्त करते. त्यांची मुले कुपोषणाचे बळी ठरतात. या गटातील ८० टक्के आदिवासींजवळ १ ते ५ एकरांपेक्षाही कमी जमीन आहे. त्यांना विकास योजनांचे फायदे मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात असंतोष आहे. हे दहशतवादी कृत्ये करणाऱ्या नक्षलवादी चळवळीत सहजपणे ओढले जातात. पोलिसांच्या अत्याचाराचे शिकार ठरतात.

खाणी, पोलादाचे कारखाने, वीज केंद्रे, धरणे आदींच्या निर्मितीमुळे काही आदिवासी लोकांना विस्थापित व्हावे लागते. त्यांना दुसरीकडे स्थलांतर करावे लागते. विस्थापित आदिवासींचे योग्य प्रकारे पुनर्वसन होत नाही. त्यांना तुटपुंज्या स्वरूपात नुकसान भरपाई म्हणून मोबदला मिळतो. तोही खर्च होऊन जातो. विस्थापित होण्यामुळे भूमिहीन झालेले आदिवासी खाणी, कारखाने यांच्या परिसरात मजूर म्हणून काम करतात व झोपडपट्टीत राहतात. वर्षानुवर्षे दारिद्र्यरेषेखाली राहून जीवन जगण्याची पाळी त्यांच्यावर येते. अशा प्रकारे आदिवासी जमातीच्या आर्थिक समस्या विविध कारणांमुळे निर्माण झाल्या आहेत.

शेती करणे, शिकार करणे, मासेमारी किंवा जंगली पदार्थ गोळा करणे यासारखा कोणताही व्यवसाय आदिवासी करीत असले तरीही त्या व्यवसायातील उत्पादन अत्यंत अपुरे असते. कारण ते आपल्या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञान व अवजारांचा उपयोग करीत नाहीत म्हणून अपुरे उत्पादन व त्यामुळे येणारे दारिद्र्य ही त्यांची प्रमुख आर्थिक समस्या आहे. आर्थिक व्यवहार, बाजारपेठा, वजन व मापे या सर्व बाबींबाबत आदिवासी जमातीमध्ये कमालीचे अज्ञान व भोळेपणा आहे. त्यांच्या भोळेपणाचा फायदा व्यापारी, सावकार, जंगलातील ठेकेदार, सरकारी नोकर इत्यादी लोक घेतात. त्यांना अल्प वेतन देऊन वेठबिदार म्हणून त्यांच्याकडून कामे करून घेतात, त्यामुळे आर्थिक शोषण व कर्जबाजारीपणा या त्यांच्या आर्थिक समस्या आहेत.

**२) सामाजिक व सांस्कृतिक समस्या :**

आर्थिक समस्यांप्रमाणेच या जमातीच्या समोर असणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक समस्याही गंभीर स्वरूपाच्या आहेत. डोंगराळ भागात व घनदाट जंगलात राहणाऱ्या आदिवासी जमातीचा बाह्य जगाशी संपर्कच नव्हता. ख्रिश्चन मिशनरी, सरकारी नोकर आदींशी संपर्क आल्यामुळे देखील समस्या निर्माण झाल्या. या जमातीपैकी काही जमातीच्या सदस्यांनी जमातीबाह्य जगातील लोकांचे वेशभूषा, केशभूषा, पोशाख, जीवन जगण्याची पद्धती इत्यादीबाबत अनुकरण केले. परिणामी, असे अनुकरण करणारे लोक जमातीच्या परंपरागत पद्धतीचा त्याग करणारे असल्यामुळे त्यांचे त्यांच्या जमातीतील जातिबांधवांपासून संबंध दुरावले. त्या जमातीत अशा लोकांना समानतेची वागणूक मिळणे बंद झाले. शहरातील वास्तव्य, आधुनिक शिक्षण इत्यादी कारणांमुळे काही आदिवासी व्यक्तींच्या परंपरागत वेशभूषेत व जीवन जगण्याच्या पद्धतीत बदल होणे स्वाभाविक ठरते, परंतु अशा व्यक्ती त्यांच्या जमातीमधील अन्य लोकांपासून सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या दुरावल्या जातात.

गुजरातमधील अहमदाबाद व बडोदा या महानगरांत नोकरी, शिक्षण, आर्थिक स्थिती, जीवन जगण्याची पद्धती यासारख्या विविध बाबतीत अनेक आदिवासी व्यक्ती त्यांच्या कुटुंबासह 'मध्यमवर्ग' म्हणून जीवन जगत आहेत. परंतु शहरातील बिगरआदिवासी मध्यमवर्ग आदिवासींच्या नवीन मध्यमवर्गाला आपल्यामध्ये सामावून घ्यावयास तयार नाहीत, तसेच अशा शहरी भागात राहणाऱ्या आदिवासींना समूह सामाजिकदृष्ट्या आपले मानावयास तयार नाहीत. परिणामी, शहरात मध्यमवर्ग म्हणून जीवन जगणाऱ्या शहरी आदिवासी व्यक्ती त्यांचे कुटुंब यांची स्थिती सामाजिकदृष्ट्या त्रिशंकूसारखी निर्माण झाली आहे.

बाह्य जगाच्या संपर्कात आल्यानंतर, काही आदिवासी व्यक्ती व त्यांचे समूह परंपरागत पोषाख पद्धती, रीतिरिवाज, भाषा व जीवन पद्धतीचा त्याग करीत आहेत. परिणामी या समूहाची एकीकडे हजारो वर्षांपासूनची सांस्कृतिक वैशिष्ट्ये हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तर

दुसरीकडे नवीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीशी पूर्णतः जुळवून न घेता आल्यामुळे अशा व्यक्तीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात पोकळी निर्माण झाली आहे.

अशा प्रकारे डोंगर, दऱ्या, घनदाट जंगले आदी दुर्गम ठिकाणी राहणाऱ्या जमातींचा बाह्य जगाशी संपर्क तुटल्यामुळे त्यांच्यात अनेक सामाजिक व सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्यात. तसेच बाह्यजगाशी संपर्क आल्यामुळे देखील सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. उदा. क्यूमूल्याची प्रथा, बालविवाहाची प्रथा, इत्यादी. यावरून या जमातींच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या किती गंभीर स्वरूपाच्या आहेत ते स्पष्ट होते.

**३) आरोग्यविषयक समस्या :**

आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्याही आर्थिक समस्यांप्रमाणे अनेकविध आहेत. उदा. कुपोषण ही त्यांची प्रमुख समस्या आरोग्याच्या बाबतची आहे. आदिवासी ज्या भागात राहतात त्या भागात त्यांना नियमित रोजगार प्राप्त होत नाही. रोजगार प्राप्तीसाठी ते आपले घरदार, गाव व प्रदेश सोडून अन्य ठिकाणी जाण्यास तयार नाहीत. ते जो व्यवसाय करतात त्या व्यवसायामधून मिळणारे उत्पन्न फारच कमी असते. यामुळे ते पोटभर अन्नदेखील वर्षभर घेऊ शकत नाहीत. त्यांना वर्षातील अनेक दिवस उपाशीदेखील राहावे लागते. त्यांची लहान मुले कुपोषणाला बळी पडतात. ते साथींच्या रोगांना बळी पडतात.

जादूटोणा किंवा यांत्रिकाच्या क्रियेचा प्रभाव यातून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. मनुष्य आजारी पडण्याचे कारण भूत-प्रेत, पिशाच्च इत्यादींची बाधा होणे हेच आहे असे त्यांना वाटते. यामुळे प्रथम मांत्रिकाकडे आजारी व्यक्तीला घेऊन जातात. योग्य औषधोपचार न मिळाल्यामुळे आजारी आदिवासीचा हकनाक बळी जातो. आदिवासी लोक घनदाट जंगले, डोंगर दऱ्या अशा दुर्गम भागात राहतात. या दुर्गम प्रदेशात दवाखान्याच्या म्हणजे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सोयी पुरेशा प्रमाणात नाहीत. दुर्गम प्रदेशात रस्ते फारसे चांगले नसतात. त्यामुळे तालुक्याच्या किंवा जिल्हा स्थानाच्या ठिकाणी असणाऱ्या आदिवासी व्यक्तीला नेण्यासाठी फार वेळ लागतो. दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच वाटेतच त्याचा मृत्यू होतो. अशा प्रकारे दवाखान्यांच्या अपुऱ्या सोयीमुळे बालमृत्यू तसेच प्रसूतीकाळत स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण आदिवासी भागात अधिक आहे. आदीवासी जमातीमध्ये अज्ञान, अंधश्रद्धा याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आरोग्याला घातक असणाऱ्या प्रथा, परंपरा या जमातींमध्ये अद्यापही सुरू आहेत. आदिवासी जमातींमध्ये मंदबुद्धी असणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण अधिक आहे. सण, उत्सव, कौटुंबिक समारंभ इत्यादी प्रसंगी पुरूष, स्त्रिया व मुले एकत्र बसून सामूहिकपणे मद्यपान करतात. मद्यपानाचे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. अशा प्रकारे अंधश्रद्धा प्रथा, परंपरा, रीतिरिवाज यातून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**४) शैक्षणिक समस्या :**

डोंगर दऱ्या, घनदाट जंगले इत्यादी ठिकाणी निवासस्थाने असणाऱ्या आदिवासींना आधुनिक शिक्षणाचे महत्त्व अद्यापही समजले नाही. ते आपल्या मुलांना प्राथमिक शाळेत दाखल करीत नाहीत. या भागात मुळातच शाळांची संख्या कमी आहे. शाळा असल्या तरीही आदिवासींची मुले शाळेत येतच नाहीत. काही मुले शाळेत दाखल झाली तरी वर्ष दोन वर्षांत शिक्षण घेणे बंद करतात. आदिवासी भागात शिक्षणामधील गळतीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण आदिवासी भागात

अल्प आहे, तसेच निरक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त आहे. प्रत्येक आदिवासी जमातींची बोलीभाषा व मातृभाषा वेगवेगळी आहे. त्यांच्या मातृभाषेत लिहिलेली पुस्तकेदेखील नाहीत. त्यामुळे त्यांना कोणत्या भाषेतून शिक्षण द्यावे, असा प्रश्न निर्माण होतो.

**५) धर्मांतराच्या समस्या :**

गेल्या दीडशे-दोनशे वर्षांपासून ख्रिश्चन मिशनरी आदिवासी क्षेत्रात सेवा कार्य करीत आहेत. ख्रिश्चन मिशनऱ्यांमुळे दुर्गम आदिवासी भागात दवाखाने, शाळा यासारख्या सोयी निर्माण झाल्या. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संपर्कात आल्यानंतर बहुतांश वेळा स्वखुशीने व काही वेळा जबरदस्तीने आदिवासी लोक ख्रिश्चन धर्म स्वीकार करतात. ख्रिश्चन धर्मांचा स्वीकार केलेल्या आदिवासी बांधवांचे आर्थिक दारिद्र्य कमी झाले नाही. धर्मांतर केलेले आदिवासी त्याच गावातील जमातीतील तसेच नातेसमूहातील व्यक्तीपासून दुरावले जातात. धर्म बदलला तरीही त्यांच्या जीवनपद्धतीत पारंपरिक गोष्टींचा प्रभाव कायमच असतो. म्हणजे धर्मांतर केल्यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडून येत नाहीत. परंतु धर्मांतरामुळे ते मूळ समूहापासूनच वेगळे पडतात. जमातीमधील एकीची भावना कमी होते व ताणतणाव वाढतो. अशा प्रकारे धर्मांतरातून त्यांच्या समस्यांमध्ये अधिक वाढ होते.

**६) राजकीय समस्या :**

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींना राजकीय सहभागाच्या संधी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत. तरीही संपूर्ण जमातीच्या हितसंबंधाचे रक्षण करून आधुनिक काळानुसार आवश्यक असणारे परिवर्तन त्यांच्यामध्ये घडवून आणणारे राजकीय नेतृत्व पुरेशा प्रमाणात विकसित झालेले नाही. सुयोग स्वरूपातील राजकीय नेतृत्वाचा अभाव असल्यामुळे आदिवासी भागात परिवर्तनाची, तसेच विकासाची गती फारच मंद आहे.

## ४.८ अनुसूचित जमातींच्या संरक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदी

**१) सुरक्षित अथवा राखीव मतदारसंघ :**

लोकशाही शासनपद्धतीत कोणत्याही समूहाला सुयोग्य प्रतिनिधित्व प्राप्त झाल्याशिवाय या समूहाचा विकास होणे शक्य नसते. लोकसभा आणि विधानसभेत अनुसूचित जमातींना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून त्यांच्यासाठी राखीव मतदारसंघ निर्माण करण्याची तरतूद संविधानित केली आहे. या शिवाय ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये या जमातींना प्रतिनिधित्व देण्यासाठी राखीव मतदारसंघ निर्माण करण्याचे कायदे घटक राज्यांनी केले आहेत.

**२) मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व :**

ओरिसा, बिहार, व मध्य प्रदेश या तीन घटकराज्यांमध्ये अनुसूचित जमातींची संख्या बरीच मोठी आहे. म्हणून या घटकराज्यांच्या मंत्रिमंडळात त्यांना प्रतिनिधित्व मिळावे, अशी तरतूद करण्यात आली आहे.

**३) अनुसूचित जमातींचा प्रदेश :**

या जमातींचे बहुसंख्येने वास्तव्य असणाऱ्या प्रदेशाला (किंवा जिल्ह्याला) 'अनुसूचित जमातींचा प्रदेश' असे घोषित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्याची तरतूद संविधानात करण्यात आली आहे. या प्रकारच्या घोषणेमुळे त्या प्रदेशातील शासकीय प्रशासन व्यवस्थेबाबत काही विशेष तरतुदी करणे शक्य होते.

**४. शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाचे रक्षण :**

अनुसूचित जमातींचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध प्रामुख्याने जपले पाहिजे. सामाजिक अन्यायापासून सर्व प्रकारच्या पिळवणुकीपर्यंत त्यांचे राज्याचे (शासनसंस्थेने) संरक्षण केले पाहिजे. अशा अर्थाची तरतूद संविधानात करण्यात आली आहे.

५) घटनात्मक तरतुदीच्या अंमलबजावणीची प्रशासकीय व्यवस्था.

६) न्याय कारणांसाठी केलेला भेदभाव.

७) घटक राज्य शासनाला आदेश देण्याबाबत केंद्र शासनाला अधिकार, अशा घटनात्मक तरतुदी करणे गरजेचे आहे.

## ४.९ अनुसूचित जमातींच्या समस्या सोडविण्यासाठी शासकीय उपाय

भारतीय समाजात 'जंगलातील राजे' असे आदिवासी जमातीचे स्थान काही वर्षांपूर्वी होते. तत्कालीन संस्थानिक, राजे मालगुजार इत्यादींच्या मालकीची जंगले होते. परंतु त्या काळात आजच्या सारखे वनखाते नव्हते. संस्थानिक, मालगुजर व जंगलात राहणाऱ्या आदिवासी जमाती यांच्यात ताण-तणाव नव्हता. जंगलातील पदार्थ गोळा करणे, शिकार करणे, लाकूडफाटा गोळा करणे यावर कोणतेही निर्बंध नसल्यामुळे त्या काळात आजच्या एवढे दारिद्र्य आदिवासी जमातीमध्ये नव्हते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सुरू केलेल्या वनखात्यामुळे आदिवासी जमातीची स्थिती फार दयनीय झाली. एकेकाळी जंगलाचे राजे म्हणून जगणाऱ्या आदिवासींना समाजाचा दुर्बल घटक म्हणून जीवन जगणे भाग पडत आहे. पारंपरिक जीवनपद्धती व दारिद्र्यात खितपत पडलेल्या आदिवासी जमातींना मदतीचा हात दिल्याशिवाय त्यांची यातून सुटका होणे शक्य नाही. अनुसूचित जमातींच्या समस्या सोडविण्यासाठीच्या शासकीय उपाययोजनेचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**स्वातंत्र्यपूर्व काळ :**

आदिवासी जमातींचे समूह समाजाता दुर्बल घटक म्हणून अधिकार हीनतेच्या स्थितीत जीवन जगत आहेत. याची जाणीव तत्कालीन राजकीय नेते व समाजसुधारकांना झाली. प्रामुख्याने महात्मा गांधींनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आदिवासी भागात सेवा कार्ये करण्याची विनंती केली. महात्मा गांधीच्या इच्छेनुसार काँग्रेसचे काही नेते व कार्यकर्ते आदिवासी भागात गेली. उदा. गुजरातमध्ये ठक्कर बाप्पा यांनी भिल्ल या आदिवासी जमातीची जीवनस्थितीत परिवर्तन घडवून आणण्याचे काम सुरू केले. आदिवासींच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'भारतीय आदिम जाती सेवक संघ' वनवासी कल्याण आश्रम यासारख्या अनेक स्वयंसेवी संस्था स्वातंत्र्यपूर्व

काळातच स्थापन करण्यात आल्या. या स्वयंसेवी संस्थांचे कार्य अद्यापही सुरूच आहे. तथापि स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आदिवासींच्या जीवन स्थितीमध्ये बदल घडवून समस्यांची सोडवणूक करण्याची प्रक्रिया मंद गतीने सुरू होती.

**स्वातंत्र्योत्तर काळ :**

अनुसूचित जमातींच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा विविधसमस्यांचे निराकरण करण्यासाठीच्या शासकीय उपाययोजनांना स्वातंत्र्योत्तर काळातच खऱ्या अर्थाने गती प्राप्त झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील व्यापक स्वरूपाच्या शासकीय उपाययोजनेचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व :**

ओरिसा, बिहार व मध्य प्रदेशातील मंत्रिमंडळात या जमातींना प्रतिनिधित्व देण्याची तरतूद संविधानात आहेच. परंतु भारताच्या सर्वच घटकराज्यांमध्ये अनुसूचित जमाती आहे. या जमातींच्या प्रतिनिधींना निर्माण प्रक्रियेत सहभागी होता यावे यासाठी त्यांना केंद्र व घटकराज्य मंत्रिमंडळामध्ये स्थान देण्याचा राजकीय संकेत निर्माण झाला आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तेतही त्यांना सहभागी करून घेण्यात येत आहे.

**२) सार्वजनिक नोकऱ्या व शिक्षणसंस्थांमध्ये आरक्षित जागा :**

संविधानातील तरतुदीतील अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये आणि शिक्षणसंस्थांमध्ये या जमातींसाठी जागा आरक्षित ठेवण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आहे व अमलात आणले आहे. त्यांना नोकऱ्यांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळावे यासाठी वयोमर्यादा शिथिल करणे, योग्यता किंवा पात्रताविषयक अटी शिथिल करणे पूर्वानुभवाच्या अटी शिथिल करणे यासारखे उपाय योजले जातात.

**३) शैक्षणिक व आर्थिक विकासाचा कार्यक्रम :**

आदिवासी कल्याण कार्यक्रमात त्यांच्या शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जातो. यासाठी आदिवासींच्या विभागात आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. आसाम, बिहार, मणिपूर व मध्य प्रदेश या घटकराज्यात आदिवासींसाठी तांत्रिक शिक्षणाच्या शाळा उघडल्या आहेत. या शाळा केंद्र सरकारकडून आर्थिक अनुदान दिले जाते. मुलींसाठी वसती गृहे बांधणे, मुलांना उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देणे या जमातीमधील विद्यार्थ्यांना आय.ए.एस सारख्या उच्च स्पर्धात्मक परीक्षांना बसता यावे म्हणून मार्गदर्शन केंद्राची सोय करणे, इत्यादी शैक्षणिक कार्यावर भर दिला जातो.

या जमातीचा आर्थिक विकास व्हावा यासाठी त्यांना पडिक वन जमीन व सीलिंग कायद्यामुळे शासनाला प्राप्त झालेली जमीन उपलब्ध करून देण्यात येते. त्यामुळे त्यांना स्थिर शेतीचे लाभ उपलब्ध होते. अशी अपेक्षा आहे. पंचवर्षिक योजनेत या जमातींसाठी कुटिरोद्योगांवर विशेष भर दिला जातो. त्यांनी गृहोद्योग करावेत, म्हणून त्यांना प्रशिक्षण दिले जाते. तसेच कर्जेदेखील उपलब्ध करून दिली जातात. या जमातीच्या उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, तसेच त्यांना

त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा, म्हणून त्यांच्या सहकारी संस्था काढण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

अशा प्रकारे या बी - बियाणे, बैल, खते अल्प किमतीत उपलब्ध करून देऊन व कर्जाची सोय उपलब्ध करून देऊन त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यांच्या सामाजिक जीवनात बदल घडवून आणण्यासाठी त्यांच्यासाठी 'संस्कार केंद्रे' स्थापन करण्यात आली आहेत.

## ४.१० स्वाध्याय

१. अनुसूचित जातीच्या समस्या सांगून शासकीय उपाययोजना सांगा.

२. अनुसूचित जातीच्या संरक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदी स्पष्ट करा.

३. अनुसूचित जातीच्या प्रमुख समस्या सांगा.

४. अनुसूचित जमातीच्या प्रमुख समस्या सांगून उपाय सुचवा.

५. अनुसूचित जमातीच्या संरक्षणासाठीच्या गटनात्मक तरतुदी सांगा.

६. दुर्बल घटक कोणास म्हणावे ? दुर्बल घटकांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या स्पष्ट करा.

७. दुर्बल घटकांच्या प्रमुख समस्या सांगा.

♦ ♦ ♦

# ५

# स्त्रियांच्या समस्या

**पाठाची रूपरेषा**

५.० पाठाचे उद्देश

५.१ प्रास्ताविक

५.२ स्त्रियांच्या समस्यांना जबाबदार असलेले घटक

५.३ स्त्रियांच्या समस्याची व्याप्ती

५.४ स्त्रियांच्या काही समस्यांचा आढावा

५.५ नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या

५.६ शहरी भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या

५.७ स्त्रियांच्या समस्येवरील पाय

५.८ स्वाध्याय

## ५.० पाठाचे उद्देश

- भारतीय समाजात स्त्रियांचे महत्त्व अभ्यासणे.
- समाजात स्त्रियांच्या समस्यांना जबाबदार असलेले घटक अभ्यासणे.
- स्त्रियांच्या समस्यांची व्याप्ती अभ्यासणे.
- स्त्रियांच्या काही महत्त्वाच्या समस्यांचा आढावा घेणे.
- नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या अभ्यासणे.
- शहरी समाजात नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कोणत्या समस्या आहेत ते अभ्यासणे.
- स्त्रियांच्या समस्येवरील कोणकोणते उपाय आहेत आणि त्याची अंमलबजावणी कशी केली जाते ते अभ्यासणे.

## ५.१ प्रास्ताविक

भारतीय संस्कृतीत स्त्रियांना फार सन्मानाने वागवले जात होते. किंबहुना स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांत कार्य करीत असत. भारतीय समाजात शक्ती, ज्ञान, संपत्ती या सर्वांची अधिष्ठात्री देवता स्त्री आहे. स्त्रीला दुर्गा, सरस्वती, लक्ष्मी इत्यादी नावाने ओळखले जाते. स्त्री ही

किती महत्त्वाची होती याचे उदाहरण म्हणजे भारताची राष्ट्रीय देवता भारतमाताच आहे. मनूने म्हटल्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचा आदर्श ''जेथे स्त्रियांना सन्मानाने वागवले जाते तेथे देवतांचा वास असतो. म्हणजेच ते कुटुंब तो समाज सुखी, संपन्न आणि समाधानी असतो. हे यावरून स्पष्ट होते. तथापि मनूने स्त्रियांबद्दल इतका आदर दाखवूनही स्त्रियांना विवाहापूर्वी वडिलांनी, विवाहानंतर पतीने व वार्धक्यात पुत्राने स्त्रियांचा सांभाळ करावा असेच तत्त्वज्ञान भारतीय संस्कृतीत आढळते. साने गुरूजींनी एका सुविचारात स्त्रीचे महत्त्व प्रतिपादन करताना म्हणतात ''स्त्री म्हणजे जगातील महाशक्ती या शक्तीशी वागणाऱ्या पुरूषाने शिव झाले पाहिजे. शिव व शक्ती ह्यांच्या प्रेमावर सर्व समाजाचा प्राण अवलंबून आहे. समाज कुटुंब आणि व्यक्तीचे अस्तित्व हे स्त्रीपुरूषांच्या परस्पर सहकार्य, उत्कट प्रेम, सद्‌भावना, त्याग या सारख्या गोष्टीवर अवलंबून असते. स्त्री शिवाय पुरूष व समाज असणे शक्य नाही. परंतु जसा समाज सुधारत गेला व गुंतागुंतीचा बनत गेला तेव्हा स्त्रियांच्या समस्या निर्माण होत गेल्या. स्त्रीला जन्मतःच 'स्त्री' म्हणून मिळालेले नैसर्गिक स्थान हे तिला मिळणाऱ्या अन्यायकारक वागणुकीला पूरक समजले जाते. स्त्रीला स्त्रीत्वामुळे ज्या विविध विचित्र अवस्थांना तोंड द्यावे लागते. त्यातूनच स्त्री समस्या उद्‌भवतात. भारतीय समाजात स्त्रियांबद्दल अनेक गैरसमज आढळतात. त्यात प्रामुख्याने असे म्हटले जाते. स्त्रियांना बुद्धी नसते. स्त्रिया पुरूषांच्या उपभोगासाठी असतात. स्त्रिया कोणतीही गोष्ट गुप्त ठेवत नाही. यातूनच स्त्रियांच्या समस्यांचा जन्म झालेला आढळतो. स्त्रियांच्या समस्येची फार मोठी यादी आपल्याला देता येईल. परंतु या प्रकरणात आपण स्त्रियांच्या समस्यांना जबाबदार असलेले घटक आणि स्त्रियांना वेगवेगळ्या क्षेत्रांत भेडसावणाऱ्या समस्या या विषयी पाहणे आवश्यक आहे.

## ५.२ स्त्रियांच्या समस्यांना जबाबदार असलेले घटक

### १) लिंग भिन्नता :

स्त्रियांच्या प्रश्नास लिंग भिन्नता हेच कारण जबाबदार आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. निसर्गतः स्त्री पुरूषात लिंगभिन्नता आहे. नर आणि नारी यांचा स्वभाव शारीरिक ठेवणे, मानसिकता इत्यादी फरक आहे. स्त्री अपंग, लावण्यवती सौंदर्यवान असली तरी ती स्त्री असते. शारीरिक वर्चस्वाच्या बाबतीत ती अत्यंत दुर्बल असते. पुरूषावर अवलंबून राहण्याशिवाय तिला पर्याय नसतो. कोणत्याही परिस्थितीत पुरूषांच्या आधाराविना जगणाऱ्या स्त्रिला स्त्री असे म्हणून पुरूषी अत्याचाराला तोंड द्यावे लागते. संशयाचा फायदा घेवून स्त्रीला अतोनात छळले जाते. या स्त्री जाचास कंटाळून स्त्रीला मरावे तरी लागते नाहीतर त्रास सहन करावा लागतो. आधुनिक काळात स्त्रिया आत्महत्येचे प्रकार आढळत आहेत. स्त्रीला त्रास देताना उपाशी ठेवणे, कष्टाच्या कामाला लावणे, शिवीगाळ करणे, टिंगल करणे, मारणे, इत्यादी निंद्य प्रकार स्त्रीजीवनाची वाईट कहाणीच आहे. यातून स्त्रियांचे अनेक प्रश्न निर्माण होतात.

### पितृसत्ताक कुटुंब :

भारतीय कुटुंब हे पितृसत्ताक कुटुंब आहे. या कुटुंबाचा प्रमुख पिता हा आहे. पित्याच्या अधिकाराची सर्वाला मान्यता आहे. सामाजिक व आर्थिक कार्यात पुरूषांना प्राधान्य असते. स्त्रियांचा छळ किंवा त्रासाला कुटुंबातील पुरूष मंडळीच जबाबदार असतात. पुरूषाने सांगायचे आणि स्त्रीने ऐकायचे अशी पितृसत्ताक कुटुंबाची रीत असते. मुलीचे लग्न असो किंवा एखाद्या मुलाची मुंज असो किंवा नामकरण संस्कार असो अगोदर पुरूषांनाच प्राधान्य द्यावे लागते. पती निधनानंतर अधिकार

प्राप्त झालेल्या स्त्रियांना सुद्धा तिच्या  मोठ्या मुलाकडे येत असल्यामुळे मुलीपेक्षा मुलाचे महत्त्व जास्त असते. थोडक्यात पितृसत्ताक कुटुंबात पुरूषांना आत्यांतिक महत्त्व असल्याने स्त्रियांना सर्वच बाबतीत दुय्यम स्थान प्राप्त झालेले असल्याने कोणत्याही अत्याचाराला स्त्रिया प्रखरपणे विरोध करणे शक्य नसल्याने त्यांचे मानसिक संतुलन बिघडले.

पितृसत्ताक कुटुंबात स्त्रियांबद्दल अनेक गैरसमज आढळतात. स्त्रियांना कलहप्रिय समजले जाते. त्या  स्त्रिया सुखासाठी जन्मलेल्या आहेत. अशा प्रकारची अनेक संबोधने भारतीय कुटुंबातील स्त्रियांना लावली जातात. मनूने मनुस्मृतील अनेक बंधने स्त्रियांसाठी सांगितलेली आहेत. विधवांनी पुन्हा विवाह करू नयेत. स्त्रियांनी अविवाहित राहू नये. पती व्यभिचारी असला तरी पत्नीने मात्र त्याच्याशी एकनिष्ठ राहावे.

वरील विवेचनावरून भारती समाजात स्त्री व पुरूष असे दोन भिन्न घटक निर्माण करून स्त्रियांना वेगळे नियम व पुरूषांना वेगळे नियम लावून त्यांच्यात भेदनीती निर्माण केली. थोडक्यात कुटुंबातील सर्व सदस्य व नातेवाईकांनी जुळवून घेण्यातच स्त्री जीवन अवघड होऊन बसलेले आहे.

**कुटुंबातील मुलांचे महत्त्व :**

भारतीय समाजातील कुटुंबात असलेले मुलांचे महत्त्व सर्व धर्मांनीच मान्य केलेले आहे. मुलीपेक्षा मुलांना श्रेष्ठ मानण्याची प्रथाच निर्माण झालेली आहे. मुलाला शाळेत प्रवेश देताना जेवढा उत्साह असतो. तेवढाच निरूत्साह मुलीला शाळेत प्रवेश देताना असतो. मुलगी जन्माला आली की कार्टी म्हणून संबोधले जाते. तर मुलगा जन्माला आला तर पेढे वाटत फिरून आनंद व्यक्त करतात. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा. वृद्धावस्थेत तोच सांभाळतो. मुलगी मात्र दुसऱ्याच्या घरी जाणार म्हणून मुलीची जाणीवपूर्वक हेळसांड केली जाते. आई वडिलांना मुलगी जन्माला आली की पाप वाटते. मुलाचे महत्त्व कुटुंबात अधिक असल्याने मुलीचा तिरस्कार केला जातो. 'माहेर आणि सासर' अशा दोन्ही ठिकाणी स्त्रीला महत्त्व नसल्यामुळे स्त्रीच्या समस्या ह्या कमी न होता वाढतच असल्याने आढळून येते. थोडक्यात हिन्दू कुटुंबातील मुलांचे अवास्तव महत्त्व हेसुद्धा स्त्रियांच्या समस्येचे मूळ कारण आहे. म्हणून स्त्री जीवनाची कहाणीच भारतीय कुटुंबात दुर्दैवी आहे. असे म्हणावे लागेल.

**सती प्रथा :**

सती प्रथा (सहमरण) हा हिन्दू सामाजिक जीवनातील एक कलंकित भाग आहे. हिन्दू धर्मशास्त्राप्रमाणे पती-पत्नीचे संबंध जन्मोजन्मीचे असल्यामुळे ते दीर्घकालीन असतात. म्हणून पती निधनानंतर मृत पतीबरोबर जिवंत पत्नीने आत्मदहन करणे होय. सुरूवातीला काही स्त्रियांनी कदाचित स्वखुषीने ही प्रथा स्वीकारली असेल. परंतु नंतरच्या काळात हितसंबंधी लोकांनी स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडले असे आढळते. सती गेलेल्या जागेवर सतीचे मंजिर, सतीचा खांब उभारून स्मारक करण्याची पद्धत आजही राज्यस्थानात आढळते. या प्रथेमागे अनेक कारणे कारणीभूत आहेत. उदा. धर्मचरण पतीनिष्ठा व्यक्त करणे विधवांना सांभाळण्याचे टाळणे इत्यादी.

सतीची प्रथा दृष्ट आहे. म्हणून नाश करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी समाजजागृती केली, परंतु त्यांचे प्रयत्न कमी पडले. बालविवाह, कन्यावध, यासारख्या प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी लोकजागृती केली. सती प्रथा म्हणजे स्त्रियांची हत्या आहे. असे सर्व समाजसुधारकांनी लोकांना

समजावून सांगितले. डॉ. आंबेडकर, महात्मा फुलेंनी केलेल्या कार्याने भारतीय स्त्रीला पुन्हा समता - स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यास हातभार लावला. सतीची प्रथा इ.स. १८२९ मध्ये कायद्याने बंद करण्यात आली, परंतु सती प्रथेतून निर्माण झालेल्या समस्या स्त्रियांच्या बाबतीत विघटनवादी ठरलेली आहे.

भारतीय समाजात स्त्रियांच्या समस्येच्या पाठीमागे सती प्रथेबरोबर अनेक कारणे होती. परंतु सर्व कारणे एकाच प्रकारची नव्हती. म्हणून सती प्रथेसारखे वाईट प्रथेचा विचार कर्मठ भारतीयांनी वेळोवेळी केलेला आहे. स्त्रियांच्या ज्या समस्या आहेत त्यात प्रामुख्याने काही परंपरागत प्रथा होत्या हे आपणास नाकारता येत नाही.

**बालविवाह प्रथा :**

भारतातील अनुलोम विवाहाचा दुष्परिणाम म्हणजे बालविवाह प्रथा होय. प्राचीन काळी मुला-मुलींचे बालवयात विवाह होत असत. हुंड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मुलीचे विवाह कमी वयातच होत असत. भारतातील आदिवासी समाजातसुद्धा बालविवाह मान्य होता. भारतात मुलींच्या विवाहाचे वय अगदी जन्मापासूनच ठरविले जात असत. भारतात बिजवराला (विधूवराला) मुलगी देण्याची प्रथा रूढ होती. विजोड वयाच्या पती-पत्नीचा संसारही भारतीय समाजात आढळत होता.

स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार व्यापक दृष्टीने केल्यास आपणास असेही लक्षात येईल की मुलगी घरात फार मोठी होऊ दिली, तर मुलीच्या पालनपोषणाचा खर्च आपल्याच कुटुंबातील व्यक्तीना करावा लागेल. बालविवाह प्रथेमुळे अनेक विध्वंस परिणाम भारतीय समाजावर झालेले आढळतात. सध्या बालविवाहाचे प्रमाण कमी झाल्याचे आढळते. विवाहयोग्य वय झाल्याशिवाय विवाह होणार नाही. अशीच भूमिका आधुनिक काळात निर्माण झालेली आहे.

## ५.३ स्त्रियांच्या समस्यांची व्याप्ती

स्त्रियांच्या समस्यांची व्याप्ती कमी न होता ती सतत वाढतच आहे. आधुनिक जीवनाच्या परिवर्तनशील समाजात अनेक घटकांची गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे स्त्रियांच्या समस्येची व्याप्ती वाढलेली आहे. कायद्याचे संरक्षण, पाश्चिमात्य विचाराचा प्रभाव, स्त्री, स्वातंत्र्य शिक्षण, राजकारण, नोकरीविषयक पूर्तता, केंद्रकुटुंबाचा उदय, बदलती ग्रामीण अर्थव्यवस्था, नागरीकरण या सारख्या बाबींमुळे स्त्रीचे क्षेत्र व्यापक बनून समस्याही व्यापकच बनलेल्या आहेत. स्त्रियांच्या समस्यांची व्यापकता खालील वेगवेगळ्या क्षेत्रांत विभिन्न स्वरूपाची आढळते.

**शैक्षणिक क्षेत्र :**

शैक्षणिक क्षेत्राची व्याप्ती वाढविण्यात शैक्षणिक क्षेत्र कारणीभूत ठरते. ब्रिटिशांचा शैक्षणिक दृष्टिकोन व शिक्षणास मिळालेली प्रेरणा स्त्रीशिक्षणाला वरदान ठरली. अडाणी असलेली स्त्री लिहिणे व वाचणे शिकत आहे. ग्रामीण भागातूनही आता मुली शिक्षण घेत आहेत. प्रौढ शिक्षणाचा फायदा ग्रामीण स्त्रियांना प्राप्त होत आहे. परंतु शाळेत व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुली वयात आलेल्या असल्याने त्यांना विवाह बंधनात अडकविण्यात येत आहे. याचाच अर्थ असा आहे की, स्त्रियांना घर व संसार यातच ठेवणे हा एक समाजाचा दृष्टिकोणच निर्माण झालेला आहे. कपडे, दागिने, यातच स्त्रियांना अधिक आनंद प्राप्त होताना दिसून येते. शिक्षण घेत असताना त्याची कौटुंबिक आणि समाजाकडून होणारी चेष्टा सहन करावी लागते.

थोडक्यात शिक्षण घेऊन मोठे होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या स्त्रियांना किती तरी संकटातून जीवन जगावे लागते. शिक्षण क्षेत्रातील निर्माण झालेल्या स्त्रियांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. शिक्षण घेत असतानाच अनेक मुलींना बलात्काराला बळी पडावे लागते, अनेक त्रास सहन करावे लागतात. घरी परत आल्यावर शिक्षण घेऊन नोकरी करायची नाही अशी बोलणी आईवडिलांकडून ऐकावी लागतात. शेवटी घरच्या समस्यांबरोबरच बाहेरच्या जगातील समस्यांनाही तोंड द्यावे लागते. अशा प्रकारे शैक्षणिक क्षेत्रात  स्त्रियां बद्दल अनेक समस्या निर्माण होतात.

**सामाजिक क्षेत्र :**

जुन्या आणि नवीन विचार प्रवाहात आजची सामाजिक परिस्थिती गुंतागुतीची झालेली आहे. स्त्रियांना स्वातंत्र्य असू नये आणि ते स्वातंत्र्य असले पाहिजे अशा दुहेरी समाजभावना निर्माण झालेल्या परिस्थितीच्या भोवऱ्यात आधुनिक स्त्री अडकून पडलेली आहे. पतीचे अपघाती निधन झाल्यानंतर सुशिक्षित स्त्रीस नोकरी मिळू शकते. परंतू अशिक्षित स्त्रीस समाजाच्या वाईट परिस्थितीस तोंड द्यावे लागते. घराबाहेर पडलेल्या स्त्रीला दुसऱ्याकडून अपमानित जीवन जगावे लागते. चांगल्या व कर्तबगार स्त्रियांच्या चारित्र्यांवर शिंतोडे उडविण्यात स्त्रियांचा प्रथम क्रमांक असतो. थोडक्यात सामाजिक परिस्थिती अनुकूल व प्रतिकूल असल्यामुळे जसे स्त्रियांवर चांगले प्रसंग येतात. तसेच वाईट प्रसंगही येत असतात. स्त्रियांच्या संदर्भात समस्यांचा विचार सामाजिक दृष्टिकोनातून करणे अवघड होऊन बसलेले आहे. स्त्रियांनी घरकाम केल्यास वेगळे प्रश्न आणि शासकीय नोकरी धरल्यास वेगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत. सासूच्या त्रासामुळे एखाद्या विवाहित स्त्रीने केलेली आत्महत्या किंवा सासूनेच सुनेचा घेतलेला जीव अशा बातम्या दररोजच्या वर्तमानपत्रात आपणास वाचावयास मिळतात. याचाच अर्थ असा की समाज हा सामाजिक समस्येनी परिपूर्ण आहे. अनेक प्रश्नांची ढवळाढवळ निर्माण झालेली आहे. शेवटी आपणास असे म्हणावेसे वाटते की, पुरूषापेक्षाही स्त्रियांचे सामाजिक प्रश्न गुंतागुंतीचे आहेत.

**राजकीय क्षेत्र :**

स्त्रियांच्या समस्येच्या बाबतीत राजकीय क्षेत्राचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. ज्या देशातील राजकीय क्षेत्र स्त्रियांच्या विकासासाठी अनुकूल आहे. त्या ठिकाणी अनेक प्रश्न स्त्रियांच्या संदर्भात निर्माण होत नाहीत. परंतु ज्या देशात स्त्रियांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते. त्या देशात स्त्रियांच्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण होतात. भारत देशात स्त्रियांच्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण होतात. भारत देशाचा विचार केल्यास आपणास असे म्हणावे लागते. स्त्रियांसाठी आम्हाला आरक्षण नको. परंतु स्त्रियांसाठी संरक्षण हवे. या विधानाचा एवढाच अर्थ आहे की, स्त्रियांना नोकरी व संरक्षण जर देता आले तर स्त्रियांसाठी कोणकोणते प्रश्न निर्माण होणार नाहीत. परंतु ते अद्याप भारतीय शासनाला जमलेले नाही. म्हणून स्त्रियांचे प्रश्न आहेत तसेच आहेत.

काही प्रमाणात सुधारणा झालेली आहे. असेही आपणास निदर्शनास येते. महाराष्ट्र शासनाने ३३ टक्केवरून ५० टक्के आरक्षण देणे तत्त्वता मान्य केले आहे. त्यांना आरक्षण देणे गरजेचे आहे. स्त्रीला आपला संसार सांभाळून समाजसेवा करण्यासाठी राजकारण हे माध्यम मिळालेले आहे. स्त्री म्हणून तिच्यावर मेहरबानी दाखविण्याची प्रवृत्ती पुरूषी राजकारणाने स्वीकारल्याने अनेक वाईट प्रसंग स्त्रियांवर येत आहेत. सभोवतालचे लोक आणि नातेवाईक राजकारण करणाऱ्या स्त्रियांना दोषी ठरवतात. तरूण स्त्री राजकारणात प्रवेश घेत असतानाच तिच्या चारित्र्यावर नजर ठेवून असतात. अनेक स्त्रियांचा संसार राजकारणामुळे दुरावस्थ झालेला आहे. राजकारण करणाऱ्या

स्त्रियांचे प्रश्न गंभीर स्वरूपाचे निर्माण होत आहेत. थोडक्यात राजकीय क्षेत्रात सुशिक्षित स्त्रियांचा भरणा अधिक आढळतो. ज्या कार्यालयात स्त्री नोकरी करते त्याच कार्यालयातील नोकरी करणाऱ्या पुरूषाकडून निंदा व टिंगल सहन करावी लागते. यातून अनेक प्रश्न निर्माण होतात.

**आर्थिक क्षेत्र :**

उदरनिर्वाहाची तरतूद करण्यासाठी स्त्रियांना आर्थिक उत्पादन क्षेत्रात प्रवेश करावा लागला हे आपणास विसरता येणार नाही. प्राचीन अर्थव्यवस्थेत अडकून पडलेल्या स्त्रिला गरजा वाढल्यामुळे स्त्रीला नोकरी करणे भाग पडले.

महागाईचा भस्मासुर एखाद्या पुरूषाच्या उत्पन्नाला आव्हान देऊ लागल्याने आर्थिक ओढाताण सुरू झालेली आहे. शेती व्यवसायावर अवलंबून असणारे धंदे आता बंद पडलेले आहेत. जमिनीचे लहान लहान तुकडे पडल्याने उत्पादन कमी होऊन पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अनेक कुटुंबे शहराकडे स्थलांतरित होत आहेत व काम न मिळाल्यास उपाशी राहत आहेत. म्हणजेच एका प्रश्नातून अनेक प्रश्न उद्‌भवत आहेत. एका पुरूषाच्या उत्पन्नावर गरजा भागविता येत नाहीत. हे निश्चित झाल्यावरच स्त्रिया उत्पादन क्रियेत भाग घेण्यासाठी नोकरीच्या मार्गाला लागलेल्या आहेत.

ग्रामीण भागात मजुरी करणाऱ्या स्त्रीला आपले काम खंडित होऊ नये म्हणून काम देणाऱ्या पुरूषाला आपले शील दान द्यावे लागते. ही स्थिती इतकी भयानक आहे की, त्याचा विचार न करणेच बरे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हालसुद्धा काही चांगले नाहीत. संस्था, चालक, अधिकारी, सहकारी या सर्वांबरोबर वागताना स्त्रिला स्वतःचे संरक्षण करताना भयानक त्रास होत असतो. एवढे करूनही स्त्रिया चारित्र्य संरक्षणास असमर्थ ठरतात. स्त्रियांचा मानसिक अपमान सहन करताना निर्माण होणाऱ्या समस्यांची साखळी सतत लांबतच आहे. अशा अनेक आर्थिक समस्या आधुनिक स्त्रिस भेडसावीत आहेत.

**५) कौटुंबिक क्षेत्र :**

आधुनिक काळातील कुटुंबाचे झालेले विघटन लक्षात घेता स्त्रियांचे प्रश्न किती व्यापक बनलेले आहेत हे आपल्याला सहजपणे समजते. बदलत्या समाज व्यवस्थेत कुटुंबाचे अस्तित्वच धोक्यात आलेले आहे. भारतातील अविभक्त कुटुंबाच्या विघटनाची प्रक्रिया केव्हाच सुरू झालेली आहे. व्यक्तिवादी दृष्टिकोन निर्माण झाल्यामुळे स्त्रीचे माहेरचे संबंध दुरावत आहे. भावाचा पाठिंबा शब्दापुरताच शिल्लक आहे. स्त्रीचे माता-पिता जिवंत असेपर्यंतच आत्मीयता राहते व नंतर ती आत्मीयता कमी कमी होत जाते. अभक्त कुटुंब नाहीसे होत असल्याने संसाराची प्रत्यक्ष जबाबदारी स्वतःवरच येऊन पडते. पतीचे किंवा पत्नीचे अकाली निधन झाल्यास मुले बेवारशी होतात किंवा त्या मुलांना एकटे जीवन जगावे लागते. वृद्धावस्थेत जवळचे नातेवाईक त्यांना सांभाळीत नाहीत. एकंदरीत स्त्रीच्या जीवनात कमालीचा एकांगीपणा निर्माण होऊ लागला आहे. थोडक्यात व्यापक क्षेत्र उपलब्ध होऊनसुद्धा स्त्रीचे कुटुंब जेव्हा विघटित होते तेव्हा स्त्रीसमोर असंख्य समस्या निर्माण होत असतात.

वरील प्रकारच्या सर्व क्षेत्रांत स्त्रियांचे विभिन्न प्रश्न निर्माण झालेले आहेत. दिवसेंदिवस स्त्रियांचे प्रश्न जटिल स्वरूपाचे बनत आहेत. स्त्री ज्या क्षेत्रात प्रवेश करते त्या क्षेत्रात अनेक समस्या उद्‌भवलेल्या आढळतात. याचाच अर्थ असा आहे की, भारतात प्रामुख्याने भारतीय स्त्रियांचे प्रश्न पुरूषांच्या प्रश्नापेक्षा वेगळे असतात.

## ५.४ स्त्रियांच्या काही समस्यांचा आढावा

### १) हुंडा समस्या :

भारतीय समाजात प्राचीन काळापासून हुंड्याची प्रथा चालू आहे. प्राचीन काळी विवाहप्रसंगी मुलीच्या आई-वडिलांकडून सासरी जाणाऱ्या मुलीस प्रेमाची भेट वस्तू मालमत्ता दिली जात असे. त्या सर्व वस्तूवर मुलीचा अधिकार होता. यास स्त्रीधन असेही म्हटले जात असे. या मालमत्तेचा उपयोग स्त्रीच्या इच्छेनुसारच होत असे. ही प्रथा प्रामुख्याने श्रीमंत कुटुंबानेच सुरूवात केलेली होती. हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने अपराध आहे. कारण तो शुद्ध स्वरूपाचा आर्थिक व्यवहार आहे. हुंड्यास गोंडस स्वरूपाचे दुसरे नाव 'वरदक्षिणा' असे आहे. ही पद्धत अत्यंत क्रूर आणि कनिष्ठ स्वरूपाची होती. भारतात हुंड्यासाठी कोणताही धर्म, पंथ आणि जात अपवाद नाही. गरीब कुटुंबातील व्यक्तीसुद्धा हुंड्याशिवाय बोलायला तयार नसतात.

वर मुलगा कमवता असो किंवा नसो, सुशिक्षित असो किंवा नसो, अगोदर हुंड्याची रक्कम निश्चित करण्यात येते. आता हुंडा ही सर्व समाजात प्रचलित प्रथा होऊन बसलेली आहे. मुलगी सुंदर किंवा रूपवान असली तरी हुंडा, तसेच स्त्री कुरूप असली तरी हुंडा इतकी वाईट अवस्था सांप्रत समाजात आढळून येते. हुंडा विवाहाच्या वेळी वराला त्याच्या पत्नीकडून व तिच्या नातलगांकडून मिळणारी मालमत्ता ज्यात सोने, चांदी व जमीन इत्यादींचा समावेश झालेला असतो.

आधुनिक समाजात हुंड्याची समस्या तीव्र बनत आहे. दररोजच्या वर्तमानपत्रात, मासिकात, पाक्षिकात, स्थानिक दैनिकात हुंड्याबद्दल अनेक बातम्या आपणास वाचावयास मिळतात. हुंड्यांमुळे आत्महत्या, खून, मारामारी इत्यादी अनेक वाईट प्रकार घडताना आपल्याला दिसतात. नववधूची आत्महत्या याचे आपण जर सत्य विश्लेषण केले तर त्या घटनेच्या मुळाशी हुंडा हे कारण आढळते. म्हणून हुंडा ही एक भारतीय समाजातील गंभीर समस्या आहे. या समस्येचे एक आश्चर्य म्हणजे सुशिक्षित मुलीमध्ये विचार कमी व भावना अधिक आहेत. त्यामुळे भावनेच्या आहारी जाऊन केलेली आत्महत्या म्हणजे एक नवीनच प्रश्न निर्माण होत आहे. म्हणून सांप्रत अवस्थेला तोंड देत असताना आपणास हुंडा समस्येची उकल करणे गरजेचे आहे.

हुंडा समस्येचा नेमका अर्थ मॅक्सरॉडीनच्या मते, ''हुंडा म्हणजे विवाहाच्या वेळी वराला त्याच्या पत्नीकडून मिळालेली संपत्ती मानली जाते.'' इ.स. १९६१ च्या हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार हुंडा म्हणजे ''कोणत्याही एका पक्षाने लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर दिलेली किंवा देण्याची मान्य केलेली कोणतीही मालमत्ता व मौल्यवान वस्तू होय. हुंडा समस्येत धार्मिक प्रथा, आंतरविवाहाचा नियम,स्त्रीसाठी विवाहाची अनिवार्यता, प्रतिष्ठेची कल्पना, नुकसान भरपाईचे तत्त्व, नवीन संसाराची मांडणी अशा प्रकारे हुंड्याची समस्या एकाच कारणातून निर्माण झालेली नसून अनेक कारणांचा तो एक परिपाक आहे. हे मात्र निश्चित. पण त्याचे अमुक दुष्परिणाम समाजावर उमटलेले दिसतात. त्यामुळे कर्जबाजारीपणा, मानसिक त्रास, शारीरिक त्रास, विजोड विवाह, विवाहाचे बाजारीकरण, घटस्फोट, आत्महत्या, वेश्यावृत्ती असे अनेक परिणाम आपणास दिसतात.

### हुंडा समस्येवरील उपाययोजना :

हुंडा समस्येच्या कारणांचा आणि परिणामांचा विचार करता ही समस्या सोडविणे आवश्यक आणि गरजेचे आहे. त्या साठी जर सामाजिक आंदोलने झाली. हुंडा प्रतिबंधक कायदा चोख

अंमलबजावणी झाली. लोकजागृती निर्माण केली व पैशापेक्षा गुणाला जास्त किंमत दिली आणि स्त्रीमुक्ती आंदोलनाची गती तीव्र केली तर वरील हुंडा समस्या कमी करण्यासाठी उपाय सांगता येतील. भारतात हुड्याच्या प्रश्नावरून बरेच विवाह जुळविता येत नाहीत. हुंडा हा केवळ आर्थिक स्वरूपाचा असल्याने सर्वसामान्य कुटुंबाची अडचण बनते. हुंड्याचा मार्ग केवळ श्रीमंताचा अविभाज्य घटक आहे. परंतु गरीब कुटुंबाची फार मोठी अडचण आहे. या प्रश्नावर समाजातील सर्वांनीच विचार करणे आवश्यक आहे.

**बालविवाहाची समस्या :**

भारतीय समाजात स्त्रियांच्या समस्यांचा विचार करताना जे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यातील बालविवाह हा एक गंभीर प्रश्न आहे. वास्तविक पाहता हुंडा पद्धतीमुळेच भारतीय समाजात बालविवाह निर्माण झालेला आहे. इतकेच नाही तर भारतात मुले व मुली जन्मास येण्याच्या अगोदरच गर्भवतीच्या पोटास कुंकू लावण्याची प्रथा प्रचलित होती. यावरून आपल्या लक्षात येईल की, भारतीय लोकांची बालविवाहाची समस्या स्वतः होऊनच निर्माण केलेली होती.

मुलगा किंवा मुलगी विवाहाला योग्य होण्यापूर्वीच त्यांचा विवाह करणे म्हणजे बालविवाह करणे होय. प्रचलित कायद्यानुसार एकवीस वर्षाखालील मुलगा व अठरा वर्षाखालील मुलीचा विवाह बालविवाह मानला जातो. परंतु याचा विचार कोणीही केलेला नाही व पुढे पुढे या विवाहाचे स्वरूप इतके विकृत बनले की तो एक गंभीर प्रश्नच निर्माण झाला. आजही उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार इत्यादी राज्यांत बालविवाह होताना आढळतात.

भारतात ब्रिटिश राजवट असतानाच बालविवाहास कायद्याने बंदी घातली होती. नंतरच्या भारत सरकाने ही बालविवाह प्रतिबंधक कायदा केला तरी पण राजस्थानातील हिंन्दू समाजात बऱ्याच प्रमाणात बालविवाह अद्यापही होत असल्याचे दिसून येते. भारत हा कायदा सोडणाऱ्याचा देश आहे असे वर्णन एका पाश्चिमात्य पत्रकाराने केले होते. त्यांच्या या निवेदनाची खरोखरच सत्यता पटल्यावाचून राहत नाही. राजस्थानात जवळपास सामूहिक बालविवाह केले जातात. तेथे त्याला 'अरवाताज' असे म्हटले जाते. २० एप्रिल १९९० रोजी राजस्थानात 'अरवाताज' झाला या दिवशी जवळपास एक लाख मुलांचे विवाह संपन्न झाले. असे विवाह होऊ नये म्हणून तेथील जनवादी महिला समिती या संघटनेने गेल्या सहा वर्षापासून निदर्शने चालविली आहेत. तथापि हा विरोध न जुमानता बालविवाह सुरूच आहेत. याचा अर्थ एवढाच आहे की, राजस्थानातील बालविवाह एक फार मोठी आपत्ती आहे. आपण या ठिकाणी फक्त राजस्थानातील बालविवाह परिस्थिती नमूद केलेली आहे.

बालविवाह ही एक समस्या आहे. हे आपण मान्य केल्यावरच त्या समस्येची कारणे पाहणे योग्य होईल. खरे तर अनेक कारणे आहेत. त्यात प्रामुख्याने धार्मिक कारणे, जाती आंतरविवाह, आर्थिक कारणे, संयुक्त कुटुंबाचा प्रभाव, चारित्र्याचे संरक्षण, प्रतिष्ठेचे लक्षण, अशा विविध कारणाने बालविवाह प्रथा रूढ झाली असावी.

**बालविवाहाचे परिणाम :**

विजोड विवाहाचे वाढते प्रमाण स्वास्थ्यासाठी अयोग्य, बालविधवाचे वाढते प्रमाण लोकसंख्येत भर व्यक्तिविकासात अडथळे अशा विविध परिणामांचा विचार करता बालविवाह भारतीय समाजाला पुढे न नेता अजून शंभर वर्षे मागे नेण्यासाठी कारणीभूत ठरतो, असे आपणास म्हणावे लागते.

जर बालविवाहाचे निर्मूलन करायचे असेल तर भारतात सामाजिक चळवळी उभ्या कराव्या लागतील आणि कायदेशीर तरतूद करून शिक्षणाचा प्रभाव आणि स्त्रियांमध्ये प्रसार झाला पाहिजे खरे तर बालविवाह कालबाह्य ठरलेले आहेत. बालविवाहासाठी प्रभावी उपाय म्हणजे आपण आपल्यातील अज्ञान, रूढी, परंपरा, धर्मांधता टाकून दिली पाहिजे नागरिकांनी परस्परांच्या सहकार्याने या समस्येविरूद्ध आवाज उठविला पाहिजे.

## ५.५ नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या

या प्रकरणात आपण स्त्रियांच्या अनेक समस्यांचा विचार केलेला आहे. भारतात स्वातंत्र्यानंतर स्त्रियांच्या विकासाचा विचार करण्यात आला. नवीन कायद्याच्या प्रभावाने शासकीय कार्यालयात स्त्रियांना नोकरीची संधी प्राप्त झाली. परंतु त्यात अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्येचे वर्गीकरण करणे एक कठीण काम होऊन बसे. स्त्रियांना ग्रामीण व नागरी दोन्हीही समुदायात नोकरी करावी लागली व त्यात असंख्य प्रश्न निर्माण झाले. कोणत्याही समाजाची प्रगती करणे म्हणजे त्याचा विकास करणे होय.

भारतीय समाजाचे चित्रण स्त्रियांच्या संदर्भात वेगळ्या स्वरूपाचे होते. प्रथमतः  निरक्षर स्त्रियांना अगोदर साक्षर करून त्यांना शिक्षणाची माहिती देण्यात आली नंतर मॅट्रीक व पुढील पदवी शिक्षण देण्यात आले. आधुनिक काळात मुलीचे बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्यात आले. याचा परिणाम असा झाला की, सुशिक्षित स्त्रियांच्या संख्येत वाढ झाली. शासनाच्या नियमाप्रमाणे नोकरीत स्त्रियांसाठी आरक्षणही ठेवण्यात आले. शहरात नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी शहर वाहतूक सेवा उपलब्ध करण्यात आली. सांप्रत अवस्थेत आपणास रस्त्याने जाता-येता किंवा एखाद्या कार्यालयात स्त्रियांची संख्या आढळते. बँका, तहसील, पंचायत समिती, विद्युत मंडळाचे कार्यालय, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ इत्यादी ठिकाणी पुरूषांबरोबर नोकरी करणाऱ्या स्त्रियाही आपणास नोकरी करताना आढळतात. जोपर्यंत स्त्रिया अडाणी व निरक्षर राहिल्या तोपर्यंत स्त्रियांचे प्रश्न कमी होते, परंतु जेव्हा स्त्रिया पदवी व पदव्युत्तर शिक्षण प्राप्त केल्यानंतर स्त्रियांच्या समस्येचे फक्त प्रकार बदलत गेले. गुंतागुंतीचा समाज निर्माण होत गेला व त्याच प्रमाणात स्त्रियांचे प्रश्नदेखील गुंतागुंतीचे बनत गेले. स्त्रियांच्या प्रश्नाचे दोन प्रमुख विभागांत विभाजन झाले. म्हणून स्त्रियांचे प्रश्न ग्रामीण समुदायात व नागरी समुदायात वेगवेगळे होते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे सामाजिक प्रश्न ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांपेक्षा गंभीर स्वरूपाचे होते. त्या सर्व प्रश्नांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा जो महत्त्वाचा प्रश्न आहे तो म्हणजे आपल्या मुलांच्या शिक्षणाचा म्हणजेच चांगले शिक्षण. चांगली शाळाच देऊ शकते. भारतात कित्येक खेडे असे आहेत की, त्या खेड्यात शाळाच नाहीत आणि ज्या खेड्यात शाळा आहेत त्या ठिकाणी शिक्षकच नसतात. हा सर्व अडथळा खेड्यात असतो. जी स्त्री खेड्यात नोकरी करते तिच्या लहान मुलांना शिक्षणापासून दूर राहावे लागते म्हणजे शिक्षण मिळू शकत नाही. म्हणूनच नोकरी करणारी स्त्री खेड्यातून शहराकडे जाण्याचा आटोकाट प्रयत्न करते. एखादी स्त्री स्वतःच जर शिक्षिका असेल तरी तिची इच्छा असते की आपला मुलगा किंवा मुलगीने शहरात शिक्षण घेतले पाहिजे. त्या शिवाय योग्य व चांगले शिक्षण मिळणार नाही. म्हणून स्त्री नोकरी करताना तिच्यापुढे फक्त शहरातील शिक्षणच चांगले असे मत निर्माण होते. म्हणून स्त्रिच्या मुलांचा शैक्षणिक प्रश्न निर्माण होताना दिसून येतो.

ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या स्त्रीयांसमोर सर्वात वाईट स्वरूपाची समस्या म्हणजे गावातील राजकारण व राजकीय पुढारी हे आहे. राजकारण वापर करून गावातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कसा त्रास देता येईल याचे नियोजन त्यांच्याकडे असते. एखाद्या शिक्षिकेचे चारित्र्यहनन कसे नाहीसे करता येईल याचा विचार गावातील राजकीय पुढारी करतात. यात प्रामुख्याने गावातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, सोसायटी चेअरमन व इतर श्रीमंत शेतकरी यांचा समावेश असतो. नोकरी करणाऱ्या स्त्रीची अब्रू सांभाळणे कठीण असते. गावातील काही रिकामटेकडे माणसे अशाच प्रकारचे उद्योग करीत असतात. या सर्व लोकांकडून त्रासली जाणारी स्त्री केव्हा केव्हा स्वत:लाच संपवून टाकते.

वरील प्रकारे नोकरी करणाऱ्या स्त्रीचे प्रश्न दिवसेंदिवस वाढतच आहेत. खेड्यातील आर्थिक प्रश्नाबरोबर सामाजिक, राजकीय गुंतागुंत वाढत चाललेली आहे. एक विचार मात्र आपणास मान्य करावा लागतो. खेड्यात स्त्रियांनी नोकरी करणे अत्यंत अवघड झालेले आहे.

आतापर्यंत आपण खेड्यात नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या यांचा आढावा घेतलेला आहे. आता आपण शहरातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या  प्रश्नांचा आढावा घेऊ.

## ५.६ शहरी भागातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या (Problem of Working Woman in Urban Area)

१) नागरी समुदायात नोकरी करणारी स्त्री चूल व मूल यापासून फार दूर गेलेली आहे. नोकरी करणारी स्त्री ही स्वतंत्र आहे. तिच्यावर कोणतेही बंधने नाहीत. ती चार भिंतीच्या आत नाही हे खरे असले तरी शहरातील नोकरी स्वीकारल्यानंतर तिच्यासमोर अनेक प्रश्न उभे राहिलेले आहेत हे आपणास नाकारता येत नाही.

डॉ लोहिया म्हणतात, ''विवाह आणि स्त्री-पुरूष संबंध या बाबतीत भारतीय मन अगदी गलिच्छ आहे.'' या  विधानातच स्त्रियांबद्दल अनेक प्रश्न मनात निर्माण होतात.'' शहरी नोकरी करणाऱ्या स्त्रीला राहण्याची निवासस्थानाची व्यवस्था असली तरी ऑफीस आणि घर यातील अंतर अधिक आहे. दररोज दहा ते पंधरा किलोमीटरचा प्रवास त्यांना करावा लागतो. एकंदरीत धकाधकीचे जीवन जगावे लागते. शहरातील नोकरी करताना पती-पत्नी एकाच कार्यालयात नसतात. त्या दोघांच्या कार्यालयातील  अंतरही अधिक असते यातूनच अनेक कौटुंबिक समस्या निर्माण होतात.

२) शहरात नोकरी करणारी स्त्री अबला नसून सबला आहे, परंतु नोकरी करणाऱ्या स्त्रियांना आता आरक्षणाची गरज नसून संरक्षणाची गरज आहे. स्त्री म्हटले की एक सुंदर, नाजूक, ममतेने ओतप्रोत भरलेली मूर्ती आपल्या नजरेसमोर येते. नोकरी करणारी स्त्री मनाने, बुद्धीने सुंदर असणारी स्त्री कुणालाही भावते. स्त्रिला शक्तीचे रूपही मानले गेले आपल्या भारतात स्त्रीची पूजा केली जाते व दुसरीकडे पायातली वहाण पायातच असावी असेही म्हटले जाते. म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रीला पुरूषांची निंदा सहन करावी लागते. हा एक मानसिक प्रश्न नोकरी करणाऱ्या स्त्रियांसमोर उभा असतो.

३) नोकरी करणाऱ्या शहरातील स्त्रियांसमोर एक कौटुंबिक समस्या निर्माण होते. स्त्री कुटुंबातील मुलाबाळांना सांभाळण्यासाठी पूर्णवेळ देऊ शकत नाही. मग कुटुंबात पती-पत्नीत बेबनाव निर्माण होतो. स्त्रीला जगन्माता असंही संबोधलं जात असलं तरी त्याच स्त्रीला पैशाच्या हव्यासापायी

संशयावरून मूल होत नसल्या कारणावरून तिला त्रास दिला जातो. नोकरी करण्यावरूनही संघर्ष होतात. सारांश, स्त्रीला कळसूत्री बाहुलीसारखं कार्यालयात व घरी वागविले जाते. अशा प्रकारे कौटुंबिक समस्यांना क्षणोक्षणी नोकरी करणाऱ्या स्त्रियांना तोंड द्यावे लागते.

४) नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रीचं जीवन अतिशय गतिमान झालेलं आहे. वेळ आणि काम यांचं गणित मांडणं स्त्रीला अवघड जात आहे. अशा या महिलांना रोजच्या जीवनातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना त्रैधातिरपीट होत आहे. शहरात शिक्षणाची सोय असताना आपल्या मुलांना शाळेत नेऊन सोडता येत नाही. शहरातील स्त्री-पुरूषांच्या गरजाही अनेक आहेत. आर्थिक अडचण दूर व्हावी म्हणून स्त्रिया नोकरी स्वीकारतात, परंतु केव्हा केव्हा असाही अनुभव येतो की, नोकरीचे वेतन कमी व मानसिक त्रास जास्त अशी अवस्था शहरातील नोकरी करणाऱ्या स्त्रीची निर्माण झाली आहे.

५) नोकरी करणाऱ्या स्त्रियांसमोर वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक इत्यादी समस्या निर्माण झाल्याने शहरातही नोकरदार स्त्रियांची कोंडी झालेली आहे. आधुनिक स्त्रियांची महत्त्वाकांक्षाही वाढू लागली. शिक्षण घेऊन पदवीधर व्हावे. नोकरी करावी, नोकरीचा पति मिळावा. बंगला, कार असावी. त्यामुळे या सोयीबरोबरच अनेक प्रश्नही निर्माण होत आहेत. जबर महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या या स्त्रियांचा संसार अत्यंत चांगला चालतोच असे नाही, यांच्या संसारात चढ-उतार नेहमीच चालतात. पती व मुले यांच्या बरोबर निर्माण होणारे मतभेद व समाजातील स्त्रीपुरूषांबरोबर आलेले चांगले वाईट अनुभव स्त्रीला प्रचंड प्रमाणात वेदना निर्माण करीत असतात. स्त्रीच्या महत्त्वाकांक्षेचे झपाटलेल्या अनेक स्त्रियांना संसाराचा झालेला स्फोट स्वतःच्याच डोळ्यांनी पाहावा लागतो. महत्त्वाकांक्षा बाळगताना पुरुषप्रधान समाज स्त्रिला महत्त्वाकांक्षापूर्ण प्राप्त करून देऊ शकत नाही. याचाच परिणाम वाईट होतो. विविध क्षेत्रांत असंख्य पुरुषरूपी लांडगे स्त्रीयांच्या चारित्र्याचा बळी घेतात.

एकंदरीत नागरी भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांना वाईट सामाजिक परिस्थिती निर्माण होते व शेवटी नोकरी करणाऱ्या स्त्रीचे अस्तित्वच धोक्यात येते. अशा प्रकारे शहरी नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या अनेक अडचणी आपणास मांडता येतात.

## ५.७ स्त्रियांच्या समस्येवरील उपाय

भारतीय समाजातील प्रगती सुरू झाल्यापासून धर्म, नीतिमत्ता, रूढी, परंपरा, आचार विचार व कायदा या सर्वांना समाज जीवनाच्या दृष्टीने महत्त्व देण्यास सुरूवात झाली. निकोप सामाजिक जीवन असावे म्हणून अनेक उपाययोजना आखण्यात आल्या.

स्त्रियांच्या समस्यांची निर्मिती विविध प्रकारच्या सामाजिक संस्थांनी अभ्यासासाठी स्वतःकडे घेतलेली आहे. स्त्रीकडे पाहताना पुरूषाच्या वृत्तीचा विचार करणे गरजेचे आहे. मुलगा आणि मुलगी यांना समाज पातळीवरून पाहण्यास सुरूवात केल्यास स्त्रियांच्या समस्या तीव्र बनणार नाहीत. पितृसत्ताक कुटुंबाचे महत्त्व कमी करून स्त्री व पुरुषांना समान संधी देऊन दोघांकडेही कुटुंबाचा कार्यभार सुपूर्द केला व मुलाचे आत्यंतिक महत्त्व कमी करून मुलींच्या बरोबरी आणले गेले तर स्त्रीवर अन्याय होणार नाही. स्त्रीवर अन्याय करणार नाही अशी भूमिका पुरूषाने स्वीकारली तर स्त्री समस्या कमी होतात.

भारत देश स्वतंत्र व समतेवर आधारलेली लोकशाही समाजव्यवस्था निर्माण करण्याचे मोठे आव्हान आपण स्वीकारले. स्वातंत्र्याला आता पन्नास वर्षे पूर्ण होत असली तरी गरिबी व विषमता दूर करता आलेली नाही. लोकशाहीत स्त्रियांना आपण सामावून घेतले तर स्त्रियांच्या समस्या लवकर सुटतील.

आज ग्रामपंचायतीच्या स्वरूपात आपण स्थानिक स्वराज्य संस्थांची उभारणी केली. अलीकडेच घटनेच्या ७३ व्या दुरूस्तीनुसार पंचायती व्यवस्थेत १/३ जागा स्त्रियांसाठी आरक्षित केल्या गेल्या. तसेच तीस टक्के महिला ग्रामपंचायतीच्या सदस्या होत आहेत. जिल्हा परिषदा, महानगरपालिका इत्यादी स्थानिक पातळीवरील व्यवस्थांमध्ये महिलांना १/३ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

स्त्रियांना समान शिक्षण देऊन त्यांना समान नोकऱ्या उपलब्ध करून दिल्यास स्त्रियांचे प्रश्न सौम्य बनतील. स्त्रियांना समान शिक्षण देणारे जगातील पहिले दहा देश कोणते हे सांगावयाचे झाल्यास आपणास त्यांची यादी देता येईल. फ्रान्स, कॅनडा , फिनलंड, नॉर्वे, बेल्जियम, अमेरिका, नेदरलॅड, स्वीडन, डेन्मार्क, इत्यादी.

स्त्रियांना शिक्षणाची अत्यंत वाईट अवस्था असणारे जगातील दहा देश पुढील यादीवरून लक्षात येतील. चाड, गुईनिया, येमेन, अफगाणिस्तान, माली, निगेर, पाकिस्तान, बेनीन, बुर्किनाफासो, सेंट्रल आफ्रिक, रिपब्लिक इत्यादी (वरील दोन्ही प्रकारची विवेचन पॉप्युलेशन ॲक्शन इंटरनॅशनल गर्ल्स १९९४ च्या धारानेच केलेला आहे.

आधुनिक काळात स्त्रियांबद्दल केलेल्या कायद्याची अंमलबजावणी केल्यास स्त्रियांच्या समस्या निर्माण होणार नाहीत. सतीप्रथा, बालविवाह प्रथा, हुंडा प्रथा, इत्यादींना वेळेवर निर्बंध घातल्यास स्त्री समस्येला आळा घातला येईल. भारतातील स्त्रियांचे प्रश्न, दारिद्र्य, गरीबी कमी करता आली तर स्त्रियांचे ग्रामीण व नागरी कोणतेही प्रश्न उद्‌भवणार नाहीत.

अशाप्रकारे स्त्रियांच्या समस्येवर उपाययोजना करता येईल.

## ५.५ स्वाध्याय

१. स्त्रियांच्या समस्येचे स्वरूप स्पष्ट करा.

२. स्त्रियांच्या समस्यांना जबाबदार असलेले घटक स्पष्ट करा.

३. स्त्रियांच्या समस्यांची व्याप्ती सांगा.

४. हुंडा समस्येच्या निर्मूलनार्थ केलेले उपाय सांगा.

५. बालविवाहाचे दुष्परिणाम सांगा.

५. नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या समस्या सांगा.

७. स्त्रियांच्या समस्येवरील उपाय स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# ६

# ग्रामीण संस्थात्मक व्यवस्था
# (धर्म -संकल्पना- स्वरूप -कार्य -बदलते स्वरूप)

**पाठाची रूपरेषा**

६.० पाठाचे उद्देश

६.१ प्रास्ताविक

६.२ धर्माचा अर्थ

६.३ धर्माची व्याख्या

६.४ धर्माबाबत मूलभूत बाबी - वैशिष्ट्ये

६.५ धर्माची भूमिका व कार्य

६.६ स्वाध्याय

## ६.० पाठाचे उद्देश

- धर्म संकल्पना समजावून घेणे.
- धर्माच्या व्याख्या अभ्यासणे.
- धर्माची भूमिका व कार्य अभ्यासणे.

## ६.१ प्रास्ताविक

मनुष्य हा संस्कृतीच्या आधारे जीवन व्यतीत करणारा प्राणी आहे. मानवशास्त्रज्ञ ह्या संस्कृतीचे स्थूलमानाने दोन भाग पडतात. भौतिक व अभौतिक संस्कृती हे ते दोन भाग होत. पैकी जी अभौतिक संस्कृती म्हणून ओळखली जाते तीत मनुष्याचे तत्त्वज्ञान, वाड्.मय व काव्य त्यांच्या नीतिमत्ताविषयक कल्पना, त्यांचा धर्म इत्यादींचा समावेश होतो. भौतिक व अभौतिक संस्कृती हे संस्कृतीचे दोन भाग परस्परांशी संबंधित असतात आणि ह्या न्यायानुसार धर्माचा भौतिक संस्कृतीवर प्रभाव पडतो. धर्माचा विचर करताना ह्या महत्त्वाच्या गोष्टीची आपल्याला सदैव जाणीव ठेवावयास हवी.

दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, मनुष्याच्या जीवनात प्रतीकांनाही महत्त्व असते. मनुष्याला भाषा अवगत असल्याने बरेचसे व्यवहार माणसे प्रतीकांद्वारे करतात. काही प्रतीके इंद्रिय गोचर असतात. तर काही तशी नसतात. उदाहरणार्थ, 'घोंडा' हा शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यासमोर घोडा येतो. कारण आपण तो पाहिलेला असतो. परंतु काही शब्द प्रतीकात्मक असूनही इंद्रिय-गोचर

नसतात. जसे पाप-पुण्य, पवित्र-अपवित्र, स्वर्ग-नरक, ऐहिक-पारलौकिक ह्या सारख्या मनुष्याच्या समाजात आढळणाऱ्या अमूर्त कल्पना व ह्या कल्पनांशी निगडित असलेल्या अभिवृत्ती इंद्रिय- गोचर नसतात. परंतु माणसांच्या जीवनातील वेगवेगळे व्यवहार आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ह्यावर चांगलाच प्रभाव पडतो.

ह्या कल्पना समाजात नेमके कोणते कार्य करतात ह्याचे थोडक्यात उत्तर असे की, माणसांचा आणि माणसांच्या ऐहिक जीवनातील घडामोडींना कोणत्या तरी अतिलौकिक व अतिनैसर्गिक शक्तीशी संबंध जोडण्याचे कार्य त्या करतात. ह्या संबंधाभोवती वेगवेगळ्या प्रकारचे विश्वास, श्रद्धा, पूजा-पाठ, प्रार्थना, यज्ञ, इ. विधी ह्यांचे जाळे विणले जाते. ह्यालाच धर्मसंस्था असे नाव दिले जाते.

जगाच्या पाठीवरील सर्व मानव समाजात आपल्याला धर्मसंस्था आढळते. तिचे स्वरूप मात्र सर्वत्र सारखे नसते. दुसरी गोष्ट अशी की, धर्मसंस्था जशी सार्वत्रिक असते. तशीच ती कायमच्या स्वरूपाची असते. म्हणजेच मानवी समाजातून तिचे समूळ उच्चाटन होणे शक्य नसते. माणसांच्या जीवनातील बऱ्याचशा व्यवहारांवर धर्मसंस्थेचा जबरदस्त पगडा असतो आणि कोणत्याही समाजाचे पूर्णत्वाने ज्ञान होण्यासाठी त्या समाजातील धर्मसंस्थेची रचना व कार्य यांचा अभ्यास अपरिहार्य ठरतो.

धर्म हा मनुष्याचा आणि त्याच्या इहलोकातील जीवनातल्या घडामोडींचा अधिभौतिक, अतिनैसर्गिक विश्वाशी व त्या विश्वातील शक्तींशी संबंध जोडतो. ह्या संबंधाविषयीचे विश्वास, श्रद्धा व तद्नुषंगाने येणारे आचरणाचे प्रकार हे माणसांच्या कल्पनांतून व अनुभवांतून साकार होतात. म्हणजेच अधिभौतिक, अतिनैसर्गिक शक्तींचे विश्व मनुष्यानेच कल्पिलेले असते.

## ६.२ धर्माचा अर्थ

लॅटिन भाषेतील Religion हा शब्द धर्म या अर्थी रूढ झाला आहे. तर हिंदूच्या संकल्पनेनुसार धर्म या शब्दाची उत्पत्ती धृ धारयति धर्मः अशी आहे. म्हणजे ज्या नियम, वर्तणूक, आचार, विचार श्रद्धा, दृष्टिकोण इत्यादींच्या योग समाजाची धारणा होते. तो धर्म होय. पण अशा प्रकारे विशिष्ट धर्माच्या संदर्भातील विवेचनावरून समग्र मानव समाजातील धर्म ही संकल्पना व संस्था याची समाजशास्त्रीय आकलन होणार नाही. त्यासाठी समाजशास्त्र, मानवशास्त्र इत्यादी क्षेत्रांतील विचारवंतांच्या विचारांचा मागोवा घेणे आवश्यक आहे. पण त्याही आधी पार्श्वभूमीच्या स्वरूपात

अ) मानवी जीवनातील अनिश्चितता, अनाकलनीयता व

ब) अलौकिक शक्ती वा प्राण्यांच्या अस्तित्वाबद्दलच्या श्रद्धा या दोन बाबी समजावून घेऊ.

### अ) मानवी जीवनातील अनिश्चितता अनाकलनीयता :

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांचे निराकरण करण्यासाठी मानवसमाज भोवतालच्या परिस्थितीशी प्रारंभापासून मिळतेजुळते घेत आला आहे. म्हणजेच पर्यावरणाशी समाजयोजन वा अनुकूलन साधत आला आहे. पण हे अनुकूलन मानवाला सहजासहजी साधता आले नाही. तसेच त्यात नेहमीच यश आले असेही नाही. मानवी जीवनात सर्वच गोष्टी, वेळेवर व अपेक्षित घडल्या नाहीत व घडत नाहीत. शेती पिकविण्यासाठी कष्ट केले तरी त्याला निसर्गाची साथ मिळाली

पाहिजे, नाही तर दुष्काळ, पूर, टोळधाड या मार्गाने श्रम वाया जातात. श्रीमंताचा गरीब होणे, गरिबाचा श्रीमंत होणे, धडधाकट माणूस मृत्युमुखी पडणे, रोगराई येणे, अचानक धनलाभ होणे, भूकंप, दुष्काळ, अपघात, शत्रूचा हल्ला, फसवणूक, विश्वासघात वगैरे पदोपदी दिसणाऱ्या गोष्टी मानवी जीवनातील अनिश्चितता दर्शवितात. यामुळे मानवाच्या गरजा पूर्ण करण्यात अडथळे येतात.

त्याचप्रमाणे जीवनातील अनेक गोष्टी मानवाला अनाकलनीयच वाटत आल्या आहेत. सावलीची हालचाल प्रतिध्वनी ऐकू येणे, मृत वा दूरचा माणूस स्वप्नात येणे. दिवस-रात्र होणे, भूकंप वादळ असा उत्पाद होणे, अचानक आजारी पडणे, जन्म, मृत्यू होणे वगैरे अनेक बाबी प्राथमिक अवस्थेतील मानव समाजास अनाकलनीय होत्या. त्यांच्यातील कार्यकारणसंबंध त्याला प्रस्थापित न करता आल्याने त्या अतर्क्य, अनाकलनीय वाटल्या. काळाच्या ओघात भूगोल, जीवशास्त्र, विज्ञान इत्यादींच्या साहाय्याने परवापर्यंत अनाकलनीय वाटणाऱ्या गोष्टींचे मानवाला आकलन झाले तरी आजही अशा अनेक घटना मानवाला अनाकलनीय वाटतात.

जीवनातील या अनिश्चित अनाकलनीय गोष्टीमुळे मानव प्रयत्नाची शर्थ करूनही हतबल ठरत आलेला आहे. त्याची जैविक व मानसिक सुरक्षा, त्याची सुखदुःखे पूर्णपणे त्याच्या हातात नाहीत याची त्याला प्रारभांपासून प्रकर्षाने होत आलेली जाणीव सार्वत्रिक आहे. तीच त्यांच्या धर्मसंस्थेची पार्श्वभूमी आहे.

**ब) अलौकिक शक्ती वा प्राण्याच्या अस्तित्वाबाबतच्या श्रद्धा :**

जीवनातील अनिश्चित, अनाकलनीय घटनांमागील कारण काय असते ? सृष्टीतील चक्रामागे कोणती शक्ती असावी. आपले सुख-दुःख, जीवन-मरण कोण नियंत्रित करीत असावे ? अशा प्रश्नांनी स्वतःशी, निसर्गाशी व इतरांशी विचारणा करता करता मानवाने त्यांचे जे उत्तर शोधून काढले ते म्हणजे अलौकिक शक्ती वा दिव्य प्राण्याचे अस्तित्व ही शास्त्रीय वस्तुस्थिती नाही, तर मानवी श्रद्धा आहे. मानवाचे सुख-दुःख, आशा-निराशा, समृद्धी-दारिद्र्य, स्थैर्य-अस्थैर्य, जीवन-मृत्यू वगैरे स्थिती या अलौकिक शक्ती वा प्राण्याच्या इच्छेचा परिणाम होय, असे मानण्यात येऊ लागले. एवढेच नव्हे तर सुख, स्वास्थ्य, समृद्धी, वैभव, आनंद प्राप्त करण्यासाठी व दुःख, दारिद्र्य अपघात, आजार संकट वगैरे टाळण्यासाठी या अलौकिक शक्तीला विशिष्ट आचरण, विधी (Rituals) करून प्रसन्न करून घेतले पाहिजे अशीही मानवाची धारणा बळकट होत गेली.

## ६.३ धर्माची व्याख्या

वरील विवेचनाच्या आधारे आपणांस असे म्हणता येईल की, जीवनातील अनपेक्षित, अनाकलनीय, दुःखदायी घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मानवाने अलौकिक शक्ती वा दिव्य प्राण्याच्या अस्तित्वावर जी श्रद्धा ठेवून विशिष्ट प्रकारच्या आचारास जीवनात स्थान दिले त्यास धर्म म्हणता येईल.

१) एडवर्ड टायलरच्या मते धर्म म्हणजे दिव्य प्राण्यावरील श्रद्धा होय.

२) पी. गिल्बर्ट यांच्या मते, धर्म म्हणजे मानवाचे अलौकिक प्राण्याशी असलेले संबंध व त्यावरील अवलंबन होय.

३) सर जेम्स फ्रेझर यांच्या मते ''मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्तीची आराधना म्हणजे धर्म होय. या शक्ती मानवी जीवन निसर्गक्रम निर्देशित व नियंत्रित करतात'', अशी मानवाची श्रद्धा असते.

४) एमिल डरखीम यांनी 'धर्म म्हणजे पवित्र वस्तूशी संबंधित श्रद्धा व आचार विधी यांची संकलित व्यवस्था होय. या श्रद्धा व आचार विधीचे संघटन चर्चसारख्या नैतिक समूहात होते.'

५) आर.एन. मुखर्जी धर्माची व्याख्या देताना म्हणतात की, धर्म म्हणजे कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या अतिमानवी किंवा अलौकिक अथवा सामाजिक शक्तीवरची श्रद्धा होय.

या श्रद्धेचा आधार, भय, पूज्यभाव आणि पावित्र्याची कल्पना असून ती प्रार्थना, पूजा, समर्पण यातून व्यक्त होत असते.

## ६.४ धर्माबाबत मूलभूत बाबी - वैशिष्ट्ये

ग्रामीण जीवनात धर्म ही एक महत्त्वाची शक्ती असून कायद्यापेक्षाही जास्त काटेकोरपणाने व कटाक्षाने धर्माचरण केले जाते. समाज संघटित करणे, सामाजिक वर्तनाला पुण्यकल्पनेची जोड देऊन समाजात शांतता नांदावी, या दृष्टीने धर्माने मोलाचे कार्य केले आहे.

**१) सार्वत्रिकता:**

समाज मग तो प्राचीन वा अर्वाचीन, अत्यंत प्राथमिक अवस्थेतील आदिवासींचा वा अत्याधुनिक प्रगत, तसेच कोणत्याही शासन पद्धतीचा असो तेथे या ना त्या स्वरूपात धर्मसंस्था आढळते.

**२) अलौकिक शक्तीच्या अस्तित्वावर श्रद्धा :**

मानवी जीवन व निसर्ग यांचे नियंत्रण करणारी असाधारण, आदी अंत नसलेली, सर्वत्र संचार करणारी व अमानवी सामर्थ्य असलेली एक अलौकिक शक्ती आहे. ही मानव समाजाची श्रद्धा धर्माचा मूलाधार आहे. अर्थात, या श्रद्धेचे स्वरूप मानव समाज व त्याची संस्कृती यानुसार वेगवेगळे आढळते. एडवर्ड टायलरने 'जीवनाचे व निसर्गाचे नियंत्रण करणारा अविनाशी स्वरूपाचा आत्मा सर्वत्र आहे' अशी आदिवासीत आढळणारी सर्वात्मवादाची (Animism) संकल्पना स्पष्ट करून आदिवासीच्या धर्मश्रद्धेचे व धार्मिक संबंधाचे स्पष्टीकरण दिले आहे. हे आदिवासी या आत्म्यालाच प्रेतात्मा, पिशाच्च, देव, भूत वगैरे म्हणतात. या आत्म्याचे वास्तव्य पशू, पक्षी, वनस्पती, तसेच निसर्गातील इतर बाबतीत असते. असेही या आदिवासींना वाटते. तर काही आदिवासींत मानव व मानवाभोवतालचे जीवन सर्व चेतन-अचेतन वस्तूत असलेल्या शक्तीमुळेच निर्धारित होत असते. अशी दृढ श्रद्धा असते. ही शक्तिवादाची (Animatism) संकल्पना मेरट, प्रिअस यांनी मांडली मॅक्स मुल्लरने निसर्गवादाची (Naturism) संकल्पना मांडून निसर्गाच्या प्रभावाने सूर्य, चंद्र, आकाश, वारा, पाऊस, जंगल, डोंगर, नदी वगैरेंना मानव अलौकिक शक्ती कसा मानू लागला, तेच त्याचे कसे देव बनले याचे विवेचन केले आहे.

प्रगत व विशाल स्वरूपाच्या समाजात ही श्रद्धा गुंतागुंतीची होत जाते. त्यामुळेच धार्मिक श्रद्धांना सुसंघटित स्वरूप देऊन धार्मिक ग्रंथातून त्याचे विवेचन केले जाते. यातूनच काही धर्म एकेश्वरवादी (Monotheists) तर काही Polytheists अशा श्रद्धा जोपासतात. काहींना ईश्वर निर्गुण, निराकार, तर काहींना सगुण, साकार वाटतो.

**३) श्रद्धेनुसार आचार विधी :**

अलौकिक शक्तीच्या स्वरूपाबाबत समाजासमाजात भिन्नता आढळली तरी तिच्या अस्तित्वाबद्दल जसा दृढ विश्वास असतो. त्याचप्रमाणे या शक्तीला शरम जाऊन तिला प्रसन्न करून घेतल्याने सुख, समृद्धी, यश, स्वास्थ्य लाभेल अशीही मानवाची दृढ श्रद्धा असते. त्यामुळे प्रत्येक धर्मात ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी त्याचा आशीर्वाद मिळविण्यासाठी कोणते धार्मिक विधी करावेत. इतरांशी कसे वागावे, पवित्र वस्तूंचे पावित्र्य कसे सांभाळावे यासाठी अनेक आचार विधी वा कर्मकांडे (Rituals) असतात. या कर्मकांडात पूजा, प्रार्थना, स्तवन, दानधर्म, बळी, होमहवन, मंत्रोच्चारण, उपास, व्रतवैकल्ये, विशिष्ट वस्तूंचाच वापर, विशिष्ट खाद्यपदार्थाचा त्याग, यांचा समावेश होतो. शिवाय धार्मिक सण, उत्सव, गाणी, नृत्य वगैरेंचाही समावेश यात केला जातो. आचारविधी, धार्मिकश्रद्धेशी सुसंगत असतात.

**४) पवित्र - अपवित्रतेचा भेद :**

एमिल डरखिम याने धर्मश्रद्धांनुसार काही वेतन व वस्तुतः पवित्र-अपवित्र असा भेद केला जातो. याचे विवेचन केले आहे. यानुसार पवित्र वस्तू बाळगणारे व पवित्र आचरण करणारे धार्मिक व प्रशंसनीय ठरतात. तर अपवित्र वस्तू बाळगणारे पवित्र वस्तूचे पावित्र्य धोक्यात आणणारे अपवित्र वर्तन करणारे अधार्मिक, धिक्काराई ठरतात. असे वर्तन पाप वा पुण्य समजले जाते. त्या बदल्यात हिंदूला मृत्यूनंतर स्वर्ग किंवा नरक, इस्लाम धर्मिया ना जन्नत किंवा जहन्नूम व ख्रिश्चनात हेवन किंवा हेल या ठिकाणी जावे लागते, अशीही त्या त्या धर्मात दृढश्रद्धा असते. एमिल डरखीम याने पवित्र-अपवित्रतेच्या संकल्पने पाठीमागील लोकांची श्रद्धा स्पष्ट केली आहे. पापाचरणामुळे व्यक्ती व समाज या दोहोंवर निश्चितच आपत्ती, अरिष्ट कोसळते व पुण्याचरणामुळे व्यक्ती व समाजास त्याची चांगली फळे मिळतात. अशी त्या समाजाची धारणा असते. अर्थातच धर्म व समाजसापेक्ष या पवित्र-अपवित्रतेच्या कल्पना बदलतात. हे ओघाने आलेच. हिंदूंना गाय पवित्र व गोमांस भक्षण हे पापाचरण आहे. तर काही धर्मीयांत गायींना मारणे व गायींचे मांस खाणे या सर्वसाधारण बाबी वाटतील.

**५) प्रतीकात्मक व उपयुक्त सांस्कृतिक लक्षणांचा समावेश :**

धर्माचे जाणीवपूर्वक प्रतिनिधित्व करण्यासाठी धर्माचरणाची जाणीव करून देण्यासाठी प्रत्येक धर्मात काही प्रतीकात्मक सांस्कृतिक लक्षणे दिसून येतात. ताईत, क्रॉस ओम, स्वस्तिक, ७८६, ही संख्या वगैरे ही विविध धर्माची सांस्कृतिक लक्षणे आहेत. त्याचप्रमाणे धर्मानुसार आचार विधी पार पाडण्यासाठी मंदिरे, मस्जिद, चर्च, गुरूद्वारा, पूजेचे साहित्य, धर्मग्रंथ वगैरे उपयुक्त सांस्कृतिक लक्षणेदेखील संबधित धर्मात दिसून येतात. आदिवासीच्या समाजामध्ये देखील कुलचिन्हांना (Totem) असेच स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

**६) आचारविधीसाठी खास प्रशिक्षित लोकांचा वर्ग :**

प्रत्येक धर्मातील धर्मविधी पार पाडले, तरच अलौकिक शक्ती प्रसन्न होणार यास्तव पुरोहित, पुजारी प्रिस्ट, मुल्लामौलवी, भगत, मांत्रिक, वगैरे लोक प्रत्येक समाजात आढळतात. त्यांनी धर्माचे समग्र आकलन करून घेतले आहे व धर्मविधीबाबत मार्गदर्शन करण्याचा त्यांना अधिकार आहे. अशी लोकांची दृढ भावना झालेली असते. प्रसंगी ही भावना इतकी टोकाची असते की असे लोकदेखील अलौकिक मानले जाऊन ते पूज्य मानले जातात व त्यांच्या वाटेला त्या आज्ञा शिरसावंद्य मानल्या जातात.

## ६.५ धर्माची भूमिका व कार्य

मानव समाजाच्या अस्तित्वासाठी मानव समाजाची जी व्यवस्था आहे त्या व्यवस्थेच्या विविध घटकांत एकात्मता टिकविणे व दृढ करण्यात धर्माला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. ऑस्ट्रेलियात अंरूटा या आदिवासी जमातीचा कार्यवादीतील दृष्टिकोणातून एमिल डरखीम याने अभ्यास करून धर्माची ही प्रधान भूमिका विशद केली आहे.

धर्म ही सामाजिक घटना असून तिचा समाजातील अन्य संस्थांशी संबंध असतो. धर्मातील श्रद्धांतून पवित्र वस्तूच्या संबंधात कोणते आचार विधी करावेत व करू नयेत याचे समूहातील लोकांना प्रभावीपणे मार्गदर्शन होते. यामुळे लोकांच्यात समान जीवनमूल्ये रूजून भावनिक एकता निर्माण होते. या भावनिक बंधामुळे एकाच धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्ती परस्परांशी जोडल्या जातात. परिणामी सामाजिक दृढत्व (Social Soildarity) आकाराला येते. समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने ही भावनिकता व सामाजिक दृढत्व अत्यंत महत्त्वाचे असते. या दृढत्वामुळे समाजातील संघटन जोपासले जाते व प्रभावीपणे टिकविले जाते. समाजाला त्याच्या विविध गरजा, कुटुंब, विवाह कुल, मालमत्ता, अर्थ, राज्य वगैरे संस्थाकडून सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सामाजिक दृढत्व निर्माण करण्याचे कार्य धर्माकडून होते. धर्म या संस्थेकडून वरील भूमिकेला पोषक अशी जी विविध कार्ये पार पाडावी लागतात ती खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) धर्म आपल्या परीने पण प्रभावीपणे भोवतालच्या अनाकलनीय अतर्क्य परिस्थितीचे स्पष्टीकरण व माहिती मानवाला देऊन त्या परिस्थितीशी मानवाचे समायोजन साधतो. हे स्पष्टीकरण व माहिती वैज्ञानिकदृष्ट्या खरी वा खोटी असेल, पण अमुक एका शक्तीमुळे अमुक गोष्ट घडते. या निव्वळ श्रद्धेमुळे तो निश्चित होतो. त्याच्या मनावरचा ताण कमी होऊन तो भोवतालच्या परिस्थितीशी समायोजन साधतो.

### २) मनःशांती व व्यक्तिमत्त्वाचे संघटन :

प्रयत्नाची पराकाष्ठा करूनही यश, सुख, समृद्धी, इच्छापूर्ती होत नाही. दुःख, दारिद्र्य, आजार, अपघात या गोष्टी टाळता येतीलच असे नाही. वृद्धत्व व मृत्यूला तर सामोरे जावेच लागते. यामुळे मानव विफल, निराश होण्याची अधिक शक्यता असते. अशा वेळी धर्मावरचा त्याचा विश्वास त्याला आशा, प्रेरणा देतो. वाईटाप्रमाणे चांगले दिवस येतील, यश मिळेल, समृद्धी लाभेल अशी मनोधारणा होते. आजारपण, अपघात, अपयश, मृत्यू याबाबतचे समर्थन व सांत्वन धर्म प्रभावीपणे करून व्यक्तिमत्त्व विघटनापासून व्यक्तीचे म्हणजेच शेवटी समाजाचे संरक्षण करतो. एवढेच नव्हे तर ऐहिक जीवनातील उद्दिष्टांचे महत्त्व बिंबवून त्यासाठी व्यक्ती व समाजाला क्रियाशील ठेवतो. निराशा, वैफल्य या बाबी व्यक्तीला समाजविरोधी बनविण्याचा दाट धोका असतो. तो धर्मामुळे टाळला जातो. व्यक्तीची मनःशाती व व्यक्तिमत्त्वाचे संघटन टिकविले जाते.

३) प्रत्येक समाजाच्या संस्कृतीनुसार त्या त्या समाजात चांगले-वाईट, योग्य-अयोग्य इष्ट, अनिष्ट अशी मूल्य व्यवस्था तयार झालेली असते. त्यातूनच त्या समाजात काही नैतिक कल्पना रूढ झालेल्या असतात. अशा बऱ्याच मूल्यांना व नैतिक कल्पनांना धर्माचा आधार मिळालेला असतो. त्यामुळे अशी जीवनमूल्य व नैतिक कल्पनांसारख्या वर्तनाचा लोक आदरयुक्त भीतीने स्वीकार करतात. त्यानुसार ते आपले आचरण ठेवतात. ही बाब समाजाचे नियंत्रण व संघटन यासाठी अत्यंत आवश्यक व महत्त्वपूर्ण आहे.

समाज नियंत्रण विषयक विविध वर्तनाचे आचरण करून समाजाचे संघटन टिकविण्यासाठी व्यक्तीवर बाह्य व आंतरिक दडपण येत असते. शासन यंत्रणा, कायदा यामुळे व्यक्तीवर सामाजिक नियमनांचे पालन करण्याचे दडपण येत असले तरी ते बाह्य दडपण असते. संधी मिळताच असे बाह्यदडपण व्यक्ती फेकू शकते. उदा. कोणी पाहात नाही, कोणाच्या लक्षात येणार नाही म्हणून व्यक्ती चोरी करण्यास प्रवृत्त होऊ शकते. पण धर्माचे दडपण हे आंतरिक दडपण असते. धर्माने पापाचरण व पुण्याचरण आणि त्यांचे परिणाम याचा ठसा व्यक्तीच्या मनावर लहानपणापासून असा बिंबवलेला असतो की, तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनलेला असतो. त्यामुळे ईश्वराचा कोप टाळणे, पुण्यसंचय करणे व स्वर्ग मोक्षाची प्राप्ती करण्यासाठी व्यक्ती नैतिक नियमांचे पालन मनोमन करते.

त्यामुळे सत्य बोलावे, चोरी करू नये, हिंसा करू नये. व्यभिचार करू नये अशा नैतिक मूल्यांचा अंतर्भाव बऱ्याच धर्मात आढळतो. याच्यावरच त्या समाजाचे स्वास्थ्य व संघटन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. तेव्हा लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्याचे धर्म हे एक प्रभावी अनौपचारिक साधन आहे. धार्मिक संस्कार झालेली व्यक्ती पोलिसाला घाबरणार नाही पण त्याची श्रद्धा असलेल्या देवाची खोटी शपथ घेण्याऐवजी आपल्या कृत्याचा जाब देईल.

**४) कल्याणकारी कार्यांना चालना:**

धर्मसंस्थेत व्यक्ती व अलौकिक शक्ती यांच्यातील संबंध कसे असावेत याचे जसे विवेचन केलेले असते. तसेच त्याने इतरांशी कसे वागावे याबद्दलही मार्गदर्शन केलेले असते. भूतदया, परोपकार, क्षमा, शांती, दया वगैरे कितीतरी उदात्त भावनांचा आविष्कार धर्मातून केलेला असतो. अशा वागण्यामुळे ईश्वर प्रसन्न होतो. असे सांगितल्याने लोक दुसऱ्याला संकटात मदत करतात. दानधर्म करतात, चुकांबद्दल क्षमा करतात, हिंसेचा त्याग करतात. संघर्षाऐवजी सहकाराची प्रक्रिया स्वीकारतात. यामुळे त्यांच्यातील समुदाय भावना वाढीस लागते. सेवाभावी वृत्तीने इतरांचे कल्याण करण्याची वृत्ती धर्माकडूनदेखील जोपासली जाते.

**५) इतर कार्ये :**

**अ) शिक्षणविषयक कार्ये :**

आज जरी शिक्षणसंस्था धर्मापासून अलग झालेली दिसून येत असली तरी प्राचीन काळापासून नव्या पिढीला किंवा जिज्ञासूला ज्ञान देण्याचे कार्य धर्माकडून होत आले. ख्रिश्चनांचे प्रार्थना मंदिर हिंदूंची मंदिरे व पाठशाळा, बौद्धांचे मठ, मशिदीजवळ असलेला मदरसा येथून शिक्षणविषयक कार्ये दीर्घकाळ होत आलेली आहेत.

**ब) मनोरंजन व कलांना उत्तेजन :**

धर्मातील श्रद्धांचा आविष्कार करण्यासाठी व विशिष्ट धार्मिक वर्तन करण्यासाठी प्रत्येक धर्माकडून लोकांचे मनोरंजनदेखील होते. धर्माच्या रूक्ष स्वरूपाचा अतिरेक कमी होण्यासाठी सण, उत्सव, जत्रा, महोत्सव, नृत्य गाणी संगीत, भजन कथा-कीर्तने वगैरेंचा वापर केला जातो. त्यामुळे लोकांचे मनोरंजन होऊन त्यांच्या मनाला आनंद, शांती देण्याचे कार्य होते.

**क) विविध संस्कारातून बदलाची जाणीव:**

आदिवासीत व्यक्ती तारूण्यात पदार्पण करते वेळी योवनारंभ विधी केला जातो. स्त्री पहिल्यांदा गर्भवती होते. त्या वेळीही विशिष्ट विधी केला जातो. विवाहाच्या वेळी विधी केला जातो. असे विधी आणि संस्कार व्यक्तीला तिच्यातील बदलाची व त्यानुसार तिचा दर्जा बदलण्याची जाणीव करून देतात.

अर्थात धर्माची केवळ अनुकूलच कार्ये आहेत असे नाही, तर प्रतिकूल कार्येही आहेत. त्याचा निर्देश धर्माच्या समाजशास्त्रीय अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. स्वतःचा धर्म व त्यानुसार धर्माचरण श्रेष्ठ समजणे व दुसऱ्या धर्मास विरोध, तिरस्कार यांतून समाजाच्या विघटनाला चालनाही मिळते. धर्मयुद्धे, धार्मिकवाद यामुळे कित्येक निरपराध लोकांना मारले गेल्याचा इतिहास आहे. नरबळी, जातिव्यवस्था, अस्पृश्यता, सतीची चाल, देवदासी अशा अमानुष प्रथांना मानवाने धर्माचेच पाठबळ दिले आहे. धार्मिक श्रद्धा व कर्मकांडे यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोणाचा स्वीकार व मानव समाजाची प्रगती यात वारंवार अडथळे उभारले गेले आहेत. सामाजिक परिवर्तन घडून येण्यात धर्माची वारंवार अडचण जाणवली आहे. त्याचप्रमाणे दैववाद, निष्क्रियतेचे समर्थन धर्माच्या सहाय्यानेच करून अनेक लोक आळशी, क्रियाशून्य राहिले. भक्त व ईश्वर यामध्ये भटजी, पाद्री, काजी, भगत यासारख्या पुरोहित वर्गाने मध्यस्थ म्हणून बऱ्याच वेळेला धर्माचा दुरूपयोग केला.

कर्मकांडाचे महत्त्व वाढवून अज्ञान, अंधश्रद्धा जोपासल्या, कारण यामुळेच त्यांना समाजावर वर्चस्व निर्माण करून पिळवणूक करणे शक्य होते. असे असले तरी धर्माचे विकृत स्वरूप नष्ट करून धर्माच्या चांगल्या बाबींचा व्यक्ती व समाजासाठी वापर केला पाहिजे ही भावना लोकांची बनत चालली आहे. धर्म न मानणे ही बाब केवळ मूठभर बुद्धिवाद्यांनाच शक्य झाली आहे.

ह्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उद्‌भवतो. तो असा की आधुनिक काळात मानवी जीवनात धर्माचे स्थान नेमके काय असावे ? ह्या प्रश्नाचे उत्तर असे धर्म ही व्यक्तीच्या बाबतीत एक खाजगी बाब राहावी. सार्वजनिक जीवनात धर्माच्या आधारे व्यवहार करणे निषिद्ध मानले जावे. धर्माला सार्वजनिक जीवनात खेचून आणणारी स्वार्थसाधू माणसे सर्वच असतात. परंतु ती धर्माचे पावित्र्य नष्ट करतात. धर्माचा जनमानसावरील पगडा विचारात घेऊन ती राजकीय डावपेच लढवितात आणि त्यामुळे धर्माची पत राखली जात नाही. माणुसकी व मनुष्यत्व हीच शुचिर्भूत बाब मानणारा मानवता धर्म बनला पाहिजे. असे झाल्यानेच बहुधर्मी समाजाला एकसंध राहता येईल यात शंका नाही.

## ६.६ स्वाध्याय

१. ग्रामीण समाजातील धर्मसंस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

२. ग्रामीण समाजातील धर्मसंस्थेच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करा.

३. ग्रामीण समुदायातील धर्मसंस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४. धर्मसंस्थेची कार्ये स्पष्ट करा.

५. ग्रामीण समाजात धर्माची भूमिका स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# ७

# शिक्षण - उद्दिष्टे - कार्य आणि महत्त्व

**पाठाची रूपरेषा**

७.० पाठाचे उद्देश

७.१ प्रास्ताविक

७.२ शिक्षणाचा अर्थ आणि शिक्षणाचे प्रकार

७.३ शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे

७.४ शिक्षणाची कार्ये

७.५ राष्ट्रीय जीवनातील शिक्षणाची कार्ये

७.६ समाजीकरण प्रक्रियेतील शिक्षणाची भूमिका आणि महत्त्व

७.७ स्वाध्याय

## ७.० पाठाचे उद्देश

- शिक्षणाची संकल्पना समजावून घेणे.
- शिक्षणाचे प्रकार समजावून घेणे.
- शिक्षणाची उद्दिष्टे अभ्यासणे.
- शिक्षणाची कार्य समजावून घेणे.
- समाजीकरण प्रक्रियेतील शिक्षणाची भूमिका आणि महत्त्व समजावून घेणे.

## ७.१ प्रास्ताविक

शिक्षण हा मानवी समाजातील महत्त्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासून वेगवेगळ्या समाजामध्ये बालकांना शिकवण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिक्षणाबाबत प्राचीन काळापासून मनन, चिंतन व विश्लेषण झालेले आहे. आधुनिक काळातही वेगवेगळ्या विचारवंतानी शिक्षणाबाबतचे विचार मांडले आहेत. त्यामुळे शिक्षणशास्त्र विकसित झाले आहे. समाजातील आर्थिक, राजकीय, धार्मिक संख्येप्रमाणे शैक्षणिक संस्था तितकीच महत्त्वाची आहे. या सर्व संस्थांसाठी शिक्षण पायाभूत आहे. शिक्षणाचे महत्त्व आधुनिक काळातच कळले असे नाही. वेदामध्ये सर्व विश्वातून आमच्याकडे ज्ञान येऊ दे अशी प्रार्थना आहे. तसेच संस्कृत भाषेतील अनेक वचने विद्या म्हणजेच शिक्षणाची महती गातात. 'विद्या' हे धन सर्वात श्रेष्ठ आहे. हॅरी जॉन्सन यांनी संस्कृतीच्या चार घटकांमध्ये अग्रक्रमाने ज्ञानाचा समावेश केला आहे. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. शिक्षण आणि समाजात अद्वैत आहे. काही वेळा

आपण आदिवासींना निरक्षर किंवा मागासलेले म्हणून संबोधतो. परंतु अक्षरज्ञान नसणे म्हणजे शिक्षणाचा अभाव असतो. हा आपला समज सर्वथैव चुकीचा आहे. अंदमान बेटावर राहणारे ओंगे, जारवा हे आदिवासी मासेमारी करतात. त्यासाठी अणकुचीदार भाले वापरतात. खानपानाचे, संरक्षणाचे, औषध योजनेचे त्यांना ज्ञान आहे. आदिवासी समाजात सफल जीवन जगण्यासाठी बालकांना अनौपचारिकरीत्या शिक्षण देण्यात येते. त्या शिक्षण प्रक्रियेमुळे मागील लाखो वर्षांपासून ते जीवन जगत आहेत. त्यांचे शिक्षण आरंभिक असेल. आधुनिक समाजातील शिक्षणातील विविधता आणि सखोलता त्यात नसेल, परंतु त्यांना शिक्षण नाही. ही धारणा आपल्या अहंभावाचे लक्षण आहे. थोडक्यात शिक्षण हे समाजाइतकेच प्राचीन आहे.

शिक्षण हे आंतरक्रियेचे फलित असते. समाज सदस्यांसमवेत कार्यान्वित असलेल्या आंतरक्रियेतून ज्ञानाचे संक्रमण घडते. अर्थात शिक्षण ही जाणीवपूर्वक होत असलेली प्रक्रिया असते. शिक्षणाचा आरंभ बालकाच्या जन्मापासून होतो आणि मृत्यूपर्यंत ही प्रक्रिया सुरू असते. त्या दृष्टीने ही सार्वत्रिक प्रक्रिया मानली जाते. परंतु सर्व समाजात गरजापूर्तीचे शिक्षण देण्यात येत असले तरी गरजांची पूर्ती कोणत्या प्रकारे करावी यामध्ये वेगळेपणा असतो. म्हणजेच एका समाजात प्रदान करण्यात आलेले शिक्षण दुसऱ्या समाजात प्रतिबिंब स्वरूप असते असे आढळत नाही.

समाजात शिक्षण देणारी कुटंब ही आद्यसंस्था आहे आणि माता ही शिक्षण देणारी प्रथम व्यक्ती असते. पुढे अन्य समूहाप्रमाणेच इतर व्यक्ती शिक्षण देण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतात. व्यक्तीने जीवन जगत असताना प्राप्त केलेला अनुभव ही शिक्षणाची मूलभूत शिदोरी असते. आदिवासी ग्रामीण भागात आणि शहरातील कुटुंबात याच पद्धतीने त्या समाजातील प्रथा, परंपरा, सांस्कृतिक वर्तन, कौशल्ये व ज्ञानाचे संक्रमण केले जाते ते संक्रमण दोन प्रकारे चालते. १) एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे आणि २) एका समूह समुदायातून दुसऱ्या समूह-समुदायाकडे अशा प्रकारे शिक्षणाची कार्य चालतात. थोडक्यात व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारी व्यक्तीच्या सुप्त शिस्त विकसित करणारी प्रक्रिया म्हणजेच शिक्षण होय.

## ७.२ शिक्षणाचा अर्थ आणि शिक्षणाचे प्रकार

इंग्रजी भाषेतील 'Educt' या क्रियापदापासून Education हे नाम बनले आहे. त्याचा अर्थ ‘व्यक्त स्वरूप देणे’ किंवा ‘बाहेर काढणे’ असा होतो. म्हणजेच व्यक्तीमध्ये जे जे सुप्तरूपात आहे. त्याला व्यक्त स्वरूप देणे म्हणजे शिक्षण होय.

प्लेटोच्या (Plato) मते - शिक्षण प्रदान करणे म्हणजे शारीरिक आणि आत्मशक्तीस जितकी क्षमता असेल तितके पूर्णत्व आणि सौंदर्य प्राप्त करून देणे होय.’

('To educate means to create and develop in body and in soul all the perfection and all the beauty of which they are capable)

ॲरिस्टॉटल (Aristotle) म्हणतो. ‘शिक्षण देणे म्हणजे ज्यात पूर्ण सुख समाविष्ट आहे. अशा ‘सत्यम्, शिवम्, सुंदरम्’ गोष्टीच्या चिंतनाचा आस्वाद घेणे होय. अशा रीतीने व्यक्तीच्या सुप्त शक्तीचा प्रामुख्याने मानसिक शक्तीचा विकास साधणे होय.

कान्ट (Kant) चे मत 'शिक्षणाचे ध्येय म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या कुवतीनुसार तिच्यामध्ये परिपूर्णता निर्माण करणे हे असले पाहिजे.'

(The end of education is to develop in each individual all the perfection of which he is capable.)

जॉन डुई म्हणतात, 'समाजाच्या धारणेस पोषक होईल ते नव्या पिढीला शिकविले पाहिजे.' डॉ. राधाकृष्णन म्हणतात, 'शिक्षण म्हणजे प्राप्त परिस्थितीशी केलेले समाधानकारक समायोजन होय.'

(Education is the adjustment with the environment)

वर दिलेल्या व्याख्यांचे आधारे शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करणारे मुद्दे लक्षात येतात, जसे

१. शिक्षणप्रक्रिया स्वरूप असते.

२. शिक्षणातून व्यक्तीचा शारीरिक व मानसिक विकास साध्य होतो.

३. शिक्षणातून सत्य, शिव आणि सुंदरत्वाचा समावेश होतो.

४. शिक्षणामुळे व्यक्तीच्या सुप्त शक्तीचा विकास होतो.

५. शिक्षण समाजधारणेस पोषक असते.

६. शिक्षणातून कोणत्याही परिस्थितीशी तडजोड करण्याची क्षमता प्राप्त होते.

एकूण शिक्षणामुळे व्यक्तीचा शारीरिक, मानसिक आणि नैतिक विकास साध्य होतो. गरजा भागविण्यासाठी लागणारे कौशल्य व्यक्ती हस्तगत करते.

अनेक समाजशास्त्रज्ञांनी शिक्षणाची भूमिका आणि कार्ये स्पष्ट केली आहेत. त्यात वेब्लीन (Veblen), दुरखिम (Durkheim), मॅक्सवेबर (Max Weber), पार्सन्स (Parsons). यांचा प्रामुख्याने अंतर्भाव करावा लागेल. रॉबर्ट लोवी (Lowie) यांनी आदिवासी समुदायातील अनौपचारिक शिक्षणाचा सविस्तर अभ्यास केला आहे. भारतात लोकमान्य टिळक, म. जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रवीन्द्रनाथ टागोर, म. गांधी, झाकीर हुसेन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, डॉ. राधाकृष्णन, कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख इत्यादी विचारवंतांचा या संदर्भात उल्लेख करावा लागेल.

प्राचीनकाळी गुरूकुलामधून शिक्षण देण्यात येते असे टी.बी.बॉटमोर यांचे मत त्याकाळी शिक्षणाचे निर्धारण वर्णव्यवस्थेने होत असे. ब्राह्मण व क्षत्रिय वर्णातील व्यक्तींना शिक्षणाचा विशेषाधिकार होता. या शिक्षणात भाषा, व्याकरण, शास्त्र, आयुर्वेद, राजनीती, धनुर्विद्या इ. विषयाचे शिक्षण दिले जाई. या शिक्षणात शारीरिक, आध्यात्मिक, नैतिक शिक्षणाचा समावेश होता. चतुर्थ व पंचम वर्णास शिक्षणाची संधी नव्हती.

बौद्ध कालखंडात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. त्याकाळी नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला ही प्रसिद्ध विद्यापीठे होती. या विद्यापीठातून अनेक विषयांसोबत धार्मिक शिक्षण देण्यात येई. १२ व्या शतकापर्यंत ही व्यवस्था कायम होती.

मोगल अमदानीत मदरशांमधून औपचारिक शिक्षण देण्यात येत असे. त्याकाळी पर्शियन भाषेच्या अध्ययनावर लक्ष केंद्रित झालेले आढळते. इ.स. ११ व्या ते १८व्या शतकापर्यंत मदरशांतून धार्मिक शिक्षण देण्यात येत होते. अकबराच्या राजवटीत त्यांनी शिक्षणात अनेक सुधारणा केल्या, मात्र संस्कृतची जागा पर्शियन भाषेने घेतली.

१७ व्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीचा भारतात प्रवेश झाला. इंग्रजी ज्या अनेक सुधारणा केल्या त्यात लॉर्ड मॅकॉले (१८३५) यांनी इंग्रजी धर्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यामुळे शाळा महाविद्यालये औपचारिक शिक्षण देऊ लागली. अभ्यासक्रमाची आखणी सहेतूक करण्यात आलेली होती. १९३० ते १९५० या कालखंडात भारतीयांच्या साक्षरतेत भर पडली. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी अस्पृश्य आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम केले. म. ज्योतिरावांचा शिक्षणाच्या सामर्थ्यावर विश्वास होता. विद्या हे मानवी जागृतीचे साधन आहे हे त्यांनी जाणले होते. त्या काळी मिशनरी शाळा चालवीत असत. परंतु त्यांच्या दृष्टिकोन वेगळा होता. हिंदुस्थानातील स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष आहे हे पाहून ज्योतिरावांना दु:ख होत असे. त्या काळी मुलींना शिक्षणाविषयी अनेक गैरसमज होते. हे लक्षात घेऊन जोतिरावांनी शूद्रातिशूद्रासाठी इ.स. १८४८ साली पुणे येथे बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. पुढे १८५१ मध्ये चिपळूणकरांच्या वाड्यात आणि रास्तापेठेत मुलींच्या शाळेची स्थापना केली. १९५५ साली रात्रीच्या शाळेची सुरूवात केली. या शैक्षणिक कार्यात क्रांतिज्योती सावित्री फुले या सहभागी झाल्या जोतिरावांनी शैक्षणिक कार्यात सावित्रीबाईंचे सहाय्य व्हावे म्हणून त्यांचे शिक्षण सुरू केले. यातून सावित्रीबाई फुले प्रथम हिंदू शिक्षिका झाल्या. त्यांना लोकांनी खूप त्रास दिला. परंतु त्या करारी, द्रष्ट्या होता. 'शुद्रांना सांगण्याजोगा आहे, शिक्षण मार्ग हा शिक्षणाने पशुत्व हाटते पहा' असे त्यांनी म्हटले आहे. ज्योतिरावांनी 'विद्येविनामति गेली । मतिविना नीती गेली । नीतीविना गति गेली। गतिविना वित्त गेले । वित्तविना शुद्र खचले । इतके अनर्थ अविद्येने केले. या प्रतिपादनातून शिक्षणाने महत्त्व कथन केले आहे. १९२० नंतर राष्ट्रीय आंदोलनात म. गांधी तसेच आर्यनायकम यांनी नई तालीमचा पुरस्कार केला. रवींद्रनाथ टागोरांनी सौंदर्यदृष्टी प्रधान मानली. परंतु त्याचबरोबर या सर्वांनी आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात १९५० मध्ये भारतीय संविधान मान्य पावले. लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, समान न्याय ही मूल्ये आदर्श मानण्यात आली. त्यानुसार शिक्षणाची आखणी झाली. शिक्षण आयोगाची स्थापना १९८६, शिक्षणविषयक धोरण आणि भारतीय घटनेत शिक्षणाची केलेली तरतूद यामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षण सर्वांना खुले झाले. शिक्षणासाठी केलेल्या तरतूदीमुळे शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षणासाठी उपेक्षित गटातील विद्यार्थ्यांसाठी विविध सोयी-सवलतींचा प्रबंध करण्यात आला. व्यावसायिक शिक्षणाबरोबर संगणकीय शिक्षणास प्रोत्साहन देण्यात आले.

**शिक्षणाचे प्रकार :**

शिक्षणाचे दोन प्रकार केले जातात ते खालीलप्रमाणे

**शिक्षण (Education)**

- अनौपचारिक (Informal)
- औपचारिक (Formal)

**अ. अनौपचारिक (Informal):**

जे शिक्षण कोणत्याही प्रकारच्या औपचारिकतेशिवाय दिले जाते, (Carried out with out formality) त्याला अनौपचारिक शिक्षण म्हणतात. मानवी जीवनात शिक्षणाचा प्रदीर्घ कालखंड अनौपचारिक शिक्षणाचा आढळतो. हे शिक्षण उक्ती, श्रुती आणि स्मृती पद्धतीने देण्यात येते. त्यात सहजता असते. आदिवासी समुदायात भाषा, सण-समारंभ, विधी-विधाने प्रमाणके तसेच उत्पादनासाठी लागणारे कौशल्य (Skill) अनौपचारिक पद्धतीने संपन्न होते. कुटुंब, युवक मंडळे, नातेवाईक या शिक्षण प्रक्रियेत सहभागी असतात. जमातीत पशुपालन, बदलती शेती, नृत्य, वादन, गायन, शस्त्रास्त्राचे शिक्षण स्वाभाविकपणे देण्यात येते.

कृषक समुदायातसुद्धा कुटुंबातील सभासद, समवयस्क व्यक्ती, नातेवाईकांचा गट, अनुभवी सदस्य, अनौपचारिक पद्धतीने शेती व पशुपालनाचे शिक्षण देतात. जमिनीची मशागत, अन्नधान्याची पेरणी, त्यासाठी लागणारी उपकरणे, त्याचा उपयोग, शेती संलग्न क्रिया कलापांचे शिक्षण सहजपणे देण्यात येते.

ग्रामीण भागातील गृहउद्योगात विविध वस्तूंचे उत्पादन केले जाते. कुंभार मातीची भांडी तयार करतो. कोष्टी कापड विणतो, सुतार लाकूडकाम करतो, लोहार लोखंडापासून विविध उपकरणं तयार करतो. हा कोणत्याही गृह उद्योग करणाऱ्यास औपचारिक शिक्षण मिळालेले नसते. मागील पिढीने मिळविलेले ज्ञान ते पुढील पिढीत प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून संक्रमित करतात. सोन्याचे दागिने घडविण्याचे नाजूक काम परंपरागत पद्धतीनेच आत्मसात केलेले आढळते.

कुटुंबात माता तयार करीत असलेले पदार्थ कोणत्याही कुकरीच्या वर्गात शिकलेले नसतात. मागच्या पिढीने अनुभवातून प्राप्त केलेल्या ज्ञानाचा वारसा तिला लाभलेला असतो.

**थोडक्यात:**

१. अनौपचारिक शिक्षण पूर्वनियोजित नसते.

२. त्याचा आधार अनुभव असतो.

३. ते लिखित स्वरूपात दिलेले नसते.

४. त्यात स्वाभाविकता असते.

५. हे शिक्षण प्रामुख्याने कुटुंबातून दिले जाते.

६. याचे कोणतेही वेळापत्रक व अभ्यासक्रम नसतो.

७. बालकास कुटुंबातून मिळणारे शिक्षण अनौपचारिक असते.

**ब. औपचारिक (Formal Education):**

औपचारिक शिक्षण सुस्थापित पद्धतीद्वारा दिले जाते. (According with established form) या शिक्षणाचे संस्थीकरण झालेले असते. औपचारिक शिक्षण शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्थांचे माध्यमातून देण्यात येते. या शिक्षणात करार प्राधान्यता असते. औपचारिक शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरलेला असतो. त्याचे वेळापत्रक असते. शिकण्यातील प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी परीक्षा पद्धती असते. संस्थेत प्रवेशासाठी, शैक्षणिक पात्रता व आवेदन पत्राचा समावेश होतो.

औपचारिक शिक्षणात १) संस्था २) शिक्षक ३) विद्यार्थी हे घटक महत्त्वाचे असतात. शिक्षक विशिष्ट विषयाचे तज्ज्ञ असतात. त्यांच्या शिक्षणातील सहभाग व उत्तरदायित्व ठरते. शिक्षक हे वेतनभोगी असतात. संस्था व शिक्षकात करार असतो. त्याचप्रमाणे संस्था व विद्यार्थ्यांतसुद्धा करार असतो. त्यासाठी दोन्ही पक्षांत औपचारिकता पूर्ण करावी लागते.

ग्रामीण समुदायातील शेतकऱ्याचे शेतीसंबंधीचे ज्ञान निरीक्षण व अनुभवातून मिळालेले असते. ती शिक्षणाची प्रक्रिया अनौपचारिक असते. परंतु कृषी विद्यापीठातून देण्यात येणारे शिक्षण औपचारिक असते. औपचारिक शिक्षणाची कालमर्यादा असते.

औद्योगिक क्रांतीनंतर औपचारिक शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात औपचारिक शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. आज औपचारिक शिक्षणाची व्याप्ती वाढलेली आहे. या शिक्षणातून व्यवसायास लागणारे कौशल्य मिळते. उदा. डॉक्टर, इंजिनीअर, वगैरे औपचारिक शिक्षणामुळे अर्जित (Achieved Status) दर्जा प्राप्त होते, आदर व प्रतिष्ठा औपचारिक शिक्षणातून मिळते. वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे, संगणकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांमधून त्या त्या विषयाचे प्रगत ज्ञान देण्यात येते.

औपचारिक शिक्षणात करारप्राधान्यता असते. या शिक्षणात सहजतेचा अभाव असतो. वर्तमान काळात प्रत्येक विषयाच्या सूक्ष्म अध्ययनाची केंद्रे विकसित झालेली आहेत. अशा विशेषित शिक्षण देणाऱ्या संस्थेत प्रवेशासाठी स्पर्धात्मक परीक्षेचे आयोजन केले जाते. या दृष्टीने औपचारिक शिक्षण महागडे झाले आहे.

व्यक्तीने पूर्वी प्राप्त केलेले शिक्षण कालबाह्य ठरते किंवा त्यात सुधारणा करण्याची गरज असते. अशा अद्ययावत शिक्षणामुळे व्यक्तीस नवभूमिका वठविणे शक्य असते. शिक्षणामुळे भूमिका वठविण्यातील ताण-तणाव कमी होतात. तसेच उर्ध्वगामी गतिशीलते (upward mobility) साठी औपचारिक शिक्षण साहाय्यभूत ठरते. या शिक्षणामुळे व्यावसायिक गीतशीलतासुद्धा साधते. जाती व व्यवसायाचे साहचर्य नष्ट करण्यासाठी औपचारिक शिक्षणाचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. उदा. निम्न जातिगटातील व्यक्ती परंपरागत व्यवसाय न करता नवीन व्यवसायाचे (वैद्यकीय) शिक्षण घेऊन डॉक्टर बनू शकते.

**एकूण :**

१. औपचारिक शिक्षण पूर्वनियोजित असते.

२. या शिक्षणाचा एक अभ्यासक्रम असतो.

३. हे शिक्षण शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रातून देण्यात येते.

४. या शिक्षणामुळे नवीन कौशल्ये प्राप्त केली जातात. नवीन व्यवसाय करता येतात. परंपरागत दर्जात बदल होतो.

**भेद**

| अनौपचारिक शिक्षण | औपचारिक शिक्षण |
|---|---|
| १. अनौपचारिक शिक्षण प्रक्रियेत सहजता असते. | १. औपचारिक शिक्षण पूर्वनियोजित असते. |
| २. या शिक्षणाचा अभ्यासक्रम व निश्चित वेळ नसतो. | २. या शिक्षणाचा ठराविक अभ्यासक्रम व निश्चित वेळ असते. |
| ३. या शिक्षणात माता-पिता, भावंडे, नातेवाईकांची भूमिका महत्त्वाची असते. | ३. औपचारिक शिक्षण संस्था व शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. |
| ४. हे शिक्षण कुटुंब, शेजार, नातेवाईकांच्या गटातून दिले जाते. | ४. औपचारिक शिक्षण शाळा, महाविद्यालये, व प्रशिक्षण केंद्रातून देण्यात येते. |
| ५. अनौपचारिक शिक्षणाचे स्वरूप पारंपरिक असते. | ५. औपचारिक शिक्षणात आधुनिक ज्ञानाचा समावेश करण्यात येतो. |
| ६. अनौपचारिक शिक्षण समोरासमोर देण्यात येते. | ६. औपचारिक शिक्षणात वर्गातील प्रत्यक्ष सहभागाबरोबर दूरशिक्षणाचा समावेश होतो. |

औपचारिक शिक्षणासाठी रेडिओ, दूरचित्रवाणी, कॅसेट, तसेच संगणकाचा उपयोग करण्यात येत आहे. ग्रंथालयाचे या शिक्षणात मूलभूत योगदान आहे. मुक्त विद्यापीठातून औपचारिक शिक्षणावर भर देण्यात येतो.

## ७.३ शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे

कोणतीही प्रक्रिया पार पाडताना निश्चित उद्दिष्ट जोपर्यंत समोर ठेवत नाही तोपर्यंत त्या क्रियेला दिशा मिळू शकत नाही. तिचे मूल्यमापन होऊ शकत नाही. शिक्षणाचे कार्य तर मानवाच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे कार्य असल्यामुळे याची उद्दिष्ट स्पष्ट झाली नाहीत, तर त्या कार्याचे स्वरूपही स्पष्ट होणार नाही. त्याला निश्चित दिशा वा वेग प्राप्त होणार नाही. जॉन ड्युईने म्हटले आहे.

"Aims are an integral part of the fabric of the educative process."

'ध्येय म्हणजे शिक्षण प्रक्रियेचा महत्त्वाचा कणा आहे. याचा अर्थ ध्येय म्हणजे अंत किंवा शेवट नाही तर ते एक साधन आहे. असेही तो पुढे म्हणतो. (Aim is not an end it is only a means) शिक्षणाची उद्दिष्टे ही स्थळानुसार, काळानुसार व प्रामुख्याने तत्त्वज्ञानानुसार बदललेली दिसून येतात. मानवी जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व अंगांवर शिक्षणाचा प्रभाव आहे. आपण प्रामुख्याने त्याचे चार भाग पाडू शकतो.

१) ज्ञानात्मक उद्दिष्टे.

२) व्यवसायात्मक उद्दिष्टे.

३) चारित्र्य निर्मितीपर उद्दिष्टे

४) सांस्कृतिक उद्दिष्टे.

**ज्ञानात्मक उद्दिष्टे :**

**अ) ज्ञानप्राप्ती :**

केवळ ज्ञान म्हणजे शिक्षण जरी नसले तरी ज्ञान हा शिक्षणाचा एक अविभाज्य व अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, यात शंकाच नाही. जुन्या पिढीने जे अनुभवाचे संचित जमा केले आहे ते आत्मसात करणे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ''नहि ज्ञानेन सदृश पवित्रमिह विद्यते'' या शब्दात भगवान श्रीकृष्णाने ज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. तर बेकननेही knowledge of power ज्ञान एक सामर्थ्य आहे, शक्ती आहे असे म्हणून त्याला दुजोरा दिला आहे. 'ज्ञान मनुजसक्य तृतीय नेत्रम्' या वचनानुसार अज्ञानरूपी अंधकारातून बाहेर पडण्यासाठी ज्ञानरूपी नेत्राचे, दृष्टीचे साह्य घेणे अपरिहार्य आहे. मानवाच्या प्रगतीमुळे आज ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झाला आहे. त्यामुळे मानवाने आपल्या परीने जेवढे वेचता येतील तेवढे ज्ञानकण वेचले पाहिजेत. संपूर्ण विश्वात ज्ञानाचे भांडार विखुरलेले आहे. मानवाने ते आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पूर्वीच्या काळी ज्ञानप्राप्तीसाठी अत्यंत कष्ट, परिश्रम घ्यावे लागत ती जणू एक तपश्चर्या ठरत असे. आज सुदैवाने ज्ञानरूप गंगा ग्रंथ पुस्तकांच्या साहाय्याने आपल्या दारापर्यंत येऊन पोहोचली आहे. त्यात अवगाहन करण्याची तयारी मात्र प्रत्येक ज्ञानार्थ्याने-विद्यार्थ्याने म्हणजेच मानवाने ठेवली पाहिजे. दर्दैवाची बाब म्हणजे आजच्या शाळांना ज्ञानविक्री केंद्राचे आणि शिक्षकांना विक्रेत्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पोपटपंचीने प्राप्त केलेले कोणतेच ज्ञान मानवाला जीवनात यशस्वी बनवू शकत नाही. जे ज्ञान विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनावर काही संस्कार उमटवेल, त्याच्या आचारविचारात, व्यवहारात परिवर्तन घडवून आणले तेच खरे ज्ञान होय आणि हे ज्ञान प्राप्त करणे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट होय.

**ब) मासिक शक्तीचा विकास :**

प्रत्येक व्यक्ती काही उपजत कलागुण घेऊन जन्माला येत असते. शिक्षणाचा अर्थ to draw out म्हणजे निसर्गदत्त कलागुण, प्रवृत्ती शोधून त्या विकसित करणे हा होता. या सुप्त कलागुणांच्या प्रकटीकरणास संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्या नैसर्गिक शक्तींना आविष्कृत करण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे माध्यम नाही. प्रत्येक व्यक्तीमध्ये तर्क, निर्णय, विचार, स्मरण, संश्लेषण, विश्लेषण कल्पना वगैरे अनेक शक्ती आहे. या शक्तींना शिक्षणाद्वारे चालना मिळाली पाहिजे. या शक्तीचा उपयोग करण्याचा सराव झाला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात मात्र आजच्या शाळामधून विद्यार्थ्यांना तयार उत्तरे पुरविली जातात. पुस्तकाच्या यादीबरोबरच गुरूकिल्ली किंवा मार्गदर्शकही आणण्यासाठी सांगितले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींना व्यायाम मिळत नाही. त्यावर एक प्रकारे धूळ जमते आणि तात्पुरती पोपटपंची करून पदवी मिळाल्यानंतरही व्यक्तीला जीवनात नैराश्य पदरी पडते म्हणून जीवनसंघर्षात यशस्वी होण्यासाठी या मानसिक शक्तींना वळण लागणे, त्या शक्ती जास्तीत जास्त कार्यक्षम कशा होतील हे पाहणे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

**क) साक्षरता :**

साक्षरता म्हणजे शिक्षण असा अनेक लोकांचा गैरसमज आहे. वास्तविक हे एक साधन आहे. ज्याच्या योगाने लिखित स्वरूपातील ज्ञानाचा ठेवा सहज आत्मसात करता येतो. आपली मते,

विचार अनुभव शब्दबद्ध करून ठेवता येतात. प्रत्येक व्यक्तीने स्वत:हून ज्ञानप्राप्ती करावी यासाठी त्याला लिहिता-वाचता येणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला लिहायला-वाचायला शिकविणे त्यादृष्टीने लायक, समर्थ बनविणे शिक्षणाचेच कार्य आहे.

**व्यावसायिक उद्दिष्टे :**

**अ) उपयोजन कौशल्य :**

उपयोजन म्हणजे प्राप्त ज्ञानाच्या प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करणे होय. विद्यार्थ्यांना केवळ शब्दज्ञान देणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नाही तर त्या ज्ञानाचा, अनुभवांचा त्यांना आपल्या जीवनात यशस्वीपणे उपयोग करता यायला हवा. दुर्दैवाने आज या उलट चित्र पाहण्यास मिळते. पदवीधर आपला अर्जही मनाने लिहू शकत नाही की पटापट हिशेब करू शकत नाही. त्यामुळे जीवनात पदोपदी अडखळताना निराश होताना दिसून येतो. अर्थात हा दोष त्याचा एकट्याचा नाही त्याला उपयोजनांची संधी मिळायला हवी. जॉन ड्युई म्हणतो ''प्राप्त सामाजिक परिस्थितीमध्ये त्याला उपयोजनांची संधी मिळायला हवी.'' जॉन ड्युई म्हणतो ''प्राप्त सामाजिक परिस्थितीमध्ये त्याला येणाऱ्या अडचणीमुळे त्याचे विचारचक्र सुरू होते. त्यातूनच त्याच्या मानसिक शक्तींना आवाहन मिळते.'' आचार्य विनोबा भावेही म्हणतात. ''ज्या वेळी आपला विद्यार्थी शिकत असतो तेव्हा तेव्हा जीवन जगत नसतो आणि जेव्हा जीवनास प्रारंभ करतो तेव्हा त्याचे शिक्षण संपून गेलेले असते.'' म्हणजेच जीवनोपयोगी शिक्षण त्याला मिळत नाही. विद्यार्थ्याला जीवनोपयोगीच शिक्षण मिळायला हवे. शिक्षणाचा प्रत्यक्ष व्यवहारात कुशलतेने उपयोग करता यायला हवा. शिक्षणांतून हे उपयोजन कौशल्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी निर्माण व्हायला हवे.

**ब) व्यावसायिक शिक्षण :**

जीवन संघर्षात टिकाव लावण्यासाठी मानवाच्या अनंत गरजा असतात. त्या गरजापूर्तीचे साधन म्हणजे पैसा होय आणि हा पैसा कमविण्यासाठी त्याला काही ना काही तरी व्यवसाय किंवा नोकरी करावी लागते. आज प्रत्येक पालकाची शिक्षणाकडून रास्त अपेक्षा आहे की आपल्या पाल्याने स्वावलंबी, स्वयंपूर्ण व्हावे. परंतु दुर्दैवाने आजच्या शिक्षणामुळे सुशिक्षित बेकारच निर्माण झाले आहेत. एकीकडे बेकारी ही देशाची बिकट समस्या झालेली आहे. तर दुसरी कुशल कामगारांचा, तंत्रज्ञानांचा मनुष्यबळाचा अभाव दिसून येत आहे. या समस्येची कल्पना असल्यामुळेच महात्मा गांधींनी मूलोद्योगिक शिक्षणाचा पुरस्कार करून प्रत्येक बालकाला हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण शालेय शिक्षणासोबतच देण्यावर भर दिला. जॉन ड्युईनेही कृतीपर शिक्षणाचा पुरस्कार केला आहे, तर स्पेन्सरनेही 'संपूर्ण जीवनाची तयारी' म्हणून शिक्षणाकडे अपेक्षेने पाहिले आहे. उदरभरणाचे हे उद्दिष्ट प्राचीन भारतीय शिक्षणाच्या दृष्टीने निम्नस्तराचे, कमी प्रतीचे झाले तरी उपेक्षणीय खासच नाही. उलट आजच्या काळाची ती महत्त्वपूर्ण गरज आहे. म्हणून १९८६च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने पदवी आणि नोकरी यातील संबंध तोडून व्यवसायिक शिक्षणावर जास्तीत जास्त भर दिला आहे. शिक्षण घेत असताना कोणत्या व्यवसायाची बालकाला माहिती व्हावयास हवी. त्यासंबंधी कौशल्ये त्याने आत्मसात करायला हवीत त्यासाठी लागणारी हत्यारे, अवजारे त्याला हाताळता यावी याची दखल घेण्यासाठीच कोठारी आयोगाने कार्यानुभव हा विषय सर्व वर्गासाठी आवश्यक केला आहे. पूर्वीच्या काळी समाजव्यवस्थेनुसार प्रत्येक जातीचा व्यवसाय हा ठरलेला असे. नवीन पिढीला हे व्यावसायिक ज्ञान कुटुंबसंस्थेकडून आपोआपच मिळत असे. आज स्वतंत्र भारतातील नागरिकांना घटनेने व्यवसायाचे स्वातंत्र्य मिळाले आहे. प्रत्येक व्यवसायासाठी कांही विशिष्ट कौशल्याची तंत्रांची माहितीची आवश्यकता असते.

शिक्षणाद्वारे या गोष्टींची पूर्तता व्हावी या हेतूनेच व्यवसायाचे शिक्षण या मार्गदर्शन शिक्षणातून त्याला प्राप्त झाले पाहिजे. आजच्या वाढत्या महागाईच्या काळात, वाढत्या लोकसंख्येच्या काळात याच उद्दिष्टाला अग्रक्रम देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**चारित्र्य निर्मितीचे उद्दिष्ट :**

**अ) शारीरिक विकास :**

व्यक्तिमत्त्व म्हणताच सर्वप्रथम कसली छाप पडत असेल तर ती सुदृढ, सशक्त, निकोप शरीरयष्टीची sound mind in a sound body, यानुसार निरोगी शरीरातच निरोगी, निकोप मन वास करीत असते. पूर्वीच्या काळी आत्मसाक्षात्कार हे जीवनध्येय होते. ते गाठण्यासाठी ज्या शरीरात आत्मा विराजमान आहे त्या शरीराचे संगोपन करण्यावर विशेष भर दिला जात असे. सूर्य नमस्कार तसेच योगासनाच्या माध्यमातून शारीरिक विकास साध्य केला जाई. या व्यायामामुळे रोग तर चार हात दूर राहीलच. शिवाय आत्मसाक्षात्कारासाठी लागणारी एकाग्रताही साध्य केली जाईल. आजच्या काळात या उद्दिष्टपूर्तीची नितांत गरज आहे. देशाच्या रक्षणाचा भार ज्या नवीन पिढीवर आहे. ती सदृढ, सशक्त निपजायला हवी व हे कार्य आहे शिक्षणाचे प्लेटोनेसुद्धा आपल्या शिक्षणयोजनेत सर्व स्तरावर व्यायामाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मुलांना व्यायामाची सवय लावणे, आरोग्याच्या स्वच्छतेच्या सवयी लावणे, पौष्टिक आहाराचे महत्त्व त्याच्या मनावर बिंबविणे सहज शक्य आहे.

**ब) नैतिक आध्यात्मिक विकास :**

बालकाला पुढे भावी आयुष्यात ज्या समाजामध्ये वावरावयाचे आहे त्या समाजातील नीती-अनीतीच्या कल्पना, नियम कर्तव्ये याची माहिती बालकाला शिक्षणातून पद्धतशीर मिळू शकते. नैतिक विकास म्हणजे सद्गुणांचा विकास, सदाचाराचा विकास होय. आध्यात्मिक विकास म्हणजे परमेश्वरावरील श्रद्धेचा आस्तिकतेचा विकास. या आस्तिकतेमुळे इतर प्राणीमात्राबद्दल प्रेमभाव, दयाभावविकसित व्हावयाला हवा. सर्वाभूती समभाव विकास झाला की, मानवामानवामधील संबंध, प्रेमाचे, जिव्हाळ्याचे, सलोख्याचे होतील. पूर्वी हे उद्दिष्ट धर्मसंस्था आणि कुटुंबसंस्थेतून आपोआप साध्य केले जाई. हल्ली विज्ञानाच्या प्रसारामुळे धर्मावरचा विश्वास उडालेला आहे आणि विभक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात आल्यामुळे नैतिक व आध्यात्मिक संस्कार करण्यात या दोन्ही संस्था निष्प्रभ ठरल्या आहेत. सुयोग्य नागरिक निर्मितीसाठी या उद्दिष्टपूर्तीची फार गरज आहे. डॉ. कोठारी यांनीसुद्धा या उद्दिष्टाला शिक्षणात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

**क) चारित्र्यनिर्मितीचा विकास :**

व्यक्तीच्या व्यक्तित्वाची छाप त्याच्या वागण्या-बोलण्यातून, स्वभावातून पडत असते. सद्गुणी पिढी निर्माण करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. 'ज्ञानेन हिनः पशूमी समानः' या संस्कृत वचनानुसार शिक्षणाशिवाय मनुष्य हा पशूवत आचरण करतो. शिक्षणातून त्याच्यात मानवता, सहकार्याची भावना, प्रेम, त्याग इत्यादी गुण विकसित झाले पाहिजेत. 'शिलं परम भूषणम्' हा भारतीयांचा आदर्श आहे. तो शिक्षणानेच जपायला हवा.

मानवी जीवनात चारित्र्याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. 'प्राण जाए पर वचन न जाए' हा भारतीयांचा बाणा आहे. त्याची जाणीव करून देण्याची जबाबदारी शिक्षणाची आहे. चारित्र्यसंपन्न

नागरिकांवरच देशाचे अस्तित्व टिकून असते. चारित्र्यसंपन्न नागरिकावरूनच देशाचे श्रेष्ठत्व ठरविले जाते. त्यामुळे नीतिमान सात्त्विक सत्प्रवृत्तीचे नागरिक घडविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

**ड) व्यक्तिगत पात्रतेचा विकास :**

व्यक्तिमत्त्वाची घडण ही व्यक्तिगत पात्रतेवर अवलंबून आहे, तर व्यक्तिगत पात्रता ही उपजत जन्मजात दैवी गुणांवर, शक्तीवर निर्भर आहे. या नैसर्गिक गुणांना नैसर्गिकरीत्या निसर्गाच्या सान्निध्यात विकसित करण्यावर रूसोने भर दिलेला आहे. 'पिण्डे पिण्डे मतिभिन्न' किंवा 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या नात्याने प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगवेगळ्या प्रवृत्ती व कलागुण असतात. त्याचा योग्य विकास करण्याचे कार्य शिक्षणाचे आहे. पूर्वी प्राचीन भारतीय शिक्षणात अशी संधी दिली जात असे. उदाहरणार्थ, पाचही पांडव पाच वेगळ्या कलेमध्ये प्रवीण होते. आजही एकाच कुटुंबातील दोन तीन भावंडामध्ये कुणाला विज्ञानाची आवड आहे, तर कुणाला साहित्याची. शिक्षणाने ही व्यक्तिगत भिन्नता जाणून तिच्या विकासाला पूर्ण वाव दिला पाहिजे.

**इ) सामाजिक जबाबदारीची जाणीव व राष्ट्रीयत्वाची जाणीव :**

बालकाचा वैयक्तिक विकास करत असतानाच पुढे त्याला ज्या समाजामध्ये वावरावयाचे आहे त्या समाजाप्रती त्याची कर्तव्य कोणती, समाजात वावरताना कोणत्या नीती नियमांचे पालन करावयाचे ह्याचाही परिचय शिक्षणातूनच झाला पाहिजे. जॉई ड्यूई सुद्धा म्हणतो की, ''वैयक्तिक विकास करत असताना सतत एक नजर सामाजिक विकासावर ठेवली पाहिजे.'' सामाजिक विकासाच्या आड वैयक्तिक विकास येणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. ''कारण मानवाचा जन्म विकास आणि मृत्यू या तीन्ही गोष्टी समाजातच घडत असतात. व्यक्तीचा बहुतेक वेळ समाजातच व्यतीत होत असतो. आज सामाजिक बांधीलकी दिसेनाशी झाली आहे. त्यामुळे सामाजाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. शिक्षणाद्वारे सामाजिक गुणांचा विकास, सामाजिक जबाबदारीची जाणीव नवीन पिढीमध्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या राष्ट्रात, देशात आपण राहतो. त्या देशाविषयीचा सार्थ अभिमान, देशप्रेम शिक्षणातून नवीन पिढीमध्ये आपण रूजवू शकतो भारतात राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाणाऱ्या घटना नित्य घडत आहेत. अशा वेळी आशेचा किरण एकच आहे व तो म्हणजे शिक्षणाचा ! डॉ. कोठारी यांनी आपल्या भिन्नधर्मी, भिन्नभाषी, भिन्न प्रांती, खंडप्राय देशातून अखंड भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी, 'राष्ट्रीय भावनात्मक एकात्मता' हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट मानले आहे.

**सांस्कृतिक उद्दिष्टे :**

**अ) संस्कृती संक्रमण व संस्कृती संवर्धन :**

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते. या वैशिष्ट्यामुळेच त्या समाजाचे अस्तित्व भिन्नत्व स्पष्ट होत असते. संस्कृती ही अमूर्त संकल्पना आहे. प्रथा, परंपरा, चालीरीती, भाषा हे त्याचे मूर्तरूप होय. या संस्कृतीचे हस्तांतर जुन्या पिढीकडून नवीन पिढीकडे झाले तरच संस्कृती टिकून राहील. हे संक्रमण पद्धतशीरपणे करण्याचे कार्य शिक्षणाचे आहे. इतकेच नव्हे तर संक्रमण करतानाच काळानुसार त्या संस्कृतीत चांगले आदर्श निर्माण करून आदर्श पायंडे पाडून तो संस्कृती विकसित केली पाहिजे. संस्कृती हा समाजाचा आत्मा आहे. शिक्षणातून त्या संस्कृतीचा योग्य विकास झाला पाहिजे.

**ब) सौंदर्याभिरूची व रसिकतेचा विकास :**

'साहित्य संगीत कला विहीन : साक्षात पशू पुच्छविषाणहीन या संस्कृतवचनानुसार मानवी जीवन साहित्य संगीत सौंदर्य ह्याच्या आस्वादाखेरीज रूक्ष नीरस कंटाळपणे आहे. जीवन जगण्यासाठीजरी यांची आवश्यकता नसली तरी जीवनात आनंद प्राप्त करण्यासाठी जीवन सुखी, समाधानी, उत्साही करण्यासाठी याची नितांत गरज आहे. दैनंदिन धकाधकीच्या यांत्रिकी, बेगडी मानवी आयुष्यातील मानसिक थकवा दूर करून जीवनात चैतन्य निर्माण करण्याची अद्‌भूत शक्ती व साहित्य संगीत आणि कलेमध्ये आहे. प्रत्येक व्यक्ती ही जरी उत्तम कलाकार, लेखक, गायक होऊ शकली नाही तरी त्या साहित्य संगीत कलेमधील सौंदर्याचा रसास्वाद तरी निश्चित घेऊ शकते. तेव्ही ही सौंदर्यात्मक दृष्टी, रसिकतेचा विकास करण्याची जबाबदारी अर्थात शिक्षणाची आहे.

**क) फुरसदीचा सदुपयोग :**

पूर्वी प्राचीन भारतात शिक्षण ही उच्चवर्णीयांचीच मिरासदारी होती. हे लोक श्रीमंत असत व त्यांच्याजवळ भरपूर रिकामा वेळ असे. या वेळेचा उपयोग त्यांनी शिक्षणासाठी केला. आज शिक्षण सर्वांसाठी खुले झाले आहे. औद्योगिकीरणामुळे प्रत्येक क्षेत्रात यंत्राने शिरकाव केलेला आहे. त्यामुळे सर्वांना रिकामा वेळ मिळतो. नेहमी जरी नाही तरी हक्काचा सुट्टीचा दिवस तरी असतोच. ह्या वेळेचा उपयोग छंदाची जोपासना करण्यासाठी केल्यास व्यक्तिमत्त्वात निश्चित भर पडते. एक इंग्रज विचारवंत म्हणतो.

Tell me what you like and dislike, and I will tell you what you are!

किती सत्य आहे ! तुमच्या आवडीनिवडीवरून तुमच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख पटत असते. लहानपणापासूनच जर मुलांना रिकाम्या वेळेचा चांगला उपयोग करण्यासाठी सुयोग्य वाचनाच्या सवयी लावल्या. विविध कलांचा विकास करण्यास प्रवृत्त केले तर मोठेपणी रिकाम्या वेळेचा ते सदुपयोगच करतील. Empty mind is devils workshop 'रिकामे मन सैतानाचे धन' यानुसार रिकाम्या वेळेत जर चांगले कार्य झाले नाही, तर व्यसने बळावतील व त्याचा तोटा आपल्यालाच होईल हे लक्षात ठेवून प्रत्येकाने रिकाम्या वेळेचा जास्तीत जास्त चांगला उपयोग कसा करून घेता येईल हे पाहिले पाहिजे. अशा तऱ्हेची दृष्टी शिक्षणाद्वारे त्यांच्यात विकसित झाली पाहिजे.

थोडक्यात कोवळ्या अपरिपक्व बालकांमधून भावी नागरिक शिक्षणाला घडवण्याचे आहेत. हे नागरिक सृदृढ, सशक्त, निरोगी, चारित्र्यसंपन्न, सद्‌गुणी, सदाचारी, सुसंस्कृत सामाजिकदृष्ट्या जबाबदार ज्ञानी कसे निपजतील हे पाहणे शिक्षणाचे काम आजपर्यंत केवळ ज्ञानात्मक अंगाचाच विकास करण्यावर भर दिला जात असे. परंतु आता बालक केंद्री शिक्षण पद्धतीमध्ये ज्ञानात्मक, भावनात्मक, क्रियात्मक असा सर्वांगीण विकास अपेक्षित आहे. बालकाच्या सर्वांगीण म्हणजे बौद्धिक मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक, सौंदर्यात्मक इत्यादी विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट होय.

## ७.४ शिक्षणाची कार्ये

मानव जीवनामध्ये सतत शिकत असतो. मूल ज्यावेळी जन्माला येते त्यावेळी त्याला भोवतालच्या परिस्थितीची जाणीव नसते. स्वतःच्या ज्ञानेंद्रियांचा वापर करून भोवतालच्या वातावरणात परिचय करून घेते. अन्य लोकांच्या संपर्कामुळे त्याच्या ज्ञानात भर पडत जाते. प्रगत व मागासलेल्या समाजामध्येही शिक्षण प्रक्रिया औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने सतत चालू असते. एकंदरीत मानवी जीवनामध्ये शिक्षणाला असाधारण महत्त्व आहे. हे शिक्षणाच्या खालील कार्यावरून अधिक स्पष्ट होते.

### १) जन्मजात शक्तीचा विकास :

बालक अनेक शक्ती व गुण घेऊन जन्माला येते. हळूहळू त्याच्या शरीराची वाढ होत असते. वृद्धी विकसित होत असते. परंतु त्यासाठी त्याला योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे असते. त्याची योग्य दखल घेणे आवश्यक असते. मुलांच्या जन्मजात शक्तीचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन, शिक्षण देणे आवश्यक असते. बालकाला विविध वस्तूंचा परिचय करून द्यावा लागतो. वस्तूंचा रंग, रूप, आकार यांची माहिती घ्यावी लागते. त्या वस्तू हाताळताना त्याच्या बुद्धीला चालना मिळते. त्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास घडून येण्यास मदत होते. वेगवेगळ्या खेळांमधून चालक आपल्या शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांचा योग्य वापर करण्यास शिकते. कुटुंबामध्ये बालकाला आई-वडिलांकडून चालण्यास शिकवले जाते. अन्न कसे खावे ? कपडे कसे घालावेत ? यासारख्या लहानसहान बाबी शिकवल्या जातात. बालक चुकते, पण नंतर शिकते या पद्धतीने बालकाचे प्रारंभिक शिक्षण चालू असते. यामुळे त्याच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होते.

### २) मूलभूत प्रवृत्तींचे नियंत्रण :

बालक काही मूलभूत प्रवृत्ती घेऊन जन्माला येते. जन्मतःच बालकामध्ये कोणते गुण असतात याबाबत विचारवंतांमध्ये भिन्नता आहे. तसेच वेगवेगळ्या बालकांमध्ये वेगवेगळ्या प्रवृत्ती व गुण जन्मतः असतात. मूल स्वतंत्र, एकटे असेल तर ते आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवावे लागते अथवा आपल्या नैसर्गिक प्रवृत्तींना समाजाच्या संदर्भात बदलून स्वीकाराव्या लागतात. उदा. काम ही जन्मजात प्रवृत्ती आहे. या नैसर्गिक प्रवृत्तीचे प्रदर्शन करणे अनिष्ट मानले आहे. समाजाने त्यासाठी नियम बनवले आहेत. काम प्रवृत्तीला योग्य वळण देण्यासाठी व तिचे उदात्तीकरण घडवण्यासाठी समाजामध्ये विविध संस्थेची निर्मिती केलेली आहे. अशा नैसर्गिक प्रवृत्तीचा शोध घेणे, समाजाच्या दृष्टीने त्यावर नियंत्रण ठेवणे व समाजाच्या दृष्टीने त्यामध्ये योग्य बदल घडविणे शिक्षणामुळे शक्य होते. समाजामध्ये शाळा, कॉलेजमध्ये नैसर्गिक प्रवृत्तींना योग्य वळण देण्यासाठी शिक्षा व बक्षिसांची योजना केली जाते. सामाजिक यंत्रणाच्या विविध साधनांद्वारा मानवाच्या मूलभूत प्रवृत्ती नियंत्रित केल्या जातात. त्यांना योग्य दिशा दिली जाते. त्यासाठी शिक्षण उपयुक्त ठरते.

### ३) व्यक्तिमत्त्वाचा विकास :

व्यक्तिमत्त्वाचा विकास हे शिक्षणाचे ध्येय मानले आहे. बालक समाजामध्ये जीवन जगत असताना, समाजातील अनेक घटकांशी समायोजन करत असते, अनौपचारिकपणे अनेक गोष्टी शिकत असते. त्यामधून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा हळूहळू विकास होत असतो. परंतु शाळा, कॉलेजमधून नियोजनपूर्वक बालकाच्या विविध गुण व शक्तींचा विकास घडवण्याचा प्रयत्न केला जातो. शाळेतील

समवयस्क मुलामध्ये त्याच्या सामाजिक गुणांना विकास घडून येण्यास मदत होते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये समाज, संस्कृती हे घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळेच भिन्न समाज व संस्कृतीमध्ये वाढलेल्या लोकांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये भिन्नता आढळून येते.

बालकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रथम त्याच्या कुटुंबाचा प्रभाव पडत असतो. कुटुंबातील बालकाचा क्रम, भाऊ, बहीण यांच्यातील स्थान कुटुंबाची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती, आई-वडिलांचा स्वभाव अशा अनेक घटकांचा प्रभाव बालकाच्या व्यक्तिमत्वावर होत असतो. आई-वडिलांनी जाणीवपूर्वक पद्धतशीर संस्कार बालकावर केले तर बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणे शक्य असते. त्यासाठी शिक्षण उपयुक्त ठरते.

शिक्षणाच्या आधारे व्यक्तीचा समाजातील दर्जा ठरला जातो. अडाणी व्यक्तीपेक्षा उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तीचा दर्जा श्रेष्ठ असतो. अशा व्यक्तीला समाजामध्ये विशेष महत्त्व असते. म्हणूनच बौद्धिक व्यवसाय करणाऱ्यांचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ मानला जातो. म्हणून स्वतःच्या गुणांचा विकास करण्यासाठी, श्रेष्ठ अभिरूचींच्या निर्मितीसाठी जीवनमान उंचावण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून उत्तम प्रकारे व्यक्तिमत्त्व विकास घडवणे आवश्यक आहे.

**४) सामाजिक गुणांचा विकास :**

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळेच तो समाजामध्ये राहतो. बालकामध्ये जन्मतः सामाजिक गुण नसतात. सामाजिक गुण प्रयत्नपूर्वक साध्य करावे लागतात. शिकावे लागतात. शिक्षणामुळे सामाजिक गुणांचा विकास होतो. शिक्षणामुळे एकमेकांशी योग्य प्रकारे कसे वागावे ? हे समजते. जाती, वर्ग असे भेद न मानता आपण सर्वजण एक आहोत अशी एकतेची भावना शिक्षणामुळे निर्माण होणे शक्य असते. म्हणूनच कॉलेजमधून समूह भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी अभ्यासक्रम, विविध उपक्रम राबविले जातात. त्यामुळे समता, बंधुत्व, समानता, सहकार्य, सहिष्णुता, त्याग यांसारख्या अनेक समाजिक गुणांचा विकास शिक्षणाद्वारा पद्धतशीरपणे घडविणे शक्य असते.

**५) संस्कृती संपादन, संरक्षण, वृद्धी व संक्रमण :**

संस्कृती हे मानवी समाजाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक समाजाची संस्कृती स्वतंत्र असते. मानवाच्या ज्ञान व अनुभवांचा संचय संस्कृतीमध्ये असतो. संस्कृतीमध्ये कला, वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्म, संगीत असे अनेक घटक असतात. संस्कृतीमधील या ज्ञानसंचयामुळे बालकाला प्रत्येक वेळी नव्याने विचार करावा लागत नाही. हजारो वर्षांचे संचित ज्ञान, रूढी, परंपराद्वारा आपोआप प्राप्त होत असते. अनौपचारिक व औपचारिक करणे व बदलत्या परिस्थितीनुसार त्यामध्ये वेगवेगळ्या घटकांचा समावेश करणे शिक्षणाद्वारा शक्य होत असते. शिक्षणामुळे व्यक्तीचे सांस्कृतिक ज्ञान वाढत जाते. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. प्राप्त ज्ञानाच्या आधारे व्यक्ती वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये विशेषतः सामाजिक, साहित्यिक, कलात्मक क्षेत्रामध्ये योगदान देऊन व्यक्ती समाजाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करते. म्हणूनच जगातील वेगवेगळ्या समाजातील सुशिक्षित, ज्ञानी व्यक्तींनी आपल्या समाजाची, देशाची प्रगती घडवून आणलेली आहे. हे प्राचीन ज्ञान संस्कृती ग्रंथरूपात सुरक्षित राहते व पुढील पिढीला दिले जाते. संस्कृतीचे संक्रमण, संरक्षण, वाढ व विकास शिक्षणामुळे घडून येतो. म्हणून भारतीय संस्कृतीचे ज्ञान आपण प्राप्त करून घेतले पाहिजे.

**६) चारित्र्य निर्मिती :**

चारित्र्य निर्मिती हे शिक्षणाचे आवश्यक कार्य मानले जाते. मानवाच्या चारित्र्याची जडणघडण त्याच्या जीवनातील सुरूवातीच्या काही वर्षातच निश्चित होत असते. विशेषतः दहा वर्षापासून अठरा वर्षापर्यंतच्या कालखंडातील मुलाच्या मनावर झालेले संस्कार अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यामधून चारित्र्याची निर्मिती होते. घर, कुटुंब, शेजारी, शाळा यामध्ये बालक जी उदाहरणे पाहते. वेगवेगळे अनुभव घेते. त्यामधून त्यांचे स्थिरभाव, वृत्ती निर्माण होतात. एखाद्या बालकामध्ये आई-वडील अथवा शिक्षकांनी आत्मसन्मानाची भावना निर्माण केली की, बालक पुढे आपोआप स्वतःचा आत्मविकास करू लागते. परंतु त्यासाठी योग्य जीवनमूल्यांचा परिचय करून देणे, श्रेष्ठ जीवन पद्धती समजावून घेणे व त्यानुसार जीवन जगणे शिक्षणामुळे शक्य होते. शिक्षणामुळे बालकाचा नैतिक विकास घडणे शक्य असते. म्हणूनच अनेक शिक्षण शास्त्रज्ञांनी चारित्र्य निर्मिती हे शिक्षणाचे मुख्य ध्येय मानले आहे. हर्बर्ट स्पेन्सर यांनी ''उत्तम चारित्र्याची निर्मिती म्हणजे शिक्षण होय' असे म्हटले आहे.

**७) सुयोग्य नागरिकांची निर्मिती :**

व्यक्ती समूहाचा घटक असते. समूह राज्याशी संबंधित असतो. आपण ज्या राज्यात, देशात राहत असतो त्या देशाचे नागरिकत्व आपणास प्राप्त होत असते. म्हणून व्यक्तीलाही राज्याच्या दृष्टीने काही हक्क प्राप्त होतात व काही जबाबदाऱ्याही स्वीकाराव्या लागतात. राज्यातील शिक्षणाची निर्मिती, व्यवस्था, नियोजन व नियंत्रण राज्य करत असते. राज्याची प्रगती, विकास, सुयोग्य नागरिकावर अवलंबून असतो. सुयोग्य नागरिकांची निर्मिती शिक्षणामुळे करता येते. म्हणूनच नागरिकत्वाचे शिक्षण शाळेमधून देण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचबरोबर रेडिओ, टेलिव्हिजन, वृत्तपत्रे, अनेक संपर्क माध्यम इत्यादी द्वारा नागरिकत्वाचे शिक्षण देऊन सुज्ञ, जाणकार, देशहित जोपासणारे, राज्याची प्रगती घडवणारे नागरिक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**८) वृद्धापकाळाची तयारी :**

शिक्षण हे चरितार्थाचे साधन मानले आहे. अर्थोत्पादनासाठी, स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. कोणत्याही प्रकारच्या आर्थिक कार्यासाठी मूलभूत स्वरूपात व्यवसायाचे, धंद्याचे, व्यापाराचे शिक्षण घ्यावे लागते. त्याशिवाय व्यक्ती अधिक सुलभपणे कार्य करू शकत नाही. म्हणून एकदा शिक्षणाच्या आधारे अर्थोत्पादनाची दिशा निश्चित झाली तर वृद्धापकाळही सुखकर ठरू शकतो. शिक्षणाद्वारा व्यक्तीचा सर्वांगीण, संतुलित विकास होत असतो. असा विकास झाला असेल तर व्यक्तीचे स्वभाव, दृष्टिकोन, जीवनपद्धती उत्तम बनते. त्यामुळे वार्धक्यात मानसिक ताण-तणाव संघर्ष निर्माण होत नाहीत. वृद्धापकाल सुखी, समाधानी बनतो.

**९) सामाजिक नियंत्रण :**

प्रत्येक समाजामध्ये समाजमान्य, कल्पना, विचार, परंपरा, मूल्ये, श्रद्धा, विश्वास असतात. या घटकांचा प्रभाव शिक्षणावर पडत असतो. शिक्षणाच्या माध्यमातून मूल्ये, प्रमाणके नीती कल्पना समाजामध्ये प्रसारित केल्या जातात. त्यामुळे समाजातील व्यक्ती समाजमान्य पद्धतीने जीवन जगते. स्वतःच्या वर्तनाला सामाजिक नियमानुसार योग्य वळण देते. समाजमान्य वर्तन करते. त्यामुळे व्यक्तीचे वर्तन नियंत्रित होते. त्यामुळे आपोआप सामाजिक नियंत्रण साध्य होते.

**१०) सामाजिक परिवर्तन :**

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणामुळे अनेक नवीन विचार, नवीन मूल्ये समजतात. नवीन पिढीच्या मनावर त्याचा प्रभाव पडू शकतो. उपयुक्त प्रेरणादायी विचारामुळे नवीन पिढीला मार्गदर्शन व प्रेरणा मिळते. समाजामध्ये विधायक कार्य करावे अशी जाणीव निर्माण होते. त्यामुळे समाजामध्ये बदल घडवून आणण्यासाठी तरूण वर्गाकडून प्रयत्न केला जातो. अशा प्रकारे समाजामध्ये परिवर्तन घडण्यामध्ये शिक्षक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. शिक्षणामुळे समाजाचा विकास होतो. प्रगती घडून येते, त्यामुळे आपोआप सामाजिक परिवर्तन होते. म्हणून सामाजिक परिवर्तनाचे कार्य शिक्षणामुळे शक्य होते.

**११) नवीन सामाजिक पद्धतीचा विकास :**

शिक्षण हे नवनिर्मितीचे साधन आहे. वैज्ञानिक ज्ञान व विचारांचा समाजामध्ये जलद गतीने प्रसार होत आहे. त्यामुळे लोकांच्या जीवनपद्धतीत बदल घडून येत आहे. जुने पारंपरिक अनुपयुक्त विचार परंपरा, रूढी मोडून दिल्या जात आहेत. त्याचबरोबर नवीन विचार पद्धती, रूढी, मूल्ये निर्माण होत आहेत. त्यांचा स्वीकार केला जात आहे. समाजाची प्रगती होत आहे. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता हळूहळू विरघळून जात आहेत. तसेच स्त्रियांवरील पुरूषांची मक्तेदारी संपुष्टात येऊ पाहत आहे. स्त्रियांची सर्व क्षेत्रातील प्रगती नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांचा समाजात वाढत चाललेला दर्जा मान्य करणे अपरिहार्य बनले आहे. स्वातंत्र्य, समानता यासारखी जीवनमूल्ये निर्माण झालेली आहेत. म्हणून बदलत्या समाजरचनेनुसार नवीन मूल्ये, वर्तनप्रकार, जीवन पद्धती लोकांना मोहित करून देण्याचे कार्य शिक्षणामुळेच घडून येते.

**१२) राष्ट्रीय विकास :**

मानव समाजाच्या विकासासाठी राष्ट्र व राष्ट्रांच्या समूहांचा विकास होणे आवश्यक आहे. हे कार्य योग्य शिक्षणाच्या प्रसारातून साध्य करता येते. म्हणूनच संयुक्त राष्ट्रात असलेल्या मागासलेल्या देशातील शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. प्रत्येक राष्ट्रामध्ये लोकांमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचा प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमातून केला जातो. राष्ट्रीय भावना निर्माण झालेले नागरिक राष्ट्राच्या विकासासाठी प्रयत्न करतात. राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने अनुरूप अशी शिक्षणाची योजना प्रत्येक राष्ट्रामध्ये राबवली जाते. त्यामुळे राष्ट्रीय विकास घडून येण्यास मदत होते.

**१३) भावनिक ऐक्य निर्माण करणे :**

आधुनिक काळामध्ये भावनिक ऐक्याची नितांत गरज आहे. बहुतेक देशामध्ये विघटनवादी प्रवृत्ती निर्माण होत आहे. भारत देश त्याला अपवाद नाही. भारतामध्ये मूलतःच जातीयवादी, भाषावाद, प्रांतवाद इ. विघटनवादी प्रवृत्ती दिसून येतात. त्यामुळे देशाचे ऐक्य धोक्यात येते. ही दृष्ट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी विभिन्न प्रकारच्या लोकांमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी सुयोग्य नियोजनबद्ध शिक्षणाची तरतूद केली आहे.

**१४) फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग :**

प्रत्येक व्यक्तीला अधूनमधून रिकामा वेळ मिळत असतो. विशेषतः नोकरीच्या निवृत्तीनंतर रिकामा वेळ कसा घालवावा याचा मोठा प्रश्न असतो. त्यासाठी सुरूवातीपासून विशिष्ट नियोजन

असावे. वाचन, लेखनाची सवय ठेवावी. वेगवेगळ्या कलांची आवड असावी. एखादी कला जोपासण्याचा प्रयत्न करावा. शिक्षणामुळे अनेक नवीन कल्पना, विचार, कृती, कला निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये रमून जाण्याचा प्रयत्न करावा. उतारवयामध्ये आपल्या नातवंडांना नवीन घटक शिकवण्याचा, संस्कृतीचा परिचय करून देण्याचा प्रयत्न करावा. अर्थात या सर्व बाबी ज्या त्या व्यक्तीवर अवलंबून असतात. व्यक्तीचा दृष्टिकोन सकारात्मक असेल, वैचारिक पातळी उच्च असेल, अन्य लोकांत मिसळण्याची आवड असेल. दुसऱ्याला मार्गदर्शन करण्याची क्षमता असेल अशा ज्ञानी व गुणी व्यक्तीला फुरसतीचा वेळ सत्कारणी लावता येतो.

## ७.५ राष्ट्रीय जीवनातील शिक्षणाची कार्ये

मानवी जीवनातील विविध शैक्षणिक कार्ये आपण वरील भागामध्ये पाहिलेली आहेत. आता शिक्षणाची राष्ट्रीय जीवनातील कार्ये विचारात घेऊ या.

प्रगत समाजामध्ये राष्ट्र ही संकल्पना आढळते. आदिवासी समाजात राष्ट्र संकल्पना नाही. प्रथम आपण राष्ट्र या संकल्पनेचा अर्थ विचारात घेऊ या.

''राष्ट्र'' या साठी इंग्रजीमध्ये Nation हा शब्द वापरला जातो. त्यामध्ये मुळ लॅटिन शब्द Natu हा आहे. त्याचा अर्थ जन्मजात वंश असा आहे. म्हणून Nation मध्ये ठराविक वंशाच्या लोकांची एकत्रित वस्ती होय. काही समाजशास्त्रज्ञांनी राष्ट्राच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) बर्जेस : 'एकाच भौगोलिक प्रदेशात वास्तव्य करणारा, समान वंश असलेल्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र होय.'

२)गार्नर : 'समान संस्कृती, समान भूप्रदेश असल्यामुळे प्रबळ ऐक्य असलेल्या मानवी समूहास राष्ट्र म्हणतात.'

थोडक्यात राष्ट्रामधील लोक राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेने एकत्रित आलेले असतात. निदान तशा प्रकारची आवश्यकता असते. राष्ट्रीय भावनेसाठी व्यक्तिगत स्वार्थ, हेतू बाजूला ठेवून सर्व समावेशक राष्ट्रीय उद्देशाच्या पूर्तीसाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. भावनिक ऐक्य निर्माण करण्यासाठी, राष्ट्राचा विकास घडवण्यासाठी शिक्षण विशेष कार्य करत असते. शिक्षणाची ही कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भाविक ऐक्य निर्माण करणे :**

राष्ट्राच्या उभारणीमध्ये भावनिक ऐक्याला विशेष महत्त्व आहे. भावनिक ऐक्य वाढवण्यासाठी सांप्रदायिकता, जातीयवाद, प्रांतवाद, भाषावाद यांसारख्या संकुचित, स्वार्थी व विघटनवादी शक्तीचा प्रभाव कमी करण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करणे. शिक्षणातील समानता, सांस्कृतिक समानता निर्माण करणे. लोकांमध्ये समुदाय भावना निर्माण करण्यासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबवणे, विशेषतः शाळा, महाविद्यालयातून विशेष प्रयत्न केले, तर शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मध्ये आपण सर्वजण एक आहोत. अशी भावना निर्माण करण्यासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबवणे, विशेषतः शाळा, महाविद्यालयातून विशेष प्रयत्न केले तर शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आपण सर्वजण एक आहोत, अशी भावना निर्माण करणे शक्य आहे. त्यामुळे राष्ट्रीय भावना निर्माण होईल, राष्ट्रीय भावनेचा विकास घडून येईल.

**२) सहिष्णुता निर्माण करणे :**

सहिष्णुता म्हणजे दुसरी व्यक्ती अथवा समूहाबद्दलची आदराची भावना. भारतामध्ये अनेक प्रकारची भिन्नता आहे. भारतात अनेक धर्म, भाषा, जाती, संप्रदाय आहेत. त्यामुळे भारतात अधून मधून दंगली निर्माण होतात. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरण, लोकांमध्ये समता, समानता, बंधुता निर्माण करण्याचा प्रयत्न, शिक्षणाच्या विविध अभ्यासक्रम, पद्धती, प्रकल्पामधून साध्य होण्यास मदत होत आहे. आपल्यापेक्षा वेगळ्या समूहाबद्दल आदराची नव्हे, निदान तिरस्काराची भावना निर्माण न करण्याचा प्रयत्न शिक्षणाद्वारा करणे शक्य आहे. सर्व जाती, धर्माचे लोक वेगवेगळ्या प्रसंगी एकत्र आणून परस्परातील भेदात्मक प्रवृत्ती कमी करता येऊ शकते व सर्वांच्या मनामध्ये 'भारत माझा देश आहे' अशी समानतेची भावना निर्माण करणे शक्य आहे.

**३) राष्ट्रभाषेतून शिक्षण:**

कोणत्याही देशामध्ये अनेक भाषा असू शकतात. भारतात तर अनेक भाषा आहेत. त्यामुळे वारंवार भाषिक संघर्ष निर्माण होतात हे टाळण्यासाठी संपूर्ण देशामध्ये एकच 'राष्ट्रभाषा' असली पाहिजे. समान राष्ट्रीय भाषा असल्याशिवाय राष्ट्रीय भावना निर्माण करणे अवघड असते. भाषा हे विचार, भावना प्रगट करण्याचे माध्यम असते. समान भाषा असलेल्या लोकांमध्ये भावनिक ऐक्य निर्माण होते. हिन्दी ही भारताची राष्ट्रभाषा मानली आहे. परंतू प्रंतिक भाषेच्या श्रेष्ठतेच्या वादामुळे हिंदी ही राष्ट्रभाषा बनण्यास असमर्थ बनली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकतेस धोका निर्माण झालेला आहे. म्हणून संपूर्ण भारतभर हिंदी या राष्ट्रभाषेतून शिक्षण देण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला व त्यामध्ये यश प्राप्त झाले तर राष्ट्रीय भावना वाढीस चालना मिळेल.

**४) समर्थ नेतृत्वाची निर्मिती करणे :**

राष्ट्रीय जीवनातील विविध क्षेत्रामध्ये सुयोग्य विकास घडवण्यासाठी समर्थ नेतृत्वाची गरज असते. कोणत्याही देशातील आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामध्ये संतुलित विकास घडवण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज असते. असे नेतृत्व शिक्षणाच्या माध्यमातून तयार होत असते. लहानपणापासून नेतृत्वाची आवड व कौशल्य असलेल्या व्यक्तीची निवड करून त्यांना योग्य व उपयुक्त प्रशिक्षण देऊन, विद्यार्थिदशेपासून वेगवेगळ्या कार्यक्रमात सहभागी करून त्याच्या भिन्न प्रतिभांचा विकास शिक्षणामुळे घडवून आणणे शक्य आहे. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील समर्थ नेतृत्वाची निर्मिती होऊ शकेल.

**५) कुशल कार्यकर्त्यांची निर्मिती :**

केवळ नेतृत्व सामर्थ्यशील असून चालत नाही. नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या भोवताली कुशल, प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा समूह असावा लागतो. कुशल कार्यकर्त्यांची निर्मिती शिक्षणामुळे होऊ शकते. शिक्षणाद्वारा कोणती व्यक्ती कोणत्या क्षेत्रामध्ये अधिक प्रभावीपणे कार्य करू शकेल हे समजू शकते व अशा व्यक्तीला योग्य प्रशिक्षण देऊन अधिक समर्थ बनवता येते, अशी प्रशिक्षित व्यक्ती राष्ट्रीय विकासास, अधिक प्रभावीपणे साथ देऊ शकते.

**६) कर्तव्याची जाणीव निर्माण करणे :**

कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी, राष्ट्रातील लोकांमध्ये तीव्र राष्ट्रीय भावना असावी लागते. शिक्षणातून राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव देता येते. वेगवेगळ्या स्थानावर असलेल्या व्यक्तींना शिक्षणातून

राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव करून दिली जाते. त्यामुळे लोकांना राष्ट्राबद्दल आपलेपणाची भावना वाटू लागते व राष्ट्राच्या विकासासाठी प्रयत्न केला जातो.

**७) राजकीय लोकांच्या आकांक्षामध्ये समानता निर्माण करणे :**

कोणत्याही देशामध्ये वेगवेगळे राजकीय पक्ष असतात. प्रत्येक राजकीय पक्षाची ध्येय, धोरणे भिन्न भिन्न असतात. स्वतःच्या राजकीय पक्षाच्या स्वार्थासाठी 'गैर पद्धतीचा अवलंब केला जातो.' त्यामुळे राष्ट्रातील ऐक्य व स्वतंत्रतेला धोका निर्माण होतो. म्हणून शिक्षणाद्वारा देशाच्या वेगवेगळ्या भागामध्ये राष्ट्राच्या दृष्टीने योग्य राजनैतिक विचारांचा प्रसार करणे शक्य आहे व त्या द्वारा राजकीय पक्षांना राष्ट्राचा सुयोग्य, संतुलित विकास घडवण्यास भाग पाडले पाहिजे.

**८) राष्ट्रीय भावनेचा विकास करणे :**

राष्ट्रीय भावनेचा विकास करण्यासाठी राष्ट्रामध्ये शिक्षणाची योजना राबवली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती ज्या गटाची, समूहाची असते त्या समूहाबद्दल तिला अभिमान वाटतो. भारतासारख्या देशामध्ये अनेक प्रकारची भिन्नता आहे. भारतात अनेक जातीचे, धर्माचे, संप्रदायाचे लोक वेगवेगळ्या प्रांतात राहतात. त्यामुळे प्रत्येकाला स्वश्रेष्ठतेच्या भावनेमुळे स्वतःचा समुदाय आपला वाटतो. अशा समूहाचे हित सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून लोकांच्या मनामधील संकुचित वृत्ती नष्ट करून सर्वसमावेशक दृष्टिकोन निर्माण करणे सत्य आहे. म्हणूनच शाळेतील विविध कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावनेची जाणीव निर्माण केली जाते. राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु या प्रयत्नाला मर्यादा पडतात. म्हणूनच अनौपचारिक पद्धतीने - वृत्तपत्रे, टेलिव्हिजन, विविध ग्रंथ व अन्य आधुनिक संपर्क माध्यमांचा योग्य पद्धतीने उपयोग करून लोकांमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण करणे शक्य आहे.

राष्ट्रीय भावनेच्या निर्मितीमधील शिक्षणाची मुख्य भूमिका आपण आतापर्यंतच्या विश्लेषणामधून समजून घेतली आहे. एकंदरीत देशातील स्त्री-पुरूषांना राष्ट्राचा इतिहास, राष्ट्राची संस्कृती, राष्ट्रभाषाचे महत्त्व विविध कार्यक्रमाद्वारा समजून देणे गरजेचे आहे. लोकांना वरील घटकांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षणाद्वारा लोकांच्या मनातील व्यक्तिगत स्वार्थ नष्ट होतील. राष्ट्रहित महत्त्वाचे मानले जाईल व सर्व लोक तन-मन धन राष्ट्राच्या विकासासाठी खर्ची करतील. अशा लोकांमधून देशाचे खंबीर नेतृत्व निर्माण होईल. राष्ट्राचा विकास घडून येईल. राष्ट्र सामर्थ्यशील बनेल. म्हणून राष्ट्रीय जीवनामध्ये शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे.

## ७.६ समाजीकरण प्रक्रियेतील शिक्षणाची भूमिका आणि महत्त्व

समाजीकरण आणि शिक्षण या दोन्ही अन्योन्यपूरक प्रक्रिया आहेत. या दोन्ही प्रक्रियांना परस्परांपासून वेगळे करता येत नाही. जेव्हा बालकाचे शिक्षण आरंभ होते, त्यास वेळेस समाजीकरणाची सुरूवात होते. शिक्षणाचा उद्देशच मुळात समाजीकरण करणे असतो. या दोन्ही प्रक्रिया बालकाच्या जन्मापासून सुरू होतात आणि मृत्यूने संपतात. त्यास समाजीकरण आणि पुनर्समाजीकरणाचा समावेश असतो. समाजीकरणात फक्त शिक्षणच असते असे नाही. बदलत्या काळात संदर्भात अनावश्यक वाटणाऱ्या गोष्टींना विसरण्याची प्रक्रियासुद्धा अंतर्भूत असते. मुलाला पोहण्यासंबंधी भीती वाटते. जेव्हा तो मनातील पोहण्याविषयीच्या भयाची भावना काढून टाकतो. तेव्हा पोहणे शिकतो. म्हणून समाजीकरणात वर्तन प्रकार आत्मसात करताना काही गोष्टी विसरणेसुद्धा आवश्यक असते.

**१. शिक्षणाची क्षमता :**

समाजीकरणातील शिक्षणाची भूमिका अभ्यासताना हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे की शिक्षणासाठी लागणारी जैविक क्षमता इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा मानवाला विशेषत्वाने लाभलेली आहे. प्राण्यांच्या वर्तनाचे निर्धारण सहज प्रवृत्तीने होते. पक्ष्यांची घरटे बांधण्याची गरज, कालावधी व घरट्याचे स्वरूप सहज प्रवृत्तीने ठरते. त्यासाठी पक्ष्यांना शिकण्याची गरज नसते. या प्रकारच्या जैवसहजप्रवृत्तीतून मानवाचे वर्तन ठरलेले असते. तर जन्मतः प्राप्त झालेल्या साचेबंद वर्तन प्रतिमानामुळे ग्रहणप्रक्रियेवर (Process of learning) बंधन पडलेले असते, तसेच समाजीकरणाची गतिमान प्रक्रिया संभव झाली नसती. संस्कृती व सभ्यता प्रत्ययास आली नसती. परंतु मानवाची जैव दशा प्राण्यापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. मानवी वर्तनात सहजप्रवृत्तीपेक्षा प्रेरणा महत्त्वाच्या आहेत.

बालकास लाभलेला आनुवंशिक वारसा अद्वितीय आहे. त्याची उभे राहण्याची क्षमता, दीर्घदृष्टी, श्रवणशक्ती, हातापायाची ठेवण, अंगठा, त्यातील लवचिकता, ग्रहणक्षमता, भाषा, क्षमता आणि विकासक्षम मेंदू, कार्यकारणभाव जाणून घेण्याची पात्रता यासारख्या कारणामुळे बालकांचे शिक्षण संभव झाले आहे.

**२.आंतरक्रिया :**

समाजीकरण आणि शिक्षणात आंतरक्रिया (Interaction) आधारभूत मानली जाते. ही आंतरक्रिया समान घटकांशी असली पाहिजे. अन्यथा समाजीकरण संभवत नाही. सिंग व मिशनऱ्यास लांडग्याच्या कळपात दोन मुली सापडल्या. त्या मुलींना समाजातील कोणताच वर्तन प्रकार ज्ञात नव्हता. कारण त्यांची आंतरक्रिया लांडग्याशी होती. अनुकरणातून लांडग्यांचे वर्तन त्यांनी आत्मसात केले. पुढे सिंग कुटुंबीयांचा व त्या मुलींचा संपर्क आल्यामुळे त्यांचे मर्यादित प्रमाणात समाजीकरण संभव झाले. एकूण समाजीकरण प्रक्रिया संपन्न होण्यासाठी शिक्षण घेत असताना संपर्क (Contact) पाहिजे आणि समाज घटकात आंतरक्रिया असावी.

**३. स्वीकारशीलता :**

समाजीकरणासाठी बालकाची स्वीकारशीलता मूलभूत मानली जाते. इतर प्राण्यापेक्षा ही स्वीकारशीलता उच्चकोटीची असते. या ग्रहणक्षमतेमुळेच भाषा-आचारविचार, कौशल्ये, पर्यावरणाची माहिती व इतर असंख्य गोष्ट बालक शिकते. ही स्वीकारशीलता शिक्षणातून निर्धारित केली जाते. काही समाजात बालकांना लहानपणापासून मांसाहार देतात. त्यातून ती मुले मांसाहाराचा स्वीकार करतात. त्यांना शाकाहार दिला असता तर त्यांची स्वीकारशीलता वेगळी झाली असती. स्वीकारशीलतेतून खानपानाबरोबर वर्तन प्रतिमान ठरते.

**४. भाषाक्षमता :**

समाजीकरण प्रक्रियेत शिकण्याची प्रक्रिया भाषा क्षमतेशी निगडित आहे. वर निर्देशित केल्याप्रमाणे भाषा क्षमता हे मानवाचेच वैशिष्ट्य आहे. माणूस हा बोलणारा प्राणी आहे, असे या संदर्भात म्हणतात. बालकाजवळ भाषा ग्रहण करण्याची क्षमता असली तरी त्यासाठी समाज सदस्यांचा संपर्क आणि आंतरक्रिया असावी लागते. अर्भकाच्या जन्मापासून माता त्याच्याशी बोलत असते. अर्थात हे बोलणे एकांगी असते. परंतु अर्भकावस्थेनंतर बालकाचा जसजसा शारीरिक व मानसिक विकास होतो. त्याप्रमाणे बालक अनुकरणातून प्रतिसाद देऊ लागते. उदा. हसणे अशा अनुकरण

आधारित प्रतिसादातून हुंकार,बडबडणे, दोन अक्षरी वाक्ये आणि या क्रमाने भाषा आत्मसात करते. हे सर्व माता व कुटुंबातील इतरेजन बालकास शिकवितात. ज्या कुटुंबात जी भाषा बोलली जात असेल तीच भाषा बालक ग्रहण करते, समजा दोन जुळ्या भावापैकी एकाला दुसऱ्या भाषा बोलणाऱ्या कुटुंबात लहानपणापासून ठेवले तर दोन भाऊ त्या त्या कुटुंबातील म्हणजेच वेगवेगळी भाषा बोलतील.

भाषेचे दोन प्रकार केले जातात, जसे

१. हावभाव भाषा (Non-verbal Language)

२. मौखिक भाषा (Verbal Language)

आरंभी बालकास हावभाव भाषा शिकविली जाते आणि पुढे साधारणतः दोन वर्षानंतर मूल मौखिक भाषाग्रहण करते व बोलू लागते.

भाषा शिकण्यामुळे त्याला आपल्या विचार आणि भावनांची अभिव्यक्ती करता येते. गरजांच्या संदर्भात संपर्क साधणे, मागणी करणे आणि गरजांची परिपूर्ती केली जाते. भाषेमुळे आंतरक्रिया फलप्रद ठरते. दुसऱ्या शब्दात आंतरक्रियेची अट संपर्क असली तरी भाषेच्या माध्यमातून तिला अर्थपूर्णता प्राप्त होते. मात्र आंतरक्रियेत सहभागी घटकांना समान भाषेचे ज्ञान असले पाहिजे. भाषा शिकविण्यात मातेची भूमिका आद्य असते. ती जी भाषा शिकविते तीच भाषा मूलग्रहण करते आणि त्या भाषेतून संवाद करते. या दृष्टीने बालकाच्या भाषेला 'मातृभाषा' म्हणतात. भाषा क्षमतेतून समाजीकरण प्रगत होते.

**५. निश्चिच अनुक्रम :**

शिक्षण आणि समाजीकरण यात एक निश्चित स्वरूपाचा अनुक्रम असतो. या अनुक्रमानुसार शिक्षण व समाजीकरणाचा पुढचा टप्पा गाठला जातो. बालक एकदम संवाद साधत नाही आणि तशी अपेक्षाही करता येत नाही. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे बालक हुकार देते. नंतर बडबड करते आणि पुढे शब्दोच्चार करून वाक्यरचना करते. शारीरिक तसेच मानसिक विकासातही असा अनुक्रम असतो. बालकाला शिक्षक प्रथम रेषा, गोलाकार काढण्यास शिकवितात, नंतर मुळाक्षरे किंवा अंक गिरविलेजातात. मूळाक्षराचे ज्ञान झाले म्हणजे वाचनाची सुरूवात केली जाते. त्यातही आरंभी सोपे शब्द, नंतर जोडाक्षरे असा अनुक्रम असतो. आई बालकास स्वतःच्या हाताने जेऊ घालते. त्याच्या कारकशक्तीचा विकास झाला म्हणजे त्याला जेवण्यास शिकविते. भोजन करताना कोणत्या हाताने भोजन करावे, कसे भोजन करावे, हे शिकविले, प्रस्तुत शिकविण्याच्या प्रक्रियेतून भोजन हा वर्तनप्रकार आत्मसात केला जातो. याच रीतीने वर्तन प्रकाराचे शिक्षण देण्यात येते.

समाजीकरणात शिकण्याचा अनुक्रम आणि काळ सदैव लक्षात घेतला जातो. जसे उभे राहण्याची क्षमता आल्यानंतर चालणे आणि चालण्यात प्रगती झाल्यानंतर धावणे इत्यादी.

**६. शिस्त :**

समाजीकरण योग्य प्रकारे होण्यासाठी माता व इतर सदस्य बालकास वर्तनाची शिस्त लावतात. शिस्त म्हणजे समाज अपेक्षित वर्तन करण्याची पद्धती होय. तसे पाहिले तर बालकाचे वर्तन स्वैर असते. त्यास शिस्तीचा अभाव असतो. ही शिस्त मूलमूत्र विसर्जनाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात असते. बालकास त्याला वाटेल त्या प्रमाणे वागू दिले जात नाही. माता त्याला शिस्त शिकविते. भोजन कसे

करावे, कोणत्या हाताचा उपयोग करावा, खाण्याची पद्धती कशी असावी, या सारख्या लहान-लहान गोष्टींचे कटाक्षाने निरीक्षण करून त्याला विशिष्टपद्धती आत्मसात करण्यास शिकविते. शिस्तीमुळे वर्तमान सूत्रबद्धता येते. गरजांच्या पूर्तीबरोबरच आंतरक्रियेतही शिस्तीचे महत्त्वपूर्ण योगदान असते.

**७. आकांक्षा रूजविणे :**

समाजीकरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे बालकाच्या मनात आकांक्षा रूजविणे हे होय. आकांक्षा ही प्रामुख्याने भूमिकेशी संबंधित असते. त्या कुटुंबातील सदस्यांच्या आणि व्यापकदृष्ट्या समाजाच्या मानसिकतेचे प्रतिबिंब आकांक्षातून उमटते. वरच्या वर्गातील लोकांपेक्षा खालच्या वर्गातील आकांक्षेची पातळी निम्न आढळते. शहरी समुदायातील लोकांच्या तुलनेत ग्रामीण भागात आकांक्षा भिन्न प्रकारचीअसते. आदिवासी समुदायात याचा वेगळा विचार करण्यात येत असे. उदा. मुलाने धाडसी बनावे, चांगली वाद्ये वाजवावीत इ.

समाजीकरण प्रक्रियेत बालकाशी कार्यान्वित असलेल्या आंतरक्रियेतून त्यांच्या मनात आकांक्षा निर्माण करीत असताना संभाषणातून वरच्या व्यक्तीच्या भूमिका आदर्श स्वरूपात प्रस्तुत करण्यात येतात. एक प्रकारे बालकास तू काय होणार, हे सतत विचारले जाते. त्या प्रक्रियेत माता व इतरांनी जोपासलेल्या आकांक्षा मुलांपुढे ठेवल्या जातात. उदा. तू डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ-सेनाधिकारी कोण होणार, हे वारंवार विचारले जाते. तसेच त्यासंबंधात तू या व्यक्तीसारखेच झाले पाहिजे हे शिकविले जाते. एकूण समाजीकरण प्रक्रियेत बालकाच्या मनात आकांक्षेसंबंधी सजगता निर्माण करणे हे शिक्षणाचे कार्य असते.

**८. भूमिका शिक्षण :**

समाजीकरणातून युवकाने भूमिका योग्य प्रकारे वठविल्या पाहिजेत म्हणून शिक्षण देण्यात येते. कारण युवकास अनेक भूमिका वठवायच्या असतात. या प्रत्येक भूमिकेशी संबंधित अपेक्षा असतात. त्या अपेक्षांची परिपूर्ती कशा प्रकारे करावी याचे शिक्षण-प्रशिक्षण आवश्यक असते. डॉक्टरची भूमिका वठविण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षण आवश्यक असते. शेतकरी आपली भूमिका वठवितो तेव्हा औपचारिक शिक्षण प्राप्त केलेले नसेलही, परंतु त्यास त्याच्या व इतरांच्या अनुभवातून कशी भूमिका पार पाडावी याचे ज्ञान असते. शिक्षकाची भूमिका औपचारिक शिक्षणातून संपन्न होते तर गृहिणीची भूमिका तिच्या अनुभवाचे आधारे साकारली जाते. सारांश, समाजीकरण प्रक्रियेत भूमिकेचे शिक्षण अतिशय आवश्यक मानले जाते. युवक आणि युवती अनुक्रमे पिता आणि मातेचा आदर्श ठेवून भूमिकांचे अंतरीकरण करतात. दुय्यम समूहात भूमिका वठवितात शिक्षण घ्यावे लागते. उदा. संगणक तज्ज्ञांची भूमिका संगणकाच्या शिक्षणाशिवाय पार पाडता येणे अशक्य आहे.

**९. सामाजिक मूल्ये आणि प्रमाणके :**

ऑगबर्नच्या मते, समाजीकरण म्हणजे त्या समाजातील मूल्य आणि प्रमाणकानुसार वर्तन करणे होय. प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते. संस्कृतीत ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणकांचा अंतर्भाव होतो. या संस्कृतीतील घटकाप्रमाणे व्यक्ती वर्तन करण्यास शिकते. समाज सदस्य हा सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीकडे आंतरक्रियेतून संक्रमित करतात. समाज सदस्यांनी त्यानुसार वर्तन केले पाहिजे. ही सार्थ अपेक्षा त्यांच्याकडून करण्यात येते. समाजीकरणात हे कार्य संपन्न होते. एकूण समाजीकरणासाठी मूल्ये व प्रमाणकानुसार वागणे समाजघटकांना शिकविले जाते.

**१०. कौशल्य प्राप्ती :**

समाजीकरणात समाज सदस्यांना तांत्रिक आणि सामाजिक कौशल्ये शिकविली जातात. कारण त्या शिवाय भूमिकांना न्याय देता येणार नाही. भूमिका शिक्षण कुटुंबातून देण्यात येते. त्या भूमिका कुटुंब आणि नातेवाईकांच्या संदर्भात असतात. परंतु इंजिनीअर किंवा डॉक्टर किंवा शास्त्रज्ञांची भूमिका पार पाडण्यासाठी अनुक्रमे अभियांत्रिकी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, विज्ञान संस्थेत शिक्षण घेणे आवश्यक आहे. उत्तम जीवन जगण्यासाठी कौशल्य प्राप्तीची गरज आहे. कौशल्ये कुणालाही जन्मतः मिळत नाहीत ही शिक्षण प्रक्रियेतून प्राप्त करावी लागतात.

**११. पर्यावरणाचे ज्ञान :**

आधुनिक काळात पर्यावरणाच्या ज्ञानाची निकड सारखी वाटत आहे. पर्यावरणात भूमी, जलवायू, जलप्रवाह, पशुपक्षी, वृक्ष इत्यादी घटकांबरोबर निसर्गातील बदलांचा समावेश होतो. समाजसदस्य भौगोलिक पर्यावरणात जीवन व्यतीत करतात. त्यात काही आकस्मिक बदल घडतात. ज्वालामुखी, वादळे, भूकंप, त्सुनामीसारखी संकटे मानवी जीवन उध्वस्त करतात. आज पर्यावरण प्रदूषणाचा प्रश्न जटिल बनला आहे. समाजात जीवन जगतात या घटकांचे ज्ञान असणे गरजेचे आहे. दुसऱ्या शब्दात गरजा भागविण्यासाठी आणि संपन्न जीवन जगण्याकरिता पर्यावरणाचे शिक्षण समाजीकरणाच्या हेतूने उपयुक्त ठरते.

अशा प्रकारे समाजीकरण प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्वपूर्ण योगदान असते. शिक्षणाशिवाय समाजीकरणाचा विचार करता येत नाही. ग्रामीण समाजातील विलक्षण निरक्षरता निपटून काढून आधुनिक ज्ञानाची व संस्कृतीची गंगोत्री ग्रामीण समाजापर्यंत नेली पाहिजे. याचसाठी सर्वंकष शैक्षणिक योजना, योग्य यंत्रणा, शिक्षण प्रसारासाठी आधुनिक साधनांचा वापर, आर्थिक पाठबळ व प्रशिक्षित शिक्षक या संबंधी विशेष गंभीरपणे विचार करूनच जाणीवपूर्वक वाटचाल केली पाहिजे.

## ७.७ स्वाध्याय

१. शिक्षणाचा अर्थ सांगून शिक्षणाचे प्रकार स्पष्ट करा.

२. शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे सांगा.

३. शिक्षणातील कार्यांचे स्पष्टीकरण करा.

४. राष्ट्रीय जीवनातील शिक्षणाची कार्ये स्पष्ट करा.

५. समाजीकरण प्रक्रियेतील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

६. समाजीकरण प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व सांगा.

♦ ♦ ♦

# ८

# सहकार – संकल्पना – वैशिष्टे – स्वरूप – व्याप्ती – महत्त्व

**पाठाची रूपरेषा**

८.० पाठाचे उद्देश

८.१ प्रास्ताविक

८.२ सहकाराची संकल्पना

८.३ सहकाराची वैशिष्टे

८.४ सहकाराचे स्वरूप

८.५ सहकाराची व्याप्ती

८.६ सहकाराचे महत्त्व

८.७ सहकाराचे ग्रामीण विकासातील महत्त्व

८.८ सहकाराचे फायदे

८.९ स्वाध्याय

## ८.० पाठाचे उद्देश

- सहकाराची संकल्पना समजावून घेणे.
- सहकारची वैशिष्टे अभ्यासणे.
- सहकाराचे स्वरूप समजावून घेणे.
- सहकाराची व्याप्ती आणि महत्त्व अभ्यासणे.
- सहकाराचे ग्रामीण विकासातील महत्त्व जाणून घेणे.
- सहकाराचे फायदे समजावून घेणे.

## ८.१ प्रास्ताविक

सहकाराची संकल्पना विचारात घेताना "विनासहकार नहीं उद्धार, एकमेंका सहाय्य करू अवघे धरू सुपंथे" ही विधाने आपण नियमितपणे राजकारणी, अराजकारणी व्यक्तींच्या तोंडून ऐकतो. या वाक्यांचा व्यावहारिक अर्थ सर्वांनी एकत्रित येऊन समानतेच्या भावनेतून कार्य केल्यास स्वतःचा, समाजाचा, पर्यायाने राष्ट्राचा विकास होईल असाच निघतो. सहकार्य म्हणजे एकत्र राहून एकविचाराने कार्य करणे हे तत्त्व मानवी जीवनाशी अत्यंत निगडित आहे. कारण मानव हा समाजशील

प्राणी असून समाजात एकोपा करून राहतो. एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होऊन जीवन व्यतीत करतो. सहकार्य म्हणजेच सहकार. परंतु सहकार हे तत्त्व खूपच व्यापक आहे.

सहकार म्हणजे एकमेकांच्या सहकार्याने एकत्र काम करणे. व्यक्ती समाजशील प्राणी आहे आणि समाजात राहतो. त्यामुळे व्यक्तीच्या सामाजिक आणि संस्कृतीचा इतिहास हा सहकाराचा आणि सहकार्याचा इतिहास आहे. आधुनिक सहकार चळवळ ही इंग्लंडमधील १८व्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे उदयास आली, असे मानले जाते. औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलशाही अर्थव्यवस्था उदयास आली. शोषणारा आणि शोषित असे दोन वर्ग तयार झाले. प्रचंड सत्ता आणि संपत्ती असलेला भांडवलदार आणि शोषित, दारिद्र्य गरिबीत जीवन जगणारा वर्ग ही भांडवलशाहीची अपत्ये आहेत. या अपत्यांमुळे आणि औद्योगिक क्रांतीच्या प्रभावामुळे वर्गकलह अन्याय आणि विषमता निर्माण झाली. या सर्वांना पर्याय म्हणून सहकार चळवळीचा उगम झाला.

सहकाराच्या संदर्भात वेगवेगळ्या तज्ज्ञांनी आपली भूमिका व्यक्त केली आहे. अर्नेस्ट पॉईसन यांच्या मते 'सहकार हा स्वरूपाने समाजवाद आहे.' लेनिन यांच्या मते, 'फक्त सहकाराची वाढ समाजवादासारखीच आहे', सहकार आणि समाजवाद यामधील भूमिका दोन विधानांच्या माध्यमातून स्पष्ट होतात. ही भूमिका म्हणजे सामाजिक कल्याण हा समाजवादाचा उद्देश असतो. समाजवादात सक्ती अस्तित्वात असते. सहकार चळवळ ही ऐच्छिक संघटना असल्यामुळे सक्तीला तेथे वाव नसतो. समाजवादात खाजगी संपत्तीचे उच्चाटन होते. सहकार खाजगी संपत्ती वाढविण्यास मान्यता देतो. सहकारी संस्थेमध्ये ग्राहक अथवा कर्मचारी स्वत:च संस्थेचे मालक असतात. ते व्यवसाय करतात. सहकारी संस्थांचे कामकाज सुरू झाल्यानंतर इतर व्यावसायिक संस्थांप्रमाणे इतर व्यक्तींना प्रवेशाची दारे बंद नसतात. लायक आणि पात्र व्यक्तींना प्रवेश केव्हाही दिला जातो.

सहकाराची चळवळ ही सामाजिक विकासाची आणि सुसंस्कृतपणाची चळवळ समजली जाते. सहकार म्हणजे एकत्र काम करणे. मानवी जीवनाइतकेच सहकाराचे तत्त्व प्राचीन असल्याने आधुनिक सुसंस्कृतपणाचा इतिहास म्हणजे सहकाराचा इतिहास होय. या संदर्भात काही तज्ज्ञांनी त्याची मते पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

१) विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की मानव जातीचे अस्तित्व व सौख्य हे प्रेम आणि सहकार्य यामधूनच आहे – मॉटेग्यू

२) सामाजिकता हा सहअस्तित्वाएवढाच महत्त्वाचा निसर्गाचा नियम आहे. हे ज्यांना सामाजिक जीवनाचे फायदे समजतात त्यांच्यातून अतिधूर्त व उद्धट नेहमी वगळले जातात. परस्पर मदतीशिवाय मानवी समाज हा एका पिढीत जेवढे आयुष्य असते तेथपर्यंत सुद्धा टिकू शकत नाही. – प्रिन्स पीटर क्रापोटकीन

३) आक्रमक स्पर्धेतून मानव समाजाची उत्क्रांती झाली नसून सहकारात्मक स्पर्धेतून मानव समाजाची उत्क्रांती झाली आहे. – डार्विन

४) सहकार हे निर्मितीचे जागतिक अवजार आहे. – ई. आर. बोवेन

५) सहकार ही जगातील अत्यंत अवघड आणि सौंदर्यसंपन्न कला मानली आहे.

६) स्पर्धा नाही तर सहकार हा भविष्यकाळातील परवलीचा व प्रगतीचा शब्द आहे.

७) समान उद्देश व समान विचाराने, कार्यक्षमतेने आणि उत्तम प्रकारे तुम्ही तुमचे कार्य करू शकता.

वरील सर्व विधाने सहकाराच्या उत्पत्तीपणाच्या संदर्भात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे निगडित आहेत. सहकाराचा इतिहास हा आधुनिक सुसंस्कृतपणाचा इतिहास समजला आहे. १८व्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलशाही आणि विषमता विरूद्ध सहकार हे नवीन तत्त्वज्ञान निर्माण झाले आहे. त्यामुळेच १८४४मध्ये इंग्लंडमधील विणकारांनी एकत्रित येऊन जीवनावश्यक वस्तूंच्या प्राप्तीसाठी ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली आणि आधुनिक काळातील सहकारी चळवळीचा पाया घातला असे असले तरी मानवी जीवनाचा विकासच सहकारातून झालेला आहे. सहकाराची जाणीव लोकांना प्राचीन काळापासून होती, हे या विधानाद्वारे स्पष्ट होते.

## ८.२ सहकाराची संकल्पना

१) समान आर्थिक उद्दिष्ट साधण्याकरिता समान गरज असणाऱ्या अनेक व्यक्ती स्वखुशीने ज्या चळवळीत सामील होतात त्यास सहकार असे म्हणतात. – व्ही. एल. मेहता.

२) सहकार हा संघटनेचा असा प्रकार आहे, ज्यामध्ये व्यक्ती स्वेच्छेने आणि मानव म्हणून एकत्र येतात आणि समानतेच्या तत्त्वाच्या आधारे आपले आर्थिक हितसंबंध सुधारतात – हेन्री कॅल्व्हर्ट

३) सहकार ही स्वत: उपयोग करणाऱ्यांनी स्थापन आणि नियंत्रित केलेली संस्था आहे. या संस्थेमध्ये लोकशाहीचे नियम पाळले जातात. ही संस्था सभासदांची आणि समाजाची सेवा करते – प्रा. पॉल लॅम्बर्ट

४) आपल्या सभासदाचे हित जोपासण्यासाठी सहकार तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय – भारतीय सहकार कायदा, १९१२

५) संयुक्त व्यापार करण्याच्या उद्देशाने दुर्बलांनी निर्माण केलेली ही सहकार एक संघटना असून तिचा कारभार नि:स्वार्थपणे अशा अटींवर चालतो की, सभासदत्वाची कर्तव्ये स्वीकारण्यास तयार असणाऱ्यांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात लाभात सहभाग मिळतो – प्रा. सी. आर. के.

६) सहकार ही एक पद्धती आहे. यापेक्षा त्यात अधिक काही तरी आहे. ह्रदय व मनाला आवाहन – एम. डार्लिंग

७) संघटनेने परिणामकारक केलेले स्वावलंबन म्हणजे सहकार होय. उत्तम शेती, उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान ही सहकाराची तीन तत्त्वे आहेत. – सर होरेस प्लॅकेट

८) सहकार म्हणजे एकता, लोकशाही समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वावर आधारित सामाजिक संघटना होय – डब्ल्यू. पी. वॅटकीन

9) " The theory of Co-operation states very briefly that an isolated and powerless individual can by association with others & moral development & mutual support obtain in his own degree, the material advantages available to welht and powerful persons & thereby develop himself to the fullest extent of his abilities" – Edward Maclagan Committee Report- 1914.

सहकार तत्त्वज्ञान असे आहे की, एकाकी, दुर्बल व्यक्तीला इतरांशी सहकार्य करून परस्पर साहाय्यांच्या व नैतिक विकासाच्या आधारे सधन व सबळ व्यक्तींना उपलब्ध असलेले भौतिक लाभ स्वत:साठी मिळविता येऊ शकतात आणि व्यक्तीच्या नैसर्गिक क्षमतेचा विकास साधत. – एडवर्ड मॅक्लॅगन समिती -१९१४

१०) सहकारी संस्था ही व्यक्तिसमूहांची किंवा समाजाची अशी संघटना आहे की, ज्या संघटनेच्या सभासदांचे आर्थिक व सामाजिक कल्याण साधण्यासाठी परस्पर साहाय्य आणि नफ्याचे उच्चाटन यावर आधारलेला उद्योग किंवा व्यवसाय स्थापन केला जातो त्याद्वारे समाजाच्या सामान्य आर्थिक गरजांची पूर्तता होते. – पी. ई. विरामन

११) सहकार म्हणजे सामाजिक आशय असलेली अर्थपद्धती होय – पी.एच. कॅसलमन

१२) "सामुदायिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजा आणि अपेक्षांच्या पूर्तीसाठी स्वेच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तींच्या संयुक्त मालकीची व लोकशाही पद्धतीने नियंत्रित केली जाणारी स्वायत्त संस्था म्हणजे सहकारी संस्था." – डॉ. इयान मॅकपर्सन अहवाल

१३) सहकार ही जगातील अत्यंत अवघड आणि सौंदर्यसंपन्न कला आहे – डॉ. एम. पी. जॅकस्

१४) सहकार हे निर्मितीचे जागतिक अवजार आहे. – आर. बोवेन

१५) सहकारी संस्था या आर्थिक विकास, सामाजिक उद्दिष्टे, सामाजिक परिवर्तन साध्य करण्यासाठी प्रयत्नरत असलेल्या व सांस्कृतिक विकास साध्य करण्यासाठी सहकारी मूल्ये अबाधित राखून सहकारी तत्त्वावर काम करणाऱ्या व्यावसायिक संघटना होय – मॅँचेस्टर कॉँग्रेस – सप्टेंबर १९९५

१६) सहकार म्हणजे स्वेच्छेने एकत्रित आलेल्या व्यक्तींची संघटना असून आर्थिकदृष्ट्या दुर्बलांनी निर्माण केलेली आणि नि:स्वार्थी भूमिकेतून संयुक्त व्यवहारासाठी स्थापन केलेली चळवळ होय. चळवळीच्या माध्यमातून स्थापन झालेल्या संस्थांचा कारभार सहकार तत्त्वावर चालविण्यात येतो. संस्थेत सभासद ज्या प्रमाणात व्यवहार करतात त्या प्रमाणात संस्थेच्या लाभात ते सहभागी होतात.- डॉ. गंगाधर वि. कायंदे-पाटील

१७) ग्राहकांना त्यांच्या आवडीप्रमाणे आर्थिकदृष्टो शक्य असेल इतक्या कमी किमतीत त्यांच्या गरजेनुसार माल किंवा सोयी उपलब्ध करून देणे हाच ज्याचा उद्देश आहे. अशा उद्योगाला सहकारी उद्योग म्हणता येईल. हा उद्देश पार पाडण्याची हमी म्हणून ग्राहकच त्याचे मालक असणे, त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणी मालक नसणे हे आवश्यक आहे. – जेरी वूव्हिस

१८) संयुक्त प्रयत्नांनी एक समान ध्येय गाठण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह किंवा गट म्हणजे सहकार – सी. एफ. स्ट्रिकलंड

१९) संयुक्त प्रयत्नांनी एक समान ध्येय गाठण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींची सामाईक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्थापलेली स्वयंशासित संयुक्त मालकीची आणि लोकशाही पद्धतीने चालणारी संस्था आहे. – आय. सी. ए. १९९५ मँचेस्टर मधील व्याख्या

२०) Co-operation is better way of life and in fact it is inevitable way when we live in cowder community – Pandit Jawaharlal Nehru.

## ८.३ सहकाराची वैशिष्टे

सहकारासाठी इंग्रजीत '**Co-operation**'हा शब्द आहे. लॅटिन भाषेतील '**Co-operare**' या शब्दापासून '**Co-operation**' शब्द तयार झाला आहे. लॅटिन भाषेत '**Co-operare**' या शब्दाचा अर्थ एकत्र काम करणे असा आहे. वरील सर्व तज्ज्ञांची मते आणि समित्यांच्या अहवालाचे तात्त्विक दृष्टिकोनातून विचारांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. वरील विचारांवरून असे स्पष्ट होते की, सहकार म्हणजे समान आर्थिक ध्येयांच्या पूर्तीसाठी असलेले ऐच्छिक संघटन आहे. हे संघटन समानता या तत्त्वावर आधारित असते. इ.स. १९४६साली श्री. सरय्या यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीने श्री. कॅलव्हर्टची परिभाषा मान्य केली आहे. मेहता यांनी सहकाराकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहिल्याचे स्पष्ट होते, तर डॉ. गंगाधर कायंदे-पाटील यांची व्याख्या सहकाराची तत्त्वे स्पष्ट करणारी महत्त्वपूर्ण व्याख्या आहे.

मागील व्याख्यांवरून सहकाराची वैशिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सहकार ही काही व्यक्तींची संघटना आहे.

२. आर्थिकदृष्टो दुर्बल घटकांनी एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करून सहकाराचा पाया घातला आहे.

३. सहकाराची स्थापना संयुक्त सहकाराची स्थापना संयुक्त व्यवहारातून होते.

४. सहकारी संस्थेचा कारभार निःस्वार्थी भूमिकेतून केला जातो.

५. सहकारी संस्थेची जबाबदारी सर्व सभासदांवर असते.

६. सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात लाभ दिला जातो.

७. सहकार म्हणजे स्वेच्छेने एकत्रित आलेल्या व्यक्तींची संघटना आहे.

८. आर्थिकदृष्टो दुर्बल घटकांसाठी सहकार चळवळ उपयोगी आहे.

९. सभासदांना सहकारामध्ये समान दर्जा प्राप्त होतो त्यांची उद्दिष्टे समान असतात. सहकारामध्ये समानता महत्त्वाची आहे.

१०. सहकारामध्ये लाभापेक्षा स्वावलंबन, सेवाभाव आदी तत्त्वांवर प्राधान्य देण्यात येते.

११. सहकारमध्ये नीतिमूल्यांना विशेष स्थान आहे.

१२. सहकार म्हणजे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची चळवळ आहे.

१३. सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश संस्थेच्या सभासदांचे आर्थिक हित जोपासणे.

१४. सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो आणि एक व्यक्ती एक मत हे तत्त्व पाळले जाते.

१५. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकार चळवळ उदयास आली. मोठ्या प्रमाणात वाढली.

१६. सहकाराच्या माध्यमातून सभासदांचा सर्वांगीण विकास होतो / होऊ शकतो.

१७. सहकार चळवळीच्या माध्यमातून सभासदांना बचत, आर्थिक काटकसर यांची शिकवण देण्यात येते आणि ही शिकवण प्रत्यक्ष अनुभवातून मिळते.

१८. सहकार चळवळ ही मानवनिर्मित मानवहिताची चळवळ आहे.

१९. सहकारामध्ये सभासदांची जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत असा भेदाभेद करण्यात येत नाही.

२०. सहकार हा भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था यांना जोडणारा महत्त्वपूर्ण आर्थिक दुवा आहे.

२१. सहकार संदर्भात अनेक प्रकारचे कायदे कालानुरूप तयार करण्यात आले असून, त्यामध्ये परिस्थितीनुरूप बदल करण्यात आलेला / झालेला आहे.

यावरून सहकार ही सर्वांकरिता चालवलेली चळवळ असून, त्यामध्ये प्रामाणिकपणा, समान दर्जा, समान हक्क, एकमेकांबद्दल आदर आदी गुणांचा समावेश होतो. गरीब व श्रीमंत असा भेद सहकारामध्ये केला जात नाही म्हणूनच सहकार ही जनतेची चळवळ, आर्थिकदृष्टो कमकुवत वर्गातील व्यक्ती स्वतःची जात, धर्म, पंथ विसरून समानतेच्या तत्त्वावर एकत्रित येऊन कार्य करतात. सहकार म्हणजे भांडवलशाही व समाजवाद यांना जोडणारा सुवर्णमध्य आहे. सहकाराचा उगम मानवी संस्कृतीबरोबर झाला आहे हेही कळते. सहकाराचा अर्थ आणि व्याख्या याबाबत प्रत्येकाने वेगवेगळ्या अंगांनी विचार केलेला आहे हेही स्पष्टपणे आढळून येते.

## ८.४ सहकाराचे स्वरूप

सहकार ही चळवळ आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला देण्यात आलेला समर्थ पर्याय आहे. सहकाराची विविध गुणवैशिष्टे आणि लक्षणांवरून सहकार चळवळीचे नेमके स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. सहकार ही व्यक्तींची संघटना :**

सहकारी संस्था स्थापन करून आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी समान उद्दिष्टांचा आधार समाजातील काही व्यक्ती एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करतात. त्यामुळे सहकार ही व्यक्तींची संघटना आहे. सहकारी संस्थेचे सभासदत्व स्वीकारण्याबाबत कुणावरही सक्ती करता

येत नाही. तथापि एखादा सभासद स्वेच्छेने सभासदत्वाचा त्याग करू शकतो. याचाच अर्थ व्यक्तींची संघटना आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मुद्यांना सहकार या व्यक्तीच्या संघटनेत महत्त्व दिलेले आहे.

**२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना एकत्रित आणणारी चळवळ:**

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यक्ती एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करतात. सभासद होणाऱ्या व्यक्ती समाजातील श्रीमंत किंवा भांडवलदार किंवा बड्या असामी नसतात. सभासदामध्ये विचार करण्याची पातळी, आर्थिक विकास, इत्यादींबाबत ध्येय सारखे असते. सभासदांचे उद्देशही सारखेच असतात. त्यामुळे एकत्रित आलेल्या सभासदांमध्ये जात, धर्म, पंथ, वर्ग, ध्येय, इत्यादींबाबत एकसमानता असते. सहकाराचे स्वरूप स्पष्ट करताना या मुद्यांचा विचार करावा लागतो.

**३. लाभप्राप्तीपेक्षा सभासदांचा सर्वांगीण विकास हे ध्येय :**

सहकाराव्यतिरिक्त व्यवसाय संघटनेतील इतर प्रकारांत एकत्र व्यापार, भागीदारी आणि संयुक्त भांडवली प्रमंडळामध्ये लाभप्राप्ती हा महत्त्वाचा उद्देश असतो. सहकारी संस्था हा व्यवसाय संघटनेचा असा प्रकार आहे, ज्यामध्ये लाभप्राप्तीला गौण स्थान दिलेले आहे. सहकारी संस्थेच्या सभासदांचा सर्वांगीण आर्थिक विकास हे सहकारी हे  संस्था करण्याचे प्रमुख ध्येय असते. सहकारी संस्थांमध्ये सभासदांच्या गरजांची पूर्तता करणे, सभासदांना वाजवी किंमतीत चांगल्या दर्जाच्या वस्तू उपलब्ध करून देणे, सभासदांची सेवा करणे या ध्येयांना महत्त्व दिले जाते. त्यामुळे लाभप्राप्ती गौणस्थान असते.

**४. नीतिमूल्यांना महत्त्व :**

सहकारी संस्थांमध्ये नीतिमूल्यांना महत्त्वाचे स्थान आहे, एवढेच नव्हे, तर सहकार चळवळ नीतिमूल्यांवर आधारित आहे, हे या चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्टे आहे. लाभप्राप्ती, पिळवणूक, फसवणूक, मालात भेसळ करणे, ग्राहकांची उपेक्षा करणे, खोटी मापे वापरणे इत्यादी बाबींना सहकार चळवळींमध्ये स्थान दिले जात नाही.

**५. सभासदांना समान संधी :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यक्तींनी समान उद्दिष्टांपोटी स्थापन केलेली सहकार ही चळवळ असल्याने संस्थेच्या सर्वच सभासदांना विकासाची समान संधी उपलब्ध होते. सभासदांना सहकार्य  करून आर्थिकदृष्ट्या सशक्त करून त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यात मदत मिळते म्हणून सहकार चळवळीचे सभासदांना समान संधी हे वैशिष्टे महत्त्वपूर्ण आहे आणि सहकाराचे स्वरूप ही बाब विचारात घ्यावी लागते.

**६. सभासदांचे समान ध्येय व उद्दिष्ट :**

कोणतीही एक व्यक्ती स्वप्रयत्नाने फार मोठी प्रगती करू शकत नाही. कारण प्रगतीच्या मार्गातील अडथळे त्या व्यक्तीस सहजपणे पार पाडता येत नाहीत. त्यामुळे सहकारी संस्था हा असा प्रकार आहे की, दुर्बल घटकांतील व्यक्ती समान ध्येय समोर ठेवून एकत्र येतात. त्यांच्या प्रगतीचे उद्दिष्ट नीतिमूल्यांवर आधारित संबंधातून साध्य होते. म्हणून सहकाराचे स्वरूप विचारात घेताना या उद्दिष्टास महत्त्व दिले जाते.

### ७. स्वावलंबन आणि सेवा :

सहकार याचा अर्थ सहकार्य असा असून एकमेकांना साहाय्य करणे, सभासदांना स्वावलंबनाचा मार्ग दाखविणे, नीतिमूल्यांचा विचार करून आर्थिक विकासांसाठी प्रयत्न करणे, तसेच त्यांच्या आर्थिक जीवनमानात वाढ करण्यासाठी त्यांनी उचित आणि वाजवी दराने सेवा उपलब्ध करून देणे. या सर्व प्रकारांतून सभासदांचे आर्थिक हित जोपासणे, त्यांच्या प्रगतीचे विकासाचे दार उघडे करून देणे हाच यांमागील महत्त्वाचा उद्देश असतो. सहकाराचे स्वरूप स्पष्ट करताना स्वावलंबन व सेवेचा विचार करावा लागतो.

### ८. वैयक्तिक स्वार्थापेक्षा सामूहिक हितास प्राधान्य :

सहकार चळवळीत एकापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतात. त्यांचे ध्येय आणि उद्देश सारखे असल्याने सर्व सभासद सामूहिक ध्येयास प्राधान्य देतात. सभासदांचे सामूहिक ध्येय हे व्यक्तिविकास किंवा सभासद विकासावरच आधारित असते. त्यामुळे सभासदांना वैयक्तिक स्वार्थाचा विचार करण्याची गरज पडत नाही. तथापि वैयक्तिक स्वार्थ आणि सामूहिक ध्येय यांमध्ये प्रश्न उद्‌भवला, तर सभासदास वैयक्तिक हित दूर करावे लागते.

### ९. सामाजिक परिवर्तन :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोषांतून सहकार चळवळीचा उगम झालेला असल्याने सहकार चळवळीस सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख हत्यार मानले आहे. समान उद्दिष्टपूर्ती, नीतिमूल्याची जोपासना, आर्थिक विषमतेस पायबंद, मध्यस्थांचे उच्चाटन, सामूहिक हितास प्राधान्य. विकासाची समान संधी, इत्यादींमुळे सहकार चळवळ ही सामाजिक परिवर्तनाची चळवळ मानली जाते.

### १०. मध्यस्थांचे उच्चाटन:

उत्पादित वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वितरणाचे अनेक मार्ग आहेत. या सर्व मार्गांमध्ये मध्यस्थास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. उत्पादक आणि ग्राहक यांमध्ये या मध्यस्थांचे प्राबल्य आहे. मध्यस्थ त्यांच्या सेवेचा मोबदला मोठ्या प्रमाणात घेत असल्याने ग्राहकांना वस्तू वाजवी किमतीत मिळत नाहीत. मध्यस्थांचे अनेक दोष वस्तू व सेवांच्या गुणवत्तेच्या संदर्भात आढळून येतात. यावर उपाय म्हणून सहकारी संस्थांची स्थापना करून मध्यस्थांचे उच्चाटन करणे व ग्राहकांना योग्य आणि वाजवी किमतीत वस्तूंचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने सहकार चळवळीस महत्त्व आहे.

### ११. लोकशाही पद्धतीने व्यवसाय संघटन :

सहकार चळवळ ही मूलतः लोकशाही पद्धतीने कारभार करणारी, व्यवस्थापन बघणारी चळवळ / संस्था आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटने (**I.L.O.**) ने सामान्य मर्यादित साधने असलेल्या व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्रित येऊन आपली समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकशाही पद्धतीने व्यवसाय संघटनेचे नियंत्रण करण्यासाठी जी संस्था निर्माण केली जाते, त्या संस्थेस सहकारी संस्था असे म्हटले आहे. लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन म्हणून व्यवसाय संघटनेस महत्त्वाचे स्थान दिले आहे.

### १२. भांडवलशाही अर्थव्यवस्थेस समर्थ पर्याय:

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत खासगी क्षेत्राचा प्रभाव, व्यक्तिस्वातंत्र्य, वैयक्तिक लाभप्राप्ती, सरकारी धोरणावर उद्योगपतींचे प्राबल्य असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहक आणि समाजातील दुर्बल घटक हा उपेक्षित राहतो. समाजात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसते, त्यातून वर्गसंघर्ष वाढण्यास खतपाणी मिळते पर्यायाने देशात अशांतता निर्माण होते. असे होऊ नये यासाठी प्रत्येकास विकासाची समान संधी मिळावी, नीतिमूल्यावर आधारित विकास व्हावा यासाठी सहकाराचा समर्थ पर्याय म्हणून विचार केला जातो. सहकाराकडून अशा संस्थांना मदत मिळते.

### १३. समताधिष्ठित स्वरूप:

समाजामध्ये समताधिष्ठित वातावरण निर्माण करावयाचे असेल, तर सहकार चळवळीच्या माध्यमातून असे वातावरण निर्माण करता येते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोषांवर उपाय, समाजवाद आणि भांडवलशाहीतील सुवर्णमध्य इत्यादी प्रकारांतून देखील या बाबींचा विचार होतो. समान दर्जा, समान ध्येय आणि समान विकासाची संकल्पना इत्यादी बाबींकडे या दृष्टीने लक्ष दिले जाते, कारण समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी हे आवश्यक आहे.

### १४. समाजहितविरोधी कार्यरत संस्थांचे निर्मूसन आणि त्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण :

समाजात दोन वर्गांचे हितसंबंध नेहमी परस्परविरोधी असतात. एक वर्ग हा कायमस्वरूपी समाजहिताच्या विरोधात कार्यरत असतो आणि समाजाच्या विकासात अडथळे आणतो. एवढेच नव्हे, तर त्यांच्या संस्थासुद्धा पद्धतशीरपणे त्यासाठी कार्यरत असतात. अशा संस्थांचे निर्मूलन करण्याचे कार्य सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्रभावीपणे करता येते. सहकारी संस्थांचे सभासद त्यांना प्राप्त होणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून समाजविकासाचे कार्य करू शकतात, म्हणून सहकाराचे स्वरूप बघताना समाजहित विरोधी कार्यरत संस्थांचे निर्मूलन आणि त्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण या मुद्यांचा परामर्श घ्यावा लागतो.

वरील सर्व मुद्यांच्या आधारे सहकाराचे स्वरूप स्पष्ट होते. शेवटी "सहकार ही सहकार्यासाठी, एकमेकांच्या आर्थिक विकासासाठी, नीतिमूल्यांवर आधारित असलेली चळवळ आहे" हे विधान सहकाराचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी पुरेसे आहे.

## ८.५ सहकाराची व्याप्ती

व्यवसाय संघटनेचे एकल व्यापार, भागीदारी संस्था, संयुक्त भांडवली प्रमंडळ आणि सहकारी संस्था असे चार प्रमुख प्रकार आहेत. सहकारी संस्थांचा अपवाद सोडल्यास इतर सर्व व्यवसाय प्रकार लाभप्राप्तीला महत्त्व देणारे असून हे व्यवसाय फक्त लाभ आणि लाभप्राप्तीसाठीच करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते. तथापि सहकार ही एक प्रवृत्ती आहे. सहकारी चळवळ आहे. सहकार समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील व्यक्तींनी एकत्रित येऊन सभासदांचा आर्थिक विकास आणि उन्नतीसाठी स्थापन केलेली संघटना असल्याने सहकाराच्या व्याप्तीचा आपणांस विचार करावा लागतो.

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून इंग्लंडमधील विणकारांनी रॉशडेल यांच्या नेतृत्वाखाली ग्राहक सहकारी भांडाराची स्थापना जीवनावश्यक वस्तूंचा सभासदांना पुरवठा करण्याच्या उद्देशातून केली आणि आधुनिक सहकार चळवळीचा पाया घातला. जर्मनीमध्ये शुल्झेडेलिश यांच्या सहकार पद्धतीमुळे विविध प्रकारच्या विशेषतः व्यापाऱ्यांना आणि शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांची निर्मिती होऊ शकली, हे सहकाराच्या व्याप्तीचा विचार करताना नमूद करणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर जर्मनीमध्ये शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी रफायझन सहकार पद्धती स्थापन करण्यात आली होती. त्यामुळे इंग्लंडमधील आणि जर्मनीमधील सहकार पद्धतीचे समान उद्दिष्ट पूर्तीसाठी एकत्रित येणे हे सूत्र आहे.

डेन्मार्कमध्ये दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणावर असल्याने अनेक दुग्धविकास सहकारी संस्था कार्यरत आहेत. सहकार या व्यवसाय संघटनेचा प्रकार जगातील अनेक देशांत प्रभावी ठरला आहे. असे म्हटल्यास चुकीचे ठरत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारास विशेष महत्त्वाचे स्थान आहे. भारतातील सहकारी साखर उद्योग, सहकारी सूतगिरण्या आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे देशातील लक्षणीय स्थान हे देशातील सहकाराच्या व्याप्तीचे स्वरूप आणि क्षेत्र स्पष्ट करते. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी अंदाजे ४० ते ४५ टक्के लोकांच्या सहकार चळवळीशी खालील एका प्रकारातून प्रत्यक्ष संबंध आलेला आहे.

१. सहकारी बँकांचे कर्ज घेणे, खाते उघडणे, जामीनदार राहणे, भाग (**shares**) खरेदी घेणे.

२. सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करणे.

३. ग्राहक विविध वस्तू भांडाराची स्थापना करणे.

४. बहुद्देशीय सहकारी संस्थेची स्थापना करणे किंवा सभासद होणे.

५. सहकारी कृषी उत्पन्न बाजार समिती सभासद, खरेदी-विक्री.

६. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासदत्व स्वीकारणे.

७. नोकरदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतपुरवठा संस्था सभासदत्व कर्मचाऱ्याने स्वीकारले.

८. दुग्धविकास सहकारी संस्थांद्वारे निर्मित उत्पादन विकत घेणे. उदा. वारणा श्रीखंड इ.

९. कुक्कुटपालन कार्यासाठी सहकारी संस्थेचे कर्ज घेणे.

१०. गृहनिर्माण कार्यासाठी सहकारी संस्थेचे कर्ज घेणे.

११. सहकारी उपसा जलसिंचन योजनेचे सभासद होणे.

१२. सहकारी रूग्णालये स्थापन करणे.

१३. कृषी माल उत्पादन प्रक्रिया उद्योग सुरू करणे किंवा मालाची विक्री करणे.

१४. राज्य सहकारी बँकेचा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून फायदा घेणे.

१५. विद्यार्थी सहकारी संस्था / भांडारे स्थापन करणे, सभासदत्व स्वीकारणे किंवा वस्तू खरेदी करणे.

१६. महिला सहकारी संस्थांमधून वस्तू खरेदी करणे.

१७. विद्युत सहकारी संस्थेचे सभासद होणे.

१८. सहकारी संस्थांमध्ये नागरी पतसंस्था, बँका, शेती पतसंस्था, विपणन संस्था, ग्राहक भांडारे, दुग्ध व्यवसाय संस्था, कुक्कुटपालन संस्था, श्रमिक संस्था, ग्राहक भांडारे, पाणी व वीजपुरवठा संस्था, विविध कार्यकारी सेवा सोसायटी, विद्यार्थी ग्राहक भांडार, वनमंजूर संस्था, बांधकाम सहकारी संस्था, उपसा जलसिंचन, खतनिर्मिती, आदिवासी सहकारी संस्था, सूतगिरणी, विणकर संस्था आणि मोटार वाहतूक संस्था इ.चा समावेश असल्याने सहकाराची व्याप्ती ही अतिशय व्यापक असल्याचे दिसून येते.

प्रत्येक क्षेत्रात सहकारी शिरकाव / प्रवेश झालेला असून, या संस्था प्रभावीपणे कार्यरत आहे. हा सर्व भाग सहकाराच्या संस्थांचा व्याप्तीशी निगडित आहे. आज सहकाराने व्यापलेले क्षेत्र भविष्यात अधिक व्यापक होत जाईल यात शंका नाही.

## ८.६ सहकाराचे महत्त्व

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारचे दोष आढळून येतात, ज्यामध्ये उत्पादनाच्या साधनांवर मर्यादित व्यक्तीचा अधिकार, आर्थिकदृष्ट्या दुर्बलांचे शोषण, वर्णद्वेष, वर्गसंघर्ष, संपत्तीचे असमान वितरण इ. भांडवलशाही व्यवस्थेस पर्याय म्हणून सहकारास महत्त्वाचे स्थान आहे. तथापि सहकाराचे महत्त्व विचारात घेताना अ) आर्थिकदृष्ट्या महत्त्व. ब) सामाजिकदृष्ट्या महत्त्व. क) शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व. ड) राज्य व देशाच्या दृष्टिने महत्त्व. इत्यादी घटकांचा विचार करून महत्त्व स्पष्ट करणे उचित ठरेल. सहकारचे महत्त्व पुढीलप्रमाणे –

**अ) आर्थिकदृष्ट्या महत्त्व:**

सहकाराचे आर्थिकदृष्टया महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल –

१. सहकारी संस्थेच्या सभासदांनाच नव्हे, तर समाजातील इतरांनादेखील वाजवी किमतीत वस्तू प्राप्त होतात.

२. गरजेनुसार जीवनावश्यक वस्तूंची खरेदी वाजवी दराने करून आर्थिकदृष्ट्या जीवनमान उंचावले जाते.

३. मध्यस्थ किंवा सावकारामार्फत अवाजवी दराने कर्ज न घेता सहकारी पतसंस्था किंवा सहकारी बँकांतून शासनाने रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या व्याजदराने कर्ज मिळते.

४. विविध प्रकारच्या लघु आणि कुटिरोद्योगांना सहकारी पतसंस्थांकडून उचित दराने कर्जपुरवठा होतो.

५. स्वत: घर बांधणे किंवा फ्लॅट घेणे हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. हे केवळ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून साकारले जाते.

६. कृषी उत्पादित माल सहकारी संस्थांच्या माध्यमातून विक्री केल्यास शेतकऱ्यांची फसवणूक टाळता येते व पिळवणुकीस पायबंद बसतो.

७. खासगी क्षेत्रातील व्यापारी आणि उत्पादकांच्या मक्तेदारीस आळा बसविता येतो.

**ब) सामाजिकदृष्ट्या महत्त्व –** सहकाराचे सामाजिकदृष्ट्या महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येते –

१. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना सामाजिकदृष्ट्या एकत्र आणले जातात.

२. समान उद्दिष्टांच्या माध्यमातून सामाजिक विकास होतो.

३. आपापसात परस्पर प्रेम आणि आपुलकी निर्माण केली जाते.

४. सभासदांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या स्वावलंबनाचा मंत्र शिकविला जातो.

५. समाजास व्यसनाधीनतेपासून दूर ठेवले जाते.

६. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

७. सभासदांना बचतीची आणि काटकसरीची सवय लावली जाते.

८. समाजात विकासाची भावना निर्माण करून वाढीस लावली जाते.

९. समाजाचे नीतिधैर्य वाढविले जाते.

**क) शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व –** सहकाराचे शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल –

१. शिक्षण संस्था स्थापन करून सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध करून दिले जाते.

२. सभासदांना सहकाराचे लोकशाही नीतिमूल्यांचे शिक्षण दिले जाते.

३. सभासदांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यात सुसंस्कृतपणाची भावना वृद्धिंगत केली जाते.

४. मानवी नीतिमूल्ये जोपासण्याचे आणि स्पर्धानिर्मित द्वेष टाळून विकास करण्याचे शिक्षण दिले जाते.

**ड) राज्याच्या किंवा देशाच्या दृष्टीने महत्त्व –** सहकाराचे राज्याच्या किंवा देशाच्या दृष्टीने महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल –

१. देशाच्या आर्थिक विकासाचा संदर्भ हा सहकार चळवळीशी जोडला जातो.

२. सहकारामध्ये समानतेच्या तत्त्वावर विकासाला महत्त्व दिले जात असल्याने सरकारी धोरणे सहकारी संस्थांना अनुकूल राहू शकतात.

३. सहकाराच्या माध्यमातून अनेक सरकारी योजना प्रभावी पद्धतीने राबविण्यात येतात.

४. सरकारकडून सहकारी संस्थांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली जाते.

५. जनकल्याणासाठी सरकारकडून जे कार्य अभिप्रेत आहे, परंतु सरकारला करता येत नाही, अशी सर्व कार्ये सहकारी संस्थांच्या माध्यमातून पूर्ण केली जातात.

## ८.७ सहकाराचे ग्रामीण विकासातील महत्त्व

शोषणमुक्त समाज निर्माण करणे, गरजू आणि दुर्बल घटकांना एकत्रित करून संघटनेच्या माध्यमातून आवश्यक त्या सेवा उत्पादन हाती घेणे 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर चालविणे. सर्व गरजूंना मुक्त प्रवेश देणे, लोकशाही पद्धतीने कारभार चालविणे या मूलसिद्धांतावर सहकारी चळवळ आधारित आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीचे स्थान व सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत, समाजवादी समाजरचनेच्या ध्येयानुसार खाजगी व सार्वजनिक उपक्रमाबरोबर ,सहकारी अर्थव्यवस्थेचाही मोठा वाटा आहे. सहकारी चळवळीतील सहकारी पतपुरवठा दुग्धउत्पादन, साखरउत्पादन, कृषीमालाचे उत्पादन, कृषी मालाचे विपणन, सहकारी गृहनिर्माण संस्थांबरोबरच मजूर, जंगल कामगार, आदिवासी, मच्छीमार, बदकेपालन, ससेपालन यांसारख्या दुर्बल घटकांच्या सहकारी संस्थांनी कृषिग्रामीण व नागरी भागाच्या विकासात मोलाची भर टाकली आहे.

सहकारी संस्था आपल्या सदस्यांच्या सामाजिक गरजांकडे वाढत्या प्रमाणात लक्ष घालू लागल्या आहेत. बालस्वास्थ्य व वृद्धांसाठी दिवसभराची काळजी घेणाऱ्या केंद्राची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा संस्थांना आवश्यक ते अर्थसाहाय्य व सुविधा पुरविण्याचा प्रयत्न सहकारी ग्रामीण व नागरी समाजामध्ये क्रीडास्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून संपूर्ण समाजाचे जीवन समृद्ध करू लागल्या आहेत.

आर्थिक क्षेत्रात पिळवणूक करणाऱ्या वाढत्या विघातक प्रवृत्तींना आळा घालण्याचे आणि ग्रामीण भागातील लोकांचे विशेषतः कमकुवत वर्गाचे हितरक्षण करण्यासाठी सहकारी चळवळ ही एक प्रभावी आघाडी बनत चालली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळवून देण्याच्या दृष्टीने सहकारी संस्थांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरली आहे.

आपापल्या क्षेत्रामध्ये सहकाराने स्वतःचे संघटन निर्माण केलेले आहे. सहकारी संस्था या स्थानिक लोकांनी निर्माण केलेल्या असून सहकारात असलेल्या संस्थेचा मालक म्हणजे सभासद होय. संस्थेचा कर्मचारीवर्ग हा स्थानिक असून त्यांना संस्थेच्या अडीअडचणी व संस्थेच्या बलस्थानाची चांगली माहिती असते. इतर सहकारी संस्थांबरोबरच दैनंदिन गरजेच्या स्वच्छ व निर्भेळ वस्तू ग्राहकांना वाजवी किमतीत कशा प्राप्त होतील यासाठी ग्राहक भांडाराच्या माध्यमातून काही सहकारी संस्था कार्यरत आहेत. सुशिक्षित लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संस्था कार्य करीत आहेत.

आज महाराष्ट्रामध्ये समाजजीवनाच्या विविध अंगांमध्ये सहकार चळवळीने पदार्पण केले आहे. ग्रामीण शेती सेवा, सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय संस्था, शेती, पाणीपुरवठा संस्था, सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, विविध प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्था, ग्राहक भांडारे, गृहबांधणी संस्था अशा अनेक प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत.

आज आपल्याकडे विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात ग्रामीण विकासामध्ये सहकारी चळवळीचे स्थान फार मोठे आहे. शेती आणि ग्रामीण विकासाची जबाबदारी असलेल्या शासनाच्या कामगिरीपेक्षा महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात सहकारी चळवळींचा सिंहाचा वाटा आहे. सहकारी यंत्रणेद्वारा प्रत्यक्ष शेतकऱ्याचा सहभाग ग्रामीण विकासात महत्त्वाचा ठरला आहे. शासनाच्या विकास योजनांचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी सहकारी यंत्रणा अधिक उपयोगी ठरते. जेथे सहकाराचा अभाव असेल तर तेथे

शासनही अपुरे पडते. शासनाने पूर्ण केलेल्या विकास योजनांचा काही वेळा पाठपुरावा न केल्याने अशा योजना भविष्यामध्ये बंद पडतात. म्हणून ग्रामीण भागात सहकार चळवळ समर्थपणे उभी राहिली पाहिजे.

पश्चिम महाराष्ट्रात गावागावांतून विविध कार्यकारी शेती सेवा संस्था उत्तमरीतीने कार्य करीत आहेत. शेतकरी सभासदांच्या सर्व प्रकारच्या गरजा सहकारी संस्थांमार्फत भागविण्याचे कार्य या संस्था पार पाडीत आहेत. ग्रामीण समाजामध्ये असे एकही क्षेत्र नाही की ज्याला सहकार चळवळीने स्पर्श केलेला नाही. शेतीसाठी खते, औषधे, कीटकनाशके, अवजारे, जीवनोपयोगी वस्तू वगैरे सर्व सेवा सहकारी संस्थांमार्फत पुरविल्या जातात. तसेच अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठाही मोठ्या प्रमाणात सेवा सहकारी संस्थांमार्फत केला जातो. त्याचप्रमाणे दुग्धव्यवसाय व उपसासिंचन योजनांद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचे महान कार्यही सहकारी संस्थाच करीत आहेत. गूळउत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यासाठी सहकारी गुऱ्हाळ घर, मार्केटिंगसाठी खरेदी-विक्रीसंघ, सहकारी साखर कारखाने व उसापासून उपपदार्थ बनविण्यासाठी सहकारी अर्कशाळा, कागद कारखाने किंवा विविध उपयोगी रसायने तयार करणारे कारखानेही उभारले जात आहेत. शेतीला संलग्न अशा प्रकारची यंत्रणा सहकारी तत्त्वावर आज वापरली जात आहे. सहकार चळवळीशिवाय ग्रामीण भागातील असंघटित दुर्बल व छोट्या शेतकऱ्यांना स्पर्धेच्या या आधुनिक युगात वाटचाल करणे केवळ अशक्य झाले असते म्हणून सहकार चळवळ हा शेतीनिष्ठ ग्रामीण समाजाचा आधारस्तंभ ठरला आहे.

## ८.८ सहकाराचे फायदे

सहकाराचे वेगवेगळे फायदे आढळून येतात हे फायदे आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक फायदे या शीर्षकांतर्गत अभ्यासले जातात. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) सहकाराचे आर्थिक फायदे –** सहकाराचे आर्थिक फायदे पुढीलप्रमाणे सांगितले जातात.

**१) सेवांचा पुरवठा :**

सहकार ही चळवळ आहे. सहकार चळवळीच्या माध्यमातून अनेक संस्था स्थापन केल्या जातात. या सहकारी संस्था आपल्या सभासदांना स्वस्त दराने वेगवेगळ्या सेवा पुरवितात.

**२) वेगवेगळ्या सोयी :**

सहकारी संस्थेच्या आर्थिक कार्याच्या माध्यमातून जमीन सुधारणा, जलसिंचनाच्या सोयी, तांत्रिक ज्ञान, जमिनीचे तुकडे जोडणे, खते व बी-बियाण्यांचा पुरवठा, पतपुरवठा, विजेचा पुरवठा आणि ग्राहकांसाठी वेगवेगळ्या वस्तूंचा पुरवठा केला जातो.

**३) उत्कृष्ट दर्जाच्या वस्तू :**

सहकारी संस्थांचा उद्देश नफा प्राप्ती नसला तरी सभासदांच्या गरजांकडे विशेष लक्ष पुरविले जाते. ग्राहकांना कमीत कमी किमतीमध्ये उत्कृष्ट दर्जाच्या वस्तू उपलब्ध करून दिल्या जातात.

**४) जीवनविषयक प्रशिक्षण :**

सहकार क्षेत्रात स्वावलंबन, काटकसर आणि बचतीला महत्त्व असल्याने सर्वसामान्य व्यक्तींना आपले जीवनविषयक प्रशिक्षण प्राप्त होते.

**५) परस्पर संबंध :**

सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कामगारांवर हेतुपुरस्सर अन्याय केला जात नाही.

**६) स्थिर रोजगार :**

सहकारी संस्थांमध्ये वेगवेगळ्या कामासाठी व्यक्तींची गरज भासते. त्यामुळे स्थिर रोजगार उपलब्ध होतो.

**७) बाजारपेठेत नियमितपणा :**

सहकारी संस्थांमध्ये सभासदांच्या गरजा विचारात घेऊन उत्पादन, वितरण आणि मागणी-पुरवठ्यामध्ये समतोल प्रस्थापित करून बाजारपेठेत नियमितपणा आणला जातो.

**८) जमाखर्चात अचूकपणा :**

सहकारी संस्थांमधील जमाखर्चामध्ये अचूकपणा आढळून येतो. त्यामुळे प्रामाणिकपणास प्रोत्साहन देऊन इतरांचा विश्वास संपादन करता येतो. पर्यायाने चुकीच्या प्रथा आणि चुकीच्या पद्धती नाहीशा केल्या जातात.

**९) वितरण खर्चात काटकसर :**

सहकारी संस्थांच्या माध्यमातून उत्पादन ते ग्राहकांपर्यंत पक्का माल पोहोचविण्याच्या क्रिया हाती घेतल्या जातात. त्यामुळे अनावश्यक मध्यस्थांचे उच्चाटन, अनावश्यक सेवांची पुनरावृत्ती टाळणे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, भेसळ आणि वजन-मापातील अपप्रवृत्ती वितरण व्यवस्थेत टाळून खर्च कमी केला जातो.

**१०) ग्राहकांची क्रयशक्ती वाढविणे :**

सहकारी संस्थेच्या सभासदांना वेगवेगळ्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. चांगल्या दर्जाच्या वस्तूंचा पुरवठा केला जात असल्याने त्यांची क्रयशक्ती वाढते आणि पैशाची बचत होण्यास मदत होते. बचतीतून दुसऱ्या वस्तू खरेदी केल्या जाऊ शकतात.

**११) मक्तेदारीस प्रतिबंध :**

ग्राहकांच्या दृष्टीने मक्तेदारी किंवा एकाधिकारास सहकारी संस्थांच्या माध्यमातून आळा बसतो, कारण वेगवेगळ्या वस्तू आणि सेवांचे वितरण सहकारी संस्थांच्या माध्यमातून होते.

**१२) आर्थिक विषमता दूर करण्यासाठी :**

समाजातील श्रीमंत व्यक्तींना इतर प्रकारच्या संस्थांच्या माध्यमातून फायदे प्राप्त होतात, परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना सहकारी संस्थांच्या माध्यमातून फायदे प्राप्त होतात. त्यामुळे समाजातील आणि देशातील आर्थिक विषमता दूर होण्यास मदत होते. संस्थेच्या लाभाची न्याय्य प्रमाणात वाटणी सभासदांमध्ये होते.

**ब) सहकाराचे सामाजिक फायदे –** सहकार ही सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. सहकाराचे सामाजिक फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सहकारी संस्थांमुळे ग्राहक विरूद्ध उत्पादक, कामगार विरूद्ध मालक, शहरी विरूद्ध ग्रामीण असे परस्पर विरोधी तणावपूर्वक संबंध आटोक्यात आणले जातात.

२. धर्म, जात, भाषा, राज्य, वंश आणि व्यवसाय यापेक्षा सहकाराचे स्वरूप वेगळे आहे. सहकार ही जीवन जगण्याची शैली म्हणून विकसित झाली आहे.

३. गैरमार्ग आणि हिंसाचाराचा अवलंब न करता, सामाजिक परिवर्तन हे सहकार चळवळीच्या माध्यमातून घडवून आणता येते.

४. सहकारामुळे व्यक्तीविकासातून सामाजिक विकास साधता येतो.

५. सहकार हे शांततामय सामाजिक परिवर्तनाचे साधन समजल्याने समाजामध्ये परिवर्तनासाठी सहकाराचा उपयोग होतो.

६. सहकारामुळे कर्तव्याची जाणीव निर्माण होऊन वेगवेगळ्या व्यक्ती आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न करतात.

७. सहकारामुळे शोषणविरहित समाजाची निर्मिती होते आणि त्यातून भावनात्मक ऐक्य वाढीस लागते.

८. सहकारामुळे नीतिमत्ता विकसित होऊन समाजाचा नैतिक स्तर उंचावला जातो.

९. सहकारामुळे सामाजिक नेतृत्व आणि सामाजिक नेतृत्वातून राजकीय नेतृत्व निर्माण होते.

**क) सहकाराचे शैक्षणिक फायदे –** सहकाराचे शैक्षणिक फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालत असल्यामुळे लोकशाही व्यवस्थेचे शिक्षण सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्राप्त होते.

२. लोकशाही पद्धतीचे प्रत्यक्ष शिक्षण सभासदांना सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्राप्त होत असल्याने संस्थांच्या व्यवस्थापनातील त्यांचा सहभाग वाढतो.

३. सहकारी संस्थेच्या सभासदांना व्यवस्थापकीय ज्ञान, सहकार कायद्याची ओळख, नियम, पोटनियम, शासनाचे निर्णय व पळवाटा याबाबत माहिती होते.

४. सहकार तत्त्वामुळेच वेगवेगळ्या सहकारी संस्था (साखर कारखाने, बँका, सूतगिरण्या, खत कारखाने व इतर प्रक्रिया संस्था इ.) यशस्वी झाल्या आहेत.

५. सहकारामुळे सर्वसामान्यांना आधुनिक व्यवस्थापनाचे शिक्षण व प्रशिक्षण प्राप्त होते.

## ८.९ स्वाध्याय

१. सहकाराची संकल्पना स्पष्ट करून सहकाराची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.

२. सहकारचे स्वरूप सांगून सहकाराची व्याप्ती विशद करा.

३. सहकाराचे ग्रामीण विकासातील महत्त्व सांगा.

४. सहकाराचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक फायदे सांगा.

♦ ♦ ♦

# १

# ग्रामीण सामाजिक परिवर्तन
**(सांस्कृतिकीकरण)**

**पाठाची रूपरेषा**

१.० पाठाचे उद्देश

१.१ प्रास्ताविक

१.२ सांस्कृतिकीकरणाचा अर्थ

१.३ सांस्कृतिकीकरणाची वैशिष्ट्ये

१.४ सांस्कृतिकीकरणास चालना देणारे घटक

१.५ सांस्कृतिकीकरण संकल्पनेच्या मर्यादा

१.६ स्वाध्याय

## १.० पाठाचे उद्देश

- सांस्कृतिकीकरणाचा अर्थ समजून घेणे.
- सांस्कृतिकीकरणाची वैशिष्ट्ये जाणून घेणे.
- सांस्कृतिकीकरणास चालना देणारे घटक कोणते ते पाहणे.
- सांस्कृतिकीकरणाच्या संकल्पनेच्या मर्यादा सांगा.
- सांस्कृतिकीकरणाचा अर्थ

**सांस्कृतिकीकरण:**

## १.१ प्रास्ताविक

सांस्कृतिकीकरणाची संकल्पना व्यापक स्वरूपाची आज जरी वापरली जात असली तरी सुरूवातीस सांस्कृतिकीकरणाऐवजी ब्राह्मणीकरण ही संज्ञा श्रीनिवास यांनी वापरली. कुर्ग समाजातील ब्राम्हणवर्गातील लोकांचे आचार, विचार, पेहराव, आहारविषयक संकल्पनाचे अनुकरण कनिष्ठ जातीतील लोक आपला सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी करीत असतात, हे जेव्हा श्रीनिवास यांना आढळून आले तेव्हा त्यास ब्राह्मणीकरण अशी संज्ञा त्यांनी वापरली. परंतु वरिष्ठ जातीच्या परंपराचे रीतिरिवाजांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती कनिष्ठ जातीतील लोक प्रत्येक प्रादेशिक समाजात

कमी-अधिक प्रमाणात करीत असतात. असे श्रीनिवास यांना जेव्हा आढळून आले तेव्हा ब्राह्मणीकरणाऐवजी सांस्कृतिकीकरण हा शब्द वापरण्यास सुरूवात केली. सांस्कृतिकीकरण हा शब्द प्रयोग सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात त्यांनी वापरलेले आहे. म्हणून ब्राह्मणीकरण हा शब्दप्रयोग फक्त कुर्ग समाजातील परिवर्तनासाठी वापरला, तर सांस्कृतिकीकरण हा शब्द प्रयोग सर्व प्रादेशिक समाजातील परिवर्तनासंबंधी त्यांनी वापरला.

डॉ. श्रीनिवास यांच्या मते सांस्कृतिकीकरणाचाा अर्थ हा फक्त रीतिरिवाजांच्या किंवा परंपराच्या अनुकरणापुरता मर्यादित नाही, तर नवीन विचारमूल्ये उच्च जातींनी जी स्वीकारलेली आहेत त्यांच्या पुरस्कारांशी निगडित आहेत. असे नवीन विचार धार्मिक किंवा धर्मनिरपेक्ष विशाल समुदायात नेहमीच आढळून येत असतात.

आजकाल अनुसूचित जातीमधील उच्चशिक्षित व विविध क्षेत्रांत कार्य करीत असलेल्या नवीन पिढीत आपली  पारंपरिक आडनावे बदलून उच्च समजल्या जाणाऱ्या जाती समुदायाची आडनावे लावून घेण्याची जी प्रवृत्ती दिसून येते ती एक सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया म्हणून ओळखली जाते.

सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत उच्च जाती समुदायाचे आचारविचार, परंपरा, नवीन मूल्ये, आहार, पेहराव, वेशभुषा, धार्मिक रीतिरिवाज इत्यादीचे अनुकरण कनिष्ठ जातीतील लोकांनी करण्याच्या प्रक्रियेवर डॉ. श्रीनिवास यांनी भर दिलेला आहे. कुर्ग समाजातील १२ कनिष्ठ जाती समुदायांनी सांस्कृतिकीकरणाच्या माध्यमातून आपला सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा अभ्यास त्यांनी १९५२ मध्ये केला.

साधारणतः असे मानले जाते की जातिव्यवस्था ही ताठर असून तिच्यात प्रत्येक जातीचे स्थान निश्चित असते. त्यात बदल संभवत नाही. श्रीनिवास यांच्या मते जातीव्यवस्थेत परिवर्तनाची प्रक्रिया किंवा गतिशीलतेची शक्यता नेहमीच दिसून येते. एखादी कनिष्ठ जात एक-दोन पिढ्यानंतर शाकाहारी बनून व मद्यपानाचा त्याग करून जातीत उच्चस्थान प्राप्त करू शकत असे. कनिष्ठ जात उच्चजातीचे विशेषतः ब्राम्हणांचे कर्मकांड, संस्कार, श्रद्धा, जीवनपद्धती व अन्य सामाजिक लक्षणांचा स्वीकार करते. या प्रक्रियेलाच श्रीनिवास यांनी ब्राह्मणीकरण म्हटले. पुढे इतरही उच्चजातीच्या रीतिरिवांजाचे व जीवन पद्धतीचे अनुकरण करतात. त्यामुळे श्रीनिवासांनी या प्रक्रियेला ब्राह्मणीकरणाऐवजी सांस्कृतिकीकरण असे नाव दिले.

## ९.२ सांस्कृतिकीकरणाचा अर्थ

१. ही एक गतिशील अशी प्रक्रिया आहे की जिच्यामध्ये कनिष्ठ जाती शाकाहाराचा स्वीकार व मद्यपानाचा निषेध करून एक-दोन पिढ्यांनंतर जातीच्या रचनेत उच्चस्तरावर जाण्यासाठी गतिशील होतात.

२. सांस्कृतिकीकरण ही अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे एखादी कनिष्ठ जात किंवा आदिम जमात किंवा एखादा अन्य समूह आपल्या प्रथा, कर्मकांड, विचारसरणी व जीवनपद्धती यामध्ये वरिष्ठ जातीच्या दिशेने बदल घडवून आणतो.

थोडक्यात सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ जात किंवा आदिम जमात वरिष्ठ जातीच्या

आचारविचारांचे अनुकरण करून काही काळानंतर जातीच्या रचनेत सोपान परंपरात उच्चसामाजिक स्थान प्राप्त करते.

३. कनिष्ठ जाती अगर जमातीनी वरीष्ठ जातीची जीवनपद्धती स्विकारणे म्हणजेच सांस्कृतीकरण होय.

## १.३ सांस्कृतिकीकरणाची वैशिष्ट्ये

सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेशी वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

**१. ब्राह्मणीकरणापेक्षा व्यापक:**

श्रीनिवास यांनी ब्राह्मणीकरण संज्ञेपेक्षा सांस्कृतिकीकरण या संज्ञेस अधिक प्राधान्य दिले आहे. त्याची त्यांनी काही कारणे सांगितली आहेत. सांस्कृतिकीकरण ही ब्राह्मणीकरणापेक्षा व्यापक संज्ञा आहे. वैदिक काळात ब्राह्मण मांसभक्षण व मद्यसेवन करीत पशुबळी देत असत. उत्तर वैदिक काळात मात्र त्यांनी या गोष्टीचा त्याग केला. आज बहुसंख्य ब्राह्मण शाकाहारी असून ते मद्यपानाचा निषेध करतात.

सांस्कृतिकीकरण्याच्या प्रक्रियेत नेहमीच समूह ब्राह्मण नसतो. इतरही उच्चजातीच्या आचारविचारांचे अनुकरण कनिष्ठ जाती करताना दिसतात. दक्षिण भारतातील लोहार स्वतःस विश्वकर्मा ब्राह्मण मानतात ते जानवे घालतात.

**२. आंधळे व अविवेकी अनुकरण:**

सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत काही वेळा कनिष्ठ जाती वर्तमानकाळातील आदर्शनुसार योग्य व कार्यात्मक ठरणाऱ्या अशा आचारणाचा त्याग करून त्याजागी ब्राह्मणांची अशी मुले आत्मसात करतात.

अविवेकी आचारणाच्या अनुकरणाचे आणखीन एक उदाहरण म्हणजे ब्राह्मण व इतर उच्च जातीय स्त्रीकडून तिने पतीला परमेश्वर मानणे, पतीने जेवल्यानंतर तिने जेवणे, पतीच्या दिर्घायुष्यासाठी तिने व्रतवैकल्ये करणे, पुत्रप्राप्ती हे धार्मिक कर्तव्य मानणे इत्यादी अपेक्षा केल्या जातात. सांस्कृतिकीकरणात या आणि अशाच आचार विचारांचे अनुकरण कनिष्ठ जातीकडून होते. त्यामुळे सांस्कृतिकीकरण हे उच्चजातीच्या जीवनपद्धतीचे आंधळे व अविवेकी अनुकरण ठरते.

**३. प्रभावशाली जातीचे अनुकरण :**

श्रीनिवास यांच्या मते कनिष्ठ जातीनी काही काळ ब्राह्मणांचे अनुकरण केले. परंतु नंतर कनिष्ठ जातींनी स्थानिक प्रभावशाली जातीचे अनुकरण सुरू केले. श्रीनिवास यांच्या मते ज्या जातीतील लोकसंख्या इतर जातीपेक्षा अधिक असते. जिच्याकडे अधिक व राजकीय सत्ता असते. जातीच्या रचनेत जिचा उच्च असा धार्मिक दर्जा असतो. जिच्यात उच्चशिक्षितांची व उच्चव्यावसायिकांची संख्या अधिक असते. ती जात या भागात प्रभावशाली ठरते. अशा जातीकडे मोठ्या प्रमाणात शेतजमीन असते. त्यामुळे तिला त्या भागात प्रतिष्ठा व वर्चस्व लाभलेले असते.

**४. धार्मिक निधीचे अनुकरण :**

काही वेळा काही कनिष्ठ जाती आर्थिक व राजकीयदृष्ट्या सत्ताधारी असल्याचे दिसून येते. पण धार्मिकदृष्ट्या मात्र त्यांना उच्च सामाजिक स्थान मिळालेले नसते. हे स्थान प्राप्त झाल्याशिवाय त्यांचे संस्कृतीकरण झाले असे म्हणता येत नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या शक्तिशाली असणाऱ्या कनिष्ठ जाती उच्च जातीचे धार्मिक विधी व कर्मकांड आत्मसात करून आपला दर्जा उंचावला असा दावा करतात. त्यामुळे सांस्कृतिकीकरणात धार्मिक विधींच्या अनुकरणास विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसते.

**५. आर्थिक स्थितीशी संबंध नाही :**

आर्थिक उन्नती होणे ही सांस्कृतिकीकरणाची आवश्यक अट नाही. आर्थिक उन्नतीबरोबर सांस्कृतिकीकरण झालेच पाहिजे असेही नाही. एखाद्या कनिष्ठ जातीने अगर आदिवासी जमातीने राजकीय सत्ता हस्तगत केल्यास त्यामुळे तिची आर्थिक उन्नती होऊ शकते तसेच सांस्कृतिकीकरणही होऊ शकते. या संदर्भात श्रीनिवास यांनी म्हैसूरजवळील रामपुरा खेड्यातील अस्पृश्यांचे उदाहरण दिले आहे. त्यांचे खूपच सांस्कृतिकीकरण झाले आहे. मात्र त्यांच्या आर्थिक स्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

**६. दुहेरी प्रक्रिया:**

सांस्कृतिकीकरण ही एकमार्गी प्रक्रिया नसून दुहेरी आहे. सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ जाती जमातीकडून अशा काही गोष्टी स्वीकारतात. तसेच त्यांना काही गोष्टी प्रदानही करतात. ब्राह्मण मंडळी भारतभर पूज्यनीय असणाऱ्या महान हिंदू देवतांच्या बरोबरच काही अशा स्थानिक देवाचीही पूजा करताना आढळतात. काही अशीही उदाहरणे सापडतात की ब्राह्मण आपल्या ब्राह्मणोत्तर मित्रांद्वारे देवतांना पशू बळी देतात. अर्थात स्थानिक संस्कृतीत देण्यापेक्षा घेण्याची प्रवृत्ती अधिक दिसून येते.

**७. आदिम जमातीचे सांस्कृतिकीकरण:**

सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया केवळ हिंदूधर्मातील कनिष्ठ जातीपुरतीच मर्यादित नसून ती आदिम क्षेत्रातही दिसून येते. बहुतेक आदिम जमातीचे शेजारी हिंदू असल्याने फार पूर्वीपासून आदिम जमातीनी सांस्कृतिकीकरणाद्वारे हिंदूंच्या श्रद्धा व कर्मकांडाचा स्वीकार केलेला आढळतो. उदा. हिमालयातील थारू व खासा या जमातींनी जानवे व हिंदू कर्मकांड स्वीकारून ठाकूर लोकांशी विवाह संबंध जोडून स्वतंत्र क्षत्रिय म्हणून संबोधण्यात मजल मारली आहे. पश्चिम भारतातील भिल्ल मध्य भारतातील गोंड व उराल जमातीनीही सांस्कृतिकीकरणाद्वारे स्वतंत्र जाती व दर्जाची मागणी केलेली दिसून येते.

**८. अनिश्चित कालावधी:**

सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत समूहाला उच्चस्थान वा दर्जा आपोआप प्राप्त होत नाही. त्यासाठी अनिश्चित काळापर्यंत वाट पाहावी लागते. त्यासाठी सतत दबाव टाकीत राहावे लागते. सांस्कृतिकीकरण कनिष्ठ जातीला उच्चस्थान प्राप्तीसाठी जरी साहाय्यक ठरले नाही तरी ते मांस भक्षण, मद्यपान, अशुद्ध व्यवसाय इत्यादी त्याग करण्यास व सांस्कृतिक परंपरा, विश्वास व देवदेवता

इत्यादींचा स्वीकार करण्यास रोखू शकत नाही. अशा प्रकारे गतिशीलतेचा उद्देश सफल न होताही सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया लोकप्रिय होऊ शकते.

## १.४ सांस्कृतिकीकरणास चालना देणारे घटक

भारतात सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया प्राचीन काळापासून चालत आलेली दिसून येते. या प्रक्रियेत चालना देणारे घटक वेगवेगळ्या कामात वेगवेगळे दिसल्याचे दिसून येतात.

**१. राजाची कृपादृष्टी :**

पूर्वी भारतात छोटी छोटी राज्ये होती. राजाच्या सेवेत असलेल्या काही कनिष्ठ जातींना आपला सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी संधी मिळत असे. राजेलोक आपल्या सेवेत असणाऱ्या कनिष्ठ जातीतील लोकांची स्वामीनिष्ठा, युद्धातील शौर्य, त्याने इमानेइतबारे केलेली सेवा इत्यादीमुळे संतुष्ट होऊन त्यांना इनाम वतन किताब प्रतिष्ठा बहाल करीत. अशा प्रकारे राजाची कृपादृष्टी लाभल्यामुळे काही कनिष्ठ जातीतील लोक स्वत:ला उच्चदर्जाचे मानू लागले.

**२. तीर्थक्षेत्र :**

श्रीनिवास म्हणतात की, भारतातील तीर्थक्षेत्रांचा सांस्कृतिकीकरणातील सहभाग मोठा आहे. तीर्थक्षेत्राच्या अभिक्षेत्रात अनेक जातीधर्माचे लोक एकत्र येतात. त्या ठिकाणी उच्च-नीच प्रबळ दुर्बल जातीचे लोक जमतात. कनिष्ठ जातीच्या लोकांना तेथे राहून प्रबळ व उच्चजातीच्या आचार विचारांचे अनुकरण करण्याची संधी मिळते.

३. ब्रिटिश राजवटीत सांस्कृतिकीकरणास विशेष चालना मिळाली. ब्रिटिश राजवटीत औद्योगिकीकरण नागरीकरण व्यावसायिक गतिशीलता साक्षरता प्रसार, दळणवळणाची प्रगत साधने व पाश्चात्य तंत्रज्ञान इत्यादींचा प्रभाव पडून कनिष्ठ जातींना काही सोयी सवलती दिल्या. त्यांच्यावरील काही पारंपरिक निर्बंध उठविले. त्यामुळे कनिष्ठ जातीतील लोकांना खाणेपिणे, आचारविचार, पूजाअर्चा इत्यादीत बदल घडवून आणणे शक्य झाले. मागासजातीच्या संघटना उदयास येऊन त्यांनी आपल्यासाठी सुधारणा मागण्यास प्रारंभ केला. तसेच या संघटनांनी आपल्या लोकांना स्वत:च्या अनिष्ट प्रथा व सवयींचा त्याग करण्यास सुचविले. परिणामी सांस्कृतिकीकरणाचा मार्ग सुलभ होण्यासाठी मदत झाली.

**४. जनगणना :**

भारतीयांची आर्थिक, धार्मिक व सामाजिक स्थिती जाणून घेण्याच्या उद्देशाने ब्रिटिश शासनाने सुरू केलेल्या जनगणनेत जातवार नोंद होऊ लागली. त्यामुळे कनिष्ठ जातींना आपले स्थान उंचावण्याची संधी मिळाली. बऱ्याच कनिष्ठ जातींनी आपली उच्चजात म्हणून जनगणनेत नोंद करून घेतली. लेखी नोंद झाल्याने कनिष्ठ जातींना उच्चजात म्हणून कायदेशीर मान्यता मिळण्यास मदत झाली.

**भारतीय संविधान:**

श्रीनिवासच्या मतानुसार स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने संसदीय लोकशाहीतील राजकीय

संस्थांचा स्वीकार केल्यामुळेही सांस्कृतिकीकरणाचा प्रसार होण्यास काही प्रमाणात चालना मिळाली आहे. सांस्कृतिकीकरणात मद्यनिषेध केला जाते. भारतीय संविधानाने दारूबंदीचे तत्त्व स्वीकारले आहे.

## ९.५ सांस्कृतिकीकरण संल्पनेच्या मर्यादा

सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीने सांस्कृतिकीकरण या संकल्पनेची उपयुक्तता खूपच मर्यादित आहे. असे स्वतः श्रीनिवास यांनी म्हटले आहे. यांच्या मते ही संकल्पना अत्यंत विजातीय आहे. ती एकच एक संकल्पना नसून अनेक संकल्पनाची गोळाबेरीज आहे. सांस्कृतिकीकरण हे अत्यंत विस्तृत अशा सांस्कृतिक प्रक्रियेचे केवळ नाव आहे. सांस्कृतिकीकरण संकल्पनेच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

१. सांस्कृतिकीकरणाची एक मर्यादा अशी की, या संकल्पनेच्या साहाय्याने जातीव्यवस्थेवर आधारलेल्या भारतासारख्या समाजातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप समजावून घेता येते. इतर समाजासाठी जेथे जातिव्यवस्था नाही तेथे ही संकल्पना उपयुक्त नाही.

२. सांस्कृतिकीकरणातून येणाऱ्या गतिशीलतेमुळे समूहाच्या केवळ स्थानात बदल होतो. संरचनेत बदल होत नाही. सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया ही वर्णव्यवस्थेचे उच्चाटन न करता तिला अधिकच बळकटी आणते.

३. श्रीनिवास यांनी म्हटले आहे की, भूतकाळात अनेक कनिष्ठ जातींनी उच्चस्थान प्राप्त केलेले आहे आणि या जाती राजकीय आदेशामुळे किंवा शक्तिप्राप्त करून प्रभावशाली जाती बनल्या आहेत.

४. सांस्कृतिकीकरणाची संकल्पना सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण मुख्यतः संस्कृतीच्या संदर्भात करते.

५. भारताच्या काही भागांत इस्लामी परंपरांचेही अनुकरण केलेले दिसते. शीख धर्मात हिंदू व मुस्लिम परंपरांचे अनुकरण दिसून येते.

## ९.६ स्वाध्याय

१. सांस्कृतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करून सांस्कृतिकीकरणाची वैशिष्ट्ये लिहा.

२. सांस्कृतिकीकरणाची संकल्पना सांगून सांस्कृतिकीकरणास चालना देणारे घटक स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# १०

# पाश्चिमात्यीकरण

**पाठाची रूपरेषा**

१०.० पाठाचे उद्देश

१०.१ प्रास्ताविक

१०.२ पाश्चिमात्यीकरणाचा अर्थ

१०.३ पाश्चिमात्यीकरणाची वैशिष्ट्ये

१०.४ पाश्चिमात्यीकरणाचे स्वरूप

१०.५ पाश्चिमात्यीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम

१०.६ स्वाध्याय

## १०.० पाठाचे उद्देश

- पाश्चिमात्यीकरणाचा अर्थ समजून घेणे.
- पाश्चिमात्यीकरणाची वैशिष्ट्ये समजून घेणे.
- पाश्चिमात्यीकरणाचे स्वरूप समजावून घेणे.
- पाश्चिमात्यीकरणाचे भारतीय समाजावर काय परिणाम झाले आहेत ते अभ्यासणे.

## १०.१ प्रास्ताविक

पाश्चिमात्यीकरण हा सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक आहे. एम.एन. श्रीनिवास यांनी पाश्चिमात्यीकरणाची संकल्पना विशद करून लघु व विस्तृत स्तरावर सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया कशी सुरू होते याचे विश्लेषण केलेले आहे. प्रत्येक प्रादेशिक समाजातील परंपरेत सुरूवातीला लघु स्तरात बदल होतात. नंतर त्याचा विस्तार जसा वाढतो तसतसे त्यांचे स्वरूप व्यापक बनत जाते. पाश्चिमात्यीकरणाची प्रक्रिया सुरू होण्याचा काळ म्हणजे ब्रिटिश काळ होय.

भारतीय समाजाच्या सांस्कृतिक परंपरांवर कोणकोणत्या घटकांचा प्रभाव पडला हे अभ्यासताना पाश्चिमात्य संस्कृतीचा भारतीय संस्कृतीवर किती व कसा प्रभाव पडला हे अभ्यासणे आवश्यक ठरते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे भारतीय सांस्कृतिक रचनेतील व पर्यायाने भारतीय समाज रचनेतील परिवर्तनास वाव मिळाला आहे. ब्रिटिश राजवटीचा, त्यांच्या जीवनपद्धतीचा आम्हा भारतीयांवर कोणता परिणाम झाला आहे ? याचा अभ्यास पाश्चिमात्यीकरणामध्ये करण्यात आलेला आहे. पाश्चिमात्यीकरणातून भारतीय समाजात चांगले-वाईट अनेक बदल घडून आलेले आहेत. त्या सर्वांचा आढावा या प्रक्रियेमध्ये घेण्यात आलेला आहे.

सुमारे १५० वर्षापेक्षा अधिक काळ टिकलेल्या ब्रिटिश सत्तेमुळे भारतीय समाजात बहुविध स्वरूपाचे परिवर्तन घडून येण्यास वाव मिळाला. बिटिश राजवटीत पाश्चिमात्य संस्कृतीतील आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, नवीन संस्था व मूल्ये इत्यादींचा भारतीय समाजावर प्रभाव पडून परिवर्तनास चालना मिळाली. या प्रक्रियेस श्रानिवास यांनी पाश्चिमात्यीकरण असे म्हटले आहे. पाश्चिमात्यीकरण हा शब्द तांत्रिक संस्थात्मक, वैचारिक, मूल्यात्मक स्तरांमध्ये झालेल्या परिवर्तनाचे द्योतक आहे. १५० वर्षापेक्षा अधिक काळ टिकलेल्या ब्रिटिश राजवटीचा परिणाम म्हणून भारतीय समाज व सांस्कृतिक घडून आलेल्या परिवर्तनास पाश्चिमात्यीकरण ही संज्ञा वापरली आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचा भारतीय समाजावर सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये झालेला परिणाम म्हणजे पाश्चिमात्यीकरण होय.

## १०.२ पाश्चिमात्यीकरणाचा अर्थ

भारतावर ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित झाले, त्यामुळे या प्रक्रियेला प्रारंभ झाला आणि दीडशे वर्षांच्या सतत आलेल्या संपर्कातून या देशातील लोकांनी त्यांचे अनुकरण केले. या काळात विज्ञान तंत्रज्ञान, शिक्षण, राजकीय जीवन, दळणवळणाची साधने, कायदे, संस्था, संघटना, खानपान, वेशभूषा, फॅशन, शिष्टाचार, निवास, सजावटी इ. अनेक क्षेत्रांत पाश्चिमात्य जीवनशैलीचा प्रभाव प्रत्ययास आला. थोडक्यात, पाश्चिमात्य जीवनशैलीप्रमाणे आपली जीवनशैली बनविण्याच्या प्रक्रियेला पाश्चिमात्यीकरण म्हणतात.

भारतीय समाजातील परिवर्तनाचे अध्ययन करताना संस्कृतीकरणाप्रमाणेच पाश्चिमात्यीकरणाचा विचार करावा वागतो. याबाबत एम.एन. श्रीनिवास यांनी सविस्तर लिहिले आहे.

''दीर्घकाळपर्यंत पाश्चिमात्य समाजाशी आलेल्या सांस्कृतिक संपर्कातून पाश्चिमात्य नसलेल्या समाजात तंत्रज्ञान संस्था विचारसरणी आणि मूल्यात झालेला बदल म्हणजे पाश्चिमात्यीकरण होय.

भारतात ब्रिटिशांनी १९ व्या शतकात आधुनिक राज्यकारभाराचा पाया घातला. जमिनीचे सर्वेक्षण केले. मालकी हक्क व शेतसारा ठरविला. कायदे करण्यात आले. न्यायदान पद्धतीत बदल केला. आधुनिक नोकरशाहीचा पाया घातला. रेल्वे, पोस्ट, टेलिग्राफ, रस्ते, जंगल विभाग, शाळा, महाविद्यालये, इंग्रजी भाषा साहित्याचे अध्ययन, छपाई यंत्रे, ग्रंथ, वर्तमानपत्रे या सर्वांच्या माध्यमातून पाश्चिमात्यीकरणाच्या धर्तीवर बदल केले. त्यातून ज्ञानाचा विकास व प्रसार जलदगतीने झाला. इंग्रजी शिक्षणातून भारतात उदारमतवादाचा प्रभाव वाढला. समता-स्वातंत्र्य-बंधुत्व, समानता, ऐहिकवाद व्यक्तीस्वातंत्र्य इ. मूल्ये मान्य करण्यास आरंभ झाला.  ब्रिटीशांच्या धोरणामुळे औद्योगिकीकरणाचा पाया घातला गेला. कारखानदारी पद्धती उदयास आली. शहरीकरणाची प्रक्रिया कार्यान्वित झाली. भारतात उत्पादन पद्धतीत बदल झाला.

भारतीय समाजातील कुटुंब, विवाह, जातिप्रथा, बलुतेदारी पद्धती, धार्मिक संस्था प्रभावित झाल्या. धर्मनिरपेक्षतेचा विचार रूजू लागला. लोकजीवनात परिवर्तनाची आकांक्षा वाढली.

१) पाश्चिमात्यीकरणाची सुरूवात ब्रिटिशांच्या राजवटीपासून वाढली.

२) या प्रक्रियेत त्यांच्या जीवनशैलीचे अनुकरण करण्यात आले.

३) पाश्चिमात्यीकरण समूहात गतिशीलतेपेक्षा वैयक्तिक गतिशीलता प्रामुख्याने दिसते.

४) या प्रक्रियेत पारंपरिक प्रतिमाणशी असणारी संलग्नता संपुष्टात येऊन नवीन प्रतिमानाचा स्वीकार समाविष्ट असतो.

५) या प्रक्रियेत संधीतील समानता आणि बुद्धीसंगत विचार महत्त्वाचे असतात.

आधुनिक काळात ही प्रक्रिया संपुष्टात आलेली नाही. आजही पाश्चिमात्यीकरणाकडे लोकांचा कल असलेला दिसतो.

## १०.३ पाश्चिमात्यीकरणाची वैशिष्ट्ये

पाश्चिमात्यीकरणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) अनुकरणात्मक प्रक्रिया :**

पाश्चिमात्यीकरण ही एक प्रकारची अनुकरणात्मक प्रक्रिया आहे. पाश्चात्यांच्या अनेक सांस्कृतिक गोष्टींचे भारतीयांनी अनुकरण केले. या अनुकरणामुळे भारतीय समाजात परिवर्तनास चालना मिळाली.

**२) नैतिक तटस्थता :**

केवळ चांगले अथवा वाईट परिणाम यांचा विचार न करता पाश्चिमात्यीकरणामध्ये चांगले अथवा वाईट असे दोन्ही बदल अंतर्भूत आहेत.

**३) ब्रिटिश संस्कृतीचा परिणाम :**

भारतातील पाश्चिमात्यीकरण हे प्रामुख्याने ब्रिटिशांच्या प्रभावाचा परिणाम आहे. स्वातंत्र्योत्तर भारतावर अमेरिका व रशिया यांचाही प्रभाव पडलेला आहे. असे असले तरी ब्रिटिश मूल्यांचाच प्रभाव अधिक जाणवतो.

**४) नागरीकरणाहून वेगळी प्रक्रिया :**

पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव प्रामुख्याने नागरी भागावर पडल्यामुळे पाश्चिमात्यीकरण व नागरीकरण या दोन्ही संज्ञा काही जणांना समानार्थी वाटतात. परंतु हे चुकीचे आहे. काही खेड्यांवरही पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. व्यापारी पिके घेणाऱ्या व लष्करी केंद्राशी संबंधित असणाऱ्या काही खेड्यांवर तर शहरांपेक्षा अधिक पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव पडलेला आढळतो.

**५) व्यापक गुंतागुंतीची प्रक्रिया :**

पाश्चिमात्यीकरण ही व्यापक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. पाश्चिमात्यीकरणामुळे नवीन तंत्रज्ञान, संस्थास विचारसरणी व मूल्ये भारतात आली. त्याचबरोबर पारंपरिक संस्था व मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला, पाश्चिमात्यीकरणामुळे भारताच्या राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांत राष्ट्रवाद, सुधारणावाद, समुदाय वाद, जातीयवाद, प्रादेशिक वाद इत्यादींचा उदय झाला.

**६) स्वारूप व गती यामध्ये भिन्नता :**

पाश्चिमात्यीकरण प्रक्रियेत इतर ठिकाणच्या लोकांपेक्षा समुद्रकिनाऱ्यावरील लोक अधिक

संपर्कात आले. कोलकाता, मुंबई, चेन्नई (मद्रास) या बंदरातील वा शहरातील लोकांनी व्यापार, शैक्षणिक सोयीसुविधा याकडे अधिक लक्ष पुरविले, ग्रामीण लोकांपेक्षा नागरी लोकांवर पाश्चिमात्यीकरणाचा अधिक प्रभाव पडला.

## १०.४ पाश्चिमात्यीकरणाचे स्वरूप

पाश्चिमात्यीकरणाचे दूरगामी परिणाम भारतीय समाजावर झालेले दिसून येतात. केशभूषा, वेशभूषा, खाण्यापिण्याचे पदार्थ, राहणीमानाचा दर्जा यामध्ये आमूलाग्र बदल झालेले दिसून येतात. चहा, कॉफी, थंडपेय इत्यादींचा स्वीकार आपण ब्रिटिशांकडून केलेला आहे. शुभ रात्र, शुभ दिन या गोष्टींचा स्वीकार आपण त्यांच्याकडून केलेला आहे. नावासमोर सिंह लावणे, जन्मदिन साजरे करणे, रिसेप्शनसारखे कार्यक्रम राबविणे या गोष्टीदेखील आपण त्यांच्याकडून स्वीकारलेल्या आहेत. शैक्षणिक दर्जामध्ये देखील सुधारणा घडून आल्या आहेत.

## १०.५ पाश्चिमात्यीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम

ब्रिटिश राजवटीत पाश्चात्य संस्कृतीचा भारतीय समाज व संस्कृतीवर पडलेला प्रभाव त्यामुळे घडून आलेले परिवर्तन खालीलप्रमाणे सांगता येते.

**१) नव्या संस्थांचा उदय :**

१९ व्या शतकात ब्रिटिशांनी भारतात हळूहळू आधुनिक राज्यनिर्मितीचा पाया घातला. जमीन मोजणी, कर आकारणी, कवायती सैन्य, पोलिस यंत्रणा, न्यायालये, तुरूंग, शाळा, महाविद्यालये, बँका, लोक प्रशासन आणि दळणवळणाची प्रगत साधने (मोटार, रेल्वे,जहाज, विमान, पोस्ट, तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ, वृत्तपत्रे) इत्यादींचा सार्वत्रिक प्रसार झाला, परिणामी भारतीय समाजात अंतर्बाह्य परिवर्तनास चालना मिळाली.

**२) नवीन मूल्यांची ओळख :**

पाश्चिमात्यीकरणामुळे केवळ नवीन संस्थाच आल्या असे नसून काही नवीन मूल्यांचीही भारतीयांना ओळख झाली. पाश्चिमात्यीकरणामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, धर्म निरपेक्षता या मूल्यांचा भारतीयांवर प्रभाव पडला. मानवतेच्या मूल्यामुळे जात, धर्म, निरपेक्षता या मूल्यांचा भारतीयांवर प्रभाव पडला. मानवतेच्या मुल्यांमुळे जात, धर्म, वर्ण, लिंग, आर्थिक स्तर इत्यादी विचारात न घेता सर्व मानवाची सेवा करण्याचे तत्त्व भारतीय समाजापुढे ठेवले गेले. समतेच्या व स्वातंत्र्याच्या मूल्यामुळे जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीवरील निर्बंध इत्यादी बाबतच्या संकुचित दृष्टिकोनात बदल होऊन उदारतेची भावना निर्माण होऊ लागली.

**३) अनिष्ट प्रथांचे उच्चाटन :**

पाश्चिमात्यीकरणामुळे भारतातील अनिष्ट प्रथांच्या उच्चाटनास चालना मिळाली. ब्रिटिश कार्यकर्त्यांनी सुशिक्षित व जागृत भारतीयांच्या मदतीने सतीप्रथा, बालविवाह, बालहत्या, नरबळी, विधवा विवाहबंदी, आंतरजातीय विवाहबंदी यासारख्या अनिष्ट प्रथा कायदेशीरपणे बंद केल्या.स्त्रीयांमध्ये शिक्षणामुळे जागृती निर्माण होऊन त्यांना विकासाची संधी उपलब्ध होण्यास मदत झाली.

**४) सामाजिक संस्थान परिवर्तन :**

पाश्चिमात्यीकरणामुळे विवाह कुटुंब, जात, धर्म, शिक्षण इत्यादी सामाजिक संस्थांमध्ये रचनात्मक परिवर्तनास वाव मिळाला. स्त्री शिक्षण, सहशिक्षण, स्त्री-पुरूष समानता, स्त्री पुरूषांनी एकत्र येऊन काम करणे इत्यादीमुळे प्रौढ विवाह, आंतरजातीय विवाह रूढ होऊ लागले. स्त्रियांचा दर्जा सुधारला. संयुक्त कुटुंबापेक्षा विभक्त कुटुंब सोयीचे ठरू लागले. जातीव्यवस्थेतही परिवर्तन घडून आले. इत्यादीमध्ये बदल होऊ लागले. पारंपरिक ग्रामपंचायतीचा ऱ्हास झाला. शेतीचे व्यापारीकरण होऊ लागले.

**५) सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन :**

पाश्चिमात्यीकरणामुळे वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या पद्धती, सवयी, राहणीमान, शिष्टाचार, कला साहित्य इत्यादीमध्येही बदल घडून आले. सुटबूट घालणे, हॅट व टाय वापरणे, पुरूषांनी केस व कल्ले राखणे, स्त्रियांनी केस कापणे, मांस भक्षण व मद्यसेवन करणे, क्लबमध्ये जाणे, नृत्य करणे, जन्मदिन साजरा करणे, पार्टी देणे, केक बिस्किटे खाणे, खुर्च्या टेबलावर बसून काट्या चमच्याने खाणे, मातापित्यांना मम्मी, डॅड म्हणणे, शुभप्रभात, शुभदपार म्हणजे, शेकहॅन्ड करणे, इत्यादी गोष्टी पाश्चिमात्यीकरणातून घडल्या आहेत.

**६) सुधारणा चळवळीचा उदय :**

भारतात पाश्चात्य विचारांनी व मूल्यांनी भारावलेले अनेक बुद्धीजीवी नेते सुधारक व कार्यकर्ते उदयास आले. त्यांनी आधुनिक भारत घडविण्याच्या कार्यास चालना दिली. धार्मिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत क्रांतिकारक सुधारणा करण्यासाठी त्यांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. राजा राममोहन रॉय यांच्या ब्राह्मोसमाज, दयानंद सरस्वती यांचा आर्य समाज, रानडे भांडारकर यांचा प्रार्थना समाज, म. फुले यांचा सत्यशोधक समाज, म. गांधींची हरिजन उद्धाराची चळवळ, डॉ. आंबेडकरांचा दलितोद्धार लढा या सर्व प्रमुख चळवळी ह्या पाश्चिमात्यीकरणाचाच परिणाम आहे. याशिवाय टागोर, विवेकानंद, टिळक, गोखले, आगरकर, पंडित नेहरू अशा असंख्य नेत्यांनाही पाश्चात्य तत्त्वज्ञानाने प्रेरित केले होते. त्यांनीही आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

पाश्चिमात्यीकरणामध्ये मांसभक्षण व मद्यपान या दोन्हींच्या सेवनाचे स्वागत केले जाते. पाश्चिमात्यीकरणामध्ये धर्मनिरपेक्षतेचा परिणाम मोठ्या प्रमाणावर आढळतो. ब्राह्मणांना शिक्षणाची संधी मिळाल्याने प्रतिष्ठा, नोकरी, आर्थिक लाभ या गोष्टी प्राप्त झाल्या. कनिष्ठ जातींनी इंग्रजी शिक्षण घेण्याच्या दृष्टीने पाश्चिमात्यीकरणावर भर दिला.

पाश्चिमात्यीकरणामुळे संरचनात्मक बदलास काही प्रमाणात चालना मिळू शकली.

## १०.६ स्वाध्याय

१. पाश्चिमात्यीकरण म्हणजे काय ते सांगा.

२. पाश्चिमात्यीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. पश्चिमात्यीकरणाचे स्वरूप सांगून भारतीय समाजावर झालेल्या परिणामांचा चर्चा करा.

♦ ♦ ♦

# ११

# आधुनिकीकरण

**पाठाची रूपरेषा**

११.० पाठाचे उद्देश

११.१ प्रास्ताविक

११.२ आधुनिकीकरणाचा अर्थ

११.३ आधुनिकीकरणाचे स्वरूप

११.४ आधुनिकीकरणाची कारणे

११.५ आधूनिकीकरणाची विविध क्षेत्रे

११.६ आधूनिकीकरणाच्या समस्या

११.७ भारतातील आधुनिकीकरणाची प्रक्रिया

११.८ भारतातील आधूनिकीकरणाचे स्वरूप

११.९ स्वाध्याय

## ११.० प्रास्ताविक

आधुनिकीकरण ही सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी सार्वत्रिक, सर्वस्पर्शी, सातत्याने गतिमान असलेली एक प्रक्रिया आहे. जगातील सर्वच विकसनशील देशात आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले आहेत. त्यामुळे आधुनिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली आहे. आधुनिकीकरणातून समाजाच्या पारंपरिक जीवन पद्धतीत आमूलाग्र बदल झालेले दिसून येतात. जुने ते सोने म्हणण्याच्या विचारात आमूलाग्र बदल घडून आलेले आहेत. खाणेपिणे, पोषाख पद्धती, विवाहातील, सणसमारंभातील विधी यामध्ये फार मोठे बदल घडून येऊ लागले आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक सर्वच क्षेत्रांमध्ये विविध बदल दिसून येत आहेत.

जुन्या प्रथा, चालीरीती, बोलीभाषा, खाणेपिणे, केशभूषा, वेषभूषा यामध्ये घडून येणाऱ्या बदलांना आधुनिकीकरण म्हटले आहे. आईला मम्मी, मम्मा म्हणून संबोधणे वडिलांना बापूस ऐवजी डॅडी, डॅड, फादर, पप्पा म्हणून संबोधणे या गोष्टी आधुनिकीकरणाचे द्योतक आहेत.

जेवणासाठी बुफेपद्धत, चमच्याचा वापर, डायनिंग टेबलचा वापर, बोलताना अय्या, इश्य, हट् शब्दप्रयोग वापरणे हादेखील आधुनिकीकरणाचाच भाग आहे.

## ११.२ आधुनिकीकरणाचा अर्थ

आधुनिकीकरणाची प्रक्रिया विस्तृत स्वरूपात वापरता येते. आर्थिक आधुनिकीकरण, राजकीय आधुनिकीकरण, शैक्षणिक आधुनिकीकरण, लष्कराचे आधुनिकीकरण, प्रशासनाचे आधुनिकीकरण इत्यादी अनेक स्वरूपात ही प्रक्रिया समजावून घेण्यासारखी आहे.

१. प्रगत औद्योगिक देशांतील समाजाप्रमाणे परिवर्तन घडवून आणणे यालाच सर्वसाधारणपणे आधुनिकीकरण समजले जाते.

२. आधुनिकीकरण म्हणजे व्यक्ती व समाजातील चिकित्सक व संशोधक मनोवृत्तीचा किंवा दृष्टिकोनाचा असा विकास की जेथे यंत्रे व तंत्रे यांच्या वापरासाठी एक नवीन वातावरण निर्माण करतो आणि नवीन प्रकारच्या सामाजिक संबंधांना प्रेरणा देतो.

३. पारंपरिक औद्योगिकीकरण पूर्व समाजातील संस्थांचे औद्योगिकीकरण झालेल्या समाजातील संस्थांप्रमाणे सामाजिक रूपांतरण घडवून येणे म्हणजे आधुनिकीकरण होय.

४. आधुनिकीकरण ही परिवर्तनाची किंवा रूपांतरणाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत मनुष्य ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, बौद्धिक, धार्मिक व मानसिक व्यवस्थांच्या आधारे आपल्या समाजाचे संघटन आणतो त्या व्यवस्थामधील रूपांतरण म्हणजे आधुनिकीकरण होय.

५. पारंपरिक समाजाचे जसजसे औद्योगिकीकरण होत जाते, तसतसे त्या समाजात घडून येणाऱ्या या गुंतागुंतीच्या परिवर्तनाच्या संचाला आधुनिकीकरण असे म्हणतात.

वरील व्याख्यांचे बारकाईने निरीक्षण केले, तर औद्योगिकीकरण घडून येणे हाच आधुनिकीकरण या संकल्पनेतील प्रमुख गाभा आहे. परंतु निव्वळ औद्योगिकीकरण म्हणजे आधुनिकीकरण असे म्हणता येणार नाही. औद्योगिकीकरणाबरोबर औद्योगिकीकरणपूर्व अशा पारंपरिक समाजातील समाज-संरचना, मूलभूत सामाजिक संस्था, नियमने, मूल्ये, श्रमविभाजन स्तरीकरण इत्यादी घटकांतही परिवर्तन घडून येणे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अभिप्रेत आहे.

भारतीय समाजातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणारे एक सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ योगेंद्रसिंग यांच्या मते आधुनिकीकरण ही सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तनाची एक प्रक्रिया असून समाजातील विविध बदलांना प्रोत्साहन देणारी अशी एकमेव प्रक्रिया आहे.

इंग्लंड आणि फ्रान्स हे आधुनिकीकरण घडून आलेले पहिले देश आहेत. त्यानंतर अमेरिकेत आधुनिकीकरण घडून आले आहे. जगातील विविध समाजांत आधुनिकीकरण घडून येत असले तरी सर्व राष्ट्रातील या देशातील आधुनिकीकरण एकाच स्वरूपाचे असते, असा मात्र याचा अर्थ नाही. जिथे सुरूवात झालेली आहे. तिथे प्राथमिक आधुनिकीकरण, तर जिथे अधिकाधिक प्रमाणात आधुनिकीकरण झालेले आहे. जिथे दुय्यम आधुनिकीकरण झालेले आहे असे मानले जाते.

आधुनिकीकरणामध्ये तीन बाबी अंतर्भूत आहेत.

१. विघटन घडून न येता सातत्याने नव्या बदलांशी जुळवून घेणारी समाज व्यवस्था.

२. लवचिक आणि विभेदिक सामाजिक संरचना.

३. विज्ञान आणि तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत जगात राहण्यासाठी आवश्यक असी कौशल्य आणि ज्ञान लोकांना देण्याची समाज व्यवस्थेत असणारी सोय.

औद्योगिकीकरण हा आधुनिकीकरणाचा एक विशेष असा पैलू आहे. उद्योगांची फारशी संस्था न वाढविताही एखाद्या देशाचे आधुनिकीकरण घडवून आणता येणे शक्य आहे. आधुनिकीकरणामुळे समाजाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक संरचनेत मूलगामी परिवर्तने ज्याप्रमाणे घडून येतात त्याचप्रमाणे समाजातील व्यक्तींचा विचारसरणीत त्यांच्या अभिवृत्ती आणि मूल्यांत एकंदर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातही महत्त्वपूर्ण बदल घडून येतात. आधुनिकीकरणामुळे घडून येणारे हे बदल म्हणजे आधुनिकीकरणाची विविध अंगे किंवा पैलूच आहेत.

## ११.३ आधुनिकीकरणाचे स्वरूप

आधुनिकीकरण ही परिवर्तनाची गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे स्वरूप पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

१. **जुन्या प्रक्रियेचे नवे नाव :** आधुनिकीकरण हे परिवर्तनाच्या जुन्या प्रक्रियेस दिलेले नाव आहे. ही प्रक्रिया १८ व्या शतकात मुख्यतः इंग्लंड, फ्रान्स देशात सुरू झाली. नंतर ती बेल्जियम पोर्तुगीज, नेदरलॅन्ड, जर्मनी, हॉलंड या देशात सुरू झाली.

२. **आधुनिकीकरण म्हणजे केवळ औद्योगिकीकरण नव्हे :** - एखाद्या राष्ट्रात अवजड उद्योगधंदे निघाले एवढ्यावरून त्याचे आधुनिकीकरण झाले असे म्हणता येणार नाही. औद्योगिकीकरणा बरोबरच समाजातील पारंपरिक सामाजिक संस्था, आचारविचार, श्रद्धामूल्ये, सामाजिक स्तरीकरण इत्यादींमध्ये बदल घडून येणे आधुनिकीकरणात अभिप्रेत आहे.

३. **आर्थिक विकासाशी संबंधित :** कृषिप्रधान राष्ट्रांच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात उद्योगधंद्याच्या वाढीबरोबरच कृषिविकासासही महत्त्व दिले जाते. अर्थात शेतीचा विकास, शेतीचे आधुनिकीकरण हे शेतीची अवजारे, रासायनिक खते, जंतुनाशके इत्यादींचे उत्पादन करणाऱ्या उद्योगावर वीज, वाहतूक यांच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. काहीही असले तरी आर्थिक विकासामुळे आधुनिकीकरणास चालना मिळते.

४. **प्राथमिक व दुय्यम आधुनिकीकरण :** जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये आधुनिकीकरणाची प्रक्रिया घडून येत असली तरी तिचे स्वरूप सर्वत्र सारखे नाही. विकसित व विकसनशील राष्ट्रातील आधुनिकीकरण प्रक्रियेतील फरक दर्शविण्यासाठी प्राथमिक आधुनिकीकरण व दुय्यम आधुनिकीकरण अशा संज्ञा वापरल्या जातात. पश्चिम युरोपातील इंग्लंड आणि फ्रान्स या देशात प्रथम व त्यापाठोपाठ अमेरिका, रशिया, जर्मनी, जपान या देशात आधुनिकीकरण घडून आले. हे देश आता विकसित देश मानले जातात. तेथील आधुनिकीकरण प्राथमिक आधुनिकीकरण म्हटले जाते.

या उलट अविकसित किंवा विकसनशील राष्ट्रात नियोजनबद्ध पद्धतीने जे आधुनिकीकरण घडवून आणले जाते त्यास दुय्यम आधुनिकीकरण म्हटले जाते.

## ११.४ आधुनिकीकरणाची कारणे

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची तीन मूलभूत कारणे सांगितली जातात.

१. भौतिक संपत्ती वाढविण्याची राष्ट्रीय प्रकृती व उपभोग्य वस्तूंना जास्तीत जास्त संचय करण्याची मनुष्याची लालस.

२. यांत्रिकीकरणाचा उद्‌गम त्यामुळे मानवी व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात यांत्रिक साधनांचा झालेला प्रसार म्हणजे जैविक शक्तीच्या ऐवजी अधिक परिणामकारक व कार्यक्रम ठरलेल्या अजैव शक्तीचा वाढता अवलंब होणे होय.

३. सर्व क्षेत्रांत तर्कशुद्ध वैज्ञानिक दृष्टिकोन व समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या लोकशाही मूल्यांना दिले जाणारे प्राधान्य.

वरील तीन कारणांमुळे आधुनिकीकरणास चालना मिळाली. अर्थात ही तीनही कारणे परस्परावलंबी असून ऐतिहासिकदृष्ट्या ती एकाच वेळी उदयास आलेली आहेत.

शास्त्रीय व तांत्रिक शोधामुळे उत्पादन पद्धतीचे यांत्रिकीकरण झाले. त्यातून औद्योगिकीकरणास चालना मिळाली. दळणवळणाची, वाहतुकीची व आचार-विचारांच्या प्रसाराची अनेक प्रभावी साधने ही उपलब्ध झाली यातून नागरीकरण, दळणवळणाची व संपर्काची प्रगत साधने निर्माण झाली. यांत्रिकीकरण झाल्यामुळे व्यक्तिगत, व्यावसायिक व सामाजिक गतिशीलता वाढील लागली. व्यक्तीचे सामाजिक स्थान व दर्जा तिच्या अंगच्या गुणकौशल्यावर तिने घेतलेल्या शिक्षण, प्रशिक्षणावर ठरू लागला. त्यामुळे सामाजिक संबंधात बदल होऊ लागले. ही सर्व परिस्थिती आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेस कारणीभूत ठरली आहे.

## ११.५ आधुनिकीकरणाची विविध क्षेत्रे

आधुनिकीकरण ही मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत कोणत्या क्षेत्रात कोणते बदल अपेक्षित आहेत. हे पुढील प्रमाणे सांगता येते. यालाच आधुनिकीकरणाचे पैलू असेही म्हणतात.

**१) आर्थिक क्षेत्रातील आधुनिकीकरण :** आर्थिक क्षेत्रातील आधुनिकीकरण होण्यासाठी पुढील गोष्टी घडून येणे आवश्यक आहे.

**१) औद्योगिकीकरण :**

अवजड उद्योगधंद्याचा विकास होणे. यंत्राच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्पादन होणे. घरगुती उत्पादन पद्धतीच्या जागी कारखाना पद्धती येणे.

**२) कृषी विकास घडून येणे:**

शेती अवजारे, रासायनिक खते, सुधारित व संकरित बी बियाणे, जंतुनाशके व कीटकनाशके, कृत्रिम पाणीपुरवठा इत्यादींचा वापर होणे. नगदी या व्यापारी पिके घेण्यास प्राधान्य मिळणे.

३. **नव्या आर्थिक संस्था**: बँका, पतपेढ्या, बाजारपेठा इत्यादी उदयास येणे.

४. **आर्थिक विकास होणे :** राष्ट्राचे दरडोई उत्पन्न वाढणे, राहणीमानाचा दर्जा उंचावणे, लोकांच्या आर्थिक कल्याणात भर पडत जाणे.

**३) सामाजिक क्षेत्रातील आधुनिकीकरण :** सामाजिक क्षेत्रातील आधुनिकीकरणात खालील बाबींचा समावेश करण्यात येतो.

१. **नागरीकरण :** नागरीकरणाची गती वाढवणे, शहराची संख्या व आकार वाढत जाणे. नागरी जीवन पद्धतीचा प्रभाव वाढत जाणे.

२. **औपचारिक संस्था :** संघटना, ऐच्छिक मंडळे, दुय्यम समूह इत्यादींची संख्या व प्रभाव वाढत जाणे.

३. **नवीन मूल्ये :** समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता, मानवता इत्यादी मूल्यांचा समाजाने स्वीकार करणे. वंश, धर्म, जात, लिंग, आर्थिक स्तर इत्यादींच्या आधारे सामाजिक भेदभाव न होणे.

४. **मुक्तस्तरीकरण :** समाजात बंदिस्त स्तरीकरणाच्या जागी मुक्त स्तरीकरण येणे. व्यक्तीला स्वकर्तृत्वाने आपले सामाजिक स्थान व दर्जा उंचावण्याची संधी उपलबध असणे म्हणजे आर्थिक दर्जाऐवजी आर्थिक दर्जाला महत्त्व देणे.

५. **दळणवळण :** वाहतूक, संदेशवहन या क्षेत्रांतील प्रगती साधनांचे जाळे उभारले जाणे, आरोग्य सुविधांत वाढ होणे, समाजातील सरासरी आयुर्मानात वाढ होणे.

**४) मानसिक क्षेत्रातील आधुनिकीकरण :** आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत लोकांची मते, मूल्ये, दृष्टिकोन, मनोवृत्ती इत्यादीमध्ये देखील परिवर्तन घडून येते. यालाच मानसिक आधुनिकीकरण किंवा व्यक्तीचे आधुनिकीकरण असे म्हणतात. यामध्ये पुढील बाबी अभिप्रेत आहेत.

१. रूढी परंपरा, अंधश्रद्धा, कर्मठपणा इत्यादी त्याग करून नावीन्याच्या, परिवर्तनाचा स्वीकार करणे.

२. दैववादीवृत्तीचा त्याग करून व प्रयत्नवादाची कास धरणे.

३ निसर्गाच्या अधीन न राहता त्यावर मात करण्याची जिद्द बाळगणे.

४ प्रत्येक क्षेत्रात नियोजन व संघटन यांना महत्त्व देणे.

५. इतरांशी सन्मानपूर्वक व्यवहार करणे, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय या मूल्यांचा आदर करणे.

६. मी, माझे कुटुंब, माझे गाव, माझा देश यांच्या पलीकडे जाऊन अखिल मानव जातीच्या कल्याणाचा विचार करणे 'विश्वची माझे घर' असा व्यापक दृष्टिकोन लोकांच्या मनात विकसित करणे.

## ११.६ आधुनिकीकरणाच्या समस्या

आधुनिकीकरणातून निर्माण झालेल्या व होत असलेल्या अनेक समस्या आज विकसित राष्ट्रांना भेडसावित आहेत. त्यापैकी काही प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) व्यक्ती व समाज यांच्यात दुरावा :**

यांत्रिकीकरणामुळे व विशेषीकरणामुळे व्यक्तीच्या कार्यात कमालीचा यांत्रिकीपणा येतो. तिला आपल्या कामाबद्दल आस्था राहत नाही. व्यक्ती व समाज यांच्यात दुरावा येतो. व्यक्ती एकाकी बनते. जीवनातील शांती, समाधान हरवून बसते.

**२) सामाजीकीकरणात बाधा :**

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत नित्यनवे शोध लागतात. नवी यंत्रे, तंत्रे उदयास येतात. त्यामुळे समाजात सतत बदल होत राहतो. बदलत्या परिस्थितीशी अनकूलन साधणे व्यक्तीला कठीण होते. तिच्या अनुकूलन क्षमतेवर ताण पडतो. परिणामी सामाजिकीकरणात बाधा येते.

**३) असंतोषाची निर्मिती :**

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत समाजाच्या सर्व क्षेत्रांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. पण सर्व क्षेत्रांचा एकात्मिक विकास होऊ शकत नाही. शिक्षित-अशिक्षित लोकांना पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून दिले जात नाहीत.

**४) संघर्षाची निर्मिती :**

आर्थिक, सामाजिक क्षेत्रांतील आधुनिकीकरण पारंपरिक जीवनपद्धतीशी संघर्ष होतो. उदा. प्रशिक्षित डॉक्टर, पारंपरिक वैद्याचे अस्तित्व धोक्यात आणतो. रिक्षा, मोटार इत्यादीमुळे टांगेवाल्याचे अस्तित्व धोक्यात येते.

**५) विघातक प्रवृत्तीस प्रोत्साहनः**

आधुनिकीकरणामुळे समाजात मुख्यत: विकसित राष्ट्रांत विघातक प्रवृत्तीस प्रोत्साहन मिळालेले आहे. त्यामुळे लोक रोगवादी-चंगळवादी बनतात. त्यातून भ्रष्टाचार, गुन्हेगारी वाढते. व्यक्ती वादाचा अतिरेक होऊन नैतिक, धार्मिक, कौटुंबिक मूल्यांचा ऱ्हास होत असतो. घटस्फोटांचे प्रमाण वाढते. कुटुंब अस्थिर बनते. मुलाबाळांची आबाळ होते.

## ११.७ भारतातील आधुनिकीकरणाची प्रक्रिया

भारतातील ब्रिटिश राजवटीतच आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. ब्रिटिशांनी येथे कवायती, लवकर अद्ययावत शस्त्रे, सुसज्ज आरमार, प्रशासकीय यंत्रणा, नवीन कायदे व न्याय व्यवस्था, औपचारिक शिक्षणपद्धती, मोठेमोठे उद्योगधंदे, दळणवळणाची व वाहतुकीची प्रगतसाधने इत्यादी गोष्टी रूजविल्या. पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या भारतीयांनी येथील अनिष्ट प्रथा, परंपरांच्या निर्मूलनासाठी चळवळी उभारल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवता इत्यादी मूल्यांचा प्रभाव पडून भारतीयांचे प्रबोधन सुरू झाले. त्यातूनच आधुनिकीकरणास सुरूवात झाली. नियोजनाचा स्वीकार

करून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबविण्यात येऊ लागले. औद्योगिकीकरण, शेतीविकास, शिक्षणप्रसार, आरोग्य सुविधांचा विस्तार, समाजकल्याण इत्यादी सर्व क्षेत्रांत प्रगतीचे वारे वाहू लागले. परिणामी आधुनिकीकरणाला चालना मिळाली.

## ११.८ भारतातील आधुनिकीकरणाचे स्वरूप

**१) आर्थिक आधुनिकीकरण :**

अवजड उद्योगधंद्यांचा विस्तार व विकास होत आहे. उत्पादन प्रक्रियेचे यांत्रिकीकरण होत आहे. शेतीतही प्रगत उत्पादनतंत्र, रासायनिक खते, सुधारित शेती अवजारे, संकरित बी-बियाणे, कृत्रिम पाणीपुरवठा, जंतुनाशके इत्यादींचा अवलंब करून हरितक्रांतीचे प्रयोग यशस्वी होत आहेत. बलुतापद्धतीचा ऱ्हास होत आहे. विदोषीकरण वाढत आहे. बाजारपेठा, बँका, पतपेढ्या, पैशाचा वापर इत्यादींमध्ये वाढ होत आहे. कामगार संघटना, व्यावसायिकांच्या संघटनांचा विस्तार होत आहे.

**२) राजकीय आधुनिकीकरण :**

राज्यघटनेने निधर्मीकरण लोकशाही व्यवस्था, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व इत्यादींचा स्वीकार केला आहे. कायद्यापुढे सर्व नागरिकांना समान लेखले जात आहे. निवडणुका, प्रौढ मताधिकार, विकेंद्रीकरण (पंचायत राज) इत्यादींच्या माध्यमातून जनतेचा राजकीय सहभाग वाढत आहे. प्रशासकीय नोकरभरती स्पर्धा परीक्षेद्वारे केली जात आहे.

**३) सामाजिक, सांस्कृतिक आधुनिकीकरण :**

जातिभेद, अस्पृश्यता पालन इत्यादी कायद्याचे उच्चाटन केले आहे. जन्माऐवजी गुणपात्रतेनुसार सामाजिक दर्जा निश्चित होऊ लागला आहे. शहराची संख्या व आकार वाढत आहे. कुटुंब, विवाह, धर्म, शिक्षण या सामाजिक संस्थांच्या पारंपरिक स्वरूपात बदल घडून येत आहेत. शैक्षणिक व आरोग्य सुविधांचा विस्तार होत आहे. दळणवळण व वाहतूक साधनांचे जाळे विस्तारित होत आहे.

**४) मानसिक आधुनिकीकरण :**

रूढी परंपरा, अंधश्रद्धा, दैववाद, कर्मकांड, इत्यादीच्या जागी वैज्ञानिक दृष्टिकोन रूजत चालला आहे. जातिभेद, लिंगभेद, धर्मभेद अशास्त्रीय वाटू लागला आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, मानवता ही मूल्ये हळूहळू लोकांच्या मनावर बिंबत चालली आहे.

**मंदगती :**

१) आधुनिकीकरणाची गती मंद आहे. सुमारे ७० टक्के भारतीय आजही शेतीवर अवलंबून आहेत. मूठभर बडे बागायतदारच आधुनिक शेती करतात.

२) आपली राज्यघटना, शासकीय यंत्रणा निधर्मी आहे, पण बहुसंख्य राज्यकर्ते शासकीय सेवक आज धार्मिक प्रभावाखाली वावरतात. सर्वसामान्यांचा राजकीय सहभाग कमी आढळतो.

३) सुमारे ७५ टक्के जनता खेड्यात राहत आहे. तिच्यावर जातपात, धर्म, रूढी, परंपरा इत्यादींचा प्रभाव आजही टिकून आहे. अस्पृश्य व स्त्रिया यांना खेड्यामध्ये खालचा दर्जा आहे. सर्वांना शिक्षण मूल्ये देऊनही अद्याप ५० टक्के जनता निरक्षर आहे. अनेक खेड्यांमध्ये रस्ते, वीज, पिण्याचे शुद्धपाणी, शाळा, पोस्ट ऑफीस, दवाखाना या मूलभूत सुविधा पोहोचलेल्या नाहीत.

४) भारतीय अडाणी लोकच नव्हे तर चांगले उच्चशिक्षित लोकही अनिष्ट, प्रथा-परंपरा आस्थेने पाळतात. प्रयत्नाबरोबरच देवधर्म, पूजाअर्चा, व्रतवैकल्य , मंत्रतंत्र इत्यादींचा भारतीय जनता आधार घेताना दिसून येते.

वरील बाबींचा विचार करता आधुनिकीकरणाची प्रक्रिया भारतामध्ये अजूनही मंदावलेली आढळते.

## ११.९ स्वाध्याय

१. आधुनिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करा.

२. आधुनिकीकरणाचे स्वरूप स्पष्ट करून आधुनिकीकरणाच्या समस्या सांगा.

३. आधुनिकीकरणाची कारणे सांगून आधुनिकीकरणाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचवा.

♦ ♦ ♦

# १२

# कृषी विकास
# (राष्ट्रीय कृषी धोरण – २००० आणि अन्नसुरक्षा)

**पाठाची रूपरेषा**

१२.० पाठाचे उद्देश

१२.१ प्रास्ताविक

१२.२ शेतीधोरण – २०००

१२.३ राष्ट्रीय कृषी धोरणाची उद्दिष्टे

१२.४ राष्ट्रीय कृषी धोरणाची वैशिष्ट्ये

१२.५ राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा

१२.६ अन्नसुरक्षा

१२.७ अन्नसुरक्षा – संकल्पना व व्याख्या

१२.८ भारतातीत अन्नसुरक्षेची गरज

१२.९ भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन

१२.१० दीर्घकालीन अन्नधान्य व्यवस्थापन धोरण

१२.११ स्वाध्याय

## १२.० उद्देश

- राष्ट्रीय कृषी धोरण समजावून घेणे.
- राष्ट्रीय कृषी धोरणांची उद्दिष्ट्ये अभ्यासणे.
- राष्ट्रीय कृषी धोरणांची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
- राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा समजावून घेणे.
- अन्नसुरक्षा आवश्यकता पडताळणे.

- भारतातील अन्नसुरक्षेची गरज अभ्यासणे.
- भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन आणि धोरणे समजावून घेणे.

## १२.१ प्रास्ताविक

भारतात १९६५नंतर हरित क्रांती घडवून आणण्यात आली, त्यामुळे भारतात शेती उत्पादन वेगाने वाढले व भारत अन्नधान्याच्या गरजेबाबत स्वयंपूर्ण देश झाला. भारतात शेतीचे उत्पादन १९५१मध्ये जे ५० दशलक्ष टन होते ते २००० पर्यंत २००दशलक्ष टनापर्यंत वाढले. पण शेतीक्षेत्राच्या वाढीचा दर ९०च्या दशकात फारच अनियमित होता.

१९९२-९३ मध्ये हा दर ५.८% इतका होता तर १९९५-९६ मध्ये हा दर ०.९ टक्क्यांनी कमी झाला. पुन्हा १९९६-९७ मध्ये तो ९.६% इथपर्यंत वाढला आणि २००२-०३मध्ये तो ०.२% नी कमी झाला. ८०व्या दशकात शेतीक्षेत्रात ३.९%दराने वाढ झाली, तर ९०च्या दशकात ३.६% दराने वाढ झाली, पण नवव्या पंचवार्षिक योजनेत शेतीक्षेत्रात फक्त २.१%दराने वाढ झाल्याचे आढळून आले. गेल्या दोन दशकांत शेती क्षेत्राच्या वाढीचा दर ४% हूनही कमी होता. त्यामुळे शेतीक्षेत्राबद्दल विशेष विचार करणे गरजेचे ठरले.

१९९१पासून भारतात उदारीकरणाचे वारे वाहू लागले आहेत. जागतिक व्यापार संघटनेनुसार शेतीक्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पादकता व कार्यक्षमता वाढवण्याचे प्रयत्न करावे लागणार आहेत. शेतकऱ्याला जास्त बाजाराभिमुखी बनवावे लागणार आहे. या सर्वांसाठी योग्य असे वातावरण निर्माण करणे गरजेचे ठरते. त्यामुळे शेतीक्षेत्रातील विषमता व इतर अडथळे दूर करण्याच्या उद्देशाने सरकारने २०००साली आपले नवीन राष्ट्रीय शेती धोरण जाहीर केले व राबविण्यास सुरूवात केली.

## १२.२ शेती धोरण २०००

भारत सरकारचे माजी कृषीमंत्री श्री. नितीश कुमार यांनी लोकसभेत २८जुलै २००० या दिवशी शेतीचे नवीन राष्ट्रीय धोरण मांडले. शेतीक्षेत्राच्या विकासासाठी सर्व ते प्रयत्न व त्याबरोबर आर्थिक विकास हेच मुख्य उद्दिष्ट या धोरणाचे होते. तसेच या धोरणात शेती क्षेत्राच्या विकासासाठी आतापर्यंत उपलब्ध साधनसामुग्रीपैकी ज्या साधनांचा वापर केला गेला नव्हता, त्या साधनांचा वापर करून तसेच शेती विकासासाठी ग्रामीण भागात रस्ते, वीजपुरवठा, दळणवळण, वाहतूक, टेलिफोन सेवा, बँकिंग सेवा, शेतीवर आधारित व्यापार, शेतीला लागणारी संकरित बियाणे, खते, जंतुनाशके इत्यादींचा पुरवठा करून ग्रामीण भागातील राहणीमान उंचावण्यासाठी व ग्रामीण क्षेत्रातून शहरी क्षेत्रात होणारे लोकसंख्येचे स्थलांतर थांबविण्यासाठी व जागतिकीकरणाने अर्थव्यवस्थेला मिळालेले फायदे, तसेच मुक्त आर्थिक धोरणाचे फायदे समाजातील ग्रामीण घटकांना पुरवणे, तसेच शेतीक्षेत्रात दरवर्षी किमान ४%वाढीचा दर टिकवून ठेवणे यासाठी साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर, जमिनीची धूप रोखणे, पाण्याचे नियोजन व वापर करणे, आर्थिक वृद्धी बरोबरच समानता प्रस्थापित करून देशातील सर्व प्रदेशांचा संतुलित विकास घडवून आणण्यासाठी, शेतीमाल निर्यात करून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किमती मिळवून देणे, तसेच आर्थिक वाढीसाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर, योग्य तंत्रज्ञान पर्यावरण संरक्षण व आर्थिक विकास ही उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी २०००चे नवीन शेती धोरण जाहीर करण्यात आले.

या धोरणाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

**उद्दिष्टे:**

१. शेतीतील आर्थिक विकास दर ४% राखणे.

२. अन्न व पोषक धान्याची सुरक्षा.

३. साधनसामुग्री व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर.

४. शेतीक्षेत्रात आर्थिक वृद्धिसाठी प्रोत्साहन देणे.

५. खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रातून शेतीत गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देणे.

६. संस्थात्मक पुनर्रचना

७. धोके व्यवस्थापन

वरील उद्दिष्टांची विस्तृत चर्चा पुढीलप्रमाणे –

**१) शेतीतील आर्थिक विकास दर ४% राखणे :**

शेतीतील संस्थात्मक बदलाबरोबरच तांत्रिक बदल करणे, कर रचनेत सुधारणा करणे, आर्थिकदृष्ट्या व पर्यावरणाला सुसंगत असे तंत्रज्ञान वापरून शेती क्षेत्रात सरासरी ४% विकासाचा दर प्राप्त करणे हे उद्दिष्ट ठरवण्यात आले. त्यानुसार पुढील उपाययोजना सुचवण्यात आल्या.

१. शेतीच्या वापराखाली जमिनीचे बिगरशेती वापरासाठी होणारे हस्तांतरण थांबवावे.

२. शेतीसाठी वापरली जाणारी जमीन शेतीच्या लागवडीखाली आणणे, तसेच जमिनीची धूप थांबवणे.

३. बहुविध तसेच आंतरपीक पद्धतीचा वापर करून शेतीचे उत्पन्न वाढवणे.

४. पावसाचे पाणी जिरवून ती पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न करणे.

५. पाणी हा शेतीचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे त्यासाठी जमिनीवरील पाण्याचा पर्याप्त वापर करून अपव्यय टाळणे.

६. भूमिहीन शेतमजुरांनी पडीत जमिनीचा लागवडीसाठी वापर करावा. त्यासाठी त्यांना आर्थिक-बिगर आर्थिक प्रोत्साहन देणे.

**२) अन्न व पोषक धान्याची सुरक्षा :**

भारतात सातत्याने वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या अन्नाची गरज पुरवणे, तसेच वाढत्या लोकसंख्येला पोषक व पुरेशा अन्नाची हमी देणे ही २०००च्या आर्थिक धोरणाची उद्दिष्टे ठरवण्यात आली. तसेच शेतीवर आधारित उद्योग उदा. साखर, तागउद्योग, फळप्रक्रिया उद्योग यासारख्या

उद्योगांना सातत्याने कच्च्या मालाचा पुरवठा करता यावा यासाठी प्रयत्नशील राहावे. त्यासाठी पुढील उपाय योजण्यात आले.

१. ज्या पिकांमध्ये मोठ्या प्रमाणात पोषक द्रव्ये आहेत अशा पिकांची लागवड करणे.

२. नवीन जातीच्या गाई, म्हशी, बैल, पशू यांची वाढ करणे, तसेच प्रत्येक वातावरणाशी सुसंगत अशा बियाणांची निर्मिती करणे, मासेमारी, मत्स्यपालन यासारख्या घटकांकडे लक्ष देणे.

३. राष्ट्रीय संकरित पशुनिर्मिती धोरण अमलात आणून दूध, अंडी, मांस याचे उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने उपाय करणे.

४. खाजगी व सहकारी क्षेत्राचा वापर करून पशुपालन दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन क्षेत्र यांचा विकास करणे.

५. पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय यांचा विकास करून लोकांच्या आहारात या सकस पदार्थांचा वापर वाढवणे.

**३) साधनसामुग्री व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर :**

१) सरकारतर्फे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीत व्हावा, तसेच जैविक तंत्रज्ञानाचा वापर यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

२) सरकारतर्फे ग्रामीण विद्युतीकरणाला विशेष प्राधान्य देऊन शेतीचा विकास करण्यावर विशेष प्राधान्य देण्यात आले.

३) सरकारतर्फे स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यात येऊन स्त्रियांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

**४) शेतीक्षेत्रात आर्थिक वृद्धिसाठी प्रोत्साहन देणे :**

१) शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी शेतकऱ्यांना हमी किमतीचा फायदा देण्यात येईल.

२) शेतकऱ्यांना शेतीच्या किमतीमध्ये होणाऱ्या हंगामी चढउतारापासून संरक्षण देणे.

३) जागतिक व्यापार संघटनेच्या अटी स्वीकारल्यानंतर शेतकऱ्याचे जागतिक स्पर्धेपासून संरक्षण करण्यासाठी प्रत्येक पिकासाठी वेगवेगळे धोरण ठरवण्यात आले.

४) नवीन संकराचा वापर करून कायदेविषयक तरतुदी करून बियाणांच्या निर्मितीतील अधिकार संरक्षित करण्याचे ठरविण्यात आले.

५) देशात अन्नधान्याच्या अंतर्गत व्यापारात असलेले निर्बंध दूर करणे.

६) शेतमाल व व्यापारी पिकांच्या करांविषयी योग्य व सुसंगत धोरण ठरविण्यात यावे.

७) शेतकऱ्यांना योग्य वेळी व पुरेसे कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे.

८) शेतकऱ्यांना अन्नधान्याबाबत तसेच खतांबाबत दिले जाणारे अनुदान पुढे सुरू ठेवण्यात यावे.

९) शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारातून फायदा व्हावा यासाठी व्यापार शर्ती अनुकूल करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

१०) शेतीसाठी वापरली जाणारी यंत्रसामुग्री व इतर वस्तूंवरील अबकारी करांवर सूट देण्यात आली.

**५) खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रातून शेतीत गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देणे –**

१) शेती विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात यावे.

२) शेतीतील संशोधन, मानवी साधन विकास, हंगामानंतर पिकांचे व्यवस्थापन व विपणन या क्षेत्रात खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात यावे.

३) खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक मागासलेल्या भागात करून प्रादेशिक विषमता दूर करण्यात यावी.

४) शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे यासाठी सहकार क्षेत्राला या क्षेत्रात प्रोत्साहन देण्यात यावे.

**६) संस्थात्मक पुनर्रचना -** यामध्ये पुढील उपायांचा समावेश केला आहे.

१) पाश्चिमात्य देशातील धोरणांप्रमाणे भारतात सर्व ठिकाणी शेतजमिनीची तुकडे जोडणी योजना राबवणे.

२) कमाल जमीन धारणा कायद्याअंतर्गत प्राप्त करण्यात आलेल्या भूमींचे तसेच पडीत जमिनीचे वाटप भूमिहीन शेतकरी व शेतमजूर यांना करण्यात यावे.

३) कूळ कायदे, तसेच जमीनभाडे कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

४) स्त्रियांना जमीन मालकीतील हक्क मान्य करणे.

५) जमिनीच्या मालकीची नोंद करणे व ती अद्ययावत करणे व त्यात संगणकाचा वापर करणे, तसेच जमीन मालकांना पासबुक (खातेपुस्तिका) देणे.

**७) धोके व्यवस्थापन :**

शेती व्यवसायात पिकांची नासाडी, हवामानात होणारे बदल, किमतीत होणारे बदल, बाजारातील अपूर्णता इत्यादी धोके व्यवस्थापनासाठी नवीन शेतकी धोरण २००० मध्ये पुढील उपाययोजना करण्यात आली.

१) राष्ट्रीय शेती विमा योजना कार्यक्रमांची संपूर्ण देशपातळीवर अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.

२) शेतकऱ्यांना किमतीतील चढउतारांमुळे नुकसान होऊ नये यासाठी अन्नधान्य खरेदी बाजार व्यवस्थापन याद्वारे शेतकऱ्यांना नुकसानापासून वाचवणे.

३) शेतकऱ्यांना जमिनीच्या पिकांच्या लागवडीपासून ते बाजारात शेतमालाची विक्री करणे या सर्व टप्प्यांमध्ये विमा संरक्षण देण्यात यावे.

अशा प्रकारे नवीन शेतकी धोरण २०००मध्ये माजी कृषीमंत्री नितीशकुमार यांनी विविध समस्यांचा विचार करून शेती विकासाचे सर्वंकष धोरण ठरवले.

शेतीचे २०००चे नवीन धोरण शेती विकासाबाबत फारच आशादायी आहे.शेती क्षेत्राचा सर्वांगीण विचार करून हरितक्रांती, धवलक्रांती (दुधाबाबत), नीलक्रांती (मासे व समुद्रजीवविषयक)या सर्वांसाठी नवीन धोरण सादर केले. हे धोरण म्हणजे भारतीय शेतात सप्तरंगी इंद्रधनुष्याप्रमाणे सर्वंकष विकास घडवून आणेल, असे चित्र यातून स्पष्ट होते.

## १२.३ राष्ट्रीय कृषी धोरणाची वैशिष्ट्ये

राष्ट्रीय कृषी धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) चिरस्थायी शेती

२) अन्न व आहारविषयक सुरक्षा

३) तंत्रज्ञान निर्मिती व हस्तांतरण

४) आदानांचे व्यवस्थापन

५) शेतीसाठी प्रलोभने

६) शेतीमधील गुंतवणूक

७) संस्थात्मक रचना

८) जोखमीचे व्यवस्थापन

विस्ताराने स्पष्टीकरण खालीलप्रमाणे-

**१) चिरस्थायी शेती :**

भारतीय शेतीमधील चिरस्थायी स्वरूपाची राहील याचा अर्थ वृद्धीमध्ये सातत्य राहील व ती दीर्घकाळासाठी असेल. भारतीय शेतीचा चिरस्थायी किंवा दीर्घकालीन विकास साध्य होण्यासाठी धोरणामध्ये पुढील उपाययोजना करण्यात आलेली आहे.

अ) बिगरशेती हेतूसाठी शेतीवापर होऊ नये यावर नियंत्रण ठेवणे.

ब) वापर नसलेल्या क्षेत्राचा शेतीसाठी वापर वाढविणे.

क) माती संरक्षणावर भर देणे.

ड) पाणी साधनसामुग्रीचा योग्य वापर करून त्या साधनसामुग्रीचे जतन करणे.

इ) जैविक तंत्रज्ञानास प्रोत्साहन देणे.

फ) बहुमिश्र व आंतर पिकाचा वापर वाढविणे.

**२) अन्न व आहारविषयक सुरक्षा :**

देशातील अन्न व आहारविषयक सुरक्षा भक्कम करण्यासाठी सर्व पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे. यामध्ये खालील घटकांचा समावेश आहे. अ) संकरित बी-बियाण्यांची उपलब्धता, पशुपालन व दुग्धव्यवसायाचा विकास करणे. ब) अन्न पिकांच्या बाबतीत पिकांच्या नवीन जातींचा विकास. क) हंगामानंतरचे व्यवस्थापन व निर्यातीवर भर.

**३) तंत्रज्ञान निर्मिती व हस्तांतरण :**

शेतीमधील तंत्रज्ञानात बदल करण्यासाठी शेतीविषयक शिक्षण व संशोधनात सुधारणा करण्याचे धोरणाचे ध्येय आहे. त्यासाठी पुढील उपाययोजना सुचविण्यात आली आहे. अ) प्रदेशनिहाय विविध विभागातील हवामान लक्षात घेऊन संशोधन. ब) नावीन्यपूर्ण संस्थात्मक बदल घडवून आणणे.

**४) आदानाचे व्यवस्थापन :**

शेतीमध्ये योग्य वेळी आदानांची उपलब्धता व्हावी यासाठी खालील उपाययोजना धोरणात प्रस्तावित आहेत. अ) दर्जेदार आदानांचा वेळेत व पुरेशा प्रमाणात पुरवठा. ब) खतांचा पर्याप्त व समतोल वापर. क) बी-बियाण्यांचा पुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय शिड ग्रीडची स्थापना. ड) रासायनिक औषधांचा किमान वापर.

**५) शेतीसाठी प्रलोभन :**

शेती उत्पादन व त्यास निर्यात प्रोत्साहन देण्याकरिता प्रोत्साहनाची धोरणात तरतूद आहे. शेती विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणात खालील तरतूद करण्यात आली आहे. अ) शेतीमधील गुंतवणूक वाढीस उत्तेजन देण्याकरिता अनुकूल आर्थिक परिस्थिती निर्माण करणे. ब) कारखानदारी क्षेत्रासोबत शेतीच्या व्यापार क्षेत्रामध्ये सुधारणा करणे. क) कर्जपुरवठ्यासारख्या सुविधा कारखानदारी क्षेत्राला ज्याप्रमाणे उपलब्ध असतात तद्वतच सुविधांची उपलब्धता शेती क्षेत्रास करणे. ड) शेती निर्यातीस प्रोत्साहन देणे.

**६) शेतीमधील गुंतवणूक :**

नवीन धोरणानुसार शेतीमधील गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यावर भर आहे. शेतीमधील गुंतवणूक वाढविण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आली आहे. अ) कृषी संशोधन, बाजारपेठ वगैरे मधील खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे. ब) नवीन गुंतवणुकीस आकर्षित करण्यासाठी ग्रामीण विद्युतीकरणाचा विस्तार करणे. क) संपूर्ण देशभर जलसिंचनविषयक सुविधा विकसित करणे.

**७) संस्थात्मक रचना :**

ग्रामीण भागाच्या संस्थात्मक रचनेत सुधारणा करण्यासाठी खालील तीन क्षेत्रांवर विशेष लक्ष दिले जाईल.

**अ) जमीन सुधारणा –** जमीन सुधारण्यासाठी खालील उपाययोजना केली जाईल.

१. शेतजमिनीचे एकत्रीकरण.

२. कुळांच्या अधिकारास मान्यता देणे.

३. लिज बाजाराचा विकास करणे.

४. स्त्रियांना जमिनीचा मालकीचा हक्क मान्य करणे.

**ब) ग्रामीण कर्ज** :

बँकविषयक सुविधांचा विस्तार करून ग्रामीण भागातील बचत व गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे.

**क) सहकारी क्षेत्र :**

सहकारी क्षेत्राच्या विकासावर भर दिला जाईल, असे धोरणात नमूद केले आहे.

**८) जोखमीचे व्यवस्थापन :**

भारतीय शेतकऱ्यांना पेरणीपासून हंगामापर्यंत व त्यानंतरसुद्धा अनेक जोखमींना तोंड द्यावे लागते. जोखमीचे व्यवस्थापन होण्यासाठी खालील उपाययोजना केली आहे.

अ) किमतीमधील चढ-उतार टाळण्यासाठी बाजाराच्या आकाराचा विस्तार करणे. ब) बी-बियाण्यांच्या पेरणीपासून बाजारापर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी विमा धोरण लागू करणे. क) किमान आधार किमती व सरकारी खरेदी सुरूच ठेवणे.

## १२.५ राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा

राष्ट्रीय कृषी धोरणाच्या माध्यमातून सरकारला शेती आणि उद्योगधंद्यामधील असमानता दूर करावयाची आहे. शेती धोरण हे फारसा वाद नसलेले धोरण आहे. तथापि, ह्या धोरणात पुढील काही उणिवा आहेत.

नवीन शेती धोरणात हरितक्रांती, धवलक्रांती (दूध व दुग्ध उत्पादने), निळीक्रांती(मासे), पिवळीक्रांती (तेलबिया), सोनेरीक्रांती (फळांचे उत्पादन) वगैरेंच्या माध्यमातून भरघोस उत्पादवाढीची खात्री दिलेली असल्याने या धोरणात सप्तरंगी क्रांतीची खात्री दिलेली आहे. त्यामुळेच या धोरणात

अ) शेती क्षेत्रातील आर्थिक वृद्धीच्या दरात ४%पेक्षा जास्त वाढ करणे.

ब) करार शेतीच्या माध्यमातून जास्तीत जास्त खाजगी क्षेत्राचा सहभाग.

क) शेतकऱ्यांना किंमत संरक्षण.

ड) सर्व शेतकरी व सर्व पिकांकरिता राष्ट्रीय विमा योजना. वगैरे घटकांची तरतूद आहे. मात्र नवीन धोरण लागू झाल्यानंतरसुद्धा शेती उत्पादनाचा निर्देशांक जवळजवळ १७६वर स्थिर राहिलेला आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात फार मोठे चढउतार आहेत. नवीन धोरणामुळे निर्माण झालेल्या आशावादाची फारशी पूर्तता झालेली आहे. त्यामुळे या धोरणात अनेक उणिवा आहेत.

**१) शेती उत्पादनाच्या लक्ष्यात निश्चितता नाही :**

भारतीय शेतीच्या उत्पादनात प्रतिवर्षी ४%पेक्षा जास्त दराने वाढ होणे अत्यावश्यक आहे. मात्र त्यादृष्टीने आवश्यक असलेली उत्पादन लक्ष नवीन धोरणात निश्चित अशा स्वरूपात ठरविलेले नाही.

**२) सर्व राज्यांचा समावेश नाही :**

या धोरणात सर्व राज्यांचा शेती विकास घडवून आणण्याचे ठरवले आहे. परंतु मागासलेली राज्ये कोणती ? त्यासाठी कोणते विशेष उपाय योजले जाणार आहेत याची माहिती दिलेली नाही.

**३) लहान शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष:**

शेतीमधील खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन दिले जाईल, असा नवीन धोरणात उल्लेख आहे. मोठ्या शेतकऱ्याच्या उत्पादकतेमध्ये वाढ करण्यासाठी ट्यूब वेल्स, शेतीविषयक आदाने मानवी संसाधन विकास वगैरेच्या स्वरूपात खाजगी गुंतवणूक आवश्यक आहे. याबाबत काहीही शंका नाही, मात्र भारतामध्ये फार मोठ्या संख्येने लहान शेतकरी आहेत. त्यांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी खाजगी गुंतवणुक पेलवण्याची त्यांची क्षमता नाही असे शेतकरी फार मोठ्या प्रमाणात सार्वजनिक गुंतवणुकीवर अवलंबून असतात. अनेक वर्षांपासून त्यात घट होत आहे. यापुढेही जाऊन असेही म्हणता येईल की, गरीब शेतकऱ्याची अधिक संख्या असलेल्या मागास राज्यात केवळ सार्वजनिक गुंतवणुकीमुळे त्यांच्या शेती विकासाला अधिक गती मिळणे शक्य आहे. नवीन धोरणात याबाबतीत काहीही दायित्व नाही.

**४) बेकारीत वाढ :**

नवीन धोरणात खाजगी क्षेत्रातील सहभागाच्या माध्यमातून करार शेती लागू करण्यावर भर आहे. लिज कराराद्वारे महामंडळ क्षेत्राचा सहभाग त्यामध्ये राहणार आहे. भांडवलदारी शेतीऐवजी करारशेती असा गोंडस शब्द वापरला आहे. करार शेतीचा अवलंब झाल्यास रोजगारात घट होईल रोजगार विस्ताराचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. देशाच्या एकूण श्रमशक्तीपैकी जवळजवळ ५०% कामगार शेतीक्षेत्रात सामावून घेतले जातात. त्यामुळे भारतासारख्या अतिरिक्त श्रम असलेल्या अर्थव्यवस्थेत करारशेती आणि महामंडळ क्षेत्राचा त्यातील अवलंब या गोष्टी फारशा शहाणपणाच्या ठरणाऱ्या नाहीत.

**५) अंमलबजावणी यंत्रणेचा अभाव :**

भारत सरकारने नवीन शेती धोरणात शेतीचा विकास करण्यासाठी सर्वव्यापी शिफारशींचा अवलंब केलेला आहे. मात्र या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रणेचा

या धोरणात उल्लेख नाही. भारतातील शेती राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. त्यामुळे शेतीच्या विकासाकरिता केंद्र राज्य सरकारकडून राबविली जाणारी कृषी योजना तयार करणे आवश्यक होते. मात्र नवीन धोरणात तसा विचार केलेला नाही. शेतीच्या या नवीन धोरणात त्रुटी असल्या तरी एका नवीन पर्वास या धोरणाने सुरुवात केली आहे. या योजना योग्य पद्धतीने राबवल्यास भारतीय शेती व शेतकरी अधिक सक्षम बनण्यास हातभार लागेल एवढे मात्र नक्की.

## १२.६ अन्नसुरक्षा

**प्रस्तावना :**

देशातील लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे. हे आर्थिक नियोजनाचे सर्वाधिक महत्त्वाचे उद्दिष्ट असते. अन्नधान्यांचे केवळ पुरेसे उत्पादन करून भागणार नाही, तर पुरेशा उत्पादनाबरोबरच समाजातील सर्व लोकांमध्ये त्या अन्नधान्यांचे योग्य वाटप केले जाणेही आवश्यक ठरते. पुरेशा अन्नाच्या अभावी मानवी कल्याण, सामाजिक न्याय, लोकशाही या गोष्टी प्राप्त करून घेणे भारताला जवळजवळ अशक्य होईल.

भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य केली असली तरी भारताची अन्नसमस्या भारतीय अर्थव्यवस्थेतील एक मूलभूत समस्या आहे. त्यामुले अन्नधान्य सुरक्षा सर्वांनाच प्राप्त करून देणे हे सरकारचे महत्त्वाचे कार्य व जबाबदारी ठरते.

## १२.७ अन्नधान्य सुरक्षा – संकल्पना व व्याख्या

**Food and Agriculture Organisation (FAO)** च्या नुसार "अन्नधान्य सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना कोणत्याही वेळी भौतिक व आर्थिकदृष्ट्या सहज प्राप्त होऊ शकेल, अशा मूलभूत अन्नधान्याची सार्वत्रिक उपलब्धता होय."

जागतिक विकास अहवाल (१९८६) नुसार "अन्नधान्य सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना सुदृढ आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक असलेल्या पुरेशा अन्नधान्याची कोणत्याही वेळी होऊ शकेल अशी उपलब्धता होय." यावरील दोन्ही व्याख्यांवरून अन्नधान्य सुरक्षेबाबत पुढील बाबी लक्षात येतात.

१. सर्व लोकांसाठी अन्नधान्याची **भौतिक उपलब्धता**.

२. मूलभूत अन्नधान्यासाठी **आर्थिक सुसाध्यता** म्हणजेच हवे असलेले अन्नधान्य विकत घेण्याची लोकांची खरेदीशक्ती.

३. **मूलभूत अन्नधान्य** हे असे अन्न आहे की ज्यात पोषकता/पोषणक्षमता असेल.

४. **कोणत्याही वेळी उपलब्धता/सार्वत्रिक उपलब्धता** : याचाच अर्थ अल्पकाळ किंवा दीर्घ काळ कोणत्याही वेळी भौतिक व आर्थिकदृष्ट्या सुसाध्य अशी अन्नधान्याची उपलब्धता हवी. यामुळेच अन्नधान्याचा पुरवठा पुरेसा असणे आवश्यक ठरते.

५. **निरोगी, आरोग्यदायी जीवनास आवश्यक असणारा पुरेसा अन्नपुरवठा** : यात धान्य, कडधान्य, दूध व दुग्धजन्य पदार्थ, भाज्या, फळे, मासे, अंडी व मटण यांचा अनुक्रमे समावेश वाढत जायला हवा.

## १२.८ भारतात अन्नधान्य सुरक्षेची गरज

अन्नधान्य समस्या ही मागणी व पुरवठ्याची समस्या आहे. उत्पादन, आयात, सरकार व खाजगी क्षेत्राने राखलेला शिलकी अन्नधान्याचा साठा यावर पुरवठा अवलंबून असतो. यावरूनच अन्नधान्याची निव्वळ उपलब्धता ठरत असते. १९६०, १९७० व १९८०च्या दशकांत भारतात अन्नधान्याचा तुटवडा होता. पण हरितक्रांतीच्या साहाय्याने भारतीय शेती उत्पादनाचे चित्र पूर्णपणे पालटल्याचे दिसते. भारत यामुळे एक अन्नधान्य मुबलकतेचा देश म्हणून ओळखला जाऊ लागला. पण वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी विचारात घेता पुढील कारणांमुळे अन्नधान्य सुरक्षेची भारतात गरज वाटू लागली.

### १. अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता आणणे :

देशाची वाढती लोकसंख्या व त्यानुसार वाढणारी मागणी लक्षात घेऊन भारतीय नियोजनकारांनी अन्नधान्याच्या उत्पादनात देशाला स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट कायमच लक्षात ठेवले आहे.

### २. अन्नधान्याची आयात कमी करणे :

देशात हरितक्रांती घडून आल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता साध्य करणे शक्य झाले आहे. त्यामुळे १९६५ पर्यंत होत असलेली सातत्यपूर्ण अन्नधान्याची आयात टाळणे १९६५ नंतर शक्य झाले. भारतात १९५०-५१मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ५१दशलक्ष टन होते ते २००१-०२मध्ये २१२दशलक्ष टनापर्यंत वाढले. त्यामुळे अन्नधान्याची आयात फारच थोड्या प्रमाणात करण्याची गरज उरली आहे.

### ३. अन्नधान्य तुटवड्याची समस्या दूर करणे :

हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादन वेगाने वाढले. त्यामुळे अन्नधान्य तुटवड्याची समस्या दूर करणे शक्य झाले. तसेच धान्याचा साठा करणेही शक्य झाले. असा अन्नधान्याचा साठा इतर वेळी तुटवड्याची स्थिती असताना वापरणे शक्य झाले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्था व भारतीय अन्न महामंडळाची (FCI) स्थापना यांच्या साहाय्याने अन्नधान्य समस्या दूर करणे शक्य झाले आहे.

### ४. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अन्नधान्य सुरक्षा प्राप्त करणे:

भारतात अजूनही २६.१%लोक दारिद्र्यरेषेखाली असल्याने कुपोषण व भूकबळी, उपासमार आहेच. जर नैसर्गिक आपत्ती मोठ्या प्रमाणात घडून आली तर त्याचे खूप मोठे परिणाम दिसून येतात. दुष्काळावर मात करणे हे अन्नधान्य सुरक्षेमुळे शक्य झाले आहे.

सरकारने दुष्काळ, पूर, युद्ध इत्यादी कारणांमुळे निर्माण झालेल्या आपत्तींना तोंड देण्यासाठी विविध उपाययोजना योजल्या आहेत. सुयोग्य सार्वत्रिक वितरण व्यवस्थेचा विकास, विकसित अन्नधान्य विभाग, राष्ट्रीयीकृत सार्वत्रिक व्यापार यांचा वापर केला आहे. पण आणीबाणीच्या, प्रखर अडचणींच्या काळात योग्य अन्नधान्य पुरवठा करण्याच्या दृष्टीने भारतात योग्य अशी अन्नधान्य सुरक्षा प्रणाली विकसित करणे आवश्यक ठरते.

## १२.९ भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन

भारतात अन्नधान्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सरकारने पुढील उपाययोजना राबवल्या आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था अ) पुरवठ्याच्या दृष्टिकोनातून ब) मागणीच्या दृष्टिकोनातून राबवता येते. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

### अ) पुरवठ्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना :

यानुसार लोकांना योग्य, पुरेशा प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता व्हावी व पुरवठा व्हावा याकडे सरकार लक्ष देते. यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

### १) अन्नधान्याचा शिलकी साठा वाढविणे (Buffer Stock) :

ज्यावेळी मुबलक प्रमाणात अन्नधान्य पिकते, त्यावेळी जास्तीचा अन्नधान्य पुरवठा सरकार शेतकऱ्यांकडून विकत घेऊन त्याचा साठा करते व अडीअडचणींच्या वेळी अल्पकाळात धान्याचा तुडवडा भासल्यास या शिलकी साठ्यातील धान्य बाहेर काढले जाते. शिलकी साठा ही संकल्पना व धोरण चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून राबवण्यास सुरूवात झाली. शिलकी साठा सरकारकडे किती असावा याबाबत दर ५ वर्षांतून एकदा निर्णय घेतला जातो. ऑक्टोबर २००५मध्ये तांदळाचा ४.८दशलक्ष टन, तर गव्हाचा १०.३दशलक्ष टन इतका शिलकी साठा सरकारकडे होता. सरकारने ठरवलेल्या प्रमाणापेक्षा हा शिलकी साठा कमीच आहे. ऑक्टोबर २००५मध्ये तांदळासाठीचे प्रमाण ५.२ दशलक्ष टन व गव्हासाठी ११ दशलक्ष टन इतके ठरवले गेले होते. असे असले तरी सरकारकडे असलेला साठा पुरेसा समाधानकारक आहे.

### २) सार्वजनिक वितरण व्यवस्था (Public Distribution System PDS) :

या व्यवस्थेत तांदूळ, गहू, साखर, रॉकेल, खाद्यतेल यासारख्या महत्त्वाच्या वस्तू अनुदानित किमतीस पुरवल्या जातात. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील विक्रीत या वस्तूंचा वाटा जवळजवळ ८६%इतका आहे. (साखर – ३५%, तांदूळ – २७%, गहू – १०%, रॉकेल – १५%) संपूर्ण भारतभर ही व्यवस्था कार्यरत आहे. शिधापत्रिका अशा सर्व व्यक्तींना देण्यात येते की ज्यांचा नोंदणीकृत निवासाचा/राहण्याचा पत्ता आहे. भारतात १९६०साली ४७हजार रास्त भावाची धान्याची दुकाने होती, तर २०००साली ती एकूण ४.७लाख इतकी होती. २०००लोकसंख्येसाठी एक रास्त भावाचे धान्याचे दुकान असते.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत १९६१-६५च्या दरम्यान ६.५ दशलक्ष टन इतके धान्य वितरित केले गेले, तर १९९०-९२मध्ये १८०४ दशलक्ष टन धान्य वितरित केले गेले.

### ३) पूर्वलक्षित सार्वजनिक वितरण व्यवस्था (Targeted P.D.S) :

ही योजना जास्त गरीब लोकांच्या गरजा पुरवणारी व्हावी यासाठी जून १९९७ मध्ये सुरू करण्यात आली. दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबांना विशेष अनुदानित किमतीला/दराला अन्नधान्य पुरवण्याचे ध्येय या व्यवस्थेचे आहे. आतापर्यंत ६५.२ दशलक्ष गरीब कुटुंबांना १८.५२ दशलक्ष टन धान्य पुरवण्याचे काम या व्यवस्थेमार्फत करण्यात आले आहे. दरमहा प्रत्येक कुटुंबाला सरासरी २५ किलो धान्याचा फायदा झाला आहे. अन्नधान्याचे वितरण करताना विक्री किंमत ही राज्य सरकारकडून ठरविली जाते.

### ४) भारतीय अन्न महामंडळ (FCI – Food Corporation of India) :

१९६५मध्ये या महामंडळाची स्थापना करण्यात आली. ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेला अन्नधान्य पुरवठा करणारी संस्था आहे. या महामंडळाची महत्त्वाची जबाबदारी म्हणजे अन्नधान्याची खरेदी, साठवणूक, वाहतूक,वितरण व विक्री करणे होय. एका बाजूला शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य ती किंमत मिळेल, तसेच ग्राहकाला योग्य भावात अन्नधान्यही मिळेल याची खबरदारी हे महामंडळ घेत असते.

या महामंडळाकडे अन्नधान्याचा साठा मुबलक झाल्यामुळे आता आयातीवर अवलंबून राहणे कमी झाले आहे व परकीय चलन ही बचत करणे शक्य झाले आहे. या महामंडळाने ज्यांच्याकडून अन्नधान्य विकत घेतले आहे, त्यांना योग्य, किफायतशीर किमती प्राप्त झाल्या आहेत. तसेच या महामंडळाने वाजवी दरात वस्तू पुरवल्यामुळे भाववाढ रोखण्यासाठी मदत झाली आहे. सरकारला शिलकी साठा वाढवून सार्वत्रिक वितरण व्यवस्थेची गरज पूर्ण करण्यासाठीही या महामंडळाने मदत केली आहे. शास्त्रीय पद्धतीने अन्नधान्याचा साठा करण्यासाठी हे महामंडळ प्रयत्न करते.

### ब) मागणीच्या दृष्टिकोनातून उपाययोजना :

यात सरकारने अन्नधान्याची मागणी वाढवण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्या आहेत.

### १) सार्वजनिक वितरण व्यवस्था गरीब लोकांपर्यंत पोहोचवणे :

ग्रामीण व शहरी भागातील गरीब यांची नोंद करणे, जेणे करून त्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे फायदे घेता येतील. यासाठी ज्या लोकांना अन्नधान्य अनुदान आवश्यक आहे अशांचा ‘टारगेट गट’ तयार करणे व जे लोक या गटात बसत नसतील त्यांना वगळणे. अशा लोकांची यादी ग्रामीण भागातील पंचायतींच्या साहाय्याने तयार करता येते. यामुळे फक्त गरीब लोकांनाच याचा फायदा मिळतो, यातून अन्नधान्याचे अनुदान कमी होऊन केंद्र सरकारची तूट कमी होते.

### २) सार्वत्रिक उपक्रम व सुरक्षा जाळे :

सार्वत्रिक वितरण व्यवस्थेचे मुख्य ध्येय म्हणजे गरीब लोकांना पुरेसे अन्नधान्य योग्य अनुदानित किमतीस उपलब्ध करून देणे व त्यांना सुरक्षित ठेवणे, त्यांचे वाढत्या किमतीपासून संरक्षण करणे हे होय.

ग्रामीण भागातील कार्यक्रम जर रोजगार हमी योजना (**EGS**), जवाहर रोजगार योजना, रोजगार खात्री/हमी योजना(**EAS**) त्यांच्या मार्फत गरिबांना सुरक्षा गटात घेऊन दारिद्र्याचे निर्मूलन करणे व त्यांना योग्य रोजगार प्राप्त करून देणे हे उद्दिष्ट असते.

**३) रोजगार कार्यक्रम :**

भारत सरकारने राज्यातील दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीने पीडित ग्रामीण भागांसाठी **Food For Work Programme** सुरू केला. १५ ऑगस्ट २००१ या दिवशी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत २६.०४दशलक्ष टन अन्नधान्याचे वाटप २००२ पर्यंत करण्यात आले. डिसेंबर २०००मध्ये अंत्योदय अन्न योजना सुरू करण्यात आली. यानुसार गहू २रू. किलो व तांदूळ ३रू. किलो दराने २५किग्रॅ. धान्य गरीब कुटुंबांना देण्याचे ठरले.

**४) अन्नपूर्णा योजना :**

ही योजना ग्राममंत्रालयातर्फे २००१ साली सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत ६५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या वृद्धांना व ज्यांना निवृत्ती वेतन मिळत नाही अशा व्यक्तींना दरमहा १०किग्रॅ. अन्नधान्याचा मोफत पुरवठा केला जातो.

**५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे विकेंद्रीकरण :**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. यात पहिल्या गटात पंचायत व स्थानिक संघटनांचा अन्न सुरक्षा व्यवस्थेत समावेश करावा. त्यांनी गरिबांची नोंद करावी व या लोकांना रोजगार व अन्नधान्य पुरवणाऱ्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.

यात दुसऱ्या गटात राज्य पातळीवर अन्न सुरक्षा व्यवस्था कार्यरत असावी. सर्वसाधारण व्यापारी ज्या भागांपर्यंत अन्नधान्य पोहोचवू शकत नाहीत, त्या भागांना धान्य पोहोचवण्याची जबाबदारी या राज्य पातळीच्या गटाने घ्यावी. किंमत स्थैर्य राखण्यासाठी राष्ट्रीय किंमत धोरण आचरणात आणावे.

दारिद्र्य निर्मूलनाकरता वापरल्या जाणाऱ्या मार्गांच्या/उपक्रमांच्या साहाय्याने 'अन्न सुरक्षा' उद्दिष्टावर भर द्यायला हवा.

या सार्वजनिक वितरण व्यवस्थेला 'कल्याणकारी कार्यक्रम' याचा दर्जा प्राप्त झाला आहे. ग्रामीण भागात जाळे पसरवण्याचे कार्य या व्यवस्थेने केले आहे. रास्त भावाच्या दुकानांची (fair price shops) संख्या ग्रामीण भागात वाढलेली आहे. अनेक रोजगार उपक्रमांमध्ये वेतन म्हणून अनुदानित अन्नधान्य वितरित केले गेले. जास्तीत जास्त गरीब लोकांना या व्यवस्थेचा फायदा झाला आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात सार्वत्रिक वितरण व्यवस्था राबवताना पुढील मर्यादा येतात.

**१) गरिबांना मर्यादित फायदा :**

ग्रामीण व शहरी भागातील गरीब सार्वजनिक वितरण व्यवस्थेपेक्षा खुल्या बाजारातील वस्तूंवर जास्त अवलंबून राहतात. त्यामुळे या व्यवस्थेचा गरिबांना कमी फायदा होतो.

**२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील प्रादेशिक तफावत :**

बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान व उत्तर प्रदेश या भागांत दारिद्र्यरेषेखालील एकूण लोकसंख्येच्या ४७.६%लोक राहतात, पण या भागांना फक्त १०.४% इतकेच धान्य सार्वत्रिक वितरण व्यवस्थेच्या मदतीने १९९५मध्ये मिळाले. तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू या भागांत १९९३-९४मध्ये १८.४%लोक दारिद्र्यरेषेखाली असताना त्यांना १९९५मध्ये ४८.७%इतके धान्य वितरित केले गेले.

**३) खर्च जास्त :**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या साहाय्याने गरीब लोकांपर्यंत धान्याचे वितरण करण्याचा खर्च खूप जास्त आहे. त्यामुळे सरकारला याचा बोजा उचलावा लागत आहे.

**४) खरे गरीब जे आहेत त्यांच्यापर्यंत शक्य नाही :**

कारण शिधापत्रिका त्यांनाच दिल्या जातात ज्यांच्याकडे निवासाच्या पत्त्याची नोंद आहे. गरिबांना घरच नसल्याने शिधापत्रिकाही नाही. त्यामुळे या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे फायदेही मिळत नाहीत.

**५) अन्न अनुदानाचा सरकारवर फार मोठा बोजा पडत आहे :**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेला स्वस्त दरात अन्नधान्य पुरवण्यासाठी सरकारला धान्यावर अनुदान द्यावे लागते.

**६) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गळती :**

वाहतूक, साठवणूक, खुल्या बाजारात धान्य आणणे यात बऱ्याचदा गळती झालेली दिसून येते. विक्रीदर सार्वजनिक वितरण व्यवस्थेला मिळालेले धान्य खुल्या बाजारात विकताना आढळतात. शिधापत्रिकांच्या बोगस नोंदणी झालेल्या आढळतात. गरिबांपर्यंत वस्तू पोहोचवण्याच्या व्यवस्थेतही त्रुटी असल्याचे आढळते.

असे असले तरीही भारतासारख्या देशात जिथे अजूनही २६%जनता दारिद्र्यरेषेखाली आहे, त्यांच्या कल्याणाकरता सार्वजनिक वितरण व्यवस्थेला पर्याय नाही.

## १२.१० दीर्घकालीन अन्नधान्य व्यवस्थापन धोरण

अन्नधान्य व सार्वजनिक वितरण व्यवस्था खात्याने १६नोव्हेंबर २०००साली दीर्घकालीन अन्नधान्य व्यवस्थापनासाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत केली. ३१ जुलै २००२ साली या समितीने आपला अहवाल सादर केला. यात पुढील काही महत्त्वाच्या शिफारशी या समितीने केल्या.

१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी अन्नधान्य खरेदी करताना गुणवत्तेचा निकष काटेकोरपणे पाळला जावा.

२) केंद्र सरकारने व राज्य सरकारने भारतीय अन्नधान्य महामंडळाकडे (**FCI**) द्यावयाची रक्कम वेळेवर द्यावी.

३) तांदळासाठी किमान खरेदी किंमत सर्व जातींसाठी एकच ठेवावी.

४) खरेदी किमतीमधील तफावत कमी करून रास्त भावांच्या अन्नधान्य दुकानांची वितरण व्यवस्थेतील व्यवहार्यता वाढवावी.

५) अन्नधान्यांचा चालू साठा संपल्यावर राहिलेले अन्नधान्य रोजगार योजनांसाठी वापरून ग्रामीण भागांतील सुविधा वाढविण्यास प्राधान्य द्यावे.

६) अंत्योदय अन्न योजना समाजातील व सर्व प्रांतातील आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत लोकांसाठी सुद्धा राबवली जावी.

७) केंद्राने पुरस्कृत केलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा देशातील सर्व लोकांसाठी वापर केला जावा.

८) पेरणीच्या आधी केंद्र सरकारने दरवर्षी किमान हमी किंमत जाहीर करावी. यासाठी कृषी खर्च व किंमत आयोगांच्या (Agricultural Costs & Price Commission) शिफारशी विचारात घ्याव्यात.

९) कृषी खर्च व किंमत आयोगाला वैधानिक अधिकार देण्यात यावेत.

१०) अन्नधान्यासाठी किमान हमी किंमत ठरवताना सर्व प्रकारच्या खर्चाचा अंदाज घेऊनच ती ठरवावी. उदा. जमिनीचे खंड, घरगुती (कौटुंबिक), श्रम, भांडवल खर्च इत्यादी.

११) अन्नधान्य खरेदी करताना स्थानिक उत्पादन खरेदी करून वाहतूक खर्चात बचत करावी.

१२) भात गिरण्यांवर सरकारद्वारे लावल्या जाणाऱ्या करांची रक्कम त्वरित काढून घेणे.

१३) जेव्हा किमान हमी किमतीला अन्नधान्य उपलब्ध होत नसेल व त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी लागणाऱ्या धान्याच्या पुरवठ्यासाठी अन्नधान्य कमी पडत असेल, त्यावेळी शेतकऱ्यांकडून बाजारभावाने अन्नधान्य खरेदी केले जाते.

१४) भारतातील लोकांच्या आहाराच्या सवयीत होत असलेल्या बदलांनुसार अन्नधान्य उत्पादनात फेरबदल करण्यासाठी विशेष उपक्रम हाती घ्यावा.

१५) मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून अन्नधान्याची आवश्यकतेनुसार आयात व निर्यात करावी.

१६) अन्नधान्याच्या खाजगी व्यापारातील आर्थिक, तसेच कायदेशीर अडचणी दूर करून व्यापारात सुलभता आणावी.

१७) भारतीय अन्नधान्य महामंडळाने संपूर्ण गुणवत्ता पालन निकषाचा विचार करून सार्वजनिक वितरण व्यवस्थेत गुणवत्ता आणावी.

नवीन धोरणानुसार पुढील तीन मुद्द्यांवर भर दिला आहे.

१. फळफळावळ व भाज्या यांच्या उत्पादनाचे प्रमाण वाढवणे.

२. अन्नधान्य साठवणुकीच्या सुविधात वाढ करणे.

३. नाशवंत वस्तूंच्या उत्पादनावरून प्रक्रिया उद्योग वाढवणे.

या वरून हेच लक्षात येते की उत्पादकतेबरोबरच गुणवत्ता वाढविण्याचा विशेष प्रयत्न अन्नधान्य व्यवस्थापन धोरणात केला आहे.

## १२.११ स्वाध्याय

१. राष्ट्रीय कृषी धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

२. राष्ट्रीय कृषी धोरणाची वैशिष्ट्ये सांगा.

३. राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा स्पष्ट करा.

४. अन्नसुरक्षेची संकल्पना सांगून भारतात अन्नसुरक्षेची गरज आहे काय?

५. भारतासाठी अन्नधान्य व्यवस्थापनाचे धोरण स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# १३

# पाणीपुरवठा आणि जलव्यवस्थापन

**पाठाची रूपरेषा**

१३.० पाठाचे उद्देश

१३.१ प्रास्ताविक

१३.२ शेतीमध्ये पाणीपुरवठ्याची असणारी गरज किंवा त्याचे महत्त्व

१३.३ सिंचनाची साधने

१३.४ जलसिंचनाच्या पद्धती /पिकांना पाणी देण्याच्या पद्धती

१३.५ सिंचनाचे फायदे

१३.६ सिंचनाच्या समस्या

## १३.० पाठाचे उद्देश

- शेतीला पाणीपुरवठ्याची असणारी गरज समजावून घेणे.
- शेतीला पाणीपुरवठा करणारी साधने अभ्यासणे.
- पिकांना पाणी देण्याच्या पद्धती समजावून घेणे.
- सिंचनाचे फायदे अभ्यासणे.
- सिंचनाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

## १३.१प्रास्ताविक

शेतीच्या विकासासाठी संस्थात्मक आणि तंत्रात्मक अशा दोन्ही प्रकारच्या सुधारणा कराव्या लागतात. संस्थात्मक सुधारणांमध्ये स्वतंत्र विचार अन्यत्र केला आहे. तंत्रात्मक सुधारणांमध्ये शेतीला पाणीपुरवठ्याची सोय, नवीन बियाणांचा वापर, खतांचा उपयोग, पीक संरक्षणाचे उपाय आधुनिक अवजारांचा वापर इत्यादी घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे शेतीची वाढती उत्पादकता. आज ज्याचा उल्लेख 'हरित क्रांती' असा करतात. ती शेतीमधील तंत्रात्मक सुधारणांमुळे शक्य झाली आहे. पाणी हे शेतीचे जीवन असल्यामुळे हरित क्रांतीमध्ये सिंचनाला सर्वाधिक महत्त्व प्राप्त होते.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीमध्ये होणाऱ्या उत्पादनाचे स्वरूप आणि उत्पादनाची पातळी बऱ्याच शेतकऱ्यांना नियमितपणे पाण्याचा पुरवठा होतो किंवा नाही व ते ह्या सोयीचा कशा रीतीने उपयोग करून घेतात ह्यावर अवलंबून असते. डॉ. हॉल्कर यांच्या मते, पाणी व खत ह्या भारतीय शेतकऱ्यांच्या दोन मुख्य गरजा आहेत.

केवळ पर्जन्यावर अवलंबून असलेली शेती निश्चित स्वरूपाचे उत्पादन देऊ शकत नाही. त्यासाठी पाणीपुरवठ्याच्या कृत्रिम सोयी असणे अत्यंत आवश्यक आहे. पाणीपुरवठ्यामुळे शेतीचे उत्पादन वाढविणे आणि आधुनिक पद्धतीने लागवड करणे शक्य होते.

## १३.२ शेतीमध्ये पाणीपुरवठ्याची असणारी गरज किंवा त्याचे महत्त्व पुढील मुद्द्यांद्वारे स्पष्ट करता येते

### १) अनियमित पाऊस :

निसर्गाचा अनियमितपणा हा शेतीला मिळालेला शाप आहे. शेतीच्या उत्पादनातील सर्वात मोठी जोखीम म्हणजे पर्जन्याचे अनिश्चित प्रमाण. ही जोखीम अशी आहे ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न शेवटपर्यंत अनिश्चित राहते. भारतीय परिस्थितीबाबत असे म्हटले जाते की येथे सरासरी पाच वर्षांचा विचार केल्यास, त्यापैकी तीन वर्षे यथातथा असतात, एक वर्ष अतिशय वाईट म्हणजे दुष्काळाचे असते, तर एक वर्ष चांगले असते. पावसाच्या या अनिश्चिततेमुळे शेतीच्या उत्पादनातही अनिश्चितता येते व ती दूर करण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या सोयी असणे आवश्यक ठरते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात पाणीपुरवठ्याच्या सोयीत वाढ झाली असली तरी अद्यापही बरीचशी शेती पर्जन्यावर अवलंबून आहे. या पर्जन्याचे मोसमाच्या दृष्टीने किंवा प्रदेशांच्या दृष्टीने असणारे वितरणसुद्धा असमान आहे. मोसमाच्या दृष्टीने विचार केल्यास वर्षभरात जेवढा पाऊस पडतो त्याचा तीन चतुर्थांश हिस्सा केवळ चार महिन्यांत, म्हणजे जून ते ऑक्टोबर या काळात पडतो. बाकी महिन्यांमध्ये पावसाचे प्रमाण अतिशय कमी असल्याने कास्तकारांना एकच पीक घ्यावे लागते. हे चित्र तेव्हाच बदलू शकते जेव्हा वर्षाच्या इतर काळातसुद्धा शेतीला पाण्याचा शाश्वत पुरवठा होऊ शकेल व त्यासाठी सिंचन महत्त्वाचे आहे.

(para)प्रदेशांच्या दृष्टीने विचार केल्यास, भारताच्या काही भागांमध्ये ओला दुष्काळ पडण्याची परिस्थिती असते. दरवर्षी आसाम, बंगाल यासारख्या प्रदेशांमध्ये अतिवृष्टीमुळे मनुष्यहानी आणि वित्तहानी होते. याउलट काही प्रदेशांमध्ये मात्र वर्षभर पिण्याच्या पाण्याची सोय होऊ शकेल इतकाही पाऊस पडत नाही. अशा भागांमध्ये पावसाच्या कमतरतेमुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी शेतीला कृत्रिम पाणीपुरवठा आवश्यक आहे.

### २) विविध पिकांची गरज :

निरनिराळ्या प्रदेशांमध्ये घेतली जाणारी पिके विविध प्रकारची असतात. त्यांना लागणारे पाणीसुद्धा वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या मात्रेत हवे असते. काही पिकांना जास्त पाणी लागते, तर काही पिकांना बराच काळ पाणी द्यावे लागते. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने दिलेल्या अनुमानानुसार, गव्हाला १४.८ एकर-इंच पाणी लागते, तर धानाला ४१.७ आणि उसाला ९५.० एकर-इंच इतकी पाण्याची गरज असते. ज्यावेळी पिकाला आवश्यक इतके पाणी पावसापासून मिळू

शकत नाही, तेव्हा सिंचनाला पर्याय नसतो. सिंचनाच्या सोयी उपलब्ध असल्यास पिकाची गरज ओळखून कमी-जास्त पाणी देता येईल. अर्थात त्यानुसार विविध प्रकारची पिके घेणेही शेतकऱ्याला शक्य होईल. अन्यथा मर्यादित पिकांच्या लागवडीमुळे त्यांचे उत्पन्नसुद्धा मर्यादित राहील.

**३) सखोल शेती :**

भूमी हा उत्पादनाचा स्थिर घटक मानला जातो. म्हणजे भूमीचा जो एकूण पुरवठा आहे त्यात बदल करण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत उत्पादनात वाढ घडवून आणल्यास सखोल शेतीला पर्याय नाही. भारतामध्ये एकूण ३२.८७ कोटी हेक्टर जमीन उपलब्ध असली तरी लागवडीखालील एकूण क्षेत्र साधारण निम्मे म्हणजे १७.३ कोटी हेक्टर आहे. यामध्ये वाढ करून विस्तृत शेतींची शक्यता फारशी नाही. पण वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य, कारखान्यांना कच्चा माल यांची गरज मात्र दिवसेंदिवस वाढते आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या लागवड-क्षेत्रात सखोल शेती करणे आवश्यक आहे. या दृष्टीने ज्या जमिनीत आज पीक घेतले जाते येथे जास्त पीक घेण्याची गरज आहे व त्यासाठी सिंचनाच्या सोयीत वाढ होणे महत्त्वाचे आहे, याचा अर्थ, उत्पादनात वाढ घडविणे आणि पीक प्रकारात विविधता आणणे यासाठी सिंचनाचे महत्त्व अतिशय जास्त आहे. आज ज्याला आपण हरित क्रांती म्हणतो तिचा आत्मा पाणीपुरवठ्याच्या सोयी हाच आहे.

**४) उत्पादकतेत वाढ :**

शेतीच्या कमी उत्पादकतेच्या कारणांचा आपण यापूर्वी अभ्यास केला. त्यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीचे मान्सूनवरील अवलंबित्व. जर लहरी मान्सूनच्या ऐवजी शेतीला कृत्रिम पाणीपुरवठ्याची शाश्वत सोय करता आली तर शेतीच्या उत्पादकतेत बरीच वाढ करता येते. ज्या भागात पाणीपुरवठ्याच्या सोयी आहेत तेथे इतर भागांमध्ये उत्पादन जास्त दिसून येते. जपानमध्ये साधारण ७५ प्रतिशत जमिनीला पाणीपुरवठा करण्याची सोय आहे. तर इजिप्तमध्ये जवळपास सर्वच जमीन पाणीपुरवठ्याखाली येते. परिणामतः या देशांमध्ये जमिनीची उत्पादकतासुद्धा जास्त दिसून येते. जपानमध्ये तांदळाचे उत्पादन ६३३० किलो प्रति हेक्टर असताना भारतात ते केवळ २६९० किलो प्रति हेक्टर (१९९०)असावे यांचे स्पष्टीकरण हेच आहे. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचनाच्या सोयीत वाढ करणे महत्त्वाचे ठरते.

**५) रोजगारात वाढ :**

शेती हा ग्रामीण भागाचा महत्त्वाचा व्यवसाय असल्यामुळे सिंचनाच्या सोयी या विभागाच्या जवळपास घ्याव्या लागतात. त्यासाठी हाती घेतल्या जाणाऱ्या प्रकल्पाद्वारे अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. सिंचनाचे मोठे प्रकल्प हे भांडवल प्रधान असतात, त्यामुळे काम लवकर होते हे जरी खरे असले तरी कालवे खोदणे, बांधकाम यासारख्या कामात श्रमिकांचा जास्त वापर करता येते. विशेषतः भरपूर श्रमशक्ती उपलब्ध असणाऱ्या भारतासारख्या देशात श्रम प्रधान तंत्र राबविणे अगत्याचे आहे. सिंचन हे एक असे क्षेत्र आहे ज्यात अनेक लोकांना रोजगार मिळू शकतो.

**६) नैसर्गिक असंतुलनावर उपाय :**

निसर्गाने केलेल्या अन्यायाची दाद मागता येत नाही, पण त्यावर उपाय मात्र करता येतो. भारतात जो पाऊस पडतो तो सर्वत्र सारखा नाही. काही भागात अतिशय जास्त पाऊस झाल्याने

प्रचंड नुकसान होते, तर काही भाग कायम कमतरतेचा असतो. जो काही पाऊस पडतो तोसुद्धा वर्षातील सर्वकाळ पडत नसून प्रामुख्याने चार महिन्यांतच पडतो. पर्यावरणाच्या संतुलनातील बिघाडामुळे ही परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. या असंतुलनावर उपाय म्हणजे पाणी साठविण्याची सोय करणे आणि त्या पाण्याचा उपयोग गरजेप्रमाणे करणे हाच होय. पावसाचे चार महिने वगळता इतर काळात शेतीची तहान भागविण्यासाठी सिंचनाला पर्याय नाही.

**७) इतर कार्यासाठी जमीन :**

विस्तृत शेतीमध्ये लागवडीखालील क्षेत्र वाढविणे अभिप्रेत असते. अर्थात लागवड-क्षेत्र वाढविताना नवीन जमीन सुपीक असेलच असे नाही. तिचा दर्जा जर उच्च नसेल तर उत्पादकता सुद्धा कमी राहील. याउलट जर आपण सखोल लागवडीवर सिंचनाच्या साहाय्याने लक्ष केंद्रित केले तर हीच दुय्यम दर्जाची जमीन इतर कामांसाठी उपयोगात येऊ शकते. शेतीशिवाय इतरही काही कामे अशी आहेत ज्यांचे महत्त्व कमी लेखता येत नाही. उदाहरणार्थ, वनीकरण. निसर्गाचे चक्र व्यवस्थित राहण्यासाठी विशिष्ट भूभाग जंगलाखाली असायलाच हवा. अफाट जंगलतोडीचे दुष्परिणाम आपण सध्या भोगतोच आहोत. जर वनीकरण वाढविले तर हे चक्र सुरळीत चालू शकते. त्यासाठी साधारण दर्जाची जमीन वापरता येते. तसेच पशुपालन हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. पशूंच्या चाऱ्याची सोय करण्यासाठी काही जमीन कुरण म्हणून वेगळी असायला हवी. म्हणजे शेतीशिवाय इतर कामात जमिनीचा उपयोग आवश्यक आहे. पण त्यामुळे शेतीचे उत्पादन कमी होणे अपरिहार्य नाही, कारण सिंचनाच्या सोयी करून मर्यादित सुपीक जमिनीतून जास्त उत्पादन घेता येईल आणि अन्नधान्य व इतर वस्तूंची गरज भागविता येईल. याचा अर्थ हाच की सिंचनामुळे आपण शेतीचे उत्पादन वाढवून जमिनीचा उपयोग इतर आवश्यक कामासाठी करू शकतो.

**८) शेतीचे व्यापारीकरण :**

शेती हा केवळ उदरनिर्वाहाचा मार्ग आहे असे मानण्याचा हा काळ नाही. इतर व्यवसायांप्रमाणे शेतीकडे सुद्धा व्यापारी दृष्टीने पाहायला हवे. त्याशिवाय या व्यवसायाची लाभक्षमता वाढणार नाही आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीत फरक पडणार नाही. परंतु भारतातील बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक किंवा सीमांत कास्तकार आहेत. त्यांच्या अतिशय मर्यादित जमिनीतून ज्वारीसारखे पीक घेणे त्यांना आवश्यक ठरते. प्रथम पोटाची सोय करणे व नंतर नफ्याचा विचार करणे हाच त्यांचा एकमेव मार्ग आहे. या परिस्थितीत बदल करण्यासाठी व्यापारी किंवा नगदी पिकांची लागवड वाढायला हवी. त्या माध्यमातून जे उत्पन्न वाढेल त्यामुळे शेतकऱ्याची परिस्थिती बदलू शकते. अर्थात त्यासाठी छोट्या व मोठ्या सिंचन-योजनांद्वारे शेतीला पाणीपुरवठ्याची कायम सोय होणे आवश्यक आहे. सिंचनामुळे नगदी पिकांचे प्रमाण वाढून सामान्य शेतकऱ्याची स्थिती सुधारू शकते.

अशा रीतीने, सिंचनाचे महत्त्व वादातीत आहे. अनेक अभ्यासकांनी ते साधार स्पष्ट केले आहे. डॉ. गाडगीळ यांच्या अभ्यासात असे दिसून आले की सिंचनामुळे कास्तकारांना पशुपालन, अवजारे यामध्ये अधिक गुंतवणुक करणे शक्य होते. अनेक प्रगत देशांच्या शेतीची उत्पादकता हेच दर्शविते की, सिंचनाच्या सोयी हे शेतीचे वरदान आहे.

## १३.३ सिंचनाची साधने

शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी भारतात विविध साधनांचा उपयोग केला जातो. शेतीला कृत्रिमरीतीने पाणीपुरवठा करण्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा वापर केला जातो. त्यांचा उल्लेख सिंचनाचे स्त्रोत असा केला जातो. यामध्ये विहीर, कूपनलिका, तलाव आणि कालवे यांचा समावेश होतो. भारतात आर्थिक नियोजनाच्या सुरूवातीला या स्त्रोतांमध्ये कालवे हे सर्वाधिक महत्त्वाचे होते. कारण सिंचनाखालील एकूण क्षेत्रांपैकी ४० प्रतिशत क्षेत्र कालव्यांवरच अवलंबून होते. त्यावेळी विहिरी आणि कूपनलिकांचा हिस्सा २९तर तलावांचा हिस्सा १७ प्रतिशत होता. पुढील काळात मात्र विहिरीचे सिंचनामधील महत्त्व वाढले त्यावेळी सिंचन केलेल्या क्षेत्राचे प्रमाण ३५ प्रतिशत होते. यावरून भारतीय शेतीमधील विहिरींचे वाढते महत्त्व दिसून येते.

सिंचनाच्या योजनांचे वर्गीकरण सामान्यतः मोठ्या, मध्यम आणि छोट्या योजना असे करण्यात येते. हे विभाजन करताना सुरूवातीला भांडवलाचा आधार घेतलेला होता. त्यानुसार ५ कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्च लागणारे मोठे प्रकल्प, २५ लाख रूपयांपेक्षा जास्त परंतु ५ कोटी रूपयांपेक्षा कमी खर्च लागणारे मध्यम प्रकल्प आणि २५ लाख रूपयांपेक्षा कमी खर्च लागणारे छोटे प्रकल्प असे विभाजन केले जात असे. १९७८-७९पासून मात्र नियोजन मंडळाने यात बदल केला. ज्या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र १०,००० हेक्टर्सपेक्षा जास्त आहे त्यांना मोठे प्रकल्प म्हणातात व २००० ते १०,००० हेक्टरदरम्यान सिंचनक्षेत्र असणारे मध्यम प्रकल्प आहेत. तर २००० हेक्टर्सपेक्षा कमी सिंचन क्षेत्र असणाऱ्या प्रकल्पांना छोटे किंवा लघुप्रकल्प म्हणतात.

### विहिरी (Wells):

पाणीपुरवठ्याचे सर्वात प्राचीन लहान शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त व अजूनही लोकप्रिय असलेले साधन म्हणजे विहीर हे होय. जेथे जमीन भुसभुशीत असते व पाण्याची पातळी फारशी खोल नसते. तेथे शेतीला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहीर खणणे सोयीचे असते. विहीर खणण्याकरिता फार जास्त भांडवली खर्च करावा लागत नाही. त्यामुळे अल्पभूधारक व लहान शेतकरीसुद्धा स्वतःच्या बळावर किंवा थोडेसे कर्ज घेऊन आपल्या शेतात विहीर खणून पाणीपुरवठ्याची नियमित सोय निर्माण करून घेऊ शकतो. विहीर ही शेतकऱ्याच्याच मालकीची असल्यामुळे विहिरी मधील पाण्याचा उपयोग केव्हा करावयाचा, कसा करावयाचा हे ठरविण्याच्या बाबतीत शेतकरी संपूर्णपणे स्वतंत्र असतो. विहिरीमध्ये असलेल्या पाण्यात सोडियम क्लोराईड व नायट्रेटसारखे पदार्थ मिसळलेले असतात, असे पाणी शेतीला मिळाल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते.

### ट्यूब विहिरी (Tube Wells) :

साध्या विहिरींपेक्षा अधिक खोलवरचे पाणी वापरायचे असेल व विस्तृत क्षेत्रांत पाणीपुरवठा करावयाचा असेल तर ट्यूब विहिरीचा उपयोग फार फायदेशीर असतो. ट्यूब विहिरीची खोली ६०ते ७० फुटांपासून ते ५००फुटांपर्यंत असू शकते. एका तासात ट्यूब विहिरीतून ३०-३२०००गॅलन पाणी प्राप्त होऊ शकते व त्यापासून १०० ते ४००एकर शेतजमिनीला पाण्याचा पुरवठा केला जाऊ शकतो. पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार ह्या प्रांतामध्ये ट्यूब विहिरींची संख्या जास्त आहे. ट्यूब विहिरींच्या साहाय्याने सर्व ऋतूंमध्ये शेतीला भरपूर पाणीपुरवठा करता येतो. ज्या विभागात पाण्याची पातळी खोल असते अशा भागात विहिरी खणणे शक्य नसते तेथे ट्यूब विहिरी

फार उपयुक्त ठरतात. ट्यूब विहिरी खणण्याकरिता १ते १.५० लाख रूपये खर्च येतो. सर्वसामान्य शेतकऱ्याला एवढा खर्च परवडत नाही तसेच पहाडी व डोंगराळ प्रदेशात पाण्याची पातळी फार खोल असते, अशा प्रदेशात ट्यूब विहिरींचा फारसा उपयोग होऊ शकत नाही.

**तलाव (Tanks):**

तलावाच्या साहाय्याने शेतीला पाण्याचा पुरवठा करण्याची पद्धतीसुद्धा भारतात बरीच प्राचीन आहे. आंध्र, तामिळनाडू, ओरिसा, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र व मध्य प्रदेश ह्या राज्यांमध्ये शेतीला पाण्याचा पुरवठा करण्याकरिता तलावांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो. १९६८-१९६९ पर्यंत तलावांच्या साहाय्याने शेतीला पाण्याचा पुरवठा करण्यात येणाऱ्या जमिनीचे क्षेत्र ३९कोटी हेक्टर्स होते. परंतु नियोजन काळात नवीन तलाव खोदण्याच्या दृष्टीने फारशी प्रगती न झाल्यामुळे तलावाच्या साहाय्याने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या शेतजमिनीच्या क्षेत्रफळात फारशी वाढ झाली नाही. तलावाच्या साहाय्याने शेतीला पाण्याचा पुरवठा करण्याची ही पद्धत इतर पद्धतीच्या तुलनेत बरीच स्वस्त मानली जाते. बहुसंख्य तलाव हे नैसर्गिक असल्यामुळे तलाव खणण्याकरिता खर्च करावा लागत नाही. बहुसंख्य तलावांवर कोणत्याही शेतकऱ्याची व्यक्तिगत मालकी नसते. गावच्या लोकांना एकत्र येऊन संयुक्तपणे तलावांचा उपयोग करावा लागत असल्यामुळे त्या गावात सहकारी प्रवृत्तीची वाढ होते.

**कालवे (Canals):**

आधुनिक काळात कालवे हे शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या साधनांपैकी महत्त्वाचे साधन आहेत. कालव्यांचे अनेक प्रकार आहेत. उदा. बारमाही, पुराच्या पाण्याचे कालवे, नदीला धरण बांधून तेथे साठविलेले पाणी, शेतीला पुरविण्यासाठी तयार केलेले कालवे बारमाही हे नदीमधूनच काढलेले असतात. नदीला वर्षभर पुरेसे पाणी राहत असल्यास या कालव्यांच्या साहाय्याने पिकांना वर्षभर पाणी पुरविता येते. पुराच्या पाण्याचे कालवे हेसुद्धा नदीमधूनच काढलेले असतात. पावसाळ्यात नदीला पूर आला म्हणजेच पाण्याच्या नेहमीच्या सपाटीपेक्षा किंचित उंचीवर असलेल्या ह्या कालव्यात पाणी शिरते व नंतर ते शेतीला हवे तेथे नेऊन पुरविता येते. ह्या कालव्यांमुळे पूर नियंत्रणाचे कार्य होते व त्याशिवाय विशिष्ट मोसमात शेतीला पाण्याचा पुरवठा करता येतो. तिसऱ्या प्रकारचे कालवे हे विशेष महत्त्वाचे आहेत. नदीला धरण बांधून तिचा प्रवाह अडविण्यात आल्यास तेथे जलाशय निर्माण होते. ह्या जलाशयात साठलेले पाणी कालव्याचे साहाय्याने शेतीला पुरविले जाऊ शकते. ज्या शेतजमिनीला कालव्यांचे साहाय्याने पाण्याचा पुरवठा केला जातो. अशा शेतजमिनीतून वर्षाला दोन ते तीन पिके घेता येतात. बारमाही बागायत शक्य होते. शेतीला पाणीपुरवठा करण्याचे हे विश्वसनीय व स्वस्त साधन आहे. पावसाच्या अनियमितपणावर यामुळे मात करता येते. कालव्यांच्या साहाय्याने शेतीला हवा त्या प्रमाणात पुरवठा करता येतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पादन देणाऱ्या बी-बियाण्यांचा व रासायनिक खतांचा वापर करता येतो. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात भरपूर वाढ होते. कालव्यांचा उपयोग अंतर्गत वाहतुकीसाठी सुद्धा केला जाऊ शकतो. कालवे हे वाहतुकीचे स्वस्त साधने आहे. कालव्यांच्या साहाय्याने शेतीला नियमितपणे पाणीपुरवठा केल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडते व शेतकऱ्यांवर कर लावून (कालव्याचे पाणी उपयोगात आणल्याबद्दल) सरकारलाही आपल्या उत्पन्नात भर टाकता येते. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी कालवे तयार केल्यामुळे अनेक फायदे प्राप्त होतात. कालव्यामुळे विशिष्ट प्रदेशांतील संपूर्ण जनतेचेच जीवन सुरक्षित व संपन्न होते. ह्या प्रदेशातील संपूर्ण जनतेच्या जीवनात आमूलाग्र व सर्वांगीण सुधारणा

घडवून आणण्याकरिता कालव्याचे साहाय्याने होते. आपल्या देशात ज्या ज्या प्रदेशात कालव्यांचे जाळे विणण्यात आले आहे. त्या त्या प्रदेशातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आढळते व त्या प्रदेशाचा विकास झपाट्याने झालेला दिसून येतो. परंतु कालव्याच्या साहाय्याने शेतीला पाणीपुरवठा करण्याकरिता सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. धरणे बांधण्यासाठी व कालवे तयार करण्यासाठी शासनाला बराच खर्च करावा लागतो.

**नदी/ओढे/नाले:**

शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी नदी, ओढे, नाले यांचाही वापर केला जातो. ज्या भागात बारमाही नदी वाहते तेथे नदीच्या काठावर विहीर खोदून नदी पात्रातील पाणी विहिरीत घेतले जाते व या विहिरीतून उपसा जलसिंचन योजनेद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला जातो. नदीपात्रात देखील विद्युतपंप बसवून पाणी उचलले जाते. काही ठिकाणी नदीपात्र कोल्हापूर पद्धतीने बंधारे बांधून नदीपात्राचे पाणी अडविले जाते व साठीव पाणी विद्युतपंपाने उचलून शेतीला पुरविले जाते. तसेच काही विभागात ओढे व नाले यांच्यातील पाणी कावडीने शेतीला दिले जाते. उत्तर भारतात व पश्चिम महाराष्ट्रात नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात बागायती शेती केली जाते.

याप्रमाणे शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विविध साधनांचा वापर केला जातो.

## १३.४ जलसिंचनाच्या पद्धती /पिकांना पाणी देण्याच्या पद्धती

**प्रस्तावना :**

आपणाकडे पाणी किती उपलब्ध आहे हे बघून कोणते पीक घ्यावयाचे ते ठरविणे महत्त्वाचे असते. कारण पिकांच्या ठराविक अवस्थेत त्यांना पाणी मिळाले नाही तर पिकांचे फार मोठे नुकसान होते. म्हणूनच पाण्याचा वापर कसा आणि केव्हा व किती करावयाचा हे ठरविणे फार महत्त्वाचे आहे. धरणाखालील कालव्यांनी पाणी मिळणारे शेतकरी पाणी वापराकडे फारसे लक्ष देत नाहीत. अनेकदा रात्रीच्या वेळी हे पाणी येते त्यामुळे पाणी पिकांना व्यवस्थित देता येत नाही. पाण्याचा अपव्यय फार मोठ्या प्रमाणात होतो. त्यातून पिकांचे उत्पादन वाढण्याऐवजी कमी होते. जमिनीचेही नुकसान होते. सर्वात मोठा तोटा म्हणजे अगोदरच कमतरता असलेले पाणी वाया जाते. त्यामुळे पाण्याखालील क्षेत्र मर्यादित होते. इतर राज्यांच्या मानाने आपल्या राज्यातील बागायती क्षेत्र वाढविण्यास फार मर्यादा आहेत. म्हणूनच जे पाणी मिळते ते काळजीपूर्वक वापरले पाहिजे. उपलब्ध पाणी जास्तीत जास्त शेतकरी कुटुंबांना मिळाले पाहिजे. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. धरणाखालील लाभक्षेत्रात जास्त पाण्याच्या वापरामुळे चांगली जमीन पाणथळ होते. या सर्व गोष्टींचा विचार केला असता पाण्याचा प्रत्येक थेंब काळजीपूर्वक वापरला पाहिजे. तो कोठे, केव्हा, कसा वापरायचा हे ठरविले पाहिजे. म्हणजेच त्यातूनच पिकांचे उत्पादन वाढेल. थोड्या पाण्यात अधिक शेती करता येऊ शकेल.

महाराष्ट्रात आणि भारतातही पाऊस वेळेवर क्वचित पडतो. काही वेळा भरपूर पाऊस होतो तर काही वेळा फार कमी पाऊस पडतो. त्यामुळे केवळ पावसाच्या पाण्यावर असलेली पिके चांगली येऊ शकत नाहीत म्हणूनच पिकांना आपण पाणी देतो. पावसाचे पाणी पिकांना देण्याचे आपल्या हातात नाही. परंतु इतर मार्गांनी पाणी देणे आपल्या हातात आहे. पाहिजे तेव्हा आणि पाहिजे त्या प्रमाणात पाणी देणे आपणास शक्य असते. परंतु हा पाणीपुरवठा जर अयोग्य पद्धतीने केला तर

अवेळी पडणाऱ्या पावसाप्रमाणेच तो वाया जातो. काही शेतकऱ्यांना वाटते की, पिकांना भरपूर पाणी द्यावे. त्यामुळे जमिनीत ओलावा निर्माण होईल, मग पिके चांगली येतील, परंतु त्यांची ही विचारसरणी बरोबर नाही. कारण जमिनीत आवश्यकतेपेक्षा जास्त ओलावा असेल, तर पिकांची वाढ चांगली होत नाही उलट ती कमी होते. पीक वाढीला अधिक ओलाव्यामुळे अडचण निर्माण होते म्हणून पाणीपुरवठा योग्य प्रकाराने करणे फार महत्त्वाचे आहे. परंतु पिकांना पाणीपुरवठा कसा करावयाचा, किती करावयाचा हे समजण्यासाठी पाणी, माती, पिके आणि जमिनीचा चढ-उतार हे पाहूनच पिकांना पाणी दिले पाहिजे. भारतात पिकांना पाणी देण्याच्या विविध पद्धती आढळून येतात त्याची माहिती खालीलप्रमाणे.

**पिकांना पाणी देण्याच्या विविध पद्धती :**

एखाद्या भागात पाणी देण्याची ठराविक पद्धती प्रचलित आहे. म्हणून तीच वापरावी असे न करता ज्या पिकांना व जमिनीला पाणी द्यावयाचे असेल त्यांना ती योग्य आहे किंवा नाही हे पाहून ती पद्धत उपयोगात आणली पाहिजे. पाणी देण्याच्या पद्धतीमुळे जमिनीचे संरक्षण होऊन पाणी वाया न जाता, पाण्याचे व पिकांचे नुकसान न करता, पिकांची गरज पुरवली जाईल हे पाहिले पाहिजे यासाठी पाणी पाण्याचे व पिकांचे नुकसान न करता, पिकांची गरज पुरवली जाईल हे पाहिले पाहिजे यासाठी पाणी देण्याची योग्य पद्धत निवडली पाहिजे की ज्यामुळे कमीत कमी पाण्यात अधिक क्षेत्र पाण्याखाली येईल तसेच जमिनीचा सुपीक थरही वाहून जाणार नाही यावरून पिकांना पाणी देण्याच्या काही महत्त्वाच्या पद्धती खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) मोकाट पद्धती.

२) सारे पद्धती.

३) वाफा पद्धती.

४) सरी, वरंबा पद्धत.

५) समपातळीतून सरीतून पाणी देण्याची पद्धत.

६) आळे पद्धत व बांगडी पद्धत.

७) फवारा किंवा तुषार जलसिंचन पद्धत.

८) ठिबक जलसिंचन पद्धत.

**मोकाट पद्धती:**

पाणी देण्याची ही सर्वात जुनी पद्धत आहे. या पद्धतीत कालव्याचे किंवा विहिरीचे पाणी शेतात मोकाट सोडतात. त्यामुळे पाणी जमिनीच्या उताराप्रमाणे कोणत्याही दिशेला वाहते. या पद्धतीत जमिनीच्या उतारानुसार पाणी वाहत असल्यामुळे जेथे जास्त उतार आहे. तेथे पाणी साठून राहते व जिथे जमिनीचा उंचवटा असतो तेथे पाणी पोहोचत नाही. शेतात मोकाट पाणी सोडले जात असल्यामुळे वरंबे, बांधबंदिस्त या साठी खर्च केला जात नाही, कोणतीही मेहनत घेतली जात नाही. पाणी मोकाट धावतच शेतात घुसल्यामुळे या पद्धतीचे अनेक तोटे दिसून येतात. या पद्धतीत दिलेल्या एकूण पाण्यापैकी फक्त२०% पाणी उपयोगात येते. जमीन उंच-सखल असेल तर सखोल भागात पाणी साचते; जास्त पाणी झाल्यास तेथे वरंबे फोडून पाणी वाहून जाते. त्यामुळे वाहत्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर

शेतीतील वरची सुपीक माती व खते वाहून जातात. जमिनीची धूप होते. याउलट उंचावरील जागी पाणी पोहोचत नसल्यामुळे तेथील पिके पाण्याअभावी वाळून किंवा जळून जातात. त्यामुळे जमिनीच्या सर्व भागात पिके एकसारखी वाढत नाहीत. पाण्याचा अपव्यय व पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे पिकांना पाणी देण्याची ही पद्धत अशास्त्रीय मानली जाते. ज्या शेतकऱ्यांजवळ भरपूर पाणी आहे किंवा नदी, कालवे यांचे मुबलक पाणी शेतकऱ्यांना मिळत असेल तर असे शेतकरी मोकाट पाणी देण्याची पद्धत वापरतात. शेतात पाणी सोडून दिले की तेथे उभे राहून पाणी भरण्याची त्यांना गरज वाटत नाही. उसाच्या शेतीत सदर पद्धत मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. कोकणात भात शेतीतसुद्धा ही पद्धत वापरली जाते.

**सारे पद्धत :**

मोकाट पद्धतीपेक्षा ही पद्धत थोडी सुधारलेली आहे. त्यासाठी पेरणी झाल्यानंतर लगेच कुळवाच्या साहाय्याने सारे पाडले जातात. सारे पाडताना कुळवाच्या एका बाजूला उभे राहिल्यानंतर कुळवाच्या उलट्या बाजूने माती उंचवट्याप्रमाणे बांध तयार होतो. ज्या बाजूने उभे राहिल्यानंतर त्याच्या बाजूला १०ते१५ सें.मी. उंचीचा लहानसा मातीचा बांध तयार होतो. काही शेतकरी फळीच्या आधारे देखील सारे पाडतात तर काही शेतकरी फावडीच्या साहाय्याने सारे पाडतात. शेतातील माती एकसारखी करून सारे समपातळीत रेषेच्या साहाय्याने पाडले जातात. सारे पद्धतीत पिकाला एकसारखे पाणी मिळते. साऱ्यांची रूंदी कमी ठेवली जाते. जमिनीला कमी उतार असेल तर या साऱ्यांची लांबी व रूंदी जास्त ठेवली जाते. या पद्धतीत जमीन बांधणीचा खर्च जास्त येत नाही. जमीन लवकर तयार करता येते व पिकांना पाणीही व्यवस्थित बसते. गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा, उन्हाळी भुईमूग इत्यादी पिकांसाठी ही पद्धत वापरली जाते.

**वाफा पद्धत (साधा वाफा व गादी वाफा) :**

वाफा पद्धत ही सारा पद्धतीची सुधारित पद्धत आहे. या पद्धतीने पाणी देण्यासाठी प्रथम जमीन समपातळीत आणतात. नंतर कुळव्याच्या साहाय्याने दोन /तीन मीटर रूंदीच्या पट्ट्या तयार करतात. त्यानंतर फावड्याचे साहाय्याने ६मीटर लांबीचे वाफे तयार करतात. अनेक वेळा पिकांची रोपे तयार करावी लागतात. त्यासाठी वाफ्याची रूंदी १.५ मीटर व उंची २० ते २२ से.मी. ठेवली जाते. साधे वाफे किंवा गादी वाफे दोन्ही पाणी देण्याच्या दृष्टीने चांगले आहेत. गादी वाफ्यात प्रत्यक्ष वाफ्याच्या पृष्ठभागावर पाणी साठत नाही त्यामुळे लहान रोपांची वाढ फार चांगली होते; भोवतालच्या खोलगट भागातून पाणी झिरपून पिकांच्या रोपांना मिळते. हवा खेळती राहते. गादीप्रमाणे वाफ्याची रचना असते. भुसभुशीत पृष्ठभागावर रोपे वाढत असल्याने रोपे उपटताना रोपांना व त्यांच्या मुळांना इजा होत नाही. गादी वाफ्यावर कांदा, टोमॅटो, फ्लॉवर, मिरची, वांगी इ. पिकांची रोपे चांगली तयार होतात. साधा वाफा पद्धतीत सर्व पिकांना चांगले पाणी मिळते. गादी वाफ्यातून रोपे उपटून ती साधा वाफा पद्धतीत लावली जातात. साधा वाफा पद्धतीत कांदा, कोबी, टोमॅटो, फ्लॉवर, मिरची यांची लागवड केली जाते.

**सरी पद्धत :**

सरी पद्धतीत नांगराने किंवा रोजरने पिकांच्या गरजेनुसार व जमिनीच्या चढ-उतारानुसार सऱ्या पाडल्या जातात. पिकांना दोन ओळीतील अंतराप्रमाणे सरी, वरंबा काढतात. सरीच्या पोटाला

किंवा सरीत पिकांची लागवड केली जाते. सरासरीतून पाणी दिले जाते. या पद्धतीत उसाला सुमारे १ मीटर रूंदीच्या सरीची आवश्यकता असते. तर कांदा, बटाटा, वांगी, मिरची, टोमॅटो यासारख्या पिकांना कमी रूंदी सऱ्या पाडतात. या पद्धतीत पिकांना सरीतून पाणी सोडले जाते. त्यामुळे या पद्धतीत संपूर्ण क्षेत्र न भिजता फक्त १ / २ क्षेत्र भिजते त्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. वाफे पद्धतीपेक्षा या पद्धतीस जमीनबांधणीचा खर्च खूपच कमी येतो. नांगराच्या साहाय्याने खोलगट भागात आपोआप सरी तयार होते व फळाच्या बाजूने मातीचा बांध तयार होतो. सरी पद्धतीने ऊस, कापूस, मिरची, वांगी, टोमॅटो, मका, बटाटा, रताळी, मुळा इ. पालेभाज्यांची लागवड करून त्यांना पाणी देता येते. सरीतून पाटातील पाणी सोडले जाते.

**ग्रेडेड फेरो पद्धत / सारे पद्धतीत आडवे मातीचे दांडके टाकून पाणी देण्याची पद्धत :**

ज्या जमिनीत ०.३ टक्क्यापेक्षा कमी उतार आहे, तेथे ही पद्धत फायद्याची ठरते. या पद्धतीत पाण्याच्या प्रवाहाची दिशा, त्याचा वेग कमी करण्यासाठी साऱ्यांमध्ये जेथे पाणी जोरात उताराच्या दिशेने वाहू लागते तेथे आडवे मातीचे दांडके / बांध टाकून पाण्याचा प्रवाह कमी केला जातो व या आडव्या मातीच्या बांधाला पाणी अडून परत मागे जेथे उंचवटा आहे तेथे पाणी पोहोचविले जाते. जो पर्यंत उंचवट्याच्या पिकांना पाणी मिळत नाही तोपर्यंत आडवे मातीचे बांध वाढविले जातात. पाणी साऱ्यातील सर्व भागाला पाणी मिळेल अशा रीतीने आडवे दांडके जातात.

जमिनीच्या उताराच्या दिशेने पाणी वाहून जात असेल व उंचवट्याच्या भागावर पाणी वाहून जाण्याच्या प्रवाहाला मातीचे आडवे बांध टाकून पाणी वाहून जाण्यास प्रतिबंध होतो व पाणी उंचवट्याच्या भागापर्यंत पोहोचविले जाते. त्यामुळे साऱ्यातील सर्व पिकांना समप्रमाणात पाणी मिळू शकते व साऱ्यातील सर्व पिके समप्रमाणात चांगले वाढण्यास मदत मिळते. या पद्धतीत पाण्याची प्रवाहाची दिशा, त्याचा वेग कमी करण्यासाठी आडवे मातीचे बांध आडवे छेद करतील अशा प्रकारे साऱ्यातून काढतात. पाणी सर्व भागांत पोहोचण्यासाठी ग्रेडेड फेरो पद्धतीचा वापर करतात. या पद्धतीत पाणी सर्व पिकांना सारख्या प्रमाणात मिळते. त्यामुळे पिकांचे उत्पादन वाढते. तेथे जमिनीची धूप होत नाही व पाणीही वाया जात नाही या पद्धतीने पाणी देण्यासाठी जास्त श्रम व खर्च येत नाही. ही पद्धत साऱ्यांमध्ये लावलेल्या कोणत्याही पिकांसाठी वापरली जाते.

**आळे पद्धत / बांगडी पद्धत:**

ज्या भागात पाणी मर्यादित असते अशा भागात व जेथे नवीनच फळझाडांची लागवड केलेली असते तेथे आळे पद्धतीने पाणी दिले जाते, झाडाचे खोडाजवळ खड्डा खोदून पाणी साचेल या उद्देशाने आळे तयार केले जाते. या खोलगट भागात / आळ्यात कावडीने, बादलीने पाणी ओतले जाते. झाडांच्या मुळांना /खोडांना पाणी मिळावं म्हणून झाडांच्या खोडाजवळ आळे /खड्डे करून त्यात पाणी ओतले जाते. परंतु सदर पद्धत अशास्त्रीय व पाण्याचा अपव्यय करणारी आहे, कारण आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी खोडाजवळ ओतले जाते. त्यामुळे खोडाजवळ खड्डा तयार होतो, खोडाजवळील झाडांची मुळे पाणी सतत ओतल्यामुळे उघडी पडतात. मुळे उघडी पडल्यामुळे झाड वाऱ्याने उन्मळून पडण्याची भीती असते. पाणी वरचेवर मिळत असल्याने झाडाची मुळे वरच्या वर राहतात. खाली मातीत खोलवर मुळे जात नाहीत. त्यामुळे अशी झाडे वाऱ्याने पडून जाण्याची जास्त भीती असते. याशिवाय झाडाच्या खोडावरच / मुळांवरच पाणी ओतले जात असल्यामुळे डिंक्या नावाचा रोग होण्याची शक्यता अधिक असते.

आळे पद्धती ही प्रामुख्याने नवीन फळझाडांच्या वृक्षारोपणाच्या वेळी वापरली जाते. आळे पद्धतीतील दोष दूर करण्यासाठी बांगडी पद्धतीचा वापर केला जातो. बांगडी पद्धतीत खोडाजवळील माती न काढता खोडापासून १ ते १।। मीटर अंतरावर बांगडीच्या आकाराचे गोलाकार वर्तुळ तयार करून खोलगट चर तयार केला जातो. या चरात पाणी ओतले जाते. प्रत्येक खोडावर किंवा मुळावर पाणी ओतले जात नाही याशिवाय खोडाजवळची माती न काढता झाडाची सावली ज्या भागापर्यंत पडते त्या भागांवर गोल बांगडीचा खड्डा तयार करून त्या चरात पाणी ओतले जाते. चरातील पाणी झिरपून झाडाच्या मुळांना मिळते त्यामुळे झाडांची मुळे सैल होत नाहीत. याशिवाय पाणी मिळण्यासाठी झाडांची मुळे आजूबाजूला फैलावतात त्यामुळे वाऱ्याने झाडे कोसळून पडण्याची भीती राहत नाही. या चरामध्येच पाण्याबरोबर खतेही दिली जातात, पाण्याबरोबर खतेही मुळांना अप्रत्यक्ष मिळत असल्याने झाडे जोमाने चांगली वाढतात. डिंक्या नावाचा रोग होऊ शकत नाही. झाडाच्या खोडाभोवतालची माती न काढल्यामुळे झाडे उन्मळून पडण्याची शक्यता नसते. चरात पाणी, खते व औषधे टाकल्यामुळे झिरपण्याच्या केशाकर्षण पद्धतीने पिकांना पाणी, खते व औषधे मिळतात. त्यामुळे प्रत्यक्ष खोडांवर व झाडांच्या पानांवर पाणी, खते व औषधांचा परिणाम होत नाही. कोकणात हापूस, पायरी या आंब्याच्या लहान-मोठ्या झाडांसाठी ही पद्धत वापरली जाते.

**फवारा किंवा तुषार जलसिंचन पद्धत :**

पाण्याच्या दाबाच्या साहाय्याने जमिनीच्या सर्व भागावर पावसासारखे पाणी फवारणे किंवा उडविणे यांस फवारा किंवा तुषार जलसिंचन पद्धती म्हणतात. पाणी ॲल्युमिनियम किंवा पी.व्ही.सी. पाईपमधून नेतात. त्या पाईपवर बसविलेल्या फवाऱ्याच्या साहाय्याने पाण्यावरील दाबामुळे शेतात पाणी सारख्या प्रमाणात फवारले जाते.

महाराष्ट्रात फक्त १२.५ टक्के जमिनीस पाणीपुरवठा होतो. त्यापैकी निम्मे क्षेत्र विहीर बागायतीचे आहे. या विहिरींपैकी सुमारे साडेआठ लाख विहिरींचे पाणी फेब्रुवारी ते जून महिन्यात फार कमी होते. अशा कमी पाण्यात जास्तीत जास्त फायदा करून घेण्यासाठी तुषार जलसिंचन ही एक पाणी देण्याची चांगली पद्धत आहे. तुषार जलसिंचन पद्धतीमुळे पाणी दिल्यास अनेक फायदे होतात. त्यापैकी काही फायदे खालीलप्रमाणे आहेत.

१) सध्याच्या पाट पद्धतीने पाणी देण्यासाठी जमीन समपातळीत आणावी लागते. जमिनीस एक टक्क्यापेक्षा अधिक उतार असेल तर समपातळीत फार खर्च करावा लागतो. याशिवाय हलक्या जमिनी समपातळीत आणल्यामुळे त्यांचा पोत बिघडतो. अशा वेळी तुषार जलसिंचन पद्धत वापरात येते. त्यामुळे जमीन समपातळीत आणण्याचा खर्च वाचतो.

२) पाटातून पाणी देताना ते पाणी पाटातून उघडेच वाहते. त्यामुळे बाष्पीभवनाने त्यातील बरेच पाणी वाया जाते किंवा अनेकदा ते पाणी इकडे-तिकडे पसरते, वाहून जाते. त्यामुळे पाण्याचे नुकसान होते. परंतु तुषार जलसिंचन पद्धतीतून हे वाया जाणारे पाणी वाचविता येते. इतर पद्धतीपेक्षा तुषार पद्धतीने ३० ते ३५ टक्के पाणी सहज वाचविता येते. त्यामुळे तेवढ्या पाण्यावर सव्वा ते दीडपट क्षेत्र पाण्याखाली आणता येते. सध्या पैसे देऊनही पाणी विकत मिळत नाही. अशा परिस्थितीत या पद्धतीने कमी पाण्यात अधिक क्षेत्र भिजवणे शक्य होते.

३) या पद्धतीत आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे हव्या त्या प्रमाणात पाणी देता येते. आपणास कमी किंवा अधिक पाणी पाहिजे असेल त्या प्रमाणात जमिनीत सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात पाणी देता येणे शक्य होते. त्यामुळे जमिनीवर पाणी, हवा, अन्न इत्यादींचा योग्य मेळ साधून

उत्पादन वाढते. असा मेळ साधल्यामुळे पिकांचे उत्पादन २० ते२५ टक्के वाढते असा अनुभव आहे.

४) तुषार जलसिंचन पद्धतीत शेतीची बांधणी करावी लागत नाही. त्यामुळे शेत बांधणीसाठी होणारा खर्च वाचतो.

५) पाण्याचा पाट- वरंबा काढण्यासाठी जमिनीतील सुमारे १० ते १२ टक्के क्षेत्र वाया जाते. परंतु तुषार पद्धतीत असे पाट वरंबा काढावे लागत नाहीत. म्हणून या पाणी देण्याच्या पद्धतीमुळे सुमारे १० ते १२टक्के क्षेत्र अधिक लागवडीखाली आणता येते.

६) सध्या आपण प्रामुख्याने पाट पद्धतीने पाणी देतो त्यामुळे जमिनीच्या पृष्ठभागाची धूप होते. तसेच पिकाला दिलेली खते खोलगट भागात पाण्याबरोबर वाहून जाऊन साठतात, परंतु तुषार पद्धतीने दिलेले पाणी हे जमिनीत पाणी मुरण्याच्या वेगापेक्षा थोड्याशा कमी वेगाने दिले जाते. त्यामुळे या पद्धतीत जमिनीची धूप होत नाही. हा एक फार मोठा फायदा होतो. त्यामुळे ही पद्धत काळ्या, भारी तसेच हलक्या, रेताड जमिनीसही उपयुक्त ठरते.

७) तुषार पद्धतीने पाणी देत असताना या पाण्यातून विरघळणारी खते, कीटकनाशके यांची पाण्याबरोबर फवारणी करणे शक्य असते.

८) मचूळ किंवा खारट असलेले पाणी फार थोड्या प्रमाणात शेतीला द्यावे लागते. परंतु नेहमीच्या पद्धतीने ते शक्य नसते. त्याऐवजी तुषार पद्धतीने अशा प्रकारचे पाणी हव्या त्या प्रमाणात देता येणे शक्य होते. त्यामुळे जमिनीतील क्षाराच्या प्रमाणात समतोल राखणे शक्य होते.

९) पाणी देण्याच्या इतर पद्धतींशी तुलना केली असता या पद्धतीने पाणी देण्याचा मजुरीचा खर्चही कमी येतो.

१०) या पद्धतीने पावसासारखे पाणी पिकांच्या पानावर पडते त्यामुळे जमीन भुसभुशीत राहते. पिकांचे तापमान नियंत्रित राहून पिकावरील रोग, किडी पाण्याबरोबर वाहून जातात. त्यामुळे उत्पन्न वाढते. कीटकनाशके व खते देण्याचा खर्चही कमी येतो.

**तुषार:**

जलसिंचन पद्धती इतर पद्धतीपेक्षा महागडी आहे. या पद्धतीसाठी खर्च अधिक येतो. परंतु या पद्धतीचा खर्च एकूण भिजणाऱ्या क्षेत्रावर अवलंबून असतो. कमीतकमी ४हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणल्यास एकूण खर्च रू.२५,०००ते ३०,००० खर्च येतो. विहिरीपासून शेताचे अंतर जास्त असेल तर हा खर्च अधिक येतो. ही पद्धत चालविण्यासाठी मजुरीचा खर्च हेक्टरी फक्त १०००रूपये येतो. हा खर्च सर्वसामान्य शेतकऱ्यांना जास्त वाटतो, परंतु हा भांडवली खर्च आहे तो एकदाच करावा लागतो. प्रत्येक वर्षी असा खर्च येत नाही, मुख्य खर्च केल्यानंतर दरवर्षी अगदी जरूरी भासली, तरच दुरूस्तीचा काही खर्च येतो. म्हणूनच ही पद्धत निश्चितच फायद्याची ठरते. याशिवाय या पद्धतीत बचत होते, उत्पन्न वाढते, मजुरांच्या खर्चाची बचत होते. तसेच तुषार जलसिंचन पद्धतीचा संच इतरांना भाड्याने देता येतो. या सर्वांचा विचार केल्यास ही पद्धत निश्चितच परवडते.

**ठिबक जलसिंचन पद्धती:**

आपणाकडे पाणी पुरेसे नाही. काही झाडे तर जगवावयाची आहेत. अशा वेळी एका मडक्यात पाणी भरून ते झाडाच्या बुंध्यापाशी ठेवण्याची आपली जुनी पद्धत आहे. अर्थात त्या मडक्याच्या तळाला छोटे छिद्र पाडून त्या छिद्रात कापडाची चिंधी घालण्याची पद्धत असते. मडक्यातील भरलेले पाणी त्या चिंधीद्वारे हळूहळू झाडाला मिळते. त्यामुळे थोड्या पाण्यात झाडे जगू शकतात. मडक्यातून चिंधीद्वारे झाडाला मिळणारे पाणी ठिबकून मिळते म्हणूनच अशा पद्धतीने ज्या ठिकाणी पाणी दिले जाते त्यास ठिबक सिंचन पद्धत म्हणतात. अजूनही अनेक ठिकाणी काही शेतकरी असे मडक्यात पाणी भरून ठेवतात. आठ दिवसांतून एकदा हे मडके भरले की काम होते. पाणी देण्याच्या या पद्धतीमुळे कमी पाणी लागते. तसेच दररोज किंवा वरचेवर पाणी देण्याची जरूरीही भासत नाही. मडक्याद्वारे झाडांना या पद्धतीने पाणी देण्याची ही ठिबक जलसिंचन पद्धत जुनी आहे. जुन्या मडका पद्धतीच्या धर्तीवर आधुनिक / सुधारित साधनांचा वापर करूनही ठिबक पद्धतीने पाणी देता येते.

आधुनिक ठिबक जलसिंचन पद्धतीत पाण्याच्या साठ्यातून पंपाने पाणी खेचतात. ते पाणी विशिष्ट दाबाखाली मुख्य नळीतून उपनळीवाटे उपनळ्यापर्यंत वाहून नेले जाते. उपनळ्यांवर विशिष्ट अंतरावर बसविलेल्या तोटीद्वारे (ठिबक किंवा ड्रीपर) शून्य दाबावर थेंबाथेंबाने पिकांना पाणी दिले जाते. या पद्धतीने पाणी देण्यासाठी पंप किंवा पाण्याची टाकी, मुख्यनळी, उपमुख्यनळी, उपनळी आणि ड्रीपर या वस्तू आवश्यक असतात. तसेच गाळण्याची टाकी (फिल्टर टाकी), रासायनिक खताची टाकी, कंट्रोल व्हॉल्व, दाबमापक उपकरणे इत्यादींची आवश्यकता असते.

**ठिबक जलसिंचन पद्धतीचे फायदे :**

ठिबक जलसिंचन पद्धत जलसिंचन पद्धतीच्या इतर सर्व पद्धतीपेक्षा अधिक फायदेशीर, पाण्याचा काटेकोर वापर करणारी, कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त क्षेत्र भिजवणारी पद्धत आहे. ह्या पद्धतीचे फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) ठिबक पद्धतीने उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त वापर होतो.

२) ठिबक पद्धतीमुळे पिकांच्या उत्पन्नात भरपूर वाढ होते, तसेच त्यांचा दर्जा सुधारतो.

३) पिकांचा कालावधी कमी होऊन कमी वेळात पीक काढणीस तयार होते.

४) ही पद्धत वापरल्यामुळे जमिनीची मशागत कमी प्रमाणात करावी लागते व तणाचा प्रादुर्भाव कमी होतो.

५) पिकांना रोग व किडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

६) रासायनिक खतांचा पिकांना अधिक फायदा होतो.

७) या पद्धतीमुळे मजुरीचा खर्च कमी होतो.

८) ही पद्धत कोणत्याही उंच-सखल जमिनीत वापरता येते. जमीनबांधणी करावी लागत नाही.

९) ज्या जमिनीत पाणी शोषण करण्याची क्षमता कमी आहे. अशा जमिनीत जलशोषण वाढते. तसेच क्षारयुक्त पाण्याचादेखील वापर बागायतीसाठी करता येतो.

१०) या पद्धतीत पाणी वाया जात नाही व जमिनीची धूपही होत नाही.

११) कमीत कमी पाण्यावर जास्तीत जास्त जमिनीचे क्षेत्र भिजविता येते.

## १३.५ सिंचनाचे फायदे

पाणी हे शेतीचे जीवन आहे. त्याचा योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पुरवठा न झाल्यास शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती आणि एकूण शेतीची उत्पादकता यावर विपरीत परिणाम होतो. भारतासारख्या कृषी प्रधान देशात तर मान्सूनच्या अवकृपेमुळे शेतीवर जो परिणाम होतो त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेगच प्रतिकूलरीत्या प्रभावित होतो. अशा परिस्थितीत शेतीला कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय ही वरदान ठरते. सिंचनाच्या विविध साधनांमुळे जे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदे होतात ते पुढीलप्रमाणे आहेत –

**१) शेतीच्या उत्पादकतेत वाढ :**

निरनिराळ्या अभ्यासांमध्ये असे दिसून येते आहे की, कोरडवाहू जमिनीपेक्षा ओलिताची सोय असलेल्या जमिनीत निरनिराळ्या पिकांचे दर एकरी उत्पादन जास्त असते. इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च या संस्थेच्या मते, एकाच प्रदेशात कोरडवाहू आणि ओलीत अशा शेतीमधील उत्पादनांची तुलना केल्यास ओलिताच्या शेतीमधील उत्पादन हे ५० ते १०० टक्क्यांनी जास्त दिसून येते. चौथ्या योजनेच्या विकास पाहणीत असे म्हटले आहे की, ओलिताची सोय असल्यास कोरडवाहू शेतीच्या तुलनेत धानाचे उत्पादन ५२.५ प्रतिशत जास्त होते. इतर पिकांच्या जास्त उत्पादनाचे प्रमाण म्हणजे गहू ५१.३%, बार्ली ५७.२%, बाजरी ४८.९%, मका ५३.०%याचे कारण म्हणजे निरनिराळ्या पिकांना जितकी ओल आवश्यक असते ती टिकवून पिकांची योग्य वाढ करण्याचे काम सिंचनामुळे होते व त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढते.

**२) उत्पादनाच्या तंत्रात बदल :**

शेतीमधील तंत्रात्मक सुधारणा या शेतीचे स्वरूप पूर्णपणे बदलू शकतात. उत्पादनाचे तंत्र जर जुने असेल, तर उत्पादनात फारशी वाढ होणार नाही. उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा वापर, पीक संरक्षणासाठी फवारणी, जास्त उत्पादन देणाऱ्या बियाण्यांचा वापर यासारखे उपाय आवश्यक ठरतात. परंतु हे उपाय तेव्हाच करता येतील जेव्हा शेतीला पाणीपुरवठ्याची शाश्वती असेल. सिंचनाच्या मोठ्या, मध्यम आणि छोट्या योजनांमुळे देशाच्या निरनिराळया भागात शेतीचे उत्पादन तंत्र बदलते आहे. हरित क्रांती ही थोड्या प्रदेशांपुरती मर्यादित असली तरी तिचे मर्यादित यशसुद्धा सिंचनाशिवाय शक्य झाले नसते.

**३) लागवडीचा फायदा :**

सिंचनामुळे शेतीच्या लागवडीचे स्वरूप बरेच बदलू शकते.

**अ) विविध पिकांची गरज पूर्ण :**

निरनिराळ्या पिकांना वेगवेगळ्या वेळी कमी-जास्त पाण्याची गरज असते. मान्सूनवर अवलंबून असणाऱ्या शेतीत ही गरज योग्य प्रकारे पूर्ण होण्याची शाश्वती नसते. त्यामुळे विशिष्ट पिकेच लागवडीत

घ्यावी लागतात. सिंचनाच्या सोयीमुळे पिकांना योग्य त्यावेळी व योग्य त्या मात्रेत पाणी मिळण्याची शाश्वती असल्याने पीक प्रकारात विविधता आणता येते.

**ब) दुबार पिके :**

भारतात सिंचनाच्या सोयींचा विस्तार होत असला तरी अद्याप पावसावर अवलंबून असण्याचे प्रमाण बरेच आहे. लागवडीखालील निव्वळ क्षेत्राच्या फक्त ३३%क्षेत्रात सिंचनाचा वापर होतो. बाकी लागवड कोरडवाहू होती. या शेतीचा पाण्याचा आधार म्हणजे मान्सून. पण तो सर्वत्र सारखा नसतो, तसेच सामान्यतः जून ते सप्टेंबर या काळातच तो केंद्रित असल्याने नंतर दुसरे पीक घेणे कठीण असते. अशा परिस्थितीत सिंचनामुळे दुसरे पीक घेणे आणि काही प्रदेशात तीन पिके घेणे सुद्धा शक्य होते.

**४) शेतीचे व्यापारीकरण :**

उदरनिर्वाहपर शेती हे अर्थव्यवस्थेच्या मागासलेपणाचे लक्षण आहे. इतर व्यवसायांप्रमाणेच शेती हीसुद्धा व्यापारी तत्त्वांनुसार करायला हवी. अर्थात त्यासाठी शेतीच्या उत्पादनाच्या तंत्रात सुधारणा झाल्याशिवाय ही गोष्ट शक्य होणार नाही. सिंचनाच्या सोयींमुळे शेतीचे उत्पादनतंत्र बदलते. ज्याला आपण नगदी पिके किंवा रोख पिके म्हणतो त्यांची लागवड सिंचनामुळे करता येते. ऊस, कापूस, तंबाखू, तेलबिया यांचे उत्पादन वाढल्यास त्याचा फायदा केवळ शेतीलाच नव्हे तर उद्योगांनासुद्धा होऊन देशाचा विकास वेगाने होऊ शकतो.

**५) रोजगार निर्मिती :**

सिंचनामुळे शेतीच्या उत्पादनात जो बदल घडून येतो त्यामुळे अधिक लोकांना काम मिळण्याची शक्यता असते. भारतामध्ये शेतीवर लोकसंख्येचे अवलंबित्व जास्त आहे. शेतीमध्ये सुप्त बेकारी दिसून येते. जर शेतीच्या तंत्रात लक्षणीय बदल झाला तर सुप्त बेकारीच्या रूपाने वाया जाणाऱ्या श्रमशक्तीची बचत होऊ शकते. दुसऱ्या बाजूने, सिंचनाच्या विविध योजना कार्यान्वित केल्यामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध होतो. धरणांचे बांधकाम, कालवे तयार करणे, विहिरी खोदणे यासारख्या कामात अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होऊन बेकारीची तीव्रता कमी होऊ शकते.

**६) पूरनियंत्रण :**

सिंचनाच्या मोठ्या योजनांचा हा अप्रत्यक्ष फायदा आहे. नदीला जास्त पाणी आले असता त्यामुळे आसपासच्या प्रदेशात पूर येऊन मालमत्ता आणि जीवहानी होते. दरवर्षी देशाच्या निरनिराळ्या भागांमध्ये पूर येतात व प्रचंड प्रमाणात नुकसान होते. जर हे पुराचे पाणी कालव्यांद्वारे वाहून नेता आले किंवा साठवून ठेवता आले तर बरेच नुकसान टाळता येईल. म्हणजे एका बाजूने पुरामुळे होणारे नुकसान टाळणे आणि दुसऱ्या बाजूने त्या पाण्याच्या साहाय्याने शेतीचे उत्पादन वाढविणे असा दुहेरी फायदा सिंचनाच्या योजनेमुळे होऊ शकतो.

**७) विद्युतनिर्मिती :**

विद्युतच्या निर्मितीसाठी कोळसा किंवा पाणी यांचा वापर करता येतो. यापैकी कोळसा हे साधन पुनरूत्पादनक्षम नाही. भूगर्भातील कोळशाचे साठे मर्यादित आहेत. या उलट पाण्याच्या

साहाय्याने विद्युत उत्पादन केल्यास ते संपण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कोळशाचे संपुष्टात येणारे साठे विचारात घेता जलविद्युत आणि आण्विक ऊर्जा यांच्या निर्मितीवर जास्त लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारतात जी विद्युतची निर्मिती झाली त्यापैकी २७ प्रतिशत जलविद्युत होती तर ७१ प्रतिशत कोळसा आणि तेलापासून झाली होती. भविष्यकाळात विद्युतची मागणी वेगाने वाढणार असल्याने सिंचनाच्या बहुद्देशीय प्रकल्पांमुळे याबाबतीत जी मदत होईल ती मोलाची ठरणार आहे.

**८) जलवाहतूक:**

जलमार्गाने होणारी वाहतूक ही रेल्वेच्या वाहतुकीचा एक पर्याय असून तो स्वस्त आहे. म्हणूनच आपल्या पंचवार्षिक योजनांमध्ये असे आढळून आले की, नदीखोरे योजनांच्या विकासात अंतर्गत जलवाहतुकीच्या शक्यतेचा जास्त विचार केला जावा.

**९) मत्स्यपालन :**

सिंचनाच्या प्रकल्पांमुळे जे पाण्याचे साठे निर्माण होतात त्यात मत्स्यपालन व्यवसाय वाढविणे शक्य आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी हा व्यवसाय अतिशय उपयुक्त ठरू शकतो.

## १३.६ सिंचनाच्या समस्या

सिंचनाच्या महत्त्वाच्या आणि अनेक फायद्याचा आपण अभ्यास केला. परंतु हे सर्व फायदे पूर्णपणे त्याच स्वरूपात मिळतील किंवा नाही ही गोष्ट निरनिराळ्या घटकांवर अवलंबून आहे. यामध्ये सिंचनाची क्षमता किती आहे, असलेल्या क्षमतेचा किती वापर होतो. मोठ्या प्रकल्पामुळे होणारे तोटे, पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थापनाची कार्यक्षमता असे मुद्दे येतात. याचा विचार खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

**१) खर्च आणि लाभ:**

सिंचनाच्या मोठ्या आणि मध्यम प्रकल्पांवर प्रचंड खर्च केला जातो. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे सिंचनासाठी असलेल्या एकूण रकमेचा साधारण ८० प्रतिशत भाग या योजनांसाठी खर्च होतो. प्रश्न असा आहे की या खर्चाचे समर्थन करता येईल तितके फायदे त्यापासून मिळतात का? याबाबत सहाव्या योजनेने नोंदविलेले मत अतिशय बोलके आहे. त्यामुसार, सिंचनाच्या क्षेत्रात 'गुंतविलेल्या रकमेपासून उत्पादनाच्या रूपात किंवा पैशाच्या रूपात झालेला लाभ अतिशय निराशाजनक आहे.' प्रायोगिक क्षेत्रांमधील प्रयोगावरून अशी अपेक्षा होती की, सिंचनाची सोय असलेल्या ठिकाणी प्रतिवर्ष दर हेक्टर ४ते५टन धान्याचे उत्पादन व्हायला हवे. परंतु प्रत्यक्षात मात्र सरासरीने १.७टन धान्याचे दर हेक्टरी उत्पादन होत असलेले दिसून येते. याचा अर्थ असा की सिंचन-योजनांपासून अपेक्षित असा लाभ मिळालेला नाही.

गुंतवणीच्या बाजूने विचार करता असे दिसून येते की मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कार्य समाधानकारक रीतीने चालू नाही. अनेक राज्यांमध्ये या प्रकल्पांमधील चालू खर्च भरून काढणेसुद्धा शक्य होत नाही, मग मूळ गुंतवणीची भरती करून देणे दूरच राहिले. परिणामतः या प्रकल्पांवर सरासरी प्रतिवर्ष ४२७ कोटी रूपये तोटा सहन करावा लागतो असा अंदाज आहे.

**२) लागवडीत अयोग्य बदल :**

देशाच्या ज्या भागात ओलिताची सोय झाली तेथे लागवडीच्या स्वरूपात बराच बदल झाला आहे. त्यामुळे उत्पादन वाढीला मदत झाली हा अल्पकालीन फायदा नाकारता येत नाही. परंतु सिंचनामुळे पूर्वीच्या पिकांच्या जागी सातत्याने रोख पिके घेण्याची जी प्रवृत्ती वाढते आहे. ती अयोग्य आहे. या प्रवृत्तीमुळे पीक पालट हा प्रकारच उरलेला नाही. उत्तर प्रदेशात उसाने आधीच्या तुरीसारख्या पिकांची हकालपट्टी केली आहे. बंगाल व बिहारमध्ये ज्यूटमुळे हाच प्रकार घडतो आहे. जर विशिष्ट जमिनीमध्ये एकच एक पीक सातत्याने घेतले गेले तर तिच्या सुपीकतेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. पीक पालट करण्याचा एक महत्त्वाचा उद्देश हाच आहे की, जमिनीच्या उत्पादन शक्तीवर सतत ताण पडू न देता उत्पादन करत राहणे. सिंचनामुळे हा प्रकार कमी होत असून पैशासाठी जमिनीचा गैरवापर होत आहे.

**३) पाण्याचा अतिरेक :**

सिंचनाच्या प्रकल्पांचे पाणी कालव्यांद्वारे शेतीला पुरवितात. ज्या क्षेत्रात असा पाणीपुरवठा होतो तेथे जर जास्त पाऊस झाला तर ती जमीन कितीतरी दिवस पाण्याखाली राहते. पाणी वाहून जाण्याच्या मार्गात जर अडथळे आले तर हे जास्तीचे पाणी साचून राहते. पाणीपुरवठा जास्त केल्यामुळेसुद्धा ही परिस्थिती उद्भवते. पंजाब व उत्तर प्रदेशात पाणी साचणे ही एक मोठी समस्या झाली असून त्यावर उपाय करण्यासाठी खर्च करणे भाग पडते. पाण्याच्या अशा अतिरेकामुळे जमिनीचे नुकसान होते.

**४) क्षारांचा अनिष्ट प्रभाव :**

ओलितासाठी पाण्याचा प्रवाह जेव्हा शेतात सोडला जातो तेव्हा त्यापासून काही काळाने क्षारांचा प्रभाव दिसू लागतो. सर्व जमिनीत निरनिराळे क्षार असतात व ते बरेच आत असतात. जेव्हा पाणी शेतात वाहते तेव्हा त्यातील काही पाणी जमिनीच्या आत झिरपते व त्यामुळे जमिनीच्या आतील पाणी वर येऊ लागते. या पाण्याबरोबर निरनिराळे क्षारसुद्धा वर येऊन जमिनीच्या वरच्या थरात पसरतात. या क्षारांमुळे नुकसान होते. काही काळाने क्षारांनी युक्त झालेली जमीन लागवडीसाठी अयोग्य ठरते. कारण लागवड केलेल्या पिकांवर त्यांचा अनिष्ट परिणाम होते. सिंचनाच्या कालव्यातून आणि वितरिकांमधून पाणी झिरपत असल्यानेच ही क्रिया घडून येते.

**५) क्षमतेचा अपूर्ण वापर:**

सिंचन प्रकल्पांमुळे शेतीला पाणीपुरवठा करण्याची जी क्षमता निर्माण होते त्यासाठी प्रचंड खर्च झालेला असतो. जर या क्षमतेचा पूर्ण वापर झाला नाही तर ही गुंतवण न परवडणारी ठरेल आणि उत्पादनात अपेक्षित वाढ होऊ शकणार नाही. एकूण सिंचनाची क्षमता ५८७ लाख हेक्टर्स जमिनीला पाणी पुरविण्याची असताना प्रत्यक्षातील वापर ९२ प्रतिशत म्हणजे ५४० लाख हेक्टर होता. एकूण क्षमता ७६८लक्ष हेक्टर्सची असताना प्रत्यक्ष सिंचन ६८६ लाख हेक्टर्सचे होते. म्हणजे या ठिकाणी साधारण १० प्रतिशत क्षमता उपयोगात आली नाही. क्षमतेचा पूर्ण वापर न होण्यामागे कारणे बरीच असू शकतात. उदाहरणार्थ, पाणी पुरविल्याबद्दल घेतले जाणारे पाण्याचे दर अवाजवी किंवा शेतकऱ्याच्या मर्यादेबाहेरचे असू शकतात. वितरिकांचे जाळे गैरसोयीचे असू शकते. कारण कोणतेही असले तरी क्षमतेचा पूर्ण वापर न झाल्याने या प्रकल्पांचा पूर्ण उपयोग होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

## ६) जमिनीची धूप (Soil Erosion):

जमिनीची धूप होण्याची जी निरनिराळी कारणे आहेत त्यामध्ये पाण्यामुळे होणारी धूप हे एक प्रमुख कारण आहे. पाण्यामुळे जमिनीचा सुपीक थर वाहून जातो. जमीन लागवडीच्या दृष्टीने कमी उपयोगी होत जाते. सिंचनाचे पाणी जमिनीत सतत झिरपल्यामुळे जलाशयातून सोडलेल्या पाण्याचा साधारण २० प्रतिशत भाग वाया जातो. जमिनीची धूप झाल्याने अंदाजे ७६लाख एकर जमिनीची प्रत घटली असून ती पुनर्स्थापित करण्यासाठी ७००कोटी रूपये खर्च येईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येतो.

## ७) अडकून पडणारे भांडवल :

मध्यम आणि मोठ्या सिंचन प्रकल्पांना हजारो कोटी रूपये भांडवल लागते व हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लागणारा अवधी बराच असतो. दरम्यान, हे भांडवल नुसतेच अडकून पडल्याने इतर ठिकाणी त्यापासून जो फायदा झाला असता तो मिळत नाही. प्रकल्पांना दीर्घकाळ लागणे सर्व बाबतीत अपरिहार्य नसते. अनेकदा टाळता येणाऱ्या कारणांमुळे प्रकल्प लांबणीवर पडतात. उदाहरणार्थ, पुरेसा वित्तपुरवठा उपलब्ध न झाल्याने काही प्रकल्प अर्धवट अवस्थेत बराच काळ पडून राहतात, काही वेळा प्रशासकीय अडचणींमुळे दिरंगाई होते, तर कधीकधी आवश्यक यंत्रे व माल वेळेवर उपलब्ध न झाल्याने वेळ लागतो. या काळात भांडवलाचा उपयोग सुरू न झाल्याने देशाचे नुकसान होते.

## ८) सदोष व्यवस्थापन :

पाणीपुरवठ्याचे व्यवस्थापन हे कार्यक्षम असणे आवश्यक आहे. कालव्यांचे पाणी सुलभतेने मिळते म्हणून त्याचा निष्काळजीपणे वापर होणे योग्य नाही. काही वेळा हा अतिरेक इतका जास्त असतो की ओलित करण्याऐवजी पिके बुडविणे हाच उद्देश असल्याची शंका यावी! शेतामध्ये पाणी पोहोचणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्या पाण्याच्या योग्य वापराला महत्त्व आहे. कारण सदोष वापरामुळे पिके आणि जमीन या दोहोंचे नुकसान होते. या दृष्टीने पाण्याचा नियंत्रित पुरवठा, पाणी-दरांचे नियमन, कालव्यांची दुरुस्ती इत्यादी बाबींकडे सतत लक्ष द्यायला हवे. सदोष व्यवस्थापनामुळे सिंचनाचे फायदे कमी होतात.

वरील समस्या या विशेषत्वाने मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या आहेत. त्यामुळे आपल्या नियोजनात लघु सिंचन योजनांवर दिवसेंदिवस जास्त भर दिला जातो आहे.

♦ ♦ ♦

# १४

# कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र (आवश्यकता - स्थापना - कार्य)

**पाठाची रूपरेषा**


१४.० पाठाचे उद्देश

१४.१ प्रास्ताविक

१४.२ कृषी विद्यापीठे व स्थापना

१४.३ कृषी विद्यापीठाची रचना

१४.४ कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचे उद्देश

१४.५ कृषी विद्यापीठाची इतर उद्दिष्टे

१४.६ कृषी विद्यापीठाची कार्य

१४.७ कृषी विज्ञान केंद्र

१४.८ कृषी विज्ञान केंद्राचे उद्देश

१४.९ कृषी विज्ञान केंद्रामार्फत स्वयंरोजगार / व्यवसाय प्रशिक्षण

१४.१० कृषी विज्ञान केंद्राचे संचलन आणि व्यवस्थापन

१४.११ प्रशिक्षणार्थ्यांना सुविधा व प्रशिक्षण

१४.१२ स्वाध्याय


## १४.० पाठाचे उद्देश

- कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्राचे महत्त्व समजावून घेणे.
- कृषी विद्यार्थ्यांची स्थापना आणि रचना जाणून घेणे.
- कृषी विद्यापीठाचे उद्देश कोणते आहेत ते समजावून घेणे
- कृषी विद्यापीठाची उद्दिष्टे समजावून घेणे.
- कृषी विद्यापीठाची कार्य अभ्यासणे.
- कृषी विज्ञान केंद्र आणि उद्देश अभ्यासणे
- कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबवले जाणाऱ्या उपक्रमाची माहिती मिळवणे.

- कृषी विज्ञान केंद्राचे संचलन आणि व्यवस्थापनाची माहिती मिळवणे.
- प्रशिक्षणार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे.

**कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र**

## १४.१ प्रास्ताविक

खंडप्राय भारताची शेती हा फार पूर्वीपासून अर्थव्यवस्थेचा कणा समजला जात आहे. शेतीक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ६७ टक्के आहे. शेती क्षेत्रातील शास्त्र आणि कला यांचे आपणाला वेदिक काळापासून संदर्भ सापडतील. हरितक्रांतीमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ हा एक मुख्य घटक होता आणि त्यामुळेच भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला आणि भारतीय अर्थव्यवस्था विकसित होण्यास गती मिळाली.

आपल्या देशामध्ये कृषी शिक्षणासाठी मजबूत अशी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. स्वातंत्र्य मिळाले. तेव्हा आपल्या देशामध्ये फक्त १७ कृषी महाविद्यालय, ३ पशुमहाविद्यालये आणि एक कृषी अभियांत्रिकीकरण महाविद्यालय अस्तित्वात होते. आपल्या देशाच्या कृषी शिक्षणातील तातडीच्या आणि भविष्यकालीन गरजा भागविण्याच्या दृष्टीने भारत सरकारने वेळोवेळी पावले उचलली आहेत. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे आयोगाची किंवा समितीची स्थापना करून याबाबतचा अभ्यास केला गेला आणि त्या आयोगाच्या किंवा समितीच्या शिफारसीनुसार कृषी क्षेत्रातील शिक्षण सुधारणा व बळकटीकरण यासाठी ठोस उपाययोजना केल्या गेल्या. संयुक्त भारत-अमेरिका गटाच्या शिफारसीनुसार १९५५ आणि १९५६ आपल्या देशामध्ये उच्चशिक्षणासाठी स्वतंत्र संस्था सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या काळातील मैलाचा दगड ठरावा असा एक निर्णय घेण्यात आला आणि या निर्णयानुसार भारतीय कृषी अनुसंधान संस्थेमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सुरूवात करण्यात आली (१९५८), तर देशामध्ये पंतनगर येथे पहिल्या कृषी विद्यापीठाची स्थापना (१९६०) करण्यात आली.

यानंतरच्या काळात आपल्या देशामध्ये कृषी शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठी क्रांती घडून आली. आज आपल्या देशामध्ये एकूण ४४ कृषी विद्यापीठे, कृषी विद्याशाखा असलेली पाच मध्यवर्ती विद्यापीठे, एक मध्यवर्ती कृषी विद्यापीठ, विद्यापीठाचा दर्जा असलेल्या भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या चार राष्ट्रीय संस्था अशा एकूण ५४ संस्था आहेत. ज्यातून कृषी आणि आनुषंगिक विषयांमध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. त्यापैकी चार कृषी विद्यापीठे महाराष्ट्रात त्यांच्या हवामान व माती पीकपद्धतीनुसार स्थापित केलेली आहेत.

भारतीय राष्ट्रीय स्तरावर चार मोठ्या संख्या असून त्यांना विद्यापीठाचा दर्जा प्राप्त आहे. त्या संस्था खालीलप्रमाणे -

१) भारतीय कृषी अनसंधान संस्था, नवी दिल्ली.

२) भारतीय दुग्ध संशोधन संस्था कर्नल - हरियाणा

३) भारतीय पशुवैद्यकीय संशोधन, संस्था इज्जातनगर, बरेली ३ प्रदेश

४) केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्था वर्सोवा. मुंबई -५८.

या शिवाय तीन पारंपरिक विद्यापीठांमध्ये कृषी विद्याशाखा आहेत.

१) बनारस हिन्दू विद्यापीठ, बनारस

२) विश्व भारतीय विद्यापीठ

३) उत्तर पूर्व डोंगरी विद्यापीठ

महाराष्ट्र हे भारतातील इतर राज्यांप्रमाणेच कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. साहजिकच– महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा कृषी विकासाशी निकटचा संबंध आहे. कृषी क्षेत्रात प्रगती केल्याशिवाय राज्याची प्रगती किंवा विकास होऊ शकत नाही हे ओळखून महाराष्ट्रात १९६७ साली गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर कृषी विद्यापीठाची प्रथम स्थापना करण्यात आली. त्यानंतर राज्याची भौगोलिक परिस्थिती, हवामान व शेती व्यवसायातील विविधता विचारात घेऊन राजवाड्याच्या चार विभागांसाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. ज्या विद्यापीठामध्ये पदवीपूर्व शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. ही कृषी विद्यापीठे अशी आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी. या विद्यापीठांमध्ये कृषी, उद्यानविद्या, वनशास्त्र, मत्स्यविज्ञान, अन्नतंत्रज्ञान, वनस्पती जैवतंत्रज्ञान, कृषी अभियांत्रिकी, गृहविज्ञान आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापन या विषयांमध्ये पदवीपूर्व शिक्षण घेण्याची सोय आहे.

महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये पदवीपूर्व शिक्षण घ्यावयाचे झाल्यास गुणवत्तेनुसार थेट प्रवेश दिला जातो. यासाठीची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या सहयोगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्यामार्फत राबविली जाते. शास्त्रशाखेतील बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ह्या प्रवेश प्रक्रियेद्वारा विविध पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात. यासाठी प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या सहयोगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या मार्फत राबविली जाते. शास्त्रशाखेतील बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ह्या प्रवेश प्रक्रियेद्वारा विविध पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात यासाठी त्यांनी संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद भांबुर्डा, भोसलेनगर - पुणे ४११००७ याच्याशी संपर्क साधावा. तसेच या प्रवेशप्रक्रियेची संपूर्ण माहिती वेबसाईटसवर उपलब्ध असते.

## १४.२ कृषी विद्यापीठे व स्थापना

| कृषी विद्यापीठ | ठिकाण | कार्यक्षेत्र | स्थापना वर्ष | स्थापना आधार |
|---|---|---|---|---|
| १) महात्मा फुले कृषी विद्यापीठ | राहुरी, जि. नगर | (पश्चिम महाराष्ट्र) पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगाव | १९६९ | लॅन्ड ग्रॅन्ट कॉलेज धर्तीवर |
| २) पंजाबराव देशमुख कृषी विद्यालय | अकोला, जि. अकोला | अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा,गडचिरोली,वाशिम, गोंदिया (विदर्भ) | १९६९ | लॅन्ड ग्रॅन्ट कॉलेज धर्तीवर |

| कृषी विद्यापीठ | ठिकाण | कार्यक्षेत्र | स्थापना वर्ष | स्थापना आधार |
|---|---|---|---|---|
| ३) कोकण कृषी विद्यापीठ | दापोली, जि. रत्नागिरी | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, मुंबई उपनगर जिल्ह्याकरिता (कोकण विभागाकरिता) | १९७२ | लॅन्ड ग्रॅन्ट कॉलेज धर्तीवर |
| ४) मराठवाडा कृषी विद्यापीठ | परभणी, जि. परभणी | औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली | १९७२ | लॅन्ड ग्रॅन्ट कॉलेज धर्तीवर |
| ५) महाराष्ट्र पशुवैद्यक मत्स्य विज्ञान विद्यापीठ महाराष्ट्र | नागपूर | संपूर्ण महाराष्ट्र | २००० (१७- ११- २०११) | लॅन्ड ग्रॅन्ट कॉलेज धर्तीवर |

## १४.३ कृषी विद्यापीठाची रचना

**कृषी विद्यापीठाची रचना**



प्राध्यापक

सहयोगी प्राध्यापक

सहयोगी प्राध्यापक

साहाय्यक प्राध्यापक

कृषी अधिकारी

कृषी पर्यवेक्षक

कृषी साहाय्यक

माळी, शेतमजूर

## १४.४ कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचे उद्देश

कृषी आणि कृषी व्यवसायाशी निगडित समस्यांविषयी एकत्रित विचार करून त्या सोडवण्यासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली.

**मुख्य उद्देश**

**कृषी संशोधन**

१) पीक संशोधन
२) फळ संशोधन
३) भाजीपाला संशोधन
४) पशुखाद्य संशोधन
५) दुग्धव्यवसाय संशोधन
६) गृह आहाराविषयी संशोधन
७) मत्स शेती संशोधन

संशोधन केंद्र

**कृषी शिक्षण**

१) कृषी पदवी, पदव्युत्तर
२) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय पदव्युत्तर
३) दुग्धव्यवसाय पदव्युत्तर
४) मत्स्यविभाग पदव्युत्तर
५) गृहशास्त्र पदव्युत्तर
६) कृषी अभियांत्रिकी पदव्युत्तर
७) निम्नस्तरीय शिक्षण
८) निम्नस्तरीय शिक्षण

**कृषी महाविद्यालय**

ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र
कृषी पदविका
माळी प्रशिक्षण
पशुधन पर्यवेक्षक
दुग्ध व पशुशास्त्र
कुक्कुटपालन

**कृषी विस्तार**

१) विस्तार गट
२) विस्तार शिक्षण योजना
३) राष्ट्रीय प्रात्यक्षिक योजना
४) प्रयोग शाळेतून शेतीकडे
५) प्रशिक्षण संस्था
६) प्रशिक्षण व भेट योजना
७) एक खिडकी योजना
८) कृषी विज्ञान केंद्र
९) प्रसारण केंद्र
१०) आकाशवाणी, दूरदर्शन
११) शेतकरी मेळावे
१२) शेती दिन
१३) गाठीभेटी
१४) सभा, समूह चर्चा

विस्तार सेवा केंद्र
प्रात्यक्षिक आणि चाचण्या

शेतकरी

## १४.५ कृषी विद्यापीठाची इतर उद्दिष्टे

१) शेती व शेतीला पूरक शास्त्र इ. विषयांची माहिती देणे.

२) शेती तत्सम विषय यांचे ज्ञान आणि संशोधन यांचा विकास करणे.

३) शेतीच्या विविध शास्त्रातील शिक्षणाचा विकास करणे आणि त्यामध्ये समन्वय साधणे.

४) कृषीविस्तार करणे आणि चाललेल्या कामात मार्गदर्शन करणे.

**कृषीविद्यापीठ घटना :**

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ ॲक्ट १९९० साली प्रसिद्ध झालेला आहे. या कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी निरनिराळ्या १६ भागांत अंतर्भूत केलेल्या आहेत. कृषी विद्यापीठाच्या घटनेत एकूण १४७ कलमांचा समावेश आहे. त्यांचा सांगबद्य खालीलप्रमाणे

| भाग नं. | स्थराचे नाव | कलम नं. |
|---|---|---|
| भाग नं.१ | प्राथमिक स्वरुपाचे | १ ते २८ |
| भाग नं. २ | घटना, अधिकार आणि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे कर्तव्य | ३ ते १५ |
| भाग नं. ३ | निवडणूक नामनिर्देशन पद्धत | १६ ते २४ |
| भाग नं. ४ | विद्यापीठातील सभा | २५ ते ३९ |
| भाग नं. ५ | शैक्षणिक अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यापीठातील इतर समतुल्य अधिकारी | ४० ते ५९ |
| भाग नं. ६ | विद्यापीठातील इतर अधिकारी वर्ग | ६० ते ७० |
| भाग नं. ७ | विद्यापीठातील विद्याशाखेचे पदाधिकारी | ७१ ते ८० |
| भाग नं. ८ | विद्यापीठातील साहाय्यक कर्मचारी | ८१ ते ८९ |
| भाग नं. ९ | सभेला हजर राहण्यासाठी सदस्यांना देण्यात येणारा भत्ता | ९० ते ९१ |
| भाग नं. १० | विद्यापीठ सुधारणा व विद्यार्थी कल्याण इत्यार्दींसाठी देणग्या, बक्षिसे, पारितोषिके, शिष्यवृत्ती इ. | ९२ ते ९३ |
| भाग नं. ११ | सूचना, शिकवण, विद्यार्थ्यांच्या परीक्षा इ. | ९४ ते ९९ |
| भाग नं. १२ | पदवी देण्याबाबतचे नियम व इतर | १०० ते १११ |
| भाग नं. १३ | उपकुलगुरू यांच्या कामकाजाबाबतच्या अटी व नियम | ११२ |
| भाग नं. १४ | सर्वसाधारण | ११३ ते १३२ |
| भाग नं. १५ | विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे पगार, इतर भत्ते, रजा, सर्वसाधारण कामाच्या अटी व नियम | १३३ ते १४६ |
| भाग नं. १६ | सुधारणा व दुरूस्ती | १४७ |

## १४.६ कृषी विद्यापीठाची कार्य

भारताच्या शेती विकासात कृषी विद्यापीठांचे मोठे योगदान आहे. कृषी विद्यापीठांची कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची कार्ये समजली जातात. आपल्या देशातील कृषी विद्यापीठे कृषी आणि तद्नुषंगिक विषयांमध्ये शिक्षण देणे, शेतकऱ्यांच्या गरजांवर आधारित संशोधन करून सुधारित तंत्रज्ञान विकसित करणे आणि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विस्तार, शिक्षण उपक्रमाचे आयोजन करणे अशा प्रकारची कार्य करीत असतात.

**शिक्षण :**

देशातील सर्व कृषी विद्यापीठांमधून कृषी आणि अनुषंगिक विषयामध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. आज या व्यवस्थेतून दरवर्षी १५०० पदवीधर, ११००० पदव्युत्तर आणि १००० आचार्य पदवीधारक विद्यार्थी निर्माण होतात.

**पदवीपूर्व अभ्यासक्रम:**

देशातील सर्व कृषी विद्यापीठांमधून मुख्यत्वे पुढील विषयांमधील पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

१) कृषी

२) उद्यानविद्या

३) वनशास्त्र

४) मत्स्यविद्यान

५) गृहविज्ञान

६) रेशीम संगोपन

७) कृषी अभियांत्रिकी

८) दुग्धतंत्रज्ञान

९) अन्नशास्त्र व तंत्रज्ञान

१०) कृषी विपणन

११) बँकिंग आणि सहकारी

१२) जैवतंत्रज्ञान

**पदव्युत्तर अभ्यासक्रम :**

राष्ट्रीय पातळीवर एकूण २० मुख्य विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध आहे. त्यामध्ये पुढील विषयाचा समावेश आहे.

१. वनस्पती जैवतंत्रज्ञान

२. वनस्पतीशास्त्र

३. भौतिकशास्त्र

४. कीटकशास्त्र आणि सुत्रकृमीशास्त्र

५. कृषीविद्या

६. सामाजिक शास्त्र

७. संख्याशास्त्र

८. उद्यान विद्या

९. वनशास्त्र / कृषीवनिकी शास्त्र

१०. कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान

११. जलशास्त्र आणि तंत्रशास्त्र

१२. गृहविज्ञान

१३. प्राणी जैवतंत्रज्ञान

१४. पशुवैद्यकशास्त्र

१५. प्राणीशास्त्र

१६. मत्स्यशास्त्र

१४. दुग्धशास्त्र

१८. दुग्धतंत्रज्ञान

१९. अन्नशास्त्र तंत्रज्ञान

२०. कृषी व्यवसाय व्यवस्थापन

**संशोधन:**

देशातील प्रत्येक कृषी विद्यापीठ आपल्या कार्यक्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती व शेतकऱ्याच्या गरजा यांचा अभ्यास करून विविध संशोधन प्रकल्प राबवीत असते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील देशाचे शेतीबाबतचे धोरणही विचारात घेतले जाते. शेतकऱ्यांच्या गरजांवर आधारित संशोधन करून शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञानाच्या शिफारसी केल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने जमिनीचे आरोग्य व व्यवस्थापन, विविध पिकांचे सुधारित व संकरित वाण, विविध पिकांच्या लागवड पद्धती काढणीपश्चात तंत्रज्ञान, विपणन व साठवणूक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान सुधारित कृषी अवजारे / यंत्र, पशु-पक्ष्यांच्या विविध जाती, पशु व्यवस्थापन पद्धती, मत्स्यसंवर्धन, तंत्रज्ञान यासारख्या तंत्रज्ञानाचा समावेश होतो.

**विस्तार शिक्षण:**

कृषी विद्यापीठामध्ये विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठामार्फत

त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये विविध विस्तार, शिक्षण उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये प्रशिक्षण, शेतकरी सहली, प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे, गटचर्चा, शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी, समूह माध्यमांचा वापर यासारख्या उपक्रमांचा समावेश असतो. भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्लीतर्फे सर्व कृषी विद्यापीठांमध्ये कृषीतंत्रज्ञान माहिती केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी कृषी तंत्रज्ञानाबद्दलची माहिती मिळू शकते व विद्यापीठ निर्मित कृषी निविष्ठा उत्पादनही मिळू शकतात. अशा तऱ्हेने कृषी विद्यापीठे शेतीक्षेत्रात फार महत्त्वाची भूमिका बजावीत असून कृषी आधारित भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी ठोस पावले उचलीत आहेत.

**कृषी विज्ञान केंद्र :**

'कृषी विज्ञान केंद्र' ही शेती शिक्षणातील एक नवीन संकल्पना आहे. जागतिक कीर्तीचे शेती शास्त्रज्ञ डॉ. एम.एस. स्वामीनाथन ह्यांची ही मूळ कल्पना असून ती मूर्त स्वरूपात आणण्यामागे भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. सी. प्रसाद ह्यांचे परिश्रम कारणीभूत आहेत. शेती व्यवसाय हा विज्ञानावर आधारित आहे. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांतून विज्ञानाचा प्रशिक्षणाद्वारे प्रसार होऊन शेती उत्पादन वाढावे किंवा शेती व्यवसाय स्वयंरोजगार निर्माण व्हावा हा कृषी विज्ञान केंद्रांमागील मूळ हेतू आहे.

आपल्या भारतामध्ये अन्नसुरक्षिततेच्या बाबतीत १९६५ साली हरितक्रांतीसारखी चांगली सुधारणा घडवून आणली. त्यांचा सर्वांना आनंद आहे. हे शक्य होण्याचे कारण कृषी संशोधन कृषी शिक्षण आणि कृषी विस्तार याचा चांगला समन्वय साधू शकलो. जरी हे झाले असले तरी ८० टक्के कोरडवाहूशेती आणि सामान्य शेतकरी ह्यापासून वंचित राहिले. कारण कृषी क्षेत्रात मौल्यवान असे संशोधन झाले आहे त्यापैकी बरेचसे संशोधन अद्याप गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाही. त्यासाठी अशा शेतकऱ्याजवळ उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचा विचार करून त्यांच्या गरजेवर आधारित असलेल्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शेतीविषयक प्रशिक्षण दिल्यावर उत्पादनात वाढ होते. हे लक्षात घेऊन भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने कृषी विज्ञान केंद्र, हे कृषी संशोधन आणि विस्तार कार्य करणाऱ्या संस्था यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य करते या सर्वांचा विचार करून डॉ. मोहनसिंग मेहता समितीमार्फत कृषी विज्ञान केंद्रे स्थापन करण्याची शिफारस केली. आणि प्रायोगिक तत्त्वावर पाँडेचरी येते पहिल्या कृषीविज्ञान केंद्राची स्थापना १९७४ रोजी केली आणि भारती कृषी अनुसंधान परिषदेने गोखले एज्युकेशन सोसायटीचे कृषी विज्ञान केंद्र देशातील दुसरे राज्यातील पहिले केंद्र म्हणून १ एप्रिल १९७७ साली कोसबाड हिल, ता. डहाणू येथे सुरू केले. भारतात सध्या प्रत्येक जिल्ह्यासाठी एक कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्याचा भारत सरकारचा मानस असून पाचव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत १८ कृषी विज्ञान केंद्राच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली. तसेच १९८४ मध्ये उच्चस्तरिय मूल्यमापन समितीतर्फे देशामध्ये आणखी कृषी विज्ञान केंद्रे स्थापण्याची शिफारस करण्यात आली. सध्या देशामध्ये ५७१ कृषी विज्ञान केंद्रे अस्तित्वात आहेत.

## १४.८ कृषी विज्ञान केंद्राचे उद्देश

सुरुवातीस कृषी विज्ञान केंद्र स्थापनेमागे उद्देश हा होता की, शेतकी शाळा अथवा कृषी महाविद्यालयामधील अभ्यासक्रम हा चाकोरीबद्ध असतो. प्रवेशाकरिता उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व वय विचारात घेतले जाते. शेती करणारे बहुतांशी शेतकरी अशिक्षित आणि वयस्कर असतात.

उत्पादन वाढीसाठी त्यांना तांत्रिक ज्ञानाची गरज भासते. हे शेतकरी शेतकी शाळेत किंवा कृषी महाविद्यालयात जाऊ शकणार नाहीत, अशा शेतकऱ्यांना त्यांना गरजेनुसार प्रशिक्षण देऊन त्यांचे उत्पादन वाढावे किंवा स्वयंरोजगार निर्मितीचे कार्य कृषी विज्ञान केंद्र करीत असे. केंद्रातील कार्य कौशल्यावर आधारित असल्यामुळे बौद्धिकांवर भर न देता प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांवर भर दिला जात असे. आता त्यानुसार पुढील उद्देश ठरविण्यात आले आहेत.

१) परिस्थितीनुरूप कृषी तंत्रज्ञान शोधण्याकरिता प्रक्षेत्र चाचण्यांचे आयोजन करणे.

२) विविध पिकांची आणि उद्योगांची शेतकऱ्याच्या शेतावर उत्पादन क्षमता तपासण्यासाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे.

३) शेतातील आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्य यांची अद्ययावत माहिती होण्यासाठी शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

४) आधुनिक तंत्रज्ञान विकासाची ओळख होण्यासाठी विस्तार अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

५) जिल्ह्यांची कृषी आर्थिक व्यवस्था सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे केंद्र उभारणे.

६) कृषी विस्तार उपक्रमांचे आयोजन करणे.

७) बियाणे, रोपे, कलमे यांचे उत्पादन करणे.

अशी विविध उद्दिष्टे ठरविण्यात आली. तसेच शेती व शेतीपूरक व्यवसायातील उत्पादनात वाढ करणे, ग्रामीण भागात स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि ग्रामीण समाजाचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावणे अशी उद्दीष्टे आहे.

कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यामध्ये स्थापनेपासून आतापर्यंत असंख्य बदल झाले आहेत. या सगळ्याचा विचार करून कृषी विज्ञान केंद्राची संकल्पना मांडायची झाल्यास कृषी विज्ञान केंद्र हे जिल्हा पातळीवर विस्ताराचे काम करणारी अतिशय महत्त्वाची यंत्रणा आहे. विशेष म्हणजे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारी अशी कृषी विज्ञान केंद्र ही संस्था आहे. की जे अद्ययावत कृषी तंत्रज्ञान आहे ते वेगवेगळ्या प्रात्यक्षिकामार्फत वेगवेगळ्या सूक्ष्म शेती पद्धतीमध्ये अमलात आणण्याचे कार्य हे कृषी विज्ञान केंद्र करते.

## १४.९ कृषी विज्ञान केंद्रामार्फत स्वयंरोजगार / व्यवसाय प्रशिक्षण

१) कुक्कुटपालन

२) रोपवाटिका व्यवस्थापन

३) अळंबी उत्पादन

४) गांडूळ खत व बीज पैदास निर्मिती

५) औषधी वनस्पती लागवड

६) दुग्ध उत्पादन

७) वराहपालन

८) शेळीपालन

९) फळे आणि भाजीपाला प्रक्रिया

१०) बीजोत्पादन तंत्र

११) आधुनिक शेतीसंबंध प्रशिक्षण

१२) सुधारित पद्धतीने भात लागवड

१३) गळीत धान्य, कडधान्य, पिके लागवड

१४) फळे आणि भाजीपाला लागवड

१५) एकात्मिक कीड, अन्नद्रव्य व्यवस्थापन

१६) पीक संरक्षण

१७) मधुमक्षिका पालन

१८) रेशीम उद्योग

अशा विविध उपक्रमांवर प्रशिक्षण कार्यक्रमावर भर देण्यात येतो.

वरील प्रशिक्षणाबरोबरच कृषी विज्ञान केंद्रामध्ये नवीन संकल्पना राबविण्याचे कार्य पुढीलप्रमाणे चालू आहे.

१) स्थानिक पातळीवर उपलब्ध स्त्रोताचा विशेषत: जमिनीचा वापर करून एखादे कृषी तंत्रज्ञान स्थानिक पातळीवर चाचणीच्या माध्यमातून घेणे.

२) दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे वेगवेगळ्या पिकांवरती प्रथम प्रात्यक्षिके घेऊन उत्पादनासंबंधी माहिती मिळविणे आणि त्या कृषी तंत्रज्ञानाबद्दलचा शेतकऱ्यांचा अभिप्राय मिळविणे.

३) विस्तार कार्य करणारे कर्मचारी / संस्था यांना वेळोवेळी अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाबद्दल प्रशिक्षण देणे.

४) शेतकरी, ग्रामीण युवक यांना लघु आणि दीर्घ मुदतीच्या कृषी तंत्रज्ञानाबद्दल व्यावसायिक प्रशिक्षण देणे ज्यायोगे कृषी तंत्रज्ञान प्रत्यक्ष काम करून अनुभवणे आणि त्यामार्फत शेतीचे उत्पादन वाढवणे व शेतकरी आणि ग्रामीण युवकांना रोजगार मिळवून देणे. थोडक्यात लघू आणि दीर्घ मुदतीचे कृषी आणि कृषी संलग्न बाबतीत रोजगाराभिमुख प्रशिक्षण शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, असे नावीन्य पूर्व उपक्रम सध्या कृषी विज्ञान केंद्राकडून राबविले जात आहेत.

## १४.१० कृषी विज्ञान केंद्राचे संचलन आणि व्यवस्थापन

कृषी विज्ञान केंद्र ही योजना केंद्रित कृषी खात्याच्या भारतीय कृषी अनुसंधान परिषदेची असून त्याकरिता शंभर प्रतिशत आर्थिक साहाय्य या परिषदेकडून दिले जाते. व्यवस्थापनाची

जबाबदारी राज्य शासनाची कृषी विज्ञापीठे अथवा ग्रामीण विकासात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेकडे सोपविण्यात आलेली असते. केंद्राचे कार्य लोकाभिमुख होऊन ते कृषी उत्पादन वाढीशी निगडित असते म्हणून कार्याचे नियोजन करण्याकरिता एक 'स्थानिक व्यवस्थापक समिती' असते व्यवस्थापकीय संस्थेचे प्रमुख या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात आणि कृषीखाते, पशुसंवर्धन खाते ग्रामीण विकास खाते, भारतीय कृषी अनुसंवर्धनखाते, ग्रामीण विकास खाते, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, कृषी विद्यापीठातील प्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कृषी अधिकारी, दोन प्रगतिशील शेतकरी, दोन समाजसेवक आणि सामाजिक कार्य करणाऱ्या महिला इत्यादी या समितीचे सदस्य असतात. समितीच्या सभा वर्षातून दोन अथवा तीन वेळा भरतात. त्यात केंद्राच्या कामाचे मूल्यमापन आणि नियोजन ठरविले जाते.

## १४.११ प्रशिक्षणार्थ्यांना सुविधा व प्रशिक्षण

कृषी विज्ञान केंद्रातील प्राध्यापक खेड्यात जाऊन तेथील उपलब्ध साधनसंपत्ती आणि गरजेवर आधारित सर्व्हेक्षण करतात. अभ्यासाच्या आधारावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करतात आणि लाभार्थ्यांना प्रशिक्षणासाठी उद्युक्त करतात. ज्या पुरूष महिलांना शेतीविषयक प्रशिक्षण हवे असेल ते केंद्राशी संपर्क साधतात. शिक्षण उपयुक्त व परिणामकारक व्हावे म्हणून प्रशिक्षणार्थ्यांची संख्या पंचवीसपर्यंत ठेवली जाते. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थ्यांची निवासाची आणि भोजनाची व्यवस्था विनामूल्य केली जाते. मात्र प्रवासखर्च प्रशिक्षणार्थ्यांना स्वत: करावा लागतो.

शेती , फळबाग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, गृहविज्ञान, मत्स्यव्यवसाय यासारख्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची सोय असते. अभ्यासवर्गाचा कालावधी एक दिवसापासून तीन महिन्यांपर्यंत असू शकतो. प्रशिक्षणाचे आयोजन केंद्राच्या प्रक्षेत्रावर केले जाते. काही शेतकऱ्यांच्या आणि विशेषत: महिलांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रसंगी गावातील प्रगतिशील शेतकऱ्याकडे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात. अशा प्रकारचे प्रशिक्षण फार प्रभावी आणि उपयुक्त, परिणामकारक असते.

## १४.१२ स्वाध्याय

१. कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यामागील उद्देश सांगून कार्य स्पष्ट करा.

२. कृषी विद्यापीठाची रचना सांगून कृषी विद्यापीठाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

३. कृषी विज्ञान केंद्राचे उद्देश सांगून कृषी विज्ञान केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची सविस्तर चर्चा करा.

४. कृषी विज्ञान केंद्राची भूमिका स्पष्ट करा.

५. कृषी विद्यापीठाची भूमिका स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# १५

# स्वयंसाहाय्यता गट

**पाठाची रचना**

१५.० उद्दिष्टे

१५.१ प्रास्ताविक

१५.२ स्वयंसाहाय्यता गटाची संकल्पना

१५.३ स्वयंसाहाय्यता गटाचा इतिहास

१५.४ स्वयंसाहाय्यता गटाची वैशिष्ट्ये

१५.५ स्वयंसाहाय्यता गटाचे स्वरूप

१५.६ स्वयंसाहाय्यता गटाचे प्रकार

१५.७ स्वयंसाहाय्यता गटाची कार्ये

१५.८ सारांश

१५.९ स्वाध्याय

## १५.० उद्दिष्ट्ये

१) स्वयंसाहाय्यता गटाची संकल्पना समजून घेणे.

२) स्वयंसाहाय्यता गटाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

३) स्वयंसाहाय्यता गटाची गरज समजून घेणे.

४) स्वयंसाहाय्यता गटाच्या कार्याचा अभ्यास करणे.

## १५.० प्रास्ताविक

भारतात बहुसंख्य जनता ही आजही खेड्यात वा ग्रामीण भागात राहते. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासाचा वेग वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले त्यामध्ये अत्यल्प भूधारक, भूमिहीन शेतमजूर, कारागीर, सर्वसामान्य शेतकरी, छोटे व्यावसायिक यांसारख्या लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी, तसेच सावकाराच्या तावडीतून या लोकांची सुटका होण्यासाठी बँकांचे राष्ट्रायीकरण करण्यात आले. १९ जुलै १९६९ रोजी १४ प्रमुख व्यापारी बँकांचे

व एप्रिल १९८० मध्ये आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण भारत सरकारने केले. परंतु वरील गरजू घटकांच्या कर्जविषयक गरजा भागवण्यावर ही संस्थात्मक पतपुरवठ्याची सोय अपुरी पडत होती. ग्रामीण भागातील या घटकांच्या कर्जविषयक गरजा या नेहमीच व तातडीच्या उद्भवणाऱ्या असतात. कर्जाची रक्कमही लहान (अल्प) असते. अल्प रकमेची कर्जे हाताळण्यास व जोखीम पत्करण्यास बँका तयार नसतात. अशा वेळी या गरजू घटकांना असंस्थात्मक स्त्रोतांकडे (सावकार, जमीनदार, श्रीमंत शेतकरी, व्यापारी इ.) जाण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य गरीब नागरिक बँकांकडे जाण्यास उत्सुक नसतात. अर्थात ही जनता विविध सवलतींपासून वंचित राहते. त्यावर प्रभावी उपाय म्हणून स्वयंसाहाय्यता बचत गट स्थापन करण्यात आले. ह्या बचत गटांच्या माध्यमातून फार मोठे परिवर्तन ग्रामीण भागात घडून येत आहे.

## १५.२ स्वयंबचत गटाची संकल्पना

स्वयंसाहाय्यता गटाची व्याख्या करणे कठीण आहे. या संकल्पनेकडून अपेक्षाही वेगवेगळ्या आहेत. स्वयंसाहाय्यता गटाची चळवळ ही समूह गट, शेजार गट, महिला बचत गट, स्वपतसमूह स्वावलंबी बचत गट, काटकसर बचत व कर्ज गट अशा वेगवेगळ्या संकल्पनेतून जोमात सुरू आहे. तरीही पुढीलप्रमाणे काही सर्वस्पर्शी संकल्पना सांगता येतील.

१) "समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन समान आर्थिक उद्दिष्टे व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकाच प्रदेशात व विभागातील व्यक्तींनी एकत्र येऊन समूह स्थापन व वृद्धिंगत करून स्वेच्छेने सहभागी होणे याला स्वयंसाहाय्यता बचत गट म्हणतात."

२) "परावलंबत्वाकडून स्वावलंबत्वाकडे जाण्यासाठी स्वेच्छेने, सर्वसंमतीने सामुदायिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसाहाय्यता बचत गट होय."

३) "जीवनामध्ये नव्याने येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी वा पेलण्यासाठी क्षमता विकसित करणारा सुसज्ज संच म्हणजे स्वयंसाहाय्यता गट होय."

४) "एकाच गावातील १० ते २० सभासदांनी एकत्र येऊन नियमित बचतीतून एकमेकांच्या गरजा, अडचणी, जीवनमूल्ये उंचावण्यासाठी कर्ज स्वरूपात अर्थसाहाय्य केले जाते, उद्योगधंदा उभारला जातो, परस्पर सहकार्य, सहभाग नेतृत्व व कर्तव्य, विचारांची देवाण-घेवाण, सातत्यपूर्ण व प्रयत्नशील सदस्यांच्या समूहाला स्वयंसाहाय्यता गट म्हणतात."

५) "समान प्रादेशिकता असलेल्या समविचारी समान गरजा, समान अपेक्षा असलेल्या १० ते २० महिलांनी स्वल्प बचत करून बचतीचा विनियोग उपभोगासाठी करून, कर्ज घेऊन, व्यवसाय करणाऱ्या व लोकशाही संघटन प्रणाली असलेल्या समूहास स्वयंसाहाय्यता बचत गट असे म्हणतात."

६) " A Self- help group is a voluntary association of homogenous set of people, either working together or living in the neighbourhood, engaged in similar activity, working with or without registration for the common good of their members."

७) "दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचे पुरोगामी-सहभागी-प्रतिगामी दुवे साधणारा मंच म्हणजे स्वयंबचत गट होय."

८) "स्वेच्छेने एकत्र येऊन जीवनाच्या सर्वांगीण विकासाकरिता महिलांनी परस्पर सहकार्यातून चालवलेली लोकशाही संघटना म्हणजे स्वयंसाहाय्यता बचत गट होय."

समाजसुधारकांच्या दृष्टीने स्वयंबचत गट हे समाजसुधारण्याचे माध्यम, शासनाच्या दृष्टीने आर्थिक विकासाचे साधन, धर्मशास्त्राच्या दृष्टीने परोपकाराचे माध्यम, सांस्कृतिकदृष्ट्या मूल्यांचे व संस्कृतीचे जतन करण्याचे माध्यम या विचारातून स्वयंसाहाय्यता बचत गटाची संकल्पना स्पष्ट होत आहे. ह्यामध्ये महिलांना आघाडीचे स्थान देण्यात आले आहे, कारण महिला ह्या आतापर्यंत दुर्बल घटक म्हणून उपेक्षित राहिल्या आहेत. महिलांना ह्या संकल्पनेत मोठ्या प्रमाणात समाविष्ट करून महिला बचत गट स्थापन करण्यावर अधिकाधिक भर देण्यात आला आहे. ह्यातून महिलांमधील सुप्त व दुर्लक्षित घटकांचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. ह्यातील अंतर्गुणांचे खालीलप्रमाणे वर्णन करण्यात आले आहे.

**म** -मर्यादित संख्या /महान,

**हि** -हिम्मत वाढवणारी / रा,

**ला**-लाभ मिळवून देणारा /लागेबंध,

**स्व**-स्वतःच्या ताकदीवर /बचतीवर,

**यं**-यातना दूर करणारा,

**स**-सर्वानुमते निर्णय घेणारा,

**हा**-हाकेला मदत करणारा,

**य्य**-यश मिळवून देणारा,

**ता**-ताकद वाढवणारा,

**ब**-बरोबरीचा हक्क देणारा,

**च**- चणचण दूर करणारा,

**त**-तत्त्वांचे पालन करणारा,

**ग**- गरजेच्या वेळी मदत करणारा,

**ट**- टप्प्याने विकास.

वरील अंतर्गुणांमुळे महिला बचत गटांमध्ये मोठी शक्ती आहे हे स्पष्ट होते आणि म्हणून महिला स्वयंसाहाय्यता बचत गटांना मोठे महत्त्व प्रामाप्त होत आहे. बचत गटांच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांमध्ये पैसा हा महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये व्यक्ती, गाव, समाज या घटकांच्या सक्षमीकरणाला मोठ्या प्रमाणात जोड मिळते. तेव्हा स्वयंसाहाय्यता गट (Self Help Group) निर्माण होतात. अशा ह्या स्वयंसाहाय्यता बचत गटांची पार्श्वभूमी आपण लक्षात घेऊ.

## १५.३ इतिहास

२१व्या शतकात ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन आणि त्याद्वारे ग्रामीण विकास साध्य करणारी यंत्रणा म्हणून स्वयंसाहाय्यता गट वा बचत गट किंवा लघु वित्त / पत गट या नावाने ओळखली जाते. या संकल्पनेचा उगम करणारे नोबेल पारितोषिक मिळालेले बांगलादेशाचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. महंमद युनुस हे आहेत. बांगलादेशामधील शेतकऱ्यांच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या कर्जबाजारीपणा व दारिद्र्याने व्यथित झालेल्या या विचारवंताने असंघटित व शोषित समुदायाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी १९७३ साली लघु वित्ताची (Micro Finance) संकल्पना मांडली. त्याचा पुढचा टप्पा म्हणजे या दुर्बल घटकांना लघु-वित्तपुरवठा करणाऱ्या ग्रामीण बँकांची संकल्पना होय. या संकल्पनेचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि त्याची परिणती १९८३ साली ग्रामीण बँकांच्या स्थापनेत झाली. बांगलादेशामधील ग्रामीण विकास दारिद्र्य निर्मूलनाचा प्रयोग यशस्वी झाला आणि त्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली. १९९४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष श्री. बिल क्लिंटन यांनी ह्याबाबत विशेष स्वारस्य दाखविले आणि जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या जागतिक पातळीवर वित्तीय, संघटनांनी 'दारिद्र्य निर्मूलनाची प्रभावी उपाययोजना' अशी प्रशस्ती केली. त्याचा परिणाम १९९०च्या दशकांत आशिया, आफ्रिका आणि मध्य व दक्षिण अमेरिका खंडातील विकलनशीन देशांत लघुवित्त आणि स्वयंसाहाय्यता गट या संकल्पनेचा प्रसार झाला.

बचत ही संकल्पना नवीन नव्हती. जगात चिट फंड, भिशी या वेगवेगळ्या स्वरूपात बचत केली जात असे. दक्षिण अमेरिका व आफ्रिका भागात (Rotating Saving And credit Association) हा बचतीचा प्रकार भिशीशी संबंधित होता. हा प्रकार ग्रामीण बँकेच्या धर्तीवर विकसित करण्यास सुरूवात झाली आहे. इंडोनेशियात GTZ या जर्मन फंडिंग एजन्सीने हा प्रयोग सर्वप्रथम केला आहे. येथे (SHG) Self Help Group चा जन्म झाल्याचे आढळते. मलेशियात प्रा. गिल्सन यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना संघटित करणारी आणि एकता, शिस्त, साहस आणि कठोर परिश्रम या गुणवैशिष्ट्यांचा मिलाफ साधणारी स्वयंसाहाय्यता गटाची संकल्पना यशस्वीरीत्या राबविली. त्याचा प्रसार श्रीलंका, फिलीपाईन्स, आखाती देश, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील विकसनशील देशांमध्ये स्वयंसाहाय्यता गट चळवळीचा प्रसार झाला.

### १५.३.१ भारतातील स्वयंसाहाय्यता गट चळवळ:

भारतामध्ये स्वयंसाहाय्यता गटाची चळवळ 'म्हैसूर रिसेटलमेंट अँड डेव्हलपमेंट' एजन्सी (मायराडा) या संस्थेने सुरू केली. मायराडाच्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता गटाची निर्मिती होत असताना राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, म्हणजेच नाबार्ड (NABARD) १९९१-९२ साली स्वयंसाहाय्यता गट या ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनविषयक प्रतिमानास स्वीकृती दिली. स्वयंसाहाय्यता गटांना कायदेशीर मान्यता प्राप्त झाल्यावर श्रीमती जया अरूणाचलम यांच्या पुढाकाराने, नाबार्डच्या माध्यमातून आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या दक्षिणेकडील राज्यात स्वयंसाहाय्यता गट चळवळीची सुरूवात झाली. १९९६ मध्ये रिझर्व्ह बँकेने बँकांशी संलग्न असणाऱ्या स्वयंसाहाय्यता गटांना प्राधान्यक्रमाने पतपुरवठा करण्याचे निर्देश दिले. भारत सरकारने १९९९ साली स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार कार्यक्रमाच्या अंतर्गत दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वयंसाहाय्यता गटांना आर्थिक अनुदान देण्याचा निर्णय घेतला. यातून स्वयंसाहाय्यता गट चळवळीला पोषक वातावरण देशात निर्माण झाले.

१९९९ ते २००९ या मागील दशकात स्वयंसाहाय्यता गट चळवळीचा देशाच्या सर्व राज्यांत प्रसार झाला. ह्यामध्ये सर्वाधिक गट ८२% गट हे महिलांचे होते.

स्वयंसाहाय्यता गटांच्या माध्यमातून ग्रामीण विकास, ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन आणि महिलांचे सबलीकरण ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर स्वयंसेवी संस्थांना या उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यात आले. स्वयंसेवी संस्थांच्या पुढाकाराने संघटित होणाऱ्या स्वयंसाहाय्यता बचत गटांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शासन आणि वित्तीय संस्थांचा स्वयंसाहाय्यता गट चळवळीविषयीचा दृष्टिकोन सकारात्मक असल्याने आणि स्वयंसेवी संस्थांचा कार्यभाग विधायक असल्याने या दशकात ही चळवळ देशव्यापी नक्कीच बनेल व ग्रामीण भागातील उर्वरित दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या दारिद्र्य निर्मूलनाच्या लढाईत सहभागी होऊन, ग्रामीण विकासासह दारिद्र्य निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य होईल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

### १५.३.२ महाराष्ट्रातील स्वयंसाहाय्यता गट:

महाराष्ट्र हे देशातील पुरोगामी राज्य आहे. प्रचलित अर्थानुसार स्वयंसाहाय्यता गट चळवळीचा प्रसार १९९० च्या दशकात झाला असला तरी १९४७ साली अमरावती जिल्ह्यात काही सासू-सुनांनी एकत्र येऊन बचत गट सुरू केला होता. १९७०च्या दशकात नामवंत समाजशास्त्रज्ञ इलाबेन भट यांनी महिला व सूक्ष्म वित्तपुरवठा या विषयाची मांडणी केली होती. १९८४ साली गडचिरोली जिल्ह्यातील वडसा तालुक्यात काही स्वयंसाहाय्यता गटांची स्थापना करण्यात आली होती.

१९९४ मध्ये आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या साहाय्याने व केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प नमुना म्हणून चार जिल्ह्यांत राबविण्यात आला. या योजनेत महिला विकास योजनेचा समावेश करून ती राबविण्याची जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळावर होती. या कार्यक्रमांतर्गत महिला स्वयंसाहाय्यता गट स्थापनेस सुरूवात झाली. सन १९९९ मध्ये भारत सरकारने स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेची कार्यवाही केल्यावर या चळवळीला महाराष्ट्रात वेग प्राप्त झाला.

**आपली प्रगती तपासा:**

१) स्वयंसाहाय्यता बचत गटाची संकल्पना सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १५.४ स्वयंसाहाय्यता गटाची वैशिष्ट्ये

समान गरजा, समान उद्दिष्टे, समान विचारसरणीचे लोक जेव्हा एकत्र येतात आणि समूहशक्तीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सहजरीत्या समूह शक्तीचे प्रदर्शन करीत सर्वांगीण प्रगती करतात. अशा स्वयंसाहाय्यता बचत गटांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१५.४.१ आर्थिक वैशिष्ट्ये :**

**१) काटकसर वृत्ती :**

स्वयंसाहाय्यता बचत गटातील सदस्य हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. उत्पादनाची पर्यायाने उत्पन्नाची साधने मर्यादित असल्यामुळे दैनंदिन उत्पन्नातून जमेल त्याप्रमाणात काटकसर करून गटांमध्ये पैसे भरत असतात. यातूनच काटकसर वृत्ती जोपासली जाते. हे स्वयंसाहाय्यता गटाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**२) स्वेच्छा सभासदत्व :**

बचत गटात येण्यासाठी कोणावरही जबरदस्ती केली जात नाही. सर्वजण स्वखुषीने सभासदत्व स्वीकारतात. फक्त सहयोगी गरजूला प्रबोधन करीत असतात. सभासदत्व मिळविण्यासाठी तशी कोणत्याही प्रकारची अट नसते.

**३) सभासद संख्या:**

स्वयंसाहाय्यता बचत गटाची सभासद संख्या १० ते २० पर्यंत मर्यादित असते.

**४) लोकशाही तत्त्वांवर कार्य:**

स्वयंसाहाय्यता गटात सर्व आर्थिक कारभार हा लोकशाही तत्त्वाने चालत असतो. सर्वानुमते निर्णय घेतले जातात. प्रत्येकाच्या मताचा आदर केला जातो. लोकशाही मूल्ये जोपासली गेल्यामुळे गट मजबूत होत असतात.

**५) आर्थिक व्यवहार:**

स्वयंसाहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून सर्व सभासद ठरलेल्या वेळी नियमित बचत जमा करतात. बचतीतून पैसा वा पत निर्माण होत असते. त्यातून गरजेनुरूप सभासद कर्जव्यवहार करतात, तर कधी व्यवसाय करतात. सर्व व्यवहार बँकांच्या मदतीने होत असतात. त्यामुळे स्वयंबचत गट हे आर्थिकदृष्ट्या सक्षम बनत आहेत.

**६) अधिकृत नोंदणी:**

स्वयंसाहाय्यता गटांना शासकीय यंत्रणेत सहकार व बँकांप्रमाणे अधिकृत नोंदणी करण्याची गरज नसते. फक्त गटाच्या नावाने बँकेत खाते उघडले जाते. परंतु गटातील सामाजिक, आर्थिक व्यवहारांच्या नोंदी ठेवल्या जातात. त्यामुळे गटांत पारदर्शकता येते.

**७) रोखीचा व्यवहार:**

स्वयंसाहाय्यता बचत गटातील बचत आणि कर्ज हे व्यवहार रोखीने केले जातात. त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता येते. रोखीच्या व्यवहारामुळे सभासदांना व्यवहाराचे ज्ञान प्राप्त होते.

**८) लाभाचे समान वाटप :**

स्वयंसाहाय्यता बचत गटात व्याजरूपात व व्यवसायरूपात नफा प्राप्त होऊन गटास लाभांश प्राप्त होतो. या लाभांश (नफा) रकमेचे वाटप समान पद्धतीने केले जाते. नफ्याचे वाटप करण्याचे बंधन गटांवर असत नाही. सभासदांच्या इच्छेनुसार नफ्याचे वाटप करतात.

**९) नियोजनपूर्वक व्यवहार :**

स्वयंसाहाय्यता बचत गटामध्ये प्रत्येक तपशिलाचे नियोजन केले जाते. नियोजनानुसार गटाचे कामकाज चालते. म्हणून गट नियोजनाचा विविध अंगाने विचार करतो. नियोजनपूर्वक व्यवहार करतो.

**१०) स्वनिर्मित व लवचिक नियमावली :**

स्वयंबचत गटाची स्थापना, दैनंदिन कामकाज इ. संघटिका आणि सहसंघटिका यांना इ. बाबत शासकीय नियमावली नसते. प्रत्येक गटाने आपली नियमावली परिस्थितीनुरूप बनविलेली असते. या नियमावलीत गरजेनुसार लवचिकता आणली जाते. गटाने स्वतः नियमावली तयार केलेली असल्यामुळे त्यात बदल करता येतो. सदर नियमावली अतिशय लवचिक असते.

**११) सहकाराचे प्रशिक्षण :**

स्वयंसाहाय्यता बचत गटात लघु स्वरूपाचा सहकार असतो. सहकाराप्रमाणे व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देण्यात येते. सभासदांना सतत मार्गदर्शन केले जाते. सहकाराच्या शिक्षणामुळे व्यावसायिक वृत्ती विकसित होते. त्यांच्यामध्ये ऐक्याची भावना निर्माण होते. सहकारीवृत्ती वाढीस लागते.

**१२) सहकारांतर्गत सहकार :**

स्वयंसाहाय्यता बचत गटाची चळवळ ही सहकाराप्रमाणे असून एकमेकांस साह्य करणारी संघटना आहे. प्रत्येक गटाचे प्रत्येक गटाला सहकार्य मिळते. तसेच सभासद संख्या मर्यादित असल्यामुळे सभासदांमध्ये सहकार्याची भूमिका असते. गटाचे कामकाज चालविण्यासाठी संघटिका व सहसंघटिका यांना सहकार्य लाभते.

**१३) स्वेच्छा नोंदणी :**

स्वयंसाहाय्यता बचत गटांना सहकारी संस्थांप्रमाणे अधिकृत नोंदणी करावी लागत नाही, फक्त पंचायत समिती किंवा स्वयंसेवी संस्थांना गट स्थापना केल्याची तोंडी नोंद फक्त करावी लागते. सरकारी खात्यामार्फत अधिकृत नोंदणी करण्याची गरज नसते. त्यामुळे गटाची स्थापना कोणालाही करता येते. परंतु स्वयंसाहाय्यता बचत गटांना सूक्ष्म वित्त संस्था म्हणून काम करतांना कंपनी कायद्यानुसार नोंद करावी लागते.

**१४) विधायक स्पर्धेचे शिक्षण :**

जागतिकीकरणामध्ये विघातक स्पर्धा टाळण्यासाठी स्वयंसाहाय्यता बचत गटांचा उगम असून स्पर्धेचे शिक्षण गटांतून मिळते. त्यातून समाजकल्याण होते.

**१५.४.२ सामाजिक वैशिष्ट्ये :**

**१) समानतेचे तत्त्व :**

भारतीय लोकशाहीतील समानता तत्त्वांचे पालन स्वयंसाहाय्यता बचत गटात होते. ही समानता वय, व्यवसाय, वस्ती, वावर, लिंग, भाषा, सुखदु:खे, समस्या इ. बाबत असते. जणूकाही हा लहान पद्धतीचा सहकाराचाच भाग आहे.

**२) समान उद्दिष्टे व गरजा :**

स्वयंसाहाय्यता बचत गटात एकमेकांशी साधर्म्य असणारे लोक एकत्र येत असतात. समान गरजा व समान विचार ह्यामुळे एकत्र येऊन गटाचा विकास होण्यास होते.

**३) स्वरशक्ती व समूहशक्तीची जाणीव :**

स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे गटातील लोक एकत्र येत असल्यामुळे आपल्या गटबळावर त्यांना आपल्या समस्या सोडविता येतात. गटशक्तीचे दर्शन समाजाला होत असताना समूहशक्ती / गटशक्ती प्रबळ बनते.

**४) सामुदायिक निर्णय कृती :**

स्वयंसाहाय्यता बचत गटातील सर्व मंडळी मीटिंगच्या वेळी एकत्र येऊन निर्णय घेत असतात. आणि सामुदायिक निर्णयातून प्रत्यक्ष कृती करण्यावर भर देतात.

**५) एकतेची भावना :**

स्वयंसाहाय्यता गटातील सदस्य / महिला सदस्य हे एकाच गावात राहणाऱ्या असल्यामुळे एकदुसऱ्याबद्दल आदर, आपुलकी, आस्थेची भावना असणाऱ्या असतात. तसेच भावनिक संबंध, परस्पर बांधीलकीची भावना एकमेकांस साहाय्य ह्यामुळे आपोआप सभासदांमध्ये एकतेची भावना वाढीस लागून समाज एकजुटीने राहाण्यास मदत होते.

**६) विश्वासाचे प्रतिक :**

स्वयंसाहाय्यता बचत गट हे एकमेकांच्या विश्वासाने चालणारे, सर्व निर्णय पारदर्शीपणे घेणारे, विश्वासाने व्यवहार करणारे असतात. ह्यामुळे कोणाचीही फसवणूक होत नाही. ह्यामुळे एकमेकांवर सहज विश्वास ठेवला जातो. ह्यामुळे गटात विश्वास वाढीस लागतो. त्यामुळे गट हे जणू विश्वासाचे प्रतीक बनत आहे.

**७) सुरक्षितता :**

स्वयंसाहाय्यता बचत गटातील सभासद अन्यायास प्रतिकार करण्यासाठी एकत्र येतात. त्यामुळे स्त्रीला सुरक्षितता प्राप्त होते. तसेच स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या सभासदाला व व्यवसायाला सुरक्षित कवच असते. उत्पादनाला सुरक्षित बाजारपेठाही मिळू शकतात.

**८) हक्काचे व्यासपीठ :**

स्वयंसाहाय्यता बचत गट हे महिलांना एकत्रित करण्याचे माध्यम असून महिलांच्या कलागुणांना वाव, नेतृत्व, वक्तृत्वास संधी देणारे, विचारांचे प्रबोधन करणारे तसेच समाजाचे सर्वांगीण प्रबोधन करणारे महिलांचे हक्काचे व्यासपीठ आहे.

**९) समाज परिवर्तन प्रक्रियेचे साधन :**

समाजातील बहुतांशी महिलावर्गाचे फार मोठे परिवर्तन बचत गटामुळे होत आहे. सुरवातीस कुटुंबात, गावात, समाजात पर्यायाने देशपातळीवर आज मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे.

**१०) मुक्त अभियान :**

स्वयंसाहाय्यता बचत गट ही अनौपचारिक चळवळ आहे. गटात कोणीही सदस्य होऊ शकतात. घटाची स्थापना, निर्मिती ह्या प्रक्रियेत कोणालाही सहभागी होता येते. नवीन बचत गटाची निर्मिती करताना गटाचे सदस्य परस्परांना व्यक्तिगत पातळीवर मार्गदर्शन करू शकतात.

**१५.४.३ सांस्कृतिक वैशिष्टे :**

स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे भारतीय संस्कृतीचे रक्षण मोठ्या प्रमाणात होत आहे. नवीन विचारांचा स्वीकार होत असला तरी सण, उत्सव, रीतिरिवाज ह्यांचे आवर्जून पालन सामूहिकरीत्या महिला बचत गटांतून केले जाते. ह्यावेळी उत्साहाचे वातावरण बचत गटांत असते. आपला सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य स्वयंबचत गटांमुळे होत आहे.

**१५.४.४ राजकीय वैशिष्ट्ये :**

**१) नेतृत्व :**

स्वयंसाहाय्यता बचत गटाचे संघटिका व सहसंघटिका हे नेतृत्व करतात. शिवाय प्रत्येक सभासदांस गटाचे नेतृत्व करण्याची संधी मिळते. तसेच प्रत्येक जण गटाचे व्यवस्थापन करून नेतृत्व सांभाळतो. प्रत्येकास ही संधी मिळाल्यामुळे नेतृत्व गुणांचा विकास होऊन राजकीय क्षेत्रात स्वतःचे वलय तयार होते.

**२) लोकशाही संघटन :**

स्वयंसाहाय्यता बचत गट हे लोकांनीच लोकांकरिता चालविलेले असतात. त्यामुळे लोकशाही संघटन असते. शिवाय गटांच्या संघटिका, सहसंघटिकांची निवड लोकशाहीप्रमाणे होते. सभासदांच्या मताला फार महत्त्व असते. सभासदांचे भांडवल, धर्म, जात, वर्ण, वंश या घटकांना मुळीच थारा नसतो. गटातील सर्व कारभार व निर्णय, कृती सर्वानुमते केली जाते. प्रत्येक सभासदांच्या मताची कदर केली जाते. त्यामुळे खरी लोकशाही मूल्ये जोपासली जातात.

### ३) लोकशाही मूल्यांची जपणूक :

स्वयंसाहाय्यता बचत गटांमध्ये स्वातंत्र्य,समता, बंधुता, न्याय, सर्वानुमते निर्णय, प्रत्येकाच्या मतांची कदर, धर्मनिरपेक्षता ह्यासारखी लोकशाहीची मूल्ये जोपासली जातात. तसेच बचत गटांमध्ये महिलांची संख्या जास्त असल्यामुळे स्वयंशिस्तीने जबाबदारी आपापले कर्तव्य नीट बजावले जाते.

### ४) दबाव गट:

बचत गटांमध्ये बहुसंख्य बचत गट महिलांचे आहेत. प्रत्येक पाड्यावर, गावात, बचत गटांची निर्मिती होत आहे. दुपारच्या वेळी महिला ह्या रिकाम्या असतात. मर्यादित सभासदांमुळे तोंडी निरोप दिले तरी महिला वेळेत जमा होतात. त्यामुळे समाजातील अपप्रवृत्तींविरूद्ध दाद मागितली जाते. समाजातील ह्या गटांमुळे वा गटांच्या दबावामुळे महिलांवरील अत्याचार कमी होत आहेत.

### ५) राजकीय व धार्मिक तटस्थता :

जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या ह्या युगात अनेक प्रकारच्या समस्या समाजात निर्माण होत आहेत. ह्यातून स्वयंसाहाय्यता बचत गट प्रभावीपणे पुढे जात आहेत. समान संधी, समान लाभ मिळत असल्यामुळे तसेच समाजातील इतर घटकांबरोबर संपर्क वाढल्यामुळे सभासदांना बऱ्यावाईटाची जाण निर्माण झाली आहे. त्यामुळे राजकीय प्रभाव व धार्मिक दडपणांस स्वयंसाहाय्यता बचत गट बळी पडत नाहीत.

अशा विविध प्रकारची वैशिष्ट्ये स्वयंसाहाय्यता बचत गटांची दिसून येतात.

## १५.५ स्वयंसाहाय्यता गटाचे स्वरूप

प्रत्येक व्यक्तीला जेव्हा उत्पन्नापेक्षा अधिक खर्च असतो त्यावेळी (ऋण) कर्जाची गरज भासत असते. गरज भागविण्यासाठी असंस्थात्मक किंवा संस्थात्मक स्त्रोतांकडे व्यक्तीला जावे लागते. परंतु अत्यंत गरीब लोकांसाठी संस्थात्मक स्त्रोत फारसे कार्य करताना दिसत नाहीत. गरीब लोकांकडे उत्पन्नाची साधने तुटपुंजी असतात. त्यामुळे तारणही कमी पर्यायाने कर्ज मिळण्याचे मार्ग दुर्मिळ होत असतात. अशा वेळी सावकार, जमीनदार, श्रीमंत शेतकरी यां सारख्या असंस्थात्मक स्त्रोतांकडून कर्ज मिळविले जाते. सावकारी पाशातून मुक्तता मिळावी म्हणून सहकार क्षेत्राची जोमाने सुरूवात झाली. परंतु १०० वर्षांनंतर ह्या चळवळीला उतरती कळा लागली. राजकारण, भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई ह्यामुळे सहकार चळवळ बदनाम झाली. ह्याचा सुवर्णमध्य म्हणून स्वयंसाहाय्यता गट चळवळ जोमाने फोफावत आहे.

## १५.६ स्वयंसाहाय्यता गटाचे प्रकार

स्वयंसाहाय्यता बचत गट हे गरजू गरीब कुटुंबातील ग्रामीण भागातील व्यक्तींनी एकत्र येऊन स्थापन केलेले असतात. गट स्थापनेमध्ये प्रेरकाची भूमिका महत्त्वाची असते. गटाची निर्मिती कोणत्या उद्देशाने झाली आहे. त्यानुसार गटांचे पुढीलप्रमाणे प्रकार पडतात.

**१) पुरुष स्वयंसाहाय्यता बचत गट :**

ज्या स्वयंसाहाय्यता समूहामध्ये सर्वच्या सर्व पुरूष सदस्य असतात, त्यांस पुरूष स्वयंसाहाय्यता गट म्हणतात.

**२)महिला स्वयंसाहाय्यता बचत गट :**

ह्यामध्ये फक्त महिला सभासद असून महिलांद्वारे व्यवस्थापन केले जाते. त्यास महिला स्वयंसाहाय्यता गट म्हणतात. प्राप्त परिस्थितीत महिला स्वयंसाहाय्यता बचत गटांची संस्था जास्त आहे.

**३) मिश्र स्वयंसाहाय्यता बचत गट :**

ह्या गटामध्ये स्त्री व पुरूष हे दोघेही सभासद असतात त्यांना मिश्र स्वयंसाहाय्यता बचत गट असे म्हणतात.

**४) स्वर्णजयंती स्वयंरोजगारांर्गत स्वयंसाहाय्यता बचत गट:**

ज्या स्वयंसाहाय्यता बचत गटातील सदस्य दारिद्र्यरेषेखालील असतात त्यांना स्वर्णजयंती स्वयंरोजगार स्वयंसाहाय्यता बचत गट असे म्हणतात. या योजनेनुसार तयार होणाऱ्या गटांना अनुदान स्वरूपात लाभ मिळत असतो.

**५) बचत गट :**

आपल्या खर्चातील काटकसरीद्वारे बचत करून त्याद्वारे सभासदांना गरजेनुसार कर्ज रूपाने पैसे देणे, कर्जाची परतफेड करणे, व्यवसाय करणे, वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारणी करणे, विमा उत्पादनासाठी वैयक्तिक व सामूहिक उद्योग निर्माण करणे, सर्व सदस्य आत्मनिर्भर बनवणे अशा समूहास बचत गट म्हणतात. हा प्रकार सर्वव्यापक असून या गटांचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे.

## १५.७ स्वयंसाहाय्यता गटाची कार्ये

इच्छाशक्ती, आत्मविश्वास, चिकाटी, प्रयत्न, महत्त्वाकांक्षा यांच्या बळावर माणूस कुठलेही अवघड ध्येय गाठू शकतो. ह्या गुणांच्या बळावर काही महिला बचत गटाच्या माध्यमातून यशस्वी होत आहेत. स्वयंसाहाय्यता बचत गटाची चळवळ ग्रामीण भागाबरोबर दुर्गम अशा आदिवासी भागातही मोठ्या जोमाने वाढत आहे. अशा ह्या स्वयंसाहाय्यता गटाची थोडक्यात कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ. स्वविकासाबाबतचे कार्य :**

**१) आर्थिक स्वावलंबन :**

इच्छाशक्ती, आत्मविश्वास, चिकाटी, प्रयत्न ह्यांच्या जोरावर महिला काम करून आपला उद्योग व्यवसाय वाढविताना दिसत आहेत. महिला उद्योजक बनण्यास मदत होत आहे. गटातून

व्यवसाय प्रशिक्षण कर्ज मिळत असल्यामुळे आर्थिक स्वावलंबनाबाबतचे महत्त्वाचे कार्य कुटुंबासाठी करताना दिसत आहेत.

**२) शिक्षण :**

व्यक्ती परिवर्तनाचे मुख्य साधन शिक्षण आहे. शिक्षणामुळे साक्षरता वाढून जीवनमान उंचावते. सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे आर्थिक स्थितीत बदल घडून आल्यामुळे कुटुंबातील बालकांना शिक्षणाची संधी मिळू लागली आहे. विशेषतः कुटुंबातील मुलींना शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे. स्वयंबचत गटांच्या माध्यमातून शिक्षणाबाबतही मोठ्या प्रमाणात प्रबोधन होत आहे.

**३) आरोग्य :**

स्वयंसाहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून आरोग्याबाबत प्रबोधन करण्यात येते. तसेच शिबिराचे आयोजन, गावस्वच्छता मोहीम ह्यासारख्या कार्यक्रमातून स्वच्छता, आरोग्यविषयक जागृतीचे शिक्षणही मिळत आहे. महिला सुदृढ आरोग्यामुळे व्यक्तीविकासाबरोबर देश विकास होतो.

**४) कल्याण :**

गटामार्फत रोजगार निर्मिती झाल्यामुळे समाजात महिलांची मान उंचावत आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय कल्याण होत असल्यामुळे महिलांचे सबलीकरण होत असताना दिसते.

**५) कार्यसहभाग :**

गटामार्फत सभा आयोजित केल्या जातात. जबाबदाऱ्यांचे वाटप केले जाते. विविध उपक्रम आयोजित केले जातात. ह्यातून महिलांचे सबलीकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर होत आहे.

**६) घरगुती ताण-तणाव मुक्ती:**

महिलांच्या हाती पैसा आल्यामुळे कौटुंबिक अर्थार्जनास मदत होत आहे. त्यामुळे कुटुंबामध्ये स्त्रियांच्या मताचा आदर केला जात आहे. चर्चेतून प्रसन्न वातावरण निर्माण झाल्यामुळे ताण-तणाव कमी होऊन खेळीमेळीचे वातावरण निर्माण होत आहे. पुरूषांचा जाचही कमी होताना दिसत आहे. यासाठी स्वयंसाहाय्यता बचत गट उपयुक्त ठरत आहे.

**७) आत्मसन्मान संवर्धन:**

स्वयंसाहाय्यता बचत गटांमुळे महिलांची आर्थिक स्थिती पर्यायाने कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. ह्यामुळे आत्मसन्मान जागृत होऊन संवर्धन होण्यास मदत झाली आहे.

नशिबालाही संधीची गरज असते. अशी संधी आज स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. या संधीचा योग्य वेळी लाभ उठविणाऱ्यांच्या स्थितीत नक्कीच बदल होत असताना दिसत आहे.

**ब. स्वयंसाहाय्यता गटाचे समाजप्रतीचे कार्य :**

**१) कर्तव्याची जाणीव :**

स्त्री समाजात अनेक भूमिका पार पाडत असते. कन्या, पत्नी, आई या भूमिकेतून जात असताना स्वतःवर अन्याय न करता कौटुंबिक व सामाजिक कर्तव्य पार पाडता येण्यासाठी स्वयंसाहाय्यता गटात समाविष्ट झाल्याने अजूनही अनेक पैलू दिसून येण्यास मदत होते.

**२) हक्कांची जाणीव :**

प्रत्येक महिलेला आपल्या हक्काची जाणीव होणे गरजेचे आहे. समानता, शिक्षण, रोजगार, संपत्ती, मतस्वातंत्र्य, आरोग्य इ. बाबतीत हक्काची जाणीव झाली पाहिजे. पालनपोषणाचा हक्क तसेच वडिलांच्या संपत्तीत समान वाटा ह्या सर्वांची जाणीव निर्माण करण्यासाठी स्वयंसाहाय्यता गटांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे.

**३)अधिकाराची जाणीव :**

प्रत्येक स्त्रीला स्वतःच्या अधिकाराची जाणीव होणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय ह्या अधिकाराची जाणीव होत असताना लग्नाचे वय, संतती नियमन, आरोग्य सांभाळणे, त्यासाठी पैसा खर्च करणे, विश्रांती घेणे ह्यासारख्या अधिकाराची जाणीव होणे अगत्याचे आहे. त्यासाठी संघटित होऊन कृती होणे अगत्याचे आहे. स्वयंसाहाय्यता गटाच्या माध्यमातून तळागाळातील स्त्रियांसाठी फार मोठे कार्य होत आहे.

**४) सामाजिक नीतिमूल्यांची जाणीव :**

महिलांना सामाजिक नीतिमूल्यांची जोपासना करण्याची जाणीव लहानपणापासून करून दिली जाते. परंतु पुरूषांनीही नीतिमूल्यांची बंधने पाळल्यास महिलांवरील अन्याय मोठ्या प्रमाणात दूर होऊन समाजात स्त्रियांना समान दर्जा प्राप्त होऊ शकतो. समाजात मूल्यांची जोपासना स्वयंबचत गटांमार्फत आज होताना दिसते.

**५) समानतेची जाणीव :**

स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक साधने प्राप्त होतात. त्यामुळे लिंगभेद न करता महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत पुरूषांबरोबर समान हक्क कुटुंबात व समाजात प्राप्त होताना दिसत आहेत.

**६) कायद्याची जाणीव :**

स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येत असल्यामुळे त्यांना सभेच्या वेळी मुलीच्या लग्नाचे वय १८ वर्षे, वडिलोपार्जित संपत्तीत हक्क, हुंडाबंदी, पोटगीचा दावा, अपहरण, व्यभिचारी कृत्य, अवैध दुसरी पत्नी या संदर्भातील कायद्यांविषयी माहिती देता येते. ह्यासाठी कार्य करताना नेतृत्व व धैर्य लागते यासंदर्भात बचत गटांमार्फत फार मोठे कार्य होताना दिसत आहे.

**७) नेतृत्वविकास :**

स्वयंसाहाय्यता बचत गटांमध्ये विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. स्वप्रयत्नाने विकासात्मक अनुकूल परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांमध्ये असलेली कौशल्य पणाला लागतात. यातूनच नेतृत्व गुणांचा विकास होण्यास मदत होते. यामध्ये संभाषण, माहिती मिळविण्याचे कौशल्य, लिखाणाचे कौशल्य, आयोजन, नियोजन, कार्याचे व्यवस्थापन, निर्णयक्षमतेचा विकास स्वयंसाहाय्यता बचत गटांमुळे वाढीस लागत आहे.

**८) समूह शक्तीचा विकास :**

समूह शक्तीचा विकास होत असताना महिलांमध्ये जवळीकता निर्माण होते. ह्यातूनच दबाव गट निर्माण झाल्याचे दिसतात. ह्या दबाव गटांमार्फत गावात अन्याय योग्य बाबींवर दबाव आणला जातो. पुढे ह्याचा योग्य वापर शासन व प्रशासनाविरूद्धच्या कार्यातही होऊ शकतो. स्वयंसाहाय्यता बचत गटांच्या मार्फत समूह शक्तीचा विकास होण्याच्या कार्यात मदत होत आहे.

**क. शिक्षणविषयक कार्य :**

स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे महिलांमध्ये शिक्षणाबाबत जागृतता निर्माण होत आहे. गट आता सामाजिक व आर्थिक क्षेत्राबरोबरच शिक्षणाच्या क्षेत्रातही आपली चळवळ व्यापक करीत आहेत. समाजातील अल्पशिक्षित व अशिक्षित महिलांना शिक्षणाच्या वाटेवर आणून सामाजिक जबाबदारी आणखी भक्कम करण्यात बचत गटही हातभार लावीत आहे. कुटुंबातील मुलांबरोबर मुलींनाही शिक्षणाची संधी मिळत आहे. मुलींच्या शिक्षणाबाबतच्या दृष्टिकोनात बदल होत आहे. ह्यामध्ये स्वयंसाहाय्यता गटांचे कार्य स्तुत्य आहे.

**ड. पर्यावरणविषयी कार्य :**

स्वयंसाहाय्यता बचत गटांमार्फत पर्यावरण जागृतीबाबत अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून अगोदर स्वतःचे, नंतर कुटुंबाचे व्यक्तिमत्त्व बदललेल्या शेकडो महिला आपल्या आसपास असतील. गटाच्या माध्यमातून मोठी झेप घेतलेल्या आणि खऱ्या अर्थाने क्रांती घडवलेल्या अनेक महिलांच्या यशोगाथाही वेळोवेळी समोर येत असतात. गेल्या काही वर्षांत बचतगट हे खऱ्या अर्थाने महिला सबलीकरणाचे एक सशक्त आणि अत्यंत प्रभावी माध्यम ठरले आहे.

## १५.८ सारांश

सारांशाने असे सांगता येईल की, स्वयंसाहाय्यता बचत गटात चारचौघींना भेटून, वेगवेगळ्या विषयांवर बोलून थोडा वेळ कुटुंबाशिवाय अन्य विचार केल्यामुळे विकासाची कवाडे खुली होतात. वेगवेगळ्या निमित्ताने सामाजिक संस्था, बँकर्स, सरकार यांच्याशी महिलांचा संपर्क येतो. सभेच्या निमित्ताने विविध बचत गटांच्या महिलांशी बोलता येते. या सगळ्यामुळे विकासाची एक एक पायरी चढून विकासाचं स्वप्न दृष्टि पथात येतं. स्वयंसाहाय्यता बचत गट या प्लॅटफॉर्ममुळे एकाच दिशेने विविध पैलू पाडत पुढे नेणं शक्य झालं आहे शिवाय, एकीचं तत्त्व सर्वश्रुत आहे. राजकीय पक्षांनाही या चळवळीची दखल घ्यावी असं वाटू लागलंय. त्यामुळे विकासाच्या या चक्रामध्ये आणखी एक घटक सामावून जाऊ शकेल.

ग्रामीण पातळीवरच्या अगदी छोट्या स्तरावरच्या बायकांचे /स्त्रियांचे एका वेगळ्या प्रकारात अस्तित्व निर्माण झाले आहे आणि अजूनही होतंय. न जाणो निवडणुकीत त्यांचा पुढे राखीव गटही निर्माण होईल. या चळवळीचा वेग थोडा कमी वाटला तरी ही चळवळ एका निश्चित दिशेने सुरू आहे. ज्या सामाजिक गटांतल्या लोकांसाठी ही चळवळ सुरू आहे. त्या दृष्टीने हा वेग इतका असणे साहजिक आहे. यामध्येही काही धोके, अडचणी असतील, पण त्यांच्या तुलनेने चांगल्या बाजू असल्याचे दिसते. यापुढे जाऊन भविष्यात यातून सहकाराची पुन्हा एकदा नवीन चळवळ उभी राहून सावकारी समूह नष्ट झालेली दिसून येईल. आजच्या जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या युगातही ह्या चळवळीमुळे सूक्ष्मस्तरावर, गावपातळीवर असलेली ही चळवळ नक्कीच महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडण्यास मदत होईल, अशी आशा आहे. बलशाली भारत बनविण्याकरिता अल्पबचत नियोजन हे तत्त्वज्ञान नक्कीच उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

## १५.१० स्वाध्याय

१. स्वयंसाहाय्यता गटाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२. स्वयंसाहाय्यता गटांची विविध वैशिष्ट्ये सांगा.

३. स्वयंसाहाय्यता गटाचे स्वरूप सांगा.

४. स्वयंसाहाय्यता गटाची कार्ये सांगा.

♦ ♦ ♦

# १६

# स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

**पाठाची रचना**

१६.० उद्दिष्टे

१६.१ प्रास्ताविक

१६.२ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSY)

१६.३ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे स्वरूप व व्याप्ती.

१६.४ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेची ठळक वैशिष्ट्ये.

१६.५ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेची अंमलबजावणी, रचना व कार्ये.

१६.६ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार कार्यक्रमाची यंत्रणा.

१६.७ उत्पादित वस्तूंसाठी विक्री व्यवस्था.

१६.८ सारांश

१६.९ स्वाध्याय

## १६.० उद्दिष्टे

१) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेची माहिती करून देणे.

२) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेच्या वैशिष्ट्यांची ओळख करून देणे.

३) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे स्वरूप समजावून देणे.

४) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे महत्त्व अभ्यासणे.

## १६.१ प्रास्ताविक

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना ही देशभरातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी आणि गाव-तालुका पातळीवर स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी योजना आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये दारिद्र्य या घटकाचा फार मोठा अडसर असल्यामुळे केंद्र शासनाच्या २० कलमी कार्यक्रमांतर्गत प्रथम प्राधान्य असलेली स्वर्णजयंती

ग्राम स्वयंरोजगार योजना हा आपल्या महाराष्ट्र राज्यामधील दारिद्र्य निर्मूलन व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याकरिता सन १९९९ पासून सुरू करण्यात आलेला महत्त्वाकांक्षी असा कार्यक्रम आहे. याची अंमलबजावणी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना एकत्र आणून बचत गटाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या कर्ज व अनुदानातून ग्रामीण भागात उद्योग व व्यवसाय सुरू करून रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. या महत्त्वाकांक्षी परंतु नियोजनबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे ही सर्वांची जबाबदारी व ध्येय असावे असे आवर्जून सांगावेसे वाटते. पंचायत राज व्यवस्थेअंतर्गत सत्तेचे विकेंद्रीकरण करून शासनाने ग्रामीण भागाच्या विकासाचा पाया अतिशय भक्कम करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी शासनाच्या बऱ्याच योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदांमार्फत काही राज्य, तर काही केंद्र शासनाच्या पुरस्कृत योजना राबविण्यात येतात. यामध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचा समावेश आहे. ह्याअंतर्गत बचतगटांच्या माध्यमातून शासनाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे. ग्रामविकासाच्या विविध योजना राबवीत असताना स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील किमान एका व्यक्तीचा समावेश ह्यामध्ये असावा असा मनोदय आहे, की ज्याद्वारे मोठ्या प्रमाणात दारिद्र्यरेषेखालची लोकसंख्या कमी होऊन अधिकाधिक लोक/जनता दारिद्र्यरेषेच्या वरती येतील.

## १६.२ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSY)

स्वयंसाहाय्यता गट चळवळीचा पाया १९९९ साली भारत सरकारने कार्यान्वित केलेली स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आहे. ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनाचा हा कार्यक्रम १९८० ते १९९९ या कालखंडात कार्यान्वित असलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची (IRDP) सुधारित आवृत्ती आहे. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या कुटुंब विकासाला अग्रक्रम देण्यात आला होता. अशा व्यक्ती वा कुटुंबांना आर्थिक अनुदान व सवलतीच्या दराने वित्तपुरवठा केला जात असे. या कार्यक्रमाच्या मर्यादा स्पष्ट झाल्यानंतर स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार कार्यक्रमात व्यक्ती किंवा कुटुंबाला आर्थिक अनुदान देण्याऐवजी दारिद्र्यरेषेखालील स्वयंसाहाय्यता गटांना अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या साधन-संपत्तीच्या आधारे व्यवसायांची यादी तयार करण्यात आली आहे. स्वयंसाहाय्यता गटाने त्यातील विशिष्ट व्यवसायाची निवड करणे आणि त्याद्वारे आपल्या उत्पन्नात भर घालणे अपेक्षित आहे. दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या आर्थिक विकासास प्राधान्य देण्यात आले आहे. म्हणजेच अधिकाधिक संख्येने महिलांचे स्वयंसाहाय्यता गट स्थापन करण्यास प्रोत्साहन देणारा हा दारिद्र्य निर्मूलनाचा राष्ट्रीय कार्यक्रम १ एप्रिल १९९९ रोजी कार्यान्वित झाला.

### १६.२.१ कार्यक्रमातील तरतुदी :

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार कार्यक्रमाच्या (SGSY) च्या कायमस्वरूपी तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

१) बचतगट स्थापना व प्रोत्साहन.

२) बचतगटांमार्फत उद्योग उभारण्यासाठी मार्गदर्शन आणि उद्योग उभारणीसाठी ७ दिवसांचे प्रशिक्षण.

३) बचतगटांच्या दैनंदिन कामकाजासाठी पंचायत समिती अधिकाऱ्यांमार्फत मार्गदर्शन, तसेच स्वयंसेवी संस्थांची नियुक्ती.

४) राष्ट्रीयीकृत व जिल्हा मध्यवर्ती बँकांमार्फत अनुदान व खेळते भांडवल आणि व्यावसायिक कर्जाची तरतूद.

५) बचतगटांचे मूल्यांकन करणे.

६) बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंना विपणन मदत करून प्रदर्शन व स्टॉल्ससाठी खर्च करणे.

७) उद्योगांना मशीनरी सुविधा देणे.

८) बचतगटांना संस्कारण मूल्यवाद व आवेष्टन करणे.

९) विमा संरक्षण प्राप्त करून देणे.

१०) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना आर्थिक लाभ मिळवून त्यांना सबल करणे.

**१६.२.२ स्वर्णजयंती योजनेंतर्गत बचत गटांसाठी आवश्यक बाबी :**

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत असणाऱ्या बचत गटांसाठी पुढील बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे.

१) बचत गटांमध्ये कमीत कमी १० ते २० सदस्य असावेत.

२) या योजनेंतर्गत स्थापन करावयाच्या बचत गटांमध्ये शक्यतो सर्व सदस्य दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील असणे गरजेचे आहे. अपवादात्मक परिस्थितीत २०% किंवा जास्तीत जास्त ३०% दारिद्र्यरेषेबाहेरील घेता येतील.

३) बचत गटांचे खाते ते गाव ज्या बँकेकडे दत्तक आहे त्या बँकेत उघडणे आवश्यक आहे.

४) स्थापन करावयाचे बचत गट ५०% अनुसूचित जाती-जमातींच्या सदस्यांचे तसेच ४०% महिला सदस्यांचे असावेत.

५) बचत गटांचे खाते अध्यक्ष, सचिव यांच्या संयुक्त नावाने उघडणे आवश्यक आहे.

६) बचत गटाने दरमहा ठरलेली (रक्कम) बचत बँकेत जमा करणे आवश्यक आहे.

७) बचत गटाच्या १ महिन्यात दोन सभा होणे आवश्यक आहे.

८) गटाने स्वत :ची नियमावली तयार करणे आवश्यक आहे.

९) गटाने पुढीलप्रमाणे वहीखाते ठेवणे गरजेचे आहे – सभासद प्रवेश अर्ज, जमा-खर्च नोंदवही, सदस्यांचे पासबुक, ठराव नोंदवही, सदस्यांचे पासबुक ठराव नोंदवही, उपस्थिती नोंदवही, अभिप्राय नोंदवही, सदस्यांचे राजीनामे अर्ज, कर्ज मागणी अर्ज, मंजुरी पत्र.

१०) गटांमध्ये जमा असलेल्या बचतीमधून अल्प व्याजदराने गटातील सदस्यांना आंतरिक कर्ज पुरवठा करता येईल. गटाबाहेरील व्यक्तीला कर्ज देता येणार नाही.

११) गटाने सामाजिक कार्यात सहभागी होणे आवश्यक आहे. जसे ग्रामीण स्वच्छता, लसीकरण, वृक्ष लागवड इत्यादी.

१२) गटाचे सहा महिन्यांनंतर मूल्यांकन / प्रथम प्रतवारी करण्यात येईल. ही प्रतवारी बँक शाखा अधिकारी, स्वयंसेवी संस्था गट विकास अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्याकडून करण्यात येईल.

१३) प्रथम प्रतवारीमध्ये बचत गट जमा पात्र ठरल्यानंतर व बँकेने शिफारस केल्यानंतर बचत गटाला बचतीएवढे किंवा कमीत कमी रू. ५०००/- खेळते भांडवल यंत्रणेकडून उपलब्ध करून देण्यात येते.

१४) खेळते भांडवल बँकेला जमा झाल्यानंतर खेळते भांडवलाच्या दुप्पट बँक गटाला कर्ज मंजूर करेल.

१५) गटाला खेळते भांडवलाच्या दुप्पट मंजूर कर्ज, अधिक खेळते भांडवल अशी एकूण रकमेची पतमर्यादा बँक गटाला मंजूर करेल.

१६) बचत गटाने मंजूर पतमर्यादेमधून ग्रामीण भागामध्ये लहान-लहान उद्योग व्यवसाय करून त्यांचे उत्पन्न वाढविणे, तसेच या पतमर्यादेमधून सदस्यांना कौटुंबिक गरजेसाठी किंवा किरकोळ व्यवसायासाठी आंतरिक कर्जपुरवठा करता येईल.

१७) पतमर्यादेच्या खात्यांतून घेतलेले कर्ज बचत गटाने नियमित भरणे व आवश्यकतेनुसार पुन्हा काढणे आवश्यक आहे.

१८) प्रथम प्रतवारीनंतर व पतमर्यादा मंजूर झाल्यानंतर त्या पतमर्यादेचा / कर्जाचा योग्य विनियोग पुढील सहा महिने बचत गटाने केल्यानंतर गटाची पुन्हा द्वितीय प्रतवारी करण्यात येईल.

१९) द्वितीय प्रतवारीमध्ये पात्र व सक्षम बचत गटांनाच उद्योग व्यवसायासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बँक गट विकास अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार कर्ज मंजूर करण्यात येईल.

## १६.३ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे स्वरूप व व्याप्ती

आपला भारत देश लोकशाही प्रधान, लोककल्याणकारी राष्ट्र आहे. तथापि वाढती लोकसंख्या, नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, आतंकवाद, नक्षलवाद, कुपोषण, निरक्षरता, बेरोजगारी इत्यादी विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्या निर्मूलनासाठी केंद्र सरकार व राज्य शासनाकडून विविध लोककल्याणाच्या योजना राबविल्या जातात.

या योजना राबविताना शासनाने स्वयंरोजगार कार्यक्रमाला महत्त्व दिले असून स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगारींना लहान लहान उद्योग व्यवसायासाठी कर्ज व अनुदान देऊन ग्रामीण भागामध्ये स्वयंरोजगार निर्माण करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेला केंद्राकडून ७५% व राज्य शासनाकडून २५% निधी पुरविण्यात येतो. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील गरीब जनतेच्या क्षमतेवर आधारित उद्योग सुरू करणे व त्यामुळे स्वयंरोजगारी निर्माण करून, या योजनेचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांना तीन वर्षांत दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, तसेच दरमहा २०००रु. उत्पन्न मिळावे असे ध्येय ठरवले आहे. या योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेतील व्यक्तींना विशेषत : महिलांना एकत्रित करून व स्वयंसाहाय्यता गट स्थापन करून उद्योग निर्मितीस कर्ज, बाजारपेठा मिळवून स्वयंरोजगार निर्माण केला जातो. या योजनेनुसार ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसायाची निवड करून बँकांमार्फत वित्तसाहाय्य दिले जाते. व्यवसायासाठीच्या एकूण निधीच्या ७५% निधी प्रकल्पांवर, २५% निधी इतर सुविधांवर खर्च केला जातो. या योजनेंतर्गत ७दिवसांच्या प्रशिक्षणानंतर बँका कर्ज वितरण करतात.

स्वयंरोजगारी निवडताना ग्रामसभेची मान्यता घेण्याचे बंधन आहे. यासाठी त्रिस्तरीय समिती आहे. यामध्ये सरपंच, बँक शाखाधिकारी, गटविकास अधिकारी यांचा समावेश असतो. एखाद्या गावात दारिद्र्यरेषेखालील गटांची संख्या नसेल, तर बिगर दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना गटात घेता येते. परंतु त्यांना यामध्ये गटाचे कोणतेही पदाधिकारी राहता येत नाही आणि त्यांना अनुदान प्राप्त होत नाही.

दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना राबविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची देखील आहे. ही योजना गावात प्रभावीपणे राबविल्यास गावांमध्ये जास्तीत जास्त बचत गट स्थापन होऊन त्याचा खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण सहभाग मिळू शकतो.

१) स्वयंसाहाय्यता बचत गट गावातील ग्रामसभेच्या बैठकीला उपस्थित राहून गावाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.

२) स्वयंसाहाय्यता बचत गट गावातील सार्वजनिक साफसफाई, लसीकरण, जनजागृती, शिक्षण, वनराई बंधारे यासारख्या सामाजिक उपक्रमात भाग घेऊन ग्रामपंचायतीला विकास कामात मदत करू शकतात.

३) स्वयंसाहाय्यता बचत गटाने सुरू केलेल्या उद्योग व्यवसायामुळे गावांतील इतर मजुरांना रोजगार मिळू शकतो.

४) ग्रामपंचायतीचा कर वसूलीसाठी स्वयंसाहाय्यता बचत गटातील सदस्यांमध्ये तसेच गावकऱ्यांमध्ये जनजागृती करून बचत गट कर वसुलीसाठी मदत करू शकतात.

५) स्वयंसाहाय्यता बचत गटांमुळे सामाजिक एकोपा गावांमध्ये तयार होतो.

### १६.३.१ या योजनेचा लाभ कोण घेऊ शकतो ?

१) ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे या योजनेच्या केंद्रस्थानी आहेत.

२) प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात येते. अशा कुटुंबाच्या यादीला ग्रामसभेद्वारे मान्यता देण्यात येते.

३) या योजनेंतर्गत किमान ५०% अनुसूचित जाती / जमातींच्या ४०% महिला व ३% अपंग स्वयंरोजगारींना लाभ देणे बंधनकारक आहे.

**१६.३.२ गटांचे वित्तपोषण :**

१. गटांना अनुदान - ६०%

२. खेळते भांडवल - १०%

३. प्रशिक्षण - १०%

४. मूलभूत सुविधा - २०%

**१६.३.३ देय अनुदान :**

१) अनुसूचित जाती-जमातीतील स्वयंरोजगारीला प्रकल्प खर्चाच्या मंजूर कर्जाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रूपये १०,०००/-

२) सर्वसाधारण वैयक्तिक स्वयंरोजगारीला प्रकल्प खर्चाच्या मंजूर कर्जाच्या ३०% किंवा जास्तीत जास्त रूपये ७,५००/-

३) स्वयंसाहाय्यता बचत गटासाठी प्रकल्प खर्चाच्या, मंजूर कर्जाच्या ५०% किंवा प्रती स्वयंरोजगारी रूपये १०,०००/- प्रमाणे किंवा जास्तीत जास्त रूपये १,२५,०००/- सिंचनाच्या व्यवसायासाठी मात्र वरीलप्रमाणे अनुदानाची आर्थिक मर्यादा नाही.

## १६.४ या कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये

**१) निधी उपलब्धता :**

या स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेस केंद्र शासन ७५% राज्य शासन २५% प्रमाणे निधी देतात.

**२) अनुदान मर्यादा :**

दारिद्र्यरेषेखालील गटांना अनुदान मर्यादा लागू आहे. अनुसूचित जाती/जमातींच्या प्रकल्प खर्चाच्या ५०% जास्तीत जास्त रू. १०,०००/- इतर स्वप्रकल्पासाठी प्रकल्प खर्चाच्या ३०% व जास्तीत जास्त रू. ७,५००/-

**३) मुख्य व्यवसाय निवड :**

गाव, तालुका पातळीवर उपलब्ध साधनसंपत्ती, बाजारपेठ यानुसार व्यवसाय निवडतात.

**४) स्वयंरोजगार निवड निकष :**

यामध्ये अनुसूचित जाती/जमाती ५०%, महिला ४०%, अपंग ३% यानुसार निवडतात.

**५) स्वयंसाहाय्यता गट स्थापना व खेळते भांडवल :**

दारिद्र्यरेषेखालील १०ते २० महिला येऊन गट स्थापन करतात. गटाने अखंड ६ महिने बचत केल्यास २५,०००/- रू. खेळते भांडवल दिले जाते. त्यात १५,००० कर्जफेड, १०,०००रू. अनुदान असते.

**६) कर्जाचे प्रारूप :**

या योजनेंतर्गत कर्ज हे माध्यम मुदतीचे असते. त्यासाठी बँकांकडून बचत गटांना कर्ज दिले जाते. खेळते भांडवल परतफेड केल्यानंतर गटांचे मुल्यांकन करून हे कर्जवितरण करतात.

**७) बाजारपेठ :**

स्वयंरोजगार निर्मिती केलेल्या वस्तूंसाठी स्थानिक बाजारपेठांवर भर देऊन प्रदर्शन आयोजित केली जातात. स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते.

**८) प्रशिक्षण व तंत्रज्ञान :**

या योजनेंतर्गत व्यवसायासाठी २ ते ७ दिवसांचे प्रशिक्षण देऊन कौशल्यवृद्धी वाढीस लागते. तसेच तंत्रज्ञान व्यवस्थापनावर भर देण्यात आला आहे.

**९) स्वयंसेवी संस्था :**

या योजनेंतर्गत स्वयंसाहाय्यता गटाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संस्थांना सामावून घेतले आहे. या संस्था गटांची स्थापना, बचत मार्गदर्शन, गटांचे सक्षमीकरण याबाबत मार्गदर्शन करतात.

**१६.४.१ २००८-०९ आर्थिक वर्षासाठी बचत गटांसाठी तरतूद :**

१) गटसमन्वय व बळकटीकरणांसाठी गाव ते जिल्हास्तरांवर सेवासंघासाठी १० कोटी रूपये.

२) नियमित कर्जफेड करणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या गटाला ४% दराने कर्ज, ४% वरचं कर्ज भरणार आणि कर्जफेडीनंतर बचत गटांना अनुदानासाठी १०कोटी रूपये.

३) महालक्ष्मी सरस ह्या प्रदर्शनासाठी ५० लाखांची मदत.

गटांसाठी वरीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

**१६.४.२ सरकारची आकडेवारी :**

१) राज्यातील एकूण गट – १ लाख ८६हजार ६३७

२) पैकी महिला गट – १ लाख ४७ हजार ४१७

३) आर्थिक उपक्रम सुरू असलेले गट – ४३ हजार ५५७

४) गटांना आतापर्यंत सरकारने दिलेले अनुदान – ७१० कोटी

५) गटांना बँकांनी दिलेली कर्ज - १२६७ कोटी.

(आकडेवारी उपलब्ध – महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांचे संयुक्त आयोजन महालक्ष्मी सरस दि. २१ जाने. ते २ फेब्रु. २०१० स्मरणिका)

## १६.५ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेची अंमलबजावणी

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असलेल्या निरनिराळ्या अभिकरणांमध्ये हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निकट समन्वय असणे फारच महत्त्वाचे आहे. सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या संबंधित भूमिकेची जाणीव ठेवत हा कार्यक्रम एक संयुक्त कार्यक्रम आहे असे मानणे गरजेचे आहे. समन्वय सुनिश्चित करण्यासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे सहभाग आहे.

**१६.५.१ गावपातळी :**

सरपंच व ग्रामसेवक हे या योजनेत पुढीलप्रमाणे भूमिका बजावू शकतात.

१) गावातील जास्तीत जास्त महिला व अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांपर्यंत स्वयंरोजगाराचे महत्त्व पोहोचवणे.

२) गावातील बचत गटांना वारंवार भेटी देऊन त्यांना मार्गदर्शन करणे, अडचणी सोडवण्यात मदत करणे.

३) चांगल्या बाजारपेठांचा शोध घेऊन गटांना त्याची माहिती देणे.

४) बँकेचे अधिकारी, गटविकास अधिकारी, प्रकल्प संचालक व इतर यंत्रणा यांच्याशी सतत संपर्क ठेवणे, स्वयंरोजगारांना या घटकांशी संपर्क साधणे अवघड जात असेल तर स्वत : पुढाकार घेणे.

५) स्वयंसाहाय्यता गटाच्या सदस्यांना, ग्रामस्वच्छता अभियान व इतर शासकीय कार्यक्रम, योजना यात सहभागी करून घेणे, त्यांच्या कौशल्याचा आणि गटांद्वारे निर्माण होणाऱ्या व्यासपीठांच्या गावाच्या विकासासाठी खुबीने उपयोग करून घेणे.

६) योजनेची यशस्विता ही बँक कर्जाच्या परतफेडीवर अवलंबून आहे. म्हणून कर्जाच्या वसुलीसाठी ग्रामपंचायतीद्वारे बँकांना सहकार्य देणे.

**१६.५.२ तालुका पातळी :**

प्रत्येक तालुका पातळीवरील स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना समितीची रचना पुढीलप्रमाणे –

१) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण अध्यक्ष.

२) प्रकल्प अधिकारी (स्वयंरोजगार) सदस्य.

३) गटांमधील सर्व बँक शाखांचे अंमलबजावणी करणारे शाखा व्यवस्थापक सदस्य.

४) संबंधित संलग्न विभागाचे गटस्तरीय उपविभागीय अधिकारी सदस्य.

५) अशासकीय संघटना प्रतिनिधी (एक) सदस्य.

६) गटविकास अधिकारी निमंत्रक.

गटविकास अधिकारी यांच्यामार्फत या समितीची बैठक बोलाविण्यात येईल. अग्रणी बँक अधिकारी, D.D.M. नाबार्ड आणि अग्रणी जिल्हा अधिकारी R.B.I. हे विशेष निमंत्रित म्हणून या बैठकींना उपस्थित राहतील. त्यामुळे स्थानिक पातळीवरील समस्यांशी ते परिचित होतील व त्यामुळे समस्या सोडविण्यात ते मदत करू शकतील.

गटस्तरीय स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना समितीची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) कार्यक्रमाच्या सुरूवातीलाच मुख्य कार्यक्रमांची निवड करणे.

२) गावांची निवड करणे आणि प्रत्येक वर्षी समाविष्ट करावयाच्या स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींची संख्या निश्चित करणे.

३) बँक शाखांमध्ये कामाचे वाटप करणे.

४) विविध अभिकरणांच्या कामाचे सनियंत्रण करणे.

५) पायाभूत सुविधा, पतकर्ज, तंत्रज्ञान आणि पणन या बाबतीत समन्वय साधणे.

६) स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींना मिळणाऱ्या उत्पन्नाचा आढावा घेणे.

७) वसुली कामाचा आढावा घेणे आणि वसुली शिबिर इ. करिता तारखा निश्चित करणे.

८) मतांची पडताळणी करण्यासाठी नमुना तपासणी करणे.

९) मासिक अहवाल काढणे.

१०) दारिद्र्यरेषा पार करण्यात स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींनी केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे.

प्रत्येक महिन्याच्या ५ ते १० तारखेच्या दरम्यान गट पातळी समितीची बैठक होईल. बैठकी अगदी नियमितपणे घेण्यात येतात. याची खात्री करून घेतली पाहिजे. गटांमध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेविषयी वित्त व्यवस्था करणाऱ्या संस्थांच्या शाखा व्यवस्थापकांनी पूर्वनिश्चित

नमुन्यात अहवाल तयार करावेत. गटस्तरीय स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना समितीचे कार्यवृत्त माहितीसाठी आणि जर आवश्यक असल्यास कार्यवाही पंचायत समितीकडे पाठविण्यात येईल. त्याची प्रत प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण आणि अग्रणी बँक अधिकारी यांना पाठविण्यात येईल.

### १६.५.३ जिल्हा पातळी :

जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना समिती कार्यरत असेल. जिल्हा पातळीवर स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना समितीच्या कामकाजात पुढील बाबी समाविष्ट आहेत.

१) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेच्या संबंधातील योजनेचा आढावा घेणे.

२) प्रत्यक्ष व वित्तीय स्वरूपातील एकूण प्रगतीचे सनियंत्रण करणे व त्याचा आढावा घेणे.

३) अभिकरणांतील मतभेद दूर करणे व राज्यस्तरीय समितीच्या विचारार्थ बाबी तयार करणे.

४) स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींच्या प्रशिक्षणविषयक गरजांचे मुल्यनिर्धारण करणे, तसेच योग्य संस्था निश्चित करून प्रशिक्षणासाठी केलेल्या व्यवस्थेचा आढावा घेणे.

५) बँकनिहाय व गटनिहाय वसुलीच्या स्थितीचे सनियंत्रण करणे, जेणेकरून आवश्यक असेल तिथे योग्य उपाययोजना करता येईल.

**जिल्हा पातळीवरील समितीची रचना पुढीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १) जिल्हा अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २) नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक | सदस्य |
| ३) भारतीय रिझर्व्ह बँकेचे LDO | सदस्य |
| ४) कार्यान्वय बँकेचे जिल्हा स्तरावरील | समन्वयक सदस्य |
| ५) जिल्हा स्तरावरील संबंधित विभागाचे | संबंधित प्रमुख सदस्य |
| ६) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| ७) जिल्हा खादी व ग्रामोद्योग बँकेचे अधिकारी | सदस्य |
| ८) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण | सदस्य |
| ९) २ वा ३ अशासकीय अधिकारी | सदस्य |
| १०) अग्रणी बँक अधिकारी | निमंत्रक |

**१६.५.४ राज्य पातळी :**

ज्या ग्रामविकास विभागास वा कोणत्याही विभागास ग्रामविकासविषयक कामे वाटून दिली आहेत, त्यांनी राज्यस्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन करणे, त्याचे कार्यान्वयन, सनियंत्रण व मूल्यमापन करणे ही त्यांची जबाबदारी असेल.

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेच्या अंतर्गत कामकाज कसे पार पाडले जात आहे, हे पाहण्यासाठी राज्यस्तरीय योजना समितीची तरतूद करण्यात आली आहे. त्याची रचना खालील प्रमाणे -

| | |
|---|---|
| १) मुख्य सचिव विकास आयुक्त | अध्यक्ष |
| २) सचिव, संस्थात्मक वित्त विभाग | सदस्य |
| ३) सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ४) प्रभारी सचिव, महिला विकास | सदस्य |
| ५) आवश्यक तेथे संबंधित विभागाचे संबंधित प्रमुख | सदस्य |
| ६) प्रभारी सचिव, अनुसूचित जाती-जमातीचे कल्याण | सदस्य |
| ७) नाबार्डचे प्रतिनिधी (प्रादेशिक कार्यालयाचे स्थानिक प्रमुख) | सदस्य |
| ८) भारतीय रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९) राज्य मुख्यालयाच्या ठिकाणी संबंधित कार्यान्वित बँकेचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०) उपसचिवांच्या दर्जापेक्षा कमी नसेल असा भारत सरकारचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ११) संचालक, SIRD | सदस्य |
| १२) निमंत्रक, S.L.B.C. | सदस्य |
| १३) प्रभारी सचिव, ग्रामविकास | सदस्य सचिव |

राज्य पातळीवरील स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना समितीची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) कार्यक्रमाचे नियोजन, कार्यान्वयन व सनियंत्रण याबाबत पुढाकार घेणे व मार्गदर्शन करणे.

२) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअन्वये जिल्हानिहाय प्रगतीचा आढावा घेणे व सुधारात्मक उपाययोजना सुचिवणे.

३) कार्यक्रमांच्या उद्दिष्टांच्या संदर्भात कार्यक्रमाच्या कार्यान्वयानेच सनियंत्रण व मूल्यमापन करणे.

४) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेमधील ख्यातनाम अशासकीय संस्थांच्या सहभागाचे पुनर्वलोकन करणे व आवश्यकता वाटल्यास निर्देश देणे.

५) राज्यपातळीवर धोरण तयार करणाऱ्या व्यक्ती आणि क्षेत्रीय स्तरावर कार्यान्वयन करणाऱ्या व्यक्ती, तसेच बँका यांच्यामध्ये अर्थपूर्ण संवाद साधण्यासाठी त्यांना चर्चापीठ मिळवून देणे.

६) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही प्रश्नाविषयी चर्चा करणे.

**१६.५.५ केंद्रीय पातळी :**

धोरण तयार करणे, कार्यक्रमाचे सनियंत्रण व मूल्यमापन करणे आणि निधीचा केंद्रीय हिस्सा देणे ही भारत सरकार यांच्या ग्रामविकास मंत्रालयातील ग्रामविकास विभागाची जबाबदारी आहे. विभागाला साहाय्य करण्याकरिता खालीलप्रमाणे केंद्रस्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रस्तरीय समन्वय समितीची सहा महिन्यांतून एकदा बैठक होईल.

| | |
|---|---|
| १) सचिव, ग्राम विकास मंत्रालय | अध्यक्ष |
| २) डेप्युटी गव्हर्नर, भारतीय रिझर्व्ह बँक | सदस्य |
| ३) सचिव, कृषी सहकार विभाग | सदस्य |
| ४) सचिव, व्यय विभाग | सदस्य |
| ५) विशेष सचिव, बँक विभाग, वित्त मंत्रालय | सदस्य |
| ६) सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ७) सचिव, लघुउद्योग व कृषी संबंधित उद्योग विभाग | सदस्य |
| ८) सचिव, विज्ञान व तंत्रशास्त्र विभाग | सदस्य |
| ९) सचिव, कल्याण मंत्रालय | सदस्य |
| १०) व्यवस्थापकीय संचालक, नाबार्ड | सदस्य |
| ११) सल्लागार (ग्रामविकास), नियोजन विभाग | सदस्य |
| १२) अतिरिक्त सचिव व क्षेत्र साहाय्यक, ग्राम-विकास मंत्रालय | सदस्य |
| १३) राज्य सचिव, ग्रामविकास | सदस्य |
| १४) सर्व वाणिज्यिक क्षेत्रीय बँकांचे अध्यक्ष नि-व्यवस्थापकीय संचालक | सदस्य |
| १५) महासंचालक, C.A.P.A.R.T. | सदस्य |
| १६) महासंचालक, N.I.R.D. | सदस्य |
| १७) अध्यक्ष, भारतीय बँक महासंघ | सदस्य |

या केंद्रीय पातळीवर समन्वय समितीची कार्ये पुढीलप्रमाणे :

१) कार्यक्रमाचे पुनर्वलोकन करणे व प्रभावी कार्यान्वयाची सुनिश्चिती करणे.

२) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेकरिता आधार, सेवांसाठीच्या दुव्याचा आढावा घेणे.

३) कर्ज साहाय्यासहित, वित्तीय व दर्जात्मक प्रगतीचा आढावा घेणे.

४) समवर्ती मूल्यमापन अहवालांचा विचार करणे.

५) राज्यशासन व बँका यांच्यात सुसंवाद चालू ठेवण्यासाठी चर्चापीठाची तरतूद करणे.

६) पतविषयक आढावा घेऊन, सुधारणांविषयी शिफारशी करणे.

अशा प्रकारे स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेच्या अंमलबजावणीसाठी समित्या आहेत.

## १६.६ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार कार्यक्रमाची यंत्रणा

**रचना :**

अशा पद्धतीने गटांचे व्यवस्थापन चालते, ज्यामध्ये प्रत्येक स्तरांवर वेगवेगळ्या समित्या असतात.

## १६.७ उत्पादित वस्तूंसाठी विक्री व्यवस्था

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत प्राचीन कलाकृती जतन करणारे कारागीर व दारिद्र्य रेषेखालील कला कौशल्य नसलेल्या व्यक्तींचे स्वयंसाहाय्यता बचतगट निर्मितीचा कार्यक्रम म्हणजेच सामाजिक व आर्थिक क्रांतीची सुरूवात असल्यामुळे विकास प्रक्रियेपासून अनेक वर्षे दूर राहिलेल्या दुर्लक्षित घटक देश विकासात सहभागी झाल्यामुळे देशाच्या प्रगतीचा मार्ग अधिक सुकर झाला आहे. देशातील महिला वर्गाला बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामावून घेणे ही काळाची गरज आहे. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत देशातील बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाची विपणन व्यवस्था हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. उत्पादित मालास देशभरात बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतूने केंद्र शासन दरवर्षी 'सरस' या नावाने प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे दिनांक १४ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत भव्य प्रदर्शन आयोजित करते. या ठिकाणी अनेक राज्यातील बचतगट सहभागी होतात. या प्रदर्शनामुळे राज्यांतून सहभागी झालेल्या ग्रामीण कारागिरांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे.

ग्रामीण कारागिरांनी निर्माण केलेल्या वस्तूंना देशभरातील व्यापारपेठ मिळवून देण्याच्या उद्देशाने राज्यांना विभागीय सरस प्रदर्शन आयोजन करण्याची परवानगी दिली असून अशा प्रदर्शनात राज्यातील अनेक बचत गटांनी भाग घेतला आहे. सन २००३ मध्ये राज्यात 'महालक्ष्मी सरस' या नावाने दिनांक १८ ते ३० डिसेंबर २००३ या कालावधीत वांद्रे, मुंबई येथे राज्यशासन व केंद्र शासन यांच्या संयुक्त विद्यमानाने पहिले विभागीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तेव्हापासून दरवर्षी मुंबईत विभागीय सरस प्रदर्शन आयोजित केले जाते. ह्या प्रदर्शनाला भेट देऊन आवर्जून खरेदी केल्यास बचत गटांना साहाय्य होईल.

महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी झालेल्या राज्य समन्वयकांची समिती गठीत करण्यात येऊन त्यांच्या गुणांकनानुसार उत्कृष्ट राज्य, उत्पादित वस्तू, उत्कृष्ट मांडणी, उत्कृष्ट कारागीर यांना मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. तसेच बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीत येणाऱ्या अडचणींवर मात करण्याकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. कार्यशाळेत खादी, ग्रामोद्योग औद्योगिक महामंडळ, महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, इंडियन

इन्स्टिट्यूट ऑफ पॅकेजिंग, विवर सर्व्हिस सेंटर यांच्या तत्त्वांचे मार्गदर्शन झाल्यामुळे मालाचा दर्जा आकर्षक वेष्टन आवश्यक परवाने याची माहिती प्राप्त होते. जेणेकरून विक्रीव्यवसाय वाढ होण्यास मदत होते.

## १६.८ सारांश

आपण कोणत्या कुटुंबात जन्म घ्यावा हे आपल्या हातात नाही. जन्माला येताना प्रत्येक व्यक्ती रडत रडतच जन्म घेतो, मात्र हसत हसत यशस्वी जीवन जगणे आपल्या हातात आहे. सर्वप्रथम आपण आपले ध्येय निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच यशस्वी होण्यासाठी मानवी दृष्टिकोन सकारात्मक असणे आवश्यक आहे. Be positive in life, definitely you will get success. ध्येयपूर्तीत इच्छाशक्तीही खूप महत्त्वाची आहे. इच्छाशक्ती, आत्मविश्वास, चिकाटी, प्रयत्न, महत्त्वाकांक्षा यांच्या बळावर माणूस कुठलेही अवघड ध्येय गाठू शकतो. ह्याच माध्यमातून काही महिला बचत गटांच्या माध्यमातून यशस्वी होत आहेत. ह्याची अनेक उदाहरणे समाजात पाहावयास मिळत आहेत. बचत गटांच्या आर्थिक उन्नतीबरोबर सामाजिक शांतता व ऐक्य हादेखील उद्देश आहे. सामूहिक प्रयत्नाने मोठ्या समस्येवर मात करता येते. शासकीय योजनांचा धागा धरून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांनी एकत्र आल्यास निश्चित परिस्थितीत बदल होईल. ग्रामीण पातळीवरच्या, अगदी छोट्या स्तरावरच्या बायकाच एका वेगळ्या प्रकारात अस्तित्व निर्माण होत आहे. या चळवळीचा वेग जरी कमी असला तरी ही चळवळ एका निश्चित दिशेने सुरू आहे. कदाचित पुढे जाऊन यातून पुन्हा एकदा सहकाराची चळवळ उभी राहिलेली, सावकारी समूळ नष्ट झालेली दिसून येईल. कुटुंबात दुय्यम स्थानावर असलेल्या महिलांनी गटांच्या माध्यमातून स्वत :चं अस्तित्व निर्माण केले आहे. शक्यता नाकारता येत नाही ती ही की, ह्या सूक्ष्मस्तरीय अर्थव्यवस्था मजबूत होतील आणि त्यात राजकारणांची गणिते बदलू लागतील. ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलन, रोजगारांसाठी स्थलांतर ह्यासाठी स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना जणू आज वरदान ठरत आहे.

## १६.९ स्वाध्याय

१ स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना म्हणजे काय ?

२ स्वर्णजयंती योजनेंतर्गत बचत गटांसाठी आवश्यक बाबी सांगा.

३ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे स्वरूप व व्याप्ती सांगा.

४ या योजनेंतर्गत विविध स्तरांवरील अंमलबजावणी रचना व कार्ये सांगा.

♦ ♦ ♦

# १७

# कृषी आधारित उद्योग

**पाठाची रूपरेषा**

१७.० उद्दिष्टे

१७.१ प्रास्ताविक

१७.२ कृषी – संक्षिप्त इतिहास

१७.३ संकल्पना

१७.४ प्रकार

१७.५ कार्ये

१७.६ महत्त्व

१७.७ सारांश

१७.८ स्वाध्याय

## १७.० उद्दिष्टे

१) कृषी उद्योगाची संकल्पना समजून देणे.

२) कृषी उद्योगाच्या कार्याची महती पटवून देणे.

३) ग्रामीण विकासात कृषी उद्योगाचे महत्त्व विद्यार्थ्यास समजून देणे.

## १७.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून शेती हा आपल्या भारत देशाचा प्राथमिक व मुख्य व्यवसाय आहे. आजही आपण शेतीला महत्त्व देत आहोत. अशा या सर्वसमावेशक शेतीमध्ये कृषीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अतिरिक्त प्रमाणात तयार होणाऱ्या कृषी उत्पादनामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्याचबरोबर शेतीतील उत्पादनात सातत्य असावे, किंमत स्थैर्य असावे या अनुषंगाने कृषी मालावर प्रक्रिया करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यासाठी उद्योग हे महत्त्वपूर्ण कामगिरी बजावू शकतात. अशा कृषी उद्योगांविषयी माहिती मिळविणे गरजेचे आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात कृषी उद्योग महत्त्वाचे आहेत. प्रादेशिक समतोल विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे व ग्रामीण भागातील बेकारी, दारिद्र्य कमी करण्यासाठी कृषी उद्योग महत्त्वपूर्ण आहेत. जम्मू काश्मीर ते कन्याकुमारी तसेच अरूणाचल प्रदेश ते महाराष्ट्र, राजस्थान ह्या प्रदेशांचा म्हणजेच भारतासारख्या विशाल आणि हवामान,

तापमानातही विविधता लाभणाऱ्या संपूर्ण देशात विविध कृषी पिके आणि त्यावर आधारित उद्योगांचा विकास होताना आढळत आहे.

## १७.२ कृषी - संक्षिप्त इतिहास

कृषी व्यवसाय हा जगातील सर्व व्यवसायांपैकी एक जेष्ठ आणि श्रेष्ठ असा व्यवसाय आहे. हा व्यवसाय सुरू होण्यापूर्वी हजारो वर्षे आधी आदिमानव हा झाडांची फळे गोळा करून अथवा रानातील वनस्पतींवर वा मध गोळा करून तर कधी प्राण्यांची शिकार करून आपला उदरनिर्वाह चालवीत असे.

इसवी सन पूर्व ११००० वर्षांपूर्वी जगातील मध्यभागातील पूर्वेकडील प्रदेशातील रानावनातून भटकणाऱ्या लोकांच्या असे लक्षात आले की, झाडावरून जमिनीवर पडणारे बियाणे पाऊस पडल्यानंतर योग्य वातावरण मिळताच रूजते व उगवते. पुढे त्यापासूनच वनस्पतींची वाढ होते. पुढे इसवी सन पूर्व ८००० वर्षापूर्वी त्यांच्या असेही लक्षात आले की, धान्याचे बियाणे गोळा करून पाऊस पडताच योग्य वातावरण निर्मिती झाल्यास ते जमिनीवर टाकल्यास उगवते. ह्यासाठी त्यांनी प्रथम गव्हाचे बी गोळा केले ते पेरणीसाठी दगडी हत्यारांचा वापर केला. अपेक्षेप्रमाणे त्यापासून अधिकचे धान्य मिळाले. पुढे एकाच ठिकाणी राहून मानव धान्य मिळवू लागला. अशा प्रकारची पहिली वसाहत नाईल नदीच्या किनाऱ्यांवर निर्माण झाली. पुढे सुपीक जमीन व बारमाही पाण्याची सोय असलेल्या ठिकाणी अनेक संस्कृत्यांचा उदय व विकास झाला. ह्याचे मुख्य कारण हे शेतीच होते.

पुढे ह्या स्थितीत वेळोवेळी बदल होत गेला. नवीन नवीन प्रयोग शेतीत तत्कालीन स्थितीत केले गेले. मानवाने आपल्या कल्पकतेच्या जोरावर शेतीत अनेक यशस्वी प्रयोगाद्वारे विकास साधण्याचा प्रयत्न केला.

१७वे शतक हे शेती क्रांतीचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात बरेच नवीन नवीन शोध लागले. सुधारित पद्धतीने पिकांची लागवड करणे, शेतीसाठी नवीन औत- अवजारे निर्माण करण्यावर अधिक भर देण्यात आला.

उत्तर अमेरिकेतील मेक्सिको येथे सन १९४०-४१ मध्ये मागासलेल्या शेतीचा संपूर्ण पाया बदलून तिला शास्त्रशुद्ध अशा नवीन पायावर उभे करण्यासाठी प्रथम हरित क्रांतीची सुरूवात झाली. अन्नधान्याच्या उत्पादनात अल्पकाळात प्रचंड वाढ घडवून आणणे ही गोष्ट ह्या ठिकाणी अपेक्षित होती. भारतामध्ये अशा प्रकारचा प्रयत्न १९६७-६८ ह्या कालखंडात मोठ्या प्रमाणात करण्यात आला.

शेती ह्या विस्तृत संकल्पनेतील कृषी ही एक शाखा आहे. जमिनीची योग्य प्रकारे मशागत करून त्या जमिनीतून उत्पादन घेतले जाते. त्याला आपण कृषी शेती असे संबोधतो. ह्यामध्ये प्रत्यक्ष जमीन कसून उत्पादन घेण्यावर भर असतो. ह्यासाठी शास्त्रशुद्ध बियाणे, रोगप्रतिबंधात्मक औषधे, रासायनिक खते, बारमाही पाणीपुरवठ्याच्या सोयी, शेती उपयुक्त आधुनिक अवजारे, जमिनीची योग्य मशागत ह्या गोष्टींवर प्रामुख्याने भर देण्यात येतो.

भारतात १९६० पासून हळूहळू परंपरागत (शेती) कृषी पद्धतीत बदल होत गेले. अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी भारताने हेतुपुरस्सर हा कृषी क्षेत्रात बदल घडवून आणला. ह्यातूनच पुढे हरित क्रांतीचा उदय झाला. आधुनिक व नवीन तंत्र व यंत्र यांच्याशी मिळत्या-जुळत्या नसणाऱ्या शेती/ जमीन कसण्याच्या जुन्या व परंपरागत पद्धतीचा त्याग करून त्याऐवजी नवीन पद्धती या काळात अवलंबिली जाऊन त्याद्वारा शेती/कृषी उत्पादनाची पातळी वाढविण्याचा प्रयत्न केला गेला.

कृषीसाठी लागणाऱ्या वरील गोष्टींबरोबरच कर्जाची सोय, पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन, कृषी संशोधन, शेतमाल किंमत शाश्वती,साठवणूक सोयी, शेतजमिनीची धूप होऊ नये म्हणून इतर अनेक प्रकारच्या योजनाही करण्यात आल्या.

उद्देश हा की, कृषीची संकल्पना अलग करत असताना निर्वाह स्वरूपाचे उत्पादन न घेता त्यामध्ये व्यापारी दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि कृषीला महत्त्व प्राप्त व्हावे, अन्नधान्याच्या बाबतही स्वयंपूर्णत्व मिळावे ह्या दृष्टीने कृषीमध्ये नवनवीन प्रयोग करण्यात आले.

## १७.३ कृषी उद्योगाची संकल्पना

प्रत्यक्ष जमीन कसून जे जमिनीतून उत्पादन घेतले जाते ते कृषी उत्पादन होय.

कृषीतून उत्पादित झालेल्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी किंवा कृषी मालाचा कच्चा माल म्हणून वापर करणारे कारखाने यांना कृषी उद्योग असे संबोधले जाते.

काही वेळेस शेतीला पूरक असणाऱ्या उद्योगांचाही समावेश कृषी उद्योगात केला जातो.

तसेच शेती वा कृषी विकासाकरिता आवश्यक असणारी खते, अवजारे, यंत्रसामुग्री, किटकनाशके इ. वस्तूंची निर्मिती करणाऱ्या उद्योगांचाही समावेश कृषी उद्योगात केला जातो.

आजही ८०% जनता ही शेतीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. शेतीचे/जमिनीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढला आहे. या अतिरिक्त असलेल्या लोकसंख्येला उद्योग आणि सेवाक्षेत्रात रोजगार देण्याची संधी निर्माण झाली आहे. अशावेळी कृषीमालावर वा शेतीमालावर प्रक्रिया करून दुय्यम स्वरूपाचा टिकावू माल तयार करणारे कृषी उद्योग हे महत्त्वाचे ठरत आहे.

## १७.४ कृषी उद्योगांचे प्रकार

कृषी उद्योगांचे प्रकार अभ्यासण्यासाठी उद्योगांचे जे प्रामुख्याने चार विभागात वर्गीकरण केले जाते ते आपण पाहू.

१) साधनांवर आधारित उद्योग.

२) मागणीवर आधारित उद्योग.

३) कौशल्यावर आधारित उद्योग.

४) दुय्यम स्वरूपाचे उद्योग.

**साधनांवर आधारित उद्योगाचे पुढील प्रकार पडतात :**

अ. कृषी आधारित उद्योग.

ब. वनांवर आधारित उद्योग.

क. पशुधन व कुक्कुटपालनावर आधारित उद्योग.

ड. खनिजांवर आधारित उद्योग.

इ. सागरी उत्पादनावर आधारित उद्योग.

ह्यामधील आपण कृषी उद्योगांविषयी माहिती मिळवू.

**कृषी उद्योगांचे साधारण दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.**

१) उत्पादनावर आधारित उद्योग.

२) निविष्टा (**Input**) उत्पादन करणारे उद्योग.

**उत्पादनावर आधारित उद्योगांमध्ये खालील प्रकार पडतात :**

१. कृषी प्रक्रिया उद्योग.

२. शेतमालावर आधारित वस्तूनिर्माण उद्योग.

३. अन्न उद्योग (**Food Industry**)

४. पशुधन व कुक्कुटपालनावर आधारित उद्योग.

निविष्टा (**Input**) उत्पादन करणाऱ्या उद्योगात खालील प्रकारांचा समावेश होतो :

१. कृषी सेवा केंद्र.

२. शेतीसाठी लागणाऱ्या बाबी/निविष्टा उत्पादन करणारे घटक.

वरील कृषी उद्योगांचे वर्गीकरण सविस्तराने करता येईल.

कृषी क्षेत्रात तयार झालेल्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून दुय्यम स्वरूपाचा माल उत्पादित केला जातो. ह्यामध्ये कच्च्या मालाचे मूळस्वरूप व नव्याने प्रक्रिया करून उत्पादित झालेल्या मालामध्ये फारसा फरक आढळत नाही. तसेच मालाची वाहतूक, हाताळणी, साठवणूकही सोयिस्कर व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून केवळ साधी प्रक्रिया केली जाते. उदा. भातगिरणी, डाळगिरणी.

**शेतमालावर आधारित वस्तूची निर्मिती करणारे उद्योग :**

ह्यामध्ये शेतमालाचा कच्चा माल म्हणून उपयोग करून पूर्णपणे नवीन वस्तू उत्पादित केली जाते. ह्यामध्ये नव्याने उत्पादित झालेली वस्तू पूर्णपणे वेगळी असते. उदा. कॉफी, कापड, साखर, तेल, कोको वगैरे.

प्रत्यक्ष शेतीतून निघणाऱ्या उत्पादनांवर आधारित उद्योगांविषयी थोडक्यात माहिती मिळवू.

**१) भातपीक :**

भातापासून तांदूळ, पोहे, कुरमुरे तयार केले जातात. तसेच कोंड्यापासून तेलही तयार केले जाते. भातापासून नुडल्स तयार करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत.

**२) मका :**

मक्यापासून पीठ, मक्याची कणी, स्टार्च, ग्लुकोज, कागद, मक्याच्या कडब्यापासून पशुखाद्य तयार करण्यावर भर दिला जातो.

**३) तेलबिया :**

भुईमूग, जवस,करडई, सूर्यफूल, मोहरी, तीळ, सोयाबीन, सरकी ह्यापासून मोठ्या प्रमाणात खाद्यतेल निर्मितीवर भर देण्यात आला आहे. उरलेल्या कोंड्याचा पेंड म्हणून पशुखाद्यासाठी वापर करण्यात येतो.

**४) ऊस :**

उसापासून साखर कारखाने, गुऱ्हाळे, खांडसरी, मळी, चिपाडे, ॲसेटीन, आंबवण यार केले जातात. राहिलेल्या पाचटपासून कागद तयार करण्यावर भर दिला जातो.

**५) कापूस :**

ह्यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात कापड निर्मिती कारखाने उभे आहेत.

**६) चहा :**

चहाचे विविध प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

**७) फळे :**

विविध प्रकारच्या फळांपासून लोणचे, जॅम, जेली, पावडर, पल्प, सरबते तयार करणारे उद्योग कार्यरत आहेत. काही फळांचा उपयोग हा सौंदर्य प्रसाधनात होताना दिसतो.

**८) भाज्या :**

विशेषत : टोमॅटोपासून रस, पावडर, केचप तयार करणारे उद्योग आहेत. तसेच मेथीपासून कस्तुरी मेथी तयार करणारे उद्योग आढळतात. इतरही भाज्या वाळवून त्यापासून पूड तयार करणे हा उद्योग करणारे लघु कारखाने आढळतात.

**९) मसाल्याचे पदार्थ :**

मिरची, हळद, दालचिनी, मिरी, जिरे ह्यासारख्या मसाल्यांच्या पदार्थांवर प्रक्रिया करून पावडर केली जाते. हे मसाल्याचे पदार्थ स्वयंपाकात उपयोगात आणले जातात. तर बऱ्याच पदार्थांचा समावेश आयुर्वेदातील औषधे तयार करण्यासाठी केला जातो.

ह्यासारख्या इतर अनेक कृषी उत्पादन उद्योगांचा समावेश ह्यामध्ये होतो.

**अन्नउद्योग :**

शहरी भागातून अन्नउद्योग म्हणजेच तयार मालास (**Instant**) भरपूर मागणी आहे. शहरात पती-पत्नीचा नोकरी करण्याचा कल अधिक असतो. त्यामुळे अन्न पदार्थ / जिन्नस तयार स्वरूपात स्वीकारणाऱ्यांचे प्रमाणही अधिक असते. ह्यामध्ये बेकरीतील पदार्थ, गोठवलेले अन्न, प्रक्रिया केलेली फळे - भाज्या, पेये, हवाबंद डब्यात असलेले मांस, मासे, शीतपेये दुधउत्पादने ह्यांचा समावेश असतो. अतिशय कमी वेळेत शिजवून तयार होतील किंवा नुसते गरम केल्यास खाता येतील किंवा आहे त्या स्वरूपात स्वाद घेता येईल ह्याचा विचार शहरातील धावपळीच्या जीवनात अधिक होताना दिसतो. त्यामुळे वरील उत्पादनांना मोठ्या प्रमाणात मागणी असते.

ह्यासाठी योग्य संघटन, विपणन (बाजारपेठ), आधुनिक उत्पादन तंत्र, शास्त्रीय व्यवस्थापन ह्यामुळे अन्नउद्योग शहरी भागात मोठ्या प्रमाणात पसंतीस उतरत आहेत.

**पशुधन व कुक्कुटपालन उद्योगावर आधारित उद्योग :**

आहाराचा दर्जा सुधारण्यासाठी ह्या उद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे. दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ ह्यांना फार मोठी मागणी आहे. ह्या उद्योगातून विपणन, संकलन, प्रमाणीकरण, प्रक्रिया व वितरण ह्यासाठीच्या बाबतीत रोजगार निर्मितीस फारच मोठा वाव आहे. अमूल, वारणा, महानंदा ही उदाहरणे देता येतील. दुग्ध प्रक्रियांमध्ये चीज, लोणी, मख्खन, श्रीखंड, लस्सी, खवा, अनेकविध स्वीट्स. अशा प्रकारे उत्पादने घेता येतात.

तसेच मांस व पक्षापासून (कोंबडी, बदक) अंडी ह्यापासून दुय्यम स्वरूपाची उत्पादने म्हणजे मांस गोठवणे वा तयार स्वरूपात खाण्यास उपलब्ध करून देण्यासाठी हवाबंद डब्यातून विक्रीस उपलब्ध करून देणे तसेच कातडीपासून चामडे - चामड्यापासून इतर अनेक वस्तू तयार करणारे उद्योग. शिंगे, पिसे ह्यापासून शोभिवंत वस्तू तयार करणारे उद्योग, मेंढरांच्या लोकरापासून विविध वस्तू तयार करणारे उद्योग ह्यांचाही समावेश ह्या उद्योगात होतो.

**शेती निविष्टा उत्पादन करणारे उद्योग :**

शेतीसाठी विविध संसाधनांची गरज असते. शेतीची/जमिनीची मशागत करण्यासाठी लागणारी साधने अगदी विळी, फावडे, कुदळ ह्यापासून कार, टॅक्ट्ररपर्यंतची साधने ही शेतीसाठी गरजेची असतात.

तसेच बी-बियाणे तयार करण्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळा, खते तयार करणारे कारखाने, औषधे तयार करणारे उद्योग, मालाची वाहतूक करणारी साधने ह्यासारख्या बाबींसाठी साहाय्यक उद्योगांची मोठ्या प्रमाणावर गरज असते. ह्यामध्ये कुशल श्रमिकांना प्रथम स्थान दिले जाते. ह्यामुळे उत्पादन वाढीला चालना मिळते. शेती व उद्योगांचा समतोल विकास साधण्यास साहाय्यक उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतात.

**कृषी सेवा उद्योग :**

ह्यामध्ये रोपवाटिका, कृषी बाजारपेठा, वित्तपुरवठा कृषी यंत्रसामुग्री, कृषी प्रशिक्षण संस्था, कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्रे, कृषीच्या विकासाबाबतचे साहित्य प्रकाशन, कृषीविषयक सल्ला

ह्यांचा समावेश होतो. कृषी बाजारपेठेत घडणाऱ्या विविध प्रकारच्या क्रिया त्यामध्ये मालाची प्रतवारी, श्रेणीकरण, प्रमाणीकरण, वाहतूक, साठवणूक, हाताळणी, बाजारमाहिती, पॅकिंग, जाहिरातबाजी, विविध खरेदी-विक्रीच्या पद्धती त्यातील अडते, दलाल, कमिशन एजंट इ. चा समावेश होतो. कृषी संशोधन शेतकऱ्यांपर्यंत जाण्यासाठी विविध प्रसार माध्यमांचा स्वीकार केला जातो. पाणीपुरवठ्याची आधुनिक पद्धती तयार करणारे उद्योग उदा.जैन इरिगेशन. ह्या सर्वांचा समावेश कृषी सेवा उद्योगात झालेला दिसून येतो.

असे विविध प्रकारात कृषी उद्योगांचे वर्गीकरण करता येईल.

## १७.५ कृषी उद्योगाची कार्ये

भारताच्या ग्रामीण विकासात कृषी मालावर आधारित उद्योगांचे कार्ये महत्त्वाची आहेत. हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) रोजगार पुरवठा :**

कृषी उद्योग हे मूलत : लहान प्रमाणावर चालत असल्याने त्यांची रोजगार निर्मितीची क्षमता जास्त आहे. भांडवल गुंतवणूक व रोजगाराचे प्रमाण जास्त असल्याने ग्रामीण लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. ग्रामीण भागात आढळणारी अर्धबेकारी, हंगामी बेकारी, छुपी बेकारी व उघड बेकारी कमी करण्याच्या दृष्टीने हे उद्योग महत्त्वाची कामगिरी पार पाडतात.

**२) शेतमालाला पूरक व्यवसाय :**

अनेक कृषी उद्योग हे शेतीला पूरक अथवा साहाय्यभूत ठरतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

**३) कमी भांडवल :**

भारतात भांडवलाची टंचाई आहे. अशा स्थितीत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी कमी भांडवलावर उभारता येणारे कृषी उद्योग ही महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**४) ग्रामीण भागात अस्तित्व :**

बहुसंख्य कृषी उद्योगाचे स्थानिकीकरण ग्रामीण भागात झाल्याचे आढळते. उदा. साखर उद्योग, रेशीम उद्योग, हातमाग उद्योग इ. त्यामुळे शहरीकरणाचे दुष्परिणाम टाळता येतात. शहरी उद्योगामुळे अनेक सामाजिक व राजकीय व इतर समस्या निर्माण झालेल्या आढळतात. या ग्रामीण भागातील उद्योगांमुळे शहरीकरणावरील ताण कमी व्हायला मदत होते.

**५) स्थानिक कच्चा माल :**

कृषी उद्योगावर आधारित उद्योगात सामान्यत : स्थानिक कच्च्या मालाचा वापर केला जातो. त्यामुळे तेथील शेतमाल उत्पादकाच्या उत्पादनास योग्य किंमत मिळून त्यांचे उत्पन्न वाढते.

**६) समतोल विकास :**

मोठे उद्योग प्रामुख्याने शहरी भागात केंद्रित झाल्याने शहरी भागाचा विकास होऊन ग्रामीण भाग अविकसित राहतो. परंतु देशात कृषी उद्योगांची वाढ झाल्यास प्रादेशिक विकास होऊन आर्थिक विकासातील विषमता कमी होणे शक्य होते.

**७) कुटिरोद्योग :**

बरेच कृषी उद्योग हे शेतकरी कुटुंबांना स्वत :च्या घरातच करता येत असल्यामुळे त्यांच्या घरातील (कुटुंबातील) व्यक्तींना त्यात काम उपलब्ध होते.

**८) अल्प तंत्रज्ञान :**

मत्स्यपालन, पशुपालन, दुग्धोत्पादन, मधुमक्षिका पालन यासारखे अनेक कृषी उद्योग अल्पशा तंत्रज्ञानावर सुरू करता येतात. म्हणजे त्यांच्या स्थापनेची सुलभता असल्याने कमी शिक्षित ग्रामीण लोकांना हे सहजासहजी करता येतात.

**९) उत्पादनात विविधता :**

कृषी उद्योगांनी विविध वस्तूंची निर्मिती होते. त्यामुळे त्यात विविधता येते.

**१०) नैसर्गिक साधनसामुग्रीचा पर्याप्त उपयोग :**

कृषी उद्योगांना आवश्यक कच्चा माल त्या-त्या ठिकाणच्या उत्पादनातून मिळत असल्याने देशातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा योग्य आणि पूर्णपणे उपयोग होऊ शकतो.

**११) उपफल निर्मिती :**

साखर उद्योग आणि अन्य काही उद्योग पूरक वस्तूंची म्हणजेच उपफलांची निर्मिती होत असल्याने उत्पादनात विविधता येतेच, शिवाय उत्पादनाचा सरासरी खर्चही कमी व्हायला मदत होते.

**१२) औषधी वनस्पतींचा वापर :**

कृषी उद्योगात डोंगराळ दुर्गम भागात आढळणाऱ्या औषधी वनस्पतींचा वापर केला जात असल्याने भटक्या आदिवासी जनजातींच्या विकासास साहाय्य होते.

**१३) ग्रामीण उत्पन्नात वाढ व दारिद्र्य निर्मूलन :**

ग्रामीण भागात कृषीवर आधारित उद्योग उभारल्याने त्यांच्या मालाचा कच्चा माल म्हणून वापर झाल्याने अथवा त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग अस्तित्वात आल्याने त्यांच्या शेतमालाला चांगली किंमत मिळून त्यांचे उत्पन्न वाढते. शिवाय पूरक कृषी उद्योगांमुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. एकूण ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे शक्य होते. सारांशाने असे सांगता येईल की, दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यात कृषी उद्योगांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

**१४) आर्थिक विषमता कमी करणे :**

ग्रामीण भागात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आढळते. कृषी उद्योगांचा विकास झाल्यास कमी उत्पन्न गटातील लोकांना पूरक व्यवसाय उपलब्ध होऊन त्यांची उत्पन्न पातळीतही वाढ होते. त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक विषमता कमी होण्यास साहाय्य होते.

**१५) साठवणुकींच्या सोयींचा विकास :**

कृषी उद्योगांच्या वाढीमुळे ग्रामीण भागात शेतमाल साठविण्यासाठी साठवणुकींच्या सोयींचा विकास घडून येतो.

**१६) वाहतूक व दळणवळणाचा विकास :**

कृषी उद्योगामुळे ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीचा विकास घडून येतो. वाहतुकीच्या साधनात व सोयीत वाढ होते. पोस्ट, तारघर, टेलिफोन, फॅक्स, इंटरनेट, मोबाईल यासारख्या दळणवळणाच्या साधनातही विकास होऊन समतोल विकास नियोजनाचे उद्दिष्ट साध्य व्हायला मदत होते.

**१७) ग्रामीण बचतीत वाढ :**

ग्रामीण उद्योगांमुळे ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची बचत करण्याची क्षमता वाढते. मुळातच ग्रामीण लोकांची उपभोग क्षमता कमी असल्याने अतिरिक्त उत्पन्नाचा बराच भाग बचत होऊन तो देशाच्या विकास कार्यासाठी उपलब्ध होतो.

**१८) प्राथमिक सोयीत वाढ :**

रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, बॅंका, सहकार, वाहतूक व्यवस्था, पोस्ट यासारख्या सोयी कृषी उद्योगांमुळे ग्रामीण भागात अस्तित्वात येतात. त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडून येण्यास चालना मिळते.

**१९) बाजारपेठ विकास :**

प्राथमिक सोयीत वाढ झाल्याचा फायदा म्हणजे शेतमालाची विक्री करण्यासाठी बाजारपेठांचा उदय व विकास घडून येतो. विशेषत : सहकारी बाजारपेठांची चळवळ उदयास येऊन त्यांची यशस्विताही वाढते. ह्यामुळे शेतमाल उत्पादकांचा अनेक बाजूंनी फायदा झाल्याचे दिसते. तसेच राजकारणातही सक्रियता वाढलेली दिसून येते.

**२०) ग्रामीण उपक्रमशीलतेला वाव :**

बऱ्याच ठिकाणी उद्योगांच्या स्थापनेसाठी अल्प भांडवल व अल्प तंत्रज्ञानाची आवश्यकता असल्याने ग्रामीण भागातील नवीन उद्योजक या क्षेत्रात पदार्पण करतात. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी असलेल्या संयोजन कौशल्यावर संधी मिळते.

**२१) सहकारी संस्थांचा विकास :**

सहकार हे दुर्बल घटकांचे ऐच्छिक संघटन आहे. ग्रामीण भागात सहकारी तत्त्वांवर कारखानदारी वाढीस लागली आहे. कृषी उद्योगांमुळे प्रक्रिया, उत्पादन, वितरण, पतपुरवठा, वाहतूक, साठवणूक, खरेदी-विक्री क्रिया इ. बहुतेक सर्वच क्षेत्रांत सहकारी चळवळ ग्रामीण भागात फोफावली आहे.

**२२) निर्यात वाढ :**

रेशीम कापड, चहा, कॉफी, साखर, कापड, ज्यूट, मसाले यासारख्या असंख्य कृषी उद्योगातील उत्पादनाची निर्यात होत आहे. अलीकडे फळावर प्रक्रिया करून त्यांची निर्यात वाढविण्याचा उद्योग विकसित होऊ लागला आहे. अशा निर्यातीपासून देशाला बहुमोल असे परकीय चलन उपलब्ध होते.

**२३) लोकांच्या राहणीमानात बदल :**

वरील सर्व कार्यांचा ऊहापोह होत असताना असे लक्षात येते की, कृषी उद्योगांमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडून येत असून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी कृषी उद्योग कार्ये करीत आहेत.

अजून काही उदाहरणे आपण पाहू. ह्या उदाहरणांवरून आपणांस हा भाग समजण्यास अधिक सोपा जाईल.

**नारळ :**

नारळाच्या झाडापासून कॉयर बनवतात. अनेक शोभिवंत वस्तू तयार करण्यासाठी नारळाच्या झाडापासून उपयोग केला जातो. नारळाचे दूध काढून ते विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जाते.

**ताड :**

ताडाच्या झाडापासून चटया, पिशव्या देशात, तसेच परदेशातही जास्त लोकप्रिय आहेत. तसेच पामतेल, ताडगूळ, नीरा, ताडी तसेच सफाईचे ब्रश तयार केले जातात.

**तुती :**

तुतीच्या झाडापासून रेशीम उद्योग करता येतो. रेशीम उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला गृहउद्योग आहे. ह्यामध्ये कुटुंबातील महिला व्यस्त असतात. छोट्याशा जागेत आपण रेशीम किडे पाळून त्यापासून कोष मिळविण्याचा व्यवसाय करू शकतो. रेशीम उत्पादनाची परदेशात निर्यात होते. त्यामुळे परकीय चलन मिळण्यास हा व्यवसाय उपयुक्त आहे.

**बांबू :**

बांबूपासून अनेक प्रकारचे व्यवसाय करता येतात. बांबू कामापासून अनेक शोभिवंत वस्तू तयार करणे, ग्रामीण भागातील घराच्या बांधकामात बांबूला महत्त्वाचे स्थान आहे. उत्तर -पूर्वीय

भागात तसेच आदिवासी समाजात आहारात बांबूचा उपयोग केला जातो. बांबू शूट पिकल नावाची लोणची तयार करण्याचे प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे. भविष्यात बांबूपासून अनेक प्रकारचे उत्पादन तयार करण्याबाबत संशोधन चालू आहे. आदिवासी भागातील लोकांसाठी फार मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकते.

**कापूस :**

कापसातून सरकी काढून कापसाचे जिनिंग व प्रेसिंग करून त्यांच्या गाठी बांधणारे उद्योग विकसित झाले आहे. शिवाय देशात सूत गिरण्या व कापडगिरण्या अस्तित्वात येऊन लाखो कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. हातमागावर अजूनही रोजगार उपलब्ध आहे. कापसापासून काढलेल्या सरकीपासून तेल काढण्याचा व्यवसाय केला जातो.

**गळिताची पिके :**

गळीतांच्या पिकांपासून मोठ्या प्रमाणात तेल उद्योग विकसित झाले आहेत. ह्यामधून मिळालेल्या तेलाचा वापर खाद्यतेल म्हणून तसेच वनस्पती तूप, साबण, औषधे इ. मध्येही मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. आज प्रचंड मोठ्या प्रमाणात ह्यापासून रोजगार होत आहे.

**तंबाखू :**

तंबाखूपासून तपकीर, जर्दा, विड्या, सिगरेट, पेस्ट ह्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होताना दिसते. टिंबुर्णीची पाने गावाकडे उपलब्ध असल्यामुळे मोठ्या प्रमाणात विड्या वाळण्याचे उद्योग ग्रामीण भागात दिसून येतात.

**अन्नधान्य व कडधान्ये :**

अनेक प्रकारच्या अन्नधान्यापासून विविध पिठं तयार करून त्यापासून इतर दुय्यम स्वरूपाचे उत्पादन घेतले जाते. उदा. नागलीपासून पापड करण्याचे उद्योग आदिवासी भागात सुरू आहेत. ह्यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला आहे.

**कडधान्ये :**

कडधान्यापासून डाळी आणि पुढे डाळीपासून पीठ आणि पिठापासून विविध खाद्य उत्पादने तयार करण्यावर भर दिला जात आहे.

**ज्यूट :**

ज्यूट उद्योग भारतात पूर्वीपासूनचा उद्योग आहे. त्यापासून पोती, गोणपाट, गालीचे यासारख्या वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जाते.

**कॉफी :**

कॉफीचे पीक व्यापारी पीक म्हणून घेतले जाते. आज विविध कंपन्या (कारखाने) आपण केलेल्या प्रक्रियांचे ब्रँड किती चांगले आहेत ह्याची जाहिरात करताना दिसतात.

**कोको :**

खाद्य पदार्थाच्या निर्मितीत ह्याचा समावेश केला जातो. उदा. चॉकलेट, केक इ. झाडापानांपासून कोकेन मिळते.

**विविध फळे :**

ॲपल, केळी, चिकू, अंजीर, बदाम, आंबा वगैरे ह्यासारख्या फळांवर प्रक्रिया करून ड्रायफ्रूट तयार करण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. ह्या ड्रायफ्रूटना मागणीही मोठी आहे.

पपयापासून टुटीफ्रूटी करण्याचे उद्योग सुरु झाले. काही फळांपासून अर्क काढला जातो.

**कोकम :**

ग्रामीण भागात कोकम ह्या झाडापासून फळे मिळविली जातात. त्याचा उपयोग जेवणात औषध म्हणून केला जातो. तसेच अर्क, सरबते तयार करण्यासाठीचा उद्योग ग्रामपातळीवर मोठ्या प्रमाणात बाळसे घेत आहे.

गावाकडे असलेल्या जंगलापासून अनेक प्रकारची उत्पादने घेतली जातात. उदा. कठीण लाकूड इंधनासाठी (विशेषत : बेकरी) वापरले जाते. औद्योगिक वापरामध्ये प्रामुख्याने मऊ लाकूड वापरले जाते. मऊ लाकडाचा घरबांधणी, फर्निचरसाठी वापर केला जातो. तसेच पेट्या, आगकाड्या, कागद कारखान्यात लागणाऱ्या लगद्यासाठी वापर केला जातो. लाकडामधील सेल्युलोजपासून रेयॉन, प्लास्टिक, छायाचित्रणासाठी चित्रफिती, लाखेचे रोगण व स्फोटक पदार्थ तयार होतात. ओक वनस्पतीपासून बाटल्यांची बुचे तयार करण्यासाठी त्याचा वापर करतात. तर चंदनासारख्या लाकडाचा सुगंधा द्रव्याचा उपयोग साबण तयार करण्यासाठी, अगरबत्ती तयार करण्यासाठी केला जातो. ह्यासारख्या व्यवसायापासून ग्रामीण भागात, आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे.

शेतीपूरक व्यवसायात मत्स्यव्यवसायाचा समावेश होतो. भारताच्या किनारपट्टीत नदी, तलाव, तळी, खाडीचा काही भाग ह्यामध्ये हा व्यवसाय चालतो. माशांचे अंडीपुंज कमावणे, बोटुकली एवढी मासळी तयार करणे किंवा मोठ्या माशांचे उत्पादन घेणे. ह्यासारख्या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात गावपातळीवर रोजगार निर्मिती होत आहे.

ग्रामीण भागात जमीन कसत असताना इतर कृषी संलग्न व्यवसाय ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात केले जात आहे. प्रक्रिया उद्योगही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे रोजगार निर्मितीही त्याचप्रमाणात होत आहे. त्यामुळे लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येत आहे. म्हणजेच कृषी उद्योगाचा विकास म्हणजे खऱ्या अर्थाने भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होय.

## १७.६ ग्रामीण रोजगार निर्मितीत महत्त्व

वरील उल्लेखावरून आपणांस हे कृषी उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेत मोलाची कामगिरी बजावताना दिसून येतात. पुढील विश्लेषणावरून ग्रामीण रोजगार निर्मितीत कृषी उद्योगांचे महत्त्व अजून स्पष्ट करता येईल.

**१) रोजगार निर्मिती :**

कृषी उद्योगामुळे लहान/मोठे/मध्यम प्रमाणात प्रक्रिया उद्योग उभे राहतात. अर्थात ह्यासाठी कुशल व अकुशल कामगारांची मोठ्या प्रमाणावर गरज असते. या उद्योगांमुळे दोन्ही प्रकारच्या कामगारांना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेली दिसून येते. रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून कृषी उद्योग मोठ्या प्रमाणत महत्त्वाची भूमिका बजावतात.

**२) स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सहभाग :**

राष्ट्रीय उत्पन्न वाढून दरडोई उत्पन्न वाढल्यास लोकांचे राहणीमान उंचावते. कृषी उद्योग राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्याची कामगिरी करतात. प्रत्यक्ष कृषीमाल प्रक्रिया उद्योग आणि त्यासाठी साहाय्यक अगर पूरक उद्योग म्हणजेच कृषी उद्योगांना सुटे भाग पुरविणारे उद्योग तयार झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पादनात पर्यायाने उत्पन्नात वाढ झाली आहे.

**३) सामाजिक आर्थिक विकासात वाढ :**

कृषी उद्योगामुळे शेतकऱ्यांस भांडवल व सेवा पुरविल्या जातात. (उदा. बियाणे, प्रशिक्षण, संसाधने, उत्पादन व बाजारपेठा) शेतकी उत्पादकता वाढविण्यासाठी, शेतमालाच्या सतत मागणीसाठी, शेतकऱ्यांची शेतीविषयक साहसता वाढविण्यासाठी कृषी उद्योगांचे फारच महत्त्व आहे.

तसेच शेतकऱ्यांना बाजारपेठेसोबत जोडण्यास, बाजारपेठेतील व्यवहार करण्यास, प्रक्रिया करण्यास अतिरिक्त मालाचे उत्पादन घेऊन ते विकण्यास शेतकी मालाचे वितरण करण्यात महत्त्व आहे.

शेतीउत्पादकता आणि गुणवत्तेमुळे शेतीतील परतावा, यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होते. त्यामुळे कौटुंबिक संरक्षण व अन्न सुरक्षितता यामध्ये फार मोठा नवा बदल घडून येण्यास ही मूल्यसाखळी महत्त्वाची आहे.

**४) दारिद्र्य निर्मूलनास मदत :**

सबळ कृषी उद्योगामुळे उत्पादनात वाढ आणि लहान भूधारकांसाठी सबळ साखळी निर्माण होण्यास मदत होते. पर्यायाने दारिद्र्य निर्मूलनास मदत होते. म्हणजेच गावपातळीवर अल्प, अत्यल्प, भूधारक, कारागीर, भूमिहीन शेतमजूर यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या घटकाला मोठ्या प्रमाणात शेतात रोजगार व कृषी उद्योगात कुशल रोजगारी मिळते. महिलांनाही त्यांच्या क्षमतेप्रमाणे उद्योगात वा शेतात सामावून घेतले जाते. त्यामुळे कृषी उद्योग ज्या ज्या ठिकाणी आहेत त्या भागातील लोकांच्या जीवनमानात नक्कीच सुधार येऊन दारिद्र्य निर्मूलनास मदत झाली आहे.

**५) स्थलांतर रोखण्यास मदत :**

ग्रामीण भागातून रोजगारीच्या शोधार्थ मोठ्या संख्येने शहरी भागात व उपनगरात कुशल व अकुशल श्रमिकांचे स्थलांतर होत असते. अशा वेळी कृषी उद्योग ग्रामपातळीवर निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणात भूमिहीन शेतमजूर, अल्प, अत्यल्प भूधारक यांच्या स्थलांतरावर मोठ्या प्रमाणात मर्यादा येण्यास मदत झाली आहे.

**६) नागरी समस्यांवर मर्यादा :**

रोजगारांच्या संधी गाव किंवा तालुका पातळीवर उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या शहराकडे होणारे स्थलांतर रोखले गेल्यामुळे नागरी भागात स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक अंतर्गत समस्या काही प्रमाणात का होईना रोखण्यास मदत झाली आहे.

**७) संपत्ती निर्मितीस पाठबळ :**

कृषी उद्योगामुळे ग्रामीण भागात तयार झालेल्या कृषी उत्पादनावर प्रक्रिया झाल्यामुळे विभागीय विकासास हातभार लागला आहे. गावपातळीवर रोजगार निर्मिती झाल्यामुळे गावाकडील दारिद्र्यात घट होत आहे. शहरी भागाकडे असलेले कारखानदारीचे आकर्षण आणि त्याबाबतचे प्रशिक्षण यामुळे फारच मोठी तफावत निर्माण होते. मात्र कृषी उद्योग हे लहान/मध्यम स्वरूपाचे असल्यामुळे स्थलांतरांस मज्जाव होऊन विभागीय विकास होण्यास महत्त्वपूर्ण कामगिरी ह्या कृषी उद्योगांमुळे होत आहे.

**८) ग्रामीण भागातील आहार दर्जा सुधारण्यास मदत :**

रोजगाराअभावी दारिद्र्य आणि मग अशा वेळी मिळणारा आहारही तुटपुंजा. मात्र कृषी माल प्रक्रिया उद्योगामुळे रोजगार निर्मिती होण्यास मदत होत आहे. पर्यायाने ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. अर्थात ह्याचा परिणाम आहार दर्जात सुधारणा होण्यास झाला आहे.

**९) कृषी क्षेत्र व औद्योगिक क्षेत्राचा समान विकास :**

कृषी क्षेत्राला लागणाऱ्या अनेक घटकांसाठी विशेषत : यंत्रे, ट्रॅक्टर, नटबोल्ट, खिळे, स्क्रू वगैरेंसाठी तसेच त्यांच्या निर्मितीसाठी औद्योगिक क्षेत्राची आवश्यकता लागते. अशा वेळी शेतीसाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंची निर्मिती औद्योगिक क्षेत्रात होत असल्यामुळे कृषी क्षेत्रासोबत औद्योगिक क्षेत्राचाही समान विकास होताना दिसत आहे.

**१०) नाशवंत मालापासून दुय्यम स्वरूपाचे उत्पादन :**

शेतमाल हा नाशवंत स्वरूपाचा असतो. तसेच तो हंगामी स्वरूपाचाही असतो. अशा मालावर प्रक्रिया झाल्यामुळे मालाला काळ उपयोगिता निर्माण होते. त्यामधील टिकावूपणा वाढतो. बिगर हंगामातही माल मिळू शकतो.

**११) अल्प प्रशिक्षण व कौशल्य :**

ग्रामीण भागातील लोकांना परंपरागत व्यवसायात कौशल्य प्राप्त झालेली असतात. कृषी प्रक्रिया उद्योगात गरजेनुसार महिला व इतर घटकांना अल्प प्रशिक्षण देऊन रोजगाराची प्राप्ती झालेली दिसून येते.

अशा अनेकविध प्रकाराने आपणांस ह्या कृषी उद्योगांची महती पटवून देता येईल. एकूण भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी उद्योगाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास पर्यायाने देशाचा विकास निश्चित होणार आहे.

मात्र कृषी उद्योग सुरू करताना काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.

१) कृषी उद्योग सुरू करण्यापूर्वी शेतीतील सर्व साधनांचा पूर्ण अभ्यास करणे गरजेचे आहे.

२) तसेच संपूर्ण जिल्ह्यांचा त्यामध्ये घडणाऱ्या क्रिया, आवडी, आपल्या व्यवसायासाठी असलेली व्याप्ती यांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.

३) व्यवसाय चालू करण्यापूर्वी आधीच अस्तित्वात असलेले व्यवसाय, त्यांची स्थिती, शिल्लक साधने ह्यांचा अभ्यास असणे अगत्याचे आहे.

४) आपण गुंतवीत असलेली साधनसामुग्री, प्लॉट, भांडवल श्रम ह्यांचा पूर्ण उपयोग होणे गरजेचे आहे. ह्यासाठी ह्या घटकांचा पूर्ण अभ्यास सर्व्हे करून लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

५) प्रशिक्षित संयोजक व सुयोग्य तंत्रज्ञान ह्यांचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे.

६) पतधोरण, बाजारपेठ आणि आपल्या उत्पादनाला भविष्यात होणारी मागणी ह्यांचा अभ्यास करून वर्तमान व भविष्यकालीन धोरणे निश्चित करणे गरजेचे आहे.

हा व्यवसाय करताना पुढील समस्या प्रकर्षाने जाणवतात.

१) अन्नधान्याची साठवणूक व हाताळणी.

२) अन्नधान्य प्रक्रिया तंत्रज्ञानामध्ये सुधारणा.

३) उपउत्पादनांचा वापर.

४) मान्सून व बदलत्या पीक आकृतिबंधाचा परिणाम.

५) आधुनिकीकरणांसाठी योग्य मार्गदर्शनाचा अभाव .

६) वित्तपुरवठ्याचा अभाव.

७) उत्पादित मालाबाबत व कच्च्या मालाबाबत बाजार अनिश्चितता.

८) शेतमालाचे हंगामी स्वरूप.

ह्यासारख्या समस्यांचा आधीच विचार करून कृषी प्रक्रिया उद्योगात उतरल्यास नक्कीच फायदा व्यावसायिकांना होऊ शकतो.

## १७.७ सारांश

शेतातून येणाऱ्या अधिकतम उत्पादनाचा योग्य विनियोग करण्यासाठी शेतकऱ्याची उत्पादन घेण्याची सततची क्षमता वाढविण्यासाठी उत्पादनाला किंमत स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने कृषी प्रक्रिया उद्योग हे महत्त्वपूर्ण ठरत आहेत. ग्रामीण भागातील कुशल-अकुशल श्रमिकांना रोजगाराची

संधी प्राप्त होण्यासाठीही आणि ग्रामीण भागात जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योग महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. ग्रामीण भागात वाहतूक- दळणवळण सोयींचा विकास होण्यासाठीही फार मोठा हातभार ह्या कृषी उद्योग व्यवसायांमुळे झाला आहे. ग्रामीण भागातील होतकरू लोकांमध्ये व्यावसायिक वृत्ती वाढीस लागत आहे. वित्तीय संस्थांचा ग्रामीण भागात विकास होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण लोकांची वित्तीय संस्थांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल झाला आहे. ग्रामीण जनता वित्तीय संस्थांकडे जात आहेत. ही नक्कीच आनंदाची बाब आहे. बचतीमध्ये सुधारणा होऊ लागली आहे.

एकंदरीत असे सांगता येईल की, कृषी उद्योग हे आज महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

## १७.८ स्वाध्याय

१. कृषी उद्योगाची संकल्पना सांगून कृषी उद्योगांचे प्रकार सांगा.

२. कृषी उद्योगांची विविध कार्ये सांगा.

३. ग्रामीण रोजगार निर्मितीत कृषी उद्योगांचे महत्त्व सांगा.

४. कृषी उद्योग सुरू करताना महत्त्वाच्या कोणत्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात ?

५ कृषी उद्योगांसंबंधी समस्यांचा आढावा घ्या.

♦ ♦ ♦

# १८

# ग्रामीण पर्यटन

**पाठाची रूपरेषा**

१८.० उद्दिष्टे

१८.१ प्रास्ताविक

१८.२ पर्यटनाच्या व्याख्या

१८.३ पर्यटनाचे स्वरूप

१८.४ पर्यटनाची व्याप्ती

१८.५ पर्यटनाचे महत्त्व /फायदे

१८.६ ग्रामीण पर्यटन

१८.७ सारांश

१८.८ स्वाध्याय

## १८.० उद्दिष्टे

१) ग्रामीण पर्यटन व्यवसायाचा अर्थ समजून घेणे.

२) ग्रामीण पर्यटन व्यवसायाचे महत्त्व समजून घेणे.

३) ग्रामीण पर्यटन व्यवसायाच्या मर्यादा समजून घेणे.

२) ग्रामीण पर्यटन व्यवसायास मिळारी शासकीय मदत व धोरण अभ्यासणे.

## १८.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीविताचा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. सुरूवातीच्या काळात अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे. नवीन पर्यावरणातील बदल अनुभवणे. धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे इ. साठी पर्यटन होत असे. पर्यटन व्यवसायाला खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुद्धानंतरच चालना मिळाली. लोकांचे राहणीमान, आर्थिक सुबत्ता, तंत्रज्ञान, माहितीचा विस्फोट, पर्यटनाच्या अद्ययावत सोयी, उपग्रहीय दळणवळण, इंटरनेट व संगणकामुळे जगातील कोणत्याही ठिकाणाची क्षणार्धात मिळणारी माहिती व त्यामुळे होणारे संपर्क या कारणामुळे पर्यटन व्यवसाय अत्यंत गतिमान झाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून तर पर्यटन हा एक सेवा-व्यवसाय बनला आहे. जगातील काही निवडक प्राकृतिक देशापैकी भारत हा एक आहे. त्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणात प्राचीन किल्ले, मंदिरे, लेणी व आश्चर्ये आहेत. तसेच भारतातील जैवविविधता इतर देशांपेक्षा जास्त आहे. भारतीय संस्कृती, सण, उत्सव, ऐतिहासिक स्थळे, निसर्गरम्य ठिकाणे.

विविध स्पर्धांचे आयोजन इ. घटक विदेशी पर्यटनाच्या मनाला भूरळ घालतात. भारत सरकारकडून पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी ममअतुल्य भारत या नावाने पर्यटनाचा प्रसार व प्रचार केला आहे. पर्यटनातून रोजगारनिर्मिती. ग्रामीण भागाचा विकास, राहणीमान सुधारणा, परकीय चलन, रस्ते विकास व एकूणच आर्थिक विकास इ. गोष्टी साध्य होतात. वर्ल्ड ट्रॅव्हल आली टुरिझम कौन्सिल २०१० यांच्या आकडेवारीनुसार सन २००८ मध्ये ३० दशकास रोजगार निर्मिती ही पर्यटन उद्योगातून झाली होती. तर २०१० अखेर ४९ दशलक्ष रोजगारनिर्मिती ही पर्यटन उद्योगाद्वारे झाली हीच वाढ पुढे चालू राहिली तर सन २०२० मध्ये ५८दशलक्ष रोजगार निर्मिती पर्यटन उद्योगातून अपेक्षित आहे. २०१० च्या पहिल्या तिमाहीत मागील वर्षाच्या तुलनेत विदेशी पर्यटकांच्या संख्येत १२.८ टक्के, तर परकीय चलनामध्ये ४१.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. विदेशी पर्यटकांच्या आगमनामध्ये भारताचा क्रमांक ४१ वा आहे. तर पर्यटनापासून मिळणाऱ्या परकीय चलन प्राप्तीमध्ये भारताचा क्रमांक २२ वा आहे.

**पर्यटन म्हणजे काय? :**

पर्यटन हा शब्द इंग्रजीतील Tourism या शब्दाचे मराठी रूपांतर आहे.Tourism हा शब्द tour (प्रवास) ह्या शब्दापासून taur हा शब्द लॅटिन भाषेतील TORNOS या शब्दापासून आला आहे. याचा अर्थ वर्तुळाकार असा होतो. या शब्दापासून वर्तुळाकार प्रवास हा शब्द रूढ झाला. तसेच TORNOS या शब्दाचे रूपांतर नंतर tourn मध्ये झाले urn याचा अर्थ journey (प्रवास किंवा भ्रमंती)असा होतो. हा प्रवास किंवा भ्रमंती जागेसंबंधी शोध घेणे. शिकणे, अभ्यास करणे तसेच व्यवसाय वा आनंदासाठी होत असतो.यामध्ये माणसाने ज्या विषयी ऐकले आहे ते पाहण्याची इच्छा अंतर्भूत असते.

**पर्यटनाची संकल्पना :**

पर्यटनाची संकल्पना ही मानवी उत्पत्तीपासून आहे. अतिप्राचीन काळापासून आदिमानव अन्न, वस्त्र, निवारा यांच्या शोधात भटकत होता नंतर तो एका ठिकाणी स्थिर शेती करून आपली उपजीविका करू लागला. परंतु नंतरच्या कालावधीत मात्र त्यास व्यापार, आर्थिक उपलब्धी, लढाया इ. च्या निमित्ताने भटकावे लागले. १७ व्या शतकात युरोपमध्ये खऱ्या अर्थाने पर्यटनाची सुरूवात झाली त्या ठिकाणी दूरवरच्या सहली निघू लागल्या. नंतर १८ व १९ व्या शतकात तत्कालीन श्रीमंत व्यापाऱ्यांनी व्यापाराच्या निमित्ताने पर्यटनाला चालना दिली. त्या प्रमाणे कोलंबस मार्को पोलो, वास्को-द-गामा अशा साहसी दर्यावर्दींनी नव्या भूमीच्या शोधात जगाच्या वेगवेगळ्या भागात समुद्रमार्गे सफर केली. २०व्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात समाजातील तथाकथित उच्चभ्रू लोकच पर्यटन करीत असत. अलीकडील कालावधीत ही सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक विकासामुळे पर्यटनाच्या स्वरूपात बदल घडून येत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे पर्यटन व्यवसायाच्या प्रगतीचे चक्र अधिक गतिमान झाले आहे. आज जगातील सिंगापूर, न्यूझिलंड, थायलंड, द.आफ्रिका, ब्राझिल इ. देशांनी केवळ पर्यटन व्यवसायावर आपली प्रगती साध्य केली आहे. भारतातही अनेक राज्यांचे उत्पन्न हे पर्यटन उद्योगावर आधारित आहे. उदा. जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश, गोवा इ.

## १८.२ पर्यटनाच्या व्याख्या

१) प्रा.व्ही.एस.हर्मन- परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात वा शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून स्वगृही गमन म्हणजे पर्यटन होय. त्या भ्रमंतीत तो निरनिराळी ठिकाणे पाहतो व आनंद घेतो.

२) जोस ॲरिलागा-मोटारीने किंवा सायकलवरून फिरणे, गिर्यारोहण करणे. तळ ठोकणे, नौकाविहार करणे, खेळ इ. साठी भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय.

३) प्रा. हुंझीकेर व फ्रॅंक- कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली, अपरिचित व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्व घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय.

४) पर्यटक जेव्हा त्याने निश्चित केलेल्या ठिकाणाकडे जावयास निघतो व तेथून तो पुन्हा त्याच्या मूळ ठिकाणी परत येतो, या दरम्यानच्या कालावधीस 'पर्यटन' असे म्हणतात.

५) पर्यटन म्हणजे असा एक आर्थिक कार्यक्रम की, ज्यांत लोकांचा प्रत्यक्ष देशांतर्गत किंवा परदेशी प्रवेश, वास्तव्य व हालचाल यांच्याशी संबंध आहे यात वास्तव्याचे ठिकाण एखादा देश, प्रदेश किंवा शहर या स्वरूपात असू शकतो.

६) पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या ठिकाणापासून काही अंतरावरील दुसऱ्या अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन व ऐषआराम अशासाठी केलेले असते.

७) पर्यटन म्हणजे घराबाहेर ऐच्छिक, ठराविक केलेली क्रिया होय. यात घराबाहेर एखादा मुक्काम केला किंवा नाही यांचा सहभाग महत्त्वाचा नाही.

८) पर्यटन म्हणजे असा कार्यक्रम की, ज्याचा संबंध एखाद्या परकीयाचा प्रवास व वास्तव्याशी आहे हे वास्तव्य अल्पकालीन व मोबदला देऊन मिळविले आहे. असे गृहीत धरले जाते. म्हणजे या परकियाचे वास्तव्य हे तेथे कायमस्वरूपी नसते.

९) एखादी व्यक्ती आपले कायमचे मूळ ठिकाण सोडून इतर देश, प्रदेश, शहर वा एखादे ठिकाण येथे विशेषत : आनंद उपभोगण्यासाठी कमीत कमी २४ तासांसाठी जाते या क्रिया कालावधीला पर्यटन असे म्हणतात.

**पर्यटक म्हणजे काय?** :

पर्यटनात (Tourism) पर्यटक (Tourist) हा एक प्रमुख घटक असतो. पर्यटकाशिवाय पर्यटनाला कोणताही अर्थ नाही म्हणजे तेव्हा पर्यटनाविषयी आपण बोलतो तेव्हा त्यात पर्यटक हा घटक येतो.

१) शब्दकोशावरून- जो आनंद उपभोगण्यासाठी प्रवास करतो तो पर्यटक होय.

२) ऑक्सफर्ड शब्दाकोशावरून- जो उत्कंठेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा गमती-जमतीसाठी अथवा मी असा प्रवास केला आहे हे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास पर्यटक असे म्हणतात.

३) लीग ऑफ नेशन व संयुक्त राष्ट्रसंघटनेने केलेली (१९३७)व्याख्या- एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत कमी २४ तास वास्तव्य करणारी कोणतीही व्यक्ती म्हणजे परदेशी पर्यटक होय.

४) पर्यटकाची भारतीय व्याख्या (परदेशी)- परदेशी पर्यटक म्हणजे परदेशी परवान्याने मनोरंजन, अभ्यास, धार्मिक गोष्टी, खेळ, व्यवसाय, कुटुंब, बैठक व विशिष्ट कार्यासाठी भारताला भेट देणारी व किमान २४ तास देशात वास्तव्य करणारी व्यक्ती होय.

पर्यटनाच्या व्याख्यांवरून आढळणाऱ्या ठळक गोष्टी-

१) पर्यटन ही एक ऐच्छिक बाब आहे.

२) पर्यटनामध्ये कोणत्याही परकीयांचे वास्तव्य एखाद्या ठिकाणी कायमस्वरूपाचे नसते.

३) पर्यटनामध्ये एखादी व्यक्ती त्याच्या राहत्या ठिकाणापासून काही अंतरावर असणाऱ्या ठिकाणी अल्पकाळासाठी स्थलांतरित होते.

४) पर्यटक हा मूळ ठिकाणापासून काही कालावधीसाठी दुसऱ्या ठिकाणी जावयास निघाल्यावर स्थलांतरित झाला तरी तो परत मूळ ठिकाणी येत असतो.

५) एखाद्या नवीन ठिकाणाचे संशोधन करणे, मनोरजंन करून घेणे अथवा ऐशआराम करणे याकरिता पर्यटन केले जाते.

६) पर्यटकाचे पर्यटन स्थळावरील वास्तव्य हे रोजगाराच्या उद्देशाने अपेक्षित नसते.

**पर्यटनाची वैशिष्ट्ये :**

१) पर्यटन हे एक नसून घटना व संबंध यांचे एकत्रीकरण होय.

२) पर्यटनातील घटना व त्यांच्यामधील संबंध लोकांच्या हालचालीतून (स्थलांतर) व त्यांच्या वास्तव्यातून निर्माण होतात म्हणून पर्यटन हे गतिशील व स्थिर आहे.

३) पर्यटन हा इतर उद्योगांपेक्षा एक वैशिष्ट्यपूर्ण असा उद्योग आहे.

४) पर्यटनातील लोकांची हालचाल (स्थलांतर) ही मर्यादित काळासाठी असते.

५) पर्यटन अनुत्पादक आहे. यामागील हेतू कोणत्याही प्रकारचा रोजगार व व्यवसाय करणे नसतो.

६) पर्यटन हे विविधांगी (Multidimensional) आहे. यामध्ये पर्यटक आणि पर्यटक केंद्रे. तेथील हॉटेलमालक व पर्यटन नियोजक यांमध्ये सहकार्याची गरज असते.

७) पर्यटन हा उद्योग असला तरी यातून मालाचे उत्पादन होत नाही. यातून सेवांची निर्मिती

होते. तसेच यादवारे लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

८) पर्यटन हे हंगामी असते, कारण पर्यटन विशिष्ट काळात चालते.

९) पर्यटनावर पर्यटकांच्या कल्पना व प्रवृत्ती यांचे प्रभुत्व असते.

## १८.३ पर्यटनाचे स्वरूप (Nature of Tourism)

अगदी सुरूवातीच्या काळात पर्यटनाचे स्वरूप प्रामुख्याने आनंद मिळविणे असे होते. या स्वरूपामध्ये पन्नास वर्षांपूर्वी एकदम बदल झाला. दुसऱ्या महायुद्धात तर समाजातील उच्चशिक्षित, पाश्चात्त्य देशातील लोक निरनिराळ्या ठिकाणी सृष्टीसौंदर्य पाहण्याच्या निमित्ताने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांना भेटी देत असत.त्या काळात पर्यटकांची संख्या अगदीच मर्यादित होती. नैसर्गिक सृष्टीसौंदर्याबरोबरच कलाविष्कार व परदेशी स्थळांचा आनंद घेण्याचा उद्देश पर्यटनामध्ये होता. परंतु मागील तीन दशकांपूर्वी 'पर्यटन' संज्ञेमध्ये केवळ मौजमज्जा, आनंद लुटण्याची कल्पना मागे पडली आहे. सध्याच्या पर्यटकांची पार्श्वभूमी निश्चितच भिन्न स्वरूपाची आहे. पूर्वी केवळ समाजातील श्रीमंत लोकच प्रवासाचा आनंद लुटत असत. सध्या मात्र अगदी सामान्य आर्थिक परिस्थितीतील लोकसुद्धा पर्यटन प्रक्रियेत सामील झालेले आढळतात. प्रत्येकाच्या पर्यटनाच्या कल्पना वेगवेगळ्या आहेत. एवढेच नव्हे तर पूर्वी इतका अधिक वेळ प्रवासासाठी देणे लोकांना शक्य नसते. कारण आर्थिकदृष्ट्या पर्यटन दिवसेंदिवस महागडे बनत चालले आहे. पर्यटनाचे झालेले 'लोकशाहीकरण' हे गेल्या दोन दशकांचे वैशिष्ट्य होय. उदा. काही दिवसांपूर्वी युरोप. अमेरिकेतील हिवाळी खेळांच्या स्पर्धांचा आनंद केवळ श्रीमंत लोकांनाच लुटता येत असे. सामान्य लोकांना त्या स्पर्धा आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या नव्हत्या. इतकेच नव्हे तर पूर्वी केवळ श्रीमंतासाठी उपलब्ध होणाऱ्या घोडदौड, नौकानयन, नेमबाजी इ. स्पर्धासुद्धा सामान्य लोकांना आज उपलब्ध होत आहेत. यामुळे पर्यटकांच्या संख्येत आज लक्षणीय वाढ होत आहे. गेल्या दोन दशकांपासून पर्वतारोहण, बर्फावरील घसरगुंडी, पोहणे इ. खेळ अधिक लोकप्रिय होत आहेत. अशा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमुळे पर्यटनाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. गेल्या दोन दशकांपासून 'सामाजिक पर्यटन' ही नवीन संकल्पना उदयास आलेली आहे. या प्रकारच्या पर्यटनाने या क्षेत्रातील नवनवीन केंद्रे उदयास आलेली आहेत. कित्येक पर्यटकांना खास सवलती देखील देण्यात येऊ लागल्या आहेत. मोठ्या संख्येने पर्यटनास जाणाऱ्या लोकांकडे मनोरजंन, भोजन व इतर सुविधा स्वत :च उपलब्ध केल्या जाऊ लागल्या आहेत. वाहनांची सोय जे ते गट स्वत : करू लागले आहेत. म्हणून अशा प्रकारच्या पर्यटनाला 'सामाजिक पर्यटन' असे म्हटले जाते.

## १८.४ पर्यटनाची व्याप्ती (Scope of Tourism)

जगातील पर्यटनाचा इतिहास पाहिल्यास अगदी प्राचीन काळात पर्यटन हे अतिशय मर्यादित होते. त्यावेळी कोणत्याही प्रकारची वाहतुकीची साधने नव्हती. मनुष्य पायी, घोडे, उंट, हत्ती किंवा होड्यांतून एका भागातून दुसऱ्या भागात जात असत. हा प्रवास नातेवाईकांना भेटणे, व्यापार, यात्रा इ. उद्देशाने होत असे. नंतर मनुष्य सागरीमार्गे दूरदूरच्या धाडसी सफरी करू लागला. ह्या सफरी मुख्यत : नवीन प्रदेशांचा शोध घेणे. तेथील माहिती मिळविणे व त्यांचा अभ्यास करणे या उद्देशाने होऊ लागल्या. रोमन साम्राज्यात पर्यटनाची कल्पना बदलली आणि पर्यटन हे विशेषत : मनोरंजन, आनंद व मौजमजा यासाठी होऊ लागतो. १८ व्या शतकात युरोपमध्ये वार्षिक सुट्टीची कल्पना पुढे आली. वर्षभर काम केल्यानंतर सुट्टीच्या काळात विश्रांती घेण्यासाठी, आनंद

उपभोगण्यासाठी लोक पर्यटन करू लागले. या कल्पनेतून पर्यटनाची व्याप्ती वाढली आणि लोक निसर्गसौंदर्य, धबधबे, जंगले, समुद्रकिनारे, पशुपक्षी, ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाणे पाहणे यासाठी प्रवास करू लागले. १९ व्या शतकाच्या सुरूवातीला जगात रेल्वेमार्ग सुरू झाले. याबरोबर सफारी वाहतुकीची प्रगती झाली. २० व्या शतकाच्या सुरूवातीपासून जगात रस्त्यांचा विकास झाला व रस्त्यावरून मोटारी धावू लागल्या. त्यामुळे पर्यटनाच्या क्षेत्रात एकदम बदल झाले. अलीकडे हवाई वाहतुकीच्या विकासामुळे जग लहान झाले आहे. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती आणखी वाढली आणि पर्यटनाचे क्षेत्र खूप विशाल बनले.

## १८.५ पर्यटनाचे महत्त्व -फायदे

१) पर्यटन व्यवसाय आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

२) पर्यटन उद्योगामुळे सेवा उद्योगांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.

३) पर्यटनामुळे व्यापाराची प्रगती होते.

४) पर्यटनामुळे परदेशी चलन मिळते.

५) पर्यटनामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडते.

६) पर्यटन व्यवसायाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी मिळते.

७) पर्यटनामुळे बेकारी व अर्धबेकारीच्या समस्यांचे काही प्रमाणात निराकरण होते.

८) पर्यटन रोजगार क्षमतेचे विशेष महत्त्व म्हणजे रोजगाराचे विविधांगी स्वरूप. पर्यटनामुळे लहान- मोठ्या वयोगटातील माणसे, शिक्षित व अशिक्षित, कुशल व अकुशल नागरी व ग्रामीण अशा प्रकारच्या लोकांना रोजगार मिळू शकतो.

९) पर्यटनामुळे खास देशी बनावटीच्या हस्तकलात्मक वस्तू बनविणाऱ्या लघुउद्योगांच्या व कुटीर उद्योगांच्या विकासाला चालना मिळते. उदा. जम्मू-काश्मीरच्या शाली-गालिचे, महाबळेश्वरच्या काठ्या, गोठ्यातील शंख -शिंपल्यांच्या माळा व शोभिवंत वस्तू, सावंतवाडीची लाकडी खेळणी इ. देशपातळीवर लोकप्रिय ठरली आहेत.

१०) पर्यटन व इतर व्यवसाय यांचा निकटचा संबंध आहे. विशेषतः पर्यटनामुळे शेती व्यवसायाचा विकास होतो. पारंपरिक पिकांचे स्वरूप बदलून व्यापारी पिके, फळे, पालेभाज्या, फळभाज्या इ. पिकांखालील क्षेत्र वाढले. कारण पर्यटनामुळे या पिकांना अधिक मागणी येऊ लागली.

११) पर्यटन व्यवसायामुळे प्रक्रिया उद्योगांना चालना मिळते. उदा. फळप्रक्रिया, अन्नप्रक्रिया उत्पादनांना पर्यटनाकडून मोठी मागणी असते.

**ब) सामाजिक व राजकीय महत्त्व /फायदे :**

१) पर्यटनामुळे एखाद्या ठिकाणाची नीतिमूल्ये, त्याठिकाणच्या लोकांची जीवनपद्धती, राहणीमान इ. बाबींचा आपणाला परिचय होऊन जातो. अशा काही बाबींचे आपण भविष्यामध्ये अनुकरण करतो.

२) पर्यटनामुळे देशोदेशींचे लोक पर्यटन स्थळांना भेटी देतात त्यामुळे संबंधित देशांची संस्कृती, इतिहास, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती जगाला वा इतर देशांना समजते. यातून त्या देशाबद्दल असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होते. पर्यटनामुळे देशोदेशींचे संबंध सलोख्याचे होतात. त्यामुळे जागतिक सामंजस्य वाढण्यास मदत होते.

## १८.६ ग्रामीण पर्यटन

भारताला खेड्यांची भूमी असे संबोधले जाते. साधारणपणे ७० कोटी भारतीय शेतकरी सुमारे ६ लाख खेड्यांमध्ये वसलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सध्या शेतीचा वाटा हा १८.५टक्के एव्हढा आहे. भारताच्या लोकसंख्येतील ७०टक्के जनता शेती आणि इतर शेती उत्पन्नावर आधारित जीवन जगत आहे त्यामुळे शेती हा भारतासारख्या देशासाठी केवळ एक व्यवसाय नसून 'शेती ही भारताची परंपराच आहे' असे म्हणाायला काही हरकत नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पाश्चिमात्य आधुनिक सुधारणांचा स्वीकार होऊ लागला. आरोग्य, शिक्षण, वीज, वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्राबरोबरच शेती क्षेत्रातही सुधारित बदल होऊ लागले. याचाच एक भाग म्हणून देशातील शेती क्षेत्रात पहिली हरित क्रांती सुरू केली. सुधारित मशागत पद्धती, बी-बियाणे, खते, अवजारे आणि जलसिंचनाच्या पायाभूत सुविधा यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पादन वाढ हे प्रमुख उद्दिष्ट ठेवण्यात आले. सुरूवातीचा काळ आणि काही ठराविक राज्यांचा अपवाद वगळता यातून अपेक्षित यश प्राप्त होऊ शकले नाही. परिणामतः खेड्यांमध्ये दारिद्र्य आणि बेकारी यांचे प्रमाण वाढतेच राहिले. याला अन्यही काही कारणे कारणीभूत ठरली. याचकाळात दुसरीकडे मात्र औद्योगिक क्षेत्राचा विकास व विस्तार झपाट्याने होत राहिला आणि आजमितीस तो सुरूच आहे. तसेच सद्यस्थितीत जगभराप्रमाणे भारतातही माहिती व तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. याच माहिती-तंत्रज्ञानाला अनुसरून ग्रामीण भागात आज दिवसेंदिवस शेती यांत्रिकीकरणाने तसेच आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाते आहे. याचा विशेष अवलंब मोठे व मध्यम जमीनदार शेतकरी, प्रगतिशील व बागायतदार शेतकरी, निर्यातदार शेतकरी करत आहेत आणि या शेती यांत्रिकीकरणाला व आधुनिक तंत्रज्ञानाला फारच कमी मनुष्यबळ लागत असल्याने ग्रामीण भागात बेरोजगारीची पर्यायाने दारिद्र्यांची समस्या अधिकच प्रमाणात निर्माण झाली आहे. तसेच या सर्व प्रतिकूल बाबी व परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील लोक विशेषतः तरूण पिढी रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर शहरांकडे वळत आहे. बेरोजगारांच्या लोंढ्यामुळे शहरांमध्ये अनेक जटिल समस्या निर्माण झाल्या आहेत. यासाठी ग्रामीण भागातील लोकांना ग्रामीण भागातच अनेक योजना, प्रकल्प व कार्यक्रमांतर्गत प्रयत्न केले जात आहेत.

ग्रामीण पर्यटन हा यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो.

ग्रामीण भागातील प्रत्येक गावात उपजतच उपलब्ध असलेल्या धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, निसर्ग, विविध समाजाच्या जीवनपद्धती व सांस्कृतिक कला या घटकांच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना वाजवी खर्चात मनोरजंन व आनंद मिळविण्यासाठी राबविले जाणारे पर्यटन म्हणजेच ग्रामीण पर्यटन होय.

ग्रामीण पर्यटन हे शहरी पर्यटकांनी ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव घेण्यावर, तसेच ग्रामीण जनतेला उत्पन्नाचा नवा मार्ग मिळण्यावर प्रकाश टाकते. हे पर्यटन पर्यावरणीय पर्यटनापेक्षा (इको टुरीझम) वेगळ्या स्वरूपाचे होऊ शकते. थोड्याशा किमान नियोजन व व्यवस्थापनाने कोणतेही गाव पर्यटकांचे आकर्षण होऊ शकते. मुळातच ग्रामीण लोक हे खूप आतिथ्यशील आहेत.

जगभरच वेगाने विस्तारणारा आणि प्रथम क्रमांकाचा होऊ पाहणारा व्यवसाय म्हणून पर्यटन व्यवसाय ओळखला जातो. याचाच एक प्रकार म्हणजेच ग्रामीण पर्यटन ही संकल्पनाा कमी भांडवल व परिश्रमात ग्रामीण जनतेच्या विकासासाठी एक नवा पर्याय व दिशा ठरू शकेल.

**ग्रामीण पर्यटनाची व्याख्या** :

१) ग्रामीण भागातील धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, निसर्ग व भौगोलिक वैशिष्ट्ये, विविध सांस्कृतिक घटक, तसेच विविध समाजाच्या जीवनपद्धती, त्यांची संस्कृती, कला आणि ग्रामीण व्यवसाय यांच्यापासून निखळ आनंद मिळविणे आणि मनोरजंन करण्यासाठी जे पर्यटन राबविले जाते ते म्हणजे ग्रामीण पर्यटन होय.

२) ग्रामीण पर्यटन म्हणजे असे क्षेत्र जिथे नैसर्गिक वातावरण उपलब्ध असून नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण जसे परंपरा, स्थानिक जीवनशैली, स्थानिक सहकार्य व विश्वास यांच्या संमिश्राने तयार होणारे एकमेवादित्य पर्यटन उत्पादन जे की नैसर्गिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण व शाश्वत, तसेच ग्रामीण जीवनाचा खराखुरा आनंद आणि अनुभव देणारे असेल. असा भाग किंवा प्रक्षेत्र म्हणजेच ग्रामीण पर्यटन क्षेत्र होय.

३) ग्रामीण भागातील उपलब्ध नैसर्गिक घटकांचा महत्तम वापर व ग्रामीण वैशिष्ट्यांची जपणूक करून केले जाणारे पर्यटन म्हणजे ग्रामीण पर्यटन होय.

**ग्रामीण पर्यटनाची वैशिष्ट्ये :**

१) ग्रामीण संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि तिचा शहरी लोकांना परिचय होण्यास ग्रामीण पर्यटनामुळे मदत होते.

२) ग्रामीण लोकांच्या आर्थिक उत्पन्नाचे प्रभावी साधन.

३) ग्रामीण जतनेच्या रोजगारासाठी नवे साधन.

४) ग्रामीण व स्थानिक उत्पादनांच्या विक्रीचे प्रभावी माध्यम.

५) ग्रामीण कला, हस्तकला, लोककला व ग्रामीण खेळ यांच्या विकास व प्रसारास प्रोत्साहन मिळेल.

६) पर्यावरणपूरक पर्यटन.

७) ग्रामीण विकासाला चालना देणारे पर्यटन.

८) छोट्या व कौटुंबिक, तसेच गाव सामूहिक स्तरावर करता येणारे पर्यटन.

९) शहरी पर्यटकांना कमी खर्चिक स्वरूपाचे पर्यटन.

१०) आधुनिक जग, बदल व विकास याबाबतीत शहरी व ग्रामीण समाजात सुसंवाद घडविणारे पर्यटन.

**ग्रामीण पर्यटनाची संकल्पना :**

ग्रामीण विकासाचा नवा मार्ग किंवा पर्याय म्हणजे ग्रामीण पर्यटन असे मानले जात आहे. पर्यटन स्थळ आणि पर्यटक असे मानले जात आहे. पर्यटन स्थळ आणि पर्यटक या दोहोंच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्णत : ही महत्त्वाची बाब ठरते. याला अनुसरून गावातील प्रत्येक घटक व बाबी या वैशिष्ट्यपूर्ण असतात. उदा. गावातील निसर्ग, गावांची रचना, कौलारू, मातीची घरे, गावातील विविध समाजाच्या लोकांची जीवनपद्धती, त्यांची बोली भाषा, वेशभूषा, रूढी, परंपरा, धार्मिक स्थळे, सण-उत्सव, संस्कृती, सांस्कृतिक कला, हस्तकला, ग्रामीण व्यवसाय इ. यामुळे पर्यटनदृष्ट्या प्रत्येक गाव वैशिष्ट्यपूर्ण आढळते.

नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्धीमुळे शहरांची लोकसंख्या बेसुमार वाढत आहे. संधी व स्थिती यामुळे शहरी जीवन धावपळीचे झाले आहे. भौतिक सुख व सुविधांमुळे त्यामध्ये कमालीचे झाले आहे. भौतिक सुख व सुविधांमुळे त्यामध्ये कमालीचा कृत्रिमपणा वाढत चालला आहे. सोबतच शहरी जीवनात ताणतणावाचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे. यावर शहरी मनावरील ताण हलका करण्यासाठी त्याला पुन्हा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शहरी मंडळींना पर्यटन गरजेचे वाटते. आपसूकच त्यांची पावले मग प्रचलित पर्यटन स्थळांकडे वळतात. परंतु तेथील प्रचंड गर्दी,गोंगाट, पायाभूत सुविधांच्या गैरसोयी, विविध प्रकारचे प्रदूषण, गुन्हेगारी, अनैतिक बाबी आणि तेथील सर्वच सुविधांचे प्रचंड महागडे दर असतात. उदा. गोवा व तत्सम प्रचलित स्थळे व शहरे शांत व निवांतपणा, निखळ आनंद यांच्या अपेक्षेने गेलेल्या पर्यटकांचा तेथे प्रचंड भ्रमनिरास व अपेक्षाभंग होतो. त्याऐवजी शांत, निवांतपणा, नैसर्गिक शुद्धता व साधेपणा असलेल्या पर्यटन पर्यायाची त्यांना गरज भासते. ग्रामीण पर्यटन त्याला उत्तम पर्याय ठरू शकते. तर प्रत्येक गाव त्यादृष्टीने अनुकूल आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरू शकेल. खेड्यातील निसर्गाच्या सान्निध्यातील कौलारू घरे त्यापुढील अंगण, तुळशी वृंदावन, मागील परसबागेतील विविध फळझाडे, त्यांची हिरवीगार शेती या वातावरणाची शहरामध्ये फ्लॅट कल्चरमध्ये राहणाऱ्या लोकांना अतिशय ओढ असते. गावातील लोकांचे शांतनिवांत जीवन, पाळलेली गुरेढोरे, विहीर, त्यांची बोलीभाषा साधी राहणी, खाद्यसंस्कृती, रूढी, परंपरा, सण, उत्सव जिव्हाळायुक्त प्रेमळ आतिथ्य या सर्वांमधून निर्माण होणाऱ्या ग्रामीण जीवनाचा सुखद अनुभव घेऊन त्यातून पर्यटनाचा निखळ आनंद मिळविणे यातूनच ग्रामीण पर्यटनाचा उदय झाला. पुण्याजवळील व सिंधुदुर्गातील ठिंगणे येथील मामाचे गाव नावाने विकसित केलेली गावे शहरी पर्यटकांना ग्रामीण जीवनाचा परिपूर्ण आनंद व अनुभव देतात.

अमेरिका आणि ग्रामीण पर्यटन संकल्पना प्राधान्याने आणि जाणीवपूर्वक राबविणारा देश आहे. या ठिकाणी ग्रामीण पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. येथे ग्रामीण पर्यटन ठिकाणासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण समाज सुधारणेसाठी तिथे ग्रामीण पर्यटनाला प्राधान्य देण्यात आले आहे. विविध कार्यक्रम, पर्यटनदृष्ट्या आवश्यक घटकांच्या विकासामुळे ग्रामीण लोकांचे आर्थिक उत्पन्न चांगल्या प्रकारचे आहे. ? संशोधकांच्या मतानूसार, ''देश आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक सुबत्तेतील पर्यटन हा अमेरिकेतील महत्वाचा घटक आहे.''अमेरिकेमध्ये ३.६टक्के लोकांना पर्यटनातून रोजगार मिळतो. येथील ग्रामीण स्थानिक लोक नेहमी पर्यटन व्यवसायात लक्ष देतात. या लोकांचे राहणीमान पर्यटनामुळे विकसित झाले आहे. अमेरिकेप्रमाणे अन्य पाश्चिमात्य देशांनी प्रचलित पर्यटनाबरोबरच ग्रामीण पर्यटनांनासुद्धा चालना दिली आहे. भारतातही विशेषत : ईशान्येकडील देशांनी दुर्गम व अविकसित राज्यांच्या आर्थिक विकासाला जोड म्हणून तेथील वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण संस्कृतीच्या माध्यमातून ग्रामीण पर्यटन संकल्पनेला प्राधान्य देण्यात आले आहे. उदा. आसाम, नागालँड, मणिपूर, सिक्कीम ही राज्ये.

**ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप :**

आज शहरांमध्ये राहणारे लोक हे नोकरी-व्यवसायासाठी कधी काळी आपल्या गावातूनच आलेले असतात. त्यांच्या सुखाचा आणि प्रगतीच्या कल्पना या वाढत्या असतात. त्या साध्य करताना त्यांना खूप ताणतणाव जाणवत असतो. हा ताणतणाव नाहीसा करण्यासाठी तसेच शरीर-मनाला आराम देण्यासाठी आणि कुटुंबासोबत आनंद मिळविण्यासाठी त्यांना पर्यटनाची आवश्यकता भासते. अशा वेळी सर्वप्रथम त्यांच्या नजरेसमोर आपले गाव येते. गावातील निसर्गसौंदर्य, शांत निवांतपणा, ग्रामीण भोजनाचा आस्वाद या सर्वांची आठवण होते. यामुळेच विविध सुट्ट्यांच्या निमित्ताने, गावातील शेती. फळांचे हंगाम, गावातील विविध जत्रा, सण, उत्सव यांच्या निमित्ताने शहरी मंडळी स्वत :च्या, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच काही विशेष बाबींसाठी प्रसिद्ध असणाऱ्या गावांमध्ये जातात. शहरात एक प्रकारच्या सिमेंटच्या जंगलात राहणाऱ्या, भौतिक सुविधाचा कृत्रिमपणा आणि तोचतोचपणाला कंटाळलेल्या शहरी पर्यटकांना ग्रामीण पर्यटनाच्या निमित्ताने गावातील व ग्रामीण जीवनशैलीतील प्रत्येक बाबीमध्ये नैसर्गिक आनंद, शुद्धता, ग्रामीण बाजार आणि विशेष म्हणजे ग्रामीण आपलेपणा अनुभवता येतो, उदा. गावातील हिरवागार निसर्ग-शेती, शुद्ध हवा, टुमदार कौलारू घरे, अस्सल ग्रामीण चवीचे भोजन आणि ग्रामीण लोकांचे प्रेमळ आदरातिथ्य.

ग्रामीण पर्यटनामध्ये शहरी पर्यटकांना काही जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या सुविधांची अपेक्षा नसते. तर ग्रामीण लोकांच्या दैनंदिन जीवनातील बाबींमधून आनंद मिळवायचा असतो. उदा. ग्रामस्थासोबत त्यांच्या शेतावर, रानावनात फेरफटका मारणे, बैलगाडीतून सवारी करणे, विहिरीचे पाणी काढणे, पोहणे, गायीचे दूध काढणे, झुणका भाकर, ग्रामीण भोजनाचा आस्वाद घेणे, स्थानिक भवन, दशावतार, तमाशा, लावणी, यासारख्या ग्रामीण सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेणे. नदी, तलावामध्ये मासेमारी करणे, डोंगरचढाई, जंगलभ्रमंती यातून आनंद मिळविणे, गावातील परिसरातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे, ग्रामीण वस्तू-उत्पादनाची खरेदी करणे.

थोडक्यात ग्रामीण लोकांनी आपल्या दैनंदिन जीवनातील व घर-शेती परिसरातील नेहमीच्या जीवनातील व घर-शेतीपरिसरातील नेहमीच्या बाबी शहरी पर्यटकांना त्यातून आनंद मिळविण्यासाठी नीटनेटकेपणा सादर करणे, उपलब्ध करणे असे ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप आढळते. ग्रामीण पर्यटन हे अशा साध्या सोप्या स्वरूपाचे, तसेच कमी भांडवल खर्चाचे असून त्यात गावाच्या व ग्रामीण जनतेच्या आर्थिक विकासाची चांगली पर्यायी क्षमता आहे.

**ग्रामीण पर्यटन आणि कोकण :**

कोकण ही परशूरामाची भूमी म्हणून ओळखली जाते. निसर्गाने कोकणाला मुक्त हस्ताने दान केले आहे. सह्याद्रीच्या डोंगर रांगा, समृद्ध वृक्षसंपदा, नद्या, तलाव, विस्तीर्ण, समुद्रकिनारा, भरपूर पाऊस आणि डोंगराच्या पायथ्याशी वसलेली टुमदार कौलारू घरांची खेडी अशी कोकणची ओळख महाराष्ट्रात, देशात परिचित आहे. कोकणची संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. येथील मासे -भाताचे भोजन; आगरी, बाणकोरी, संगमेश्वरी, राजापूरी व मालवणी या बोलीभाषा; विविध जाती-धर्माच्या लोकांच्या वस्ती; गावातील विविध देवदेवतांची देवालये व त्यांचे सण-उत्सव व जत्रा; तारपा नृत्य, जाखडीनृत्य, नमन खेळे, दशावतार, धनगर बांधवांचे गजा व चपईनृत्य; वारली चित्रकला, ठाकर चित्रकथी, कळसुत्री बाहुल्यांचा खेळ, कापड खेळे, भजन आदी कला व लोककला इ. आणि सोबत कोकणी पाहुणचार आदीबाबींमुळे कोकण ग्रामीण पर्यटनच्या दृष्टीने अनुकूल आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ आणि कोकणच्या पर्यटन विकासाला मोठाच हातभार लागला आहे.

**पर्यटन विकासाच्या दृष्टीने कोकणचे तीन विभाग पाहता येतील :**

**अ)उत्तर कोकण :**

भौगोलिक व सामाजिकदृष्ट्या कोकणचे उत्तर कोकण आणि दक्षिण कोकण असे दोन प्रमुख भाग मानले जातात. या उत्तर कोकण विभागात ठाणे आणि रायगड हे दोन जिल्हे येतात. ठाणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांच्या विकासाच्या बाबतीत औद्योगिक विकासाला प्राधान्य दिल्याचे दिसून येते. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, मीरा- भाईंदर आणि वसई-विरार या महानगरांच्या निकटच्या सान्निध्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विस्तार झपाट्याने वाढत आहे यामुळे येथील स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. परंतु या दोन्ही जिल्ह्यांचा अंतर्गत भाग हा दुर्गम सर्वांगिणदृष्टीने अविकसित आहे. या भागामध्ये आगरी आणि वारली व कातकरी या आदिवासी समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. भात पीक आणि भाजीपाला ही यांची प्रमुख शेती उत्पादने आहेत, तर शिक्षण आणि व विकासाची आरोग्याच्या गैरसोयीमुळे यांच्या रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे. परंतु आगरी आणि आदिवासी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि येथील निसर्ग संपन्नता यांची ग्रामीण पर्यटन संकल्पनेशी सांगड घालून त्यांना विकासाचा नवा पर्याय निर्माण करून देणे शक्य आहे.

या दोन्ही जिल्ह्यांच्या समुद्रकिनारी भागात आणि अंतर्गत निसर्गरम्य भागात हॉटेल आणि हॉलिडे रिसॉर्टच्या रूपाने प्रचलित पर्यटन विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. परंतु त्याचा लाभ स्थानिकांऐवजी बाहेरच्या धनिकांनाच झाला आहे. म्हणूनच स्थानिक ग्रामीण जनतेचा रोजगार आणि उत्पन्नाच्या दृष्टीने विकास होण्यासाठी ग्रामीण पर्यटन संकल्पना येथे महत्वाची आहे.

येथील आदिवासी लोकांची संस्कृती बाह्यजगापासून अलिप्त आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. यांची घरे व गावांची रचना, तुकड्या-तुकड्यातील शेती, त्यांची वेशभूषा, वारली आणि कातकरी या बोलीभाषा, धार्मिक रूढी, परंपरा, सण, उत्सव प्रसिद्ध तारपानृत्य, निसर्गाशी एकरूप जीवनपद्धती आणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध पावलेली वारली चित्तशैली इ. सर्वच बाबी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामुळेच त्याला बाह्यजगताच्या म्हणजेच शहरी आणि पर्यटकांच्या दृष्टीने खूप पर्यटनमूल्य आहे या बाबींचा ग्रामीण पर्यटन संकल्पनेशी सांगड घालून आदिवासी लोकांचा विकास करणे शक्य आहे. यातून त्यांचे कमालीचे दारिद्र्य बऱ्याचशा प्रमाणात दूर करता येईल. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणता येईल.

यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था व इतर घटकांनी जाणीवपूर्वक व नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक आहेत. असा एक उत्तम व पथदर्शक प्रयत्न ठाणे जिल्ह्यामध्ये जव्हार तालुक्यातील 'केळीचा पाडा' या गावात 'बायफ मित्र' या स्वयंसंस्थेने ग्रामीण पर्यटन आणि शेती विकास यांच्या माध्यमातून केला आहे आणि विशेष म्हणजे याला स्थानिक आदिवासी जनतेने आणि शहरी पर्यटकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

आदिवासी लोकांप्रमाणेच येथील प्रस्थापित समाजातील शेतकरी लोकांच्या विकासाची दयनीय अवस्था आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या घरात पर्यटकांची राहण्याची व्यवस्था, त्यांचे स्थानिक भोजन, गावातील निसर्ग, सण, उत्सव, जत्रा यांमधून शहरी पर्यटकांना ग्रामीण पर्यटनाचा खरा आनंद देता येईल.

अशा प्रकारे ग्रामीण पर्यटन व्यवसायातून आदिवासी आणि ग्रामीण लोकांना आर्थिक विकासाचा, रोजगार, स्वयंरोजगाराचा नवा मार्ग उपलब्ध करून देता येईल.

**ब) दक्षिण कोकण :**

दक्षिण कोकण भागामध्ये रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे येतात. येथील ग्रामीण जनता संस्कृती आणि सामाजिकदृष्ट्या उत्तर कोकणपेक्षा अधिक सुधारित वाटते. ग्रामीण पर्यटनाच्या दृष्टीने येथील परिस्थिती अधिक अनुकूल आहे. येथील गावांमध्ये विविध जाती- धर्माच्या लोकांच्या वाडी-वस्त्या, पक्की चिरेबंदी कौलारू घरे, चांगली शेतीवाडी, गुरे - ढोरे, आंबा-काजू-नारळ-पोफळीच्या बागा, विविध देवतांची मंदिरे, विविध सण, उत्सव, जत्रा, तसेच पारंपरिक लोककला, ग्रामीण उत्पादने इ. घटक ग्रामीण पर्यटनातून शहरी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. यासह रस्ते व रेल्वे वाहतूक सेवा वाहतुकीची साधने, वीज-दूरसंचार सेवा, सरकारी व खाजगी आरोग्यसेवा यासारख्या पायाभूत सेवा सुविधांचा चांगला विकास झाला आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन्ही जिल्हे पर्यटनासाठी यापूर्वीच पर्यटकांच्या पसंतीस उतरले आहेत. पर्यटनाचा येथे चांगला विकास होत आहे. सद्यस्थितीतील येथील पर्यटन हे प्रसिद्ध परंतु प्रचलित स्वरूपाचे आहे. यामध्ये सागरकिनारे; गणपतीपुळे, मार्लेश्वर, कुणकेश्वर, आंगणेवाडी ही धर्मिकस्थळे; विजयदुर्ग, मालवण हे सागरी किल्ले ; थिबा पॅलेस ; चिपळूण, नांगरतास आंबोलीचे प्रसिद्ध धबधबे; आंबोली हे थंड हवेचे ठिकाण या प्रसिद्ध स्थळांचा समावेश होतो. याचा आर्थिक लाभ मर्यादित स्थानिकांनाच होतो. उर्वरित ग्रामीण भागातील जनतेला याचा फारसा लाभ होत नाही. येथील गावांतील निसर्ग, डोंगर-दऱ्या, नदी-तलाव, कौलारू मातीची घरे, शेती-बागायती, गाई-म्हशी-शेळ्यांसारखे पशुधन, विविध देवतांची देवालये, सण-उत्सव-जत्रा, विविध लोककला, हस्तकला इ.सर्वांमुळे येथील प्रत्येक गाव मुळातच एक परिपूर्ण पर्यटन स्थळ आहे. ग्रामीण पर्यटन संकल्पनेतून येथील ग्रामीण लोकांना शेतीव्यतिरिक्त शाश्वत व निरंतर आर्थिक उत्पन्नाचा पर्याय निर्माण करता येणे शक्य आहे.

**समुद्रकाठचे पर्यटन :**

महाराष्ट्राला म्हणजेच कोकणाला ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्र लाभला आहे. यामध्ये ठाणे जिल्ह्यातील डहाणू-पालघरपासून ते सिंधुदुर्गातील रेडीपर्यंतच्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याचा समावेश होतो. जगभरातील बहुसंख्य पर्यटकांची प्रथम पंसती ही समुद्रकिनाऱ्याच्या पर्यटनाला असल्याचे दिसून येते. सागरकिनाऱ्यावरील शुभ्र मऊशार वाळू, समुद्राच्या लाटा, समुद्राचा वारा, या वाऱ्यावर डोलणारी किनाऱ्यावरील सुरूची बने व नारळ, आंब्याची झाडे, मच्छिमारांच्या होड्या या सर्व आल्हाददायक सागरी वातावरणाची पर्यटकांना भुरळ पडते. कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावर कोळी, खारवी, दालदी व गाबीत इ. मच्छिमार समाजाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. यातील बहुसंख्य मच्छिमार हे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करतात. त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावर ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. परंतु अलीकडील वाढत्या यांत्रिक मासेमारीमुळे आणि समुद्रातील मत्स्यदुष्काळामुळे त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. त्यांची शेतीही नसते. त्यामुळे त्यांची बिकट परिस्थिती झाली आहे. ग्रामीण पर्यटन संकल्पना ही या पारंपरिक मच्छिमारांना नवा आर्थिक पर्याय निर्माण करू शकते. समुद्रकाठची मच्छिमारांची गावे-वस्त्या; वाळू परिसरातील कौलारू घरे, झोपड्या ; लगतची नारळ-सुपारी-आंबा-काजूची किरकोळ झाडे; त्यांची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा; कोळी, बाणकोटी दालदी उर्दू व मालवणी या बोलीभाषा. त्यांची

परंपरा, सण, नारळी पौर्णिमा उत्सव; प्रसिद्ध कोळी गीते व कोळी नृत्य ; मासेमारींची होडी, जाळी व इतर साधने ; मासळी सुकविण्याची झोपडी, कट्टे या सर्व वातावरणातून एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण मच्छिमार संस्कृती निर्माण झाली आहे. याचेही बाह्य समाज घटकांना, तसेच शहरी पर्यटकांना आकर्षण आहे. कोकणातील सागरकिनारी पर्यटनाचा चांगला विकास झाला आहे. परंतु त्याचे स्वरूप फक्त ठराविक समुद्रकिनारे आणि मोठे हॉटेल उद्योजक, यांच्यापुरताच सीमित आहे. सामान्य मच्छिमार लोकांना यांचा विशेष आर्थिक लाभ होत नाही. तसेच येथील अतिउत्साही पर्यटकांच्या स्वैराचार व अनैतिक बाबींमुळे सर्वसाधारण पर्यटकांना कुटुंबासह सागरकिनारी पर्यटनाचा खरा आनंद घेता येत नाही. ग्रामीण पर्यटन संकल्पनेतून व सामान्य मच्छिमार लोकांच्या सहभागातून येथे ग्रामीण सागरी पर्यटन राबविता येईल. जसे की, मच्छिमारांच्या राहत्या घरात पर्यटकांची निवास व्यवस्था; ताज्या मासळीचे विविध पदार्थ व मासे व भात भोजनाचा आस्वाद; होडीतून समुद्र आणि खाडीतील जलविहार, पोहणे; वाळूवरील विविध खेळ ; मासेमारीचा आनंद; मच्छिमांराच्या कोळी गीते व नृत्यात प्रत्यक्ष सहभागातून आनंद तर परतीच्या वेळी सुक्या मासळीची, मत्स्यप्रक्रिया पदार्थांची (बोंबिल, कोळंबीच्या चटण्या, कोळंबी लोणचे) खरेदी इ. स्वरूपात येथे ग्रामीण सागरी पर्यटन राबविता येणे शक्य आहे. याला शहरी पर्यटकांचा चांगल्या प्रतिसाद लाभेल. तर मच्छिमार लोकांना मासेमारी व्यतिरिक्त आर्थिक उत्पन्न व विकासाचा नवा मार्ग मिळेल.

**ग्रामीण पर्यटन आणि सिंधुदुर्ग जिल्हा :**

१९९९ साली कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील पहिला व एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. विपुल जंगलसंपदा, सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या, भरपूर पाऊस, आल्हाददायक हवामान, १२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, किल्ले व डोंगरीगड, डोंगरकुशीत तसेच समुद्र-खाडी-नदी किनारी वसलेली मालवणी संस्कृतीची खेडी, या खेड्यातील विविध जातीधर्माच्या लोकांच्या वाडी-वस्त्या, विविध देवतांची, धर्माची देवालये, त्यांच्या परंपरा उत्सव- जत्रा, लोककला-हस्तकला, भात शेती-आंबा, काजू, नारळ सुपारीच्या बागायती, मासेमारी, मालवणी बोलीभाषा इ. वैशिष्ट्यामुळे हा संपूर्ण जिल्हा पर्यटनदृष्ट्या समृद्ध बनला आहे.तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.१७, कोकण रेल्वे व नजीकच्या गोवा राज्यातील विमानतळ या आधुनिक वाहतुकीच्या सुविधाही उपलब्ध आहेत. जिल्ह्यांचा पर्यटनदृष्ट्या प्रचार, प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. पर्यटकांचा प्रतिसादही चांगला आहे. परंतु पर्यटन विकास मात्र योग्य प्रमाणात व सर्वसमावेशक होताना दिसत नाही. जिल्ह्यातील प्रचलित पर्यटन हे ऐतिहासिक मालवण किल्ला, विजयदुर्ग किल्ला, मालवण शहर, मालवण तारकर्ली, देवबाग, शिरोडा, वेळागर हे सागरकिनारे; विशाल धामापूर तलाव; कुणकेश्वर, आंगणेवाडी ही प्रसिद्ध धार्मिक स्थळे ; संस्थानकालीन सावंतवाडी शहर आणि आंबोली हे गिरीस्थान आणि तेथील धबधबा या मोजक्याच पर्यटन स्थळापुरता मर्यादित आढळतो. यात मालवण किल्ला, मालवण शहर आणि तारकर्ली, देवबाग येथील समुद्रकिनारे इ. सर्वाधिक आघाडीवर आहेत. जिल्ह्यातील या प्रसिद्ध स्थळांच्या पर्यटन विकासाचा लाभ ठराविक क्षेत्र आणि मोजक्या घटकांच्या पुरता मर्यादित आढळतो. तसेच सागरकिनारी 'स्कूबा डायव्हिंग आणि स्नॉर्कलिंग' हे विदेशी व नाविन्यपूर्ण साहसी सागरी पर्यटन प्रकार सुरू करण्यात आले आहेत. तर 'सी वर्ल्ड' हा पर्यटनदृष्ट्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प होऊ घातला आहे.

सद्यस्थितीत बहुतांशी ग्रामीण लोक जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या लाभापासून वंचित आहेत. तसेच दिवसेंदिवस बदलणाऱ्या अनिश्चित पर्जन्यमान, हवामान, तापमानवाढीमुळे शेती, बागायती उत्पादनात होणारी घट; औद्योगिक रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण, तसेच मच्छिमार लोकांच्या रोजगार व आर्थिक विकासाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ग्रामीण पर्यटन संकल्पना ही ग्रामीण भागातील सर्व घटकांना सामावून घेणारी आहे. उपलब्ध पर्यटन वैशिष्ट्ये व घटकांमुळे येथील प्रत्येक गाव स्वतंत्र पर्यटन स्थळ बनण्यास योग्य आहे, जसे की, गावातील लोकांच्या राहत्या घरात त्यांची निवास व्यवस्था, मालवणी भोजन व विविध पदार्थांचा आस्वाद, शेती-बागायती-डोंगर-निसर्ग-रानावनात भटकंती, बैलगाडीतून सफर, नदी-तलाव, खाडीत पोहणे, मासे पकडणे, झाडावर चढणे, जनावरांचे दूध काढणे, विहिरीचे पाणी काढणे, गावातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे-वास्तू पाहणे, सण-उत्सव-जत्रांमध्ये सहभागी होणे, रात्रौ लोककलांचा आनंद घेणे, गावातील चांदण्या रात्रीचा अनुभव यांसारख्या ग्रामीण जीवनातील दैनंदिन बाबींमधून येणाऱ्या पर्यटकांना आनंद अनुभवण्यास देणे. अशा प्रकारचे सहजसाध्य, कमी खर्चिक व प्रदूषणमुक्त पर्यटन या जिल्ह्यातील ग्रामीण जनतेचा रोजगार व आर्थिक विकासासाठी ग्रामीण पर्यटन संकल्पनेतून राबविणे शक्य आहे. याला शहरी पर्यटकांचा निश्चितच चांगला प्रतिसाद लाभेल. तसेच पर्यटन सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल.

**ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती :**

ग्रामीण भागात निसर्गातच उपलब्ध असलेल्या भौगोलिक, पर्यावरणीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक वैशिष्ट्यांचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी उपयोग करून घेणे आवश्यक आहे. त्यांची ग्रामीण पर्यटन संकल्पनेशी सांगड घालून ग्रामीण भाग व लोकांचा पर्यटनात्मक दृष्टिकोनातून रोजगार, स्वयंरोजगार आणि आर्थिकविषयक विकास करणे शक्य आहे. यादृष्टीने ग्रामीण पर्यटनाला खूप मोठा वाव आहे. ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**१) नैसर्गिक घटकांचा उपयोग :**

गावांमध्ये शेती व संबंधित व्यवसायाच्या व गरजांच्या वापरानंतर उपलब्ध असलेल्या जंगल, डोंगर-दऱ्या, नदी, तलाव, खाडी, सागर किनारे, वन्यजीवन, मुसळधार पाऊस, शुद्ध हवा या सर्व निसर्गसौंदर्यांचा उपयोग करून ग्रामीण लोकांचा रोजगार व आर्थिक विकास करण्यास येथे खूप मोठा वाव आहे.

**२) पर्यटकांची शांत- निवांतपणाची गरज :**

आज जगभरातील विकसित, विकसनशील देशातील, महानगरातील शहरी लोक तेथील वाढती प्रचंड गर्दी, गोंगाट, प्रदूषण, धावपळ, ताणतणाव, स्पर्धा यामुळे खूप त्रस्त झालेले दिसतात. त्यामुळे तेथे शांत-निवांतपणा दुर्मिळ होत चालला आहे. शरीर- मनाला आनंद, उत्साह देण्यासाठी याची त्यांना नितांत गरज भासत आहे. ग्रामीण भागात व लोकजीवनामध्ये निसर्गत :च उपलब्ध असलेला हा शांत व निवांतपणा ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना अनुभवू देण्यास येथे सहजसाध्य आहे.

**३) ग्रामीण लोकजीवन व संस्कृतीचे आकर्षण :**

शहरातील आधुनिक जीवनशैलीत भौतिक सुविधा व आधुनिक मनोरंजनाची साधने-माध्यमे यांचा विकास झाला आहे. परंतु यामध्ये येणारा तोचतोचपणा व कृत्रिमपणा तसेच अभिरूचीतील बदल म्हणून वेगळ्या पर्यायाची गरज भासते. त्याचप्रमाणे ग्रामीण संस्कृती ही शहरी संस्कृतीपेक्षा भिन्न आणि मनाला खरे समाधान व पर्यटनाचा शाश्वत आनंद देणारी असल्याने त्यांना ग्रामीण

संस्कृतीचे आकर्षण वाटत आहे. त्यामध्ये ग्रामीण लोकजीवन, त्यांची वेशभूषा, बोलीभाषा, स्थानिक खाद्यसंस्कृती, धार्मिक परंपरा, लोककला, शेती व पूरक व्यवसाय इ. वैशिष्ट्यांच्या आधारे शहरी पर्यटकांना ग्रामीण पर्यटनासाठी आकर्षक करता येईल.

**४) कौटुंबिक मनोरंजनाचे साधन :**

जीवनाच्या प्रत्येक बाबीविषयी जागरूक असणारे शहरी लोक आपल्या मानसिक व मनोरंजन स्वास्थ्यासाठी पर्यटनाला प्राधान्य देतात. परंतु प्रचलित व प्रसिद्ध पर्यटन स्थळांवर आढळणारा वाढता बीभत्सपणा, स्वैराचार, गुन्हेगारी, अनैतिक बाबी यांमुळे त्यांना कुटुंबासह मनोरंजन, पर्यटनाचा मनापासून आनंद घेता येत नाही. परंतु ग्रामीण पर्यटन माध्यमातून गावातील विविध सण,उत्सव, जत्रा, ग्रामीण खेळ, विविध लोककला, शेतावरील-रानावनातील भटकंती, तसेच बैलगाडीची सफर आदी बाबींमधून ग्रामीण पर्यटनाचा व मनोरंजनाचा कुटुंबासह निखळ आनंद घेता येईल.

**५) कमी खर्चिक स्वरूपाचे पर्यटन :**

आज पर्यटन ही केवळ उच्चभ्रू वर्गाचीच मिरासदारी राहिली नसून तर शहरी जीवनशैलीतील वाढती स्पर्धा, ताणतणाव आदींमुळे समाजातील सर्व घटकांची ती एक गरज बनली आहे. तसेच जगभर पर्यटनाच्या वाढत्या प्रचार व प्रसारामुळे समाजातील सर्व घटकांना त्याची भुरळ पडली आहे. परंतु प्रचलित पर्यटन स्थळांच्या ठिकाणी निवास व्यवस्था, खानपान सुविधा, वाहतूक व्यवस्था व अन्य अनुषंगिक सुविधा यांचे दर प्रचंड प्रमाणात वाढलेले असल्याने बहुतांश सामान्य पर्यटक घटकांना त्यापासून दूर व वंचित राहावे लागते. यातुलनेत ग्रामीण पर्यटन सर्वार्थाने कमी खर्चिक स्वरूपाचे असल्याने शहरी पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळविल्यास येथे संधी आहे.

**६) ग्रामीण संस्कृती व परंपराचे जतन :**

आधुनिक जीवनशैली, सुधारित सुखसुविधा, मनोरंजनाची नवी साधने, शहरीकरणाचा वाढता विस्तार, शहरांशी विविध कारणांनी येणारे वाढते संबंध इ. अनेक बाबींचा ग्रामीण भागावर प्रभाव पडत आहे त्याचप्रमाणे ग्रामीण लोकही शहरी व आधुनिक बाबींचा स्वीकार करू लागले आहेत. या सर्व कारणांचा ग्रामीण संस्कृती व परंपरांवर बरे वाईट परिणाम होत आहेत. ग्रामीण संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण देशाचा वारसा असल्याने तिचे भविष्यकाळाच्या दृष्टीने जतन होणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण पर्यटनामुळे या ग्रामीण संस्कृती विविध परंपरांचे जतन होण्यास हातभार लागू शकतो.

**७)ग्रामीण कला, लोककला, हस्तकलांचा प्रसार :**

संस्कृतीमध्ये आढळणाऱ्या विविध कला, लोककला व हस्तकला या ग्रामीण जीवनाचा महत्त्वाचा भाग आहेत. तसेच ती त्यांची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक ओळखही आहे. शेकडो वर्षांच्या परंपरेने त्या जतन केल्या आहेत. आतापर्यंत त्या ग्रामीण भाग व संस्कृतीपुरत्या मर्यादित होत्या. परंतु वाढत्या पर्यटन प्रसारामुळे त्यांना सांस्कृतिक, व्यावसायिक आणि पर्यटनमूल्य प्राप्त झाले आहे. ग्रामीण पर्यटनामुळे बाह्यजगताशी परिचय होऊन त्यांचा देश-विदेश स्तरावर प्रसार होत आहे. उदा. वारली चित्रकला, मालवणी दशावतार, सावंतवाडीची लाकडी खेळणी, कोळीगीते व नृत्ये इ.

**८) ग्रामीण उत्पादनांना बाजारपेठ :**

ग्रामीण भागातील लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी तसेच दैनंदिन उपयोगासाठी विविध उत्पादने व वस्तू तयार करीत असतात. त्यांना ग्रामीण उत्पादने असे म्हणतात. ही ग्रामीण उत्पादने नैसर्गिक स्वरूपाची तसेच गुणवतापूर्ण असतात. त्याचप्रमाणे ही ग्रामीण उत्पादने त्यांच्या आर्थिक मिळकतीचे साधन असतात. परंतु ग्रामीण भागातील स्थानिक व आठवडे बाजार ही त्यांना मर्यादित बाजारपेठ असते. त्यातून त्यांना मर्यादित बाजारपेठ असते त्यातून त्यांना तुटपुंजे आर्थिक उत्पन्न मिळते. दुसरीकडे शहरी लोकांना या वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण वस्तू व उत्पादनाचे औत्सुक्य व आवड असते. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून आलेल्या देशी -विदेशी पर्यटकांच्या रूपाने त्यांना चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. आर्थिक उत्पन्न मिळू शकते. उदा. हात साडीचे तांदूळ, कोकम, सुकी मासळी, डांगराचे पीठ, कापडी बांबू ,लाकडाच्या शोभेच्या वस्तू, मातीची भांडी, चामड्याच्या चपला वगैरे.

**९)स्थलांतराला आळा आणि बेकारी निर्मूलन :**

ग्रामीण भागातील शेती आणि अन्य पारंपरिक व्यवसायातून पुरेसा व वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. तसेच पर्यायी रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बेकारी आढळते. परिणामी दारिद्र्य व गरिबी आढळते. तर दुसरीकडे शहरांतील ओद्योगिक व सेवा व्यवसायांच्या विकासामुळे रोजगाराच्या विविध संधीची उपलब्धता आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोक विशेषतः तरूण पिढी रोजगारासाठी शहराकडे मोठ्या प्रमाणात धाव घेत आहे. त्यातून ग्रामीण भागात स्थलांतरांची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर ग्रामीण पर्यटनाचा प्रभावी व नियोजनबद्ध प्रसार केल्यास त्यातून ग्रामीण भागात विविध स्वरूपाचे रोजगार , स्वयंरोजगार सुरू करता येतील. त्यामुळे ग्रामीण भागातील स्थलांतराला आळा घालून, बऱ्याच प्रमाणात बेकारीचे निर्मूलन करणे शक्य आहे.

**१०)पडीक जमीन व शेती विकासाला चालना :**

शेतीच्या पारंपरिक व हंगामी स्वरूपामुळे तसेच त्यातील मोठ्या प्रमाणातील रोजगाराच्या अभावामुळे ग्रामीण भागातील लोकांनी विशेषत : तरूणपिढीने शहराकडे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले आहे. या स्थलांतरामुळे ग्रामीण भागात बहुतांशी जमीन व शेती पडीक राहिली आहे. ग्रामीण पर्यटनाच्या रूपाने याला साहाय्यभूत पर्याय निर्माण झाला आहे. तर ग्रामीण ग्रामीण पर्यटनात शहरी पर्यटकांच्या दृष्टीने असलेली शेती संस्कृतीचे महत्त्वाचे आकर्षण याचा पर्यटनपूरक लाभ करून घेण्यासाठी ग्रामीण भागातील पडीक जमीन व शेती विकासाला चालना देता येईल.

**११)ग्रामीण विकास आणि देशाच्या विकासाला चालना:**

ग्रामीण भागातील शेतीची असंतुलित स्थिती, पर्यायी रोजगाराचा अभाव, विकास योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी, शासन व शासकीय यंत्रणेची अनास्था, भ्रष्टाचार व वाढती महागाई इ. अनेक कारणामुळे ग्रामीण विकासाची स्थिती चिंताजनक असल्याची आढळते. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी अन्य उपाय व पर्यायांची गरज निर्माण झाली आहे. ग्रामीण पर्यटन संकल्पना याला उत्तम व शाश्वत उपाय किंवा पर्याय ठरू शकते. यासाठी आवश्यक पर्यटन घटक गावात, ग्रामीण

भागात उपजतच उपलब्ध आहेत. याला मोठ्या भांडवल उभारणीची, व्यावसायिक यंत्रणा व व्यावसायिक विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. ग्रामीण पर्यटनातून गावातील प्रत्येक लोक व समाज घटकाला रोजगार व उत्पन्न मिळू शकेल. परंतू, ग्रामीण जनतेचा प्रतिसाद किमान प्रशिक्षण, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास, स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार, शासनाचा आस्थापूर्वक सहकार्य, योग्य नियोजन-समन्वय व प्रचाराची निश्चितच गरज आहे. यामूळे ग्रामीण जनता, ग्रामीण विकास व पर्यायाने देशाच्या विकासाला जरूर ती चालना मिळेल.

**ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व :**

गावातच उपलब्ध घटकांचे ग्रामीण पर्यटन व्यवसायाच्या दृष्टिकोनातून योग्य ते व्यवस्थापन केल्यास व त्यामध्ये समन्वय साधल्यास त्यातून गावांच्या व ग्रामीण जनतेच्या विकासाचा एक नवा पर्याय व मार्ग मिळेल या दृष्टिकोनातून ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व समजणे आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे.

**१)गावातच रोजगाराची उपलब्धता :**

ग्रामीण पर्यटन हे थेट गावातच राबविले जाते. ग्रामीण पर्यटन व्यवसायामुळे लोकांना गावातच रोजगार उपलब्ध होतो. उदा. गावामध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची न्याहरी-भोजन व निवास व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, ग्रामीण जीवनशैलीचं मार्गदर्शन (टुरिस्ट गाईड), गाव-शिवारातून बैलगाडीची सैर करणे, गावातील धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक वैशिष्ट्यांचे स्थलदर्शन घडविणे, पर्यटकांना आवडणाऱ्या ग्रामीण वस्तूचे उत्पादन करणे, पर्यटकांसाठी स्थानिक, सांस्कृतिक कला व क्रीडा सादर करणे. यासारख्या अनेक बाबींमधून ग्रामीण पर्यटनामुळे लोकांना गावातच रोजगार उपलब्ध होतो.

**२) ग्रामीण व स्थानिक उत्पादनांची विक्री :**

गावातील लोक विविध प्रकारची शेती पिके, फळ पिके, अन्नप्रक्रिया पदार्थ, फळप्रक्रिया पदार्थ, घरगुती वापराच्या वस्तू, आयुर्वेदिक औषधे, काही वनउत्पादने इ. यांचे कमी-अधिक प्रमाणात उत्पादन होत असतात. ही सर्व ग्रामीण उत्पादने नैसर्गिक तसेच गुणवत्ता व वैशिष्ट्यपूर्ण असतात. शहरी लोकांना या ग्रामीण उत्पादनांची खूप आवड असते आणि ग्रामीण पर्यटनदरम्यान ते यांची आवडीने खरेदी करतात. यामुळे गावातील लोकांना स्थानिक पातळीवरच आपल्या ग्रामीण उत्पादनांच्या विक्रीसाठी विक्रीव्यवस्था व विना दलाली उत्पन्नांचा मार्ग उपलब्ध झाला आहे.

**३) स्थानिक संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार :**

ग्रामीण भागातील लोकांची बोलीभाषा,वेशभूषा, परंपरा, सण , उत्सव, धार्मिक, श्रद्धा, व्यवसाय यातून त्यांची संस्कृती निर्माण होते. ही संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. या संस्कृतीचा बाह्यजगताशी फारसा संबंध येत नाही. परंतु ग्रामीण पर्यटनामुळे या संस्कृतीचा शहरी पर्यटकांना अनुभव व आनंद घेता येतो. तसेच बहुविध प्रकारच्या पर्यटकामुळे त्याचा अगदी राष्ट्रीय व जागतिक स्तरावर प्रसार होण्यास मदत होतो. उदा. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांची वारली चित्रशैली, तारपा नृत्यप्रकार, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार लोककला व मालवणी बोली भाषा यांचा ग्रामीण पर्यटनातून चांगला प्रसार होत आहे. यामुळे शहरी व विदेशी पर्यटकही येथे ग्रामीण पर्यटनासाठी येत आहेत. याचा फायदा तेथील जनतेच्या आर्थिक विकासासाठी होत आहे.

**४) स्थानिक पर्यावरणाचे जतन :**

गावातील निसर्ग, वृक्षसंपदा, शेती, नद्या, तलाव, डोंगर टेकड्या त्यातील वन्यजीवन तसेच धार्मिक व ऐतिहासिक स्थळे या सर्वांपासून गावाचे नैसर्गिक, साामजिक व सांस्कृतिक पर्यावरण जसे आहे, तसेच म्हणजेच नैसर्गिक व पारंपरिक स्वरूपात पाहण्यास शहरी पर्यटकांना आवडते. ग्रामीण पर्यटन या व्यवसायांच्या संकल्पनेतून याचा रोजगार व उत्पन्न मिळविण्यासाठी आपल्याला लाभ होऊ शकतो. ग्रामीण लोकांना आता पटू लागले आहे. त्यामुळे त्याचे संवर्धन व जतन आपण केले पाहिजे ही भावना ग्रामीण लोकांमध्ये वाढीस लागली आहे. एकंदरीतच ग्रामीण पर्यटन संकल्पनेमुळे ग्रामीण भागातील स्थानिक पर्यावरणाच्या जतन होण्यास मदत होत आहे.

**५) लोककलांचे जतन व त्यास व्यावसायिक रूप :**

निसर्गसौंदर्य व अन्य बाबींप्रमाणेच विविध लोककलांच्या बाबतीतही ग्रामीण जीवन समृद्ध असते. ग्रामीण भागात विविध प्रकारच्या लोककला आढळतात. शेकडो वर्षांच्या परंपरेने चालत आलेल्या या लोककलांचे ग्रामीण जनतेने जतन केले आहे. या लोककलांना अस्सल ग्रामीण बाज व ढंग असतो. त्यामुळेच त्या शहरातील आधुनिक मनोरंजन कलापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असतात. या स्थानिक लोककलांचे सादरीकरण प्रामुख्याने धार्मिक सण-उत्सव व कौटुंबिक कार्यक्रमांच्या वेळीच केले जाते. अलीकडच्या काळात शहरी आधुनिक मनोरंजन साधनांच्या आक्रमणामुळे तसेच रोजगारांसाठी स्थानिक लोकांचे शहराकडे वाढते स्थलांतर यामुळे या लोककला हळूहळू लोप पावण्याची स्थिती निर्माण झाली आहे. परंतु ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांचा त्यास मिळणारा उत्स्फूर्त व सशुल्क प्रतिसाद पाहता या ग्रामीण कलांचे जतन व त्यांना व्यावसायिक रूप मिळण्यास मदतच होत आहे. उदा. ठाणे, रायगड जिल्ह्यातील जाखडी नृत्य, नमन खेळ तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार, गजानृत्य, कापडखेळे, ठाकर समाजाची कळसूत्री बाहुल्यांची चित्रकथी, सावंतवाडीची लाकडी खेळणी, गंजिफा तर मच्छिमार समाजाची घुमाट लोककला इ.

**६) स्थानिक लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल :**

शेती व्यवसाय हा ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रमुख साधन होय. परंतू बदलते हवामान, कमी उत्पादकता व पडीक शेतीचे जास्त प्रमाण यामुळे शेतीतून गावातील लोकांना हंगामी स्वरूपात व कमी प्रमाणात रोजगार मिळतो. त्यामुळे उर्वरित लोकांच्या रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे. परंतू ग्रामीण पर्यटन व्यवसायातून गावातील बहुतांश लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. जसे की शेती व शेतीपूरक उत्पादनाचे उत्पादन, पर्यटकांसाठी भोजन व निवास व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, स्थानिक-ग्रामीण तसेच हस्तकला उत्पादने, ग्रामीण कला, लोककला व खेळांचे सादरीकरण, पर्यटन मार्गदर्शक (टुरिस्ट गाईड) या व इतर बाबीची ग्रामीण पर्यटनासाठी नितांत गरज आहे. यातून गावातील उत्पादन घेणाऱ्या तसेच पर्यटकांना विविध सेवा देणाऱ्या अशा बहुतांश लोकांना रोजगार प्राप्त होऊ शकतो आणि त्यापासूनच्या उत्पन्नामुळे निश्चितच स्थानिक लोकांच्या राहणीमानचा दर्जा उंचावू शकतो.

**ग्रामीण पर्यटनाच्या मर्यादा :**

ग्रामीण पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेच्या विकासासाठी एक नवा मार्ग किंवा पर्याय निर्माण केला आहे. परंतु पर्यटक व ग्रामीण जनता या दोहोंच्या दृष्टिकोनातून त्याचा

प्रचार-प्रसार व विकास अपेक्षित गतीने होताना दिसत नाही. याबाबतीत अनेक उणिवा व मर्यादा आढळतात त्या खालीलप्रमाणे.

**१) ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता :**

ग्रामीण भागातील लोक हे रूढी व परंपरावादी म्हणून ओळखले जातात. तसेच त्यांची मानसिकताही बहुतांशी प्रमाणात स्थितीप्रिय आढळते. बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च, बाजारातील अनिश्चित दर, दलाल, सावकारांकडून फसवणूक या व इतर कारणांमुळे तोट्याची शेती, व्यवसाय यातून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांची ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे. गावातील लोकांची वाढती आर्थिक हलाखी व बेरोजगारी यावरील अनेक पर्याया पैकी ग्रामीण पर्यटन व्यवसाय हा उत्तम व किफायतशीर पर्याय ठरू शकतो यासाठी गावामध्ये उपजतच उपलब्ध असलेले नैसर्गिक, भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक घटक आहेत त्याच स्वरूपात मात्र किमान नियोजन, व्यवस्थापन व प्रशिक्षणाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना अनुभव व आनंद मिळविण्यासाठी सशुल्क स्वरूपात उपलब्ध करता येतात. मात्र याच्यासाठी काहीतरी नवे शिकण्याची व करण्याची तयारी पाहिजे. परंतु किरकोळ अपवाद वगळता ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता यासाठी विशेष तयार झालेली दिसून येत नाही.

**२) आर्थिक अडचण :**

तोट्यातील शेती व्यवसायाला ग्रामीण भागात ग्रामीण पर्यटन व्यवसाय पर्याय म्हणून पुढे येत आहे. तसेच पर्यटनाच्या निखळ आनंद मिळण्याचा चांगला पर्याय म्हणून शहरी पर्यटक ग्रामीण पर्यटनाला चांगला प्रतिसाद देत आहेत. याचा एकत्रित परिणाम म्हणून ग्रामीण भागातील काही लोक ग्रामीण पर्यटन व्यवसाय सुरू करण्यास पुढे येत आहेत, पंरतू त्यांच्यासमोर भांडवल उभारणी ही प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. शासनाकडून ग्रामीण पर्यटन व्यवसायास पूरक म्हणून 'न्याहरी निवास योजनेची' परवानगी मिळण्याखेरीज कोणत्याही अर्थसाहाय्याची किंवा अनुदानाची मदत मिळत नाही, तर ग्रामीण पर्यटन ही संकल्पना वा व्यवसाय अजून प्रचलित वा त्याचा विकास न झाल्याने तसेच या व्यवसायातील उत्पन्नाची हमी किंवा त्यात सातत्य नसल्याने सरकारी आणि खाजगी बँका भांडवल उभारणीसाठी अर्थसाहाय्य करण्यास तयार होत नाहीत.

**३) प्रशिक्षणाचा अभाव :**

ग्रामीण भागातील लोकजीवन, तेथील निसर्ग, समुद्रकिनारे, भौगोलिक वैशिष्ट्ये, धार्मिक ऐतिहासिक स्थळे, लोककला, उत्सव या सर्वांमधून प्रचलित पर्यटन स्थळांपेक्षा मिळणारा पर्यटनाचा शाश्वत आनंद मिळविण्यासाठी शहरी पर्यटकांची पावले बऱ्यापैकी प्रमाणात ग्रामीण भागातील लोक याचा लाभ घेताना दिसत नाहीत. यातील प्रमुख कारण म्हणजेच पर्यटन प्रशिक्षणाचा अभाव होय. ग्रामीण पर्यटनाचे व्यवसाय म्हणून अपेक्षित असलेले आतिथ्य, पर्यटकांशी सुसंवाद साधणे, पर्यटकांच्या अपेक्षा जाणून घेणे, पर्यटकांना द्यावयाच्या सुविधांमध्ये स्वच्छता-टापटिपपणा-नीटनेटकेपणा, त्यांची प्रवास व्यवस्था, सुरक्षितता तसेच व्यवसायाचे नियोजन आणि व्यवस्थापन इ. बाबीमुळे त्याच्या व्यवसायामध्ये विस्कळीतपणा जाणवतो. पण पर्यटकांना यामुळे पूर्ण समाधान मिळत नाही. ग्रामीण लोकांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी शासकीय यंत्रणा, तसेच स्वयंसेवी संस्थांनी पुढे येणे गरजेचे आहे.

**४) पायाभूत सुविधांचा अभाव :**

प्रचलित पर्यटन स्थळांकडून होत असलेला भ्रमनिरास, तर दुसरीकडे ग्रामीण पर्यटनामुळे मिळणारा नैसर्गिक व शाश्वत आनंद समाधान यामुळे ग्रामीण पर्यटनाला शहरी पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. तरी याचा फारसा विकास न होण्यामागे ग्रामीण भागात अजून पायाभूत सुविधांचा विकास पुरेशा प्रमाणात व योग्य प्रकारे न होणे ही मुख्य अडचण आहे. आजही बहुतांशी ग्रामीण भागात व खेड्यांमध्ये रस्त्यांची दयनीय स्थिती आहे. विविध वाहतूक यंत्रणा टेलिफोन, मोबाईल, आवश्यकप्रसंगी वैद्यकीय सुविधा, तसेच ग्रामीण पर्यटन स्थळांची माहिती देणारी यंत्रणा इ.पायाभूत सुविधा या योग्य स्वरूपात नसल्याने त्याचे दुष्परिणाम ग्रामीण पर्यटनाच्या प्रचार, प्रसार व वाढीवर देखील होत आहेत.

**५) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव :**

ग्रामीण पर्यटनाची अवस्था कस्तुरीमृगाप्रमाणे आहे असे म्हणावयास हरकत नाही. कारण ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून गावातील सर्व घटकांचा म्हणजेच शेतकरी-शेतमजूर, उत्पादक-अनुत्पादक, प्रतिष्ठित-सामान्य, ग्रामीण कारागीर-लोककला कलाकार, पुरूष-महिला-युवक इ. चा विकास करण्याची क्षमता आहे. गरज आहे ती योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाची तसेच ग्रामीण पर्यटनाच्या गतिशील प्रसारासाठी वर्तमानपत्रे, मासिके, याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान वापर होणे गरजेचे आहे. परंतू ग्रामीण पर्यटनाच्या बाबतीत याचा अभाव जाणवतो. माहिती तंत्रज्ञानाने (इंटरनेट) आज जग जवळ आहे. जगभराच्या पर्यटन व्यवसायाच्या प्रचार व प्रसारामध्ये इंटरनेट तंत्रज्ञानाचा मोलाचा हिस्सा आहे. अगदी राजस्थान व केरळ या राज्यांतील अनुक्रमे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि निसर्ग पर्यटनाच्या वाढीत इंटरनेटवरील जाहिरात व माहिती प्रसाराचा महत्त्वपूर्ण हिस्सा आहे. परंतु महाराष्ट्रातील व कोकणातील ग्रामीण पर्यटनाचा प्रसार व प्रचार यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा बऱ्यापैकी अभाव आढळतो.

**६) शासकीय धोरण आणि अनास्था :**

शेतीच्या दुरावस्थेमुळे ग्रामीण जनतेची आर्थिक व रोजगाराच्या बाबतीत दयनीय अवस्था झाली आहे. ती सुधारण्याची प्राथमिक जबाबदारी शासनाची आहे. अशा पार्श्वभूमीवर ग्रामीण पर्यटनाचा सक्षम पर्याय निर्माण झाला आहे. परंतु त्याच्या यशस्वितेसाठी शासनाच्या प्रोत्साहनाची गरज आहे, ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून गावातील लोकांचा पर्यायाने ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी शासनाने संबंधित विभागांना एकत्रित आणून एक सर्वकष धोरण तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रत्येक गावाचा पर्यटन विकास आराखडा तयार करणे, लोकांमध्ये ग्रामीण पर्यटनाबाबत जाणीव जागृती निर्माण करणे, योग्य ते नियोजन व व्यवस्थापन करणे, ग्रामीण पर्यटन व्यवसायासाठी इच्छुकांना अर्थसाहाय्य करणे. देश-विदेशात ग्रामीण पर्यटनाचा प्रचार-प्रसार करणे, ग्रामीण पर्यटन महोत्सव यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणे इ. परंतु शासन आणि शासकीय यंत्रणा यांच्या स्तरावर या बाबतीत निरूत्साह व अनास्थाच आढळून येते.

**७) सांस्कृतिक बदल आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास :**

आधुनिक युगातील सुधारित बदल आणि भौतिक सुविधा काहीशा प्रमाणात ग्रामीण लोकांनी स्वीकारल्या असल्या तरी आपल्या संस्कृती आणि सामाजिक मूल्यांविषयी ते फार संवेदनशील

असतात. वर्षानुवर्षे चालत आलेल्या आपल्या धार्मिक रूढी, परंपरा, चालीरीती, सामजिक मूल्ये, स्थानिक अस्मिता त्यांनी मनापासून जपलेल्या असतात. ग्रामीण पर्यटनाचा त्यांनी स्वीकार केलेला असला तरी त्यांना त्यांच्या धार्मिक, सामाजिक व संस्कृतीविषयक मूल्यांमध्ये पर्यटकांच्या रूपाने बाह्य घटकांचा हस्तक्षेप वा आक्रमण नको असते. अन्यथा ते संवेदनशील वा नाराज होण्याची शक्यता असते. यादृष्टीने ग्रामीण भागात पर्यटन हे दुधारी शस्त्र ठरण्याची शक्यता असते. शहरी भागातील व सुधारित सामाजातील लोक हे व्यक्तिस्वातंत्र्याचा व मुक्त जीवनशैलीचा पुरस्कार करणारे असतात. मौजमजा व आनंदाचा उथळ व सवंग कल्पनांच्या बाबतीत ते पर्यटनवेळी आधिक आग्रही असतात. अशा बाबींच्या अतिरेकामुळे वा आक्रमणामुळे स्थानिक संस्कृती व नैतिक मूल्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतात. उदा. गोवा हे पर्यटन राज्य. ग्रामीण पर्यटनाच्या बाबतीतही अशा शक्यता नाकारता येत नाही.

**तात्पर्य :**

ग्रामीण पर्यटन ही संज्ञा अधिकाधिक स्पष्ट व्हावी. ग्रामीण पर्यटनाला ग्रामीण विकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व या विषयी विद्यार्थी वर्गाला सखोल माहिती मिळावी या उद्देशातून सदर गृहपाठाचे लेखन केलेले आहे. याशिवाय ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व, मर्यादा या विषयीदेखील विद्यार्थी वर्गाच्या ज्ञानात भर पडावी या उद्देशातून गृहपाठ लेखनावर भर दिला आहे. ग्रामीण पर्यटनाला विशेषत : कोकणामध्ये आणि भारतातील पहिला पर्यटन जिल्हा सिंधुदुर्गामध्ये उपजतच उपलब्ध असलेली अनुकूल पार्श्वभूमी आणि बाब इ. बाबींची माहिती विद्यार्थीवर्गाला करून देण्याचा प्रयत्नदेखील या गृहपाठातून करण्यात आलेला आहे.

## १८.७ सारांश

गृहपाठाच्या प्रास्ताविकामध्ये पर्यटन व्यवसायात ग्रामीण पर्यटन ही नवी संकल्पनादेखील व्यवसाय म्हणून कशी विकसित होत आहे ? याचे वर्णन केले आहे. ग्रामीण भागातील निसर्ग, शेती, व्यवसाय, ग्रामीण कारागिरी व व्यवसाय, तसेच धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आदी घटकांना कसे पर्यटन स्वरूप देता येईल ते मांडले आहे. ग्रामीण भागातील बेकारी व स्थलांतर रोखण्यासाठी एक उत्तम पर्याय म्हणून ग्रामीण पर्यटनाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शहरी आणि विदेशी पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीचा परिचय व अनुभव देणे, तसेच किफायतशीर व निखळ पर्यटन आनंदाचे साधन म्हणून ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व व इतर अनेक बाबींची यथासांग चर्चा करण्यात आलेली आहे.

## १८.८ स्वाध्याय

१. ग्रामीण पर्यटनाची व्याख्या सांगा. त्याचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती व महत्त्व स्पष्ट करा.

३. ग्रामीण पर्यटनास ग्रामीण विकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व यावर भाष्य करा.

**४. टीपा लिहा.**

अ)ग्रामीण पर्यटनाच्या मर्यादा.

ब)ग्रामीण पर्यटन आणि  पर्यटन सिंधुदुर्ग जिल्हा.

क) ग्रामीण पर्यटन आणि ग्रामीण संस्कृती.

♦ ♦ ♦

# १९

# कृषी पर्यटन

(Agro Tourism)

**पाठाची रूपरेषा**

१९.० उद्दिष्टे

१९.१ प्रास्ताविक

१९.२ कृषी पर्यटनाची संकल्पना

१९.३ कृषी पर्यटनाचे स्वरूप

१९.४ कृषी पर्यटनाची व्याप्ती

१९.५ कृषी पर्यटनाचे महत्त्व

१९.६ कृषी पर्यटनाची मर्यादा

१९.७ सारांश

१९.८ स्वाध्याय

## १९.० उद्दिष्टे

१) कृषी पर्यटन व्यवसायाच्या संकल्पनेचा अर्थ समजावून घेणे.

२) कृषी पर्यटन व्यवसायाचे स्वरूप समजून घेणे.

३) कृषी पर्यटन व्यवसायाच्या व्याप्तीचा अभ्यास करणे.

४) कृषी पर्यटन व्यवसायाचे महत्त्व समजून घेणे.

५) कृषी पर्यटन व्यवसायाच्या मर्यादा समजून घेणे.

## १९.१ प्रास्ताविक

भारतीय लोकांचा कृषी क्षेत्राशी जवळचा संबंध आहे. काळानुसार मानवी व्यवसायाच्या स्वरूपात बदल झाले असले तरी आजही भारतातील ५८ टक्के लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. ६४ टक्के श्रमिक आजही शेतीवर अवलंबून आहेत. एकूण महाराष्ट्र उत्पन्नाचा २७ टक्के उत्पादन शेतीमधून मिळते. आज काळानूसार शेतीत बदल झाले असून त्यामध्ये कृषी पर्यटन ही नवी संकल्पना उदयास आली आहे. सद्यस्थितीतील धावपळीच्या जीवनपद्धतीत मानवाला विरंगुळा

मिळावा. कधीतरी आपल्या जिवाला आनंद मिळावा. आपले मनोरंजन व्हावे असे वारंवार वाटत असते. लोक मनोरंजनासाठी, आनंदप्राप्तीसाठी अनेक प्रचलित, आधुनिक साधनांचा आस्वाद घेत आहेत. उदा. टी.व्ही., नाटक, सिनेमा इ. साधनांच्या माध्यमातील मनोरंजनात तोच तोचपणा आल्याने मानव मनोरंजनासाठी विविध मार्गांचा विचार करत आहे आणि त्यातूनच त्याने पर्यटन या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. पर्यटनाच्या माध्यमातून मनोरंजन करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे त्यातूनच आज पर्यटन हा एक व्यवसाय, एक उद्योग म्हणून विकसित होत आहे.

सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येक जण मन:शांतीच्या शोधात आहे. जागतिकीकरणाच्या या काळात हातात पैसे खेळत असल्यामुळे सध्या पर्यटनासाठी पैसा खर्च करताना प्रत्येकजण आपला रिकामा वेळ आणि मनोरंजनाच्या दृष्टीने त्याचा झालेला सदुपयोग ह्यांचा मेळ घालीत असते. त्यामुळे अलीकडे गर्दी-गडबड गोंधळ असलेल्या पर्यटन स्थळांकडे लोक पाठ फिरवीत आहेत. याउलट ग्रामीण भागातील कृषी संस्कृती तेथील अन्नाचा आस्वाद, निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची व्यवस्था, पक्ष्यांचा किलबिलाट, झुळझुळ वाहणारे झरे, नद्या, धबधबे इ. माध्यमांतून हा वर्ग आपल्याला आवश्यक असलेली सुखशांती शोधण्याचा प्रयत्न करत आहे. यातूनच कृषी पर्यटन ही संकल्पना नव्याने जोम धरू लागली आहे. या व्यवसायाला अतिशय चांगले दिवस येऊ लागले आहेत. किंबहुना 'कृषी पर्यटन' हा एक मनोरंजन पर पर्यटन उद्योग म्हणून पुढे येत आहे.

## १९.२ कृषी पर्यटनाची संकल्पना

आपल्या शेतीचा काही भाग जाणीवपूर्वक पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणे म्हणजे कृषी पर्यटन होय. थायलंड, मलेशिया, इटली आदी देशांत ज्याप्रमाणे कृषी पर्यटन वाढत आहे. उदा. इटलीमधील ऑलिव्ह पिकिंग हा कृषी पर्यटनाचा प्रसिद्ध प्रकार आहे अशाच प्रकारे महाराष्ट्र राज्यात विशेषतः कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी पर्यटनासाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती आहे. अरबी समुद्राच्या सान्निध्यात असलेल्या केरळ राज्यातदेखील कृषी पर्यटन केंद्रे विकसित केली आहेत. शहरी लोकांना अथवा पर्यटकांना नेहमीच ग्रामीण भागातील शेतीविषयी कुतूहल असते.

कृषी पर्यटन ही संकल्पना मूळ परदेशी विशेषतः ऑस्ट्रेलियातील आहे. तेथे पाच दिवसांचा आठवडा असल्याने वीकएण्डला आठवड्याच्या अखेरीस येथील मंडळी कुठे तरी पर्यटनाला जातातच. यातूनच पर्यटन संकल्पना अस्तित्वात आली.. कृषी पर्यटन म्हणजे शहरातल्या मंडळींनी खेड्यात एखाद्या शेतकऱ्याच्या शेतावर फिरायला आणि दोन दिवस राहायला जायचे. शेतकऱ्याने आपल्या शेतावर त्यांची राहायची व्यवस्था करायची. त्यांच्या मुक्कामांच्या दिवसात शेतकऱ्याने त्यांना शेतावरून फिरवून आणावयाचे झाड, पान, फूल, फळ, पक्षी आणि निसर्गातच गमतीजमती दाखवायच्या, आजूबाजूची निसर्गरम्य स्थळं दाखवायची.

कृषी पर्यटन म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात रममाण होणे. पर्यावरणाला कोणताही धोका न पोहोचवता पर्यावरण रक्षणाच्या दृष्टिकोनातून काढण्यात आलेली सहल म्हणजे कृषी पर्यटन. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या कोकणसारख्या ठिकाणी तर हा प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देऊ शकतो.

ग्रामीण भागातील शेती, शेतीउत्पादने, कुटिरोद्योग, पशुपालन तेथील निसर्ग, संस्कृती,

राहणीमान इ. माध्यमातून ग्रामीण भागातील आनंदाचा प्रत्यक्ष आस्वाद घेऊन आपल्या मनाला शांतता मिळवून देणे, जिवाचे मनोरंजन करणे यालाच कृषी पर्यटन म्हणता येईल.

कृषी पर्यटनाचा प्रारंभ प्रथमतः रोमन कालखंडात दिसून येतो. सैन्यातून निवृत्त झालेल्या सैनिकांना थोडी जमीन शेती कसण्यासाठी दिली जात असे. त्यासोबतच त्यांना शेतीच्या विकासासाठी उत्तेजन दिले जात असे. या शेतीमध्ये अन्नधान्ये , द्राक्षे, त्यापासून वाईन तयार करणे , कॅटलपासून दुग्धव्यवसाय इ. अनेक शेती उत्पादने घेतली जात असत. या शेतीमध्येच हे सैनिक शेतकरी छोटी छोटी घरे बांधून येथे येणाऱ्या आपल्या पाहुण्यांची राहण्याची सोय करीत असत. तसेच आपला मित्र परिवार, व्यापारी मंडळी यांच्या व्यापारवृद्धीसाठी या ठिकाणी पार्ट्या आयोजित केल्या जात असत. तर उन्हाळ्यात निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी शहरी भागातील लोक ह्या फार्महाऊसमध्ये राहणे पसंत करत असत.

कृषी पर्यटनाचा इतिहास हा १८व्या शतकापूर्वीचा आहे. आठवडाअखेर (वीकएंड) सुट्टी तसेच दीर्घ सुट्टी घालविण्यासाठी लोक कृषी पर्यटनाकडे वळले.

२०व्या शतकात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर औद्योगिक क्रांतीमुळे विकासाला चालना मिळाली. त्यामुळे मानवाचे जीवन अत्यंत धावपळीचे सुरू झाले. जागतिक स्तरावर मग आनंद, विरंगुळा तसेच मनोरंजनासाठी प्रचलित पर्यटनापेक्षा वेगळ्या निसर्ग सुसंगत अशा खऱ्या अर्थाने कृषी पर्यटनाची गरज विशेषत्वाने जाणवू लागली.

विशेष सूचना-कृषी पर्यटन संकल्पनेचे पुढील विवेचन- भारतात सर्वप्रथम कृषी पर्यटन या संकल्पनेची सुरवात १९७० च्या दरम्यान महाराष्ट्रातील बारामती येथे करण्यात आली. बारामतीजवळ मालेगाव येथील श्री. आप्पासाहेब पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'कृषी पर्यटन विकास महामंडळ' नावाची संस्था स्थापन केली. यांच्या माध्यमातून गावातील पडीक व ओसाड जमिनीत प्रयत्नपूर्वक विविध पिके, विविध फळझाडे, जनावरासाठी चारा, विविध भाजीपाला पिके यांची लागवड केली. सोबतच दुग्धउत्पादन, मधुभक्षिका पालन, गांडूळ खत प्रकल्प, रेशीम पालन अपारंपरिक ऊर्जा निर्मिती (बायोगॅस), कृषी विज्ञान केंद्र यांसारखे विविध उपक्रम राबविणे या केंद्रातील कृषी उत्पादनाबरोबर हे विविध, कृषी उपक्रम पर्यटनाच्या माध्यमातून शहरी लोकांसाठी उपलब्ध केले. अशाच प्रकारचे परंतु वैयक्तिक स्तरावरील कृषी पर्यटन केंद्र श्री. चंद्रशेखर भडसावळे यांनी १९९० च्या दरम्यान मालेगाव, ता.कर्जत, जि.ठाणे येथे सुरू केले. पारंपरिक स्वरूपाच्या शेतावर विविध शेतीपूरक व्यवसाय व  उपक्रम जाणीवपूर्वक राबवून या सर्वांचे अप्रूप असणाऱ्या शहरी पर्यटक/लोकांसाठी उत्तम व्यवस्थेच्या माध्यमातून पर्यटनाच्या स्वरूपात उपलब्ध केले. याला शहरी पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. हे दोन्ही कृषी पर्यटन प्रकल्प भारतातील व महाराष्ट्रातील पथदर्शी प्रकल्प म्हणून ओळखले जातात. आज अनेक प्रयोगशील व प्रगत शेतकऱ्यांनी कृषी पर्यटन केंद्रे विकसित केली आहेत. शहरी पर्यटकांच्या उत्तम प्रतिसादामुळे ग्रामीण भागात कृषी पर्यटनाच्या संकल्पनेचा विकास व विस्तार झपाट्याने होत आहे.

**कृषी पर्यटनाची व्याख्या:**

१) श्री.चंद्रशेखर भडसावळे- ''स्वतः शेतकऱ्याने आपल्या खेड्यातील फळत्या, फुलत्या शेतावरच आयोजित केलेली आनंददायी शिक्षण प्रक्रिया व मौज यांचा सहज सुंदर मिलाफ

असलेला उपक्रम म्हणजे कृषी पर्यटन होय.

२) आपल्या शेतीचा काही भाग जाणीवपूर्वक पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणे म्हणजे कृषी पर्यटन होय.''

३) प्रचलित गर्दी, गोंधळाच्या पर्यटन स्थंळापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात शेतकऱ्याच्या शांत, निवांत, आल्हाददायक शेतावरील शेतीजीवन, शेतीची कामे, ग्रामीण संस्कृती जाणून घेणे, त्यात सहभागी होण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांकडून योग्य मोबदल्यात आदरातिथ्य स्वीकारणे, तेथे मुक्काम करणे आणि त्यातून निर्भळ आनंद उपभोगणे म्हणजेच कृषी पर्यटन होय.

४) शेतकऱ्याने आपले उत्पन्न वाढविण्यासाठी शेती उत्पादनाबरोबरच पर्यटकांना आकर्षक करणाऱ्या बाबींची शेतावरच उपलब्धता करून पर्यटकांना आनंद प्राप्ती करून देणे म्हणजेच कृषी पर्यटन होय.

५) निसर्ग, शेतकरी, त्याची शेती व शेतीपूरक व्यवसाय, शेतीची विविध कामे-उपक्रम शेतकऱ्यांची ग्रामीणजीवन पद्धती याविषयीच्या कुतूहलापोटी शेतकऱ्यांच्या शेतकऱ्याच्या शेतावर भेट देऊन या बाबी जाणून घेणे, त्याचा अभ्यास करणे, शक्य तेथे प्रत्यक्ष सहभाग होणे आणि यातून आनंद मिळविण्याच्या हेतूने केलेले पर्यटन म्हणजेच कृषी पर्यटन होय.

**कृषी पर्यटनाची वैशिष्ट्ये :**

१) प्राचीन व पारंपरिक भारतीय कृषी व ग्रामीण संस्कृतीचे प्रदर्शन व जतन करतात.

२) कृषी पर्यटन केंद्र उभारण्यासाठी शेतकऱ्याला जास्त गुंतवणुकीची आवश्यकता नाही.

३) शहरी व खेडेगावातील लोकांचा परस्पर परिचय व संबंध वाढीस लागतील पर्यायाने ग्रामीण लोकांना विकासाच्या प्रवाहात सामील होता येईल.

४) शहरी भागातील नवीन मानवी तंत्रज्ञान, ज्ञान व संपत्तीचे ग्रामीण भागाकडे स्थलांतर होईल.

५) शहरातील घाई गर्दीच्या वातावरणातून कमी खर्चिक व शांत वातावरणात वेळ घालविण्यास मदत होईल.

६) निसर्ग रम्यतेशी संबंध असल्यामुळे पर्यावरण मैत्रीचे नियम आवर्जून पाळले जातात.

७) अन्नधान्य उत्पादन व सभोवतालचा निसर्ग यांविषयीचे शहरी मंडळीचे कुतूहल व आकर्षण अबाधित राहील.

८) कृषी मालाची थेट विक्री झाल्याने अत्यंत वाजवी दरामध्ये ग्राहकांना वस्तू अथवा कृषी माल मिळेल तर शेतकऱ्यांना विनादलाली उत्पन्न मिळेल.

९) शेती सुंदर, नीटनेटकी व वर्षभर हिरवीगार राहील.

**कृषी पर्यटनाची तत्त्वे :**

शेतीला कृषी पर्यटनाची व्यावसायिक जोड द्यावयाची असल्यास पर्यटकांच्या दृष्टिकोनातून काही तत्त्वे शेतकऱ्याने समजून घेणे आवश्यक आहेत यालाच कृषी पर्यटनाची पायाभूत तत्त्वे म्हणता येतील.

**१) काहीतरी पाहण्यासारखे :**

कृषी पर्यटन केंद्रामध्ये पर्यटकांना आवडीने पाहण्यासारखे काहीतरी असावे उदा. पक्षी, प्राणी, शेती, निसर्ग, ग्रामीण पोषाख, स्थानिक उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामीण खेळ इ.

**२)काहितरी करण्यासारखे :**

कृषी पर्यटन केंद्रामध्ये पर्यटकांना काहीतरी करण्यासारखे म्हणजेच प्रत्यक्ष सहभाग घेण्यासारखे असावे. उदा. शेतीच्या विविध कामांत सहभाग घेणे, नदी-तलावात पोहणे, बैलगाडी हाकणे, म्हैस-उंटावरील सफर, जेवण बनविणे, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामीण खेळ इ.

**३)काहीतरी विकत घेण्यासारखे :**

कृषी पर्यटन केद्रांत पर्यटकांना काहीतरी खरेदी करता येण्यासारखे असावे. उदा. ग्रामीण कला हस्तकलेच्या वस्तू, ग्रामीण पोषाख शेतावरील ताजे कृषी उत्पादन, प्रक्रिया केलेले फळ व अन्न पदार्थ इ.

**कृषी पर्यटनाची गरज:**

भारतामध्ये पर्यटन उद्योगाला सद्य परिस्थितीमध्ये अतिशय चांगले दिवस आहेत. पुढील कालावधीत पर्यटनाचे हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. पंचतारांकित संस्कृतीतील राहणे, शहरातील गोंगाट, प्रदूषण, पर्यटन सुविधांचा अभाव, महागाई ,लुटालुट इ. माध्यमातून पर्यटकांची मोठी फसवणूक होत आहे. एवढे करूनसुद्धा त्यांना आवश्यक ते मनोरंजन, आनंद, सुखशांती, समाधान या पर्यटनातून मिळू शकत नाही.

यातूनच खऱ्या अर्थाने हा आनंद, मनोरंजन, सुखशांती, आनंदाच्या शोधात पर्यटक ग्रामीण भागात जाऊन पोहोचलेले दिसून येतात. ग्रामीण भागातील निसर्ग सान्निध्यातील कृषी पर्यटन त्यांना खुलवू लागलेले दिसून येत आहे. कारण पर्यटकांना आवश्यक असलेली शांतता, सुख-समाधान व आनंद खऱ्या अर्थाने त्यांना या कृषी पर्यटनातूनच मिळू लागलेले दिसून येत आहेत. म्हणून महाराष्ट्र शासनाने सन २०११ हे वर्ष कृषी पर्यटन वर्ष म्हणून घोषित केले आहे.

कृषी पर्यटन म्हणजे ग्रामीण भागातील शेती व्यवसायाबरोबरच पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक सोयी-सुविधा निर्माण करून पर्यटकांना मौजमजा, निखळ आनंद, मनोरंजन निर्माण करून देणारे केंद्र होय.

शेतकऱ्याने मोठ्या कष्टाने शेती फुलवलेली असते. नवनवीन प्रयोग केलेले असतात हे

प्रयोग कोणीतरी पाहावेत, शाबासकी द्यावी असे त्यांना वाटते. म्हणूनच कृषी पर्यटनाच्या निमित्ताने शेतकऱ्याचे प्रयोग शहरातील नागरिकांपर्यंत पोहोचतात. तर दुसऱ्या बाजूला खेड्यातील लोंढेच्या लोंढे शहराकडे जातात. मात्र तेवढ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होतेच परिणामी संस्कृतीचे जतन होऊन शेतकऱ्यांना उदरनिर्वाहाचे साधनही उपलब्ध होते. म्हणूनच कृषी पर्यटनाची आवश्यकता भासते. ही गरज पुढील प्रमाणे:

१) पर्यटकांना स्थानिक कारागीर, शेतकरी यांच्याशी थेट संवाद साधता येतो. त्यांची कुशल कारागिरी, उत्तम शेती पाहता येते आणि त्यांची उत्पादने बाजारभावापेक्षा वाजवी किमतीत खरेदी करता येतात.

२) कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना एक नवीन जोड व्यवसाय मिळाला आहे. ज्यामुळे त्यांना आपली शेती टिकवून ठेवण्यास, तिला व्यावसायिक स्वरूप देण्यास प्रोत्साहन मिळाले.

३) शेतकरी आणि ग्रामीण कुशल कारागीर नवनवीन प्रयोग करण्यास प्रेरित झाले.

४) कृषी पर्यटनामुळे शेती आणि शेतकऱ्यांना शहरी भागातून एक सामाजिक प्रतिष्ठेची वागणूक मिळू लागली आहे.

५) कृषी पर्यटनामुळे ऱ्हास पावत चाललेली ग्रामीण जीवन पद्धती आणि लोककला यांना पुनर्जीवन मिळाले.

कृषी पर्यटन सर्वसामान्यांच्या आवाक्यातील पर्यटन आहे. यामध्ये शहरी पर्यटकांना झुणका भाकर, पिठलं-भात, मासे भात, चुलीवर भाजलेली कणसं, वांगी, असा गावरान आहार, शेती व शेतीमाल प्रक्रिया उद्योग यांना भेट, शेतीच्या विविध कामात प्रत्यक्ष सहभाग, तसेच विहिरीतून पाणी काढणे, गायी-म्हैशीची धार काढणे, बैलगाडीतून सवारी, प्रत्यक्ष शेतावरच निसर्गाच्या सान्निध्यात मुक्काम इ. चा समावेश करता येईल. त्यामुळे शहरी पर्यटकांना शेती व शेतीचे महत्त्व यांची जाणीवपूर्वक कल्पना येईल. शेती व शेतकऱ्याबद्दलचे गैरसमज दूर होतील. ग्रामीण भागातील जीवन जवळून पाहता येईल. तेथील भाषा, हस्तकला, संस्कृती, राहणीमान, परंपरा, क्रीडा प्रकार, यात्रा, सण-उत्सव यांचा आनंदही त्यांना लुटता येईल. अशा पर्यटनातून कदाचित शेतकऱ्याला हरविलेला आत्मविश्वास परत मिळेल, त्याचे नैराश्य कमी होईल. त्याची सकारात्मकता वाढेल व त्याचे व्यवहार चातुर्यदेखील वाढण्यास मदत होईल. या सर्वांतूनच कृषी पर्यटनाची गरज प्रतीत होते.

**कृषी पर्यटनासाठी शासनाच्या योजना:**

**१. न्याहरी व निवास योजना:**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने पर्यटन व्यवसायाला विशेषतः ग्रामीण भागात चालना देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. याचा कृषी पर्यटन व्यवसाय करणारे शेतकरी व पर्यटक यांना चांगला लाभ होत आहे.

**२. कर सवलती :**

पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी शासनाकडून विविध कर सवलती देण्यात येत आहेत. या सर्व प्रकारच्या कर सवलतीमध्ये कृषी पर्यटन व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना प्राधान्य दिलेले आहे.

**३. सार्वजनिक भौतिक सुविधा :**

केंद्र व राज्य सरकारच्या पर्यटन विभागामार्फत सार्वजनिक भौतिक सुविधा, उदा. रस्ते, वीज, पाणी, रेल्वे वाहतूक इ. प्राधान्याने राबविल्या जात आहेत. याचा खूप चांगला लाभ कृषी पर्यटनासाठी देखील होत आहे.

**४. महाभ्रमण योजना :**

कृषी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी शासनामार्फत शेतकऱ्यासाठी महाभ्रमण ही योजना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये उत्तम व व्यावसायिक शेती, निसर्ग, ऐतिहासिक वारसा, विविध पारंपरिक व सांस्कृतिक कला, हस्तकला, जंगले, पर्यावरण इ. विविध घटकांच्या अभ्यासातून शेतकऱ्याने कृषी पर्यटन व्यवसायाला समृद्ध करणे.

**कृषी पर्यटन विकासाचे टप्पे:**

**प्रचार:**

एखाद दुसऱ्याने कृषी पर्यटन केद्रांचा प्रचार कठीण आहे. तेव्हा सामूहिकरीत्या ही सर्व कृषी पर्यटन केंद्रे काम करू शकतील किंवा आय.टी.डी.सी., राज्य पर्यटन विकास महामंडळे, स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे आणि सहल आयोजक (टूर ऑपरेटर) ही जबाबदारी घेऊन साहाय्य करू शकतील.

**२. दळणवळण :**

कृषी पर्यटन स्थळांवर पोहोचण्यास तुटपुंजी व्यवस्था आहे. जसे की, स्थळांना जोडणारा रस्ता नसणे, दूरध्वनी सेवा अजून खेड्यापर्यंत सक्षमपणे पोहोचलेली नाही. ती पोहोचणे आवश्यक आहे. कृषी पर्यटन केद्रांच्या ठिकाणी सरकारने रस्ते, दळणवळण, टेलिफोन सेवा सर्व ग्रामीण भागांत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**३. राहण्याची व्यवस्था :**

कृषी पर्यटन केंद्राच्या ठिकाणी सुरक्षित व स्वच्छ राहण्याची व्यवस्था असावी. स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा व स्वच्छ शौचालये असणे आवश्यक आहेत. शहरी आधुनिक सुविधांच्या बाबतीत कृषी पर्यटकांचा विशेष अट्टाहास नसतो.

**४. जाळे विणणे (नेटवर्क):**

सरकारी व खाजगी उद्योजकांमध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय पातळीवर देवाणघेवाण ठेवल्यास

दूरच्या कृषी पर्यटन टुर्स ऑपरेटर्सना पॉलिसी ठरविण्यासाठी पाठिंबा व मूलभूत सुविधा आणि प्रचार करण्याबाबत मदत करू शकतील.

**५. शेतकऱ्यांची क्षमता वाढवणे :**

शेतकरी वर्गाला व्यवस्थापन, आदरातिथ्य, मेंटेनन्स, जनसंपर्क या बाबतीत ज्ञान अवगत करून देण्यासाठी प्रोत्साहन देणे, अशा प्रकारचे प्रशिक्षण शासनाच्या (महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ) या विभागाच्या साहाय्याने 'सगुणा बाग' मालेगाव-नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड या प्रसिद्ध कृषी पर्यटन केंद्रावर आयोजित केले जाते.

**६. पर्यटकांची सुरक्षा :**

कृषी पर्यटन केंद्रे ही दूर जागी असतात. अशा बहुतांश ठिकाणी चांगले रस्ते, वैद्यकिय मदत, दूरध्वनी सेवा यांची गैरसोय असते. तसेच चोर व वन्यप्राणी यांचीही भीती असते. त्यासाठी स्थानिक जनतेची मदत, तसेच तातडीची वैद्यकिय सेवा उपलब्ध हवी.

**७. सरकारी, खाजगी क्षेत्राची भागीदारी :**

शेतीचे उद्योजक, शेतकऱ्यांच्या संस्था, सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शेतीविषयक कारखाने व उद्योग धंदे हे कृषी पर्यटन व्यवसायाचे धाडस करू शकतात.त्यांना या बाबतीत शेतकरी एजन्सीज, टुर्स ऑपरेटर्स यांचे सहकार्य मिळू शकेल. दळणवळण उद्योजक आणि आदरातिथ्य सेवा यांना त्यांच्यामुळे फायदा मिळू शकेल.

**कृषी पर्यटन आणि कोकण :**

कोकण प्रदेश हा महाराष्ट्रातील निसर्गाच्या दृष्टीने सर्व समृद्ध असा प्रदेश आहे. कोकणात निसर्गरम्य परिसरासह विशाल समुद्रकिनारा आहे. अनेक बंदरे आहेत. भारताचे आर्थिक केंद्र मुंबई हा कोकणाचा एक भाग आहे. विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती, नितांत सुंदर समुद्रकिनारे व खाड्या (बॅक वॉटर्स), विविध पर्यटन स्थळे, हापूस आंबा, काजू-फणस-नारळ व अन्य फळे कोकणची शक्तीस्थाने आहेत.

कोकणामध्ये विशेषतः रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनापासून सुरुवातीला अत्यल्प उत्पन्न मिळत होते परंतु सध्या हे कोकणातील निसर्गसौंदर्य जागतिक बाजारपेठेमध्ये आणण्यासाठी वेब साईटवर कोकणातील पर्यटन स्थळांची माहिती व फोटो पाठविण्यात आले. विमान सेवा, रेल्वे सेवा तसेच विविध फेस्टिव्हलमधून मार्केटिंग केले. हिंदी-मराठी चित्रपटांतून येथील निसर्गस्थळांचे चित्रीकरण केले गेले आणि त्यातूनच आज कोकण पर्यटकांनी फूलू लागले आहे. शांत, सुंदर समुद्रकिनारे आणि विविध स्थळांना भेटी देण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढली आहे.गणपतीपुळे, पावस, गुहागर, दापोली, आंजर्ले, केळशी, मुरूड, हर्णे, राजापूर या रत्नागिरीतील तर सिंधुदुर्गातून कुणकेश्वर, विजयदुर्ग, मालवण किल्ला, तारकर्ली, देवबाग, मोचेगड, निवती, सावंतवाडी, आंबोली इ. नवीन पर्यटन स्थळांची प्रसिद्धी होत आहे. या ठिकाणी पर्यटकांचा ओघ सातत्याने वाढत आहे.

विशेषत: भारतातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्गातील कृषी पर्यटनाचे गोव्यात मार्केटिंग केल्यास दरवर्षी लाखो पर्यटक जिल्ह्यात आणता येतील. कृषी पर्यटन,फळ प्रक्रिया,

हेरिटेज टुरिझम च्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. देशातील सर्वोत्कृष्ट समुद्रकिनारे, हापूस आंबा,काजू, नारळाचे फलोद्यान व मासेमारी क्षेत्र रत्नागिरी व सिंधुदुर्गात आहे याचा पर्यटनाच्या माध्यमातील विकासासाठी पुरेपूर लाभ उठविणे आवश्यक आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतातील वाली, वांगी, पालेभाज्या तसेच फळबागेतील आंबा, काजू पिकतात कसे, कसे काढले जातात याची पर्यटकांना उत्सुकता असते. येथील शेतकऱ्याच्या शेतावर, बागेत पर्यटकांना ते बघता येऊ शकते. शेतावरील घरात वांगी भाजून त्याचे भरीत करण्याची, कुळीथ पिठले, भाकरी तयार करण्याची ती त्या मोकळ्या शेतावर, नदीकिनारी, झाडाच्या सावलीत चाखण्याची मजा औरच असते. हा आनंद पर्यटकांना घेता आला पाहिजे. झाडावर पिकलेले हापूस आंबे, काजू माडावरील शहाळे यांचा आस्वाद बागेतच घेता आला पाहिजे. हा आनंद पर्यटकांना घेता आला पाहिजे तसेच सर्वोत्कृष्ट मालवणी जेवण पर्यटकांना भुरळ पाडते. मात्र हे मालवणी पदार्थ शेतघरामध्ये शिजवून त्याच ठिकाणी निसर्गरम्य वातावरणात त्याचा आस्वाद घेण्यासाठी संधी पर्यटकांना मिळत नाही. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून नेमके हेच साध्य होते आणि यातील समाधान, आनंद मिळविण्यासाठी पर्यटक आपला खिसा रिकामा करायला तयार असतात. कोकणात अशी कृषी पर्यटन केंद्रे वाढल्यास रोजगार वाढीस मोठीच संधी उपलब्ध होईल.

## १९.३ कृषी पर्यटनाचे स्वरूप

सर्वसामान्य शेतकऱ्याच्या दृष्टिकोनातून शेती व्यवसाय तोट्याचा होत चालला आहे. शेतकऱ्याची ही मानसिकता बदलण्यासाठी शेती व शेतीसंबंधीत आणि शेतीपूरक व्यवसायातील विविध घटनांकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. नवीन व्यावसायिक संधीची शेतीशी सांगड घातली पाहिजे आणि त्याला व्यवसायाचे रूप देणे गरजेचे आहे. कृषी पर्यटन ही संकल्पना यासाठी नवसंजीवनी ठरू पाहात आहे. या कृषी पर्यटनाचे स्वरूप खालीलप्रमाणे पाहता येईल.

**फळबागांमधील कृषी पर्यटन:**

कोकण प्रदेश हा विपुल नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. कोकणात विविध पिके घेतली जातात. यामध्ये भात, नाचणी, भाजीपाला, विविध फळे यांचा समावेश होतो. यामध्ये आंबा, काजू, केळी, चिकू, नारळ-सुपारी आदी फळ उत्पादनाला शंभर टक्के अनुदानित फलोद्यान योजना महत्त्वपूर्ण ठरली आहे. यामुळेच पूरक नैसर्गिक वातावरणाचा लाभ घेऊन येथील शेतकरी आज चिकू, आंबा, काजू, नारळ-सुपारी यांच्या शास्त्रशुद्ध फळबागा विकसित करीत आहेत.याच फळबागांचे प्रचलित पद्धतीने उत्पादन घेण्याबरोबरच त्याला कृषी पर्यटनाची जोड दिल्यास शेतकऱ्याला अतिरिक्त आर्थिक उत्पन्न मिळून त्याला वेगळेच व्यावसायिक समाधान मिळेल.

कोकणामध्ये खालील प्रमुख फळबांगामध्ये कृषी पर्यटन करणे शक्य आहे.

**अ) नारळ- पोफळीच्या बागेतील पर्यटन :**

समुद्रकिनारी वाऱ्यावर डोलणाऱ्या नारळ- सुपारीच्या बागा या तर कोकणाची खास ओळख आहेत. कोकणात नारळ-सुपारीची पारंपरिक लागवड मोठ्या प्रमाणात आढळते. आता शासनाच्या फलोद्यान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी त्यांच्या शास्त्रशुद्ध जागा विकसित केल्या आहेत. आंतरपीक म्हणून त्यात मसाला पिकेही घेत आहेत. समुद्र खाडी किनाऱ्यालगतच्या या माड-

पोफळीच्या आल्हाददायक वातावरणात शहाळ्याची अमृत चव चाखण्यासाठी मसाला पिकांचा सुगंध घेण्यासाठी, नारळाच्या झाडावर चढण्याचा थरारक अनुभव घेण्यासाठी, त्यांच्या शांत थंडगार सावलीतील झोपडीत स्थानिक भोजनाचा आस्वाद घेत निवास करण्यासाठी शहरी पर्यटकांना नक्कीच आवडेल. यासाठी कृषी पर्यटनातून त्यांना संधी उपलब्ध करून देणे शक्य आहे.

**ब) आंबा बागेतील पर्यटन :**

हापूस आंबा ही कोकणची जागतिक ओळख आहे. आंबा उत्पादनासाठी कोकणमध्ये अनुकूल भौगोलिक वातावरण आहे. तेथे हापूस व अन्य स्थानिक जातीच्या आंब्याचे उत्पादन घेतले जाते. शासनाच्या फलोद्यान योजनेमुळे कोकणातील विशेषतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात जमिनीचे क्षेत्र हापूस आंबा लागवडीखाली आले आहे. हापूस आंब्याला देश- विदेशातील असलेली वाढती मागणी, त्यातील आर्थिक नफा यामुळे शेतकरी कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठे यांच्या मार्गदर्शनाने शास्त्रशुद्ध लागवड करीत आहे. परंतु मागणी पुरवठ्याच्या सिद्धातानुसार मार्च महिन्यात हंगामांच्या प्रारंभी कमी उत्पादना वेळी चांगला दर आणि मे महिन्यात हंगाम अखेरीस जास्त उत्पादना वेळी कमी दर मिळतो. यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. या समस्येवर कृषी पर्यटन हंगामात पर्यटकांची पर्यटनासाठी कोकणलासुद्धा विशेष पसंती असते. याचा फायदा घेऊन शहरी पर्यटकांना आंबा बागेतील कृषी पर्यटनासाठी प्रोत्साहित करता येईल. आंबा उत्पादनाची विविध कामे पाहता येतील. त्यात सहभागी होता येईल उदा. झाडावर चढणे, स्वतःच्या हाताने आंबे काढणे, आंब्यांच्या बागेतील झोपडीत निसर्गाच्या सान्निध्यात राहता येईल. स्थानिक भोजनाचा आस्वाद घेणे, स्थानिक संस्कृती व लोक जीवन पाहणे आणि अनुभवणे, तसेच निघताना योग्य किमतीत दर्जेदार ताज्या हापूस आंबा फळांची खरेदी करणे, यासारख्या बाबींतून पर्यटकांना निश्चितच आनंद व समाधान मिळेल. तर शेतकऱ्याला विना दलाली जादा उत्पन्नाचा मार्ग मिळेल. वेगळे समाधान मिळेल. तसेच पर्यटक आणि शेतकरी यांच्यात नवीन माहिती व विचारांचा सुसंवाद घडेल.

**क) काजू बागेतील पर्यटन :**

काजू हे कोकणातील प्रमुख फळापिकांपैकी एक होय. काजू पिकांपासून काजूगर हे प्रमुख उत्पादन होय. काजूगरामध्ये असलेल्या पौष्टिक गुणधर्मामुळे त्याला सुकामेवामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. बदलत्या आधुनिक खाद्यपद्धतीमध्ये काजूचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. उदा. हॉटेलमधील विविध प्रकारच्या डिशेस (खाद्यप्रकार), विविध प्रकारची आईस्क्रिम्स, विविध प्रकारची बेकरी उत्पादने, प्रथमच गोपुरी आश्रम कणकवली या संस्थेने विकसित केलेले काजू बोंडू सरबत, गोवा राज्यात तयार केले जाणारे काजूबोंडापासूनचे 'फेणी' नामक मद्य इ. मुळे कोकणातील काजू पिकाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. विदेशात काजूगर व फेणी मद्याची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. त्यातून चांगले परकीय चलनदेखील मिळते. यास अनुसरून कोकणातील शेतकऱ्यांनी पारंपरिक लागवडीबरोबर शासनाच्या फलोद्यान योजनेतून शास्त्रशुद्ध काजूच्या फळबागा विकसित केल्या आहेत.

पंरतु उत्पादनाच्या हंगामात किमतीतील चढ-उतार , खाजगी व्यापारी-दलालांकडून फसवणूक प. महाराष्ट्राच्या तुलनेत कोकणातील कृषी उत्पन्न बाजार समित्या व सहकार क्षेत्राची उदासीनता, पर्यायी बाजारपेठेची माहिती आणि थेट व वैयक्तिक विक्री कौशल्याच्या शेतकऱ्यातील अभाव बदलते. हवामान यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होते.

अशा परिस्थितीत काजू बागेतील 'कृषी पर्यटन' ही संकल्पना नवा आर्थिक पर्याय जोड उत्पन्न ठरू शकेल. यासाठी शेतकऱ्याने आपल्या काजू बागेचे पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यामध्ये शहरी पर्यटकांना निसर्गरम्य वातावरणात काजूबागेमध्ये स्वतंत्र झोपड्या बांधून निवासाची व्यवस्था करणे, काजू फळपिकांच्या उत्पादन कार्याची माहिती देणे, त्यात प्रत्यक्ष सहभाग देणे उदा. झाडावर चढणे, स्वतःच्या हाताने फळे काढणे, बागेतील काजू बियाणे चणे. काजू बोंडूचा आस्वाद घेणे, काजू बागेतच पारंपरिकरीत्या भाजलेल्या काजूगराची चव चाखणे, स्थानिक भोजनाचा आस्वाद घेणे यामध्ये काजूबागेतच छोटे काजू प्रक्रिया युनिट सुरू करून विविध प्रकारच्या काजूगराची पर्यटकांना विक्री करता येईल. यामुळे पर्यटकांना ताज्या स्वरूपात आणि बाजारपेठेपेक्षा वाजवी किमतीत काजूगर व काजूबोंडू सरबत खरेदी करता येईल आणि शेतकऱ्याला बागेतच विना दलाली रोख उत्पन्न मिळेल. याबरोबरच शेतकऱ्याला पर्यटकांचा मागणीनुसार परिसरातील अन्य स्थळांचे त्यांना दर्शन घडविता येईल. या दरम्यान शेतकरी व पर्यटकांमध्ये माहिती, नवे ज्ञान-तंत्रज्ञान व आचार विचार यांची देवाणघेवाण होईल. यामुळे पर्यटकांना खऱ्या शांत, निवांत निसर्ग कृषी पर्यटनाचा निर्भेळ आनंद तर शेतकऱ्याला नवा व्यावसायिक दृष्टीकोन, आर्थिक उत्पन्न, नवनिर्मितीचा आनंद मिळेल. आपण शेतकरी असल्याचे व आपल्या शेती व्यवसायाचे समाधान मिळेल. त्याचा आत्मविश्वास वाढेल.

### २)सर्वसामान्य कृषी बगीचा पर्यटन:

कोकणामध्ये काही शेतकरी मध्यम व मोठे भूधारक आहेत ज्यांचे शेती क्षेत्र कमीत कमी दोन एकर ते चार -पाच एकर किंवा त्याहून अधिक मोठेही असते. यातील काही शेतकरी हे प्रयोगशील असतात. ते आपल्या शेतीमध्ये विविध प्रकारची शेती व शेतीपूरक व्यवसाय करतात. यामध्ये भात-नाचणीची शेती; भाजीपाला लागवड, आंबा, काजू, चीकू, पेरू, केळी, नारळ-सुपारी, पपई, कोकम, अननस, काकडी, कलिंगड या फळपिकांची लागवड, चवळी, तूर, कुळिथ यासारखी कडधान्ये; भुईमूग, सूर्यफुलासारखी तेलबिया पिके; अबोली, झेंडू, जास्वंद, गावठी गुलाब आदी फुलझाडे यांबरोबरच शासनाच्या विविध अनुदानित योजनातून गायी-म्हशी या दुभत्या जनावंराचे पालन, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी-ससेपालनासारखे शेतीपूरक व्यवसाय, गोट्या पाण्याचे शेततलाव, त्यात मत्स्यपालन, सेंद्रिय खतासाठी गांडूळ खत निर्मिती प्रकल्प यांसारखे शेतीपूरक उपक्रम राबवीत असतो. या शेतावरच त्याचे पीक मळणीचे खळे; गवताच्या गंजी, शेतीची अवजारे, बैलगाडी सारखे पांरपरिक वाहतूक साधन, शेतविहीर त्यावरील मोट, पाण्यांचा विद्युत पंप, पाण्याचे पारंपरिक पाट; बांधावरील आईने किजंळ सांग, बांबूसारखी जंगली झाडे आणि सर्वांमध्ये त्याचे कौलारू शेतघर या सर्वांमधून एक प्रकारचा 'कृषी बगीचा' तयार होतो. तसेच शेतीचे विविधीकरण ही संकल्पना साकारते.

कृषी पर्यटन या संकल्पनेतून याचा आर्थिक लाभ घेता येईल. यासाठी शांत-निवांत व सुंदर निसर्ग आणि शेतीची आवड असणाऱ्या शहरी पर्यटकांना या कृषी बगीचाकडे पर्यटनासाठी आकर्षित करता येईल. येथे त्यांना विविध प्रकारची शेती पाहणे, अनुभवणे उदा. भाजीपाला काढणे, झाडावर चढणे, फळे काढणे, तलाव पाटाच्या पाण्यात डुंबणे-पोहणे, मासे पकडणे, विहिरीचे पाणी काढणे, दुधाची धार काढणे, शेतात निसर्गात मनसोक्त फिरणे, बैलगाडीचीर सैर करणे इ. यातून शहरी पर्यटकांना कृषी संस्कृतीचे दर्शन घडेल. शेतकऱ्यांचे परिश्रम समजता येतील. निघताना ताज्या कृषी उत्पादनाची योग्य दरात खरेदी करता येईल. पर्यटनाचा खरा नैसर्गिक आनंद अनुभव घेता येईल. तर शेतकऱ्याला नवा आर्थिक पर्याय मिळेल. त्याला आपली शेती व श्रम याबद्दल अभिमान

वाटेल. पर्यटक व शेतकरी यांच्या सुसंवादातून परस्परांच्या माहिती, ज्ञान, विचारांचे आदान प्रदान होईल. यातून कृषी पर्यटन संकल्पनेला बळकटी मिळेल.

**३) औषधी वनस्पती बाग पर्यटन:**

कोकण प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे येथे पाऊसही मोठ्या प्रमाणात पडतो. या नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये विपुल वनसंपदेची जंगलेसुद्धा आहेत. कोकणातील शेती ही केवळ मान्सूनच्या पावसावर अवलंबून आणि पारंपरिक पद्धतीची आहे त्यामुळे शेतकऱ्याला चांगले उत्पादन व आर्थिक उत्पन्न मिळत नाही. याशिवाय येथे पडीक जमीन मोठ्या प्रमाणावर आहे. कमी शेती उत्पादन; चांगल्या बाजारव्यवस्थेचा आणि उपलब्ध पाणीसाठ्याच्या नियोजनाचा अभाव; आधुनिक कृषीतंत्रज्ञानाचा अभाव इ. मुळे येथील शेतकरी आर्थिकदृष्ट्या विवंचनेत असतो. आयुर्वेद ही जगाला भारताने दिलेली भेट आहे असे समजले जाते. जीवक, चरक यांसारखे ऋषीमुनी थोर आयुर्वेदाचार्य म्हणून इतिहासप्रसिद्ध आहेत. कोकणातील समृद्ध जंगलामध्ये औषधी गुणधर्माच्या वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळतात. उदा. कडुनिंब, बेल, आवळा, बेहडा, सर्पगंधा, अष्टगंधा, शतावरी, हीरडा वगैरे शेकडो औषधी वनस्पती.

सध्याच्या धावपळीच्या युगात मानवाला विविध प्रकारचा ताणतणाव सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्याला विविध रोग-आजारांनी देखिल ग्रासले आहे यावर तात्काळ आराम देणाऱ्या आधुनिक उपचार (ॲलोपॅथी) पद्धतीचे कालातरांने दुष्परिणाम जाणवतात. तर आयुर्वेदिक व वनौषधी उपचार पद्धती रोग आजारांचे कोणत्याही दुष्परिणामांशिवाय समूळ उच्चाटन करतात याचा विचार करता अलीकडे सुशिक्षित व आरोग्यदक्ष लोक आयुर्वेदिक उपचार पद्धतीकडे वळत आहेत यामुळेच सध्या आयुर्वेदिक उपचार केंद्रे मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहेत. लोकांचाही त्याला चांगला प्रतिसाद आहे. आयुर्वेदिक व निसर्गोपचार केंद्रे या क्षेत्रात जंगलातील औषधी गुणधर्माच्या, वनस्पतीच्या विविध घटकांची मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. उदा. मुळे, पाने, फळे, बिया, साल, फुले इ. या सर्व बाबींचा कोकणातील शेतकऱ्याला लाभ घेता येईल. यास अनुसरून शासनाच्या वन, साामाजिक वनीकरण व कृषी विभागाने पडीक जमिनीत औषधी वनस्पतीच्या शास्त्रशुद्ध लागवडीस प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. यातून 'वनौषधीची बाग' ही नवी वनौषधीची शेती संकल्पना उदयास येत आहे. यास काही प्रयोगशील शेतकरी सकारात्मक प्रतिसाद देत आहेत. या वनौषधी बागेतही शेतकरी कृषी पर्यटन केंद्र सुरू करू शकतो. यामध्ये शेतकऱ्याला न्याहरी, भोजन व निवास सुविधायुक्त झोपड्या पर्यटकांसाठी बांधता येतील. या वनौषधी बागेत निसर्ग -पर्यावरण प्रेमी; निसर्ग, पर्यावरण व वनौषधी अभ्यास, संशोधक शालेय व महाविद्यालयतील विद्यार्थी तसेच विदेशी वनौषधी अभ्यासक-संशोधक यांना पर्यटक म्हणून आकर्षित करता येईल. सोबतच या बागेत आयर्वेद व निसर्गोपचार केंद्र सुरू करता येईल. या वनौषधी बाग लागवडीमुळे पडीक जमिनीचा वापर; वृक्ष-निसर्ग व पर्यावरणाचे संवर्धन आयुर्वेद व वनौषधीचे जतन करता येईल. शेतकऱ्याला पारंपरिक शेती उत्पादनाबरोबरच नवा आर्थिक उत्पन्नाचा पर्याय मिळेल. यातूनच कृषी पर्यटनाचा 'वनौषधी बाग पर्यटन' हा नवा प्रकार विकसित करता येईल.

**४) चिरेखाणेतील पर्यटन :**

कोकण प्रदेशाचे साधारणत: दोन विभाग मानले जातात. यातील उत्तर कोकण विभागात ठाणे आणि रायगड जिल्हे येतात. तर दक्षिण कोकण विभागात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन

जिल्हे येतात. उत्तर कोकण विभागातील ठाणे आणि रायगड या जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकासाला प्राधान्य दिले आहे. तर दक्षिण कोकण विभागातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांमध्ये पांरपरिक शेतीबरोबरच फलोद्यान आणि पर्यटन या व्यवसायांच्या विकासाला प्राधान्य दिले जात आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांतील अनुकूल भौगोलिक वातावरणात 'हापूस' या जगप्रसिद्ध आंबा फळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. त्यापासून देशाला परकीय चलनदेखील चांगले प्राप्त होते. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील भौगोलिक हवामानानुसार समुद्रकिनारीजवळील आणि सह्याद्री डोगंरपट्ट्यातील असे दोन भाग पडतात.

समुद्रकिनाऱ्याजवळील भागामध्ये हजारो वर्षे मोठ्या प्रमाणात मातीची धूप झाल्याने हा भाग कमी मातीचा आणि खडकाळ असा आढळतो. याला कातळ असे म्हणतात. हे कातळ लाल-जांभ्या दगडाचे बनले आहे. अशा या प्राप्त भौगोलिक परिस्थितीत येथील शेतकऱ्यांनी या कातळ जमिनीतही खड्डे खोदून हापूस आंबा कलमाची लागवड केली आहे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशी कातळावरील हापूस आंबा झाडांची लागवड हजारो हेक्टरमध्ये आढळते.

कोकणात पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असल्याने पारंपरिक रितीने येथील घर बांधणीत मातीबरोबरच या जांभ्या दगडाचाही मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. अलीकडील काळात घरबांधणीत (गृहनिर्माण) व्यवसाय आधुनिकपणे प्रचंड प्रमाणात विकसित होत आहे. कोकणातील आधुनिक गृहनिर्माण व्यवसायात टिकाऊपणासाठी सिमेंट, वाळू , स्टिलबरोबरच जांभ्या दगडही मोठ्या प्रमाणातील मागणी पूर्ण करण्यासाठी आधुनिक 'स्टोन कटिंग मशिन' या यंत्राद्वारे जांभ्या दगडाचे उत्पादन काढले जाते. या ठराविक मापाच्या जांभ्या दगडांना चिरा असे म्हटले जाते, तर या दगडाचे उत्खनन केलेल्या मोठ्या व खोल खड्ड्यांना किंवा जमीन क्षेत्राला 'चिरेखाण ' असे म्हणतात. नापीक व पडीक असलेल्या या कातळ जमिनीत मोठ्या प्रमाणात चिरेखण व्यवसाय विकसित झाला आहे. साधारणतः ३० ते ४० फूट खोल अंतरावर या खाणीतील चिरा दगडाचे उत्खनन थांबवले जाते. खाजगी चिरेखाण उद्योजकांबरोबरच येथील काही शेतकरीदेखील आपल्या कातळ जमिनीवरील आंबा बागेतील काही क्षेत्रात चिरेखाण व्यवसाय करीत आहेत. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात उत्खनन/ उत्पादन क्षमता संपलेल्या अशा हजारो खाणी आता पडीक आहेत.

कृषि पर्यटन संकल्पनेतून या पडीक चिरेखाणींचा वापर करता येणे शक्य आहे. पावसाच्या पाण्याने या चिरेखाणी तुंडुंब भरलेल्या असतात. शेती क्षेत्रात किंवा शेती क्षेत्राच्या नजीक असलेल्या या चिरेखाणीचा शेतकऱ्यांच्या स्वरूपात विकास करता येईल. चिरेखाणी लगतच्या पडीक जमिनीत आंबा, काजू, भाजीपाला यांची लागवड, तसेच इतर शेती उपक्रम करता येईल. चिरेखाणीतील पाण्याचा वापर करता येईल. चिरेखाणी जलाशयामध्ये गोड्या पाण्यातील मत्स्यपालन करता येईल. चिरेखाणी लगतच्या विकसित केलेल्या आंबा, काजू बागेत किंवा शेतावर निसर्गाची शेतीची आवड असलेल्या शहरातील लोकांना कृषी पर्यटक म्हणून आकर्षित करता येईल. या बागेत किंवा शेतावर गवत, बांबू नारळाच्या झाडाच्या झावळ्या, तसेच माती यांच्यापासून तयार केलेल्या ग्रामीण पंरतु सेल्फ कन्टेन्ड झोपड्या बांधून निसर्गाच्या सान्निध्यात त्यांची निवास व्यवस्था करता येईल. स्थानिक भोजन व खाद्य संस्कृतीचा त्यांना आस्वाद घेता येईल आणि सर्वांत आनंददायक म्हणजे या चिरेखाणीच्या जलाशयात जीव संरक्षक साधनांच्या साहाय्याने छोट्या पारंपरिक होड्या किंवा

छोट्या फायबरच्या पॅडल बोटींमधून नौकाविहाराचा तसेच पोहाण्याचाही आनंद पर्यटकांना देता येईल.

अशा प्रकारे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात पडीक असलेल्या चिरेखाणीचा शेतीसाठी पाणीपुरवठा , गोड्या पाण्यातील मत्स्यपालन आणि जलविहार या प्रमुख बाबींच्या दृष्टिकोनातून पर्यटनात्मक विकास करता येईल.

## १९.४ कृषी पर्यटनाची व्याप्ती

कृषी पर्यटन संकल्पनेच्या माध्यमातून शेतीला जोड व्यवसाय निर्माण व्हावा, शेती व ग्रामीण विकासाला चालना मिळावी, शेतीपूरक व्यवसायाचा विकास होणे यातून ग्रामीण भागात शाश्वत पर्यटनाचा विकास होणे अशा प्रकारे कृषी पर्यटनाची संकल्पना व्यापक होत आहे. यासंदर्भात पुढील मुद्दे उपस्थित होत आहेत.

**१) कृषी विकास:**

शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे. पंरतु शेतीचे पारंपरिक व हंगामी स्वरूप यामुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न  व रोजगार मिळत नाही. यावरील अनेक उपाय व पर्यायांपैकी कृषी पर्यटन हा बहुस्पर्शी पर्याय ठरला आहे. त्याला काही शेतकरी व शहरी पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. शेती उत्पादनाबरोबरच कृषी पर्यटनातून मिळणाऱ्या रोजगार व अधिकच्या उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. याचा अंतिम परिणाम म्हणून ग्रामीण भागात कृषी विकासाला चालना मिळत आहे.

**२) ग्रामीण विकास :**

ग्रामीण भागातील शेती व शेतीपूरक व्यवसाय, ग्रामीण कारागीर, त्यांची विविध कुटिरोद्योग व प्राथमिक पायाभूत सुविधा या सर्वांमधून रोजगार, आर्थिक उत्पन्न व राहणीमानाचा दर्जा उंचावणे यांची ग्रामीण जनतेला अपेक्षा असते. यातून ग्रामीण विकास संकल्पना निर्माण होते. परंतु आज रोजगार, आर्थिक उत्पन्न व राहणीमानाचा दर्जा या प्रमुख बाबींच्या  दृष्टीने ग्रामीण विकासाची दयनीय अवस्था आढळते. यासाठी शासनाच्या विविध प्रयत्नांबरोबरच कृषी पर्यटन हादेखील महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरत आहे. कृषी पर्यटनातून शेती उत्पादक, शेती पूरक व्यवसायाचे उत्पादक, ग्रामीण कारागीर, विविध कला , लोककला सादर करणारे घटक, पर्यटनास आवश्यक वाहतूक व्यवस्था आणि तत्सम सेवा देणारे घटक या बहुतांश घटकांना रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाच्या दर्जामध्ये सुधारणा होईल. एकंदरितच कृषी पर्यटनामुळे एकप्रकारे ग्रामीण विकासाला चालना मिळेल.

**३) बेकारी निर्मूलन :**

आजही बहुतांशी ग्रामीण भागात पारंपरिक व हंगामी स्वरूपाची शेती केली जाते. यासोबतच अनिश्चित पर्जन्यमान, हवामान तर वाढलेल्या तापमानामुळे शेती उत्पादनात सातत्यपूर्ण घट; शेतीपूरक व्यवसायाचा खुंटलेला विकास; पर्यायी रोजगार संधीचा अभाव यामुळे ग्रामीण भागात बेकारी मोठ्या प्रमाणात आढळते. कृषी पर्यटनाच्या निमित्ताने येणाऱ्या पर्यटकांची पर्यटनाबरोबरच

स्थानिक विविध प्रक्रिया पदार्थ, विविध ग्रामीण वस्तू व उत्पादने यांच्या खरेदीची वृत्ती व वाहतूक व्यवस्था व सेवांची गरज या बाबी विचारात घेऊन ग्रामीण भागात शेती प्रक्रिया, फळ प्रक्रिया, अन्नप्रक्रिया व कुटिरोद्योग यांची छोटी युनिटस (केंद्रे) सुरू केल्यास व त्याला कृषी पर्यटनाच्या रूपाने स्थानिक पातळीवरच बाजारपेठ उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील बेकारी काही प्रमाणात कमी करण्यास निश्चितच मदत होईल.

**४) स्थलांतरास आळा :**

ग्रामीण भागातील अधिकांश शेतीमध्ये मर्यादित रोजगाराच्या संधी व पर्यायी रोजगाराचा अभाव आढळतो. तर दुसरीकडे शहरी भागात उद्योग व अन्य विविध सेवा व्यवसायामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक व तरूण पिढी रोजगार व आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर करतात. त्यामुळे ग्रामीण भागात स्थलांतराची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावरील विविध उपायांपैकी कृषी पर्यटन हा समग्र पर्यायच आहे. यामध्ये नीटनेटकी व व्यावसायिक शेती, शेती पूरक व्यवसाय व विविध उपक्रम, ग्रामीण उद्योग, ग्रामीण मनोरंजन, पर्यटकांची भोजन, निवास व वाहतूक व्यवस्था आदी व्यवसायांच्या पुनर्रचनात्मक विकासाला चालना देण्यात आली आहे. यातून गावातच अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होऊन त्याद्वारे स्थलांतराची समस्या बऱ्याच अंशी मर्यादित करता येईल.

**५) कृषी विविधीकरणाला चालना :**

केवळ अन्नधान्य व उदरनिर्वाहाच्या पिकांचे उत्पादन म्हणजे शेती नसून विविध शेतीपूरक व जोडव्यवसाय व उपक्रमांमुळे शेतीच्या विकासाला हातभार लागतो. यातून कृषी विविधीकरणाची संकल्पना निर्माण होते. कृषी पर्यटन संकल्पना हीसुद्धा कृषी विविधिकरणाचा एक नवा; परंतु महत्त्वाचा भाग बनत आहे. कृषी पर्यटनाच्या निमित्ताने येणाऱ्या शहरी पर्यटकांना ग्रामीण भोजन, निवासपद्धती, ग्रामीण, सांस्कृतिक कला यांच्याबरोबरच इतर शेतीपूरक व जोड व्यवसाय पाहण्याची आवड व उत्सुकता असते. उदा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीमेंढी पालन, फळबागायती वगैरे. यामुळे कृषी पर्यटनामध्ये विविधता येते. यास अनुसरून शेतकऱ्यांना आपल्या शेतात व परिसरात व राहपालन, इमूपालन, शेततळ्यातील मत्स्यपालन, रेशीमपालन, मधुमक्षिकापालन, अळंबी उत्पादन, फुलशेती (फ्लोरिकल्चर), गांडूळ खत प्रकल्प, औषधी वनवस्पतीची लागवड, फुलफळझाडांची नर्सरी, शेती, फळ व मत्स्यप्रक्रिया व्यवसाय वगैरे जोड व्यवसायांमधून कृषी पर्यटन व कृषी विविधीकरणाला चालना मिळेल.

**६) पर्यटकांसाठी निसर्ग व निवांत पर्यटनाचे साधन :**

पर्यटन ही चैनीची बाब राहिली नसून आधुनिक युगातील धावपळीच्या व ताणतणावग्रस्त जीवनशैलीची ती एक महत्त्वाची गरज बनली आहे. पर्यटनातून आनंदप्राप्ती बरोबरच शांती व निवांतपणाची अपेक्षा असते. जी शहरातील गर्दी, गोंगाट, धावपळीच्या जीवनामध्ये साध्य होत नाही. शहरी पर्यटक जेव्हा प्रचलित व प्रसिद्ध पर्यटन स्थळांकडे जातो. तेव्हा तेथील गर्दी, गोंगाट, विविध प्रदूषणे, गैरसोयी, महागाई आदी अनेक कारणांमुळे त्याचा भ्रमनिरास होतो. पंरतु कृषी पर्यटनाच्या माध्यमातून जेव्हा पर्यटक एखाद्या गावात ग्रामीण भागात येतात तेव्हा त्यांना शेती, शेती संस्कृती, शेतकरी कुटुंबाचे आदरातिथ्य ग्रामीण संस्कृती यांच्या सहवासातून आनंद मिळतो त्याचबरोबर निसर्गाचा खरा सहवास व मनस्वी शांतता व निवांतपणा मिळतो. कृषी पर्यटनातून त्यांना निसर्ग सौंदर्य व शांत -निवांतपणाचे खरे सौख्य अनुभवता येते.

### ७) कृषी पर्यटकांचा कृषी संस्कृतीशी परिचय:

शहरामध्ये विकसित झालेले व विस्तारत जाणारे विविध उद्योग व सेवा प्रचंड प्रमाणातील व्यवसाय, तसेच त्यामध्ये असणाऱ्या रोजगाराच्या संधी व आर्थिक विकासाची क्षमता यातून शहरी जीवनात आधुनिक व भौतिक सुखाच्या प्राप्तीला पराकोटीचे महत्त्व दिले जात आहे. याच कारणास्तव शहरी समाज शेती आणि शेती संस्कृतीपासून खूप दूर गेला आहे. परंतु कृषी पर्यटनाचा आनंद व मनोरंजनाबरोबर शेती म्हणजे काय ? विविध पिके, शेतीची कामे, शेतीचे जोडव्यवसाय, शेतकऱ्याच्या समस्या, प्रगतीच्या व समाधानाच्या त्यांच्या कल्पना हे सर्व समजून घेता येईल. अनुभवता येईल. थोडक्यात कृषी पर्यटनामुळे शहरी पर्यटक आणि शहरातील नवी पिढी यांचा कृषी संस्कृतीशी परिचय करून देता येईल.

### ८) ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास :

ग्रामीण जनतेच्या विकासाच्या दृष्टीने स्थानिक पातळीवरील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास महत्त्वपूर्ण ठरतो. या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शेती, शेतीपूरक व्यवसाय, जोडव्यवसाय, ग्रामीण कुटिरोद्योग, मासेमारी व्यवसाय आदी महत्वाचे घटक आहेत. सद्य स्थितीतील यातील काही व्यवसाय संक्रमण अवस्थेत आहेत असे असले तरी ग्रामीण विकासासाठी नवा पर्याय असलेल्या कृषी पर्यटन व्यवसायाच्या संकल्पनेत या सर्व व्यवसाय घटकांना पर्यटन व व्यवसाय मूल्य निर्माण झाले आहे. याचा विचार करून या ग्रामीण व्यवसाय घटकांचा पुनर्रचनात्मक आणि परस्परांशी समन्वय साधून विकास केल्यास आपोआपच स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल.

## १९.५ कृषी पर्यटनाचे महत्त्व

व्यक्तीच्या दैनंदिन जीवनापासून ते व्यक्ती, समाज, देशाच्या विकासामध्ये शेतीला महत्त्वाचे स्थान आहे.भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा भक्कम पाया आहे. आज जगभरच्या विशेषतः युरोपियन विकसित राष्ट्रांच्या आर्थिक मंदीच्या वातावरणात याच शेती व्यवसायाच्या भक्कम पायामुळे भारतीय अर्थव्यवस्था सक्षमपणे उभी आहे असे असले तरी अनेकविध कारणांमुळे शेती आणि शेतकऱ्यांची स्थिती चिंताजनक आहे. यावरील अनेक उपायांपैकी कृषी पर्यटन व्यवसाय हा उत्तम पर्याय आहे. कृषी पर्यटनामुळे शेतीला बहुविध व व्यावसायिक स्वरूप प्राप्त होते यामध्ये निसर्ग, शेती पूरक व्यवसाय, सेवा व्यवसाय, ग्रामीण उद्योग, ग्रामीण कला-क्रीडा यांसह गावातील बहुतांश घटकांना सामावून घेत त्यातून रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकास करण्याची क्षमता आहे. या सर्व दृष्टीने कृषी पर्यटनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे अधोरेखित करता येईल.

### १) कृषी सहवासाची आनंददायी पर्यटन संकल्पना:

शहरांमधील रोजगाराच्या अनेकविध संधी त्यातून अधिकाधिक आर्थिक विकासाचा प्रयत्न यातून आधुनिक जीवनशैली, भौतिक, सुखसुविधांचा ध्यास यामुळे शहरी लोक कृषी संस्कृतीपासून खूप दूर गेले आहेत. सततच्या धावपळीच्या व ताणतणावाच्या जीवनपद्धतीमुळे आनंदप्राप्तीसाठी पर्यटन ही त्याची गरज बनली आहे. परंतु नेहमीच्या प्रसिद्ध पर्यटन स्थळाकडील विविध समस्यांमुळे त्यांना पर्यटनाचा खरा आनंद मिळू शकत नाही. कृषी पर्यटनातून मात्र त्यांना निसर्ग, हिरवीगार शेती, फळबागायती, शेतीचे जोड व्यवसाय, उपक्रम, शेतकरी कुटुंब, त्यांचे आदरातिथ्य, परंपरा

सण, उत्सव इ. जवळून पाहता येतील. त्यात सहभागी होता येईल. थोडक्यात शेतीच्या सहवासातून आगळ्यावेगळ्या आनंददायी पर्यटनाचा खरा आनंद घेता येईल.

**२) किफायतशीर पर्यटन :**

पर्यटन हा जगभर वेगाने विस्तारणारा आणि जगातील प्रथम क्रमांकाचा व्यवसाय बनला आहे. पर्यटन ही समाजातील केवळ उच्चभ्रू लोकांची मिरासदारी राहिली नसून समाजातील सर्व घटकांच्या आनंद प्राप्तीचे एक महत्त्वाचे साधन बनले आहे यातूनच पर्यटनाचा सर्वदूर प्रचार व प्रसारदेखील मोठ्या प्रमाणात झाला आहे. आज पर्यटनाचे अनेक प्रकार व अनेक प्रेक्षणीय पर्यटन स्थळे प्रसिद्ध व उपलब्ध आहेत. परंतु वाहतूक, भोजन, निवास या प्रमुख व इतर संबंधित सुविधांच्या दृष्टीकोनातून हे प्रचलित पर्यटन प्रचंड खर्चिक बनले आहे. त्याचबरोबर वाढती महागाई, तसेच खासगी क्षेत्रातील रोजगार आणि आर्थिक उत्पन्नाची अनिश्चितता यामुळे समाजातील विशेषत: शहरी भागातील सर्वसामान्य लोकांना या प्रचलित पर्यटनाचा लाभ घेणे शक्य होत नाही. परंतु कृषी पर्यटन यावर उत्तम पर्याय ठरत आहे. निसर्ग व शेतीचा सहवास शेतकऱ्यांच्या राहत्या किंवा शेतावरील घरात. निवास व्यवस्था, शेतकऱ्यांचा पारंपरिक पाहुणचार, घरगुती व स्थानिक भोजनाचा आस्वाद, ग्रामीण लोककला व खेळांचा आनंद, निसर्ग तसेच शेती व गावपरिसरातील पायी भटकंती बैलगाडीतून सफर आणि ग्रामीण/स्थानिक उत्पादनांची खरेदी असे कृषी पर्यटनाचे साधे व नैसर्गिक स्वरूप आहे. त्यामुळेच ते वाजवी खर्चात करता येण्याजोगे व पर्यटनाचा आगळावेगळा आनंद देणारे पर्यटन आहे. थोडक्यात कृषी पर्यटन हे शहरी व सार्वसामान्य पर्यटक घटकांसाठी किफायतशीर पर्यटन आहे.

**३) कृषी जीवनाची ओळख :**

शहरी भागात प्रचंड प्रमाणात विविध उद्योगधंदे, तसेच सेवा व्यवसायांचा विकास झाला आहे त्यातून रोजगाराच्या व आर्थिक विकासाच्या संधी, विविध नागरी सुविधा, चांगल्या राहणीमानाचा दर्जा, व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी, आधुनिक व भौतिक सुखसुविधा प्राप्त होतात. ग्रामीण व कृषी जीवनशैलीत या साऱ्यांचा बहुतांशी प्रमाणात अभाव आढळतो. आदी अनेक कारणांमुळे शहरी समाज शेती आणि शेतीच्या इतर माहितीपासून (ज्ञानापासनू) खूप दूर गेला आहे. परंतु कृषी पर्यटनाच्या निमित्ताने शहरातील लोकांना शेतीचा परिचय करून घेता येईल. शेती आणि शेतकरी जीवनाचा सहवास अनुभवता येईल. शेती म्हणजे काय ? शेतीचे विविध हंगाम, अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबिया आदी विविध प्रकारची पिके, फळ बागायतीची शेती, फुलशेती, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीमेंढीपालन, मस्त्यपालन यासारखे जोडव्यवसाय, शेतीतील नवनवीन उपक्रम, शेतविहीर, शेततळे, पाट यासारखी पाणीपुरवठ्याची साधने, शेतीच्या विविध कामातील शेतकऱ्यांचे अपार कष्ट, समस्या, सुखदु:खे, त्यातही त्याची समाधानी वृत्ती इ. सर्व जवळून पाहता येईल. समजून घेता येईल. त्यांच्याशी संवाद साधता येईल. याचबरोबर शेतकऱ्यांचे विविध सण-उत्सव, जत्रा, लोककला, ग्रामीण खेळ, शेतावरील गमतीजमती यातून आनंद घेता येईल. थोडक्यात कृषी पर्यटनाच्या निमित्ताने शहरी लोकांना पर्यटकांना शेती, शेतकरी व शेती संस्कृतीशी परिचय करून घेता येईल.

**४) बेकारी, स्थलांतर व रोजगाराला सक्षम पर्याय :**

देशातील ग्रामीण भागात आजही शेती हाच प्रमुख व्यवसाय म्हणून केला जातो. पंजाब,

हरियाणा, महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र हा विभाग आदीसारख्या काही ठराविक प्रगत व व्यावसायिक शेतीच्या विभागांचा अपवाद वगळता ग्रामीण भागात सद्यस्थितीतही शेती पारंपरिक स्वरूपाचीच केली जाते उदा. शेतीचे हंगामी व उदरनिर्वाह मर्यादित स्वरूप, शेतीचे वाढते तुकडीकरण, निसर्गाचा लहरीपणा, पाणीपुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी, आधुनिक तंत्रज्ञान व सुधारित बाबींच्या मार्गदर्शन व वापराचा अभाव, व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव, जोड व्यवसायाचा योग्य प्रमाणात न झालेला विकास, बाजारपेठेतील शेतीमालाच्या दरांची अनिश्चितता व परिणामी शेतीतील घटते उत्पादन इ. अनेक कारणांमुळे रोजगार संधीचा अभाव आणि त्यामुळे ग्रामीण भागात बेकारी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. यातून बेकार लोकांचे रोजगारासही शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे. त्यामुळे गावे आणि शेती ओस पडली आहेत. या ग्रामीण बेकारी, स्थलांतर आणि रोजगार संधीच्या समस्येवर कृषी पर्यटन संकल्पना सक्षम पर्याय होऊ शकते. कृषी पर्यटन संकल्पनेत नीटनेटकी, नाविन्यपूर्ण व व्यवस्थापनयुक्त शेती अपेक्षित आहे. तसेच शेतीला विविध पूरक व्यवसायांचे, कृषी प्रक्रिया उत्पादन, पूरक व्यवसायाचे, कृषी प्रक्रिया उत्पादन, नाविन्यपूर्ण उपक्रम, पर्यटकांच्या वाहतूक-भोजन-निवासाची व्यवस्था, लोककलामधून मनोरंजन, स्थानिक व ग्रामीण उत्पादनांची विक्री आदी बाबींमधून चांगला रोजगार मिळेल. बेकारी कमी करता येईल. थोडक्यात ग्रामीण भागातील बेकारी, स्थलांतर व रोजगाराचा अभाव यावर कृषी पर्यटनाचा सक्षम पर्याय निर्माण करता येईल.

**५) कृषी उत्पादनांना स्थानिक बाजारपेठ :**

आपल्या आगळ्यावेगळ्या पर्यटन वैशिष्ट्यांमुळे कृषी पर्यटन शहरी पर्यटकांच्या चांगल्या पसंतीस येत आहे. ग्रामीण व कृषी परिसरातील वैविध्यपूर्ण पर्यटनाबरोबरच स्थानिक विविध कृषी उत्पादनेही त्यांच्या आवडीची असतात. या कृषी उत्पादानांच्या नैसर्गिक स्वरूप व सेंद्रिय गुणवत्तेमुळे त्यांची खरेदी शहरी पर्यटक विशेष पसंतीने करतात. शिवाय शहरी बाजारपेठेच्या तुलनेत स्थानिक बाजारात ती वाजवी किमतीत उपलब्ध होतात. त्यामुळेच त्याच्या खरेदीस पर्यटक प्राधान्य देतात. तर यामुळे शेतकऱ्यांचा आपली कृषी उत्पादने प्रसिद्ध किंवा दूरच्या बाजारपेठेत विक्री करण्याचा वेळ आणि काही खर्च वाचू शकतो. एकंदरित कृषी पर्यटनामुळे कृषी उत्पादनाच्या वाढीला, तसेच स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध होण्याला चालना मिळेल.

**६) कृषी विविधीकरण आणि कृषी प्रक्रियेला चालना :**

निसर्ग आणि हिरव्यागार शेतीचा सहवास, तेथील शांती व निवांतपणा, कृषी संस्कृतीची आगळीवेगळी वैशिष्ट्यपूर्णतः किफायतशीरपणा आणि पर्यटनाचा निखळ आनंद यामुळे शहरी पर्यटक विशेषत्वाने कृषी पर्यटनाकडे वळत आहेत. कृषी पर्यटनामुळे शेतीला व्यावसायिक आणि व्यवस्थापनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यासाठी शेतकऱ्याने आपली शेती निटनेटके व्यवस्थापन आणि व्यावसायिक दष्टिकोनातून करण्याची गरज आहे. पर्यटकांना सर्वसाधारणपणे एका ठिकाणी विविध पिके, भाजीपाला लागवड, फळबागायती शेती, फुलशेती, तेलबिया उत्पादन तसेच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व्यवसाय, शेळीमेंढीपालन यांसारखे जोड व्यवसाय त्याचप्रमाणे शेततळ्यातील मत्स्यशेती, रेशीमपालन, मधुमक्षिका पालन, अळंबी उत्पादन, ससेपालन, नर्सरी, वनौषधीची लागवड यांसारखे नवीन शेती उपक्रम एकाच ठिकाणी पाहावयास आवडतात. तसेच कृषी प्रक्रिया उपक्रमही पाहण्यास आवडतात.उदा. विविध फळांचे लोणचे, सरबत, जॅम, काजूगराचे विविध प्रकार, कोकम-जांभूळ सरबत, आंबा-फणस पोळी वगैरे यातील बहुतांश कृषी उत्पादनांची, कृषी

प्रक्रिया पदार्थाची पर्यटक स्थानिक पातळीवर खरेदीसुद्धा करतात. थोडक्यात अशा प्रकारे कृषी पर्यटनातून शेती, जोडव्यवसाय, विविध शेती उपक्रम व कृषी प्रक्रिया व्यवसाय यांचे व्यावसायिक दष्टिकोनातून योग्य व्यवस्थापन व पर्यटकांसमोर योग्य सादरीकरण केल्यास ग्रामीण भागात कृषी विविधीकरणाच्या आणि कृषी प्रक्रियेच्या विकासाला निश्चित चालना मिळेल.

**७) कृषी व ग्रामीण विकास :**

उद्योग आणि सेवा व्यवसायांवर आधारित शहरी भागाच्या विकासाच्या तुलनेत ग्रामीण भागाच्या विकासाची स्थिती विदारक असल्याचे आढळते. शेती हा आजही ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने रस्ते, पाणी, वीज, दर्जेदार आरोग्य व शिक्षणाच्या सोयी आणि पर्यायी रोजगाराच्या संधी यांची चिंताजनक स्थिती आढळते. त्याचप्रमाणे कृषी विकासाच्या दृष्टीने निसर्गाचा लहरीपणा, वाढते तापमान, हंगामी व पारंपरिक शेती, शेतकऱ्याची मानसिकता, व्यावसायिक शेती तसेच शेतीच्या नवीन तंत्रज्ञानाच्या मार्गदर्शन व स्वीकाराचा अभाव, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी, परिणामी घटते उत्पादन, योग्य बाजारपेठेचा अभाव, अनिश्चितता दर, कर्जबाजारीपणा, शासनाची कृषीविषयक धोरणे या बाबी शोचनिय ठरतात. या सर्वांचा कृषी व ग्रामीण विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. यावर कृषी पर्यटन ही संकल्पना प्रामुख्याने पर्यटनाच्या माध्यमातून शेतकऱ्याचे विविध शेती प्रयोग, जोड व्यवसाय, नवीन उपक्रम यांचे कौतुक तर त्याच्या कष्टांची दखल घेणारी ठरते. यामुळे शेतकऱ्याला प्रेरणा मिळते. कृषी पर्यटन ही संकल्पना गावातील शेती, जोडव्यवसाय, शेती उपक्रमांचे उत्पादक घटक, पर्यटकांना वाहतूक भोजन, निवास व्यवस्था पुरविणारे सेवा घटक, कला-लोककलातील मनोरंजन घटक, महिला बचत गट उत्पादक ग्रामीण कारागीर आदी सर्व घटकांना समजावून घेऊन त्यांना पर्यायी रोजगार व आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण करणारी आहे. याचा जाणीवपूर्वक विचार करून कृषी पर्यटन ही संकल्पना शासन व शेतकऱ्यांच्या पुढाकाराने, स्वयंसेवी संस्थांच्या मार्गदर्शनाने, योग्य समन्वय नियोजन व व्यवस्थापनाने तसेच वित्तसंस्थांच्या अर्थ सहाय्याने गावागावात राबविली गेल्यास ग्रामीण भागातील कृषी व ग्रामीण विकासाला निश्चितच बळकटी मिळेल.

**कृषी पर्यटनाचे गुण-दोष/फायदे तोटे :**

**अ) गुण/फायदे :**

१. शहरी कोलाहल, धावपळ, ताणतणाव आणि प्रदूषित वातावरणात राहणाऱ्या पर्यटकांना कृषी पर्यटनाच्या निमित्ताने शांत, निवांत, स्वच्छ व सुंदर निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची संधी मिळेल. शहरी वास्तव्यातील ताणतणाव दूर होऊन त्यांचे शरीर व मन प्रसन्न, प्रफुल्लित आणि उत्साही होण्यास मदत होईल.

२. कृषी पर्यटन केंद्रात शेती, भाजीपाला व फळफळावळ उत्पादनाबरोबरच दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन व शेळी, मेंढीपालन उपक्रम देखील राबविले जातात. त्यांच्या प्रमुख उत्पादनाबरोबरच सेंद्रिय खत निर्मितीस चालना मिळते. त्यामुळे ग्रामीण परिसरात सेंद्रिय शेतीच्या विकासाला प्रोत्साहन मिळते. कृषी पर्यटकांना रासायनिक घटक मुक्त आहाराचा आनंद देता येतो. तसेच बाजारपेठेत सेंद्रिय शेती उत्पादनांना चांगला उठाव व विशेष दर मिळतो.

३. कृषी पर्यटन संकल्पनेत जाणीवपूर्वक कृषी पर्यटन केंद्र विकसित केले जाते. त्यामध्ये शेती उत्पादनाबरोबरच शेतीपूरक व कृषी पर्यटन यांसारखे उपक्रम वर्षभर राबविले जातात. या सर्व उपक्रमांच्या विविध कामांसाठी मनुष्यबळाची फार गरज असते. यातून परिसरातील लोकांना कायमस्वरूपी रोजगारांची संधी प्राप्त होते. उदा. सगुणा बाग, मामा गाव ही कृषी पर्यटन केंद्रे व त्यांचा परिसर.

४. कृषी पर्यटन संकल्पनेमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीतील उत्पादनाबरोबरच कृषी पर्यटनातून त्यांना जास्तीच्या आर्थिक उत्पन्नाचा नवा स्त्रोत/मार्ग मिळेल. तसेच शेतकऱ्याच्या या कृषी पर्यटन केंद्रातील विविध कामे करणाऱ्या परिसरातील शेतमजुरांना देखील जादा मजुरी मिळेल. शेतकरी व शेतमजूर यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल.साहजिकच कृषी पर्यटनामुळे या ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल.

**५) पर्यटकांना ग्रामीण जीवनाचा आनंद :**

शहरातील पर्यटकांना उपलब्ध असलेल्या प्रचलित पर्यटन क्षेत्राबरोबरच कृषी पर्यटन संकल्पनेमुळे कृषी क्षेत्रही उपलब्ध झाले आहे. शांत, निवांत, निसर्ग सहवास, कृषी संस्कृती यांची ओढ/आवड असलेल्या शहरी पर्यटकांना कृषी पर्यटन आता चांगलेच पसंतीस आले आहे. निसर्ग, शेतीचा सहवास, शेतीची विविध कामे, शेतीतील विविध उपक्रम, परिसरातील सुंदर स्थळे, शेतकऱ्याचा साधेपणा, जिव्हाळा, पारंपरिक भोजन, त्यांचे सण, रीतिरिवाज, त्यांच्याशी सुसंवाद या सर्वांमधून पर्यटकांना ग्रामीण व कृषी जीवनाचा मनमुराद आनंद घेता येतो.

**६) कृषी संस्कृतीचे जतन :**

दिवसेंदिवस बदलत जाणारे हवामान, पर्जन्यमान, शेतीचा वाढता उत्पादन खर्च, ग्रामीण युवकांचा शहराकडे असलेला ओढा यामुळे शेती बंद करण्याची किंवा अपरिहार्यपणे करण्याची शेतकऱ्याची मानसिकता या सर्व समस्यांवर 'कृषी पर्यटन' ही संकल्पना संजीवनी ठरत आहे. प्रचलित पर्यटन स्थळांकडून होत असलेला भ्रमनिरास, तर वाजवी खर्चात मिळत असलेला निखळ आनंद यामुळे शहरी पर्यटकांची पावले बऱ्यापैकी प्रमाणात कृषी पर्यटनाकडे वळत आहेत. ग्रामीण भागात आजही शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. काही तरूण, सुशिक्षित व प्रयोगशील शेतकऱ्यांकडून कृषी पर्यटन व्यवसायाचा स्वीकार होत आहे. यामुळे पर्यटकांना निखळ आनंद, कृषी संस्कृतीची माहिती मिळते. तर शेतकऱ्यांना विनादलाली रोख, परंतु जास्तीचे आर्थिक उत्पन्न मिळते. अशा या कृषी पर्यटनामुळे कृषी संस्कृतीचे जतन व शहरी संस्कृतीमध्ये प्रसार होण्यास मदत होते.

**७) परदेशी चलन प्राप्ती :**

कृषी पर्यटनाला देशी पर्यटकांबरोबरच काही परदेशी पर्यटकही आवर्जून प्राधान्य देत आहेत. निखळ आनंदाबरोबरच काही परदेशी पर्यटक भारतीय संस्कृती, ग्रामीण जीवन याबरोबरच भारतीय शेती व तिची सद्यस्थिती, त्यातील नवे बदल, तंत्रज्ञान तसेच शेती व शेतकऱ्यांच्या समस्या येथील निसर्ग व पर्यावरण यांचा अभ्यासाच्या हेतूनेदेखील येतात. यामध्ये काही अभ्यासक, विचारवंत, शास्त्रज्ञ यांचाही समावेश असतो. ही मंडळी प्रचलित पर्यटन स्थळांबरोबरच ग्रामीण भागातील कृषी

पर्यटन केंद्रांनांही आवर्जून भेट देतात आणि भारतीय शेतीतील या नावीन्यपूर्ण जोड व्यवसायाचे कौतूक करतात. या कृषी पर्यटनांचा मनमुराद आनंद घेतात. यातून शेतकऱ्याला पर्यायाने देशाला परकीय चलनाची प्राप्ती होते.

**८) परिसरातील ग्रामीण उत्पादनांना बाजारपेठ :**

ग्रामीण भागातील शेतकरी शेती उत्पादनाबरोबरच इतर घरगुती उत्पादनेही तयार करत असतो यामध्ये फळप्रक्रिया व अन्नप्रक्रिया पदार्थ, तसेच घरातील वापराच्या विविध वस्तू यांचा समावेश असतो. उदा. विविध फळांचे लोणचे, सरबते, कोकम, मध, काजूगर, आंबा-फणसपोळी, हातसडीचे तांदूळ, पोहे, सूप, झाडू, हातशिलाईच्या नक्षीदार गोधड्या यांसारख्या गृहापयोगी वस्तू इ. या व इतर सर्व उत्पादनांना एक खास ग्रामीण ढंग व चव असते आणि शहरी पर्यटकांना याची आवड अप्रूप असते. कृषी पर्यटनाच्या निमित्ताने पर्यटक याची वाजवी दरात खरेदी करतात. तर शेतकऱ्याला जास्तीचे उत्पन्न मिळते. यानुसार कृषी पर्यटनामुळे पर्यटनाबरोबरच परिसरातील ग्रामीण उत्पादनाला चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते.

## १९.६ कृषी पर्यटनाची मर्यादा

**कृषी पर्यटनातील दोष :**

**१) कोकणात नवीन विचार पोहोचविण्यात अडथळा/ अडचणी :**

कोकणातील लोक हे स्थिती व परंपराप्रिय मानले जातात. कोणतेही नवे विचार किंवा नवा बदल ते लगेच स्वीकारत नाहीत. कोकणात नैसर्गिक घटक मोठ्या प्रमाणात उपलब्ध असूनही ते कृषी पर्यटन व अन्य क्षेत्रातील विकासापासून दूर आहेत. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून कोकणातील शेती आणि शेतकरी व अन्य घटक यांचा चांगला विकास करणे शक्य आहे. यासाठी शासनयंत्रणा काही स्वयंसेवी संस्था व प्रसारमाध्यमे बऱ्यापैकी प्रचार व प्रसार करीत आहेत. परंतु कोकणातील शेतकरी याचा फारसा स्वीकार करण्यास पुढे येताना दिसत नाहीत.

**२) भाषेचा अडथळा :**

कोकणातील सुंदर निसर्ग, येथील ग्रामीण जीवन व संस्कृती तसेच हिरवीगार शेती विविध प्रकारच्या फळबागा यांचा सुखद अनुभव घेण्यासाठी चांगल्या प्रमाणात शहरी पर्यटक येथे येत आहेत. यामध्ये शहरी-परभाषिक तसेच परदेशी पर्यटकांचाही समावेश होतो. परंतु या पर्यटकांना मुख्य अडचण भासते ती भाषेची. पर्यटन व्यवसायामध्ये सोयी सुविधाप्रमाणेच संवाद साधण्याला विशेष महत्त्व आहे. स्थलदर्शनाबरोबरच येथील ग्रामीण जीवनशैली संस्कृती, शेती व त्यातील बदल, शेती व शेतकऱ्यांच्या समस्या याबद्दल जाणून घेण्याची पर्यटकांची इच्छा असते. परंतु भाषेच्या अडचणीमुळे ते शक्य होत नाही. शेतकरी आपल्या स्थानिक भाषेव्यतिरिक्त इतर भाषा शिकण्यास स्वारस्य दाखवीत नाही. त्यामुळे पर्यटक काहीसे नाराज होतात. त्यामूळे कृषी पर्यटन विस्तारास याचा काहीशा प्रमाणात तोटा होतो.

**३) शासन यंत्रणेचा अल्प प्रतिसाद:**

कोणत्याही नव्या योजना किंवा क्षेत्राचा प्रसार व विकासासाठी शासन यंत्रणेच्या सकारात्मक

सहकार्याची व मोठ्या प्रतिसादाची आवश्यकता असते व अन्य शासकीय योजना, उपक्रमांप्रमाणेच कृषी पर्यटन संकल्पनेचा प्रचार व प्रसारासाठी शासकिय यंत्रणेचा अल्प व त्रोटक प्रतिसाद जाणवतो. कृषी पर्यटन संकल्पनेचा पर्यटकांमध्ये प्रचार व प्रसार होण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या विशेष प्रयत्नांची गरज आहे. तसेच या कृषी पर्यटन व्यवसायाच्या विस्तारासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन, मार्गदर्शन व अर्थसाहाय्याची गरज आहे. परंतू या सर्व बाबींमध्ये शासकीय यंत्रणेचा अल्प प्रतिसाद आढळतो.

**४) पायाभूत सोयीसुविधांचा अभाव :**

प्रचलित पर्यटन स्थळांठिकाणाची प्रचंड गर्दी, गोंगाट, विविध प्रकारचे प्रदूषण, अनैतिक बाबी, वाढती गुन्हेगारी, सेवासुविधांची वाढीव दर आकारणी, फसवणूक, आनंदप्राप्तीचा झालेला भ्रमनिरास यामुळे पर्यटक शांत-निवांत व साध्या पर्यटन पर्यायाच्या शोधात आहेत. ग्रामीण भागातील व शांत, निवांत निसर्ग आणि हिरव्यागार शेतीच्या सहवासातील कृषी पर्यटन आता त्यांच्या चांगल्या पसंतीस उतरत आहे. परंतु यासाठी चांगले रस्ते, सरकारी व खाजगी वाहन सुविधा, वीज, आरोग्य, दूरध्वनी व्यवस्था, चांगली निवास व्यवस्था, शेतकऱ्यांना कृषी पर्यटन प्रशिक्षण व्यवस्था, पर्यटकांची सुरक्षितता यांसारख्या किमान पायाभूत सोयीसुविधांचा ग्रामीण भागात अभाव आढळतो.

**५) भांडवल उभारणीच्या अडचणी :**

कृषी पर्यटन संकल्पनेत पर्यटकांना शेतकऱ्यांच्या शेतावर किंवा फळबागेत प्रचलित शेती उत्पादनाबरोबरच अन्य शेतीपूरक उपक्रम, तसेच किमान सोयीसुविधांची अपेक्षा असते. उदा. शेतकऱ्यांच्या शेतावर अन्नधान्ये, भाजीपाला, तेलबिया, फुलबागा, फळबाग उत्पादनाबरोबरच गोपालन, शेळीमेंढी, कुक्कुटपालन , ससेपालन, मधुभक्षिका पालन, रेशीमपालन, अळंबी उत्पादन, शेततळे व त्यातील मत्स्यपालन हे विविध शेतीपूरक उपक्रम याबरोबरच शेतावरील स्वतंत्र निवास व्यवस्था हे सर्व पर्यटकांना एकाच ठिकाणी असल्यास विशेष आवडते. या सर्व बाबी व उपक्रम कृषी पर्यटन व्यवसायाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून सुरू करण्यासाठी शेतकऱ्याला भांडवलाची गरज भासते. पंरतु यासाठी शेतकऱ्याला शासनाकडून कोणत्याही अर्थसाहाय्याची किंवा अनुदानाची मदत मिळत नाही. तसेच कृषी पर्यटन क्षेत्राचा पुरेशा प्रमाणात विकास व विस्तार न झाल्याने त्याबरोबरच यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात पुरेसे सातत्य व हमी नसल्याने राष्ट्रीयीकृत अथवा खासगी बँकादेखील शेतकऱ्याला भांडवलाचा पुरवठा (अर्थसाहाय्य) करण्यास तयार होत नाहीत.

**तात्पर्य :**

थोडक्यात कृषी पर्यटनामुळे शेती व्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय, पारंपरिक ग्रामीण व्यवसाय यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था साकारण्यास हातभार लागू शकेल. कृषी पर्यटनामुळे ज्या पद्धतीने शेतकरी वर्ग व ग्रामीण लोकांना फायदे होणार आहेत. त्याचप्रमाणे पर्यटकांनाही त्याचे अनेक लाभ होणार आहेत. जसे कमी खर्चामध्ये पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेता येईल. या कृषी पर्यटनातूनच पर्यटकांचा खऱ्या अर्थाने मन:शांतीचा, मनोरंजनाचा उद्देश सफल होऊ शकेल. त्याचप्रमाणे शहरी व विदेशी उद्देश सफल होऊ शकेल. त्याचप्रमाणे शहरी व विदेशी पर्यटकांना खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवन शैलीचा अभ्यास करता येईल. ती अनुभवता येईल आणि त्यातून आनंदही लुटता येईल.

## १९.७ सारांश

प्रास्ताविकामध्ये कृषी पर्यटनाच्या संकल्पनेचा उदय, तिच्याशी संबंधीत बाबी व आधुनिक मानवी जीवनातील भूमिका यांची चर्चा केली आहे. कृषी पर्यटनाचा विकास या विषयीचा आढावा घेताना त्याच्या वेगळ्या वैशिष्ट्यांमुळे त्याला पर्यटकांची पसंती कशी वाढती आहे या गोष्टीवर लक्ष्य वेधले आहे. कृषी पर्यटनाच्या संदर्भात विविध व्याख्या, संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये, तत्त्वे, गरज, व्याप्ती, महत्त्व आणि गुण दोष याही गोष्टी तपशीलवार मांडल्या आहेत. विशेषतः कृषी पर्यटन आणि कोकण या संबंधाकडे खास लक्ष वेधले आहे. थोडक्यात प्रस्तुत पाठामध्ये कृषी पर्यटन ही संज्ञा अधिकाधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १९.८ स्वाध्याय

१) कृषी पर्यटनाची व्याख्या सांगा. त्याचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

२) कृषी पर्यटन आणि कोकण या विषयांवर निबंध लिहा.

३) कृषी पर्यटनाची गरज आणि त्याचे महत्त्व यावर भाष्य करा.

**४. टिपा लिहा.**

अ) कृषी पर्यटनाचे फायदे

ब) कृषी पर्यटन आणि सिंधुदुर्ग जिल्हा.

क) कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास.

♦ ♦ ♦

# २०

# पर्यावरणीय पर्यटन

**(संकल्पना - स्वरूप आणि जागृती व शासकीय मदत)**

**पाठाची रूपरेषा**

२०.० उद्देश

२०.१ प्रास्ताविक

२०.२ पर्यावरणीय पर्यटन

२०.३ पर्यटनाचा पर्यावरणीय घटकांवरील परिणाम

२०.४ पर्यटनाचे स्वरूप पर्यावरणीय करण्यासाठी उपाय

२०.५ संचालित सहली

२०.६ कृषी पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थळे

२०.७ हंगाम-हवामानानुसार व्यवस्थापन

२०.८ प्रचार आणि प्रचार साहित्य

२०.९ यशस्वी प्रचार नियोजनाचे प्रमुख मुद्दे

२०.१०स्वाध्याय

## २०.० उद्देश

- पर्यावरणीय पर्यटन संकल्पना अभ्यासणे.
- पर्यावरणाचे स्वरूप समजावून घेणे.
- पर्यावरण पर्यटन व्यवसायाच्या व्याप्तीचा अभ्यास करणे.
- पर्यावरण पर्यटन व्यवसायाचे महत्त्व समजावून घेणे.
- पर्यावरण पर्यटन व्यवसायाच्या समस्या जाणून घेणे.

## २०.१ प्रास्ताविक

गेल्या काही दशकांमध्ये पर्यटन क्षेत्रामधील उलाढाल मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसून येते. ही वाढ संख्यात्मक आणि दर्जात्मक अशा दोन्ही प्रकारची आहे. त्याद्वारे पर्यटनाच्या प्रकारांमध्ये देखील अनेक प्रकारचे बदल झाले आहेत. तरीदेखील पर्यटनाची बाजारपेठ, प्रवास, प्रवासाचे ठिकाण आणि पर्यटनाचा प्रचार या पर्यटन प्रणालीतील चार महत्त्वाच्या मुद्यांमध्ये कोणताही फरक

झालेला नाही. सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी काहीतरी उद्देश असतो. तसेच त्यामागे काहीतरी चेतना असते. पर्यटनाचे असे अनेक प्रकारचे उद्देश असतात. त्यामध्ये आसपासच्या प्रदेशाचे सौंदर्य बघणे, इतर देशांतील जनजीवन अभ्यासणे अशा कितीतरी उद्देशांचा समावेश होत असतो. अशा प्रकारे पर्यटकांच्या इच्छेनुसार अथवा ठिकाणांच्या वैशिष्ट्यांनुसार पर्यटनाचे स्वरूप बदलत असते. यामधूनच विशेष पर्यटन पर्यावरणीय पर्यटन ही कल्पना उदयाला आलेली आहे.

या घटकाच्या अभ्यासावरून आपणाला पर्यावरण पर्यटनाची संकल्पना स्पष्ट होईल. विविध पद्धतीने आयोजित केलेल्या सहलींची वैशिष्ट्ये, फायदे तसेच मर्यादा सांगता येतील आणि कृषीपर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या स्थळांची माहिती होईल. हंगाम आणि हवामानानुसार पर्यटनस्थळाचे व्यवस्थापन कसे करावे आणि पर्यटनस्थळाच्या व्यवसायवाढीसाठी आवश्यक असलेली प्रसिद्धी प्रचार व प्रसार साहित्याद्वारे कशी करावी हेदेखील या घटकातून समजेल.

## २०.२ पर्यावरणीय पर्यटन

पर्यटन करण्यामागे अनेक हेतू/उद्देश असतात. तसेच पर्यटन करण्यामागे धार्मिक उद्दिष्टे असण्याचे प्रमाण जरी मोठे असले तरी अन्य प्रमुख उद्देशांनुसार पर्यटन करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळेच काही विशेष पर्यटन प्रकार सुरू झाले आहेत. अशा विशेष पर्यटन प्रकारांमध्ये डोंगरावरील पर्यटन, समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन, जंगल पर्यटन, क्रीडा पर्यटन असे काही प्रमुख प्रकार आहेत. त्यांचे अनेक उपप्रकारदेखील आहेत. त्यांची आपण थोडक्यात माहिती करून घेणार आहोत. मात्र त्यापूर्वी पर्यावरण या संकल्पनेची माहिती करून घेऊया.

पर्यावरण ही अतिशय विस्तृत संकल्पना आहे. त्यामध्ये एखाद्या प्रदेशातील जमीन, पाणी, हवा, वनस्पती, प्राणी अशा सर्व जैविक घटकांचा समावेश होतो. अशा सर्व सजीवांची एकमेकांवर अवलंबून असलेली एक प्रकारची साखळी असते आणि प्रत्येक सजीवाचे त्यातील स्थान वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास ही साखळी तुटते आणि हा समतोल बिघडतो. अशा प्रकारे समतोल बिघडण्यामुळे होणारे काही प्रकारचे तोटे हे तत्कालीन असतात. परंतु बरेचसे मात्र दीर्घकालीन असतात. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या अन्य घटकांसंबंधीची माहिती करून घेणे महत्त्वाचे आहे.

शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, भरपूर सूर्यप्रकाश, घनदाट वनसंपदा, सुसह्य हवामान यांची निसर्गाकडून माणसाला अनमोल देणगी मिळालेली आहे. मात्र तिचा वापर अनेकदा नियोजनपूर्वक होत नाही, असे आपल्याला दिसून येते. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अशा नैसर्गिक साधनसंपत्तीचा नाश तर होत आहेच. परंतु त्याचबरोबर पर्यावरणाचे प्रदूषणदेखील मोठ्या प्रमाणावर होत आहे.

अशा सर्व परिस्थितीमध्ये, ज्या ठिकाणी शुद्ध हवा, पाणी, जंगल असे घटक उपलब्ध असतात. अशा ठिकाणी पर्यटक आकर्षीत होतात. यातूनच पर्यावरण पर्यटनाची कल्पना रूढ झाली. आज पाश्चिमात्य देशांसह भारतामध्ये देखील ही कल्पना चांगली रूजलेली आहे असे आढळते. पर्यावराचे रक्षण करून तसेच संवर्धन करून पर्यटनाचा आनंद घेणे हे पर्यावरण पर्यटनामागील प्रमुख उद्दिष्ट असते.

अनेकदा एखादे ठिकाण पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिद्ध झाले की त्या ठिकाणी पर्यटकांची गर्दी दरवर्षी वाढतच जाते. अशा मोठ्या संख्येमुळे त्या ठिकाणच्या सर्व सोयीसुविधांच्या वापरावर अतिरिक्त

ताण पडतो. अशा मोठ्या गर्दीमुळे तेथे अनेक प्रामुख्याने निवास, वाहतूक, भोजन, करमणूक, संपर्क अशा सेवासुविधा पुरविण्याच्या क्षेत्रातच असतात. त्यामुळे ह्या क्षेत्रातील व्यापार व उलाढाल वाढते. पर्यायाने अधिक प्रमाणावर नैसर्गिक स्त्रोत नष्ट होतात. म्हणजेच जंगले तोडली जाऊन तेथे इमारती उभ्या राहतात. पायवाटा जाऊन पक्के रस्ते होतात. अशा प्रकारचे आक्रमण निसर्गावर केले जाते. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळे सांडपाणी केले जाते. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळे सांडपाणी, कचरा यांच्या विल्हेवाटीबद्दलचे प्रश्न निर्माण होतात.

आज पर्यटक मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकिंगच्या वस्तू वापरत असतात आणि उपयोग झाल्यानंतर त्या तेथेच इतस्ततः फेकून देतात. अशा वस्तूंचा नायनाट होत नसल्याने पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर कायमस्वरूपी नुकसान होते.

अशा प्रकारे त्या ठिकाणच्या नैसर्गिक सौंदर्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. आज श्रीनगर, मसुरी, उटी किंवा महाराष्ट्रामध्ये महाबळेश्वर अशा पर्यटन ठिकाणी काही प्रमाणात हा धोका दिसू लागला आहे.

अशा प्रकारांमुळे होणारे नुकसान हे कायमस्वरूपी व न बदलणारे असते. त्यामुळे पर्यटनस्थळांचे सौंदर्य नष्ट होणार नाही. तेथे प्रदूषण होणार नाही याची काळजी पर्यटक, आयोजक, स्थानिक रहिवासी आणि व्यावसायिक यांनी एकत्रितपणे घेणे आवश्यक ठरते.

## २०.३ पर्यटनाचा पर्यावरणीय घटकांवरील परिणाम

पर्यावरण म्हणजे जमीन, हवा, पाणी, वनस्पती, प्राणी व लोक त्यांची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती यांच्या संयुक्त प्रक्रियेने बनलेली परिस्थिती की ज्यामध्ये भूपृष्ठावरील लोक व प्राणी जगतात. अशा पर्यावरणाचा पर्यटनाशी निकटचा संबंध आहे. अनेक पर्यावरणीय घटकांमुळे जी नैसर्गिक सृष्टीसौंदर्याची स्थळे निर्माण होतात, पशुपक्षी मोठ्या संख्येने एखाद्या भागात वावरतात त्यामुळे पर्यटनाला चालना मिळते. परंतु अलीकडे पर्यटनामध्ये या पर्यावरणीय घटकांचे जतन व संवर्धन करण्याची संकल्पना सामावलेली आहे. या दृष्टीनेही या दोहोंचे परस्पर घनिष्ठ संबंध आहेत. या संदर्भात पुढील घटक महत्त्वाचे ठरतात.

पर्यटनाच्या इतिहासात त्याचा उद्‌गम व विकास यामध्ये पर्यावरणाचे महत्त्व मोठे आहे. भूदृश्य, नैसर्गिक सृष्टीसौंदर्य, हवा, पाणी यांनी बनलेल्या पर्यावरणाकडे पर्यटक आकर्षीत होतात. या जोडीला मानवनिर्मित उपलब्ध सोयी, सामाजिक व सांस्कृतिक घटकांनी पर्यटनाचे क्षितिज विस्तृत बनते. (या घटकांचा पर्यटनवृद्धीवर होणारा परिणाम प्रकरण दोनमध्ये दिला आहे.) पर्यटनाच्या विकासाबरोबर या पर्यावरणीय घटकांमध्ये काही बदल घडून येतात. यासाठी पूर्वीपेक्षा अधिक काळजीपूर्वक पर्यावरणाचे जतन, संवर्धन करून, पर्यटनाचा विकास करण्याचे अवघड कार्य सध्या त्या त्या देशातील पर्यटन विभागाला करावे लागते. यासाठी या व्यवसायाचे शास्त्रीय नियोजन करून पर्यटनामुळे पर्यावरणाचे नुकसान टाळण्याची गरज आहे. पर्यावरणाच्या विविध घटकांवर पर्यटनाचा होणारा परिणाम पुढीलप्रमाणे :-

### १. पर्यटन व नैसर्गिक वनस्पती :

नैसर्गिक वनस्पती हा एक पर्यटन विकासातील महत्त्वाचा नैसर्गिक घटक आहे. या घटकामुळे

नैसर्गिक सृष्टीसौंदर्यात मोलाची भर पडते, पशुपक्ष्यांना आसरा व अन्न मिळते. अशा या घटकांवर पर्यटनाचा जो परिणाम होतो तो पुढीलप्रमाणे :-

(अ) पर्यटक जी झाडे, फळे, फुले, शेवाळ गोळा करतात त्यामुळे त्या विभागातील नैसर्गिक वनस्पतींच्या स्वरूपात बदल घडून येतात.

(ब) पर्यटक राष्ट्रीय उद्याने, जंगले व गवताळ कुरणात जी आग लावतात त्यामुळे झाडे, वेली, गवत यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते.

(क) पर्यटक बऱ्याच वेळा झाडांची तोड करून तंबूसाठी खुंट्या, सोट व शेकोटीसाठी झाडांची तोड करतात.

(ड) पर्यटकांकडून जंगलात कचरा टाकून दिल्यामुळे तेथील वातावरण प्रदूषीत होते.

(इ) मनोरंजन, हॉटेल्स, रस्ते इत्यादींमुळे जंगलव्याप्त, गवताळ क्षेत्रांत झपाट्याने घट होत आहे.

(ई) जंगलातील पर्यटक व त्यांची वाहने यांच्या वावरण्याने झाडांवर विपरीत परिणाम होतो.

(फ) जंगलातील वन्य पशुपक्ष्यांच्या सवयी पर्यटकांमुळे बदलू लागतात. उदा. पर्यटक पशुपक्ष्यांना जे खाण्याचे पदार्थ टाकतात. त्यामुळे त्यांच्या सवयी बदलतात. काही वेळा त्यांना निरनिराळे आजार होतात.

(भ) फर, कातडी, चामडी, हाडे, कूस, सुळे इत्यादी प्राणिज उत्पादनांना दिवसेंदिवस चांगली किंमत येऊ लागल्याने पर्यटक अशा पशुपक्ष्यांची शिकार करतात.

(म) पर्यटनाच्या विकासासाठी राष्ट्रीय उद्याने, राखीव जंगले, अभयारण्ये इत्यादींसाठी लागणारे क्षेत्र सभोवतालच्या शेती क्षेत्रातून वन्य जमिनीच्या भागातून घेतले जाते. हे लोक त्यांची लोकसंख्या वाढली की, या सुरक्षित भागात आक्रमण करतात. त्यामुळे या संरक्षित भागाचे अति नुकसान होते. या सुरक्षित क्षेत्राबाहेर वन्य पशुपक्ष्यांना वावरता येत नाही. पर्यटक त्यांची शिकार करतात. अशा रीतीने पर्यटनाचा या घटकांवर विस्तृत परिणाम होतो. यामुळे पशुपक्ष्यांची संख्याच नव्हे, तर अनेक वृक्ष, वेलींच्या जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

पर्यटक फोटो घेतात, मोठमोठ्याने रेडिओ, टेप लावतात. या आवाजामुळे पशुपक्ष्यांच्या पुनर्निर्माणाच्या कार्यावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यांची संख्या अभयारण्यात असूनही झपाट्याने कमी होऊ लागली आहे. याशिवाय मोटारी, रेल्वे, दुचाकी वाहनांच्या आवाजाचा वाईट परिणाम होत आहे.

### २. पर्यटन व पर्यावरणाचे प्रदूषण:

पर्यावरणीय प्रदूषण व पर्यटन यांचा जवळचा संबंध आहे. वास्तविक पर्यावरण प्रदूषण ही एक जागतिक गंभीर समस्या बनलेली आहे. त्यामध्ये पर्यटनाच्या विकासामुळे भर पडत आहे. उत्तर

अमेरिका, युरोप व भूमध्य सागराच्या किनाऱ्यावरील पुळणी (बीचेस) प्रदूषणाच्या शिकार बनलेल्या आहेत. जंगलातील तळी, तलाव, सरोवरे यांचे प्रदूषण तेथील पर्यटकांमुळे होते. पर्यटकांच्या मोटारी, दुचाकी वाहने, विमाने, रेल्वे यामुळे ध्वनीचे व हवेचे प्रदूषणही वाढत आहे.

**(अ) बीचेसचे प्रदूषण :**

उष्ण कटिबंधातील वालुकामय पुळणी (बीचेस) गेल्या दोन-तीन दशकांत प्रगत राष्ट्रातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. यासाठी पर्यटक संयुक्त संस्थानातील (अमेरिकेतील) मियामी, कॅरिबियन बेटे, भूमध्ये सागरीय किनारा, उष्ण कटिबंधातील सागरी बेटे उदा. मॉरिशस, मालदीव इत्यादी. भारतातील गोवा व इतर सागर किनारे येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी करू लागले. त्याचबरोबर देशांतर्गत पर्यटकही वाढू लागले. या पर्यटकांनी टाकून दिलेल्या विविध वस्तू, अन्न व पेय यांच्या प्लॅस्टिक बॅगा, कागद यांच्या कचऱ्याचे ढीग अशा बीचेसवर वाढू लागले आहेत. पर्यटकांच्या सातत्याच्या वावरामुळे कासवासारख्या जलचर प्राण्यांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ लागला आहे.

**(ब) जलप्रदूषण :**

पर्यटनाच्या विकासामुळे पाण्याचे प्रदूषण वाढत चालले आहे. या पर्यटकांच्या तंबू (tents) सांडपाण्याची विल्हेवाट यामुळेही जलप्रदूषण वाढत चालले आहे, ही पर्यटन क्षेत्रे शक्यतो तळी, तलाव, नद्या, सरोवर यांच्या सान्निध्यात उभारली जातात आणि सांडपाणी अशा जलाशयात मिसळत राहिल्यामुळे या जलाशयांचे झपाट्याने प्रदूषण होत आहे. पर्यटकांनी टाकून दिलेल्या वस्तू पाण्यात मिसळून या प्रदूषणास हातभार लावतात. पर्यटकांचे मलमूत्र विसर्जन हेसुद्धा याचे मुख्य कारण आहे. महाबळेश्वरच्या वेण्णा तलावाच्या प्रदूषणाचे 'पर्यटन' हे मूळ कारण आहे.

**(क) ध्वनिप्रदूषण:**

वास्तविक नागरी वस्तीपासून दूर, शांत, वनांच्या नीरव स्तब्धतेच्या सान्निध्यात, पशुपक्ष्यांच्या सहवासात काही काळ आरामात घालवावा ही पर्यटनाची मूळ प्रेरणा आहे. शहराच्या गोंधळ, गोंगाटापासून दूर जावे असे प्रत्येकाला वाटते. यातूनच पर्यटन स्थळांचा विकास झाला. परंतु हीच पर्यटन स्थळे आज गोंगाटयुक्त बनलेली आहेत. या गोंगाटातून केवळ पर्यटकच नव्हे, तर जंगलातील पशुपक्षीही सुटलेले नाहीत. पर्यटकांच्या वाहनांचा आवाज, रेडिओ, टेपरेकॉर्डर यांचा गोंधळ, घोळक्याने मोठ्या आवाजात म्हटलेली गाणी यामुळे ही पर्यटन केंद्रे गोंगाट व गर्दीची ठिकाणी झालेली आहेत. जंगलव्याप्त भागात अशा आवाजांचा तेथील पशुपक्ष्यांवर विपरीत परिणाम होतो व त्यांची प्रजननक्षमता कमी होते.

पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणाच्या समस्येच्या समाधानासाठी पर्यटनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. कोणतेही पर्यटन स्थळ अति गर्दीचे ठिकाण (Over Crowded) बनणार नाही. याकडे लक्ष दिले पाहिजे. अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने येथे मर्यादित पर्यटकांना प्रवेश द्यावा. सर्व पर्यटनस्थळी सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावून जलप्रदूषण नियंत्रण करावे लागेल. जंगलव्याप्त भागात वाहनांचा वेग कमी ठेवावा लागेल. इतर आवाज करणारी मनोरंजनाची साधने यांच्या वापरावर बंदी आणणे इत्यादी उपायांनी ही प्रदूषण समस्या सोडविता येईल.

**३. पर्यटन व पशुपक्षी :**

वन्य पशुपक्षी हा पर्यावरणाचा एक महत्त्वाचा घटक असून पर्यटन विकासात त्याचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतातील जिम कॉर्बेट नॅशनल पार्क, काझीरंगा अभयारण्य, भरतपूरचे पक्षी अभयारण्य अशा कित्येक राष्ट्रीय उद्यानांना पर्यटक दरवर्षी लाखोंच्या संख्येने भेट देतात व पशुपक्ष्यांच्या सान्निध्याचा रोमहर्षक अनुभव घेतात. परंतु तेथील पशुपक्ष्यांच्या दृष्टीने ज्या गंभीर समस्या निर्माण होतात, त्यांचा विचार केला पाहिजे. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळे अभयारण्यांचे शांत वातावरण बिघडते. सातत्याने होणाऱ्या आवाजांमुळे पशुपक्ष्यांचे स्वास्थ्य खराब होते. त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर, इतर सवयींवर व पुनर्निर्मिती क्षमतेवर होतो. गीर अभयारण्यातील सिंहाच्या संख्येमध्ये वाढ न होणे हे याचे उदाहरण आहे.

पर्यटनाचा अशा रीतीने पर्यावरण घटकांवर जो विविध प्रकारचा अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे पर्यटनाच्या मर्यादा स्पष्ट होतात. यातूनच पर्यटनाच्या शास्त्रीय व परिपूर्ण नियोजनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. योग्य वेळी त्या संदर्भातील उपाययोजना करून जगातील विकसित आणि विकसनशील देशात वेगाने पसरणाऱ्या पर्यटन व्यवसायाचे भवितव्य आशादायक ठेवण्याचा प्रयत्न करावा लागेल.

## २०.४ पर्यटनाचे स्वरूप पर्यावरणीय करण्यासाठी उपाय

**१. पर्यायी पर्यटनस्थळांचा प्रचार व विकास:**

प्रसिद्ध पर्यटनस्थळाच्या ठिकाणी/गावांमध्येदेखील पर्यटन सुविधा निर्माण करून त्यांचा प्रचार केल्यास गर्दीचा प्रवाह तिकडे वळविता येईल. त्यामुळे एकाच ठिकाणावर ताण पडणार नाही. त्याद्वारे पर्यावरणाचा समतोल काही प्रमाणात सांभाळला जाईल. त्याचबरोबर व्यवसायाच्या वाढीव संधीदेखील उपलब्ध होतील.

**२. सवयींमध्ये बदल:**

पर्यटनाला गेल्यावर आपल्या शहरी जीवनातील काही सवयी बदलणे गरजेचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने पर्यावरणास हानीकारक बाबींचा वापर टाळला पाहिजे. उदाहरणार्थ, प्लास्टिकच्या वस्तूंचा कमी वापर करून कमीतकमी प्लास्टिक कचरा तयार करणे, पर्यटनस्थळावर शक्य तेथे वाहनांऐवजी सायकलचा वापर करणे अथवा पायी फिरणे, तसेच काही प्रमाणात खाण्याच्या सवयींमध्येदेखील बदल केला पाहिजे. हवाबंद प्रक्रिया केलेल्या पदार्थांऐवजी ताजे, स्थानिकरीत्या उपलब्ध असलेले अन्न, फळे व भाजीपाला यांचा आहारात समावेश असावा. त्यामुळे पर्यटनस्थळावर कचऱ्याची समस्या कमी प्रमाणात निर्माण होईल.

**३. पर्यावरणाबद्दल जाणीवजागृती:**

फिरत असताना आसपासच्या प्रदेशातील झुडपे, गवत व अन्य वनस्पती निष्कारण तोडू नयेत, झाडांची फुले/फळेदेखील तोडू नयेत. अशाने त्या भागाचे सौंदर्य तर कमी होतेच, परंतु पर्यावरणाचे देखील नुकसान होते. पर्यटनाच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या जलस्त्रोतांचा (उदाहरणार्थ विहीर, नदी, ओढा इत्यादी) वापर काळजीपूर्वक करावा. त्यामध्ये कचरा व अन्य टाकाऊ पदार्थ टाकून प्रदूषण करू नये. तसेच निष्काळजीपणे आगपेटीची जळती काडी फेकू नये. अशा अनेक कृतींमधून आपणास पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करता येईल.

स्वतःची वागणूक हाच इतरांना आदर्श असतो. त्यामुळे पर्यावरण पर्यटनामध्ये पर्यटकांची भूमिकाच अधिक महत्त्वाची असते. ते स्वतःच्या वागण्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश सर्वत्र पोहोचवू शकतात. पर्यावरणाचा प्रश्न हा एखादे गाव, राज्य अथवा देश पातळीवर मर्यादित नाही. त्यामुळे पर्यावरणाच्या बाबतीमधील निष्काळजीपणाचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागतात. असे दुष्परिणाम काही प्रमाणात टाळण्यासाठी पर्यावरण पर्यटन ही काळाची गरज आहे.

## २०.५ संचालित सहली (स्थानिक/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय)

वेळेच्या मर्यादेमुळे पर्यटकांना कमी काळात अनेक ठिकाणांना भेट देणे आवश्यक बनते. अशा परिस्थितीमध्ये त्यांच्या गावापासून विमान, रेल्वे, बस व इतर साधनांचे आरक्षण, मुक्कामाच्या ठिकाणी हॉटेलमध्ये आरक्षण, प्रवास व इतर शंकांसंबंधी सल्ला व सेवा, विविध प्रकारच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता अशी सर्व कामे करण्यासाठी संपूर्ण पर्यटन कार्यक्रमाचे काळजीपूर्वक नियोजन करणे अतिशय गरजेचे असते. असे नियोजन करण्यासाठी बराच वेळ लागतो; परंतु पर्यटकाकडे जर अशा कामांसाठी आवश्यक असलेला वेळ उपलब्ध नसेल तर ही सर्व कामे एखाद्या व्यक्ती वा संस्थेमार्फत करून घेता येऊ शकतात. अशा प्रकारच्या सेवासुविधा पुरविणाऱ्या संस्थेस प्रवास कंपनी असे म्हणतात. अशा प्रकारच्या प्रवास कंपनीमार्फत पर्यटकांना वैयक्तिकरीत्या मार्गदर्शनदेखील केले जाते. त्याचबरोबर पर्यटकांच्या गरजा आणि अंदाजपत्रकानुसार सहलीचे नियोजनसुद्धा करून दिले जाते. त्यामध्ये प्रवास, निवास, आरक्षण, स्थलदर्शन अशा गोष्टींचा समावेश असतो. अशा प्रकारच्या सेवा पुरविण्यापोटी कंपनीला ग्राहकाकडून सेवाशुल्क मिळते. अनेक महानगरांमध्ये तसेच अन्य शहरांमध्ये अशा पद्धतीने सहलींचे आयोजन करण्याचा प्रकार हल्ली अधिक प्रमाणावर लोकप्रिय होऊ लागला आहे.

याउलट, एखादी कंपनी ठराविक प्रवासमार्गावरील निश्चित कालावधीमध्ये काही ठिकाणांची एकत्रित सहल आयोजित करते. अशा आयोजित सहलींना संचालित सहली असे म्हणतात. अशा प्रकारच्या सहलींसंबंधी वृत्तपत्रामधील जाहिराती तुम्ही बघितल्या असतील.

संचालित सहलींची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. मर्यादित कालावधीमध्ये एखाद्या विभागातील अनेक स्थळे पाहणे शक्य होते.

२. गटाने पर्यटन केल्याने ते काही प्रमाणात स्वस्त पडते.

३. पर्यटकाला स्वतःच्या प्रवास, निवास, आरक्षणाची काळजी करावी लागत नाही. त्याची व्यवस्था कंपनी करते.

४. सहलीबरोबर व्यवस्थापक/मार्गदर्शक असतो. त्यामुळे काही अडचणी आल्यास मदत मिळू शकते, तसेच प्रवासातील ठिकाणांबद्दलची माहिती मिळते.

५. विशिष्ट पद्धतीचे भोजन उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे वृद्ध व्यक्ती, तसेच काही पथ्य असणाऱ्या व्यक्तींची सोय होते.

६. प्रवासामध्ये काही प्रसिद्ध ठिकाणी खरेदी करावयाची असल्यास त्याबद्दल योग्य मार्गदर्शन मिळते. त्यामुळे फसवणूक होत नाही.

७. वैयक्तिक व सामानाची सुरक्षितता मिळते.

अशा प्रकारे आज संचालित सहली ह्या सर्व प्रकारच्या पर्यटनांसाठी लोकप्रिय झालेल्या आहेत. अनेक वर्तमानपत्रे आणि इतर प्रसिद्धी माध्यमांतून तुम्ही त्यांच्या जाहिरातीदेखील बघितल्या असतील. कृषीपर्यटनांच्या संदर्भात अशा प्रकारच्या संचालित सहली इस्त्राईल व अन्य कृषीप्रगत देशांमध्ये आयोजित केल्या जातात. पीक-उत्पादन, पाणीव्यवस्थापन, तसेच अन्य प्रगत तंत्रांबद्दलची माहिती अशा ठिकाणी मिळते. महाराष्ट्राच्या कृषीप्रगत भागातील शेतकरी अशा संचालित सहलींमध्ये माहिती मिळवू लागलेले आहेत. स्थानिक, तसेच राष्ट्रीय पातळीवर मात्र संचालित कृषीसहली आयोजित करण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे व्यवसायक्षेत्र म्हणून अशा संचालित कृषीसहलींच्या आयोजनाला उज्ज्वल भवितव्य आहे.

## २०.६ कृषीपर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थळे

भारतामध्ये जमीन, हवामान, पीकपद्धती यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर विविधता आढळून येते. आपल्या देशाचे ते एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. ह्या वैशिष्ट्यामुळेच आपल्या देशात पर्यटनासाठी व्याप्ती फार मोठी आहे. आपल्या देशात जवळजवळ सर्व प्रकारची पिके कमी-अधिक प्रमाणात घेतली जातात. त्यांमध्ये तृणधान्य, कडधान्य, फळे, भाजीपाला, गळितांची पिके, मसाल्याची पिके यांचा प्रामुख्याने समावेश होतो. यांपैकी काही वैशिष्ट्यपूर्ण पिके प्रत्यक्ष शेतीमध्येच बघणे व त्यांबद्दल माहिती करून घेणे हे नेहमीच औत्सुक्यपूर्ण असते. याबाबत काश्मीरमधील केशर व सफरचंदाच्या बागा, हिमाचल प्रदेशातील फुलांची व्हॅली आणि आसाममधील चहाचे मळे, महाराष्ट्रातील आंबा, द्राक्ष, डाळिंब बागा वा फुलशेती प्रकल्प अशी काही उदाहरणे सांगता येतील. तसेच प्रसिद्ध व महत्त्वपूर्ण पर्यटनस्थळांच्या आसपास असलेली कृषीसंशोधन केंद्रे, कृषीशिक्षणसंस्था यांचादेखील कृषीपर्यटनस्थळांच्या यादीत समावेश करता येईल.

महाराष्ट्राचा विचार केल्यास राज्यातील चारही कृषीविद्यापीठे, त्यांच्या अंतर्गत कार्यरत असणारी संशोधन केंद्रे, काही प्रगत शेतकऱ्यांची प्रक्षेत्रे, कृषीविज्ञान केंद्राचे प्रक्षेत्र अशा काही प्रमुख कृषीपर्यटनस्थळे आहेत, असे आपल्याला म्हणता येईल. तसेच महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब, हरियाणा इत्यादी राज्यांत कृषीपर्यटन ही संकल्पना राबविण्याचे प्रयत्न चालू आहेत. याचा फायदा काही प्रगतिशील व भांडवलदार शेतकरी व्यावसायिक तत्त्वावर करून घेत आहेत.

## २०.७ हंगाम-हवामानानुसार व्यवस्थापन

पर्यटनाचा हंगाम हवामानाशी मोठ्या प्रमाणावर निगडित असतो. उन्हाळ्याच्या काळात अनेक लोक थंड हवेच्या ठिकाणी पर्यटनास जातात, किंवा हिवाळयामध्ये बर्फावरील खेळ, गिरिभ्रमण असे पर्यटन प्रकारदेखील लोकप्रिय आहेत. आता तर पावसाळ्यामध्येही अनेक लोक वर्षासहलींचा आनंद घेतना दिसतात. माळशेज घाट, लोणावळा, आंबोली अशी काही ठिकाणे वर्षासहलींसाठी प्रसिद्ध झाली आहेत. त्याचप्रमाणे कृषीपर्यटनस्थळाचेदेखील हंगाम-हवामानानुसार व्यवस्थापन करावे लागते. त्याची आवश्यकता आपण थोडक्यात समजून घेऊ.

१. कृषीपर्यटनस्थळावर उपलब्ध असलेल्या पीक प्रकारानुसार पर्यटकांच्या गर्दीचा काळ निश्चित असतो. उदाहरणार्थ, धान्यपिकांच्या बाबतीत ज्वारी, हरबरा, गहू यांसारखी पिके असतील. तर कोवळ्या कणसांच्या वा घाट्यांच्या अवस्थेत हुरडा उपलब्ध करून पर्यटकांना आकर्षीत करता येतो. तसेच आंबा, द्राक्षे यांसारखी फळपिके पूर्ण बहरात असताना अशा बागांमध्ये

पर्यटकांना नियोजनबद्ध पद्धतीने आकर्षीत करता येते. ह्यासाठी कृषीपर्यटनस्थळाची योग्य काळात जाहिरात व प्रसिद्ध करणे गरजेचे असते.

२. कृषीपर्यटनस्थळावर पर्यटकांसाठी खुला भाग आणि अन्य प्रतिबंधित भाग असे व्यवस्थित विभाजन असणे आवश्यक असते. कृषीपर्यटनस्थळावर जर गर्दी वाढली तर अशा परिस्थितीमध्ये त्या अतिरिक्त गर्दीमुळे उभ्या पिकांचे वा शेतावरील साधने, उपकरणे, अवजारे यांचे नुकसान होऊ शकते. अशा प्रकारच्या नुकसानीमुळे दीर्घकालीन तोटेदेखील होऊ शकतात. म्हणून कृषीपर्यटनस्थळावर योग्य रीतीने आखलेले रस्ते असावेत. ते कच्च्या स्वरूपाचेदेखील चालतील; मात्र ते प्रक्षेत्रावरील पिकांपासून योग्य अंतरावर असावेत. पर्यटक पिकांमध्ये शिरून नुकसान करणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी राखणदार असावेत. तसेच शक्य असल्यास प्रतिबंधित क्षेत्राला पक्के कुंपण असावे अथवा प्रतिबंधित क्षेत्राचे फलक असावेत.

३. कृषीपर्यटनस्थळावर एका वेळी मर्यादित गटांनाच प्रवेश देता येऊ शकतो. फार गर्दी झाल्यास तेथील पिकांचे वा मालमत्तेचे नुकसान होऊ शकते. त्यासाठी प्रवेशसंख्येवर मर्यादा ही कृषीपर्यटनस्थळाच्या व्यवस्थापनातील महत्त्वाची बाब आहे.

४. खरीप व रब्बी हंगामात निरनिराळी धान्यपिके घेतली जातात. त्या पिकांच्यादेखील अनेक जाती असतात. त्यामुळे त्यांत मोठ्या प्रमाणावर विविधता असते. हे सर्व वैविध्यपूर्ण प्रकार एकाच हंगामात एकत्रितपणे पर्यटकांना बघण्यासाठी उपलब्ध करून देता येतात. उदाहरणार्थ, एकाच पिकाच्या अनेक जाती किंवा एका वर्गातील पिके (वेलवर्गीय, कंदपिके इत्यादी) यासाठी शेतावर स्वतंत्र विभाग करता येईल. हे सर्व शक्य होण्यासाठी योग्य नियोजन व व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

## २०.८ प्रचार आणि प्रचारसाहित्य

व्यापार आणि उद्योगांच्या संदर्भात सध्याचे युग जाहिरातींचे आहे असे हल्लीच्या काळी नेहमीच म्हटले जाते. ते पूर्णपणे सत्य आहे. विविध माध्यमांद्वारे होणाऱ्या प्रभावी जाहिरातीमुळे एखादे उत्पादन अतिशय लोकप्रिय कसे होऊ शकते, याची काही उदाहरणे तुम्हाला माहीत असतील. पर्यटनक्षेत्रामध्ये व्यवसायाच्या अनेक नवीन संधी निर्माण झाल्यामुळे त्या क्षेत्रामध्येदेखील अनेक संस्था वा व्यक्ती यांनी सेवा पुरविण्यास सुरूवात केली. अशा प्रकारच्या स्पर्धेमुळे आपापल्या सेवा-सुविधांची जाहिरात करून जास्तीत जास्त ग्राहकांना स्वतःकडे कसे आकर्षीत करून घेता येईल याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यातूनच स्वतःच्या व्यवसायाचा प्रचार करण्याचे आणि प्रचारासाठी योग्य असे साहित्य विकसित करण्याचे तंत्र उदयाला आले. प्रभावी प्रचार जाहिराती, तसेच आकर्षक प्रचारसाहित्यामुळे पर्यटन-व्यवसायाची उलाढाल फार मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसून येते. पर्यटनाच्या दृष्टीने प्रचाराचे विशेष महत्त्व आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. पर्यटन हा प्रामुख्याने हंगामी/मर्यादित काळातील व्यवसाय आहे. त्यामुळे पर्यटन हंगाम सुरू होण्यापूर्वी नियोजनात्मक जाहिराती, तसेच पर्यटन हंगामामध्ये प्रोत्साहनपर जाहिराती करून पर्यटकांना आकर्षीत करता येते.

२. काही विशिष्ट प्रकारच्या संचालित सहलींसाठी जाहिरात करताना समाजातील वृद्ध व्यक्ती हा लक्ष्यगट असतो. अशा जाहिरातींमध्ये लक्ष्यगटाच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने माहिती

दिलेली असते. उदाहरणार्थ, मधुमेहींसाठी विशिष्ट आहार, याच काळामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणे, इत्यादींमुळे लक्ष्यगटाच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन जाहिरात केल्यास ती उपयुक्त ठरते.

३. पर्यटनाच्या सेवेची मागणी ही बऱ्याचदा किमतीवर अवलंबून असते आणि ती आर्थिक गटांनुसार बदलते. पर्यटनसहलींचा खर्च हा त्यामध्ये पुरविल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष सेवांच्या दर्जावर अवलंबून असतो. प्रवास, निवास किंवा वाहतूक या सेवांसाठी जर उच्च श्रेणीच्या सुविधा वापरल्या तर सहलीचा खर्च वाढतो. उदाहरणार्थ, वातानुकूलित वाहनाने प्रवास, विमान प्रवास, उच्च श्रेणीच्या हॉटेलमध्ये वास्तव्य व भोजन यांसारख्या सेवांमुळे सहलींचा खर्च वाढतो. मात्र त्याऐवजी सामान्य सेवा वापरल्यास कितीतरी कमी खर्चात सहल करता येते. म्हणजेच पर्यटन करणे हे प्रत्येकाला आपापल्या कुवतीनुसार शक्य होते, हे जाहिरात प्रचाराने सिद्ध करता येते.

४. पर्यटनक्षेत्रामध्ये सेवा वापरण्यापूर्वी त्याचे पैसे भरावे लागतात. उदाहरणार्थ, प्रवास तिकिटांचे आरक्षण, हॉटेलाचे आरक्षण इत्यादी. त्यामुळे ग्राहकांना पर्यटनाकडे आकर्षीत करण्यासाठी प्रभावी जाहिरात व प्रचार करणे आवश्यक असते.

५. पर्यटनव्यवसायामधील स्पर्धा खूप वाढलेली आहे. त्यामुळे ग्राहकांसाठी त्यांच्या स्वतःच्या गरजा व कुवतीनुसार अनेक पर्याय उपलब्ध आहेत. स्पर्धा वाढल्यामुळे या व्यवसायात अनेक अनिष्ट प्रथा सुरू झालेल्या दिसतात. अशा सर्व परिस्थितीमध्ये वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रभावी प्रचार करणे आवश्यक ठरते.

६. उपलब्ध सेवांची माहिती लोकांपर्यत पोहोचली नाही तर लोक त्याचा वापर करत नाहीत. अनेकदा पर्यटनस्थळांची तसेच तेथे उपलब्ध असणाऱ्या सर्व सेवासुविधांची माहिती लोकांपर्यंत पूर्णपणे पोहोचविली जात नाही. त्यामुळे उपलब्ध पर्यायांची माहिती लोकांना नसते. अशी माहिती जाहिरातीद्वारे करून देता येईल.

प्रचार या शब्दाचा अर्थ कोणताही विक्रेता आणि ग्राहक यांमधील संवाद असा होतो. अशा संवादांचा हेतू प्रामुख्याने ग्राहकास वस्तू विकत घेण्यास प्रवृत्त करणे असा असतो. त्याबरोबर उत्पादनाबद्दलची माहिती देणे असादेखील असतो. जाहिरात म्हणजे विविध माध्यामांद्वारे केलेली वस्तूंची/सेवांची प्रसिद्धी. प्रचार/जाहिरात म्हणजे खर्च नसून व्यवसायासाठी एक प्रकारची गुंतवणूक असते असे म्हटले जाते. मात्र, त्यासाठी अतिशय काळजीपूर्वक नियोजन करणे आवश्यक असते.

## २०.९ यशस्वी प्रचार नियोजनाचे प्रमुख मुद्दे

यशस्वी प्रचार नियोजनाचे चार प्रमुख मुद्दे आहेत. ते पुढील प्रमाणेः

**१. लक्ष्यगटाची निश्चिती :**

जाहिरात वा प्रचार करताना लक्ष्यगट निश्चित करणे अतिशय गरजेचे असते. आपले उत्पादन किंवा आपली सेवा वापरणारा संभाव्य लक्ष्यगट कोणता, त्याची वैशिष्ट्ये कोणती आहेत, याचा विचार करणे आवश्यक असते. तसेच प्रचार करताना लक्ष्यगटाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमीदेखील विचारात घ्यावी लागते. जाहिरातीमधील संदेश योग्य अशा लक्ष्यगटापर्यंत पोहोचणे यावरच जाहिरातीचे यश अवलंबून असते.

**२. प्रचारउद्दिष्टे निश्चिती :**

प्रचार व जाहिरात करण्यामागील उद्दिष्टे स्पष्ट आणि निश्चित असावीत. अशी उद्दिष्टे खालीलप्रमाणे असू शकतात.

(१) संभाव्य ग्राहकांना उपलब्ध सेवा-सुविधांची माहिती करून देणे,

(२) व्यवसायात वाढ करणे,

(३) प्रतिस्पर्ध्यांपेक्षा वेगळेपण दाखविणे,

(४) नवीन सेवा-सुविधा लोकप्रिय करणे.

**३. विविध प्रचार पर्यायांचा आढावा घेणे :**

विविध पद्धती वा माध्यमांद्वारे प्रचार केल्यामुळे प्रत्येक पद्धतीचे फायदे आणि मर्यादा लक्षात येतात. त्यातूनच आपली उद्दिष्टे साध्य करणारी योग्य पद्धत निवडता येते. अशी पद्धत निवडताना लक्ष्यगटांची पार्श्वभूमी लक्षात घेणेदेखील गरजेचे असते. साक्षर लक्ष्यगटासाठी मुद्रित माध्यमांचा प्रभावी वापर करता येतो. त्यासाठी वृत्तपत्रे, घडीपत्रिका अशा साधनांचा उपयोग होतो. लक्ष्यगट जर उच्च आर्थिक गटामधील असेल तर विविध मासिके, आकर्षक माहितीपुस्तके अशा साधनांचा देखील उपयोग करता येतो. दृक्-श्राव्य माध्यमांपैकी दूरचित्रवाणी हे सर्व प्रकारच्या जाहिरातीसाठी उपयुक्त आहे, असे आढळून आले आहे. त्याच्या साहाय्याने तरूण, वृद्ध, निरक्षर, ग्रामीण अशा विविध स्तरांतील लक्ष्यगटापर्यंत सहजपणे संदेश पोहोचू शकतो. आता इंटरनेटच्या साहाय्यानेदेखील जाहिरातीचे तंत्र मोठ्या प्रमाणावर विकसित झालेले दिसून येते.

**४. प्रचाराची योग्य वेळ साधणे:**

जेव्हा लोक पर्यटनाला जाण्याच्या मन:स्थितीमध्ये असतात, म्हणजेच ऐन पर्यटनाच्या हंगामात प्रचार करून उपयोग होत नाही. त्याऐवजी पर्यटन हंगामाच्या पूर्वीच योग्य प्रकारे प्रचार केल्यामुळे लोकांना पर्यटन कार्यक्रमाचे नियोजन करता येते. योग्य वेळ साधून केलेला प्रचार अधिक परिणामकारक असतो असे दिसून येते. जाहिरात व प्रचाराद्वारा ग्राहकांपर्यंत पोहोचून त्यांना सर्व सेवासुविधांची माहिती करून देता येते. या दृष्टीने जाहिरात व प्रचाराच्या काही प्रमुख प्रकारांची आपण माहिती करून घेऊया.

**१. वैयक्तिक प्रचार :**

संभाव्य ग्राहकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना वस्तूची वा सेवेची माहिती पुरविली जाते. प्रचाराची ही अतिशय प्राचीन पद्धत आहे. ही पद्धत वेळखाऊ असली तरी पुष्कळ परिणामकारक असल्याचे आढळून येते. ग्राहकांच्या सोयीनुसार प्रचारासाठी वेळ व ठिकाण निश्चित करावे लागत असल्यामुळे ही पद्धत खर्चीक असल्याचे दिसून येते. मात्र या पद्धतीद्वारे ग्राहकांच्या सर्व शंकांचे समाधान तात्काळ करता येणे शक्य होते. त्यामुळे वैयक्तिक प्रचार पद्धतीची विश्वासार्हता अधिक आहे. पर्यटन क्षेत्रासाठी ही पद्धत अधिक उपयुक्त असल्याचे आढळून आले आहे.

**२. दूरचित्रवाणीद्वारे प्रचार:**

या पद्धतीमध्ये विक्रेता ग्राहकांना आपल्या मालाची किंवा सेवांची माहिती दूरचित्रवाणीद्वारे

देतो. अशा प्रचारासाठी ठरावीक कार्यपद्धती निश्चित केलेली असते. त्यानुसार एखाद्या शहराचे त्यातील लोकसंख्येनुसार काही भागांमध्ये विभाजन केले जाते. प्रत्येक विक्री-प्रतिनिधीला ठरावीक प्रभाग नेमून दिले जातात. आपल्या प्रभागातील संभाव्य ग्राहकांची यादी तयार करणे, दूरध्वनीवरून त्यांच्याशी संपर्क साधणे, त्यांच्याशी झालेल्या संभाषणाची नोंद ठेवणे आणि त्यानुसार पुढील कार्यवाही करणे अशी कामे विक्री प्रतिनिधीला करावी लागतात.

अशा प्रकारे दूरध्वनीद्वारे काही नावीन्यपूर्ण सेवा अथवा वस्तूंची प्रसिद्धी करता येते. ही प्रचाराची पद्धत इंग्लंड, अमेरिका आणि अन्य युरोपियन देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. आपल्या देशात काही महानगरांपुरताच असा प्रचार करण्यात आलेला दिसतो. मात्र ही पद्धत अद्याप पर्यटनसेवांच्या प्रचारासाठी भारतात फारशी रूढ झालेली नाही. आपल्या देशातील दूरध्वनी सेवेची वाढती उपलब्धता आणि पर्यटनव्यवसायाचे बदलते स्वरूप लक्षात घेता आपल्या देशातदेखील दूरध्वनीद्वारे प्रचार करण्याचे तंत्र मोठ्या प्रमाणावर वापरले जाईल, असे आशादायक चित्र आज दिसते आहे.

### ३. मुद्रित माध्यमांमार्फत प्रचार :

आपल्या उत्पादनात अथवा सेवांची जाहिरात करण्यासाठी मुद्रित माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो, हे तुम्हाला ठाऊक असेल. विविध वर्तमानपत्रांमध्ये, नियतकालिकांमध्ये अनेक व्यवसाय, उत्पादने, सेवा यांच्या जाहिराती तुम्ही पाहिल्या असतील. अशा मुद्रित माध्यमांच्या वापरामुळे फार मोठ्या विस्तृत ग्राहकगटापर्यंत प्रभावीपणे संदेश, माहिती पोहोचविता येते. त्या मानाने त्यासाठी कमी खर्च येतो.

म्हणूनच जाहिरातीसाठी मुद्रित माध्यमाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे आढळून येते. वृत्तपत्रे, नियतकालिके/मासिके यांच्या जोडीने आकर्षक पद्धतीची हँडबिल्स, घडीपत्रिका, माहितीपुस्तिका यांचादेखील जाहिरात/प्रसिद्धीसाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. ह्या प्रचारसाहित्यामध्ये मजकुराची प्रभावी भाषा, आकर्षक चित्रे यांचा वापर केलेला असतो. त्याचबरोबर मुद्रणाच्या आधुनिक तंत्रामुळेदेखील साहित्य अतिशय आकर्षक व परिणामकारक बनलेले दिसते. त्यामुळे असे प्रचारसाहित्य खूप उपयोगी असते. व्यावसायिक दृष्टिकोनातून अशा प्रचारसाहित्यामध्ये संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध क्लृप्त्या वापरलेल्या असतात. सुटसुटीत, आटोपशीर आकार आणि माफक किंमत यासह परिणामकारक प्रसिद्धीक्षमता ह्या गुणांमुळे पर्यटनसेवांच्या प्रचारासाठी मुद्रित माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असल्याचे दिसून येते.

### ४. दृक्-श्राव्य साधनांमार्फत प्रचार:

प्रत्येक नवीन विकसित माध्यमाचा ज्ञान आणि करमणूक यांबरोबरच जाहिरात तसेच प्रचारक्षेत्रासाठीदेखील प्रभावीपणे उपयोग करून घेता येईल असे लक्षात आले. त्यामुळे प्रत्येक माध्यमाचा वापर विविध सेवा/उत्पादने यांची जाहिरात करण्यासाठी केला जाऊ लागला. पर्यटनव्यवसायाची व सेवांचीदेखील जाहिरात या माध्यमांद्वारे प्रभावीपणे होऊ लागली. वर्तमानपत्र वा अन्य मुद्रित साहित्य दुर्गम भागात पोहोचण्यामध्ये अनेक अडचणी होत्या. तसेच निरक्षर व्यक्तींसाठी मुद्रित प्रचारसाहित्याचा उपयोग होत नसे. मात्र रेडिओ, दूरचित्रवाणी, ध्वनि-चित्रफिती अशा दृक्-श्राव्य साधनांमुळे मुद्रित साहित्याची मर्यादा व त्यातील अडचणी यासंबंधी प्रभावी पर्याय उपलब्ध झाला. दूरचित्रवाणीवरील जाहिरातीची परिणामकारकता आपणाला माहिती आहेच. आज तर संगणक

आणि माहिती-तंत्रज्ञानातील प्रगत सुविधांमुळे जाहिरात व प्रचार क्षेत्र फार विस्तारले आहे. कोणत्याही उत्पादन/सेवेची उपलब्धता आता भौगोलिक क्षेत्रांवर मर्यादित राहिलेली नाही, तर त्याची व्याप्ती संपूर्ण जगभर झालेली आहे. त्यामुळे जाहिरात व प्रचार पद्धतीमध्ये आमूलाग्र क्रांती झालेली आहे.

**५. अन्य प्रचारपद्धती:**

मुद्रित तसेच दृक-श्राव्य माध्यमांखेरीज पर्यटनसेवांच्या प्रचारासाठी अन्य पद्धतीदेखील वापरल्या जातात. त्यामध्ये प्रामुख्याने प्रवासी/पर्यटक मेळावे, पर्यटन मार्गदर्शिका, रस्त्यांवरील फलक, पोस्टर/छायाचित्रांचे प्रदर्शन यांसारख्या उपक्रमांचा समावेश होतो. सामूहिक प्रचाराच्या दृष्टीने अशा पद्धती उपयुक्त आहेत.

पर्यटनाच्या प्रकारामध्ये अनेक प्रकारचे बदल झाले असले तरीदेखील पर्यटनाची बाजारपेठ-प्रवास, प्रवासाचे ठिकाण आणि पर्यटनाचा प्रचार या पर्यटन प्रणालीतील चार महत्त्वाच्या मुद्यांमध्ये कोणताही फरक झालेला नाही. पर्यटकांच्या इच्छेनुसार किंवा पर्यटनाच्या ठिकाणांच्या वैशिष्ट्यांनुसार पर्यटनाचे स्वरूप बदलते असू शकते. त्यातूनच विशेष पर्यटन ही कल्पना उदयाला आलेली आहे. डोंगरावरील पर्यटन, समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन, जंगल पर्यटन, क्रीडा पर्यटन ही विशेष पर्यटनाची काही उदाहरणे आहेत. पर्यावरणाचे रक्षण करून, तसेच त्यांचे संवर्धन करून पर्यटनाचा आनंद घेणे हे पर्यावरण पर्यटनामागील प्रमुख उद्दिष्ट असते.

एखादे ठिकाण पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिद्ध झाले की त्या ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढतच जाते. त्यामुळे तेथील सोयी-सुविधांवर ताण पडतो. अशा प्रकारांमुळे होणारे नुकसान हे कायमस्वरूपी व न बदलण्यासारखे असते. त्यामुळे पर्यटनस्थळाचे सौंदर्य नष्ट होणार नाही, तेथे प्रदूषण होणार नाही याची काळजी पर्यटक, आयोजक, स्थानिक रहिवासी आणि व्यावसायिक यांनी एकत्रितपणे घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी पर्यायी पर्यटनस्थळांचा प्रचार व विकास, सवयींमध्ये बदल, पर्यावरणाबद्दल जाणीवजागृती असे उपाय करता येतील. पर्यावरण पर्यटनामध्ये पर्यटकांची भूमिकाच अधिक महत्त्वाची असल्याने ते स्वतःच्या वागण्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश सर्वत्र पोहोचवू शकतात.

## २०.१० स्वाध्याय

१. पर्यावरण पर्यटन म्हणजे काय ते स्पष्ट करून देशाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व सांगा.

२. पर्यटनाचे स्वरूप पर्यावरणीय करण्यासाठी कोणत्या उपाययोजनांची गरज आहे ते सांगा.

३. पर्यावरणीय पर्यटनाच्या यशस्वी प्रचार व जाहिरातीसाठी कोणत्या गोष्टीची गरज पडते ते सांगा

४. पर्यटनाचा पर्यावरणीय घटकांवरील परिणाम सांगा.

♦ ♦ ♦

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | Desai A.R. | Rural Sociology in India |
| | | Popular Publication 1994 5th Edition |
| २. | डॉ. विलास संगरे | भारतातील सामाजिक समस्या |
| | | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - १९७९ |
| ३. | प्रा. श्रीमती शरयू अनंतराम | सामाजिक संस्था |
| | | महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर १९८१. |
| ४. | प्रा. बाबा वि. तिजारे | सामुदायिक विकास आणि विस्तार शिक्षण |
| | | महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ |
| | | औरंगाबाद १९८३. |
| ५. | प्रा. ए. वाय. कोंडेकर | समाजशास्त्र |
| | | फडके पब्लिकेशन्स, कोल्हापूर २००८. |
| ६. | डॉ. भा. कि. खडसे | समाजशास्त्राची मूलतत्त्वे |
| | | हिमालया पब्लिशिंग हाऊस मुंबई - २००३ |
| ७. | प्रा. ए. वा कोंडेकर | ग्रामीण समाजशास्त्र |
| | प्रा पी. व्ही. चांदोरकर | फडके प्रकाशन, कोल्हापूर |
| ८. | डॉ. भा. कि. खडसे | भारतीय समाज |
| | | हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई - १९९५ |
| ९. | शांता मालेगावकर | शिक्षण वेध (बदलत्या शिक्षण प्रवाहाचा मागोवा) |
| | वसुधा परांजपे | प्रकाशक - विद्यार्थी साहाय्य समिती, पुणे - २००३. |
| १०. | वि. वा. भिडे | शैक्षणिक समाजशास्त्र |
| | | प्राची प्रकाशन, मुंबई - १८८७ |
| ११. | डॉ. तानाजीराव निकम | ग्रामीण समाजशास्त्र प्रशासन |
| | | प्रकाशक, रामचंद्र दत्ताराम पवार सातारा २००१. |
| १२. | भा. कि. खडसे | समाजशास्त्र परिचय |
| | | हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई २००६. |
| १३. | नी.स. वैद्य/ चं. वा. लाखे | समाजशास्त्राची मूलतत्त्वे |
| | | श्री मंगेश प्रकाशन, नागपूर १९९३. |
| १४. | प्रा डॉ. गुरुनाथ द. नाडगोंडे | ग्रामीण समाजशास्त्र |
| | | कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे १९८६ |
| १५. | रा.ज. लोटे | भारतीय समाज आणि सामाजिक समस्या |
| | | पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर २००५. |
| १६. | डॉ. भा. कि. खडसे | भारतीय सामाजिक समस्या |
| | | श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर १९९१. |

| | | |
|---|---|---|
| १७. | डॉ.एस.बी. शिंदे | पर्यटन भूगोल<br>फडके प्रकाशन, कोल्हापूर २००६ |
| १८. | डॉ. भा. कि. खडसे | भारतीय समाज आणि सामाजिक समस्या<br>हिमालया पब्लिशिंग |
| १९. | प्रा. एस.एन. गंदेवार | भारतीय सामाजिक समस्या<br>विद्याभारती प्रकाशन, लातूर १९९८. |
| २०. | रा.ज. लोटे | भारतातील सामाजिक समस्या<br>पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर १९९९. |
| २१. | प्रा. अनंत वासुदेव वाईकर<br>डॉ. सौ. औरंगाबादकर नलिनी जीवन<br>प्रा. वाघमारे उत्तमराव शिवराम | समाजशास्त्र<br>विशाल पब्लिकेशन, मुंबई २००६ |
| २२. | प्रा. अरुण मळेरीकर | शेती मूलतत्त्वे<br>प्राची प्रकाशन, मुंबई - २००१ |
| २३. | कु. माधवी रेणावीकर | ग्रामीण समाज व परिवर्तन, भाग-३<br>मुक्त विद्या केंद्र टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. |
| २४. | डॉ. हिरा अहेर | उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक<br>विद्या प्रकाशन, नागपूर १९९५ |
| २५. | यशदा | यशदा, यशमंथन, महिला विशेषांक<br>यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन, प्रबोधिनी,<br>पुणे. २००२. |
| २६. | स.मा. गर्गे | भारतीय समाजविज्ञान कोश<br>समाजविज्ञान मंडळ, पुणे १९९० |
| २७. | प्रा. डॉ. सौ. सुधा काळदाते | भारतीय समाजरचना<br>महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ<br>औरंगाबाद १९७६ |
| २८. | महात्मा फुले | कृषिदर्शनी २०१०<br>महात्मा फुले कृषी, विद्यापीठ, राहुरी |
| २९. | शरद पाटील | बँकर टू द पुअर<br>सुविधा प्रकाशन |
| ३०. | श्रीधर देशपांडे/विनायक देशपांडे | भारतीय अर्थव्यवस्था<br>हिमालय पब्लिकेशन हाऊस, मुंबई - २००४. |
| ३१. | श्री पांडुरंग तावरे | कृषी पर्यटन |
| ३२. | डॉ. भालेराव देसाई | भारतीय अर्थव्यवस्था<br>नीराली प्रकाशन, पुणे |

३३. डॉ. विजय कविमंडन कृषि अर्थशास्त्र
श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २०००.

३४. अल्पबचत नियोजन (बचत गट) - प्रा. डॉ. एम्. यू. मुलाली, डायमंड पब्लिकेशन्स्

३५. Rural Development And Poverty Eradiction in India – N. Mukundan – New Century Publications, New Delhi, India.

३६. Micro Finance & Poverty Eradiction – Dr. Daniel Lazar, Professor P. Palanichamy, New Century Publications, New Delhi, India.

३७. Micro Finance & Rural Development in India – S.K. Das, B.P. Nanda & Rath, New Century Publications, New Delhi, India.

३८. Micro Finance in India, A Tool for Women Employment, G. Rama Krishna, Manglam Publications, Delhi.

३९. Micro Finance & Women Empowerment, B. Malleswari Serials Publications, New Delhi, India.

४०. भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. एन्. एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन्स्.

४१. स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था - भोसले, काटे, फडके प्रकाशन.

४२. शेतीचे अर्थशास्त्र - डॉ. गंगाधर वि. कायदे - पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

४३. अल्पबचत नियोजन (बचत गट) - प्रा. डॉ. एम्. यू. मुलाली, डायमंड पब्लिकेशन्स्

४४. Rural Development And Poverty Eradiction in India – N. Mukundan – New Century Publications, New Delhi, India.

४५. Micro Finance & Poverty Eradiction – Dr. Daniel Lazar, Professor P. Palanichamy, New Century Publications, New Delhi, India.

४६. Micro Finance & Rural Development in India – S.K. Das, B.P. Nanda & Rath, New Century Publications, New Delhi, India.

४७. Micro Finance in India, A Tool for Women Employment, G. Rama Krishna, Manglam Publications, Delhi.

४८. Micro Finance & Women Empowerment, B. Malleswari Serials Publications, New Delhi, India.

४९. भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. एन्. एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन्स्.

५०. स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था - भोसले, काटे, फडके प्रकाशन.

५१. शेतीचे अर्थशास्त्र - डॉ. गंगाधर वि. कायदे - पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

५२. अल्पबचत नियोजन (बचत गट) - प्रा. डॉ. एम्. यू. मुलाली, डायमंड पब्लिकेशन्स्

५३. Rural Development And Poverty Eradiction in India – N. Mukundan – New Century Publications, New Delhi, India.

५४. Micro Finance & Poverty Eradiction – Dr. Daniel Lazar, Professor P. Palanichamy, New Century Publications, New Delhi, India.

५५. Micro Finance & Rural Development in India – S.K. Das, B.P. Nanda & Rath, New Century Publications, New Delhi, India.

५६. Micro Finance in India, A Tool for Women Employment, G. Rama Krishna, Manglam Publications, Delhi.

५७. Micro Finance & Women Empowerment, B. Malleswari Serials Publications, New Delhi, India.

५८. भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. एन्. एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन्स्.

५९. स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था - भोसले, काटे, फडके प्रकाशन.

६०. शेतीचे अर्थशास्त्र - डॉ. गंगाधर वि. कायदे - पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

६१. मासिक उद्योजक- फेब्रुवारी २०११

६२. ग्रामीण पर्यटन- ग्रामीण विकासाचे साधन -प्रा.प्रविण सनये.

६३. पर्यटन माहिती पुस्तिका-२००७-०८

६४. विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानीत कार्यशाळा, 'अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पर्यटन विकास ' जाने .२०११ संकलन पुस्तिका.

६५. दै.अॅग्रोवन-ऑक्टोबर २०११

६६. प्रवास पर्यटनाचे नवे पैलू - यशोधरा भोसले , मेहता प ाब्लिशिंग हाऊस पुणे, जाने. २००५

६७. सिधुंदुर्ग जिल्हा पर्यटन माहिती विशेषांक- पर्यटन सागर, संपादक- दि.रा. बांदेकर, २००५

६८. www.nal.usda.gov/ric.ricpubs.tourism.html

६९. कृषी पर्यटन चर्चासत्र - २००६- कृषी पर्यटनातून कोकण समृदधी.

७०. कृषी विज्ञान केंद्र, सिंधुदुर्ग.

७१. कोकणातील पर्यटन - प्र. के. घाणेकर.

७२. पर्यटनातील करिअर - आनंद मापुस्कर.

७३. कृषी पर्यटन- चंद्रशेखर भडसावळे.

७४. मासिक भटकंती - मैत्रेय प्रकाशन .

७५. वेब साईट - अॅग्रो टुरिझम इ. सकाळ.


♦ ♦ ♦

## ग्रामिण विकास- द्वितीय वर्ष कला अभ्यासपत्रिका क्र. २
## ग्रामीण समाज आणि ग्रामीण विकासाचे उपक्रम
## (विभाग पहिला)

**१. भारतीय ग्रामीण समाज**

अ. भारतीय ग्रामीण समाज स्वरूप आणि वैशिष्ट्ये

ब. भारतीय समाजाचे घटक- आदिवासी-ग्रामीण - शहरी- ग्रामीण नागरी सातत्य

क. दुर्बल घटकाच्या समस्या :- अनुसूचित जाती- जमाती आणि महिला.

**२. ग्रामीण संस्थात्मक व्यवस्था**

अ. धर्म- संकल्पना,स्वरूप, कार्य आणि त्याचे बदलते स्वरूप (विविध धर्माचे स्पष्टीकरण अपेक्षित नाही.)

ब. शिक्षण - उद्दिष्टे, कार्य, आणि त्याचे महत्त्व

क. सहकार - संकल्पना, स्वरूप, व्याप्ती, भूमिका आणि ग्रामीण विकासातील त्याचे महत्त्व

**३. ग्रामीण सामाजिक परिवर्तन**

अ. सांस्कृतिकीकरण

ब. पाश्चिमात्यीकरण

क. आधुनिकीकरण

## (विभाग दुसरा)
## ग्रामीण विकासाचे उपक्रम

**४. कृषी विकास**

अ. राष्ट्रीय कृषी धोरण

ब. पाणीपुरवठा आणि जलव्यवस्थापन

क. कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र-आवश्यकता,स्थापना आणि कार्य

**५. ग्रामीण रोजगार निर्मितीचे उपक्रम**

अ. स्वयंसहाय्यता गट

ब. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना - ठळक वैशिष्ट्ये, स्वरूप आणि व्याप्ती

क. कृषी आधारीत उद्योग - व्यवसाय-संकल्पना, प्रकार,कार्य आणि ग्रामीण रोजगार निर्मितीत महत्त्व

**६. पर्यटन विकास**

अ. ग्रामीण पर्यटन - संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती, महत्त्व आणि मर्यादा.

ब. कृषी पर्यटन - संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती, महत्त्व आणि गुणदोष.

क. ग्रामीण पर्यटन - संकल्पना, स्वरूप आणि जागृती शासकीय मदत.

♦ ♦ ♦

द्वितीय वर्ष कला

अभ्यासपत्रिका-क्र.२

# ग्रामीण समाज आणि ग्रामीण समाजाचे उपक्रम

**डॉ. राजन वेळूकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्राध्यापक-नि-संचालक,
दूर व मुक्त शिक्षण संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **श्री अनिल बनकर**
साहाय्यक प्राध्यापक-नि-साहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**संपादक व लेखक** : **डॉ. रविंद्र भा. घागस**
एस. आर.करंदीकर महाविद्यालय,
वडकूम-डहाणू, जि. ठाणे.

**अभ्यास लेखक** : **डॉ. किरण पाटील**
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर, जि. - ठाणे.

**डॉ. सुभाष सावंत**
मंडणगड महाविद्यालय, जि. रत्नागिरी.

**प्रा. सी. रिबेले**
सेंट जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा, आगाशी
विरार (प.) जि. ठाणे.

**प्रा. विक्रम मुंबरकर**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
ओरस, ता. कुडाळ,
जि.- सिंधुदुर्ग.

**फेब्रुवारी २०१२, द्वितीय वर्ष कला, अभ्यासपत्रिका क्र.२, ग्रामीण समाज आणि ग्रामीण समाजाचे उपक्रम.**

**प्रकाशक :** **प्राध्यापक-नि-संचालक**
**दूर व मुक्त अध्ययन संस्था,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.**

अक्षरजुळणी : वरदा ऑफसेट आणि टाईपसेटर्स
अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८.

मुद्रण :

## अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १ | भारतीय ग्रामीण समाज<br>स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १ |
| २ | भारतीय ग्रामीण समाजाचे घटक<br>(आदिवासी - ग्रामीण - शहरी) | १३ |
| ३ | ग्रामीण नागरी सातत्य | २६ |
| ४ | दुर्बल घटकांच्या समस्या<br>(अनुसूचित जाती आणि जमाती) | ३९ |
| ५ | स्त्रियांच्या समस्या | ५४ |
| ६ | ग्रामीण संस्थात्मक व्यवस्था<br>(धर्म -संकल्पना- स्वरूप -कार्य -बदलते स्वरूप) | ६६ |
| ७ | शिक्षण - उद्दिष्टे - कार्य आणि महत्त्व | ७४ |
| ८ | सहकार — संकल्पना — वैशिष्टे — स्वरूप — व्याप्ती — महत्त्व | ९७ |
| ९ | ग्रामीण सामाजिक परिवर्तन<br>(सांस्कृतिकीकरण) | ११४ |
| १० | पाश्चिमात्यीकरण | १२० |
| ११ | आधुनिकीकरण | १२५ |
| १२ | कृषी विकास<br>(राष्ट्रीय कृषी धोरण — २००० आणि अन्नसुरक्षा) | १३३ |
| १३ | पाणीपुरवठा आणि जलव्यवस्थापन | १५० |
| १४ | कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र<br>(आवश्यकता - स्थापना - कार्य) | १६८ |
| १५ | स्वयंसाहाय्यता गट | १८० |
| १६ | स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना | १९५ |
| १७ | कृषी आधारित उद्योग | २०९ |
| १८ | ग्रामीण पर्यटन | २२५ |
| १९ | कृषी पर्यटन (Agro Tourism) | २४७ |
| २० | पर्यावरणीय पर्यटन<br>(संकल्पना - स्वरूप आणि जागृती व शासकीय मदत) | २७० |


♦ ♦ ♦

**Modified Syllabus - for S. Y. B. A. - Rural Development**
**Paper No. II**
**Rural Society and its Development Strategies**
**Section I**
**(Rural Society)**

**I Indian Rural Society :**

a. Indian Rural Society - Nature and Characteristics

b. Factors of Indian Society - Tribal - Rural - Urban - Rural Urban Continuum

c. Problems of Weaker Sections - Schedule Casts, Schedule Tribes and Women

**II Rural Institutional Systems :**

a. Religious - Concept, Nature, Function and Its Changing Structure

b. Education - Objectives, Functions and Importance.

c. Co-operation - Concept, Nature, Scope, Role and Significance in Rural Development.

**III Rural Social Change :**

a. Sanskritization

b. Westernization

c. Modernization

**Section II**
**(Development Strategies)**

**IV Development of Agriculture :**

a. National Agricultural Policy 2000 and Food Security

b. Irrigation and Water Management, Methods of Irrigation, Conventional and Modern Methods.

c. Role of Agricultural Universities and Krishi Vigyan Kendra - Needs and Establishment

**V Sources of Rural Employment:**

a. Self Help Group - Concept, Characteristics and Functions

b. Swarnajayanti Gram Swarojgar Yojana (SGSY) - Silent features of SGSY, Nature and Scope

c. Agro Based Industries - Concept, Types, Functions and Importance in Rural Employment Generation

**VI Tourism Development:**

a. Rural Tourism - Concept, Nature, Scope, Importance and Limitations

b. Agro-Tourism - Concept, Nature, Scope, Merits and Demerits c. Eco-Tourism - Concept, Nature and awareness and Govt. Help

♦ ♦ ♦